| १२ | मंगळवार, दिनांक २२ मार्च, २०२२ | २४८ | २१८ | ३० | ८७.९०% |
| १३ | बुधवार, दिनांक २३ मार्च, २०२२ | २४८ | २१५ | ३३ | ८६.६९% |
| १४ | गुरुवार, दिनांक २४ मार्च, २०२२ | २४८ | २०१ | ४७ | ८१.०४% |
| १५ | शुक्रवार, दिनांक २५ मार्च, २०२२ | २४८ | १५७ | ९१ | ६३.३०% |

## विवरण क्रमांक - ६

## विधानसभा पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन २०२२

दिनांक ३ ते २५ मार्च, २०२२

महाराष्ट्र विधानसभेच्या सदस्यांच्या उपस्थितीचे दिवस व बैठकीच्या एकंदर दिवसांची टक्केवारी

(मा. उपाध्यक्ष, मा. उपमुख्यमंत्री, मंत्री, राज्यमंत्री,विरोधी पक्ष नेता व्यतिरिक्त)

एकूण बैठकांची संख्या - १५

| अ. क्र. | सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | आत्राम, श्री. धर्मरावबाबा भगवंतराव (अहेरी) | १४ | १ | ९३.३३ % |
| २ | आबिटकर, श्री. प्रकाश आनंदराव (राधानगरी) | १५ | ० | १०० % |
| ३ | अडसड, श्री. प्रताप अरुणभाऊ (धामणगाव रेल्वे) | १५ | ० | १०० % |
| ४ | अग्रवाल, श्री. विनोद (गोंदिया) | ११ | ४ | ७३.३३ % |
| ५ | आहेर, डॉ. राहुल दौलतराव (चांदवड) | ११ | ४ | ७३.३३ % |
| ६ | आहिरे, श्रीमती सरोज बाबुलाल (देवळाली) | १५ | ० | १०० % |
| ७ | आयलानी, श्री. कुमारउत्तमचंद (उल्हासनगर) | ९ | ६ | ६० % |
| ८ | आजबे, श्री. बाळासाहेब भाऊसाहेब (आष्टी) | १४ | १ | ९३.३३ % |
| ९ | अळवणी, श्री. पराग (विलेपार्ले) | १३ | २ | ८६.६६ % |
| १० | आवताडे, श्री समाधान महादेव | १५ | ० | १०० % |
| ११ | अंतापूरकर, श्री. जितेश (देगलूर) | १५ | ० | १०० % |
| १२ | आवाडे, श्री. प्रकाश आण्णा (इचलकरंजी) | ५ | १० | ३३.३३ % |
| १३ | आवळे, श्री. राजू (बाबा) (हातकणंगले) | १४ | १ | ९३.३३ % |
| १४ | आजमी, श्री. अबू आसिम (मानखुर्द शिवाजीनगर) | १५ | ० | १०० % |
| १५ | बाबर, श्री. अनिलभाऊ (खानापूर) | १३ | २ | ८६.६६ % |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १६ | बागडे, श्री. हरीभाऊ किसनराव (फुलंब्री) | १२ | ३ | ८० % |
| १७ | बालदी, श्री. महेश (उरण) | १५ | ० | १०० % |
| १८ | बंब, श्री. प्रशांत बन्सीलाल (गंगापूर) | १४ | १ | ९३.३३ % |
| १९ | बांगर, श्री. संतोष लक्ष्मणराव (कळमनुरी) | १० | ५ | ६६.६६ % |
| २० | बनकर, श्री. दिलीपराव शंकरराव (निफाड) | १३ | २ | ८६.६६ % |
| २१ | बनसोडे, श्री. अण्णा दादू (पिंपरी) | १० | ५ | ६६.६६ % |
| २२ | बेनके, श्री. अतुल वल्लभ (जुन्नर) | १४ | १ | ९३.३३ % |
| २३ | भांगडिया, श्री. बंटी (चिमुर) | १० | ५ | ६६.६६ % |
| २४ | भारसाकळे, श्री. प्रकाश गुणवंतराव (आकोट) | १२ | ३ | ८० % |
| २५ | भातखळकर, श्री. अतुल (कांदिवली पूर्व) | १५ | ० | १०० % |
| २६ | भोईर, श्री. विश्वनाथ आत्माराम (कल्याण पश्चिम) | ७ | ८ | ४६.६६ % |
| २७ | भोळे, श्री. सुरेश दामू (राजूमामा) (जळगाव शहर) | १३ | २ | ८६.६६ % |
| २८ | भोंडेकर, श्री. नरेंद्र भोजराज (भंडारा) | १३ | २ | ८६.६६ % |
| २९ | भोसले, श्री. शिवेंद्रसिंह अभयसिंहराजे (सातारा) | ८ | ७ | ५३.३३ % |
| ३० | भोयर, डॉ. पंकज राजेश (वर्धा) | ११ | ४ | ७३.३३ % |
| ३१ | भुसारा, श्री. सुनिल चंद्रकांत (विक्रमगड) | १५ | ० | १०० % |
| ३२ | भुयार, श्री. देवेंद्र महादेवराव (मोर्शी) | १२ | ३ | ८० % |
| ३३ | बोदकुरवार, श्री. संजिवरेड्डी बापूराव (वणी) | १५ | ० | १०० % |
| ३४ | बोरनारे, श्री. रमेश नानासाहेब (वैजापूर) | १५ | ० | १०० % |
| ३५ | बोरसे, श्री. दिलीप मंगळू (बागलान) | १५ | ० | १०० % |
| ३६ | चंद्रीकापुरे, श्री. मनोहर गोवर्धन (अर्जुनी मोरगाव) | १५ | ० | १०० % |
| ३७ | चौधरी, श्री. शिरीष मधुकरराव (रावेर) | १५ | ० | १०० % |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ३८ | चौधरी, श्रीमती मनिषा अशोक (दहिसर) | १४ | १ | ९३.३३ % |
| ३९ | चौगुले, श्री. महेश प्रभाकर (भिवंडी पश्चिम) | १४ | १ | ९३.३३ % |
| ४० | चव्हाण, श्री. दिपक प्रल्हाद (फलटण) | १५ | ० | १०० % |
| ४१ | चव्हाण, श्री. मंगेश रमेश (चाळीसगाव) | १२ | ३ | ८० % |
| ४२ | चव्हाण, श्री. पृथ्वीराज दाजीसाहेब (कराड दक्षिण) | १० | ५ | ६६.६६ % |
| ४३ | चव्हाण, श्री. रविंद्र दत्तात्रय (डोंबिवली) | १२ | ३ | ८० % |
| ४४ | चौधरी, श्री. अजय विनायक (शिवडी) | १३ | २ | ८६.६६ % |
| ४५ | चौगुले, श्री. ज्ञानराज धोंडिराम (उमरगा) | १४ | १ | ९३.३३ % |
| ४६ | दळवी, श्री. महेंद्र हरी (अलिबाग) | १४ | १ | ९३.३३ % |
| ४७ | दानवे, श्री. संतोष रावसाहेब (भोकरदन) | १३ | २ | ८६.६६ % |
| ४८ | दरोडा, श्री. दौलत भिका (शहापूर) | १४ | १ | ९३.३३ % |
| ४९ | देशमुख, श्री. अनिल | ० | १५ | ० |
| ५० | देशमुख, श्री.धिरज विलासराव (लातूर शहर) | १३ | २ | ८६.६६ % |
| ५१ | देशमुख, श्री. नितीनकुमार भिकनराव (बालापुर) | १० | ५ | ६६.६६ % |
| ५२ | देशमुख, श्री. सुभाष सुरेशचंद्र (सोलापूर दक्षिण) | १४ | १ | ९३.३३ % |
| ५३ | देशमुख, श्री. विजयकुमार सिद्रमप्पा (सोलापूर शहर उत्तर) | १४ | १ | ९३.३३ % |
| ५४ | धानोरकर, श्रीमती प्रतिभा सुरेश (वरोरा) | १५ | ० | १०० % |
| ५५ | ढिकले, ॲड. राहूल उत्तमराव (नाशिक पूर्व) | १४ | १ | ९३.३३ % |
| ५६ | धोटे, श्री. सुभाष रामचंद्रराव (राजुरा) | १४ | १ | ९३.३३ % |
| ५७ | धुर्वे, डॉ. संदीप प्रभाकर (अर्णी) | १३ | २ | ८६.६६ % |
| ५८ | एकडे, श्री. राजेश पंडीतराव (मलकापूर) | ११ | ४ | ७३.३३ |
| ५९ | फुंडकर, श्री. आकाश पांडुरंग (खामगांव) | १३ | २ | ८६.६६ % |
| ६० | गाडगीळ, श्री. धनंजय उर्फ सुधीर हरी (सांगली) | ८ | ७ | ५३.३३ % |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ६१ | गायकवाड, श्री. गणपत काळू (कल्याण पूर्व) | १३ | २ | ८६.६६ % |
| ६२ | गायकवाड, श्री. संजय रामभाऊ (बुलढाणा) | १४ | १ | ९३.३३ % |
| ६३ | गजबे, श्री. कृष्णा दामाजी (आरमोरी) | १५ | ० | १०० % |
| ६४ | गावीत, श्रीमती मंजुळा तुळशीराम (साक्री) | १५ | ० | १०० % |
| ६५ | गावीत, डॉ. विजयकुमार कृष्णराव (नंदुरबार) | १२ | ३ | ८० % |
| ६६ | घाडगे-पाटील, श्री. कैलास बाळासाहेब (उस्मानाबाद) | १२ | ३ | ८० % |
| ६७ | गोगावले, श्री. भरत मारुती (महाड) | १३ | २ | ८६.६६ % |
| ६८ | गोरंट्याल, श्री. कैलास किसनराव (जालना) | १५ | ० | १०० % |
| ६९ | गोरे, श्री. जयकुमार भगवानराव (माण) | १५ | ० | १०० % |
| ७० | गुट्टे, श्री. रत्नाकर माणिकराव (गंगाखेड) | १३ | २ | ८६.६६ % |
| ७१ | हंबर्डे, श्री. मोहनराव मारोतराव (नांदेड दक्षिण) | १५ | ० | १०० % |
| ७२ | हिरे, श्रीमती सीमा महेश (नाशिक पश्चिम) | १२ | ३ | ८० % |
| ७३ | होळी, डॉ. देवराव मादगुजी (गडचिरोली) | १५ | ० | १०० % |
| ७४ | जाधव, श्री. भास्कर भाऊराव (गुहागर) | १३ | २ | ८६.६६ % |
| ७५ | जाधव (पाटील), श्री. मकरंद लक्ष्मणराव (वाई) | १३ | २ | ८६.६६ % |
| ७६ | जाधव, श्रीमती यामिनी यशवंत (भायखळा) | ० | ० | ० |
| ७७ | जगताप, श्री. लक्ष्मण पांडूरंग (चिंचवड) | ३ | १२ | २० % |
| ७८ | जगताप, श्री. संग्राम अरुणकाका (अहमदनगर शहर) | १३ | २ | ८६.६६ % |
| ७९ | जगताप, श्री. संजय चंदुकाका (पुरंदर) | १५ | ० | १०० % |
| ८० | जैन, श्रीमती गीता भरत (मिरा-भाईंदर) | १३ | २ | ८६.६६ % |
| ८१ | जैस्वाल (वकील), श्री. आशिष नंदकिशोर (रामटेक) | १५ | ० | १०० % |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ८२ | जैस्वाल, श्री. प्रदिप शिवनारायण (औरंगाबाद मध्य) | १ | १४ | ६.६६ % |
| ८३ | जोरगेवार, श्री. किशोर गजानन (चंद्रपूर) | १३ | २ | ८६.६६ % |
| ८४ | कदम, श्री. राम (घाटकोपर पश्चिम) | १३ | २ | ८६.६६ % |
| ८५ | कदम, श्री. योगेशदादा रामदास (दापोली) | १५ | ० | १०० % |
| ८६ | काळे, श्री. आशुतोष अशोकराव (कोपरगाव) | १४ | १ | ९३.३३ % |
| ८७ | कल्याणकर, श्री. बालाजी देविदासराव (नांदेड उत्तर) | १२ | ३ | ८० % |
| ८८ | कल्याणशेट्टी, श्री. सचिन पंचप्पा (अक्कलकोट) | १५ | ० | १०० % |
| ८९ | कांबळे, श्री. रणजित प्रतापराव (देवळी) | १० | ५ | ६६.६६ % |
| ९० | कांबळे, श्री. सुनिल ज्ञानदेव (पुणे छावणी) | १४ | १ | ९३.३३ % |
| ९१ | कानडे, श्री. लहू नाथा (श्रीरामपूर) | १५ | ० | १०० % |
| ९२ | कांदे, श्री. सुहास (आण्णा) द्वारकानाथ (नांदगाव) | १२ | ३ | ८० % |
| ९३ | कारेमोरे, श्री. राजू माणिकराव (तुमसर) | १५ | ० | १०० % |
| ९४ | कथोरे, श्री. किसन शंकर (मुरबाड) | १५ | ० | १०० % |
| ९५ | केचे, श्री. दादाराव यादवरावजी (आर्वी) | १५ | ० | १०० % |
| ९६ | केळकर, श्री. संजय मुकूंद (ठाणे) | १५ | ० | १०० % |
| ९७ | केराम, श्री. भिमराव रामजी (किनवट) | ० | ० | ० |
| ९८ | केसरकर, श्री. दिपक वसंतराव (सावंतवाडी) | १५ | ० | १०० % |
| ९९ | खाडे, डॉ. सुरेश (भाऊ) दगडू (मिरज) | १५ | ० | १०० % |
| १०० | खोडके, श्रीमती सुलभा संजय (अमरावती) | १५ | ० | १०० % |
| १०१ | खोपडे, श्री. कृष्णा पंचम (नागपूर पूर्व) | १० | ५ | ६६.६६ % |
| १०२ | खोसकर, श्री. हिरामण भिका (इगतपूरी) | १५ | ० | १०० % |
| १०३ | किणीकर, डॉ. बालाजी प्रल्हाद (अंबरनाथ) | १४ | १ | ९३.३३ % |
| १०४ | कोकाटे, ॲड. माणिकराव शिवाजीराव (सिन्नर) | १५ | ० | १०० % |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १०५ | कोळंबकर, श्री. कालीदास निळकंठ (वडाळा) | १५ | ० | १०० % |
| १०६ | कोरे (सावकर), श्री. विनय विलासराव (शाहूवाडी) | १२ | ३ | ८० % |
| १०७ | कोरगांवकर, श्री. रमेश गजानन (भांडुप पश्चिम) | १५ | ० | १०० % |
| १०८ | कोरोटे, श्री. सहसराम मारोती (आमगाव) | १२ | ३ | ८० % |
| १०९ | कोटेचा, श्री. मिहीर चंद्रकांत (मुलुंड) | १४ | १ | ९३.३३ % |
| ११० | क्षिरसागर, श्री. संदिप रविंद्र (बीड) | १४ | १ | ९३.३३ % |
| १११ | कुचे, श्री. नारायण तिलकचंद (बदनापूर) | १५ | ० | १०० % |
| ११२ | कुडाळकर, श्री. मंगेश (कुर्ला) | १३ | २ | ८६.६६ % |
| ११३ | कुल, ॲड. राहुल सुभाषराव (दौंड) | १४ | १ | ९३.३३ % |
| ११४ | कुंभारे, श्री. विकास शंकरराव (नागपूर मध्य) | ११ | ४ | ७३.३३ % |
| ११५ | कुणावार, श्री. समीर त्र्यंबकराव (हिंगणघाट) | १५ | ० | १०० % |
| ११६ | कुटे, डॉ. संजय श्रीराम (जळगाव जामोद) | १४ | १ | ९३.३३ % |
| ११७ | लहामटे, डॉ. किरण यमाजी (अकोले) | १५ | ० | १०० % |
| ११८ | लांडे, श्री. दिलीप भाऊसाहेब (चांदीवली) | १४ | १ | ९३.३३ % |
| ११९ | लांडगे, श्री. महेश (दादा) किसन (भोसरी) | १२ | ३ | ८० % |
| १२० | लंके, श्री. निलेश ज्ञानदेव (पारनेर) | ११ | ४ | ७३.३३ % |
| १२१ | लटके, श्री. रमेश (अंधेरी पूर्व) | १५ | ० | १०० % |
| १२२ | लव्हेकर, डॉ. भारती (वर्सोवा) | १५ | ० | १०० % |
| १२३ | लोढा, श्री. मंगल प्रभात (मलबार हिल) | १४ | १ | ९३.३३ % |
| १२४ | महाजन, श्री. गिरीष दत्तात्रय (जामनेर) | ११ | ४ | ७३.३३ % |
| १२५ | महाले, श्रीमती श्वेता विद्याधर (चिखली) | १४ | १ | ९३.३३ % |
| १२६ | मलिक, श्री. लखन सहदेव (वाशिम) | १० | ५ | ६६.६६ % |
| १२७ | माने, श्री. यशवंत विठ्ठल (मोहोळ) | १४ | १ | ९३.३३ % |
| १२८ | मते, श्री. मोहन गोपाळराव (नागपूर दक्षिण) | १३ | २ | ८६.६६ % |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १२९ | मेघे, श्री. समीर दत्तात्रय (हिंगणा) | १२ | ३ | ८० % |
| १३० | म्हात्रे, श्रीमती मंदा विजय (बेलापूर) | १० | ५ | ६६.६६ % |
| १३१ | मिसाळ, श्रीमती माधुरी सतिश (पर्वती) | १३ | २ | ८६.६६ % |
| १३२ | मोहिते, श्री. दिलीप दत्तात्रय (खेड आळंदी) | १२ | ३ | ८० % |
| १३३ | मोरे, श्री. शांताराम तुकाराम (भिवंडी ग्रामीण) | १४ | १ | ९३.३३ % |
| १३४ | मुफते, श्री. मोहम्मद इस्माईल अब्दुल खलिक (मालेगाव मध्य) | १० | ५ | ६६.६६ % |
| १३५ | मुंदडा, श्रीमती नमिता अक्षय (कैज) | १५ | ० | १०० % |
| १३६ | मुनगंटीवार, श्री. सुधीर सच्चिदानंद (बल्लारपूर) | १४ | १ | ९३.३३ % |
| १३७ | मुटकुळे, श्री. तान्हाजी सखारामजी (हिंगोली) | १४ | १ | ९३.३३ % |
| १३८ | नाईक, श्री. गणेश (ऐरोली) | १४ | १ | ९३.३३ % |
| १३९ | नाईक, श्री. इंद्रनिल मनोहर (पुसद) | १५ | ० | १०० % |
| १४० | नाईक, श्री. मानसिंग फत्तेसिंगराव (शिराळा) | १३ | २ | ८६.६६ % |
| १४१ | नाईक, श्री. शिरीषकुमार सुरूपसिंग (नवापूर) | १२ | ३ | ८० % |
| १४२ | नाईक, श्री. वैभव विजय (कुडाळ) | १२ | ३ | ८० % |
| १४३ | नार्वेकर, ॲड. राहूल सुरेश (कुलाबा) | १३ | २ | ८६.६६% |
| १४४ | नवघरे, श्री. चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत (बसमत) | १२ | ३ | ८०% |
| १४५ | निकम, श्री. शेखर गोविंदराव (चिपळूण) | १५ | ० | १००% |
| १४६ | निकोले, श्री. विनोद भिवा (डहाणू) | ७ | ८ | ४६.६६% |
| १४७ | निलंगेकर-पाटील, श्री. संभाजी दिलीपराव (निलंगा) | १४ | १ | ९३.३३% |
| १४८ | पाचपुते, श्री. बबनराव भिकाजी (श्रीगोंदा) | ११ | ४ | ७३.३३% |
| १४९ | पाडवी, श्री. राजेश उदेसिंग (शहादा) | १५ | ० | १००% |
| १५० | पारवे, श्री. राजु देवनाथ (उमरेड) | १४ | १ | ९३.३३% |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १५१ | पटेल, श्री. अमीन (मुंबादेवी) | १५ | ० | १००% |
| १५२ | पटेल, श्री. राजकुमार दयाराम (मेळघाट) | १२ | ३ | ८०% |
| १५३ | पाटील, श्री. अनिल भाईदास (अमळनेर) | १४ | १ | ९३.३३% |
| १५४ | पाटील, श्री. बाबासाहेब मोहनराव (अहमदपूर) | १५ | ० | १००% |
| १५५ | पाटील, श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू (कोथरुड) | १२ | ३ | ८०% |
| १५६ | पाटील, श्री. चंद्रकांत निंबाजी (मुक्ताईनगर) | १२ | ३ | ८०% |
| १५७ | पाटील, श्री. चिमणराव रुपचंद (एरंडोल) | १३ | २ | ८६.६६% |
| १५८ | पाटील, श्री. किशोर आप्पा (पाचोरा) | १४ | १ | ९३.३३% |
| १५९ | पाटील, श्री. कुणालबाबा रोहिदास (धुळे ग्रामीण) | १२ | ३ | ८०% |
| १६० | पाटील (सडोलीकर), श्री. पी.एन. (करवीर) | १४ | १ | ९३.३३% |
| १६१ | पाटील, श्री. प्रमोद (राजु) रतन (कल्याण ग्रामीण) | ७ | ८ | ४६.६६% |
| १६२ | पाटील, डॉ. राहुल वेदप्रकाश (परभणी) | १२ | ३ | ८०% |
| १६३ | पाटील, श्री. राजेश नरसिंगराव (चंदगड) | १५ | ० | १००% |
| १६४ | पाटील, श्री. राजेश रघुनाथ (बोईसर) | १४ | १ | ९३.३३% |
| १६५ | पाटील, श्री. राणाजगजितसिंह पद्मसिंह (तुळजापूर) | १२ | ३ | ८०% |
| १६६ | पाटील, श्री. रविशेठ (पेण) | १२ | ३ | ८०% |
| १६७ | पाटील, श्री. ऋतुराज संजय (कोल्हापूर दक्षिण) | ९ | ६ | ६०% |
| १६८ | पाटील, ॲड. शहाजीबापू राजाराम (सांगोले) | १० | ५ | ६६.६६% |
| १६९ | पाटील, श्रीमती सुमनताई आर.आर. (आबा) (तासगाव-कवठे महांकाळ) | १५ | ० | १००% |
| १७० | पाटणी, श्री. राजेंद्र सुखानंद (करंजा) | १५ | ० | १००% |
| १७१ | पटोले, श्री. नानाभाऊ फाल्गुनराव (साकोली) | १३ | २ | ८६.६६% |
| १७२ | पवार, श्री. अभिमन्यु दत्तात्रय (औसा) | १५ | ० | १००% |
| १७३ | पवार, श्री. अशोक रावसाहेब (शिरुर) | १४ | १ | ९३.३३% |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १७४ | पवार, श्री.माधवराव निवृत्तीराव | १४ | १ | ९३.३३% |
| १७५ | पवार, श्री. लक्ष्मण माधवराव (गेवराई) | ७ | ८ | ४६.६६% |
| १७६ | पवार, श्री. नितीन अर्जुन (ए.टी.) (कलवण) | १४ | १ | ९३.३३% |
| १७७ | पवार, श्री. राजेश (नायगांव) | १५ | ० | १००% |
| १७८ | पवार, श्री. रोहित (कर्जत जामखेड) | १५ | ० | १००% |
| १७९ | पावरा, श्री. काशिराम वेचान (शिरपूर) | १५ | ० | १००% |
| १८० | फरांदे, श्रीमती देवयानी सुहास (नाशिक मध्य) | १५ | ० | १००% |
| १८१ | फातर्पेकर, श्री. प्रकाश वैकुंठ (चेंबूर) | १५ | ० | १००% |
| १८२ | पिंपळे, श्री. हरीष मारोतीआप्पा (मूर्तिजापूर) | १५ | ० | १००% |
| १८३ | पोतनीस, श्री. संजय गोविंद (कलिना) | १३ | २ | ८६.६६% |
| १८४ | प्रभू, श्री. सुनील (दिंडोशी) | १५ | ० | १००% |
| १८५ | रहांगडाले, श्री. विजय भरतलाल (तिरोरा) | १२ | ३ | ८०% |
| १८६ | राजाळे, श्रीमती मोनिका राजीव (शेवगाव) | १३ | २ | ८६.६६% |
| १८७ | राजपुत, श्री. उदयसिंग सरदारसिंग (कन्नड) | १४ | १ | ९३.३३% |
| १८८ | राणा, श्री. रवि (बडनेरा) | ११ | ४ | ७३.३३% |
| १८९ | राणे, श्री. नितेश नारायण (कणकवली) | १३ | २ | ८६.६६% |
| १९० | राणे, श्री. सुनील दत्तात्रय (बोरिवली) | ६ | ९ | ४०% |
| १९१ | राठोड, श्री.संजय | १२ | ३ | ८०% |
| १९२ | राठोड, श्री. तुषार गोविंद (मुखेड) | १५ | ० | १००% |
| १९३ | राऊत, श्री. राजेंद्र विठ्ठल (बार्शी) | ९ | ६ | ६०% |
| १९४ | राऊत, श्री. सुनिल राजाराम (विक्रोळी) | १५ | ० | १००% |
| १९५ | रावल, श्री. जयकुमार जितेंद्रसिंह (सिंदखेडा) | १३ | २ | ८६.६६% |
| १९६ | रायमुलकर, श्री. संजय भास्कर (मेहकर) | १३ | २ | ८६.६६% |
| १९७ | सागर, श्री. योगेश (चारकोप) | १४ | १ | ९३.३३% |
| १९८ | साकोरे-बोर्डीकर, श्रीमती मेघना दिपक (जिंतूर) | १३ | २ | ८६.६६% |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १९९ | साळवी, श्री. राजन प्रभाकर (राजापूर) | १३ | २ | ८६.६६% |
| २०० | सरनाईक, श्री. प्रताप बाबुराव (ओवळा-माजीवडा) | १४ | १ | ९३.३३% |
| २०१ | सरवणकर, श्री. सदा (माहिम) | १५ | ० | १००% |
| २०२ | ससाने, श्री. नामदेव जयराम (उमरखेड) | ९ | ६ | ६०% |
| २०३ | साटम, श्री. अमीत भास्कर (अंधेरी पश्चिम) | १५ | ० | १००% |
| २०४ | सातपुते, श्री. राम विठ्ठल (माळशिरस) | १३ | २ | ८६.६६% |
| २०५ | सावे, श्री. अतुल मोरेश्वर (औरंगाबाद पूर्व) | १५ | ० | १००% |
| २०६ | सावंत, श्री. तानाजी जयवंत (पारंदा) | २ | १३ | १३.३३% |
| २०७ | सावंत, श्री. विक्रमसिंह बाळासाहेब (जत) | १४ | १ | ९३.३३% |
| २०८ | सावरकर, श्री. रणधीर प्रल्हादराव (अकोला पूर्व) | १५ | ० | १००% |
| २०९ | सावरकर, श्री. टेकचंद श्रावण (कामठी) | १२ | ३ | ८०% |
| २१० | सावकारे, श्री. संजय वामन (भुसावळ) | १५ | ० | १००% |
| २११ | सेल्वन, कॅप्टन आर तामिल (सायन कोळीवाडा) | १४ | १ | ९३.३३% |
| २१२ | शाह, श्री. फारुक अन्वर (धुळे शहर) | ११ | ४ | ७३.३३% |
| २१३ | शाह, श्री. पराग (घाटकोपर पूर्व) | १३ | २ | ८६.६६% |
| २१४ | शेख, श्री. रईस कासम (भिवंडी पुर्व) | १५ | ० | १००% |
| २१५ | शर्मा, श्री. गोवर्धन मांगीलाल ऊर्फ लालाजी (अकोला पश्चिम) | ५ | १० | ३३.३३% |
| २१६ | शेलार, ॲड. आशिष बाबाजी (वांद्रे पश्चिम) | १५ | ० | १००% |
| २१७ | शेळके, श्री. सुनिल शंकरराव (मावळ) | १५ | ० | १००% |
| २१८ | शिंदे, श्री. बबनराव विठ्ठलराव (माढा) | ११ | ४ | ७३.३३% |
| २१९ | शिंदे, श्री. महेश संभाजीराजे (कोरेगाव) | १३ | २ | ८६.६६% |
| २२० | शिंदे, श्रीमती प्रणिती सुशीलकुमार (सोलापूर शहर मध्य) | ९ | ६ | ६०% |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| २२१ | शिंदे, श्री. संजयमामा विठ्ठलराव (करमाळा) | १३ | २ | ८६.६६% |
| २२२ | शिंदे, श्री. श्यामसुंदर (लोहा) | १३ | २ | ८६.६६% |
| २२३ | शिरोळे, श्री. सिध्दार्थ अनिल (शिवाजीनगर) | १३ | २ | ८६.६६% |
| २२४ | शिरसाट, श्री. संजय पांडुरंग (औरंगाबाद पश्चिम) | १४ | १ | ९३.३३% |
| २२५ | सिद्दिकी, श्री. झीशान बाबा (वांद्रे पुर्व) | ११ | ४ | ७३.३३% |
| २२६ | सोळंके, श्री. प्रकाश (दादा) सुंदरराव (माजलगाव) | १५ | ० | १००% |
| २२७ | सोनवणे, श्रीमती लताबाई चंद्रकांत (चोपडा) | १३ | २ | ८६.६६% |
| २२८ | सुर्वे, श्री. प्रकाश राजाराम (मागाठाणे) | १५ | ० | १००% |
| २२९ | तापकीर, श्री. भिमराव (अण्णा) धोंडीबा (खडकवासला) | १५ | ० | १००% |
| २३० | ठाकरे, श्री. विकास पांडुरंग (नागपूर पश्चिम) | ८ | ७ | ५३.३३% |
| २३१ | ठाकूर, श्री. हितेंद्र विष्णु (वसई) | २ | १३ | १३.३३% |
| २३२ | ठाकूर, श्री. क्षितीज हितेंद्र (नालासोपारा) | ११ | ४ | ७३.३३% |
| २३३ | ठाकूर, श्री. प्रशांत रामशेठ (पनवेल) | १५ | ० | १००% |
| २३४ | ठाकूर, श्रीमती विद्या जयप्रकाश (गोरेगाव) | १४ | १ | ९३.३३% |
| २३५ | थोपटे, श्री. संग्राम अनंतराव (भोर) | १५ | ० | १००% |
| २३६ | थोरवे, श्री. महेंद्र सदाशिव (कर्जत) | १५ | ० | १००% |
| २३७ | टिळक, श्रीमती मुक्ता शैलेश (कसबा पेठ) | ३ | १२ | २०% |
| २३८ | टिंगरे, श्री. सुनिल विजय (वडगाव शेरी) | १४ | १ | ९३.३३% |
| २३९ | तुपे, श्री. चेतन विठ्ठल (हडपसर) | १५ | ० | १००% |
| २४० | वनगा, श्री. श्रीनिवास चिंतामण (पालघर) | १४ | १ | ९३.३३% |
| २४१ | विखे-पाटील, श्री. राधाकृष्ण एकनाथराव (शिर्डी) | १२ | ३ | ८०% |
| २४२ | वायकर, श्री. रविंद्र दत्ताराम (जोगेश्वरी पूर्व) | १५ | ० | १००% |
| २४३ | वानखडे, श्री. बळवंत बसवंत (दर्यापूर) | १५ | ० | १००% |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| २४४ | वरपुडकर, श्री. सुरेश अंबादासराव (पाथरी) | ९ | ६ | ६०% |
| २४५ | उईके, श्री. अशोक रामाजी (राळेगांव) | १५ | ० | १००% |
| २४६ | यादव (लोणीकर), श्री. बबनराव दत्तात्रय (परतूर) | १५ | ० | १००% |
| २४७ | येरावार, श्री. मदन मधुकर (यवतमाळ) | १४ | १ | ९३.३३% |
| २४८ | झनक, श्री. अमित सुभाषराव (रिसोड) | १५ | ० | १००% |
| २४९ | रिक्त | | | |

## विवरण क्रमांक – ७

## सन २०२२ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील

## (मार्च २०२२) दैनंदिन कार्यवाहीचा संक्षिप्त वृत्तांत

## बुधवार, दिनांक ३ मार्च, २०२२

सकाळी ११.०० वाजता दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीसमोर झालेल्या माननीय राज्यपालांच्या अभिभाषणानंतर २० मिनिटांच्या विश्रांतीनंतर विधानसभेची बैठक मुंबई येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ११ वाजून २५ मिनिटांनी माननीय उपाध्यक्ष श्री. नरहरी झिरवाळ यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

अधिवेशनाचा शुभारंभ 'वंदे मातरम्' या गीताच्या समूह गायनाने झाला.

**१.** प्रधान सचिव यांनी, राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवली.

**२.** श्री. सुनिल प्रभू, वि.स.स.यांनी सभागृहाच्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडला-

"माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधानसभेचे सदस्य, त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो."

श्री. अनिल पाटील, वि.स.स. यांनी सन्माननीय सदस्य श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी मांडलेल्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास अनुमोदन दिले.

सदर प्रस्तावावर शुक्रवार, दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी व शनिवार, दिनांक ५ मार्च, २०२२ रोजी चर्चा होईल. या प्रस्तावास ज्या सन्माननीय सदस्यांना सुधारणा सुचवावयाच्या असतील त्यांनी त्या सुधारणांच्या सूचना ३ प्रतींमध्ये ' अ ' कक्ष, कक्ष क्रमांक ११०३, अकरावा मजला, विधान भवन, मुंबई येथे किंवा al.assembly.mls@gmail.com या ई-मेलवर (DVOT-Surekh या Font मध्ये ) आज गुरुवार, दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी पोहोचतील या बेताने पाठवाव्यात, असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

**३.** नगरविकास मंत्र्यांनी, पुढील अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवले-

(क) सन २०२२ चा अध्यादेश क्रमांक १ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा ) अध्यादेश, २०२२ .

(ख) सन २०२२ चा अध्यादेश क्रमांक २— मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०२२.

४. **उप मुख्यमंत्र्यांनी**, सन २०२१-२०२२ च्या पुरवणी मागण्या सभागृहास सादर केल्या व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०५ व २०३ खंड ( ३ ) अन्वये मिळालेल्या अधिकारात महाराष्ट्राच्या माननीय राज्यपाल महोदयांनी सन २०२१-२०२२ च्या पुरवणी मागण्या विचारात घेण्यात याव्यात, अशी शिफारस या सभागृहास केली आहे असे सांगितले.

मागण्या प्रस्तुत झाल्या.

माननीय उपाध्यक्षांनी, सन २०२१-२०२२ च्या पुरवणी मागण्या सभागृहास सादर करण्यात आल्या आहेत. पुरवणी मागण्यांचे विवरणपत्र सन्माननीय सदस्यांना महाराष्ट्र विधानमंडळाच्या व शासनाच्या संकेतस्थळावरून तसेच टपालखणाद्वारे उपलब्ध करून देण्यात येत आहे. या मागण्यांवर चर्चा व मतदान दिनांक ७ मार्च, २०२२ व दिनांक ८ मार्च, २०२२ रोजी होईल. दिनांक ७ मार्च, २०२२ रोजी चर्चा व मतदानासाठी जे विभाग प्राथम्यक्रमाने घेण्यात येतील त्या विभागांवरील कपात सूचना दिनांक ५ मार्च, २०२२ व दिनांक ८ मार्च, २०२२ चर्चा व मतदानासाठी जे विभाग प्राथम्यक्रमात घेण्यात येतील त्या विभागांवरील कपात सूचना दिनांक ७ मार्च, २०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील, असे घोषित केले.

५. प्रधान सचिव यांनी, सन २०२१ चे वि.स.वि.क्रमांक ३९ - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२१ च्या संबंधात माननीय राज्यपालांकडून, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम १५७ ला सुचविलेल्या प्रस्तावित सुधारणेचा पुनर्विचार करण्यासंबंधी आलेला संदेश वाचून दाखविला.

६. प्रधान सचिव यांनी,विधानपरिषदेने कोणत्याही सुधारणेशिवाय संमत केलेली १७ वि.स. विधेयके, विधानपरिषदेने कोणत्याही शिफारशी शिवाय परत केलेली ३ वि.स.विधेयके, माननीय राष्ट्रपतींची अधिसंमती मिळालेले १ वि.स. विधेयक आणि माननीय राज्यपालांची अधिसंमती मिळालेली २० वि.स.विधेयके यांची यादी सभागृहास वाचून दाखविली.

७. माननीय उपाध्यक्षांनी, महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ८ (१) अन्वये खालील सदस्यांना सभाध्यक्ष तालिकेवर नामनिर्देशित केले-

(१) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.

(२) श्री. संजय शिरसाट, वि.स.स.

(३) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

(४) श्री. कुणाल पाटील, वि.स.स.

(५) श्री. कालिदास कोळंबकर, वि.स.स.

८. श्री. दौलत दरोडा(समिती प्रमुख),यांनी अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहास सादर केले व ते संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

९. माननीय उपाध्यक्षांनी, भारतरत्न स्वरसम्राज्ञी लता दीनानाथ मंगेशकर, उद्योगपती राहुल कमलनयन बजाज, श्री. नारायणराव ज्ञानदेव पाटील, माजी वि.स.स. व माजी मंत्री, सर्वश्री गजानन धरमशी बाबर, विश्वासराव आत्माराम पाटील, नरेन्द्रसिंग भगतसिंग पाडवी, माजी वि.स.स. व श्रीमती आशाताई मारोतीअप्पा टाले, माजी वि.स.स. यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला.

शोक प्रस्तावाची एक प्रत व विधानमंडळाचे स्मृतीपत्र शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल, असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

**शुक्रवार, दिनांक ४ मार्च २०२२**

श्री. देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांनी,"स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये ओबीसींना राजकीय आरक्षण मिळणे" इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांनी उपरोक्त मुद्यासंदर्भात खुलासा केला.

प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्यासंदर्भात आज एकूण तीन सूचना प्राप्त झाल्या असून त्या म.वि.स. नियम ५७ अन्वयेच्या निकषात बसत नसल्यामुळे सदरहू सूचनांना अनुमती नाकारण्यात येत आहे असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

१. (१) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एक तारांकित प्रश्न उत्तरित झाला. (चर्चा अपूर्ण)

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक २० मिनिटांसाठी स्थगित करीत असल्याचे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.
सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून २६ मिनिटांनी, २० मिनिटांकरिता स्थगित झाली.
सभागृहाची बैठक ११ वाजून ४६ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून ४७ मिनिटांनी, दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्थगित करीत असल्याचे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १२.०० वाजता पुन्हा सुरू झाली.

**प्रश्नोत्तरे — पुढे सुरू**

**(२)** आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील चव्वेचाळीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

प्रश्नोत्तराचा तास संपला असल्याचे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

**(१)** संसदीय कार्य मंत्र्यांनी, लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचा त्रेचाळीसावा वार्षिक एकत्रित अहवाल स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवला.

**(२)** उद्योग राज्यमंत्र्यांनी, मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा ५३ वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

**(३)** परिवहन मंत्र्यांनी, मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र.२१६९९/२०२१ महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ विरुध्द संघर्ष एस.टी. कामगार संघटना आणि इतर या याचिकेतील मा. उच्च न्यायालय यांच्या आदेशानुसार शासन निर्णय दि.८.११.२०२१ नुसार मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीचा अहवाल सभागृहासमोर ठेवला.

आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली असल्याचे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

आजच्या कामकाजपत्रिकेत दर्शविण्यात आलेल्या सर्व लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहेत असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

माननीय उपाध्यक्षांनी, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चा आज शुक्रवार, दिनांक ४ मार्च व शनिवार, दिनांक ५ मार्च, २०२२ रोजी घेण्यात येणार असल्याचे सांगितले व त्यासंदर्भातील कार्यपद्धती विशद करून माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला सुरूवात केली.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला —

(१) श्री.रविंद्र वायकर

(चर्चा अपूर्ण)

२. **पुरःस्थापनार्थ —**

(१) कामगार मंत्र्यांनी, सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक १— महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२२ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

३. **पुरःस्थापनार्थ :—**

आजच्या कामकाजपत्रिकेत अनुक्रमांक-सात मध्ये 'पुरःस्थापनार्थ' या शीर्षकांतर्गत दर्शविण्यात आलेली अनुक्रमांक १ ते ४ वरील अशासकीय विधेयके संबंधित सन्माननीय सदस्यांनी अनुक्रमे मांडावीत असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

४. आजच्या कामकाजपत्रिकेत अनुक्रमांक-आठ मध्ये"अशासकीय ठराव" या शीर्षकांतर्गत दर्शविण्यात आलेले अनुक्रमांक १ ते ६ वरील अशासकीय ठराव सन्माननीय सदस्य सर्वश्री गणेश नाईक, सुनिल प्रभू, राणाजगजितसिंह पाटील, समीर मेघे, सुरेश भोळे, सुनिल प्रभू यांचे आहेत, त्यांनी ते अनुक्रमे मांडावेत असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहापुढील कामकाज संपले असल्याचे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

## सोमवार, दिनांक ७ मार्च, २०२२

१. (अ) तारांकित प्रश्न

**(१)** सात तारांकित प्रश्नांची तारांकित उत्तरे देण्यात आली.

**(२)** तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पस्तीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते यांनी, "श्री. रवि राणा, वि.स.स. हे गेल्या चार दिवसांपासून दिल्लीमध्ये असतानाही आयुक्तांवर शाई फेकल्याप्रकरणी त्यांच्यावर दाखल करण्यात आलेला गुन्हा," इ. बाबत मुद्दा उपस्थित केला आणि त्यांना आपले म्हणणे मांडू देण्याची विनंती केली.

श्री. रवि राणा, वि.स.स. यांनी उपरोक्त मुद्याबाबत आपली बाजू मांडली.

शासनाने याची नोंद घ्यावी, असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

**(ब)** (१) आदिवासी विकास राज्यमंत्र्यांनी, "शासकीय आश्रमशाळांमध्ये मृत्युमुखी पडलेल्या मुलांच्या कुटुंबीयांना आर्थिक भरपाई देण्याबाबत" या विषयावरील श्री. चंद्रकांत सोनावणे, वि.स.स. यांचा दिनांक २८ मार्च, २०१६ रोजीचा तारांकित प्रश्न क्रमांक ४८७१६ला दिनांक १३ एप्रिल, २०१६ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार माहिती सभागृहासमोर ठेवली.

**२.** (१) विधि व न्याय राज्यमंत्र्यांनी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल,

(२) कृषी राज्यमंत्र्यांनी, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा लेखा परीक्षण अहवाल तसेच वार्षिक लेखे, तसेच

(३) वस्त्रोद्योग मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, नवी मुंबई यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते यांनी, " मगरवाडी, ता. पंढरपूर येथील श्री. सूरज जाधव या शेतकऱ्याने ४ मार्च, २०२२ रोजी फेसबुक लाईव्ह करून आत्महत्या करणे," इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी देखील आपले मत मांडला.

आज एकूण ९ स्थगन प्रस्तावाच्या सूचना प्राप्त झाल्या असून आज सन २०२१-२२ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (पहिला दिवस) असल्यामुळे म.वि.स. नियम २६० (५) अन्वये स्थगन प्रस्ताव घेता येणार नाही. त्यामुळे या सर्व सूचनांना दालनात अनुमती नाकारली आहे, असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते यांनी शेतकरी आत्महत्येचा मुद्दा पुन्हा उपस्थित केला.

सरकारने सायंकाळपर्यंत निवेदन करावे तसेच आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबास तात्काळ मदत करावी, असे निर्देश माननीय उपाध्यक्षांनी दिले.

**३.** (१) सर्वश्री देवेंद्र फडणवीस व इतर वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते, यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृह मंत्र्यांचे लक्ष वेधले.

" दिवसेंदिवस बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर होत असणे, जिल्हाधिकारी कार्यालयात दिवसा गोळीबाराच्या घटनेत दोन व्यक्तींना गंभीर इजा होणे, पोलिसांचा गुन्हेगारांवर वचक राहिला नसल्याने आठवड्याभरात खुनाचे चार प्रकार उघडकीस येणे, महिला अत्याचार रोखण्यासाठी पोलिसांना मोठे अपयश आल्याने महिला विशेषतः तरुण मुलींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होणे, वाळू उत्खनन आणि अवैध वाळू वाहतूक याकडे पोलिसांनी अक्षम्य दुर्लक्ष केल्याने निरपराध लोकांचे बळी जाणे, बेकायदेशीररित्या सुरू असलेल्या वाळू उत्खनन व वाहतूक या सारख्या घटनांना पोलिसांकडून वरदहस्त असणे, बँकांमधील आर्थिक गैरव्यवहार, देवस्थान

जमीन गैरव्यवहार प्रकरणी कारवाईसाठी पोलिसांकडून होत असलेली अक्षम्य दिरंगाई, वाढलेल्या चोरी, दरोडे यांच्या घटना, यामुळे बीड जिल्ह्यातील सर्व सामान्य लोकांमध्ये पसरलेले भीती आणि दहशतीचे वातावरण, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक यांना आलेले अपयश, जिल्हा पोलिस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदली प्रक्रियेत झालेला भ्रष्टाचार, यामुळे जिल्हा पोलिस दलाची प्रतिमा मलीन होणे, या गंभीर प्रकाराची दखल घेऊन शासनाने गांभीर्यपूर्वक करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.''

गृह मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

( २ ) सर्वश्री कुणाल पाटील व इतर वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. कुणाल पाटील, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधले.

''शेतकऱ्यांचे कृषी पंप व घरगुती वीज जोडणी कोणतीही पूर्वसूचना न देता कापत असल्याची बाब नुकतीच निदर्शनास येणे, परिणामी शेतकऱ्यांनी कर्ज काढून रब्बी हंगामातील केलेली पेरणी पाण्याअभावी वाया जाणे, रोहित्र जळाल्यास त्या रोहित्रावर जेवढ्या वीज जोडणी असतील त्यांना सक्तीने बिले भरण्यास सांगणे, बिल न भरल्यास रोहित्र दुरुस्ती करून न देणे, परिणामी शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होऊन ते कर्जबाजारी होणे, शासनाने शेतकऱ्यांच्या वीज जोडण्या तोडणार नाही अशी घोषणा करूनही वीज जोडण्या मोठ्या प्रमाणात तोडणीचे काम सुरूच ठेवणे, पिण्याच्या पाण्याचे कनेक्शन तसेच पथदिव्यांच्या जोडण्या तोडल्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात होत असलेली गैरसोय, जोपर्यंत पूर्ण थकीत वीजबिल भरले जात नाही तोपर्यंत वीज पुरवठा खंडित ठेवणे, प्रस्तुत प्रकरणाकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया.''

ऊर्जा राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

( ३ ) श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे नगरविकास ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधले.

''ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सुविधा भूखंड व आरक्षित भूखंड ज्या विकासकाने महानगरपालिकेला हस्तांतरित केले त्याच विकासकाला रेडीरेकनरच्या दरानुसार १२५ टक्के

रक्कम आकारून बांधकाम करायला देण्याचा महानगरपालिकेने ठराव क्रमांक. १४३४ दिनांक १२ नोव्हेंबर, २०१७ आणि त्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिकेचे परिपत्रक क्रमांक ठामपा/शाविवि/वियोअंक-६७, दिनांक ७ एप्रिल, २०१८ अनुसार पारित करण्यात येणे, तत्कालीन व विद्यमान आयुक्तांनी काही मोजक्या विकासकांना अधिकृतरित्या प्रमाणपत्र देऊन बांधकाम परवानगी दिलेली असणे, सदर विकासकांचे जागेवर काम चालू असून तेथील व्यापारी गाळे व सदनिका सर्वसामान्य जनतेला विकणे, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी याबाबत महानगरपालिकेकडे चौकशी करणे, नगरविकास विभागाची परवानगी न घेता दोन्ही आयुक्तांच्या कार्यकाळात विकासकांना सीसी प्रमाणपत्र देण्यात येणे, शासनाच्या नियमावलीमध्ये त्याचा कुठेही उल्लेख नसल्याने सदर होत असलेली बांधकामे पूर्णपणे बेकायदेशीर असून त्यांना ओ.सी. देण्यात येणार नसल्याचे सांगण्यात येणे, ज्या ग्राहकांनी या प्रकल्पामध्ये व्यापारी गाळे अथवा सदनिका घेतल्या आहेत त्यांचे भविष्य अंधःकारमय असणे, सदर बांधकामे तातडीने थांबवून ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या विकासकांवर गुन्हे दाखल करून ग्राहकांना पैसे परत करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

नगरविकास मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहात गोंधळसदृश परिस्थिती निर्माण झाल्यामुळे सभागृहाची बैठक १० मिनिटांसाठी स्थगित करीत असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी ०१ वाजून ३५ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी ०१ वाजून ४५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

**४.** (अ) पुरःस्थापनार्थ -

(१) नगर विकास मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.स.वि.क्र. ५ — मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२२ सभागृहाच्या अनुमतीने मांडले.

(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे —

(१) नगर विकास मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.स.वि.क्र. ५ — मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२२ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

विधेयक खंडशः विचारात घेण्याबाबतचा प्रश्न प्रस्तुत झाला.

खंड २ ला श्री. सुनील प्रभू, वि.स.स. यांनी उपरोक्त विधेयकातील सुधारणा सुचविली असून त्यांनी ती मांडावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

श्री. सुनील प्रभू, वि.स.स. यांनी पुढील सुधारणा मांडली -

"पृष्ठ क्रमांक २, --

ओळ क्रमांक १० मध्ये

"राज्य शासन" या मजकुराऐवजी "राज्य शासन, राज्य निवडणूक आयुक्ताच्या मान्यतेने" हा मजकूर दाखल करण्यात येईल."

सुधारणा प्रस्तुत झाली.

सुधारणा मतास टाकून संमत झाली.

खंड २ सुधारणा केल्याप्रमाणे विधेयकाचा भाग झाले.

खंड ३ ला सर्वश्री. सुनील प्रभू, प्रकाश आबिटकर व प्रकाश सुर्वे, वि.स.स. यांनी सुधारणा सुचविली आहे. त्यापैकी एकाने ती मांडावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

श्री. सुनील प्रभू, वि.स.स. यांनी पुढील सुधारणा मांडली -

"पृष्ठ क्रमांक २, --

ओळ क्रमांक १५ मध्ये

" राज्य शासन " या मजकुराऐवजी " राज्य शासन, राज्य निवडणूक आयुक्ताच्या मान्यतेने " हा मजकूर दाखल करण्यात येईल."

सुधारणा प्रस्तुत झाली.

सुधारणा मतास टाकून संमत झाली.

खंड ३ सुधारणा केल्याप्रमाणे विधेयकाचा भाग झाले.

खंड ४ ला सर्वश्री. सुनील प्रभू, प्रकाश आबिटकर व प्रकाश सुर्वे, वि.स.स. यांनी सुधारणा सुचविली आहे. त्यापैकी एकाने ती मांडावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

श्री. सुनील प्रभू, वि.स.स. यांनी पुढील सुधारणा मांडली -

"पृष्ठ क्रमांक २, --

(१) ओळ क्रमांक २३ मध्ये

" राज्य शासन " या मजकुराऐवजी 'राज्य शासन, राज्य निवडणूक आयुक्ताच्या मान्यतेने' हा मजकूर दाखल करण्यात येईल;"

(२) ओळ क्रमांक २६ मधील,

" राज्य शासन' या मजकुराऐवजी 'राज्य शासन, राज्य निवडणूक आयुक्ताच्या मान्यतेने' हा मजकूर दाखल करण्यात येईल ".

सुधारणा प्रस्तुत झाली.

सुधारणा मतास टाकून संमत झाली.

खंड ४ सुधारणा केल्याप्रमाणे विधेयकाचा भाग झाले.

खंड ५ कोणत्याही सुधारणेशिवाय संमत झाला व विधेयकाचा भाग झाला.

खंड १, संपूर्ण शीर्षशक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

सुधारणा मतास टाकून संमत झाली.

सन २०२२ चे वि.स.वि. क्र. ५ सुधारणा केल्याप्रमाणे संमत झाले.

**पुरःस्थापनार्थ -**

(१) ग्राम विकास मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.स.वि.क्र. ६ — महाराष्ट्र ग्रामपंचायत, आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, २०२२ सभागृहाच्या अनुमतीने मांडले.

**विचार, खंडशः विचार व संमत करणे —**

ग्राम विकास मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.स.वि.क्र. ६ — महाराष्ट्र ग्रामपंचायत, आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, २०२२ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

विधेयक खंडशः विचारात घेण्याबाबतचा प्रश्न प्रस्तुत झाला.

खंड २ ला श्री. अनिल पाटील व दिलीप बनकर, वि.स.स. यांनी उपरोक्त विधेयकास सुधारणा सुचविली असून त्यांनी ती मांडावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

श्री. अनिल पाटील, वि.स.स. यांनी पुढील सुधारणा मांडली -

"पृष्ठ क्रमांक २, --

ओळ क्रमांक ८ मध्ये

"राज्य निवडणूक आयोग या मजकुराऐवजी राज्य शासन" या मजकुराऐवजी"राज्य निवडणूक आयोग" हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या मजकुराऐवजी"राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने, राज्य शासन" हा मजकूर दाखल करण्यात यावा.

सुधारणा प्रस्तुत झाली.

सुधारणा मतास टाकून संमत झाली.

खंड २ सुधारणा केल्याप्रमाणे विधेयकाचा भाग झाले.

खंड ३ ला कोणतीही सुधारणा नसल्यामुळे तो मतास टाकून संमत झाला.

खंड ४ ला सर्वश्री. अनिल पाटील व दिलीप बनकर, वि.स.स. यांनी सुधारणा सुचविली आहे. त्यापैकी एकाने ती मांडावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

श्री. अनिल पाटील, वि.स.स. यांनी पुढील सुधारणा मांडली -

""पृष्ठ क्रमांक २, --

ओळ क्रमांक १६ मध्ये

"राज्य शासन" या मजकुराऐवजी"राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने, राज्य शासन" हा मजकूर दाखल करण्यात यावा.

सुधारणा प्रस्तुत झाली.

सुधारणा मतास टाकून संमत झाली.

खंड ४, विधेयकाचा भाग झाले.

खंड ५ ला सर्वश्री. अनिल पाटील व दिलीप बनकर, वि.स.स. यांनी सुधारणा सुचविली आहे. त्यापैकी एकाने ती मांडावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

श्री. अनिल पाटील, वि.स.स. यांनी पुढील सुधारणा मांडली -

"पृष्ठ क्रमांक २, --

ओळ क्रमांक १९ मध्ये

"राज्य शासनाकडून" या मजकुराऐवजी"राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने, राज्य शासनाकडून" हा मजकूर दाखल करण्यात यावा.

सुधारणा प्रस्तुत झाली.

सुधारणा मतास टाकून संमत झाली.

खंड ५ सुधारणा केल्याप्रमाणे विधेयकाचा भाग झाले.

थंड ६ कोणत्याही सुधारणेशिवाय संमत झाला.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

खंडशः विचारानंतर उक्त विधेयक सुधारणा केल्याप्रमाणे संमत झाले.

**(क) गृह मंत्र्यांनी, सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५२ — महाराष्ट्र अनन्य विशेष न्यायालये (शक्ती कायद्याखालील महिलांच्या व बालकांच्या विरुध्दच्या विवक्षित अपराधांसाठी) विधेयक, २०२०** वरील संयुक्त समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर केले.

सभागृहात गोंधळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून ०४ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून ३० मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

आजच्या कामकाजाच्या पत्रिकेत दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहेत, असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

**(ड)** (१) नगर विकास मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.स.वि. क्र. ३ — मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२२ सभागृहाच्या अनुमतीने पुरस्थापित केले.

(२) नगरविकास मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.स.वि. क्र. ४ — मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२२ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

५. माननीय उपाध्यक्षांनी राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चेची कार्यपद्धती विशद केली व सभागृहाच्या अनुमतीने पुढील प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत केला.

"माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधानसभेचे सदस्य त्यांचे मनः पूर्वक आभार मानतो."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

६. महसूल व वन विभाग, नगरविकास विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्र. सी-५, सी-६, एफ-२, एफ-५, के-६, के-७, के-११ चर्चेसाठी सभागृहाला सादर करण्यात आल्या.

मागण्या प्रस्तुत झाल्या.

माननीय अध्यक्षांनी, अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेची कार्यपद्धती विशद केली व या मागण्यांवर कोणीही कपात सूचना मांडणार नाही, असे गृहित धरून आता चर्चेला प्रारंभ होईल, असे सांगितले.

चर्चेत कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला नाही.

उप मुख्यमंत्र्यांनी, उपरोक्त सर्व विभागांच्या मागण्या वितरित केलेल्या सूचीप्रमाणे मंजूर कराव्यात, अशी विनंती केली.

उपरोक्त विभागाच्या मागण्या एकत्रितपणे मतास टाकून संमत झाल्या.

## मंगळवार, दिनांक ८ मार्च, २०२२

माननीय उपाध्यक्षांनी, खडतर परिश्रम आणि अढळ आत्मविश्वासाच्या बळावर मोठमोठी शिखरे सर करणाऱ्या सर्व महिलांना 'जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स., श्रीमती सरोज अहिरे, वि.स.स., डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स., श्रीमती सुलभा खोडके, वि.स.स. आणि श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स. यांनी याबाबत आपापले म्हणणे मांडले.

**१.** (१) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील चार प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एकोणचाळीस प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित झाले.

२. (१) संसदीय कार्य राज्यमंत्र्यांनी पुढील कागदपत्रे सभागृहासमोर ठेवली-

(क) मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळ यांचे सन २०१६-२०१७ ते २०१८-२०१९ या वर्षांचे अनुक्रमे सत्तेचाळीसावा, अठ्ठेचाळीसावा, एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल,

(ख) लातूर आणि उस्मानाबाद जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, लातूर यांचा सन २०१९ - २०२० या वर्षांचा एकोणतीसावा वार्षिक अहवाल,

(ग) कापड बाजार आणि दुकाने मंडळ, मुंबई यांचा सन २०१६-२०१७ नव सन २०१७-२०१८ या वर्षांचे अनुक्रमे सेहेचाळीसावा व सत्तेचाळीसावा वार्षिक अहवाल,

(घ) अहमदनगर माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, अहमदनगर यांचा सन २०१८ - २०१९ या वर्षाचा वार्षिक अहवाल,

(ङ) नाशिक माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नाशिक यांचा सन २०१६- २०१७ व सन २०१७-२०१८ या वर्षांचे अनुक्रमे बत्तीसावा व तेहतीसावा वार्षिक अहवाल,

(च) क्लिअरिंग ॲण्ड फॉरवर्डिंग असंरक्षित गोदी कामगार मंडळ, यांचा सन २०१८- २०१९ या वर्षाचा अठ्ठाविसावा वार्षिक अहवाल,

(छ) जळगाव माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, जळगाव यांचे सन २०१७- २०१८ ते सन २०१९-२०२० या वर्षांचे वैधानिक लेखापरीक्षण व कामकाज अहवाल,

(ज) किराणा बाजार व दुकाने मंडळ, यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा एकावन्नावा वार्षिक अहवाल,

(झ) जालना जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, जालना यांचा सन २०१७- २०१८ या वर्षाचा एकोणतीसावा वार्षिक अहवाल,

(ञ) सोलापूर जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, सोलापूर यांचे सन २००९-२०१० ते सन २०२०-२०२१ या वर्षांचा अनुक्रमे एकवीसावा, बावीसावा, तेवीसावा, चोवीसावा, पंचवीसावा, सव्वीसावा, सत्ताविसावा, अठ्ठाविसावा, एकोणतिसावा, तिसावा, एकतिसावा, बत्तीसावा वार्षिक अहवाल,

(ट) पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, पुणे यांचा सन २०१८- २०१९ या वर्षाचा सोळावा वार्षिक अहवाल,

(ठ) रत्नागिरी जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, रत्नागिरी यांचे सन २०१४ - २०१५ नते सन २०१६ - २०१७ या वर्षांचे वार्षिक अहवाल,

(ड) औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, औरंगाबाद यांचे सन २०११-२०१२ ते सन २०१८ - २०१९ या वर्षांचे अनुक्रमे दहावा, अकरावा, बारावा, तेरावा, चौदावा, पंधरावा, सोळावा, सतरावा वार्षिक अहवाल, आणि

(ढ) धुळे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, धुळे (अंतर्गत जळगाव, धुळे व नंदूरबार जिल्हे) जळगाव यांचे सन २०१६-२०१७ नते सन २०१८-२०१९ नया वर्षांचे वैधानिक लेखापरीक्षण व कामकाज अहवाल.

श्री. कुणाल पाटील, वि.स.स. यांनी, 'खानदेशातील गव्हाचे रब्बी पीक कापणीला आले असताना काल उत्तर महाराष्ट्रात वादळी वाऱ्यासह गारपीट झाल्यामुळे पिकांचे नुकसान होणे तसेच एका महिलेचा गारपिटीचा मार लागल्यामुळे मृत्यू होणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला

शासनाने नोंद घ्यावी, असे निदेश माननीय उपाध्यक्षांनी दिले.

(२) संसदीय कार्य राज्यमंत्र्यांनी, विधानसभेच्या सन २०२१ च्या तिसऱ्या (हिवाळी) अधिवेशनात दिनांक २२ डिसेंबर, २०२१ ते दिनांक २८ डिसेंबर, २०२१ या कालावधीत मा.मंत्री/मा.राज्यमंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण ७० आश्वासनांची यादी तसेच, सन २०२१ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर आतापर्यंत पूर्तता करण्यात आलेल्या एकूण १६२ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह सभागृहासमोर ठेवली.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता यांनी, 'आजच्या 'जागतिक महिला दिना'च्या दिवशी मागील दोन दिवसांपासून हजारो आदिवासी महिलांसोबत आदिवासी समाजाचे व माहिलांचे मुद्दे घेऊन रस्त्यावर आंदोलन करीत असलेल्या लोकसंघर्ष समितीच्या श्रीमती प्रतिभाताई शिंदे यांची शासनाने महिला दिनाचे औचित्य साधून भेट घ्यावी व त्यांचे म्हणणे ऐकून त्यातून मार्ग काढावा', अशी विनंती शासनास केली.

आदिवासी मंत्री महोदयांनी याबाबतची नोंद घ्यावी, असे निदेश माननीय उपाध्यक्षांनी दिले.

श्रीमती प्रतिभाताई शिंदे यांच्या विषयावर चर्चा करण्यासाठी आज दुपारी १.०० वाजता माननीय मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक आयोजित करण्यात आलेली असून उक्त बैठकीमध्ये चर्चा करून योग्य तो निर्णय घेण्यात येतील, असे आदिवासी विकास मंत्र्यांनी सांगितले.

माननीय उपाध्यक्षांनी, आज मंगळवार, दिनांक ८ मार्च, २०२२ रोजी स्थगन प्रस्तावाच्या एकूण ३ सूचना प्राप्त झालेल्या आहेत. परंतु आज सन २०२१-२०२२ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (दुसरा व शेवटचा दिवस) व चर्चारोध (गिलोटीन) असल्यामुळे म.वि.स.नियम २६० (५) अन्वये स्थगन प्रस्ताव घेता येणार नाही. अतः या सर्व सूचनांस मी दालनात अनुमती नाकारीत असल्याचे सांगितले.

माननीय उपाध्यक्षांनी, " सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यांत येते की, वित्त विभागाच्या दिनांक ११ मार्च, २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार सेवार्थ प्रणालीतून सादर होणाऱ्या सर्व देयकांची प्रदाने ई-कुबेर बल्क पेमेंट प्रणालीद्वारे मा. सदस्य, त्यांचे स्वीय सहायक व वाहनचालक यांच्या बँक खात्यात थेट जमा करावयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ते फॉर्म व कागदपत्रे ज्या सन्माननीय सदस्यांनी अद्यापही भरून दिलेले नाहीत त्या सन्माननीय सदस्यांनी परिपत्रकासोबतचा फॉर्म भरून त्यात नमूद आवश्यक कागदपत्रांसह हया सचिवालयातील ह-१ (मा. सदस्यांचे वेतन व भत्ते) कक्षाकडे लवकरात लवकर सादर करावेत." अशी घोषणा केली.

**३.** (१) श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. यांनी, 'ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सुविधा भूखंड व आरक्षित भूखंड ज्या विकासकाने महानगरपालिकेला हस्तांतरित केले त्याच विकासकाला रेडीरेकनरच्या दरानुसार १२५ टक्के रक्कम आकारून बांधकाम करायला देण्याचा महानगरपालिकेचा ठराव' विषयावर दिलेल्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा पुढे सुरू झाली.

**नगरविकास मंत्र्यांनी निवेदन केले.**
**काही प्रश्नोत्तरे झाली.**

**(२) सर्वश्री सुनिल प्रभू व इतर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

**श्री. सुनिल प्रभू, वि.स.स** यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सांस्कृतिक **कार्य मंत्र्यांचे** लक्ष वेधले-

"आजच्या फेसबुक आणि व्हॉट्सअपच्या काळात भजनाच्या माध्यमातून होणारे समाजप्रबोधन व परिवर्तन ही काळाची गरज असून विशेषतः कोकणात भजनी मंडळींना गणेशोत्सव काळात मोठ्या प्रमाणात भजनासाठी आमंत्रित करण्यात येणे, या मंडळामध्ये भजनी बुवा, टाळ-मृदुंग वाजविणारे तसेच कोरस देणारे लोक ग्रामीण भागात छोटी-मोठी नोकरी करणारे आणि शेती करणारे सर्वसामान्य कुटुंबातील असणे, परंतु मार्च, २०२० मध्ये कोरोना महामारीच्या प्रकोपामुळे सार्वजनिक उत्सवांवर निर्बंध येऊन सन २०२० व सन २०२१ मधील गणेशोत्सवात भजने न करता आल्याने त्यातून मिळणाऱ्या आर्थिक हातभारापासून ही कुटुंबे वंचित राहून त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट होणे, राज्य शासनाने राज्यातील मान्यवर वृद्ध साहित्यिक व कलावंत इत्यादींना मानधन या योजनेअंतर्गत शासन निर्णय क्र. पूरक ६९१९/ प्र.क्र.८३/ सां.का-४, दिनांक ९ सप्टेंबर, २०१९ नुसार राष्ट्रीय कलावंत दरमहा ३,१५०/- रुपये, राज्यस्तरीय कलावंत दरमहा २,७०० रुपये, स्थानिक कलावंत दरमहा २,२५० रुपये पेन्शन लागू करण्यात येणे, परंतु, कोविडमुळे राज्यात नाटक, तमाशातील लोककलावंत, भजनीबुवांना तसेच वृध्द कलावंतांना शासनाकडून मिळणाऱ्या तुटपुंज्या पेन्शनमध्ये उदरनिर्वाह करणे अडचणीचे होणे,

याकरिता शासनामार्फत दरमहा देण्यात येणाऱ्या पेन्शनमध्ये जास्तीत जास्त ६,००० ते ५,००० रुपये एवढी वाढ करण्याबाबतचा निर्णय शासनाने तात्काळ घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही."

**सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी निवेदन केले.**
**काही प्रश्नोत्तरे झाली.**

**(३) सर्वश्री अनिल पाटील व इतर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

**श्री. अनिल पाटील, वि.स.स.** यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **नगरविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधलेः—

"कृषी विकास अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी दिनांक १८.११.२०२१ रोजी मे. पंचगंगा सीड्स प्रा. लि., औरंगाबाद येथे बियाणे अधिनियम नियम व नियंत्रण आदेशांतर्गत तपासणी केलेली असणे, या तपासणीमध्ये भेंडी व वांगी यांच्या बोगस बियाण्यांसह ७५ टन बोगस बियाण्यांचा अवैध साठा आढळून आलेला असणे, सदर तपासणी दरम्यान मे. पंचगंगा सीड्स प्रा. लि., औरंगाबाद यांनी बियाणे विक्री परवाना नूतनीकरण केलेले नसणे, परवाना दर्शनी भागावर लावणे बंधनकारक असतांनाही तो दर्शनी भागावर लावलेला नसणे, पुरवठा, साठा फलक तसेच भाव फलक व साठा रजिस्ट्रर उपलब्ध नसणे, बियाणे विक्री रजिस्ट्रर व शिल्लक साठा जुळत नसणे, मुदत बाह्य बियाण्यांचा साठा नोंदवहीत शेरा मारून ठेवलेला नसणे, कीटकनाशके/औषधांचा परवाना न घेता अनधिकृत साठा करणे, शेतकऱ्यांना बोगस औषधांची विक्री करून फसवणूक करणे इत्यादी अनेक त्रुटींमुळे सदर कंपनीचा परवाना रद्द करण्याची शिफारस तपासणी अधिकाऱ्यांनी आपल्या अहवालात केलेली असणे, असे असतानाही कृषी विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून या बोगस बियाणे उत्पादन करणाऱ्या कंपनीवर अद्याप कोणतीही कार्यवाही न करता कंपनीला पाठीशी घालण्यात येणे, परिणामी बोगस बियाणे शेतकऱ्यांना पुरवठा करण्यात येत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी फसवणूक, यासर्व प्रकरणी मे. पंचगंगा सीड्स कंपनी प्रा. लि., औरंगाबाद या कंपनीचा बियाणे परवाना रद्द करून शेतकऱ्यांची फसवणूक केल्याप्रकरणी कंपनीच्या मालकाविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा व भारतीय दंड संहितेतील तरतुदीनुसार फौजदारी तसेच कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.

**कृषी मंत्र्यांनी निवेदन केले.**
**काही प्रश्नोत्तरे झाली.**

**(४) सर्वश्री सिद्धार्थ शिरोळे व इतर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

**श्री. सिद्धार्थ शिरोळे,वि.स.स.** यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे** लक्ष वेधले-

"शिवाजीनगर (जि. पुणे) येथील मुळा-मुठा नदीचे पात्र मोठे असून त्यात जलपर्णी मोठ्या प्रमाणात असणे, यामुळे डासांचे प्रमाण वाढणे, जलपर्णीने बाधित भागांच्या आजूबाजूस राहणाऱ्या नागरीकांना याचा प्रचंड त्रास होणे, बोपोडी, औंध, पाटील इस्टेट, खडकी येथील नागरिकांना मलेरिया, डेंग्यू चिकुनगुनिया या सारखे साथीचे आजार होणे, या आजारांमुळे माहे फेब्रुवारी २०२२ च्या तिसऱ्या आठवड्यात १० जणांचा मृत्यू झाल्याची बाब निदर्शनास येणे, जलपर्णी ही एक मोठी समस्या बनणे, जलपर्णीचा पर्यावरणावर महत्त्वपूर्ण नकारात्मक परिणाम होत असणे, पुणे आणि पिंपरी-चिंचवड या दोन शहरातील ५३ कि.मी. नदी पात्रापैकी जवळ जवळ ३० कि.मी. नदीपात्रामध्ये जलपर्णी पसरणे, दरवर्षी दोन्ही महानगरपालिकांकडून जलपर्णी काढण्यात येणे परंतु पूर्णपणे जलपर्णी काढणे हे अतिशय अवघड व खर्चिक असणे, या आक्रमक प्रजातीमुळे पर्यावरणातील विविध जीवसृष्टीवर गंभीर परिणाम होणे, तसेच मासेमारी, वाहतूक, सिंचन, जलविद्युत प्रकल्पांवर याचा प्रचंड नकारात्मक परिणाम होणे, जलपर्णी काढण्याबाबत शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**नगरविकास मंत्र्यांनी निवेदन केले.**
**काही प्रश्नोत्तरे झाली.**

श्री. प्रताप अडसड, वि.स.स. यांनी, 'अमरावती जिल्ह्यामधील बालाजी प्लॉट येथील एका धार्मिक कार्यक्रमामधून एका मुलीचे नागपूरहून आलेल्या २ मुलांनी अपहरण करून हवेत गोळीबार करणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

याबाबत शासनाने माहिती घेऊन दखल घ्यावी, असे निदेश माननीय तालिका सभाध्यक्षांनी दिले.

**४.** (१) गृह विभाग (२) सार्वजनिक आरोग्य विभाग (३) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग या विभागांच्या पुरवणी मागण्या सभागृहाला सादर झाल्या असून त्या एकत्रित चर्चेला घेण्यात येतील, असे तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

मागण्यांवरील एकत्रित चर्चेची कार्यपद्धती माननीय तालिका सभाध्यक्षांनी विशद केली व कपात सूचना न मांडता मान्य करण्यात आलेल्या कपात सूचनांची उत्तरे मा.मंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने तीस दिवसांच्या कालावधीत सदस्यांना पाठविण्याची प्रथा माहे जुलै, २०१० पासून मान्य झाली

असल्यामुळे आता कोणीही कपात सूचना मांडणार नाही असे गृहीत धरून चर्चेला प्रारंभ होईल, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

मागण्या प्रस्तुत झाल्या.

उक्त पुरवणी मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

१) श्रीमती देवयानी फरांदे
२) श्रीमती सरोज अहिरे
३) श्रीमती प्रतिभा धानोरकर
४) श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर
५) श्री. रमेश कोरेगावकर
६) श्री. प्रकाश सोळंके
७) श्रीमती सुलभा खोडके
८) श्री.अबू आजमी
९) श्रीमती मंदा म्हात्रे
१०) श्री. विश्वनाथ भोईर
११) श्री. धर्मरावबाबा आत्राम
१२) श्री. संग्राम थोपटे
१३) श्रीमती मनिषा चौधरी
१४) श्री. प्रकाश सुर्वे
१५)श्री. बाबासाहेब पाटील
१६) श्री. शिरीषदादा चौधरी
१७) श्री. रईस शेख
१८) डॉ. भारती लव्हेकर
१९) श्री. ज्ञानराज चौगुले
२०) श्री. हिरामण खोसकर
२१) श्री. संजय जगताप
२२) श्रीमती मंजुळा गावीत
२३) श्रीमती नमिता मुंदडा
२४) श्री. सुनिल भुसारा
२५) श्री. राम सातपुते
२६) श्री. उदयसिंग राजपूत
२७) श्री.बाळासाहेब आजबे
२८) श्रीमती मोनिका राजळे
२९) श्री. दिलीप बोरसे
३०) श्री. चेतन तुपे

सार्वजनिक आरोग्य मंत्री, सहकार व पणन मंत्री, गृह मंत्री यांनी आपापल्या विभागांच्या मागण्यांवरील उपरोक्त चर्चेला उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

वरील सर्व मागण्या एकत्रितपणे मतास टाकण्यात आल्या व त्या संमत झाल्या.

चर्चारोधानंतर असलेल्या पुढील विभागांच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक-

(एक) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग : डी-५, डी-८, डी-९.

(दोन) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग : ई-२, ई-४

(तीन) वित्त विभाग : जी-६

(चार) सार्वजनिक बांधकाम विभाग : एच-७, एच-८

(पाच) जलसंपदा विभाग : आय-५

(सहा) ग्रामविकास विभाग : एल-३

(सात) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग : एम-३

(आठ) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग : एन-३, एन-४

(नऊ) नियोजन विभाग : ओ-२, ओ-९, ओ-१०

(दहा) वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग : एस-१

(अकरा) आदिवासी विकास विभाग : टी-५

(बारा) उच्च व तंत्र शिक्षण विभाग : डब्ल्यू-२, डब्ल्यू-३

(तेरा) महिला व बाल विकास विभाग : एक्स-१

(चौदा) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग : वाय-२

(पंधरा) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग : झेडए-२

(सोळा) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग : झेडडी-२

(सतरा) मराठी भाषा विभाग : झेडएफ-२

(अठरा) इतर मागास बहुजन कल्याण विभाग : झेडजी-२, झेडजी-३

या आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबत सूचीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकण्यात येत आहेत, असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

५. (अ) पुरःस्थापनार्थ, विचार, खंडशः विचार व संमत करणे—

वित्त राज्य मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.स. विधेयक क्रमांक ७ – महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२२ सभागृहाच्या अनुमतीने मांडले व असे करीत असताना भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०७, खंड (१) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा

वापर करून त्यांनी हे विधेयक विचारात घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस केली आहे, असे वित्त राज्य मंत्र्यांनी सांगितले.

वित्त राज्य मंत्र्यांनी उक्त विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता यांनी उपरोक्त विधेयकास म.वि.स.नियम २६४(५) अनुसार पुढील तीन सूचना सुचविल्या.

१) राज्यातील सर्व आश्रमशाळांना अनुदान देण्यात यावे.

२) जे.जे. रुग्णालयाकडे औषध पुरवठादारांची रू. ९० कोटी रकमेची देयके प्रदान करण्याची तरतूद करण्यात यावी.

३) पालघर जिल्ह्यातील जव्हार, वाडा, मोखाडा, तलासरी, ठाणे जिल्ह्यातील शहापूर, वसई-विरार व पुणे-रत्नागिरी येथील कुपोषित बालकांसाठी काम करणाऱ्या ग्राम बालविकास केंद्रांना निधी उपलब्ध करून देण्यात यावा.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता व श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.यांनी सदरील विधेयकाच्या अनुषंगाने दिलेल्या सर्व सूचना मान्य केल्या असल्याचे उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**६.** श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता, वि.स.स. यांनी पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले.

“१९९३ चा बॉम्बस्फोट व २००८ मधील मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचे आघात अद्यापही विसरले नसताना, दिवसाढवळ्या खून, बलात्कार, चोऱ्या, दरोड्यामुळे सर्वसामान्य जनता त्रस्त असताना त्यावर कोणताही मार्ग न काढता भ्रष्टाचाऱ्यांना संरक्षण दिल्यामुळे राज्यातील कोट्यवधी जनतेचा कायदा व सुव्यवस्थेवरील उडालेला विश्वास, महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे जन्मदिनी ५०० नागरिकांपेक्षा अधिकची गर्दी जमवल्यामुळे हजारो शिवभक्तांवर दाखल झालेले गुन्हे व त्याचवेळेस सत्ताधारी पक्षाच्या प्रवक्त्यांच्या पत्रकार परिषदेत १५०० नागरिक उपस्थित असताना एकाही व्यक्तीवर दाखल न झालेले गुन्हे, कायद्याचा वापर

स्वतःच्या सोयीने केल्याने कोट्यवधी शिवभक्तांमध्ये पसरलेला असंतोष, लोकप्रतिनिधींना गुंडांकडून मिळत असलेल्या धमक्या, राजकीय हस्तक्षेपामुळे बड्या राजकीय नेत्यांविरोधातील गुन्ह्यांच्या तपासात आलेली शिथिलता, हत्या, अपहरण, दरोडे, घरफोड्या यासारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यात आलेले अपयश, मुंबई, नवी मुंबईसह राज्यातील मोठ्या शहरातील गुन्ह्यात झालेली वाढ, सायबर हल्ल्यांना व गुन्ह्यांना रोखण्यात आलेले अपयश, अंमली पदार्थ, गुटखा व्यापार, जुगार, मटका या अवैध धंद्यात झालेली अपरिमित वाढ, अल्पवयीन मुले, मुली व महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ, पूजा चव्हाण आत्महत्या प्रकरणाच्या तपासातील संथगती, डान्सबार, पब, डिस्कोथेक, ऑनलाइन गेमिंग, विशेषतः ऑनलाईन लॉटरीमधील भ्रष्टाचाराला आळा घालण्यात आलेले अपयश, त्यांच्या चालकांना मिळणारे अभय, पोलिसांवर पडणारा ताण व पोलिसांच्या मागण्यांकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, वाळूमाफिया व अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांविरोधात करावयाच्या कारवाईत आलेली शिथिलता, मागासवर्गीय समाजावर होणारे हल्ले व त्यांच्यात वाढलेली असुरक्षिततेची भावना, राजकीय कार्यकर्ते, लोकप्रतिनिधींवर सूडबुद्धीने होणारी कारवाई, राज्याची कायदा व सुव्यवस्था कोलमडल्यामुळे गोरगरीब जनता, महिला व सर्वसामान्यांमध्ये निर्माण झालेले असुरक्षिततेचे व असंतोषाचे वातावरण तसेच एसटी कर्मचाऱ्यांच्या संपाला शंभर दिवसांपेक्षा जास्त कालावधी होऊन देखील संप मिटवण्यात सरकारला आलेले अपयश, शेकडो एसटी कर्मचाऱ्यांनी केलेल्या आत्महत्या, मा. न्यायालयाने सरकारवर ओढलेले ताशेरे, संपामुळे राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील प्रवाशांना होत असलेला असह्य त्रास, एसटी कर्मचारी व कुटुंबीयांमध्ये निर्माण झालेले निराशेचे वातावरण तसेच सरकारच्या उदासीनतेमुळे मराठा व ओबीसी आरक्षण रद्द होणे, इतर मागासवर्ग आयोगाचा अंतरिम अहवाल मा. सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला असणे, अहवाल फेटाळत असताना न्यायालयाने सांख्यिकी अभ्यास आणि संशोधनाविनाच अंतरिम अहवाल तयार केला असल्याचे, अहवालात इतर मागासवर्गीयांच्या राजकीय प्रतिनिधित्वाबाबत कोणतीही माहिती नसल्याचे, स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय ओबीसी प्रतिनिधित्वाची माहिती नसल्याचे तसेच कोणत्या कालावधीतील माहितीच्या आधारे हा अहवाल तयार केला याबाबतही स्पष्टता नसल्याचे न्यायालयाने नमूद केले असणे तसेच ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका घेण्याचे आदेश निवडणूक आयोगाला व राज्य सरकारला दिलेले असणे, सरकारच्या अनास्थेमुळे ओबीसी आरक्षण गमावण्याची आलेली वेळ, सुरूवातीपासूनच सरकारी उदासीनतेमुळे मागासवर्ग आयोग स्थापन करण्यात व आयोगाला कर्मचारी व निधी देण्यात सरकार कडून होणारी टाळाटाळ, मराठा, ओबीसी समाजासाठी केलेल्या घोषणांची दोन वर्षात न झालेली अंमलबजावणी, यामुळे या दोन्ही समाजात शासनाबद्दल निर्माण झालेली तीव्र उद्रेकाची भावना, धनगर आरक्षणाच्या प्रश्नाबाबत सरकारकडून कोणतीही कार्यवाही न होणे, संविधानानुसार धर्माच्या आधारे आरक्षण देता येत नसताना, मंत्रिमंडळाचा निर्णय झालेला

नसताना मंत्र्यांनी आरक्षण देण्याबाबत सभागृहात केलेली घोषणा व परिणामी नागरीकात निर्माण झालेली संदिग्धतेची भावना तसेच टीईटी व अन्य स्पर्धा परीक्षेत झालेले घोटाळे, स्पर्धा परीक्षेसाठी सेवा पुरवठादार कंपन्यांची निवड करताना झालेल्या अनियमितता, परिणामी राज्यातील लाखो उमेदवारांची नोकरीची संधी हिरावल्यामुळे त्यांच्यात निर्माण झालेला असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

१) श्री. नाना पटोले

२) श्री. चंद्रकांत पाटील

३) श्री. राजेंद्र राऊत

४) श्रीमती प्रतिभा धानोरकर

५) डॉ. संजय कुटे

६) श्री. दिलीप मोहिते

७) श्री. रवि राणा

माननीय तालिका सभाध्यक्षांनी उपरोक्त चर्चा संपल्याचे घोषित केले.

## बुधवार, दिनांक ०९ मार्च, २०२२

**१.** (अ) तारांकित प्रश्न -

(१) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील चार प्रश्न उत्तरित झाले. (चर्चा अपूर्ण)

(२) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एकोणचाळीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

प्रधान सचिवांनी, शनिवार, दिनांक ५ मार्च, २०२२ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवली.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते यांनी, "माननीय मंत्री श्री. नवाब मलिक यांचा राजीनामा" इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

सभागृहात गोंधळसदृश परिस्थिती उद्‌भवून सदनाचे कामकाज करणे शक्य नसल्यामुळे सभागृहाची बैठक अर्ध्या तासाकरिता स्थगित करीत असल्याचे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.
सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ०३ मिनिटांनी स्थगित झाली.
सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ३३ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, विधानसभेच्या १२ सन्माननीय सदस्यांच्या निलंबनाबाबत कार्यपद्धतीविषयक मुद्दा उपस्थित केला.

**२.** (१) गृह मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा दिनांक ३१ मार्च २०२० रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा शेहेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्र्यांनी, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे सन २०१६-२०१७ व सन २०१७-२०१८ करीताचे अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(३) ग्रामविकास मंत्र्यांनी खालील अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवले—

(क) सन २०१८-२०१९ चा महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यावरील अठ्ठेचाळीसावा लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल.

(ख) सन २०१९-२०२० चे ठाणे/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग/ पालघर/ नाशिक/ धुळे/ नंदुरबार/ जळगांव/ अहमदनगर/ पुणे/ सातारा/ सांगली/ सोलापूर/ कोल्हापूर/ औरंगाबाद/ जालना/ परभणी/ हिंगोली/ बीड/ नांदेड/ उस्मानाबाद/ लातूर/ अमरावती/ अकोला/ वाशिम/ बुलढाणा/ यवतमाळ/ नागपूर/ वर्धा/ भंडारा/ गोंदिया/ चंद्रपूर व गडचिरोली या ३४ जिल्हा परिषदांचे वार्षिक प्रशासन अहवाल.

(४) गृहनिर्माण मंत्र्यांनी, महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण, मुंबई प्राधिकरणाचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ चे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवले.

आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

आजच्या कामकाजपत्रिकेत अनुक्रमांक ४ वर दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना १, २ व ३ पुढे ढकलण्यात येत आहेत असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

**३.** (अ) विचार, खंडशः विचार व संमत करणे -

**(१) (क)** कामगार मंत्र्यांनी, सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक १— महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२२ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते यांचा दुसरा प्रस्ताव, ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांचा तिसरा प्रस्ताव सदस्य अनुपस्थितीमुळे मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**(२) (क)** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा, महाराष्ट्र विधानसभा सन २०२२ चा अध्यादेश क्रमांक १ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अध्यादेश, २०२२ नापसंत करण्यासंबंधीचा प्रस्ताव सन्माननीय सदस्य अनुपस्थितीमुळे मांडण्यात आला नाही.

**(ख)** संसदीय कार्य राज्यमंत्र्यांनी, सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२२ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, श्री.देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते यांचा दुसरा प्रस्ताव, श्री.संजय केळकर, वि.स.स. यांचा तिसरा प्रस्ताव व ॲड.राहुल कुल, वि.स.स. यांचा चौथा प्रस्ताव सदस्य अनुपस्थितीमुळे मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**(ब) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०० अन्वये राज्यपालांच्या अधिसंमतीसाठी पाठविण्यात आलेले व राज्यपालांनी फेरविचारार्थ परत पाठविलेले सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९—महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२१ मधील खंड २२ बाबत म.वि.स. नियम १५३ अन्वये फेरविचार करणे –**

सहकार मंत्र्यांनी, सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२१ मधील खंड २२ म.वि.स. नियम १५३ अन्वये फेरविचारार्थ घेण्यात यावा असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

राज्यपालांनी विधेयकातील खंड २२ च्या फेरविचाराबाबत संदेश पाठविला असल्यामुळे आता फक्त खंड २२ विचारात घेण्यात येईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

विधानसभेने दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे खंड २२
हा विधेयकाचा भाग झाला.
विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.

विचारानंतर सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ विधानसभेने दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे विधेयक पुन्हा संमत झाले.

**(२) (क)** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा, महाराष्ट्र विधानसभा सन २०२२ चा अध्यादेश क्रमांक २— मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०२२ नापसंत करण्यासंबंधीचा प्रस्ताव सन्माननीय सदस्य अनुपस्थितीमुळे मांडण्यात आला नाही.

**(ख)** संसदीय कार्य राज्यमंत्र्यांनी, सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२२ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, श्री.देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते यांचा दुसरा प्रस्ताव, श्री.संजय केळकर, वि.स.स. यांचा तिसरा प्रस्ताव व ॲड.राहुल कुल, वि.स.स. यांचा चौथा प्रस्ताव सदस्य अनुपस्थितीमुळे मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

तालिका सभाध्यक्षांनी, सन्माननीय सदस्यांच्या अटकेसंबंधी पुढील घोषणा केली —

“अधीक्षक, मुंबई मध्यवर्ती कारागृह, मुंबई यांचेद्वारे कळविण्यात आले आहे की, मा.शहर सत्र न्यायालय, मुंबई यांचे दिनांक ७ मार्च २०२२ रोजीचे रिमांड आदेशान्वये द डायरेक्टर ऑफ इन्फोर्समेंट (ECIR/MBZO-I/१०/२०२२) प्रिव्हेंशन ऑफ मनी लाँडरींग अॅक्ट अंडर सेक्शन ३, ४ केसमध्ये श्री.नवाब मोहम्मद इस्लाम मलिक, विधानसभा सदस्य यांना दिनांक ७ मार्च २०२२ रोजी १७.२० वाजता मुंबई मध्यवर्ती कारागृहामध्ये दाखल करण्यात आले असून त्यांना सुरक्षेच्या कारणास्तव सर्कल क्र. १२ येथे ठेवण्यात आले आहे.”

गृह मंत्र्यांनी, ‘‘म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्तावाच्या चर्चेवरील मंत्रिमहोदयांचे उत्तर उद्या घेण्यात यावे’’ इ.बाबत विनंती केली.

म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्तावावरील मंत्रिमहोदयांचे उत्तर उद्या घेण्यात येईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

## गुरूवार, दिनांक १० मार्च, २०२२

१. (अ) तारांकित प्रश्न-

(१) दोन तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली. (प्रश्नोत्तरे अपूर्ण)

श्री. भास्कर जाधव वि.स.स. यांनी, “१२ निलंबित सदस्यांना सभागृहात घेण्यात येणे” इ. बाबत कार्यपध्दतीविषयक मुद्दा उपस्थित केला.

सभागृहात गोंधळसदृश परिस्थिती निर्माण झाल्यामुळे सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्थगित करीत असल्याचे सांगितले.

सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून ३४ मिनिटांनी दुपारी १२-०० वाजेपर्यंत स्थगित झाली.
स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजता पुन्हा सुरू झाली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील चौतीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

श्री. भास्कर जाधव वि.स.स. यांनी, “सन्माननीय सदस्यांना निलंबित करण्याचा विधानसभा अध्यक्षांनी घेतलेला निर्णय सर्वोच्च न्यायालयाने बदलणे”, इ. बाबत कार्यपध्तीविषयक मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्याच्या संदर्भात अॅड. आशिष शेलार वि.स.स. यांनी आपले मत मांडले.
संसदीय कार्यमंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

**२.** (१) वित्त राज्यमंत्र्यांनी, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२१-२०२२ हे प्रकाशन सभागृहासमोर ठेवले.

(२) पशुसंवर्धन राज्यमंत्र्यांनी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा एकेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(३) रोजगार हमी राज्यमंत्र्यांनी, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र व राज्य रोजगार हमी योजना यांचा सन २०२०-२०२१ चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(४) परिवहन मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचा सन २०१९-२०२० चा वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवला.

**३.** प्रधान सचिव यांनी, दिनांक ३ मार्च, २०२२ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवली.

**४.** आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावांच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

श्री. भास्कर जाधव वि.स.स. यांनी, "सभागृहामध्ये काही सन्माननीय सदस्य पक्षाची चिन्हे असलेले वस्त्र घालून आलेले असणे" इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

याबाबत तपासून निर्णय घेण्यात येईल व यामध्ये काही चुकीचे असेल तर त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**५.** (१) श्री. चंद्रकांत नवघरे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"सन २०१८-२०१९ यावर्षी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत मौजे रुखी (ता.वसमत, जि.हिंगोली) या गावातील नॅशनल रोड ते रुखी अंतर्गत रस्ता करण्यात येणे, परंतु, केवळ २ वर्षाच्या कालावधीत संपूर्ण रस्ता उखडला जाऊन सदर रस्त्यावर जागोजागी खड्डे पडल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये उघडकीस येणे, कंत्राटदाराने या रस्त्याच्या बांधकामाकरीता अधिकाऱ्यांशी संगनमत करून निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले असल्यामुळे रस्त्यावर जागोजागी खड्डे पडून अपघात होऊन नागरीकांच्या जीवितेचे व मालमत्तेचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास येणे, उक्त रस्त्यावर शासनाने करोडो रुपये खर्च करूनही रस्त्यांची दयनीय अवस्था झाली असल्यामुळे सदरचा रस्ता तातडीने दुरुस्त करण्यात यावा अशी मागणी रुखी ग्रामस्थांनी व मा.स्थानिक लोकप्रतिनिधीनी शासनाकडे दिनांक २८ फेब्रुवारी, २०२१ च्या निवेदनाद्वारे करण्यात आल्याचे निदर्शनास येणे, परिणामी शासनाचा करोडो रुपयांचा खर्च होऊनही अल्पावधीत सदर रस्त्याच्या

दुर्दशेमुळे नागरीकांना व वाहनचालकांना होत असलेला त्रास, त्यामुळे तेथील जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, सबब निकृष्ट रस्ता बांधकामात सामील असणाऱ्या अधिकारी व संबंधित कंत्राटदाराविरुध्द कारवाई करून सदर रस्ता तातडीने दुरुस्त करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

ग्रामविकास मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) कॅप्टन आर. तमिल सेल्वन वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"आशिया खंडामधील मुंबईतील सर्वात मोठी झोपडपट्टी असलेल्या धारावीचा पुनर्विकास गेल्या १६ वर्षांपासून रखडलेला असणे, धारावी येथील झोपडपट्टीच्या पुनर्विकासाकरिता राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर तब्बल २५ पेक्षा जास्त निविदा निघूनही धारावीचा पुनर्विकास रखडला असणे, यामुळेच कोरोनासारख्या जागतिक महामारीच्या काळात कोरोना विषाणूचा फैलाव मुंबईतील इतर भागांच्या तुलनेत धारावीमध्ये दाटीवाटीने असलेल्या झोपडपट्ट्यांमध्ये मोठ्या प्रमाणात होणे, मागील १६ वर्षांत सुमारे ३१ कोटी खर्च होऊनही धारावी विकासाचे कंत्राट रद्द झाल्यामुळे नव्याने निविदा मागविण्यासाठी पुन्हा खर्च करावा लागणार असणे, निवासी इमारती तसेच झोपडपट्ट्यांची दुरवस्था झाल्यामुळे स्थानिक रहिवासी जीव मुठीत घेऊन तेथे राहत असणे, त्याचबरोबर सदर ठिकाणी छोटे-मोठे व्यवसायिक आपला व्यावसाय मोडकळीस आलेल्या जुन्या गाळयाममध्ये करीत असणे, स्थानिक रहिवाशी व व्यावसायिक यांना इच्छा असून देखील खाजगी विकासकामार्फत आपल्या निवासी सोसायटीचा पुनर्विकास स्वतः करणे शक्य शक्य नसणे, सदर रखडलेला पुनर्विकास तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

गृहनिर्माण मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

श्रीमती मंजुळा गावित वि.स.स. यांनी, "साक्री तालुक्यात अवकाळी पाऊस, वादळ वाऱ्यासह गारपीट मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे मांजरी, बारीपाडा, मोगरापाडा, मापलगाव, शेंदवड, वार्सा, उमरपाडा, रामपुरा, उमऱ्यामाळ, डांगरशिरवाडे, बोपरखोल, भोरटेपाडा, शिवखट्याळ, विजयपूर, वर्दडी या परिसरातील रब्बी हंगामातील हाता-तोंडाशी आलेला गहू, हरभरा मसूर, वाटाणा, कांदा, मका, आंब्याच्या बागा इ. पीकांचे १०० टक्के नुकसान झालेले असणे", इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

याबाबत शासनाने नोंद घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(३) सर्वश्री राजेश एकडे, अमित झनक, बळवंत वानखेडे, विकास ठाकरे, ॲड. आकाश फुंडकर, डॉ. संजय रायमुलकर, श्री.संजय गायकवाड, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. राजेश एकडे वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"बुलढाणा जिल्ह्यातील दसरखेड (ता.मलकापूर, जि.बुलढाणा) येथील बॅन्जो केमिकल कंपनी अनेक वर्षांपासून सुरू असणे, सदर केमिकल कंपनी मधील दूषित रसायनयुक्त पाणी टँकरद्वारे शेतजमीन परिसरात व तलावात सोडण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांच्या कसदार शेतजमिनी खराब होऊन नापीक होत असल्याबाबत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी व लोकप्रतिनिधींनी उपविभागीय महसूल अधिकारी यांचेकडे तक्रार करणे, तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असता माती परीक्षण अहवालामध्ये संबंधित शेतकऱ्यांच्या जमिनी शेतीयोग्य नसल्याचे निष्पन्न होणे, शेतजमिनी रसायनयुक्त पाण्यामुळे नापीक करणाऱ्या कंपनीवर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी कारवाई करण्याची मागणी करणे, वारंवार तक्रारी करूनही याप्रकरणी कोणतीही कारवाई न होणे, यामध्ये कंपनी व संबंधित अधिकारी यांचेवर कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया.

पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) सर्वश्री. भास्कर जाधव, शेखर निकम,वि.स.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना-

श्री. भास्कर जाधव वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"रत्नागिरी जिल्ह्यातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील परशुराम घाटामध्ये रस्ता चौपदरीकरणासाठी डोंगरकटाईचे काम सुरू असताना दरड कोसळून त्याखाली दोन पोकलेन, एक डंपर गाडले जाऊन एका पोकलेन चालकाचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक ८ फेब्रुवारी, २०२२ रोजी घडणे, त्याआधी दिनांक ५ फेब्रुवारी, २०२२ रोजी याच ठिकाणी महामार्गाचे काम सुरू असताना अजस्त्र दगड कोसळून पायथ्याशी असलेल्या मौजे पेढे-बौध्दवाडीतील एका घराला भगदाड पडून मोठी हानी होणे, तसेच दिनांक २२ जुलै, २०२१ च्या अतिवृष्टीमध्ये परशुराम घाटातील काम सुरू असलेल्या ठिकाणाची दरड पेढे-कुंभारवाडी येथील घरावर पडून तीन जणांचा झालेला दुर्दैवी मृत्यू, रस्ता चौपदरीकरणाचे काम करणाऱ्या कंत्राटदार कंपनीकडून सुरक्षिततेच्या कोणत्याही उपाययोजना करण्यात न आल्यामुळे तेथे सतत दुर्घटना घडत असल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांकडून होणे, घाटातील सुरक्षेबाबतच्या प्रश्नावर शासकीय यंत्रणा अद्यापही गंभीर नसणे, सतत दुर्घटना घडून

जीवित व वित्त हानी होऊनही संबंधित कंत्राटदार कंपनीवर अद्याप कोणतीही कारवाई न होणे, सततच्या दुर्घटनांमुळे पेढे गावातील ग्रामस्थ तसेच घाटातील सुरक्षेचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांनी निवेदन केले. काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्री.सुनिल प्रभू वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"गोरेगांव (पूर्व), कुरार पोलीस ठाणे हद्दीत, ऑबेरॉय मॉल समोर, शामबापू मंदिरा लगत, सी.एस. क्र.१०८ या शासनाच्या रिक्त भूखंडावर पोलीस उपायुक्त, परिमंडळ ११ व १२ चे कार्यालय सुरू करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दोन वर्षांपूर्वी शासनास लेखी निवेदन देऊनही अद्यापपर्यंत सदरहू भूखंड शासनाने उपलब्ध करून देण्यास मान्यता दिली नसल्याची बाब दिनांक ७ मार्च २०२२ रोजी निदर्शनास येणे, सद्यःस्थितीत पोलीस उपायुक्त परिमंडळ ११ व १२ चे कार्यालय दहिसर येथे असल्यामुळे सामान्य व ज्येष्ठ नागरीकांना कार्यालयीन कामकाजाकरिता जोगेश्वरी (पूर्व) पासून दहिसर (पूर्व) पर्यंत प्रवास करतांना गैरसोयीचा होत असणे, तसेच दिंडोशी पोलीस ठाणे सध्या खाजगी सोसायटीत असून कार्यालयीन कामकाजाच्या दृष्टीने सदरची जागा अत्यंत अपुरी पडत असणे, त्याचप्रमाणे तेथील नागरीकांना पोलीस ठाण्यात येणारे तक्रारदार, सततची वर्दळ, गोंगाट इत्यादी बाबीमुळे त्रास होत असल्याची नागरीकांची तक्रार असणे, तसेच परिमंडळ-१२ कार्यालय हे इतर पोलीस ठाण्यापासून लांब अंतरावर एका बाजूला असल्याने नागरीकांना कार्यालयीन कामकाजकरिता गैरसोय होत असणे, यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० रोजी लेखी पत्र देऊनही व त्यास दोन वर्ष इतका कालावधी होऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच दखल घेऊन कार्यवाही करण्यात न येणे, यामुळे पोलीस उपायुक्त परिमंडळ ११ व १२ तसेच दिंडोशी पोलीस ठाणे येथील कार्यालयीन कामकाजासाठी भेटी देणाऱ्या नागरीकांची झालेली व होत असलेली प्रचंड गैरसोय, शासनाने सदर प्रकरणी सी.एस.क्र.१०८ हा सरकारी भूखंड मुंबई पोलीस प्रशासनाच्या पोलीस उपायुक्त परिमंडळ ११ व १२ तसेच दिंडोशी पोलीस ठाणे उभारण्याकरिता उपलब्ध करून देण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील नागरीकांमध्ये निर्माण झालेला तीव्र अंसतोष व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) श्री. चंद्रकांत (दादा) पाटील वि.स.स. यांनी, पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"सन २००१ सालच्या गुंठेवारी कायद्यानुसार राज्य शासनाने दिनांक ३१ डिसेंबर, २०२० पर्यंतची बांधकामे गुंठेवारी नियमित करण्याचा अधिनियम एकमताने मंजूर करणे, मात्र या संदर्भात माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये राज्य शासनाने काढलेल्या परिपत्रकात एकात्मिक विकास नियंत्रण नियमावलीनुसार गुंठेवारीतील बांधकामे नियमितीकरणाचा आदेश काढणे, बहुतांश गावांमध्ये गुंठेवारी मध्ये झालेली बांधकामे ही ९ मीटरच्या आतील रस्त्यांवर असल्यामुळे नियमितीकरणासाठी अत्यल्प प्रस्ताव दाखल झाले असणे, तसेच यासाठीचा प्रशमन शुल्क अवाजवी असून, त्यामुळे गुंठेवारी नियमितीकरणाचा लाभ सर्वसामान्य नागरीकांना घेता येत नसणे, त्यामुळे नागरिकांच्या मनात पसरलेला तीव्र असंतोष, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने सदरहू गुंठेवारी बांधकामे नियमितीकरणाचा लाभ सर्वसामान्य नागरीकांना मिळण्याकरीता शुल्क आकारणी कमी करण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

नगरविकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) श्री. सुनिल शेळके वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"पुणे जिल्ह्यातील तळेगाव दाभाडे नगरपरिषद हद्दीमधील तळयातील माती, मुरुम गौण खनिजाचे बेकायदा खोदकाम करण्यात आले असल्याचे निदर्शनास येणे, तसेच नगरपरिषद प्रशासनाने सदर तळयातील गौण खनिजांची परस्पर विक्री करून शासनास स्वामित्व धन (रॉयल्टी) जमा न केल्यामुळे शासन महसुलाचे नुकसान केल्याप्रकरणी मा.तहसीलदार यांनी, तळेगांव दाभाडे नगरपरिषदेस रुपये ७९ कोटी ६४ लाख ९४ हजार ६०० इतक्या रकमेचा दंड ठोठावला असल्याचे दिनांक ८ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, सदर गैरव्यवहार व आर्थिक घोटाळयाप्रकरणी सीआयडीमार्फत चौकशी करून संबंधित पदाधिकारी, अधिकारी व संबंधित ठेकेदाराविरुध्द फौजदारी गुन्हा नोंदविण्यात यावा अशी आग्रही मागणी मा.लोकप्रतिनिधींनी मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचेकडे करण्यात येणे, त्यानुसार मा.जिल्हाधिकारी यांनी, याप्रकरणी केलेल्या चौकशीत दोषारोप निश्चित करून प्रथमदर्शनी दोषी ठरत असलेल्या नगरपरिषद पदाधिकाऱ्यांबाबत अपात्रता व मुख्याधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबतचा अहवाल मा.विभागीय आयुक्त,पुणे यांना सादर करून सदर प्रकरणी शासनाकडे पाठविण्यात येणे, तथापि, मागील ६ महिन्यापासून ही बाब शासनाकडे कोणतीही कार्यवाही न होता प्रलंबित असल्याचे आढळून

येणे, परिणामी या प्रकरणी सर्व संबंधितांविरुद्ध अपात्रता व शिस्तभंगाची कारवाई करण्याची होत असलेली मागणी, तथापि, कारवाई होत नसल्यामुळे तेथील जनतेमध्ये निर्माण झालेले नैराश्याचे वातावरण, प्रकरणी शासनाने केलेली कार्यवाही व उपाययोजना."

नगर विकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(८) डॉ. राहुल आहेर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधले.

राज्यात माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०२१ या कालावधीत अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीमुळे बाधित शेतकऱ्यांना मदत देण्याकरिता राज्य आपत्ती प्रतिसाद निधी व राज्य शासन निधीमधून दिनांक २८ ऑक्टोबर, २०२१ च्या परिपत्रकानुसार नाशिक जिल्ह्यातील ९ तालुक्यांना १२०२४०७००० इतकी मदत देण्यात येणे, परंतु यामध्ये शासकीय यंत्रणेमार्फत देण्यात आलेल्या चुकीच्या आकडेवारीनुसार अथवा चुकीच्या माहितीमुळे चांदवड व देवळा तालुक्यात मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन देखील देण्यात आलेल्या मदतीत दोन्ही तालुक्यांचा समावेश न झाल्यामुळे तेथील शेतकऱ्यांवर अन्याय झालेला असणे, दिनांक २८ व २९ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या पावसाच्या आकडेवारीत जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा कृषी अधिकारी कार्यालय यांच्या व तालुकास्तरीय यंत्रणेमार्फत सादर करण्यात आलेल्या आकडेवारीत प्रचंड मोठी तफावत असल्याने शासनास चांदवड व देवळा तालुक्याची दिलेली आकडेवारी ही चुकीची असल्याचे स्पष्ट होणे, दिनांक ३० सप्टेंबर २०२१ अखेरीस चांदवड तालुक्यात सरासरी ७०२ एम.एम. पाऊस झालेला असला तरी तालुका स्तरीय यंत्रणेकडील माहितीवरून फक्त ३५८ एम.एम. पाऊस झाल्याचे कळविण्यात आल्याने यात हेतुपुरस्सर तालुका वगळण्याचे काम केले जात असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे तालुक्यातील नागरिकांमध्ये शासनाविषयी पसरलेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी (चांदवड) यांनी कृषी मंत्री यांना निवेदन देऊन मदत मिळण्याकरिता विनंती करणे, शासनाने तातडीने खऱ्या आकडेवारीनुसार चांदवड व देवळा तालुक्याला मदत देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

मदत व पुनर्वसन मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

गृह मंत्र्यांनी, म.वि.स. नियम २९३ अन्वयेच्या विरोधी पक्षाच्या प्रस्तावावर आज उत्तर द्यायचे ठरले होते. परंतु विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य तसेच माननीय विरोधी पक्ष नेते देखील सभागृहात उपस्थित नसल्यामुळे म.वि.स. नियम २९३ अन्वये विरोधी पक्षाने दिलेल्या प्रस्तावावर सोमवारी उत्तर देण्यात येईल असे सांगितले.

**६.** (१) श्री. सुधीर मुनगंटीवार वि.स.स. यांनी पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित केली व भाषण केले.

“अनुसूचित जमातीची वर्ग १ ते ४ पर्यंतची प्रलंबित विशेष पदभरती प्रक्रिया महाराष्ट्र लोकसेवा आयोगासह इतर प्राधिकरणांनी जाहिराती देऊन पूर्ण करण्याची आवश्यकता असणे, न्यायालयीन आदेशाप्रमाणे व दिनांक २१ डिसेंबर २०१९ च्या शासन निर्णयानुसार शासकीय तसेच खाजगी अनुदानित संस्थातील पदभरती प्रक्रिया पूर्ण करण्याची गरज असणे, मा. सर्वोच्च सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्रमांक ८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दिनांक ६ जुलै २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची राज्यात अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २१ डिसेंबर २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला असणे, अद्याप या शासन निर्णयाची अंमलबजावणी झालेली नसणे, परिणामी अनुसूचित जमातीतील बेरोजगार उमेदवारांमध्ये तीव्र असंतोष पसरलेला असल्याने सदर रखडलेली पदभरती प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याची शासनाने करावयाची कार्यवाही.”

सामान्य प्रशासन राज्यमंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. सुधीर मुनगंटीवार वि.स.स. यांनी पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित केली व भाषण केले.

“चंद्रपूर जिल्ह्यातील चंद्रपूर-बल्लारपूर मार्गावर विसापूर गावानजिक बंगलूरच्या धर्तीवर बॉटनिकल गार्डन उभारण्याचे काम सुरू असणे, राज्य शासनाच्या दिनांक १६ जून २०१५ च्या शासन निर्णयानुसार बॉटनिकल गार्डन उभारण्यात येणे, सदर प्रकल्पाची योजना राबविण्याकरिता राष्ट्रीय वनस्पती संशोधन संस्था लखनऊ या संस्थेची तांत्रिक कामात मदत झालेली असणे, फुलांचे निर्जलीकरण तंत्र व त्याबाबतचे प्रशिक्षण हे या संस्थेच्या सहभागाचा मुख्य भाग असणे, सायकॅड हाऊस, हर्बेरिअम, बीज संग्रहालय, बोन्साय गार्डन, कॅना गार्डन, बोगनवेलीया गार्डन इत्यादी घटकांचा समावेश करण्यात आला असणे, त्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासी गरीब लोकांना जगण्याचे साधन निर्माण होणार असणे, तसेच वनविभागामार्फत रोपवन कामे, निरीक्षण पथ, जल व मृद् संधारणाची कामे, वॉच टावर पूल, रस्ते, जलाशय, सुशोभीकरण, सिमेंट नाला बांध, ट्री हाऊस, इतर कामे प्रगतीपथावर असणे, निधी अभावी सदर बॉटनिकल गार्डनमधील अनेक कामे रखडली असणे, निसर्गवन आणि जैवविविधतेने संपन्न आणि समृद्ध या क्षेत्राला व त्यांच्या निसर्ग वैभवाला संजीवनी ठरणाऱ्या या प्रकल्पाच्या पूर्ण होण्यात अडसर निर्माण झालेली असणे, शासनाचे याकडे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, सदर प्रकल्पासाठी तातडीने निधी उपलब्ध करून प्रकल्पाचे काम

जलदगतीने पूर्ण कण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

वने राज्य मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. रवि राणा वि.स.स. यांनी,"अमरावती जिल्ह्यामध्ये गेल्या ४-५ दिवसांपासून अमरावती जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पाचे काही लाभार्थी उपोषणास बसलेले असणे" इ. बाबत महितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री. भास्कर जाधव, वि.स.स., यांनी पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित केली व भाषण केले.

"रत्नागिरी जिल्ह्यातील कोळकेवाडी (ता. चिपळूण) धरणाच्या आऊटलेटमधून २४ ग्रामपंचायतीमधील २७ गावांना ग्रॅव्हीटीने पाणी देणे शक्य असल्याचा निष्कर्ष शासनाकडून नेमण्यात आलेल्या मे. मॉडर्न सर्व्हे कन्सल्टन्सी, पुणे या एजन्सीने सर्व्हेक्षण करून काढणे याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडून या सर्व २७ गावांना भेटी देऊन सद्यःस्थितीची पाहणी करण्यात आली असून त्याबाबतचा अहवाल या विभागाचे अधिक्षक अभियंता यांचेकडून माहे मे २०२१ मध्ये पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर करण्यात येणे, मात्र, सात महिने उलटले तरी यावर कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी पाणीटंचाईची समस्या अत्यंत गंभीर होत असणे, त्याचबरोबर धरणापासून जवळ असलेल्या आणि तीव्र पाणीटंचाई असलेल्या चिपळूण तालुक्यातील पिंपळी बुद्रुक, तिवरे, रिक्टोली, आकले, कादवड, दादर, कळकवणे या गावांनाही ग्रॅव्हीटीने पाणी देणेबाबत सर्व्हे होऊन त्यांचा यादीत समावेश करण्यात यावा, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

पाणी पुरवठा मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्री. कृष्णा गजबे वि.स.स. यांनी पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित केली व भाषण केले.

" गडचिरोली हा आदिवासी, दुर्गम व नक्षलग्रस्त जिल्हा असणे, जिल्ह्यात कोणतेही मोठे उद्योग, व्यवसाय नसणे, जिल्ह्यातील नागरीक पूर्णतः शेती व्यवसायावर अवलंबून असणे, गडचिरोली जिल्ह्यातील मुख्य पीक असलेल्या धान पिकाच्या सिंचनासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता असणे, जिल्ह्यात वीज वितरण कंपनीकडून केवळ ८ तास वीज पुरवठा करण्यात येणे,

सिंचनाची सोय उपलब्ध असूनही विजेअभावी पुरेसे सिंचन करता येत नसल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होणे, शेतकरी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदने व आंदोलनाद्वारे जिल्ह्यात कृषि पंपाना २४ तास वीज पुरवठा करण्याची वारंवार मागणी करणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

ऊर्जा मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) श्री. अतुल भातखळकर वि.स.स. यांनी पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित केली व भाषण केले.

'' मुंबईतील पोयसर नदीचे पुनरुज्जीवन करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने १४२८ कोटी रुपयांच्या प्रस्तावास माहे जानेवारी २०२२ च्या सुमारास मान्यता दिलेली असणे, परंतु वेळोवेळी खर्चाच्या अंदाजपत्रकात होणारे बदल व वाढीमुळे तसेच निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी होणाऱ्या विलंबामुळे सदर प्रकल्प मागील अनेक वर्षापासून रखडला असणे, त्यामुळे पोयसर नदीचे पुनरुज्जीवन करण्यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम आखण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.''

ऊर्जा राज्य मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) श्री. सुधीर मुनगंटीवार वि.स.स. यांनी पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित केली व भाषण केले.

''शासकीय कृषी महाविद्यालय मुलच्या नवीन इमारत बांधकामाचा १३३.३५ कोटींचा सुधारित आराखडा विद्यापीठाद्वारे कृषी परिषद पुणे यांच्या मार्फत शासनाच्या बांधकाम प्रस्ताव उच्चस्त समिती मंत्रालय मुंबई यांच्याकडे अंतिम मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे. परंतु सदर महाविद्यालयाच्या इमारत बांधकामासाठी शासनाकडून प्रशासकीय मान्यता व निधीची तरतूद करण्यात आलेली नाही. तसेच इमारत बांधकामाचे अनुदान व वेतनाचे अनुदान या बाबींकडे देखील शासनाचे दुर्लक्ष झाल्यामुळे कृषी शिक्षक व प्रशिक्षणाच्या प्रक्रियेत अनेक अडचणी निर्माण होणे. सदर कृषी महाविद्यालयाच्या इमारत बांधकामाला प्रशासकीय मान्यता व निधी तातडीने उपलब्ध करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

कृषी मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून उद्या शुक्रवार, दिनांक ११ मार्च २०२१ रोजीच्या सकाळी ११.०० वाजता पुन्हा भरेल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

## शुक्रवार, दिनांक ११ मार्च २०२२

**१.** (अ) तारांकित प्रश्न

(१) सात तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील बत्तीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, "आजच्या स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजीराजे महाराजांच्या पुण्यतिथी दिनानिमित्त औरंगाबाद शहराचे नामकरण "संभाजीनगर" असे करण्याची आवश्यकता, इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

**२.** (१) इतर मागास बहुजन कल्याण राज्यमंत्र्यांनी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित (मुख्य कंपनी) व शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ (उप कंपनी) याचा एकत्रित वार्षिक अहवाल तसेच मुख्य कंपनी व उप कंपनीचे सन २०१८-२०१९ चे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

**३.** आज शुक्रवार दिनांक ११ मार्च २०२२ रोजी स्थगन प्रस्तावाच्या एकूण ३ सूचना प्राप्त झाल्या असून परंतु आज राज्याचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा अर्थसंकल्प सभागृहात सादर होणार असल्यामुळे प्रथेनुसार स्थगन प्रस्ताव घेतले जात नसल्यामुळे सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना अनुमती नाकारली असल्याचे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

**४.** १) डॉ. किरण लहामटे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"आदिवासी जमीन हस्तांतरणाबाबत महाराष्ट्र महसूल अधिनियम कलम ३६ व ३६ अ नुसार निर्बंध घालण्यांत येणे, त्यामुळे एखाद्या आदिवासी भोगवटा जमीनधारकाला अन्य आदिवासी व्यक्तींला जमीन विकायची असेल तर कलम ३६ (२) नुसार जिल्हाधिकारी यांची परवानगी घेणे बंधनकारक असणे व एखाद्या आदिवासी भोगवटा जमीन धारकाला बिगरआदिवासीला जमीन हस्तांतरण करायची असेल तर कलम ३६ (अ) नुसार राज्य शासनाची परवानगी घेण्याची कायद्यांतर्गत तरतूद केलेली असणे, तथापि पेसा कायद्यातील वरील तरतुदीच्या अनुषंगाने जमीन महसूल संहिताच्या कलम ३६ अ मध्ये सुधारणा अनिवार्य असल्याने मा.राज्यपाल महोदयांनी पाचव्या अनुसूचीतील परिच्छेद ५ (१) च्या अधिकारात दिनांक १४ जून २०१६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे कलम ३६ अ च्या पहिल्या परंतुकानंतर कलम ३६ अ (१) परंतुक दुसरे दाखल करून त्याद्वारे"राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील गावांमध्ये ग्रामसभेची मंजुरी मिळाल्याशिवाय

आदिवासी व्यक्तींचा भोगवटा बिगरआदिवासी व्यक्तींकडे हस्तांतरित करण्यास जिल्हाधिकारी यांनी मंजुरी देऊ नये" अशी तरतूद केलेली असणे, तथापि अशा तरतुदी असल्या तरी राज्यात अनेक आदिवासी जमिनींचे बिगर आदिवासींना हस्तांतरण झालेले असणे, त्यामुळे बनावट कागदपत्रे तयार करून जमिनी खरेदी करण्यांत आल्याचे निदर्शनास येणे, परिणामी अशाप्रकारे बेकायदेशीर हस्तांतरण झालेल्या जमिनी पुन्हा आदिवासींना प्रत्यार्पित करण्यासाठी तसेच असे कृत्य करणाऱ्यांवर व यामधील दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, परंतु त्याप्रकरणी कारवाई करण्यांत न येणे, परिणामी राज्यातील आदिवासी समाजांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई व उपाययोजना."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

२) सर्वश्री नाना पटोले व इतर वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"यवतमाळ येथील बाबाजी दाते महिला सहकारी बँकेत मोठ्या प्रमाणात अनियमितता असून त्याबाबत रितसर अनेक तक्रारी होऊनही पोलीस अधीक्षक यवतमाळ हे गुन्हा दाखल करून घेत नसल्याचे नुकतेच उघडकीस येणे, सदर बँकेने व संचालक मंडळाने संगनमत करून बनावट कर्ज दुसऱ्याच्या नांवे वाटप करणे, या बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पतीच्या नावे कोट्यवधींचे बनावट कर्ज वाटप केलेले असून ते सध्या बुडीत असणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, संचालक मंडळ व बँकेचे अधिकारी हे कर्जदारांचे मालमत्ता जप्त करून या मालमत्तेचा कमी किंमतीत लिलाव करणे, सदरची बँक रिझर्व्ह बँकेची कोणतीही मार्गदर्शक तत्त्वे पाळत नसणे, १० वेगवेगळ्या कंपनीच्या नांवे २२७ कोटींचे कर्ज या बँकेने तारणाशिवाय मंजूर करणे, ते सध्या बुडीत असणे, सदरचे व्यवहार जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ व आरबीआयच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने होत असणे, हे प्रकरण सन २०१४ पासून सुरू असून बँक जुने दस्तऐवज नष्ट करीत असणे, या बँकेचे सदर प्रकरण गंभीर असून या प्रकरणात शेकडो कोटींचा आर्थिक गैरव्यवहार झाला असणे, त्यामुळे संचालक मंडळ बरखास्त करून येथील मुख्य कार्यकारी अधिकारी व अन्य दोषी अधिकारी यांच्यावर फौजदारी कारवाई व्हावी तसेच यामध्ये मोठा अपहार झाला असल्याने हे प्रकरण सखोल चौकशीसाठी सक्त वसुली संचालनालय (ईडी) कडे सोपविण्यात यावे अशी होत असलेली मागणी, परंतु यासंदर्भात कारवाई करण्यास शासनाकडून होत असलेला विलंब, परिणामी या बँकेच्या खातेदारांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सहकार मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

३) श्री. रवींद्र वायकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"शामनगर तलाव, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई येथील जुना व नैसर्गिक मजास नाला कल्पतरु विकासकामार्फत मातीने बुजवून व त्यावर पत्रे लावून अतिक्रमण करण्यात येत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, तसेच मजास नाल्याच्या दुतर्फा असलेली संरक्षक भिंत दोन ठिकाणी अनधिकृतरीत्या तोडून विकासाच्या नावाखाली मातीचे भराव टाकण्याचे काम बेकायदेशीररित्या करण्यात येत असणे, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई येथील विविध भागातील मुख्य लोकवस्तींमधील पर्जन्यवृष्टीचे पाणी व सांडपाणी वाहून नेणारा मजास हा एकमेव मुख्य नाला असून तो अशाप्रकारे अतिक्रमण करून बुजवल्यास आसपासचा संपूर्ण परिसर पावसाळ्यात पाण्याखाली येण्याची शक्यता असणे, तसेच मजास नाल्याचा प्रवाह बंद होऊन आजूबाजूच्या परिसरात दुर्गंधी निर्माण होऊन स्थानिक नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होणे, तसेच सदर नाल्याची व आजूबाजूच्या परिस्थितीची पाहणी न करता या नाल्यावर ५ ठिकाणी पूल बांधण्याची परवानगी दिल्यामुळे हा नाला अधिकच अरुंद होणे, प्रस्तुत गंभीर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी व नागरिकांनी महानगरपालिका प्रशासनाकडे लेखी तक्रारी दाखल करूनही याकडे जाणूनबुजून होत असलेले दुर्लक्ष, यात विकासकासोबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेही आर्थिक संगनमत असण्याची शक्यता, त्यामुळे या प्रकरणी महानगरपालिकेकडून कोणतीही कारवाई न होणे, परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण झालेली संतापाची भावना, या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नगरविकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची बैठक दुपारी २.०० वाजेपर्यंत स्थगित करीत असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून १६ मिनिटांनी दुपारी २.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.
स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी २.०० वाजता पुन्हा सुरू झाली.

**५.** वित्त मंत्र्यांनी, सन २०२२-२०२३ चा अर्थसंकल्प सादर केला व भाषण केले.

## सोमवार, दिनांक १४ मार्च, २०२२

**१.** (१) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील चार प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील छत्तीस प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित झाले.

**२. जलसंपदा मंत्र्यांनी, पुढील अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवले—**

**(क)** विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे सन २०१५-२०१६, सन२०१६-२०१७ व सन २०१८-२०१९ यावर्षांचाअनुक्रमे एकोणीसावा, विसावा व बावीसावा वार्षिक वित्तीय अहवाल, आणि

**(ख)** तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचा सन २०१९-२०२० वर्षाचा बावीसावा वार्षिक वित्तीय अहवाल.

**३.** माननीय उपाध्यक्षांनी, आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारलेली असल्याचे सांगितले.

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, ' सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना नियमबाह्यपणे देण्यात आलेली नोटीस ' इ. बाबत म.वि.स.नियम ५७ अन्वये स्थगन प्रस्तावाची सूचना दिली असल्याचे सांगितले तसेच याबाबत आपले सविस्तर म्हणणे मांडले.

ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी उपरोक्त विषयावर आपले म्हणणे मांडले.

श्री. मंगलप्रभात लोढा, वि.स.स.यांनी, ' भारतातील काश्मीर समस्येवर आधारित 'दि काश्मीर फाईल्स' हा चित्रपट भारतातील अनेक राज्यात करमुक्त असल्यामुळे माननीय वित्त मंत्र्यांनी महाराष्ट्रातही तो करमुक्त घोषित करणे' इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. व ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी, सभागृहात सन्माननीय सदस्यांच्या हक्कांचे संरक्षण होण्याबाबत स्थगन प्रस्तावाच्या सूचनेच्या माध्यमातून मांडलेल्या विषयाबाबत श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांनी आपले म्हणणे मांडले. तसेच या विषयाबाबत सभागृहात तत्काळ चर्चा सुरू करावी, अशी मागणी माननीय तालिका सभाध्यक्षांकडे केली.

सदरहू विषय शासनाने गांभीर्याने घेतला असून योग्य वेळी मंत्री महोदय याचे उत्तर देतील, माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

गृह मंत्र्यांनी या विषयाबाबत आपले म्हणणे सविस्तरपणे मांडले.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता यांनी देखील सदरहू विषयाबाबत आपले म्हणणे मांडले.

**४. (१) ॲड. राहुल कुल व इतर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

**ॲड. राहुल कुल, वि.स.स** यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **जलसंपदा मंत्र्यांचे** लक्ष वेधले-

"मावळ व मुळशी तालुक्यात (जि. पुणे) टाटा पॉवर कंपनीने एकूण सहा धरणे बांधली असणे, या धरणातील पाणीसाठा पश्चिमेकडे वळवून त्याद्वारे विद्युत निर्मिती करण्यात येत असणे, या धरणांच्या अनुषंगाने विद्युत निर्मितीसाठी काही पाणी वळविणेसंदर्भात स्वातंत्र्यपूर्व काळात करारनामे झालेले असणे, महाराष्ट्रातील कोयना जललविद्युत प्रकल्प व टाटा जलविद्युत प्रकल्प समूहातून विद्युत निर्मितीसाठी कृष्णा खोऱ्यातून विपुलतेच्या खोऱ्यात वळविण्यात येणारे पाणी (मुळशी धरणाचे पाणी) टप्प्याटप्प्याने कमी करण्यासाठी माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये व माहे मे, २०१९ अशा दोन वेळा समित्या नियुक्त केल्या गेल्या असणे, पश्चिम महाराष्ट्रात पाण्याची परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असताना १०० टी. एम. सी. पेक्षा जास्त पाणी जलविद्युत वीजजनिर्मितीसाठी कृष्णा भीमा खोऱ्यातील वळविण्यात आले असणे, वास्तविक पाहता या पाण्यावर पहिला नैसर्गिक हक्क असणाऱ्या कृष्णा, भीमा खोऱ्यातील नागरिकांना आज देखील मोठ्या प्रमाणावर पाणी टंचाईस सामोरे जावे लागत असणे, त्यामुळे हे पाणी मूळ प्रवाहात आणणे गरजेचे असणे, समिती सदस्यांच्या बैठकांमध्ये समिती सदस्यांनी पाणी पूर्वेकडे वळविण्याची मागणी केलेली असणे, हे पाणी मिळाल्यास दौंड, पुरंदर आणि बारामती तालुक्यातील (जि.पुणे) कायमस्वरूपी दुष्काळी भागातील सिंचनाच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटू शकतो. कोट्यवधी रुपये खर्च करून कार्यान्वित करण्यात आलेली पुरंदर उपसा सिंचन व जनाई - शिरसाई सिंचन योजना सक्षमपणे चालवता येणे शक्य असणे, दौंड तालुक्यातील (जि. पुणे) खोर,रपडवी, देऊळगाव गाडा, कुसेगाव,व वासुंदे, हिंगणीगाडा, रोटी, जिरेगाव व पांढरेवाडी या गावांचा समावेश जनाई शिरसाई व पुरंदर उपसा सिंचन योजनेत करण्यात आला असून त्यामधील काही समाविष्ट परंतु भरता न येणारे तलाव, व समाविष्ट व भरता येणारे तलाव व नव्याने समाविष्ट करण्याचे तलावाचे फेरसर्वेक्षण करण्याची मागणी मा. लोकप्रतिनिधीनी माहे जानेवारी, २०२२ मध्ये मा. मंत्री यांचेकडे केलेली असणे, मुळशी धरणाचे पाणी वळविण्याबाबत स्थापन केलेल्या दुसऱ्या सुर्वे समितीचा अहवाल अद्याप प्रलंबित असल्याने हा पाणी वळविण्याचा प्रस्ताव देखील प्रलंबित असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**जलसंपदा मंत्र्यांनी निवेदन केले.**

**काही प्रश्नोत्तरे झाली.**

**(२) श्री. नरेंद्र भोंडेकर, वि.स.स.** यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधले-

"महर्षी विद्या मंदिर बेला (ता. जि. भंडारा) या शाळेविरुद्ध शाळेच्या गैरव्यवस्थापन आणि लॉकडाऊन काळात विद्यार्थ्यांनी फी न भरल्याने त्यांना परीक्षेपासून वंचित ठेवणे, जबरदस्तीने फी वसुली करणे, पाल्यांना नाहक त्रास देणे, लोकप्रतिनिधींशी वाद घालणे व त्यांच्याविरुद्ध शाळा व्यवस्थापनामार्फत फौजदारी गुन्हा दाखल करणे, इत्यादी कारणास्तव व लोकप्रतिनिधींद्वारे शाळेची मान्यता रद्द करण्यासंदर्भात मा. शिक्षण मंत्री यांना दिनांक ६ जानेवारी, २०२१ रोजी निवेदनाद्वारे मागणी करणे, त्यानुसार मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी शिक्षण उप संचालक, नागपूर विभाग, नागपूर यांना चौकशी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिलेले असून चौकशी अहवालाची उप संचालक स्तरावर तपासणी सुरू असणे, तसेच महर्षी शिक्षण संस्थाद्वारा संचालित महर्षी विद्या मंदिर, बेला (ता.जि. भंडारा) या शाळेविरुद्ध लोकप्रतिनिधींच्या तक्रारीवरून चौकशी सुरू असताना चौकशीदरम्यानशासन निर्णय क्र. माशास्थ ३३२१/ प्र.क्र.४१८/एसएम-१ या निर्णयान्वये शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दिनांक १ जुलै, २०२१ रोजी शाळेला महर्षी विद्या मंदिर, रबेला (ता.जि.भंडारा) येथून मौजा अशोकनगर, फुलमोगरा, ता. जि. भंडारा येथे स्थलांतरास कार्योत्तर मान्यता देऊन शासन निर्णय निर्गमित केलेला असणे, उक्त प्रकरणी शासनस्तरावर चौकशी व कार्यवाहीची प्रक्रिया सुरू असताना व स्थानिक लोकप्रतिनिधींच्या गंभीर तक्रारी असूनही त्यावर तात्काळ कार्यवाही करण्याऐवजी शाळेच्या स्थलांतरास बेकायदेशीरपणे मान्यता देण्यात आलेली असणे, या संपूर्ण प्रकरणी शाळा व्यवस्थापनाशी संगनमत करून गैरव्यवहार झालेला असणे, यामध्ये दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध अद्यापही कोणतीही ठोस कारवाई झालेली नसणे, सदर शाळेच्या गैरप्रकाराबाबत सादर करण्यात आलेल्या अहवालाची तपासणी व चौकशी अहवाल शिक्षण उप संचालक, नागपूर विभाग यांनी शासनास सादर केले असता शाळा प्रशासनाविरुद्ध कोणतीही ठोस कारवाई करण्यात न येणेयासंदर्भात दिरंगाई करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना."

**शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.**
**काही प्रश्नोत्तरे झाली.**

**(३) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.** यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **नगर विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधले-

"चंद्रपूर थर्मल महाऔष्णिक विद्युत केंद्रामध्ये प्रकल्प सुरू होऊन ४० वर्षे झाल्यानंतरही सी.टी.पी.एस. च्या आस्थापना विभागात कार्यरत असलेले अधिकारी प्रकल्पग्रस्तांच्या नावावर गैरप्रकल्पग्रस्तांची प्रशिक्षणार्थी म्हणून भरती करीत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ च्या दरम्यान

निदर्शनास येणे, यासाठी आर्थिक देवाणघेवाणही होत असून मूळ जमीन मालकाच्या नावावर वारसदार म्हणून खोटी कागदपत्रे बनवून गैरप्रकल्पग्रस्तांची प्रकल्पग्रस्त म्हणून निवड केली जात असून या प्रकरणात सी.टी.पी.एस. चे सहाय्यक महाव्यवस्थापक श्री.अरविंद वानखेडे वव अनेक अधिकारी / कर्मचारी सहभागी असल्याचे समजणे, नुकतेच १२८ उमेदवारांची प्रशिक्षणार्थी यादी सी.टी.पी.एस नोटीस बोर्ड वर लावून दिनांक २८ नोव्हेंबर, २०२१ पर्यत आक्षेप घेण्याची मुदत दिली असता या यादीवर अनेक प्रकल्पग्रस्तांनी आक्षेप घेणे, निवड केलेल्या उमेदवारांच्या नावासमोर प्रकल्पग्रस्त गावाचे नाव, उमेदवार कोणत्या प्रकल्पग्रस्तांच्या हक्कावर निवडला गेला याचा उल्लेख नसणे, तसेच दिनांक ७ ऑक्टोबर, २०२१ ला मा. जिल्हा पुनर्वसन अधिकारी, चंद्रपूर यांनी बोगस प्रकरणात प्रपत्र कुणाला व किती लोकांना दिले तसेच यास सी.टी.पी.एस.ची एन.ओ.सी. प्राप्त झाली किंवा कसे याबाबत माहितीच्या अधिकारातून विचारली असता माहिती न दिल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयीन पुनर्वसन विभागाचे अधिकारी यात सहभागी असणे असा संशय बळावणे, त्यामुळे पात्र प्रकल्पग्रस्त व स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करून बनावट कागदपत्रे तयार करून थर्मल पॉवर स्टेशन, चंद्रपूर येथे नोकरी मिळविल्याप्रकरणी सखोल चौकशी करून संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

**ऊर्जा राज्य मंत्र्यांनी निवेदन केले.**
**काही प्रश्नोत्तरे झाली.**

श्री.अमिन पटेल, वि.स.स. यांनी, ‘कोव्हिड-१९ महामारीच्या काळानंतर मुंबईतील विनाअनुदानित शाळांमध्ये शिकणाऱ्या ज्या मुला-मुलींनी शालेय शुल्क न भरल्यामुळे महानगरपालिकेच्या शाळांमध्ये प्रवेश घेतला आहे त्यांन जुन्या शाळांकडून शाळा सोडल्याचा दाखला न मिळणे’ इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याची नोंद घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**४. (४) ॲड. अशोक पवार व श्री. भीमराव तापकीर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

**ॲड. अशोक पवार, वि.स.स.** यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधले-

“पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यात १६० गावांचा समावेश असून तेथे जवळजवळ ४० लाख लोकसंख्येची वस्ती असणे, हवेली तालुक्याचे वाढते विस्तारीकरण, नागरीकरण, विकास पाहता या तालुक्यासाठी सद्यःस्थितीत अस्तित्वात असलेली प्रशासकीय यंत्रणा अत्यंत तोकडी असून

इतक्या मोठ्या लोकसंख्येच्या तालुक्यासाठी शहरी व ग्रामीण भागाला मिळून एकच तहसीलदार, गटविकास अधिकारी व कृषि अधिकारी असल्यामुळे प्रशासनावर प्रचंड ताण पडत असणे, यामुळे खरेदी-विक्री व्यवहार, पुरवठाविषयक कामे, विविध परवानग्या, दाखले, नैसर्गिक आपत्ती, कायदा सुव्यवस्था, बैठका, नियोजन, न्यायालयीन कामकाज इत्यादी महत्त्वाच्या कामांमधील विलंबासह जनतेच्या विकास कामांवर परिणाम होणे, राज्यातील अन्य जिल्ह्यांच्या लोकसंख्येसाठी उपलब्ध असलेल्या तहसीलदार, गटविकास अधिकारी, कृषि अधिकारी व इतर खात्यांचे अधिकारी यांची तुलनात्मक संख्या पाहता हवेली तालुक्यावर या तोकड्या व अपुऱ्या प्रशासकीय यंत्रणेमुळे नागरिकांवर प्रचंड अन्याय होणे, उपरोक्त वस्तुस्थिती पाहता हवेली तहसील कार्यालयाचे विभाजन करून हवेलीसाठी स्वतंत्र नवीन तहसील कार्यालय स्थापन करून तेथे तहसीलदार, गटविकास अधिकारी व कृषि अधिकाऱ्यांची पदे वाढवून हवेली तालुक्याच्या विकास कामांची गती वाढविण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

**महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.**
**काही प्रश्नोत्तरे झाली.**

**(५) श्री. प्रकाश फातर्पेकर, वि.स.स.** यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **नगर विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधले-

“मौजे चेंबूर येथील न.भू.क्र. ३६० क बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील भूखंड ३० वर्ष मुदतीकरिता डॉ.बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल फाऊंडेशन या संस्थेला सांस्कृतिक आणि कल्याणकारी उपक्रम इमारतीचे बांधकाम करण्याकरिता देण्यात येणे, सदरील भूखंडावरील इमारतीचे बांधकाम मागील ६-७ वर्षापासूननपूर्णतः बंद असल्याची बाब नुकतीच निदर्शनास येणे, यासंदर्भात स्थानिककलोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०२० पासून आजतागायत वारंवार सहा. आयुक्त, मालमत्ता, बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय यांच्याकडे विचारणा केली असता या संदर्भात अद्यापही कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

**नगर विकास मंत्र्यांनी निवेदन केले.**
**काही प्रश्नोत्तरे झाली.**

**(६) सर्वश्री. राम सातपुते व अबू आजमी, वि.स.स.** यांची लक्षवेधी सूचना.

**श्री. राम सातपुते, वि.स.स.** यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **गृहनिर्माण मंत्र्यांचे** लक्ष वेधले-

"ठाणे महापालिका हद्दीत ग्लॅडी अल्वारीस रोड वरील मौजे चितळसर, मानपाडा येथील सेक्टर चार मधील खासगी गट क्र.५९ अ/३ अ, २ ई, २ फ या भूखंडावर तिरुपती डेव्हलपर्स प्रोप्रायटर्स कंपनी या विकासकातर्फे राबविण्यात येत असलेल्या बांधकाम प्रकल्पात विकासकाने ठाणे महापालिका आणि म्हाडाच्या माजी अधिकाऱ्यांसोबत आर्थिक संगनमत करून सुमारे सव्वातीन लाख चौ.फूट चटई क्षेत्रफळ बेकायदा मंजूर करून शासन तथा महापालिकेचे ७० कोटी रुपये आर्थिक महसुली उत्पन्न बुडवून आर्थिक घोटाळा केल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच उघडकीस येणे, आरक्षित क्षेत्र संपादित करून त्याचा म्हाडा नियमानुसार विकास करणे आणि खाजगी जमीन मालकास अकोमोडेशन रिझर्वेशन नियमानुसार विकास अनुज्ञेय करण्याचा अधिकार म्हाडाला असणे, त्यानुसार निव्वळ भूखंड क्षेत्रविचारात घेणे अपेक्षित असताना सदरहू प्रकल्पात म्हाडा व ठाणे महापालिकेने रस्त्याच्या क्षेत्रासह १२६५३ चौ.मी.निव्वळ भूखंडाऐवजी १७९४० चौ.मी. क्षेत्र विचारात घेऊन विकासकाला अतिरिक्त चटई क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढवून देऊन व यामध्ये कोटयावधी रुपये शासकीय महसुलाचे आर्थिक नुकसान केल्याचा प्रकार उघड होणे, अकोमोडेशन नियमानुसार भूखंडाचे ४० टक्के म्हाडाला व ६० टक्के जमीन मालकाला असे विभाजन होणे आवश्यक असतानाही तसे न करता ७० टक्के भूखंड जमीन मालकाला देऊन केवळ ३० टक्के भूखंड म्हाडाला देऊन म्हाडाचे आर्थिक नुकसान करणे, प्रकल्पात ६५७६ चौ.मी. क्षेत्र यूएलसी कायद्याअंतर्गत येत असून त्यानुसार आवश्यक नजराणा रक्कम भरुन शासनाची मान्यता घेणे बंधनकारक असतानाही ठाणे महापालिका व म्हाडा अधिकाऱ्यांनी याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करून शासकीय महसुलाचे आर्थिक नुकसान करणे, म्हाडाच्या कोकण विकास मंडळाच्या तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना डीसीआर नियमामध्ये फेरफार करण्याचे कोणतेही अधिकार नसताना त्यांनी बेकायदा पध्दतीने परवानगी देत विकासकास मोठ्या प्रमाणात आर्थिक फायदा मिळवून देणे, सदरहू गृह प्रकल्पात मोठ्या प्रमाणात शासकीय महसूल बुडविण्यात येऊन शासन व महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी आर्थिक संगनमत करून कोटयवधी रुपयांचा आर्थिक घोटाळा केल्याचे उघडकीस येणे, यास्तव या प्रकरणाशी संबंधीत सर्व संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करून त्यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी पाहता,।अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, याबाबत शासनाने संबंधीत विकासकाचे बांधकाम तात्काळ थांबवून सदर प्रकरणी चौकशी करून दोषींवर तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**गृहनिर्माण मंत्र्यांनी निवेदन केले.**

**काही प्रश्नोत्तरे झाली.**

**(७) श्रीमती सरोज अहिरे, वि.स.स.** यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **नगर विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधले-

"देवळाली मतदारसंघातील (जि.नाशिक) नाशिक रोड लगतच्या वडनेरगांव, वडनेरगेट परिसरातील वड, पिंपळ, आंबा व कडुनिंब इ. वृक्षांची बेकायदेशीरपणे तेथील नगरसेवक व उपायुक्त (उद्यान) महापालिका नाशिक, यांच्या आदेशानुसार संबंधित ठेकेदाराने दिनांक ७ व ८ जानेवारी, २०२२ रोजी वृक्षतोड केल्याचे तसेच जेलरोड-टाकळीरोड (नाशिक) येथे एका व्यावसायिकाने माजी नगरसेवकांच्या आदेशावरुन पिंपळ, औदुंबर इ. वृक्षांची वृक्षतोड केल्याचेही त्याचदरम्यान निदर्शनास येणे, सदर वृक्षतोडप्रकरणी वरील संबंधितांनी नाशिक महापालिका प्रशासनाची व वृक्षप्राधिकरणाची कोणतीही परवानगी घेतली नसल्याचेही त्याच सुमारास निदर्शनास येणे, संबंधित नगरसेवक, उपायुक्त (उद्यान) व संबंधित ठेकेदार यांचेविरुध्द वृक्षतोड संवर्धन कायदा व वन्यजीव संरक्षण कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी पोलिस कारवाई करण्यात यावी तसेच एक झाड एक लाख रुपये याप्रमाणे संबंधितांकडून वसुली करावी, अशी मागणी नाशिक कृती समितीचे पदाधिकारी, तसेच स्थानिक कर्तव्यशील सामाजिक संस्थेचे पदाधिकारी व वृक्षप्रेमी जनतेने केली असल्याचेही त्याचदरम्यान निदर्शनास येणे, इतकेच नव्हे तर, सदर बेकायदेशीररीत्या वृक्षतोड केल्याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी या सर्व प्रकरणी सर्व संबंधितांच्या विरोधात कारवाई करावी, अशी मागणी दिनांक १९ जानेवारी, २०२२ रोजीच्या पत्रान्वये मा. प्रधान सचिव, व नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडे करणे, तथापि, त्याप्रकरणी अद्याप कोणतीही कारवाई करण्यात न येणे, परिणामी नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.'

**नगर विकास मंत्र्यांनी निवेदन केले.**
**काही प्रश्नोत्तरे झाली.**

(८) **डॉ. बालाजी किणीकर**, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **नगर विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधले-

"भारत-पाकिस्तान फाळणीच्या वेळी पाकिस्तानातील सिंध प्रांतातून निर्वासित केलेल्या रहिवाशांचे भारतात पुनर्वसन करण्याच्या उद्दिष्टाने उल्हासनगर शहरात त्यांचे पुनर्वसन करणे, उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील अनेक इमारती या ६० ते ७० वर्षांपूर्वी बांधकाम केलेल्या असणे, परिणामी उल्हासनगर महानगरपालिकेने सर्वेक्षण केलेल्या ५०० हून अधिक इमारती या धोकादायक असल्याचे निदर्शनास येणे, सदर धोकादायक इमारतींमध्ये सुमारे १० हजार नागरिक

रहिवास करीत असून त्यांच्यात भीतीचे व असुरक्षिततेचे वातावरण पसरणे, दरवर्षीप्रमाणे या इमारतीमधील नागरीकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्याबाबत महानगरपालिकेमार्फत नोटीस पाठविण्यात येणे, उल्हासनगरमध्ये दिनांक १५ व २८ मे, २०२१ रोजी मोहिनी पॅलेस आणि साई शक्ती अपार्टमेंट तसेच दिनांक २४ ऑक्टोबर, २०२१ रोजी पारस अपार्टमेंट या इमारतीचा स्लॅब कोसळून झालेल्या अपघातात १३ नागरिकांचा मृत्यू आणि ११ नागरीक गंभीर जखमी होणे, या इमारतीमधील मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांना शासनाने ५ लाख रुपये मदत जाहीर करण्यात येऊनही अद्याप कोणतीही मदत देण्यात न येणे, मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना तातडीने मदत करावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वारंवार करणे, मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी शासनाकडे मानवतेच्या दृष्टीने आर्थिक मदत करण्यासाठी मागणी करणे, परंतु शासनामार्फत धोकादायक इमारतीमधील नागरिकांसाठी अद्यापपर्यंत पर्यायी व्यवस्था न करण्यात येणे, उल्हासनगरमधील कोसळलेल्या धोकादायक इमारतींचे पुनर्निर्माण करण्यासाठी ४ एफ.एस.आय. देण्याची लोकप्रतिनिधींकडून होत असलेल्या मागणीच्या अनुषंगाने मा. नगर विकास मंत्री यांनी एक समिती स्थापन करून या समितीने १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले असतानाही अद्यापही कोणतीही निर्णयात्मक कार्यवाही न होणे, धोकादायक इमारतींची पुनर्बांधणी करण्याकडे राज्य शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी नागरीकांमध्ये शासनाविरुद्ध निर्माण झालेली असंतोषाची भावना, तसेच अनधिकृत बांधकामे नियमित करण्याकरीता शासनाकडून आकारण्यात येणाऱ्या दंडाची रक्कम कमी करून लहान-मोठ्या भूखंडधारकांना न्याय देण्याची आवश्यकता, याबाबत शासनानेतातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**नगर विकास मंत्र्यांनी निवेदन केले.**
**काही प्रश्नोत्तरे झाली.**

(९) **श्रीमती मंजुळा गावित,** वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **आदिवासी विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधले-

"माधुरी पाटील विरुद्ध अपर आयुक्त व महाराष्ट्र शासन (सिव्हील अपील क्र. ५८५४ / १९९४ विशेष अनुज्ञा याचिका क्र. १४७६७ / १९९३) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे नियमन) अधिनियम, २००० आणि शासनाकडील विविध आदेश यांच्या अनुषंगाने जात प्रमाणपत्र आणि वैधता प्रमाणपत्र दिले जात असणे, श्री. दिलीप विठ्ठल बांबळे विरुद्ध महाराष्ट्र शासन या विशेष अनुज्ञा याचिका क्र.११२३४-४८-२०१७ प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी निर्णय देताना हमीपत्राच्या आधारे वैधता प्रमाणपत्राशिवाय अनुसूचित

जमातीच्या राखीव जागेवर शैक्षणिक संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी देण्यात आलेले प्रवेश रद्दबातल ठरविले असणे, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. एसटीसी २११९/प्र.क्र.१७९ का.१०, दिनांक १० डिसेंबर २०१९, शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर प्रवेश मिळवणाऱ्या व्यक्तीस जात वैधता प्रमाणपत्र असल्याशिवाय प्रवेश देऊ नये असे शासनाने स्पष्ट आदेश दिलेले असताना विविध शैक्षणिक संस्थांमध्ये सर्रासपणे शासन निर्णय धाब्यावर बसवून जात वैधता प्रमाणपत्रे सादर न करणाऱ्या विद्यार्थ्यांना संरक्षण दिले जात असणे, तसेच ज्या विद्यार्थ्यांकडे वैधता प्रमाणपत्र नाही परंतु त्यांच्या कुटुंबातील सदस्य यांचेकडे वैधता प्रमाणपत्र आहे अशा विद्यार्थ्यांना अटी शर्तींच्या अधीन राहून वैधता प्रमाणपत्र मा.न्यायालयाकडून दिली जात असल्याने अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर बनावट उमेदवार प्रवेश घेत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे आदिवासी विकास विभागाने अशा विद्यार्थांचे व कुटुंबीयांचे मूळ वैधता प्रमाणपत्र पुनश्च तपासण्याबाबत अथवा पुनर्विलोकन करण्याची तसेच मा. सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

**आदिवासी विकास मंत्र्यांनी निवेदन केले.**
**काही प्रश्नोत्तरे झाली.**

५. **उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी,** म.वि.स.नियम ५७ अन्वये पुढील प्रस्ताव मांडला.

“अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या संदर्भात महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम २४६ (१) मधील सात दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी.''

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

६. माननीय उपाध्यक्षांनी अर्थसंकल्पावरील चर्चेची कार्यपद्धती विशद केली. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी चर्चेला सुरूवात करावी, असे सांगितले.

अर्थसंकल्पावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

१ )श्री. देवेंद्र फडणवीस (विरोधी पक्ष नेते) २) श्री. रविंद्र वायकर( भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

७. ‘‘राज्यातील बिघडलेली कायदा व सुव्यवस्था, मराठा व ओबीसी समाजाला आरक्षण मिळणे, परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा संप व स्पर्धा परीक्षांमध्ये झालेले घोटाळे'' **या** विषयावर सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते व इतर वि.स.स. यांनी म.वि.स.नियम २९३

अन्वये दिलेला प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

गृह मंत्र्यांनी उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेस उत्तर दिले.
विरोधी पक्ष नेत्यांनी उत्तरादाखल भाषण केले.

सभागृहाने प्रस्तावावर विचार केला असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, ‘ राज्यातील फोन टॅपिंग व मुंबई बँकेच्या संचालक मंडळाने हजारो कोटींचा केलेला भ्रष्टाचार ’ इ. बाबत मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

यासंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या असून त्या संदर्भात चौकशी सुरू असल्याचे गृह मंत्र्यांनी सांगितले.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून सभागृहाची विशेष बैठक, उद्या मंगळवार दिनांक १५ मार्च २०२२ रोजी सकाळी १० ते १०.४५ या कालावधीत घेण्यात येईल. तसेच या विशेष बैठकीमध्ये लक्षवेधी सूचना घेण्यात येतील व त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता भरेल, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी घोषित केले.

## मंगळवार, दिनांक १५ मार्च, २०२२

(१) **श्री. दिलीप मोहिते-पाटील, ॲड. अशोक पवार, डॉ. किरण लहामटे, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना -**

श्री. दिलीप मोहिते-पाटील, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे नगरविकास मंत्र्याचे लक्ष वेधले —

“राजगुरुनगर नगरपरिषद हद्दीतील गट नंबर ३१४/१ व ३१४/३ मध्ये बांधकाम सुरू आहे, सदर विकासकाने सन २०१४ साली क्षेत्र १२ आर चा नकाशा मंजूर करताना मो.र.न.१०३४८/१३ हा मोजणी नकाशा जोडून बांधकाम परवानगी मिळविणे, तसेच सन २०१७ साली संबंधित जागा मालक व विकासकाने सन २०१३ सालच्या मोजणीची बनावट प्रत बनवून त्यावर शासनाचे व भूमि अभिलेख कार्यालयाचे बनावट सही शिक्के तयार करून २४ आर क्षेत्राचा आराखडा व बांधकाम परवानगी राजगुरुनगर नगरपरिषद यांच्याकडून मिळविली असणे, गट नंबर ३१४ लगत महाराष्ट्र शासनाचा गट नंबर ३०७ हा हुतात्मा राजगुरू स्मारकाचा असणे, त्यामुळे गट नंबर ३१४ ला लागून ३०७ हा गट दाखवायला हवा. परंतु, सदर विकासकाने केलेल्या मोजण्यांमध्ये लगत धारकांमध्ये कुठेच ३०७ हा गट दाखवला गेला नसणे, तसेच शासनाची जागा बळकावून तेथे वाणिज्य स्वरूपाची इमारत उभी केली तसेच सदर बांधकाम परवानगी मिळवताना सादर केलेली

कागदपत्रे ही बनावट व क्षेत्र १२ आर ची असून त्यावर क्षेत्र २४ आर ची बांधकाम परवानगी राजगुरुनगर नगरपरिषदेकडून मिळविणे, सदर बाब तत्कालीन मुख्याधिकारी, श्री. प्रकाश पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली असता मुख्याधिकारी यांनी कोणतीही कारवाई न केल्याने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन ९३२९९/२०२० दाखल केले असता मुंबई उच्च न्यायालयाने सर्व तक्रारी अर्ज मुख्याधिकारी राजगुरुनगर नगरपरिषद यांना सुनावणी घेऊन आठ आठवड्यात निकाली काढण्याचे आदेश दिले गेले असणे, त्यानुसार मुख्याधिकारी प्रकाश पाटील यांनी सुनावणी घेऊन तक्रारदाराने दिलेले पुरावे व सादर केलेले लेखी युक्तिवाद यांच्यातील ठराविक मुद्दे घेऊन उपस्थित केलेल्या तक्रारी या दुसऱ्या कार्यालयाच्या असून त्याचा या कार्यालयाशी काही संबंध नाही असे सांगण्यात येणे, तसेच राजगुरुनगर नगरपरिषदेच्या कार्यालयाशी संबंधित असलेले कागदपत्रे व पुरावे विचारात न घेता विकासकाबरोबर मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण-घेवाण करून विकासकाच्या बाजूने निकाल देत तक्रारदार यांच्या म्हणण्यात कोणतेही तथ्य नाही असे कळविणे, तरी विकासकाने सादर केलेले बनावट नकाशे राजगुरुनगर नगरपरिषदेचा डीपी प्लॅन त्यामध्ये ३१४ लगत असणारा शासनाचा ३०७ गट असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले आहे, तसेच क्षेत्र २४ आर चे चलन हे करोडो रुपयाचे असताना शासनाच्या रहिवासी आदेशाचा वाणिज्य वापरासाठी चुकीचा वापर करून करोडो रुपयाचा नगरपरिषदेचा महसूल बुडवला असणे, सादर केलेली बनावट फायर एनओसी व तहसील कार्यालयातून बनावट सनद मिळवून त्या सर्व ठिकाणी बिगर शेती आदेश वापरून बॅंकांकडून कर्ज उपलब्ध करून घेतले असणे, तसेच बनावट कागदपत्रांच्या आधारे तहसीलदारांनी दिलेली सनद त्यांच्या कार्यालयाकडून दिनांक २४ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या आदेशाने रद्द करण्यात आली असणे, भूमी अभिलेख कार्यालयाचे रेकॉर्ड गहाळ करणे, त्यामुळे संबंधित विकासकाने विविध ठिकाणी व वेगवेगळ्या प्रकल्पामध्ये भूमी अभिलेख कार्यालयाचे शिक्के व राजमुद्रा बनविल्याचा अहवाल भूमी अभिलेख कार्यालयाने देणे, देशासाठी हसत हसत बलिदान देणाऱ्या हु. राजगुरू यांच्या राजगुरूनगर येथील भूमिपुत्र"हुतात्मा राजगुरू स्मारका" साठी महाराष्ट्र शासन यांचे जागेत सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामामुळे नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, अनधिकृत बांधकाम काढून टाकून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नगर विकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(२) श्री. हिरामण खोसकर, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मृद व जलसंधारण मंत्र्यांचे लक्ष वेधले —**

"नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी-त्र्यंबकेश्वर या आदिवासी मतदारसंघात सन २००९ ते २०१४ या कार्यकाळात आदिवासी जलसिंचन उपसा योजना या देवमोगरा सेवाभावी संस्थेमार्फत कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याप्रकरणी दिनांक ८ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या सुमारास मा. उपमुख्यमंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदन देण्यात येणे, सदर प्रकरणासंदर्भात चौकशी सुरू असतांना टाकेहर्ष, आवडे, टाकेदेवगाव यांना सुधारित सुप्रमा देण्यात येणे, मा.सहा.गुणनियंत्रण अधिकारी, दक्षता व गुणनियंत्रण पथक, मृद् व जलसंधारण, औरंगाबाद येथील अधिकारी यांनी दिनांक ८ व ९ सप्टेंबर, २०२१ रोजी केलेल्या पाहणी दौऱ्यात १९ पैकी १४ योजना अपूर्ण अवस्थेत असल्याचे आढळून येणे, या सर्व योजना अपूर्ण असतांनाही कोट्यवधी रुपयांची देयके काढण्यात येऊन मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करणे, यासंदर्भात सर्वसामान्य जनतेने तसेच आदिवासी कोळी महादेव समाज विकास संघटना तसेच विविध आदिवासी संघटनेच्या वतीने मा. मंत्री, राज्यमंत्री यांच्याकडे तक्रारी देऊनही कोणतीच कारवाई होत नसल्याने सर्वसामान्य जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करून संबंधित दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मृद् व जलसंधारण मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(३) सर्वश्री. अतुल भातखळकर व योगेश सागर, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –**

**श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्र्याचे लक्ष वेधले :–**

"जागतिक युवा तंबाखू सर्वेक्षणामध्ये राज्यातील १३ ते १५ वयोगटातील ५.१ टक्के बालके तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करीत असल्याचे निदर्शनास येणे, तसेच १८ वर्षांखालील मुलांना तंबाखूजन्य पदार्थ विकण्यास कोटपा कायद्याअंतर्गत बंदी असतानाही त्याचे पालन होत नसल्याचे निदर्शनास येणे, त्यामध्ये शहरी भागातील बालकांच्या तुलनेत ग्रामीण भागातील बालकांना याचे व्यसन झपाट्याने लागत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे बालकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता, बालकांना व्यसनापासून परावृत्त करण्यासाठी त्यांच्यात जागृती करण्याची गरज, कोटपा कायद्याचे पालन न करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सामाजिक व विशेष सहाय्य राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(४) श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधले –**

" राज्यात पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता आणि त्यासंबंधित बाबींकरीता तरतूद करण्यासाठी दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी महाराष्ट्र लोक हक्क अधिनियम, २०१५ प्रस्थापित करण्यात आला जेणेकरून नागरीकांच्या कामात शासकीय कर्मचारी व अधिकारी यांचेकडून होणाऱ्या दप्तर दिरंगाईस आळा बसावा व विहित कालावधीमध्ये सेवा पुरविण्यात यावी हा मुख्य उद्देश असणे, परंतु प्रत्यक्षात मात्र शासनाच्या कोणत्याही विभाग व कार्यालयांमध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाप्रमाणे कामकाज होत नसून त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास होत असणे, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ नुसार कोणत्याही साध्या संचिकेवर/प्रकरण/पत्र निर्गमित करण्याकरीता ७ दिवसांत, त्वरित/तात्काळ संचिकेवर १ दिवसात, तातडीच्या संचिकेवर ४ दिवसांत, खात्याअंतर्गत संचिकेवर ४५ दिवसांत व विविध खात्यांशी संबंधीत ३ महिन्यांच्या आत निर्णय देणे बंधनकारक आहे, परंतु, प्रत्यक्षात मात्र या कालमर्यादेचे पालन होत नाही, याबाबत महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमामध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार संबंधीत अधिकारी किंवा कर्मचारी यांनी त्यांना नेमून दिलेले काम किंवा त्यांच्याशी संबंधीत काम पार पाडण्यात, कसूर केल्यास किंवा जाणूनबुजून किंवा हेतुपुरस्सर विलंब केल्यास महाराष्ट्र हक्क अधिनियम कलम १२ पोटकलम (१) अन्वये, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अन्वये शिस्तभंगांच्या कारवाईस पात्र राहतील अशी तरतूद असतानाही याबाबत कोणतीही कार्यवाही संबंधित विभागांकडून न होणे, राज्यात सदर अधिनियमाचा भंग झाला असल्यास सर्वच विभागांमध्ये किती अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्यात आली आहे किंवा कसे, यासंदर्भातील माहिती देण्याची आवश्यकता, या सर्व बाबी विचारात घेता राज्यात सामान्य नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व लोकप्रतिनिधी यांना वेळेत लोकसेवा देण्याकरीता महाराष्ट्र लोक हक्क अधिनियम, २०१५ ची प्रभावीपणे अंमलबजावणी शासनाने करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

सामान्य प्रशासन राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(५) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृह मंत्र्याचे लक्ष वेधले -**

" जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, गोरेगाव (पूर्व), मुंबई येथील जागृती रुग्णालयाच्या प्रमुख प्रसिद्ध कर्करोग व गायनाकॉलॉजिस्ट विशेषज्ञ व मुंबईसह, देशभरात विविध रुग्णालयात गरीब व गरजू रुग्णांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणाऱ्या सुप्रसिद्ध डॉक्टर मिनल कांबळे यांची बजाज फिनसर्व्ह फायनान्स कंपनींने स्थानिक पोलिसांबरोबर संगनमत करून कॅन्सर रुग्णालय म्हणून सुरू असलेला त्यांचा सूचीधाम संकुलातील बंगला बळकावून बेकायदेशीररित्या एन्कॉर कंपनीला विक्री करून आर्थिक घोटाळा केल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक २१ फेब्रुवारी, २०२२ रोजी निदर्शनास येणे, सदरहू महिला डॉक्टरने ३ कोटी ६ लाखापैकी ५० टक्के कर्ज अदा केले असतानाही डॉक्टर महिलेचे कॅन्सर रुग्णालय सुरू असलेला दिंडोशी, सूचीधाममधील बंगला बजाज फिनसर्व्ह फायनान्स कंपनीने कागदोपत्री कर्ज थकित दाखवून व मालमत्ता सर्फेसी कायदा, १९८९ चे उल्लंघन व स्थानिक पोलिसांबरोबर संगनमत करून व मा. न्यायालयाची दिशाभूल व फसवणूक करून बंगला जप्तीचे आदेश मिळवून सदरहू महिला डॉक्टरचे हात बांधून मारहाण करून शारीरिक व मानसिक छळवणूक करून सदरहू बंगला बेकायदा जप्त केल्याची धक्कादायक घटना घडणे, सदरहू प्रकरणी दिनांक ३१ मार्च, २०२१ व दिनांक ४ जून, २०२१ रोजी ॲट्रॉसिटी ॲक्ट अन्वये दाखल गुन्ह्यांवर पोलिसांनी, संबंधित २९ आरोपींना अटक करून त्यांचेविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करणेबाबत अद्याप पोलिसांनी कोणतीच कार्यवाही न करणे, यासंदर्भांत दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी संबंधित पोलीस अधिकारी यांनी शासनास सादर केलेला अहवाल चुकीचा व दिशाभूल करणारा आणि अर्धसत्य माहितीवर आधारीत असणे, राज्यातील महिलांना सुरक्षा प्रदान करणे व त्यांना न्याय देण्यासाठी नुकतेच आंध्रच्या धरतीवर शक्ती कायदा मंजुर केला असताना, कॅन्सर व गायनाकॉलॉजीस्ट तज्ज्ञ डॉक्टरची मालमत्ता बळकावून त्यांचा मानसिक व शारीरिक छळ करून झालेला अन्याय, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

गृह (शहरे) राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(६) श्री. चंद्रकांत निंबा पाटील, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृह मंत्र्यांचे लक्ष वेधले-**

"जळगांव जिल्ह्यातील मुक्ताईनगर तालुका महाराष्ट्र राज्य व मध्यप्रदेशच्या सीमारेषेवर असल्याने या भागात परप्रांतीयांचे अवैध धंदे सुरू असून त्या माध्यमातून तालुक्यातील गुन्हेगारी वाढत असल्याचे निदर्शनास येणे, गेल्या काही काळापासून पोलिसांच्या दुर्लक्षामुळे किंवा आर्थिक हितसंबंधामुळे आदिशक्ती श्री संत मुक्ताईच्या पुण्यभूमीमध्ये गुन्हेगारी वाढतांना दिसून येणे, तसेच

गावठी कट्टे, हत्यारांची तस्करी, शहरातील भर चौकात तीक्ष्ण हत्यारांचे वार, अवैधरीत्या बंदुकीच्या माध्यमातून दहशत माजविण्याचे प्रकार, इतर तालुका व जिल्ह्यातील तडीपार, मोक्का लावलेल्या गुन्हेगारांचा मुक्त संचार, मागील काळात एका गुन्हेगारांकडे गावठी कट्टा आढळून आल्याबाबतचे प्रकरण दडपण्यात येणे, दिनांक ६ नोव्हेंबर, २०२१ रोजी मुक्ताईनगर तालुक्यातील हलखंडा येथे जबरी दरोडा टाकून एका व्यक्तीचा खून होणे, त्याच दिवशी याच तालुक्यातील कोथळी या गावात श्री. विनोद शिंदे यांच्याकडे दरोडा, दिनांक १० नोव्हेंबर, २०२१ रोजी कुऱ्हा, ता. मुक्ताईनगर येथे दिनेश जयस्वाल यांचे घरावर दरोडा, गेल्या महिन्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी मुक्ताईनगर शहरात अवैध बनावट दारु विक्रेत्यावंर कारवाई करणे तसेच याच तालुक्यात अवैध बनावट दारुचा कारखाना सुध्दा उद्ध्वस्त करण्यात येणे, परंतु पोलीस निरीक्षकांकडून आजपावेतो अशी कुठलीच कारवाई होताना दिसत नसल्याने या अवैध धंदे व अवैध बनावट दारु विक्रेत्यांशी अर्थपूर्ण संबंध असल्याचा सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण होत असलेला संशय, याकरिता शासनाने मुक्ताईनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांचेवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कारवाई."

गृह (ग्रामीण) राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाजपत्रिकेतील लक्षवेधी सूचना क्रमांक ७ पुढे ढकलण्यात येत आहे असे तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

आता सभागृहाची विशेष बैठक स्थगित होऊन सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता भरेल असे तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक सकाळी १० वाजून ४९ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय उपाध्यक्ष श्री. नरहरी झिरवाळ यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते यांनी, विधान परिषदेचे माननीय विरोधी पक्ष नेते यांच्यावर दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याबाबत मुद्दा उपस्थित केला.

श्री.बालाजी कल्याणकर, वि.स.स यांनी,"विजेचे खंडित करण्यात आलेले कनेक्शन जोडून देण्यासंदर्भात महावितरण कंपनीला आदेश देणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला

श्री.देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते यांनी उपरोक्त माहितीच्या मुद्यास समर्थन दिले.

माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या बाबतीत दखल घेऊन याबाबतीत गृह मंत्री माहिती घेऊन निवेदन देतील असे संसदीय कार्य मंत्र्यांनी सांगितले.

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक ५ मिनिटांसाठी स्थगित करतो असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून ०८ मिनिटांनी स्थगित झाली.
सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून १३ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

श्री. अनिल पाटील, वि.स.स. यांनी," जळगाव जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन श्री. गुलाबराव देवकर यांचा केलेला उल्लेख" इ.बाबत हरकतीचा मुद्दा उपस्थित केला.

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक १५ मिनिटांसाठी स्थगित करतो असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून २० मिनिटांनी स्थगित झाली.
सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून ३५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

**१.** (१) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एक प्रश्न क्रमांक उत्तरित झाला परंतु त्यावरील अनुपूरक प्रश्नोत्तरे अपूर्ण राहिली.

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्थगित करीत असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून ४० मिनिटांनी स्थगित झाली.
सभागृहाची बैठक दुपारी १२.०० वाजता पुन्हा सुरू झाली.

**(२)** आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पस्तीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

**२.** विधि व न्याय राज्यमंत्र्यांनी,"धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करणे" या संदर्भातील तदर्थ संयुक्त समितीचा अहवाल सभागृहास सादर केला.

**३.** श्री.नरेंद्र भोंडेकर, समिती प्रमुख, यांनी, बुधवार, दिनांक १६ मार्च, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय ठरावांना वेळ नेमून देणारे अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहास सादर केले व ते संमत करावे असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

४. आज प्राप्त झालेल्या स्थगन प्रस्तावाच्या सर्व सूचनांना दालनात अनुमती नाकारली आहे असे तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(१) माननीय तालिका सभाध्यक्षांनी खालील घोषणा केली —

"सर्व माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात आनंद होत आहे की, या सचिवालयातील सीपीए/राजशिष्टाचार कक्षामार्फत तयार करण्यात आलेले" 'महाराष्ट्र विधानसभा मार्गदर्शिका' हे पुस्तक माननीय विधानसभा सदस्यांना; हजेरीपट ठेवण्यात आलेल्या ठिकाणी आज मंगळवार, दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी वितरित करण्यात येत आहे. तरी सर्व माननीय सदस्यांनी आपल्या अभ्यासासाठी तसेच संदर्भासाठी सदर पुस्तक अवश्य प्राप्त करावे, अशी विनंती आहे. 'महाराष्ट्र विधानसभा मार्गदर्शिका' या पुस्तकाचे संदर्भमुल्य लक्षात घेता सदर उपयोगी पुस्तक सर्वांना माहिती तसेच संदर्भासाठी कोणत्याही वेळी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने या पुस्तकाची पी.डी.एफ. स्वरुपातील प्रत महाराष्ट्र विधानमंडळाच्या www.mls.org.in या संकेतस्थळावर दर्शविण्यात येत आहे. याचा माननीय सदस्यांनी अवश्य लाभ घ्यावा.सदर पुस्तकात काही त्रुटी आढळल्यास त्याबाबत पुढील आवृत्तीत अवश्यपणे सुधारणा करण्यात येईल. पुस्तकाची उपयुक्तता वाढविण्याच्या दृष्टीने माननीय सदस्यांच्या काही सूचना/सुधारणा असल्यास त्याचे देखील निश्चितच स्वागत केले जाईल."

(२) माननीय तालिका सभाध्यक्षांची खालील घोषणा केली —

'नवनिर्वाचित सन्माननीय सदस्यांसाठी लोकसभा सचिवालयातील' पार्लमेंटरी रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट फॉर डेमॉक्रसीस' (PRIDE) या प्रशिक्षण संस्थेतर्फे संसद भवन, नवी दिल्ली येथे संसदीय अभ्यासवर्गाचे आयोजन दिनांक ५ व ६ एप्रिल, २०२२ रोजी करण्यात आले आहे. या अभ्यासवर्गासाठी समन्वयाची जबाबदारी राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा व वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र, विधान भवन, मुंबई यांच्याकडे आहे.या संसदीय अभ्यास वर्गात सहभागी होण्यासाठी ज्या सन्माननीय सदस्यांनी आपली नावे कळविली आहेत त्यांनी दिनांक ५ व ६ एप्रिल, २०२२ रोजी लोकसभा सचिवालया, नवी दिल्ली येथे होणाऱ्या या अभ्यास वर्गाची नोंद घ्यावी."

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते यांनी,"विजेच्या प्रश्नावर चर्चा तसेच महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनने मंगळवार दिनांक १५ मार्च २०२२ पासून आझाद मैदान येथे धरणे आंदोलन सुरू करणे" इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

यासंदर्भात लवकरात लवकर चर्चा करण्यासाठी सरकारतर्फे प्रयत्न सुरू आहेत असे तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक दुपारी ०१.०० वाजेपर्यंत स्थगित करतो असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ०९ मिनिटांनी स्थगित झाली.
सभागृहाची बैठक दुपारी ०१.०० वाजता पुन्हा सुरू झाली.

ऊर्जा मंत्र्यांनी,"राज्यातील शेतकऱ्यांची वीज जोडणी कापण्यात येत असणे" इ.बाबत नियम ४७ अन्वये निवेदन केले व भाषण केले.

माननीय उपाध्यक्षांनी खालील घोषणा केली

"मला वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आझाद मैदान पोलीस ठाणे, मुंबई यांचेकडून कळविण्यात आले आहे की, श्री. देवेंद्र फडणवीस, माननीय विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा तसेच विधासनभा सदस्य श्री. नितेश राणे, ॲड. आशिष शेलार, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री चंद्रकांत पाटील, मंगलप्रभात लोढा, जयकुमार रावल, गिरीश महाजन, प्रशांत ठाकूर, मंगेश चव्हाण, सुधीर मुनगंटीवार तसेच विधानसभा सदस्या सर्व श्रीमती देवयानी फरांदे, मनिषा चौधरी यांना दिनांक ९ मार्च, २०२२ रोजी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम ६९ अन्वये वासुदेव बळवंत फडके चौक (मेट्रो जंक्शन) मुंबई येथे ताब्यात घेण्यात येऊन त्यांना त्याच दिवशी येलोगेट पोलीस ठाणे, मुंबई येथून मुक्त करण्यात आले."

**५. (१) श्री. कुणाल पाटील, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा मंत्र्याचे लक्ष वेधले –**

"धुळे जिल्ह्यातील सुलवाडे, जामफळ-कनोली उपसा सिंचन योजनेंतर्गत शेती संपादित केली असून त्यात धुळे तालुक्यातील वेल्हाणे, कुंडाणे, बाबरे येथील शेतकऱ्यांना अत्यल्प निवाडा घोषित करणे व आश्वासन देऊनही प्रशासनाने निवाडा दुरुस्तीबाबत कोणतीही ठोस कार्यवाही न करणे, प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहीत केल्या मात्र मोबदल्याबाबत प्रत्येक भागातील शेतकऱ्यांना वेगवेगळा मोबदला देणे, सोनगीर व सोंडले शिवारात २० ते २५ लाख रुपये एकरी भाव असताना ५ लाख रुपये देखील एकरी भाव न देणे तसेच विहीरी, फळझाडे, घर, बोअरवेल शेड यांचे योग्य मोबदल्यासाठी मूल्यमापन केले जात नसल्याने स्थानिक शेतकऱ्यांनी माहे जानेवारी, २०२२ च्या पहिल्या आठवड्यादरम्यान धरणाचे काम बंद पाडून बेमुदत धरणे आंदोलन सुरू करणे व याबाबत जिल्हाधिकारी, धुळे यांना निवेदन देण्यात येणे, तसेच जवाहर सामाजिक कृतज्ञता ट्रस्ट, धुळे या ट्रस्टने धुळे तालुक्यातील अनेक दुष्काळी गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर सिंचनासाठी काम केले असून सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजनेतून दुष्काळी गावांसाठी लाभ देणे शक्य असल्याचा प्राथमिक अभ्यास केलेला असणे, शासनाने बंद पाईपद्वारे सिंचन सुविधा

देणेबाबत निर्णय घेतलेला असणे, त्यामुळे प्रकल्पाच्या पाणी वापरात निश्चितपणे बचत होणे, सदर बचतीतून धुळे तालुक्यातील दापुरा, सरवड, लोणकुटे, कापडणे, धमाणे, धमाणी, नगाव बु., बिलाडी, कुंडाणे, वरखेडे व बाळापुर या १० गावातील ४० बंधारे भरल्यास सदर गावांमधील सिंचन व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटू शकणे, या बाबींकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

जलसंपदा मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(२) श्री. अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री हिरामण खोसकर, संग्राम थोपटे, कुणाल पाटील, झीशान सिद्दिकी, कुमारी प्रणिती शिंदे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री धीरज देशमुख, सुरेश वरपुडकर, विकास ठाकरे, अमित झनक, लहू कानडे, सुभाष धोटे, विक्रमसिंह सावंत, बळवंत वानखडे, अबू आजमी, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना —**

श्री. अमीन पटेल, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्याचे लक्ष वेधले—

"मुंबई हे बेटांचे शहर असणे, या शहरात १६००० पेक्षा जास्त उपकर प्राप्त इमारती जुन्या व जीर्ण असून मोडकळीस आलेल्या असणे, सदर इमारतींना दुरुस्तीची किंवा पुनर्विकास करण्याची गरज असणे, त्यातील जास्तीत जास्त इमारती या दक्षिण मुंबई विभागात असणे, मुंबई शहरात संक्रमण शिबिरांची संख्या खूप कमी असणे, त्यातच म्हाडाच्या कर्मचारी वर्गाची संख्या देखील कमी असणे, विशेषतः मुंबादेवी विधानसभा विभागात अनेक पदे रिक्त असणे, त्यामुळे जुन्या व जीर्ण इमारतींचे सर्वेक्षण वेळेत न होणे, इमारतींच्या दुरुस्तीसाठी म्हाडाकडे निधी उपलब्ध नसणे, कामाठीपुरा परिसराचा पुनर्विकासाचा प्रश्न ऐरणीवर असणे, परंतु आजमितीपर्यंत त्यावर कार्यवाही न होणे, परिणामी इमारतींच्या दुरुस्ती व पुनर्विकासात होत असलेल्या दिरंगाईमुळे नागरिकांत पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

गृहनिर्माण मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(चर्चा अपूर्ण)

**(३) श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे नगरविकास मंत्र्याचे लक्ष वेधले —**

"जोगेश्वरी विधानसभा क्षेत्र हे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'के' पूर्व व 'पी' दक्षिण गोरेगाव या दोन कार्यालयांशी जोडलेले असणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे के/पूर्व कार्यालय अंधेरी (पूर्व) येथे कार्यरत असून त्याअंतर्गत येणाऱ्या एकूण १५ प्रभागांपैकी ७२, ७३, ७४, ७७, ७८, ७९ असे सहा प्रभाग जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील असणे, तर पी / दक्षिण हे कार्यालय गोरेगाव (पश्चिम) येथे कार्यरत असून त्याअंतर्गत येणाऱ्या एकूण ८ प्रभागांपैकी ५२ व ५३ हे दोन प्रभाग जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील असणे, जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रापासून बृहन्मुंबई महानगरपालिकेची के / पूर्व व पी / दक्षिण ही दोन्ही कार्यालये जवळपास ८ ते ९ कि.मी. दूर असल्याने या कार्यालयात कामानिमित्त जाणाऱ्या नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून तेथे ये-जा करण्यात त्यांच्या वेळेचा अपव्यय होत असल्याने नागरिक त्रस्त होणे, त्यानुषंगाने जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील आजगावकर मैदान येथील प्लॉट क्रमांक ५१ व ५२ येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नवीन कार्यालय सुरू करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली असता सदरहू बाब तांत्रिक स्वरूपाची व धोरणात्मक असल्याने या प्रकरणी व्दिसदस्यीय समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर कारवाई करण्यात येईल असे सहआयुक्त (सा.प्र.) यांनी कळविलेले असणे, उक्त जागेवर बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नवीन विभागीय कार्यालय सुरू होण्यास होत असलेला विलंब तसेच या प्रकरणी येत असलेल्या तांत्रिक अडचणी लक्षात घेता जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील पुनमनगर येथे नव्याने तयार करण्यात आलेल्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मजास मंडई या १० मजली इमारतीत बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नवीन विभागीय कार्यालय सुरू करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये केलेली असणे, तसेच याआधी तेथे अगोदर इमारत प्रस्ताव विभागाचे कार्यालय सुरू असणे, सद्यःस्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिकेतील प्रभागांच्या नवीन रचनेनुसार विभाग कार्यालयांचे विभाजन व पुनर्रचना करण्याकरिता गठित करण्यात आलेल्या दोन उपायुक्तांच्या समितीने दिलेल्या अहवालावर विविध गटनेत्यांनी अनेक हरकती, मुद्दे व सूचना उपस्थित केलेल्या असणे, या प्रकरणी दोन सहआयुक्तांच्या समितीकडून अहवाल मागविण्यात आला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, तथापि सदरहू समितीने आपला अहवाल शासनास अथवा बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनास सादर केलेला नसणे, या प्रकरणी अहवाल सादर करण्यास होत असलेला विलंब लक्षात घेता संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून त्यांचेवर कारवाई करून अहवाल लवकरात लवकर सादर करण्याबाबत समितीस निर्देश देण्याबाबत. मा. मुख्यमंत्री यांच्या समवेत पार पडलेल्या बैठकीत या प्रस्तावाला संमती देण्यात आली असून मुंबई उपनगर पालकमंत्री यांच्या बैठकीत मनपा आयुक्तांनी या मागणीला दुजोरा देणे, असे असतानाही जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील पूनमनगर येथे नव्याने तयार करण्यात आलेल्या

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मजास मंडई या १० मजली इमारतीत बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नवीन विभाग कार्यालयाच्या निर्मितीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून शासन व बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडे वारंवार मागणी करण्यात येणे, या प्रकरणी नवीन विभागीय कार्यालयाच्या निर्मितीस मंजुरी मिळणेबाबत होत असलेल्या विलंबामुळे स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण होत असलेली संतापाची भावना, शासनाने या प्रकरणी तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नगर विकास मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(चर्चा अपूर्ण)

सर्वश्री अमीन पटेल व इतर वि.स.स. यांनी,"मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास आणि म्हाडाचे विविध प्रश्न" इ.बाबत उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेदरम्यान श्री. अमीन पटेल, वि.स.स. यांनी विचारलेल्या दोन उपप्रश्नांना गृहनिर्माण मंत्र्यांनी उत्तर दिले.

(उक्त लक्षवेधीवरील चर्चा पूर्ण झाली.)

सर्वश्री रविंद्र वायकर, वि.स.स. यांनी,"जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रात नवीन विभागीय कार्यालयाच्या निर्मितीस मंजुरी मिळणे" इ. बाबत उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा पुढे सुरू झाली.

(उक्त लक्षवेधीवरील चर्चा पूर्ण झाली.)

**(४) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्याचे लक्ष वेधले –**

"राज्यातील गोरगरीब आदिवासी जनतेचे बळजबरीने आमीष दाखवून व त्यांना आरोग्याच्या सेवा देऊन होणारे धर्मांतरण रोखण्याकरिता भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४१ व ३४२ मध्ये सुधारणा करणे आवश्यक असणे, रामायण, महाभारतापासून छत्रपती शिवाजी महाराज, महाराणा प्रताप, झाशीची राणी लक्ष्मीबाई या काळातील आदिवासींचा मोठा इतिहास व पराक्रम असणे, निसर्गप्रेमी आदिवासी समाज खेड्यापाड्यांमध्ये ११ टक्क्यांच्या आसपास असून आरोग्य व अन्य सेवा देण्याच्या नावावर आमीष दाखवून बळजबरीने आदिवासींचे धर्मांतरण करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास येणे, परिणामी देशातील पुरातन आदिवासी संस्कृती नष्ट होत असणे, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४१ अन्वये अनुसूचित जातीचा माणूस धर्मांतरीत होऊन मूळ संस्कृतीपासून दूर गेला तर त्याच्या अनुसूचित जातीच्या सवलती बंद होणे, तथापि, कलम ३४२

नुसार अनुसूचित जमातीची व्यक्ती धर्मांतरीत होऊन मूळ संस्कृतीपासून दूर गेली तरी त्यांच्या अनुसूचित जमातीच्या सवलती बंद होत नसणे, उलट हा धर्मांतरित आदिवासी व्यक्ती अनुसूचित जमातीचा व अल्पसंख्याक अशा आरक्षणाचा दुहेरी लाभ घेत असणे, त्यामुळे अनुसूचित जमातीच्या व्यक्तीने कोणत्याही कारणास्तव धर्मांतर केल्यास त्याला अनुसूचित जमातीचे आरक्षण बंद करण्याच्या दृष्टीने संविधानाच्या अनुच्छेद ३४१ व ३४२ मध्ये उचित सुधारणा करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

आदिवासी विकास मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. रवि राणा, वि.स.स. यांनी," श्री. रवि राणा, वि.स.स. यांनी त्यांच्यावर भारतीय दंड संहितेच्या कलम ३०७ आणि कलम ३५३ सारखा गुन्हा दाखल करण्यात येणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्याची गृह मंत्र्यांनी नोंद घ्यावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

श्री. राम कदम, वि.स.स. यांनी,"भिवंडी येथील हसीन पीव्हीआर येथे 'द कश्मिर फाईल्स' या चित्रपटाचा शो बंद पाडणे" इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याची चौकशी करावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा पुढे सुरू झाली.

अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला —

श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. यांनी आपले भाषण पूर्ण केले.

(१) श्री. सुधीर मुनगंटीवार
(२) श्री. प्रकाश सोळंके
(३) श्री. सुरेश वरपुडकर
(४) श्री. गणेश नाईक
(५) श्री. भास्कर जाधव
(६) श्री. हरिभाऊ बागडे
(७) श्री. रोहित पवार

(चर्चा अपूर्ण)

संसदीय कार्यमंत्र्यांनी, "बुधवार, दिनांक १७ मार्च, २०२२ रोजी होळी सण असल्यामुळे सभागृहाच्या कामकाजास सुट्टी मिळण्याची आवश्यकता" इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

श्री.आशिष शेलार, वि.स.स. यांनी उपरोक्त मुद्यास सहमती दर्शविली.

बुधवार, दिनांक १७ मार्च, २०२२ रोजी होळी सण असल्यामुळे सभागृहाची बैठक भरणार नाही तसेच आता नियम २९३ अन्वये प्रस्तावावरील चर्चेस सुरूवात करावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**६.** सर्वश्री अनिल पाटील, सुनिल प्रभू, नाना पटोले, यशवंत माने, भास्कर जाधव, सुरेश वरपुडकर, प्रकाश सोळंके, रविंद्र वायकर, रणजित कांबळे, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री अजय चौधरी, अमिन पटेल, ॲड. अशोक पवार, सर्वश्री दीपक केसरकर, संग्राम थोपटे, दीपक चव्हाण, संजय शिरसाट, कु. प्रणिती शिंदे, श्री. दौलत दरोडा, डॉ. संजय रायमुलकर, सर्वश्री कैलास गोरंट्याल, रोहित पवार, चिमणराव पाटील, अमित झनक, धर्मरावबाबा आत्राम, डॉ.राहुल पाटील, सर्वश्री कुणाल पाटील, संग्राम जगताप, संजय राठोड, शिरिष चौधरी, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री प्रताप सरनाईक, सुभाष धोटे, बाळासाहेब आजबे, सदा सरवरणकर, श्रीमती सुलभा खोडके, श्री.बाबासाहेब पाटील, डॉ.तानाजी सावंत, सर्वश्री माधवराव जवळगावकर-पाटील, शेखर निकम, अनिल बाबर, पी.एन. पाटील (सडोलीकर), मनोहर चंद्रिकापुरे, राजन साळवी, शिरिषकुमार नाईक, दिलीप बनकर, भरतशेठ गोगावले, राजेश एकडे, सुनिल भुसारा, किशोर पाटील, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री चेतन तुपे, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री विकास ठाकरे, अतुल बेनके, ज्ञानराज चौगुले, बळवंत वानखडे, सुनिल शेळके, संजय पोतनीस, राजु पारवे, सुनिल टिंगरे, प्रकाश फातर्पेकर, संजय जगताप, दिलीप मोहिते-पाटील, वैभव नाईक, विक्रमसिंह सावंत, संदिप क्षीरसागर, मंगेश कुडाळकर, सहसराम कोरोटे, राजेश पाटील, प्रकाश आबिटकर, मोहनराव हंबर्डे, अण्णा बनसोडे, सुनिल राऊत, हिरामण खोसकर, मकरंद जाधव-पाटील, कैलास पाटील (घाडगे), धीरज देशमुख, आशुतोष काळे, बालाजी कल्याणकर, ऋतुराज पाटील, राजू कारेमोरे, संजय गायकवाड, राजु आवळे, निलेश लंके, सुहास (अण्णा) कांदे, झिशान सिद्दीकी, डॉ.किरण लहामटे, सर्वश्री नितीनकुमार देशमुख, लहू कानडे, इंद्रनिल नाईक, संतोष बांगर, मानसिंग नाईक, उदयसिंग राजपूत, चंद्रकांत नवघरे, रमेश बोरनारे, नितीन पवार, विश्वनाथ भोईर, बबनराव शिंदे, प्रकाश सुर्वे, शांताराम मोरे, रमेश लटके, रमेश कोरगावकर, महेंद्र थोरवे, महेंद्र दळवी, महेश शिंदे, ॲड. शहाजीबापू पाटील, सर्वश्री योगेश कदम, श्रीमती लता सोनवणे, सर्वश्री प्रदिप जैस्वाल, श्रीनिवास वनगा, दिलीप लांडे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :—

श्री. अनिल पाटील, वि.स.स. यांनी म.वि.स. नियम २९३ अन्वये खालील प्रस्ताव मांडला व भाषण केले —

“राज्यातील अस्तित्वात असलेल्या व दुरवस्था झालेल्या ग्रामीण रस्त्यांची दर्जोन्नती करणे यासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-१ च्या धर्तीवर राज्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-२ या योजनेची टप्प्याटप्प्यात अंमलबजावणी करण्यात आली असणे, प्रथम टप्प्यात रस्ते दर्जोन्नतीसाठी १० हजार किलोमीटर लांबीवर काम करण्यात येणार असून त्यापैकी सन २०२१-२२ या वर्षात ३ हजार किलोमीटर लांबीवर काम करण्यात येणे, या प्रकल्पाची एकूण किंमत ७ हजार ५०० कोटी रुपये असणे, सन २०२२-२३ मध्ये ३ हजार कोटी इतक्या निधीची आवश्यकता असून रस्त्याच्या कामात निधी कमी पडल्यास नाबार्ड बँक, आशियाई विकास बँक वा तत्सम संस्थेकडून कर्जरुपी निधी उपलब्ध करून घेण्याचा निर्णय सुद्धा शासनाने घेतलेला असणे, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-१ मध्ये बऱ्याच त्रुटी असून त्या दूर करण्याची आवश्यकता असणे, पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत एकूण ६ हजार ५५० किलोमीटर रस्त्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला असून पहिल्या टप्प्यात २९२५ किलोमीटर बांधकामाला मान्यता प्राप्त झाली असून २०१७७ कोटी रुपये खर्च होणार असणे, ग्रामीण भागातील कोरोनामुक्तीच्या कामाला प्रोत्साहन मिळावे यासाठी राज्यातील प्रत्येक महसुली विभागात पहिल्या ३ ग्रामपंचायतींना अनुक्रमे ५० लाख, २५ लाख व १५ लाख रुपयांचे बक्षीस देण्याचा शासनाने चांगला निर्णय घेतलेला असणे, राज्यात ५ लाख ४२ हजार ९४४ महिला स्वयंसहाय्यता गट कार्यरत असून ५५ लाख ३५ हजार ४३२ कुटुंबांचा त्यात समावेश करण्यात आला असून ११ हजार १४० कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आलेले असणे, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजने अंतर्गत १० हजार २३१ गटांना २६ कोटी रुपये बीजभांडवल वाटप करण्यात आलेले असणे, ग्रामीण भागातील घरकुलांच्या निर्मितीला गती देण्यासाठी ग्रामीण महाआवास अभियानाचा शासनाने प्रारंभ केला असून आतापर्यंत ४ लाख २५ हजार घरकुले पूर्ण करण्यात येणे, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतून ५,३९,५२,२६८ इतके मनुष्यबळ निर्मिती करण्यात येणे. स्वच्छ भारत मिशनमधून ८ लाख ७८ हजार ७११ शौचालये बांधण्यात येणे. प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेतून ५ लाख ७५ हजार १८३ महिलांना गॅस जोडणी देण्यात आलेली असणे, सौभाग्य योजनेतून ५ लाख ७८ हजार १५१ विद्युत जोडण्या देण्यात आलेल्या असणे, अनुसूचित जमातींचे बनावट जात वैधता प्रमाणपत्रे सादर करून इतर जातीच्या उमेदवारांनी शासकीय नोकरी मिळविली असणे, ज्यांनी अशी बनावट जात प्रमाणपत्रे दिली आहेत त्यांच्यावर कार्यवाही करणे आवश्यक असणे, आदिवासी शालेय विद्यार्थिनींना शालेय भत्ता गेल्या २० वर्षांपासून प्रत्येक दिवशी १ रुपया देण्यात येतो त्यात वाढ करून आदिवासी विद्यार्थीनीना कमीतकमी १० रुपये शालेय भत्ता देण्यात येणे, मानव विकास निर्देशांकास उंची देण्यासाठी राज्य शासनाने आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ राज्यात सुरू करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतलेला असणे, ऑलिम्पिकसाठी राज्यातील निवड झालेल्या १० खेळाडूंना प्रशिक्षण व सरावासाठी रु. ५ कोटी इतकी आर्थिक सहाय्य करणारे देशातील महाराष्ट्र एकमेव राज्य

असून नवीन व्यायाम शाळेच्या बांधकामाची मर्यादा ७ लक्ष रुपयावरून १२ लक्ष इतकी करण्याची आवश्यकता, नवीन व्यायाम शाळांच्या साहित्य खरेदीसाठी जास्त निधीची तरतूद करण्यात यावी, डीपीसी योजनेअंतर्गत क्रीडांगण विकास योजनेला व्यापक स्वरूप देऊन तरतूद ७ लक्ष रुपयावरून १० लक्ष करण्यात यावी त्यात रनिंग ट्रॅक (Running Track) जॉगिंग ट्रॅक विकसित करावे जेणे करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पोलीस भरती व इतर मैदानी खेळासाठी चालना मिळेल, विदेशी गायींच्या जातीपैकी सर्वात जास्त दूध देणारी गाय होलस्टीन फ्रिजीयन (एका वेतात सरासरी ९ ते १२ हजार लिटर) ही आहे. तसेच भारतीय जातीपैकी सर्वात जास्त दूध देणारी गाय साहीवाल (एका वेतात सरासरी ४ ते ६ हजार लिटर) ही आहे. महाराष्ट्र राज्यातील जातीपैकी सर्वात जास्त दूध देणारी गाय देवणी (एका वेतात १ ते दीड हजार लिटर) ही आहे. होलस्टीन फ्रिजियन गाय सध्या पुणे येथील भाग्यलक्ष्मी फार्म, येथे असून भारतीय वातावरणात ही गाय एका वेतात ११५०० लिटर दूध देत आहे. होलस्टीन फ्रिजियन गाय राज्यात आणण्यासाठी शेतकऱ्यांना अनुदान देण्याची गरज, याबाबत राज्य शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला —

(१) डॉ. संजय कुटे (भाषण पूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा पुढे सुरू झाली.

अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला —

(८) श्री. रत्नाकर गुट्टे

(९) श्री. नाना पटोले

(१०) श्री. बबनराव लोणीकर

(११)श्री. अबु आजमी (भाषण पूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

## बुधवार, दिनांक १६ मार्च, २०२२

**(१)** डॉ. विनय कोरे, श्री. रईस शेख, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. विनय कोरे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"शाहूवाडी तालुक्यामधील २६८ पैकी ३४ प्राथमिक शाळा अत्यंत दुर्गम व डोंगराळ क्षेत्रात ज्ञानदानाचे कार्य करत असणे, दुर्गम व डोंगराळ क्षेत्र असल्याने सदर शाळेतील शिक्षक पदे नेहमी रिक्त राहणे, सुगम शाळेतील शिक्षकांची दहा वर्षे बदली होत नसणे, शिक्षक या शाळा स्वीकारण्यास नकार देणे याउलट दुर्गम शाळेतील शिक्षकांची तीन वर्षांनंतर विनंती बदली होत असल्याने अनेक शिक्षक दुर्गम शाळा स्वीकारण्याची शक्यता असणे, सध्या तालुक्यात २६८ प्राथमिक शाळेत मंजूर शिक्षकांची ९०० इतकी पदे असून त्यापैकी २३० इतकी पदे रिक्त असणे, त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, शासनाने शाहूवाडी तालुक्यातील दुर्गम शाळा निकषांमध्ये बसणाऱ्या १६६ गावातील शाळा दुर्गम व अवघड क्षेत्र म्हणून घोषित केल्यास अधिकाधिक रिक्त पदे भरण्यास मदत होणे व त्यामुळे रिक्त पदाचा प्रश्न मिटेल व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नसून तालुक्याचा शैक्षणिक दर्जा उंचावेल याकडे शासनाने प्राधान्याने लक्ष घालण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

ग्रामविकास मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. सुनील शेळके वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"पुणे जिल्ह्यातील लोणावळा नगरपरिषद (ता.मावळ) प्रशासनाने नगरपरिषदेचा कोणताही ठराव पारित न करताच संबंधित कंत्राटदारास माहे मे, २०१२ मध्ये रुपये १.५० कोटी अदा केले असल्याचे निदर्शनास येणे, सदर नगरपरिषदेने कोणतीही कामे वा साहित्य लोणावळा नगरपरिषदेकडे उपलब्ध न केल्यामुळे सन २०१६ सालापर्यंत सुमारे रुपये ८ कोटीहून अधिक रक्कमेचे आर्थिक नुकसान झाल्याचे निदर्शनास येणे तसेच त्याबाबत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मागविण्यात आलेल्या माहितीद्वारे ही बाब उघडकीस येणे, मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी त्यांचे दिनांक २९ जानेवारी, २०२० रोजीच्या पत्रान्वये तसेच मा. लोकआयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचेकडे तक्रारी दाखल केल्या असल्याचेही निदर्शनास येणे, सदर प्रकरणी मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याप्रकरणी व त्याबाबत तक्रारी दाखल करूनही १ वर्षापेक्षा अधिक कालावधी होऊनही कार्यवाही न होणे व त्यामुळे मा. लोकप्रतिनिधींसह सर्वसामान्य जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने केलेली कार्यवाही व उपाययोजना."

नगरविकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. सुहास (अण्णा) कांदे वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"नाशिक जिल्ह्यातील नांदगांव क्षेत्राची भौगोलिक स्थिती पाहता गावा-गावातील अंतर मोठ्या प्रमाणात असणे, ग्रामस्थांची प्रशासकीय कामाबाबत गैरसोय होणे, त्यामुळे गोरगरीब ग्रामस्थांना उदरनिर्वाहासाठी ८ ते ९ महिने बाहेर गावी जाणे लागणे, ग्रामपंचायत असलेल्या गावांना वाडी व तांडे यामध्ये राहणाऱ्या रहिवाशांना त्यांची कामे वेळेवर करण्यास मोठ्या प्रमाणात आजमितीपर्यंत त्रास सहन करावा लागणे, या त्रासातून त्यांची मुक्तता व्हावी याकरिता व या परिसरातील ग्रामस्थांची अनेक कामे विनाविलंब होण्याकरिता व त्यांची होत असलेली गैरसोय दूर व्हावी म्हणून नांदगाव या क्षेत्रातील वाडी व तांड्या वस्तीशी संलग्न असलेल्या ग्रामपंचायती विभक्त करून देणे या अनुषंगाने शासनाने तात्काळ निर्णय घेऊन त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता."

ग्रामविकास मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) सर्वश्री प्रकाश सोळंके, संदिप क्षीरसागर, बाळासाहेब आजबे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. प्रकाश सोळंके वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"पाटोदा (जि.बीड) येथील नगरपंचायत हद्दीत मांजरा नदीवरील ब्रिज कम बंधारा कामासाठी शासनाने २ कोटी ९२ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करणे, सदर कामाच्या ई-निविदेसाठी अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यतेचा अधिकार नसताना देखील सा.बां.विभागाच्या अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद यांची तांत्रिक मान्यता सादर करणे, परंतु सा.बां. विभागाच्या अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद यांनी सदर कामास तांत्रिक मान्यता दिली नसल्याचे लेखी पत्र देणे, एकंदरीत सदर ई-निविदा बोगस पद्धतीने करणे, प्रत्यक्ष अंदाजपत्रकानुसार काम न करता २ कोटी ६० लक्ष रुपयांचे देयक अदा होणे, यामध्ये तत्कालीन नगराध्यक्ष, मुख्याधिकारी, नगर अभियंता व ठेकेदार यांनी संगनमत करून भ्रष्टाचार करणे, या कामासाठी अतिरिक्त १ कोटी रुपयांच्या निधीची मागणी करणे, दरम्यान या नगरपंचायतीच्या सन २०१७ ते २०२१ या ५ वर्षांच्या कालावधीमध्ये विविध सार्वजनिक व मूलभूत योजनेच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता व भ्रष्टाचार होणे, एकंदरीत या नगरपंचायतचे सन २०१७ ते २०२१ या कालावधीमधील विशेष लेखापरीक्षण करण्याची आवश्यकता असणे, तसेच बंधारा कम ब्रिज कामाच्या अपहार प्रकरणी दोषी विरुद्ध फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करून अपहाराची रक्कम शासनाने वसूल करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

नगरविकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ५० मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय उपाध्यक्ष श्री. नरहरी झिरवाळ यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**१.** (अ) तारांकित प्रश्न-

(१) पाच तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील बावन्न प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

श्री. सुनिल प्रभू वि.स.स. यांनी,"राज्यामध्ये येत्या तीन दिवसांमध्ये तापमानात मोठी वाढ होईल, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला त्यादृष्टीने आरोग्य विभागाने जनजागृतीकरिता कोणती उपाययोजना केली आहे" इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

आरोग्य मंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

**(ब)** महिला व बाल विकास मंत्र्यांनी, ''मुंबईतील डोंगरी येथील बालसुधारगृहाच्या दुरवस्थेबाबत'' या विषयावरील सन्माननीय सदस्य श्री. अमिन पटेल यांच्या दिनांक १२ मार्च, २०१५ रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक ५३१४ ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवली.

**२.** (१) ऊर्जा मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा सोळावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) संसदीय कार्य मंत्र्यांनी,

(अ) शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (सिडको) यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल,

(क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा त्रेसष्टावा वार्षिक अहवाल,

(ख) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचा सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे छत्तीसावा व सदतीसावा वार्षिक अहवाल,

(ग) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० चे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

**३.** श्री. कैलास गोरंट्याल (समिती प्रमुख) यांनी विधानसभा आश्वासन समितीचा दुसरा अहवाल सभागृहाला सादर केला.

**४.** उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी पुढील प्रस्ताव मांडला.

"अर्थसंकल्पातील अनुदानासाठीच्या मागण्यांवर चर्चा व मतदानाच्या संदर्भात महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम २५१ (१) मधील दहा दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

(१) श्री. संदीप कुणावार वि.स.स. यांनी,"गेल्या अनेक वर्षांपासून मनोरा आमदार निवासाचे काम रखडलेले असणे" इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

(२) श्री. किशोर पाटील वि.स.स. यांनी,"शेतकऱ्यांची वीज न तोडण्याच्या संदर्भात ऊर्जा मंत्र्यांनी घोषणा करूनही काही ठिकाणी शेतकऱ्यांची तोडणी केलेली वीज पुन्हा जोडण्यास संबंधित अधिकारी तयार नसणे" इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

याबाबत नोंद घेतली असून तसे आदेश निर्गमित करण्यात येतील असे ऊर्जा मंत्र्यांनी आश्वासन दिले.

(३) श्रीमती मनिषा चौधरी वि.स.स. यांनी,"डहाणू येथील महालक्ष्मीची यात्रा सुरू करण्यात येणार आहे किंवा नाही, या विषयी स्पष्टीकरण होण्याची गरज." इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

(४) प्रा. देवयानी फरांदे वि.स.स. यांनी,"अभिनव भारत मंदिर नव्याने बांधण्यासाठी १ कोटी रुपयांचा निधी आपल्या मागणीवरून मंजूर झाला असताना व त्यासंबंधीचा प्रस्ताव आपण दिलेला असताना त्या कामाच्या नावासमोर तेथील खासदारांचे नाव आलेले असणे." इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

पर्यटन मंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

(५) श्री. भास्कर जाधव वि.स.स. यांनी,"होळी सणाच्या पार्श्वभूमीवर कोकणात मुंबई-कोकण या एसटीच्या गाड्या काही कारणास्तव सुरू नसल्यामुळे खाजगी वाहतूकदार किंवा खाजगी बसवाले प्रवाशांकडून किमान तीन ते चारपट पैसे उकळत असणे, इ. बाबत माहितीषयक मुद्दा उपस्थित केला.

परिवहन मंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

प्रा. देवयानी फरांदे वि.स.स. यांनी उपस्थित केलेल्या उपरोक्त माहितीच्या मुद्याच्या संदर्भात ॲड. आशिष शेलार व श्री. सुधीर मुनगंटीवार वि.स.स. यांनी आपले मत मांडले.

सदर मुद्दा कार्यवाहीच्या सूचनेप्रमाणे स्वीकारण्यात येईल असे पर्यटन मंत्र्यांनी सांगितले.

(६) श्री. मुफ्ती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक वि.स.स. यांनी, "मालेगाव महानगरपालिकेतील शिक्षण मंडळात मोठ्या प्रमाणात घोटाळा झाला असणे." इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

४. सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री.जयकुमार गोरे
(२) श्री. दिलीपराव बनकर
(३) ॲड. आशिष जैस्वाल
(४) श्री. राहुल कुल
(५) श्री. दिपक केसरकर
(६) श्री. राणा जगजितसिंह पाटील
(७) श्री. अमिन पटेल
(८) श्री. राजेश पवार
(९) श्री. अशोक पवार
(१०) श्रीमती मनिषा चौधरी (भाषण पूर्ण)
(११) श्री. चिमणराव पाटील (भाषण पूर्ण)
(१२) श्रीमती सुमन पाटील
(१३) डॉ. भारती लव्हेकर
(१४) श्री. रईस शेख
(१५) श्री. अतुल बेनके

श्री. मिहिर कोटेचा वि.स.स. यांनी, "मुंबईतील नायगाव विभागामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या तालुकाध्यक्षांनी पोलीस हवालदार श्री.सुनील जाधव यांना शिवीगाळ व धक्काबुक्की करणे" इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

गृह मंत्र्यांनी उक्त प्रकरणी लक्ष द्यावे, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)

उपरोक्त चर्चा पुढे सुरू होऊन चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१६) श्री. सुभाष धोटे
(१७) श्री.समीर कुणावार

(भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

श्री. हिरामण खोसकर वि.स.स. यांनी, "सन २०१४ ते सन २०१९ या कालावधीत महावितरणद्वारे राबविण्यात आलेल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या चौकशी बाबत सभागृहाला अवगत करावे." इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

**सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर.)**

उपरोक्त चर्चा पुढे सुरू होऊन चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१७) श्री. समीर कुणावार (भाषण पूर्ण) (१८) श्री. प्रकाश अबिटकर

(१९) श्री. कैलास गोरंट्याल

(चर्चा अपूर्ण)

"राज्यातील शेतकऱ्यांची वीज जोडणी कापण्यात येणे" इ. बाबत ऊर्जा मंत्र्यांनी नियम ४७ अन्वये निवेदन केले.

श्री. हिरामण खोसकर वि.स.स. यांनी उपस्थित केलेल्या उक्त माहितीविषयक मुद्याबाबत ऊर्जा मंत्र्यांनी थोडक्यात माहिती दिली.

**५.** सर्वश्री अभिमन्यू पवार व इतर वि.स.स. यांनी, "मौजे मगरवाडी (ता.पंढरपूर, जि. सोलापूर) येथील शेतकरी सूरज राम जाधव याने विष प्राशन करून दिनांक २ मार्च रोजी आत्महत्या केल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रसिद्ध होणे" इ. बाबत दिलेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेस अनुलक्षून माननीय उपाध्यक्षांनी दिलेल्या निदेशानुसार ऊर्जा मंत्र्यांनी निवेदन केले.

**सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा .(चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर.)**

वित्त मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

माननीय तालिका सभाध्यक्षांनी सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा संपल्याचे घोषित केले.

**७. पुरःस्थापनार्थ :-**

वित्त मंत्र्यांनी, सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत विधेयक २०२२ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

**८.** माननीय तालिका सभाध्यक्षांनी, १) गृह विभाग, २) नगरविकास विभाग, ३) गृह निर्माण विभाग, ४) पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक बी-१, बी-२, बी-३, बी-४, बी-५, बी-६, बी-७, बी-८, बी-९, बी-१०, बी-११, बी-१२, एफ-२, एफ-३, एफ-४, एफ-५, एफ-७, एफ-८, क्यु- २, क्यु-३, क्यु-४, क्यु-६, यू-२, यू-३, यू-४, यू-५ चर्चेला घेण्यात येत असून या मागण्यांचा तपशील कार्यक्रमपत्रिकेबरोबर वितरित केला आहे व विभागांच्या मागण्यांचा तपशील सदस्यांना टपालखणाद्वारे (पिजन होल) वितरित करण्यात आला असून कपात सूचना देण्याची मुदत गुरुवार, दिनांक १७ मार्च, २०२२ रोजी सायंकाळी ५-०० वाजेपर्यंत निश्चित करण्यात आली असल्याने मान्य कपात सूचनांची यादी सदस्यांना स्वतंत्रपणे वितरित करण्यात येईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी घोषित केले.

उक्त विभागाच्या अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेस सुरूवात झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) ॲड. आशिष शेलार (२) श्री. रविंद्र वायकर

(३) श्री. अतुल भातखळकर

(चर्चा अपूर्ण)

श्री अबू आजमी वि.स.स. यांनी,"महाराष्ट्रातील सरकारी मेडिकल कॉलेजचे अध्यापक व डॉक्टर्स उपोषणास बसलेले असणे." इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

**सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान (चर्चा पुढे सुरू)-**

उपरोक्त मागण्यांवरील चर्चा पुढे सुरू होऊन चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(४) श्री. रोहित पवार (५) श्री. झीशान सिद्दीकी

(६) श्री. गणेश नाईक (७) श्री. रमेश कोरगावकर

(८) श्री. यशवंत माने (९) श्री. अबू आजमी

(चर्चा अपूर्ण)

"श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. तथा विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद, यांच्या विरुद्ध दाखल झालेला गुन्हा." इ. बाबत सहकार मंत्र्यांनी नियम ४७ अन्वये निवेदन केले.

**सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान (चर्चा पुढे सुरू)-**

उपरोक्त मागण्यांवरील चर्चा पुढे सुरू होऊन चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१०) श्री. विक्रमसिंह सावंत
(११) श्री. कालिदास कोळंबकर
(१२) डॉ. राहुल पाटील
(१३) ॲड अशोक पवार
(१४) श्री. अमित साटम
(१५) श्री. लहु कानडे
(१६) श्री. अजय चौधरी
(१७) श्री. रविंद्र चव्हाण
(१८) डॉ. किरण लहामटे
(१९) श्री. दिलीप लांडे
(२०) श्रीमती मनिषा चौधरी
(२१) श्री. संजय जगताप
(२२) श्री. हिरामण खोसकर

गृह (शहरे) राज्यमंत्री, गृहनिर्माण मंत्री, नगरविकास मंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री यांनी आपापल्या विभागाच्या मागण्यांवरील चर्चेस उत्तर दिले.

आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचीत दर्शविल्याप्रमाणे मागण्या एकत्रितपणे मतास टाकण्यात आल्या .

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेतील नियम २९३ अन्वयेचा प्रस्ताव व अशासकीय कामकाज पुढे ढकलण्यात येत असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**सोमवार, दिनांक २१ मार्च, २०२२**

**(१) श्री.बळवंत वानखेडे, वि.स.स.** यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधले-

“विदर्भात तसेच अमरावती जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सिंचनाचा अनुशेष असणे, अमरावती विभागातील अंदाजे १०० हून अधिक लघु व मध्यम प्रकल्पांना पंतप्रधान पॅकेज अंतर्गत सन २००६ ते २००८ या काळात मान्यता प्रदान झालेली असणे, सदर मान्यता प्रदान करण्यात आलेले सिंचन प्रकल्प लवकरात लवकर पूर्णत्वास जावे या हेतूने प्रकल्पाकरिता आवश्यक असणारी जमीन व घरे भूसंपादन कायदा १९८४ अन्वये संपादित न करता सरळ खरेदी पद्धतीने प्रत्यक्ष जमीन

खरेदी केलेली असणे, सिंचन प्रकल्पात जमिनी गेलेल्या अनेक शेतकऱ्यांनी प्रशासनाला सहकार्य करून १२ हेक्टरहून अधिक प्रमाणात जमिनी शासनास हस्तांतरीत केलेल्या असणे, परंतु जमिनी संपादित केलेल्या असताना प्रत्यक्ष वाटाघाटी न होणे, ग्रामपंचायतीस विश्वासात न घेणे, कुठलीही पूर्वसूचना न देणे, संमतिपत्र वा खरेदी खताचा मसुदा न करणे, त्यास कायदेशीर अनुमती न घेणे, शासनाकडून मार्गदर्शक तत्त्वे न मागवणे, पुनर्वसन अनुदानाकरिता सूचना न देणे, अनुमती न देणे, खरेदीखत मसुद्यास शेतकऱ्यांची मान्यता न घेणे, अशा अनेक प्रकारच्या त्रुट्या अलीकडच्या काळात दृष्टीक्षेपात येणे, भूसंपादन पुनर्वसन पुनःस्थापना अधिनियम २०१३ हा कायदा मंजूर होऊन दिनांक १ जानेवारी, २०१४ रोजी अंमलात आलेला असणे, एकाच प्रकल्पावर सरळ खरेदी करण्यात आलेल्या शेतकऱ्याला रु.८०,०००/- प्रती एकर ते २ लक्ष प्रति एकर एवढा मोबदला देण्यात आलेला असणे, परंतु ज्या शेतकऱ्यांनी सरळ खरेदीस विरोध करून अन्य मार्गाने खरेदी केल्याने त्यांना १२ ते १४ लक्ष प्रति एकर एवढा मोबदला दिलेला असणे, याबाबत वारंवार विविध प्रकल्पग्रस्त संघर्ष समित्यांमार्फत विविध प्रकारे शासनाला न्याय देण्याची मागणी केलेली असणे, परंतु अद्यापपर्यंत सदर प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळालेला नसल्याने प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्या निकाली काढण्यासाठी विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी अमरावती यांच्या कार्यालयासमोर प्रकल्पग्रस्तांचे दिनांक ४ मार्च, २०२२ पासून अनिश्चित काळाकरिता प्राणांतिक महाउपोषण सुरू असणे, परंतु अद्यापही सदर प्रकरणी तोडगा न निघाल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

**जलसंपदा मंत्र्यांनी निवेदन केले.**
**काही प्रश्नोत्तरे झाली.**

**(२) सर्वश्री. अभिमन्यू पवार व इतर वि.स.स.** यांची लक्षवेधी सूचना–

**श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स.**यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधले-

“महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांसाठी केंद्र शासनाने सुरू केलेल्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM KISAN) या योजनेच्या कामकाजावर तहसीलदार व नायब तहसीलदार संघटना, महाराष्ट्र राज्य व महाराष्ट्र राज्य तलाठी संघ यांनी सन २०२१ मध्ये बहिष्कार घातला असणे, सदरील योजनेतील अनेक त्रुटींची पूर्तता होत नसल्याने अनेक शेतकरी या योजनेच्या मंजुरीपासून तसेच नियमित मिळत असलेल्या मदतीपासून वंचित राहत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये निदर्शनास येणे, सदर योजनेचे महसूल विभागाच्या पातळीवरील १००%०कामकाज पूर्ण

झाल्याने सदरील योजना तांत्रिक अडचणीसंदर्भात कामे व योजना राबविण्याबाबतची कार्यवाही कृषी विभागाने करावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य तलाठी व पटवारी मंडळ यांनी मुख्य सचिव,व महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये निवेदनाद्वारे केली असणे, मा.कृषी मंत्री महोदय यांनी सदरील योजना कृषी विभागामार्फत राबविली जाईल अशी घोषणा करणे, महसूल विभागाने सदरील कामकाजावर बहिष्कार घातला असल्याने व ही वेबसाईट बंद असल्याने शेतकऱ्यांची त्रुटी पूर्तता होत नसल्याने तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या खात्यात मदत जमा होत नसल्याने शेतकरी तहसील कार्यालयात खेटे मारत असणे, महसूल विभागाकडून त्यांच्या प्रश्नांची दखल घेतली जात नसणे, राज्यातील अनेक शेतकरी या योजनेपासून वंचित असणे, नगरपालिका, महानगरपालिका व नगरपंचायत मधील रहिवाशी शेतकरी या योजनेपासून वंचित असणे, परिणामी शेतकरी वर्गात तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, सदरील योजना सक्षमरीत्या राबविण्यासाठी या योजनेसाठी राज्य शासनाने पूर्णवेळ अधिकारी व कर्मचारी नियुक्त करून सदरील योजनेत राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा समावेश करण्याबाबत व त्यांच्या त्रुटीची पूर्तता करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**कृषी मंत्र्यांनी निवेदन केले.**
**काही प्रश्नोत्तरे झाली.**

माननीय उपाध्यक्षांनी, आजच्या आजच्या कामकाज पत्रिकेत विशेष बैठकीतील दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ३ सन्माननीय सदस्य श्री. नामदेव ससाणे यांच्या विनंतीनुसार पुढे ढकलण्यात येत असल्याचे सांगितले.

**(४) सर्वश्री. जयकुमार गोरे व इतर वि.स.स.** यांची लक्षवेधी सूचना-

**श्री. जयकुमार गोरे, वि.स.स.** यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **जलसंपदा मंत्र्यांचे** लक्ष वेधले-

"गुरुवर्य कै. लक्ष्मणरावजी इनामदार उपसा सिंचन योजना, जिऱ्हे-कठापूर, सातारा या प्रकल्पामुळे माण व खटाव तालुक्यातील दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना लाभ होणार असणे, या योजनेमुळे माण व खटाव तालुक्यातील २७,५०० हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येऊन दुष्काळी तालुक्यातील शेतकऱ्यांना फायदा होणार असणे, त्यासाठी सुमारे ७०० कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित असणे, सदरचा प्रकल्प दुष्काळी भागातील असल्याने राज्य शासन हा प्रकल्प कधीपर्यंत पूर्ण करणार व त्यास कसा निधी उपलब्ध करून दिला जाणार याबाबत काहीही नियोजन सरकारने जाहीर केलेले नसणे, याबाबतची वर्षनिहाय आकडेवारी देण्याची आवश्यकता असणे, तसेच प्रकल्प पूर्ण करणेसाठी कालबद्ध कार्यक्रम हाती घेण्याची आवश्यकता असून यामुळे माण व

खटाव तालुक्यातील जनतेला दिलासा मिळणार असणे, या कामांची उर्वरित निविदा काढण्यात अक्षम्य दिरंगाई होत असून त्वरित निविदा काढण्याची आवश्यकता असणे, या योजनेचा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेमध्ये समावेश करणेचा प्रस्ताव प्रलंबितत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**जलसंपदा मंत्र्यांनी निवेदन केले.**
**काही प्रश्नोत्तरे झाली.**

**(५) श्री. संतोष बांगर, वि.स.स.** यांची लक्षवेधी सूचना-

**श्री. तानाजी मुटकुळे, वि.स.स.**यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **जलसंपदा मंत्र्यांचे** लक्ष वेधले-

"हिंगोली जिल्ह्यातील सिंचनाचा अनुशेष भरुन काढणे व इतर मागण्यांकरिता दिनांक २ जानेवारी, २०२२ रोजीपासून हिंगोली जिल्हा सिंचन संघर्ष समितीतर्फे तहसील कार्यालय, कळमनुरी येथे ट्रॅक्टर मोर्चा व इसापूर धरणाच्या उजव्या कालव्याचे गेट बंद आंदोलन सुरू असणे, जिल्ह्यात अनेक सिंचन योजना प्रस्तावित असूनही त्यावर अद्याप अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास येणे, याउलट हिंगोली जवळील मौ.खरबी या गावाजवळ कयाधू नदीवर बॅरेज बांधून येथून इसापूर धरणात पाणी वळविण्याचा शासनाचा असलेला घाट, जिल्ह्यातील कयाधू नदी ही एकमेव जिवंत नदी असून हिंगोली जिल्ह्याची जीवनरेखा असलेल्या या कयाधू नदीचे पाणी वळविल्यास जिल्ह्यातील कयाधू नदी काठावरील संपूर्ण भागाचे अक्षरशः वाळवंट होण्याची निर्माण झालेली भीती, कयाधू नदी ही पुराचे पाणी आल्यावर भरलेली असते नाहीतर ती कोरडी पडत असल्याने खरबीचा बंधारा झाल्यास परिसरातील गावांना पिण्याकरिता पाणी सुध्दा मिळणे शक्य होणार नसल्याची वस्तुस्थिती असणे, याकरिता जिल्हा सिंचन संघर्ष समितीने प्रस्तावित बॅरेजला मान्यता देऊ नये याकरीता मागणी करणे, सदरहू समितीने हिंगोली जिल्ह्यातील सिंचनाचा अनुशेष भरुन काढण्याच्या दृष्टीने संबंधित विभागाकडे केलेला पत्रव्यवहार, याकडे शासनाचे जाणीवपर्वूक होत असलेले दुर्लक्ष, याकरिता हिंगोली जिल्हा सिंचन संघर्ष समितीने केलेले आंदोलन,नयाकडे शासनाने गांभीर्याने लक्ष घालून शासन स्तरावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

**जलसंपदा मंत्र्यांनी निवेदन केले.**
**काही प्रश्नोत्तरे झाली.**

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ५२ मिनिटांनी सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय उपाध्यक्ष श्री. नरहरी झिरवाळ यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**१.** (अ) (१) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सात तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील वीस वरील प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित झाले.

**(ब)** उपसचिव यांनी, अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ७६ ते ९० सभागृहासमोर ठेवली.

**२.** माननीय तालिका सभाध्यक्षांनी, श्री. शंकरराव गेणूजी कोल्हे माजी वि.स.स. व माजी मंत्री यांच्या दुःखद निधनाबद्दल निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण केली.
शोक प्रस्ताव संमत करण्यात आला.

प्रस्तावाची एक प्रत व विधानमंडळाचे स्मृतिपत्र शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**३.** **(१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण राज्य मंत्र्यांनी,** महाराष्ट्र ग्राहक संरक्षण (राज्य व जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद) नियम, २०२२ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक ग्रासंनि २०२० / प्र.क्र.३९ / ग्रासं-२, दिनांक १७ फेब्रुवारी, २०२२ सभागृहासमोर ठेवली.

**(२) संसदीय कार्य राज्यमंत्र्यांनी,** पुढील अहवाल सभागृहासमोर मांडले-

(क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे सन या २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे,

(ख)राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचे सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे (अंकेक्षण अहवालासह),

(ग) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे

(घ) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेख

(ङ) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचा दिनांक १ एप्रिल, २०२० ते ३१ मार्च, २०२१ या कालावधीचा वार्षिक अंकेक्षण अहवाल

(च) महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, औरंगाबाद यांचे सन २०१७-२०१८, सन २०१८-२०१९, सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ चे वार्षिक अहवाल

(छ) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक लेखे आणि अंतर्गत लेखा परीक्षण अहवाल

सदरहू वार्षिक लेखे, वार्षिक अहवाल व लेखापरीक्षण अहवाल विधानमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतील, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, ' विधानसभेच्या नियमानुसार व यापूर्वी माननीय अध्यक्ष महोदयांनी दिलेल्या निर्देशानंतरही सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ अशा वर्षांचे वार्षिक अहवाल पुन्हा पुन्हा सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणे ' इ. बाबत हरकतीचा मुद्दा उपस्थित केला.

संसदीय कार्य राज्य मंत्री महोदयांनी याची नोंद घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**३. (३) संसदीय कार्य राज्य मंत्र्यांनी,** कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा सन २०२०-२०२१ चा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवला.

**स्थगन प्रस्तावाच्या सूचना-**

(१) श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते व इतर वि.स.स. यांनी, "मराठा समाजाच्या आरक्षण व अन्य मागण्यांसंदर्भात माननीय मुख्यमंत्री यांनी दि.२८ फेब्रुवारी, २०२२ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांच्या अनुषंगाने झालेली कार्यवाही"इ.बाबत दिलेल्या सूचनेतील विषय स्थगन प्रस्तावाच्या निकषात बसणारा नाही, असे सांगून माननीय तालिका सभाध्यक्षांनी सदर सूचनेस अनुमती नाकारली. तथापि, सन्माननीय सदस्यांना त्यावर आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास त्यांच्यापैकी एकाने ते थोडक्यात मांडावे, असेही माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील, वि.स.स. यांनी उपरोक्त सूचनेच्या बाबतीत आपले म्हणणे सविस्तरपणे मांडले.

(२) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, "दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी चंद्रपूर शहरालगतच्या सोलारा गावालगत मित्राला भेटण्यासाठी गेलेल्या २० वर्षीय तरुणीचा संशयास्पद मृत्यू" इ. बाबत दिलेल्या सूचनेतील विषय स्थगन प्रस्तावाच्या निकषात बसणारा नाही, तथापि विषयाचे गांभीर्य लक्षात घेता शासनाने अधिवेशन समाप्तीपूर्वी निवेदन करावे असे निदेश देऊन माननीय तालिका सभाध्यक्षांनी सदर सूचनेस अनुमती नाकारली.

(३) सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील व इतर वि.स.स. यांनी”पोलीस व्हॅन फॉर्मेलिटीची पूर्तता केल्याशिवाय मॅग्नम हॉस्पिटल, नाशिक यांचेकडून पोलीस कर्मचारी यांचा मृतदेह ताब्यात देण्यास नकार देण्यात येत असणे” इ.बाबत दिलेल्या सूचनेतील विषय स्थगन प्रस्तावाच्या निकषात बसणारा नाही, तथापि या विषयाची दखल घेऊन शासनाने अधिवेशन समाप्तीपूर्वी निवेदन करावे असे निदेश देऊन माननीय तालिका सभाध्यक्षांनी सदर सूचनेस अनुमती नाकारली.

तसेच श्री. चंद्रकांत पाटील, वि.स.स. यांनी मांडलेल्या उक्त सूचनेसंदर्भात शासनाने निवेदन करावे, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, ‘ रोजगार हमी योजनेतील १६६ कोटी रुपये देणे थकीत असणे तसेच धानाचे बोनस अनेक दिवसांपासून देण्यात न येणे’ इ. बाबत मुद्दे उपस्थित केले.

उक्त दोन्ही विषयांच्या अनुषंगाने शासनाने निवेदन करावे, असे निदेश माननीय तालिका सभाध्यक्षांनी दिले.

श्री. अबू आजमी, वि.स.स. यांनी, ‘ सन १९९९ मध्ये सिडकोने तन्झिम मुस्लिम सोसायटी, सानपाडा येथील जमीन धार्मिक कार्य व मशिदीकरिता मागणे’ इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला व आपले सविस्तर म्हणणे मांडले.

शासनाने याबाबत नोंद घेण्याची सूचना करण्यात आल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

## ५. (विचार, खंडशः विचार व संमत करणे)

**(अ)** वित्त मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ९- महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत विधेयक, २०२२ विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्याबाबतच्या प्रश्नावरील चर्चेत श्री. योगेश सागर,
वि.स.स. यांनी भाग घेतला.
वित्त मंत्र्यांनी उपरोक्त विधेयकावरील चर्चेस उत्तर दिले.
विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

श्री. वैभव नाईक, वि.स.स.यांनी, 'शासनाने गेल्या वर्षीपासून कोकणातील शेतकऱ्यांची भात खरेदी केलेली असूनही या वर्षीचा बोनस दिलेला नसल्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यात वेगवेगळी आंदोलने सुरू असणे ' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी उपरोक्त विषयाबाबत आपले म्हणणे मांडले.

शेतकऱ्यांना मदत करण्याबाबत मंत्री महोदयांना सांगितले आहे, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**६.** माननीय तालिका सभाध्यक्षांनी, (१) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग (२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (३) वित्त विभाग (४) सार्वजनिक बांधकाम विभाग (५) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (६) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग विभागांच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक डी- २, डी-३, डी-४, डी-५, डी-६, डी-७, डी-८, डी-९, डी-११, ई-२, ई-३, ई-४, ई-५, जी-१, जी-२, जी-४, जी-५, जी-६, जी-७, जी-८, जी-१०,एच-२, एच-३, एच-४, एच-५, एच-६, एच-७, एच-८, एच-९, एच-११, व्ही-२, व्ही-३, व्ही-५,व्ही-६, झेडडी-१, झेडडी २, झेडडी–३, झेडडी–४, झेडडी–५, झेडडी – ६ सभागृहाला सादर झाल्या असून त्या एकत्रित चर्चेला घेण्यात येतील, असे तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

मागण्यांवरील एकत्रित चर्चेची कार्यपद्धती माननीय तालिका सभाध्यक्षांनी विशद केली व कपात सूचना न मांडता मान्य करण्यात आलेल्या कपात सूचनांची उत्तरे मा.मंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने तीस दिवसांच्या कालावधीत सदस्यांना पाठविण्याची प्रथा माहे जुलै, २०१० पासून मान्य झाली असल्यामुळे आता कोणीही कपात सूचना मांडणार नाही असे गृहीत धरून चर्चेला प्रारंभ होईल, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

मागण्या प्रस्तुत झाल्या.

उक्त अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) श्री. प्रशांत बंब (चर्चा अपूर्ण)

श्री. सुनिल टिंगरे, वि.स.स. यांनी, 'पुणे येथे मागील आठवड्यात इनामदार स्कूल या शाळेत जाऊन १० वीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या अल्पवयीन मुलीवर करण्यात आलेला हल्ला' इ. बाबत मुद्दा उपस्थित केला .

उक्त प्रकरणाची शासनाने नोंद घ्यावी व त्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करावी, असे निदेश माननीय तालिका सभाध्यक्षांनी दिले.

**सन २०२२-२०२३ च्या अनुदानाकरिता मागण्यांवर चर्चा व मतदान (दुसरा दिवस) (चर्चा पुढे सुरू)-**

उक्त अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चा पुढे सुरू झाली व चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(२) श्री. योगेशदादा कदम (३) श्री. चेतन तुपे

(चर्चा अपूर्ण)

श्री. राम कदम, वि.प.स. यांनी, 'घाटकोपर येथील एलबीएस मार्गावर कोणतीही परवानगी न घेता ऑप्टीकल फायबर टाकण्याचे काम सुरू असणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

**सन २०२२-२०२३ च्या अनुदानाकरिता मागण्यांवर चर्चा व मतदान (दुसरा दिवस) (चर्चा पुढे सुरू)-**

उक्त अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चा पुढे सुरू झाली व चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(४) श्री. सुभाष देशमुख
(५) श्रीमती प्रतिभा धानोरकर
(६) श्री. अजय चौधरी
(७) श्री. रवि राणा
(८) श्री. अभिमन्यू पवार
(१०) श्री. शेखर निकम
(११) श्री. संजय केळकर
(१२) श्री. रविंद्र वायकर
(१३) श्री. लहू कानडे
(१४) श्री. सचिन कल्याणशेट्टी
(१५) श्री. अबू आजमी
(१६) श्री. रत्नाकर गुट्टे
(१७) डॉ. राहुल पाटील
(१८) डॉ. किरण लहामटे
(१९) ॲड. आशिष शेलार
(२०) श्री. प्रकाश सोळंके
(२१) श्री. राजेश पवार
(२२) श्री. विक्रमसिंह सावंत
(२३) ॲड. आशिष जैस्वाल
(२४) डॉ. तुषार राठोड
(२५) श्री. दीपक केसरकर
(२६) ॲड. अशोक पवार
(२७) श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर
(२८) श्री. संजय जगताप
(२९) श्री. संजय गायकवाड
(३०) श्री. दादाराव केचे
(३१) श्री. सुनिल भुसारा
(३२) श्री. रईस शेख (भाषण पूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

माननीय ऊर्जा मंत्र्यांनी, 'रायगड किल्ल्यावरील जीर्ण झालेल्या विद्युत वाहिन्या शिवजयंतीच्या निमित्ताने बदलणे' इ. बाबत म.वि.स.नियम ४७ अन्वये निवेदन केले.

**सन २०२२-२०२३ च्या अनुदानाकरिता मागण्यांवर चर्चा व मतदान (दुसरा दिवस) (चर्चा पुढे सुरू)-**

उक्त अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चा पुढे सुरू झाली व चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(३३) डॉ. भारती लव्हेकर
(३४) श्री. यशवंत माने
(३५) श्री. राजेश एकडे
(३६) श्री. प्रकाश आवाडे
(३७) श्री. रमेश कोरगावकर
(३८) श्री. राजू पारवे
(३९) प्रा. डॉ. अशोक उईके
(४०) श्रीमती नमिता मुंदडा
(४१) श्री. ज्ञानराज चौगुले

सार्वजनिक बांधकाम मंत्री, सहकार मंत्री, पर्यटन मंत्री, मत्स्यव्यवसाय मंत्री, शालेय शिक्षण मंत्री, कृषी मंत्री, वस्त्रोद्योग राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री, फलोत्पादन मंत्री यांनी आपापल्या विभागांच्या मागण्यांवरील उपरोक्त चर्चेला उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

वरील सर्व मागण्या एकत्रितपणे मतास टाकण्यात आल्या व त्या संमत झाल्या.

**मंगळवार, दिनांक २२ मार्च, २०२२**

लक्षवेधी सूचना क्रमांक १, सन्माननीय सदस्य श्री. रवि राणा सभागृहामध्ये उपस्थित नसल्यामुळे सन्माननीय सदस्या श्रीमती गीता जैन यांना ती मांडण्यास अनुमती देत आहे तसेच सन्माननीय सदस्य श्री. रोहित पवार यांची आहे या लक्षवेधीसंबंधी विभागाचे उत्तराच्या प्रती अद्याप सन्माननीय सदस्यांना वितरित केलेल्या नसल्यामुळे त्यांच्या विनंतीनुसार सदरची लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे, असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

**(१) श्री. रवि राणा, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –**

श्रीमती गीता जैन, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे नगरविकास मंत्र्याचे लक्ष वेधले -

"मौजे घोडबंदर सर्व्हे नं. ७२/२, ७३/१, २, ३, ४ या भागातील मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गौरव एनक्लेव को-ऑप. हौ. या सोसायटीमध्ये राहणाऱ्या २३३ सदनिका/गाळेधारक व त्यामध्ये वास्तव्य करणारे जवळ जवळ ३००० नागरिक यांना सदर इमारत धोकादायक दाखवून तिचा पुनर्विकास करण्यासाठी महानगरपालिकेकडून रवि डेव्हलपर्स या विकासकास दिली जाणे व इमारतीतील रहिवाशांना जबरदस्तीने सदनिका खाली करण्यास भाग पाडणे, सदर सोसायटीमधील सर्व रहिवाशांना घर व दुकाने देण्याचे आश्वासन देऊन देखील अद्याप सदर प्रकल्प अर्धवट स्वरुपात असणे, जवळपास ७ वर्ष इतक्या कालावधीत रहिवाशांना रवी डेव्हलपर्स यांनी केलेल्या करारानुसार भाडे सुध्दा न देणे, सन २०१३ ते आजपर्यंत सदर इमारतीचे बांधकाम अपूर्ण स्वरुपात असणे, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महानगरपालिकेकडे याबाबत चौकशी करणे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेडून देण्यात आलेली सदर बांधकामाची परवानगी वारंवार रद्द होणे, परिणामी सदर इमारतीतील रहिवाशांचे भविष्य अंधःकारमय होणे, सदर विकासकाने रहिवाशांची केलेली फसवणूक लक्षात घेता त्यांच्यावर कडक कारवाई करून गौरव एनक्लेव को-ऑ.हौ.सो. या इमारतीतील रहिवाशांना न्याय मिळण्याबाबत होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नगरविकास मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(४) श्री. धर्मरावबाबा आत्राम, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्याचे लक्ष वेधले –**

"नागपूर-मुंबई दरम्यान विकसित करण्यांत येत असलेला बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्ग माहे सप्टेंबर, २०२२ पर्यंत जनतेसाठी खुला करण्याचे शासनाने नियोजित करणे, तथापि हा समृध्दी महामार्ग केवळ नागपूरपर्यंत मर्यादित न ठेवता गडचिरोली जिल्ह्यापर्यंत विस्तारित करण्यांत येणार असल्याचे दिनांक ७ डिसेंबर, २०२१ रोजी सहसंचालक अभियांत्रिकी यांनी प्रसार माध्यमांसमोर तर मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्व. उपक्रम) तथा जिल्हा पालकमंत्री, गडचिरोली यांनी प्रसार माध्यमांतर्फे आयोजित, कार्यक्रमात दिनांक १ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास जाहीर करणे, गडचिरोली जिल्हा हा आदिवासी व नक्षलवादी जिल्हा असल्याने उपराजधानी असलेल्या नागपूरसारख्या शहरांशी तातडीने संपर्क साधण्यासाठी समृध्दी महामार्गासारख्या महामार्गाची असलेली तातडीची गरज, परिणामी, शासनाच्या या निर्णयाबाबत गडचिरोली जिल्हावासीयांनी व्यक्त केलेली समाधानाची भावना, त्यामुळे सदर समृध्दी महामार्गाचा तातडीने विस्तार करण्यासंदर्भात तसेच त्याबाबतचा व्यवहार्यता अहवाल (Feasibility Report) व सल्लागार कंपनी नेमण्याचे दृष्टीने शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.''

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

लक्षवेधी सूचना क्रमांक ५ संबंधी सन्माननीय सदस्य श्री.प्रताप सरनाईक, सभागृहामध्ये उपस्थित नसल्यामुळे पुढील लक्षवेधी सूचना घेण्यात येत आहे असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

**(६) श्री.रईस शेख, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे नगरविकास मंत्र्याचे लक्ष वेधले –**

"भिवंडी शहरात मूलभूत आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येणे, यासंदर्भात मुंबई महानगर विकास प्राधिकरण कडून मेट्रो ५ प्रकल्पातंर्गत मुंबई नागरी परिवहन प्रकल्प राबविण्यात येत असणे, सदर प्रकल्पाचा दुसऱ्या टप्प्याच्या विस्तारिकरण प्रकल्पबाधीतांना दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. द्वारे पुनर्वसनासाठी शिथिल धोरण अवलंबिण्याची शिफारस करण्यात येणे, दिनांक ६ जानेवारी, २०२१ रोजी शिफारस केलेल्या धोरणांनुसार मुंबई महानगर विकास प्राधिकरणामार्फत आजपर्यंत भिवंडीतील प्रकल्प बाधितांच्या खाजगी मालमत्तेची नुकसान भरपाई न मिळणे, त्यामुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली असणे, नागरिकांनी वेळोवेळी मागणी करून देखील मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडून याबाबत नुकसान भरपाई मिळण्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नगर विकास मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(५) श्री. प्रताप सरनाईक व श्रीमती यामिनी जाधव, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –**

श्री.प्रताप सरनाईक, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे नगरविकास मंत्र्याचे लक्ष वेधले-

"ठाणे व मीरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये एम.एम.आर.डी.ए.च्या माध्यमातून मेट्रोचे काम सुरू असून त्यापैकी मेट्रो-४ व मेट्रो-९ हे ओवळा-माजिवडा मतदारसंघातील असणे, मेट्रोचे काम पूर्णत्वाला येण्यापूर्वी कारशेडची जागा एम.एम.आर.डी.ए.च्या ताब्यात असणे, याकरिता मेट्रो-४ साठी एम.एम.आर.डी.ए.ने घोडबंदर रोडवरील मोघरपाडा येथे रहिवासी क्षेत्रातील शेतकरी कसत असलेल्या जागेवर आरक्षण टाकणे, त्यानंतर एम.एम.आर.डी.ए.चे अधिकारी जागेवर सर्वेक्षण करण्याकरिता गेले असता स्थानिक शेतकऱ्यांनी त्यांना विरोध करणे, स्थानिक आमदार म्हणून मध्यस्थी करून एम.एम.आर.डी.ए. ने जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या माध्यमातून सर्वेक्षणाचे काम पूर्ण करणे, शेतकऱ्यांना जो मोबदला द्यावयाचा आहे तो आर्थिक मोबदला न देता मेट्रो कारशेडसाठी

लागणाऱ्या जागे व्यतिरिक्त रहिवासी क्षेत्रातील त्यांच्याच जमिनीचा उर्वरित विकसित भाग परत त्यांना देणेबाबत मा.मुख्यमंत्री व मा.नगरविकास मंत्री हे अंतिम निर्णय घेणेसंदर्भात आश्वस्त केलेले असणे, मीरा भाईंदर क्षेत्रातील मेट्रो-९ चे काम सुरू असून त्यासाठी लागणाऱ्या कारशेडसाठीचे आरक्षण राई, मुर्धा व मोर्वा या गावातील शेतकऱ्यांच्या कसत असलेल्या जमिनीवर एम.एम. आर.डी.ए.ने टाकलेले असणे, जमिनीच्या आसपास अनेक खाजगी, मालकी, धर्मादाय संस्था तसेच शासकीय जमिनी उपलब्ध असतानाही जाणीवपूर्वक एम.एम.आर.डी.ए.ने भात शेती व इतर शेतीविषयक व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनीवर हे आरक्षण टाकून अन्याय करणे, त्यामुळे तेथील शेतकऱ्यांनी सर्वेक्षण न होणेसाठी एम.एम.आर.डी.ए.च्या विरोधात एल्गार पुकारणे, त्यामुळे या गावापासून काही अंतरावर असलेल्या खोपरा गावातील शासकीय जमिनीवर मेट्रो-९ च्या कारशेडचे आरक्षण टाकावे व राई, मुर्धा, मोर्वा गावापर्यंत मर्यादित असलेली मेट्रो सेवा पुढे उत्तन व गोराई जवळ असलेल्या पॅगोडापर्यंत नेल्यास पर्यटनाला चालना मिळून या परिसराचा विकास होईल व या गावाजवळून जाणाऱ्या ३० मीटरच्या रस्त्याऐवजी १८ मीटरचा रस्ता व मेट्रो कारशेडकडे जाणाऱ्या १८ मीटरच्या रस्त्याऐवजी ३० मीटरचा रस्ता बनविण्यात यावा अशी स्थानिक नागरिकांची मागणी असणे, तसेच मेट्रो-४ व मेट्रो-९ च्या कारशेडच्या आरक्षणाबाबत शासनाने सत्वर भूमिका स्पष्ट करणेबाबत, शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

नगर विकास मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(७) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्याचे लक्ष वेधले –**

"चंद्रपूर जिल्ह्यातील महाऔष्णिक वीज केंद्राच्या प्रदूषणात दिवसेंदिवस वाढ होत असणे, सदर केंद्राच्या प्रदूषणाचा परिणाम चंद्रपूरसह थेट नागपूर, पुणे व मुंबईवर होत असल्याचा दावा पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या द सेंटर फॉर रिसर्च ऑन एनर्जी ॲण्ड क्लीन एअर (सीआरईए) नामक संस्थेने नुकताच केलेला असणे, सदर महाऔष्णिक वीज केंद्रातून निघणारे एस.पी.एम., सल्फर डायऑक्साइड, नायट्रोजन डायऑक्साइड आणि मर्क्युरी सारखे प्रदूषणकारी घटक हवेच्या माध्यमातून उक्त शहरांपर्यंत पोहोचणे, त्यामुळे उक्त शहरातील नागरीकांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होत असल्याचा दावाही सदर संस्थेने करणे, सदर वायू प्रदूषणामुळे २०२० मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील ८५, नागपूर ६२, यवतमाळ ४५, मुंबईत ३० आणि पुणे व नांदेड मध्ये प्रत्येकी २९ जणांचा अकाली मृत्यू झाल्याचे उक्त संस्थेच्या अहवालात नमूद करण्यात येणे, त्यामुळे महाऔष्णिक वीज केंद्राचे मुदतबाह्य झालेले ३ आणि ४ क्रमांकाचे संयंत्र बंद करण्याची व सल्फर कमी करण्यासाठी यंत्रणा उभारण्याची मागणी करणाऱ्या द सेंटर फॉर रिसर्च ऑन एनर्जी ॲण्ड

क्लिन एअर (सीआरईए) नामक संस्थेने केलेली असणे, चंद्रपूर जिल्ह्यातील महाऔष्णिक वीज केंद्रच नव्हे तर राज्यातील इतरही औष्णिक वीज केंद्र अशाच पध्दतीने प्रदूषणात भर घालत असल्याचे चित्र असणे, शासनाने या सर्व बाबीचा गांभीर्याने विचार करून निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता वा शासनाची प्रतिक्रिया."

पर्यावरण राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाजपत्रिकेतील विशेष बैठकीमध्ये दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २ नियमित बैठकीमध्ये चर्चेस घेण्यात येईल तसेच लक्षवेधी सूचना क्रमांक ३ वरील निवेदन अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी पटलावर ठेवण्यात येईल असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ९ वाजून ४९ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.संजय शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**१.** (१) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पाच तारांकित प्रश्न हे उत्तरित झाले.

(२) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एकोणचाळीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

**२.** ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी, "राज्यातील एस.टी. महामंडळांच्या कर्मचाऱ्यांचा संप" इ.बाबत स्थगन प्रस्तावाची स्थगन प्रस्तावाची सूचना दिली असून त्यावर त्यांना त्यांचे म्हणणे मांडावयाचे असल्यास थोडक्यात मांडावे असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी, "राज्यातील एस.टी. महामंडळांच्या कर्मचाऱ्यांचा संप" इ.बाबत दिलेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेस अनुलक्षून आपले म्हणणे मांडले.

आज मंगळवार, दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी स्थगन प्रस्तावाच्या २ सूचना प्राप्त झाल्या आहेत. परंतु, आज सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान (तिसरा दिवस) असल्यामुळे म.वि.स. नियम २५१ (२) अन्वये स्थगन प्रस्ताव घेता येणार नाहीत. अतः उक्त सूचनांना अनुमती नाकारीत आहे असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**३.** (१) कामगार मंत्र्यांनी पुढील अहवाल सभागृहासमोर ठेवले –

**(क)** मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळ यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे पन्नासावा व एकावन्नावा वार्षिक अहवाल,

**(ख)** सातारा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, सातारा यांचे सन २०११-२०१२, सन २०१२-२०१३ व सन २०१३-२०१४ चे वार्षिक अहवाल,

**(ग)** दि रेल्वे गुडस् क्लिअरींग अँड फॉरवर्डींग एस्टॅब्लिशमेंटस् लेबर बोर्ड, मुंबई यांचे सन २०१६-२०१७ ते सन २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे चाळीसावा, एकेचाळीसावा, बेचाळीसावा व त्रेचाळीसावा वार्षिक अहवाल,

**(घ)** कापड बाजार आणि दुकाने मंडळ, मुंबई यांचे सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे अठ्ठेचाळीसावा व एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल,

**(ङ)** औरंगाबाद माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, औरंगाबाद यांचे सन २०१६-२०१७ ते सन २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे पंचवीसावा, सव्वीसावा, सत्तावीसावा व अठ्ठावीसावा वार्षिक अहवाल,

**(च)** बीड जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, बीड यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा तेवीसावा वार्षिक अहवाल,

**(छ)** धुळे - नंदुरबार जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, धुळे यांचे सन २००९-२०१० ते सन २०१६-२०१७ या वर्षांचे अनुक्रमे एकवीसावा, बावीसावा, तेवीसावा, चोवीसावा, पंचवीसावा, सव्वीसावा, सत्तावीसावा व अठ्ठावीसावा वार्षिक अहवाल,

**(ज)** अमरावती जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, अमरावती यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे अठ्ठावीसावा व एकोणतीसावा वार्षिक अहवाल,

**(झ)** कापूस बाजार कामगार मंडळ, बृहन्मुंबई, ठाणे व रायगड जिल्ह्यांकरिता यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे अठ्ठेचाळीसावा व एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल,

**(ञ)** धातू (लोखंड व पोलाद वगळून) आणि कागद बाजार व दुकाने माथाडी कामगार मंडळ, मुंबई यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे सत्तेचाळीसावा व अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल,

**(ट)** मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळ, मुंबई यांचे सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे चौतीसावा व पस्तीसावा वार्षिक अहवाल,

**(ठ)** नांदेड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नांदेड यांचे सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे सत्तावीसावा व अठ्ठावीसावा वार्षिक अहवाल,

**(ड)** कोल्हापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, कोल्हापूर यांचे सन २०१७-२०१८ ते सन २०२०-२०२१ चे वार्षिक अहवाल,

**(ढ)** नाशिक माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नाशिक यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा चौतीसावा वार्षिक अहवाल,

**(ण)** रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, रत्नागिरी यांचे सन २०१८-२०१९ ते सन २०२०-२०२१ चे वार्षिक अहवाल,

**(त)** दि क्लिअरिंग आणि फॉरवर्डिंग असंरक्षित गोदी कामगार मंडळ यांचा सन २०१९-२०२० चा एकोणतीसावा वार्षिक अहवाल,

**(थ)** अकोला - वाशिम - बुलढाणा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, अकोला यांचा सन २०२०-२०२१ चा वार्षिक अहवाल,

**(द)** माल वाहतूक कामगार मंडळ, बृहन्मुंबई यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल,

**(ध)** चंद्रपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, चंद्रपूर यांचे सन २०१५-२०१६ ते सन २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे पहिला, दुसरा, तिसरा, चौथा, पाचवा व सहावा वार्षिक अहवाल,

**(न)** अहमदनगर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, अहमदनगर यांचा सन २०१९-२०२० चा वार्षिक अहवाल,

**(प)** सांगली जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, सांगली यांचा सन २०२०-२०२१ चा वार्षिक अहवाल,

**(फ)** सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा चाळीसावा वार्षिक अहवाल,

**(ब)** नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नाशिक यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा पंधरावा वार्षिक अहवाल,

**(भ)** धुळे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ ( अंतर्गत जळगाव, धुळे व नंदूरबार जिल्हे ) जळगाव यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे वैधानिक लेखापरिक्षण व कामकाज अहवाल, तसेच

**(म)** कोल्हापूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, कोल्हापूर यांचे सन २०१८-२०१९, सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ चे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

ॲड.आशिष शेलार, वि.स.स. यांनी, राज्यातील एस.टी. महामंडळांच्या कर्मचाऱ्यांचा संपाबाबत मंत्रिमहोदयांना निवेदन करण्यास सांगावे असा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात अधिवेशन संपण्याच्या अगोदर या सभागृहात सविस्तर निवेदन मांडले जाईल, असे परिवहन मंत्र्यांनी सांगितले.

**४. (१) श्री. भास्कर जाधव, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मत्स्यव्यवसाय मंत्र्याचे लक्ष वेधले –**

"मौजे साखरीआगर (ता. गुहागर, जि. रत्नागिरी) येथे राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत मच्छीमारांना मूलभूत सुविधा व मासेमारी जेट्टी उभारणेसाठी रु.२.९७ कोटी इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता दिनांक १५ डिसेंबर, २०११ रोजी शासनाने दिलेली असणे, त्यानुसार कामाची निविदा प्रसिध्द होऊन प्रत्यक्षात सन २०१२ मध्ये हे काम सुरू झालेले असणे, परंतु काम सुरू होऊन आणि त्यावर रु.१६.२५ लक्ष इतका खर्च झाल्यानंतर सन २०१४ पासून हे काम पूर्णपणे बंद अवस्थेत असून ठेकेदाराने या कामाकडे पूर्णतः दुर्लक्ष केलेले असणे, काम अपूर्ण अवस्थेत असल्याने साखरीआगर व परिसरातील किनारपट्टीच्या गावांमधील मच्छीमारांची खूप मोठी गैरसोय होत असणे, बर्फ, पाणी, डिझेल नौकेवर चढवणे ही कामे करताना त्यांचे खूप हाल होत असणे, आधीच मत्स्यदुष्काळ, वादळ, पाऊस यामुळे अडचणीत असलेला मच्छीमार जेट्टीच्या सुविधेअभावी अधिकच संकटात सापडलेला असून त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झालेला असणे, हे काम पूर्णत्वास जाण्याच्या दृष्टीने अनेकदा मंत्रालय स्तरावर बैठका होऊन, त्यात ठोस निर्णय होऊनदेखील वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांची अडवणुकीची व असहकार्याची भूमिका यामुळे कोणतीही कार्यवाही होत नसल्याने मच्छीमारांमध्ये प्रचंड संतापाचे वातावरण असणे, सदर जेट्टीचे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे याकरिता आवश्यक उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, सदर गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मत्स्यव्यवसाय मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(२) ॲड. आशिष जयस्वाल व डॉ. बालाजी किणीकर, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –**

ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृह मंत्र्याचे लक्ष वेधले –

"राज्यात शासकीय अधिकाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात भा.दं.वि. कलम ३३२ व ३५३ चा गैरवापर होत असल्याच्या घटनेत वाढ होत असल्याचे उघडकीस येणे, कोणाचाही वाद झाल्यास किंवा कुठल्याही कर्मचाऱ्यांना विचारणा केल्यास शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याची तक्रार देऊ, अशी धमकी दिली जाणे व खोट्या तक्रारी होणे, पोलिसांनी तात्काळ दखल व अटक करणे, परिणामी सामान्य जनतेची होत असलेली पिळवणूक, कायद्यात झालेली सुधारणा ही ढाल म्हणून वापरण्याऐवजी त्याचा शस्त्र म्हणून वापर होणे, मागील हिवाळी अधिवेशनात मा. मंत्री (गृह)

यांनी या कायद्याचा गैरवापर होत असल्याचे मान्य करून कायद्यात सुधारणा करण्याचे आश्वासन देऊनही त्याची पूर्तता न होणे, कायदा पारित करतानाही याचा गैरवापर झाल्यास पुनर्विचार करून सुधारणा करू असे देखील आश्वासन दिले असताना याबाबत आढावा न घेतल्यामुळे राज्याच्या जनतेची होत असलेली कुचंबणा, लोकप्रतिनिधी व सर्व स्तरावरून मागणी होत असताना याबाबत शासनाने निर्णय घेण्याची गरज, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

गृह मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(३) ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, श्री. पराग शाह, श्रीमती विद्या ठाकूर, श्री. अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री. हिरामण खोसकर, संग्राम थोपटे, कुणाल पाटील, झीशान सिदिद्की, कुमारी प्रणिती शिंदे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. धीरज देशमुख, सुरेश वरपुडकर, विकास ठाकरे, अमित झनक, लहू कानडे, सुभाष धोटे, विक्रमसिंह सावंत, बळवंत वानखडे, अमित साटम, अतुल भातखळकर, डॉ.भारती लव्हेकर, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –**

ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले –

"मुंबई उपनगरातील अनेक गृहनिर्माण सोसायट्यांना महसूल विभागाने अकृषिक कराच्या नोटीसा बजावलेल्या असणे, मुंबई उपनगरातील सुमारे २० हजार गृहनिर्माण सोसायट्यांना दरवर्षी अकृषिक कर आकारण्यात येत असणे, ज्यावेळी या सोसायट्यांची बांधकामे झाली त्यावेळी त्यांनी हा कर भरलेला असणे, तसेच मुंबई शहर विभागातील सोसायट्यांना हा कर भरावा लागत नसताना उपनगरातील सोसायट्यांना हा कर भरावा लागत असणे, सन २००८ पासून कर भरण्यासाठी ज्या नोटिसा बजावण्यात आल्या होत्या त्याला या अगोदर तत्कालीन महसूलमंत्री यांनी स्थगिती दिलेली असणे, परंतु आता पुन्हा राज्य सरकारच्या महसूल विभागाने या नोटिसा बजावल्या असून याबाबत सोसायट्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होणे, याबाबत लोकप्रतिनिधींनी पत्राद्वारे ही बाब शासनाच्या लक्षात आणून दिलेली असणे, कोरोनामुळे आधीच सोसायट्यांना अनेक आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असून त्यातच आता या अवाजवी कराचा बोजा आल्याने सोसायट्या अडचणीत आलेल्या असणे, तरी मुंबई उपनगरातील गृहनिर्माण सोसायट्यांना बजावलेल्या सदर अकृषिक कर नोटिसांना त्वरित स्थगिती देण्याबाबत व मुंबई उपनगरातील लावण्यात येत असलेला हा अकृषिक कर कायमस्वरूपी रद्द करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(४) श्री.नारायण कुचे, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्याचे लक्ष वेधले –**

"जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील बावणे पांगरी व भोकरदन तालुक्यातील राजूर या महसुली मंडळात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होणे, नैसर्गिक नुकसानीमुळे बाधित शेतकऱ्यांना शासनाने तातडीने आर्थिक नुकसान भरपाई अद्यापही न देणे, त्यामुळे अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना राज्य शासनाने आर्थिक मदत तातडीने करावी व बाधितांना दिलासा द्यावा यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माननीय मुख्यमंत्री महोदय यांना दिनांक ९ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्या दरम्यान जावक क्रमांक २०२१-२०२२/०८० या पत्राद्वारे तसेच कृषी मंत्री, मदत व पुनर्वसन मंत्री व संबंधित अधिकारी यांना लेखी विनंती केलेली असणे, परंतु शासनाने शेतकऱ्यांना अनुदान मिळणेसाठी अद्यापही कोणत्याच उपाययोजना केल्या नसणे, परिणामी स्थानिक लोकप्रतिनिधींसह बाधित शेतकऱ्यांच्या समवेत दिनांक १२ नोव्हेंबर रोजी वा त्या दरम्यान लाखोच्या संख्येने ट्रॅक्टर आक्रोश मोर्चा काढणे, सदर नुकसानीला अनेक महिने उलटूनही कोणतीही कारवाई होत नसणे, तसेच पांगरी व राजूर महसूल मंडळातील अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे व फळबागांचे पंचनामे ७ महिन्यांपूर्वी झालेले असणे, तसेच जिल्हाधिकारी जालना यांनी सदर दोन्ही तालुक्यातील बदनापूर, बावणे पांगरी व भोकरदन तालुक्यातील राजूर महसूल मंडळात नुकसान झालेल्या क्षेत्राचा पाहणी दौरा केलेला असणे, जिल्हाधिकारी, जालना यांनी शेतकऱ्यांच्या पिकांचे व फळबागांचे अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीबाबतचा सविस्तर प्रस्ताव महसूल व पुनर्वसन विभाग, मंत्रालय यांच्याकडे सादर करणे, जिल्हाधिकारी, जालना यांनी नुकसानग्रस्त शेतकरी यांना अनेकदा आर्थिक मदत देण्याचे आश्वासन देऊनही अद्यापही बाधित गरीब शेतकऱ्यांना मदत दिलेली नसणे, परिणामी शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत असणे, शासनाच्या उदासीन धोरणामुळे शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ येणे, त्यामुळे सामान्य गरीब शेतकरी यांच्यात शासनाच्या विरोधात पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मदत व पुनर्वसन मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(५) श्री. इंद्रनील नाईक, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले –**

"खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी"अमृत" (AMRUT-Academy of Maharashtra Research, Upliftment and Training) संस्थेला निधी व कर्मचारी पदाधिकारी देण्याबाबत खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी "अमृत" ही संस्था ऑगस्ट, २०१९ मध्ये स्थापन करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, यापूर्वी अनुसूचित जातीतील तरुण व तरुणींसाठी त्यांना शैक्षणिक मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने "बार्टी" ही संस्था स्थापन करण्यात येणे, त्याच धर्तीवर खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी "अमृत" ही योजना शासनाने मंजूर करणे, परंतू, सुमारे २ वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊनसुद्धा या संस्थेला कार्यालयासाठी जागा तसेच त्याठिकाणी अधिकारी व कर्मचाऱ्यांची नेमणूक न करणे तसेच त्यांना आर्थिक निधीसुध्दा अद्याप देण्यात न आल्यामुळे या संस्थेचे काम ठप्प असणे, त्यामुळे खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या शैक्षणिक व त्यांना मार्गदर्शन प्रशिक्षणही न मिळणे, त्यामुळे या प्रवर्गात पसरलेला तीव्र असंतोष,"अमृत" या संस्थेला कार्यालयासाठी जागा तसेच त्या संस्थेसाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून ही योजना प्रत्यक्षात कार्यान्वित करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(२) श्री.रोहित पवार, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले–**

"राज्यातील पत्रकारांना दुर्धर आजार, अपघात झाल्यास किंवा मृत्यू झाल्यास त्यांना मदत करण्याच्या उद्देशाने शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीची स्थापना शासनाने १ ऑगस्ट, २००९ रोजी केलेली असणे, सदरील निधीतून मिळणाऱ्या मदतीच्या रकमेत शासनाने सन २०१६ नंतर वाढ केलेली नसणे, सदर निधीतून केवळ अधिस्वीकृतीधारक पत्रकारांनाच मदत मिळत असणे, शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीसाठी राज्याच्या अर्थसंकल्पात दरवर्षी रुपये १० कोटीची कायम निधीची तरतूद करण्याची मागणी पत्रकारांची असणे, या योजनेअंतर्गत पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांना मदतीस पात्र असलेल्या आजारांची संख्या वाढ करण्याची आवश्यकता असणे, पत्रकार संरक्षण कायद्याची अंमलबजावणी राज्यात कठोरपणे

होत नसणे, ग्रामीण व शहरी पत्रकारांना अपघात विमा व आरोग्य विम्याची सुविधा नसणे, महात्मा फुले जन आरोग्य योजनेतून सरसकट सर्व पत्रकारांना दीड लाखांपर्यंत मोफत उपचाराची सोय उपलब्ध नसणे, या सर्व प्रश्नांची तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

माहिती व जनसंपर्क राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**५.** वने राज्यमंत्री तथा समिती प्रमुख यांनी, "महाराष्ट्र विधानसभा नियम १८३ च्या पोट-नियम (१) अन्वये,"राज्यात ३३ कोटी वृक्ष लागवडीसाठी राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेबाबत" या विषयावर गठित करण्यात आलेल्या तदर्थ समितीचा अहवाल सभागृहास सादर करण्याची मुदत पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिनांकापर्यंत वाढवून देण्यात यावी." इ.बाबतचा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

प्रा.डॉ.अशोक उईके, वि.स.स., यांनी " "दिनांक २९ मे, २०१७ च्या शासन निर्णयाच्या अधीन राहून भविष्यात वर्ग ३ आणि वर्ग ४ ची नियुक्ती आणि पदभरती सरळसेवा भरतीच्या माध्यमातून करणे तसेच दिनांक २५ फेब्रुवारी, २०२२ रोजी काढलेला शासन निर्णयाला आपण स्थगिती देणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. व श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते यांनी आपले म्हणणे मांडले.

ही बाब गंभीर असून यासंदर्भात शासनाने दखल घ्यावी तसेच मंत्रिमहोदयांनी या विषयावर उद्या सभागृहात निवेदन करावे असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

**६.** १) महसूल व वन विभाग २) जलसंपदा विभाग ३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग ४) ग्रामविकास विभाग ५) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग ६) सार्वजनिक आरोग्य विभाग.

उपाध्यक्ष : आता १) महसूल व वन विभाग २) जलसंपदा विभाग ३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग ४) ग्रामविकास विभाग ५) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग ६) सार्वजनिक आरोग्य विभाग म्हणजे मागण्या क्रमांक सी-१, सी-२, सी-४, सी-५, सी-६, सी-७, सी-९, सी-१०, सी-१२, आय-२, आय-३, आय-४, आय-५, आय-७, के-१, के-३, के-५, के-६, के-७, के-८, के-९, के-१०, के-११, के-१३,एल-२, एल-३, एल-४, एल-५, एल-७, एल-८, एम-१, एम-२, एम-३, एम-४, एम-५, एम-६, आर-१, आर-२, आर-३, आर-४ चर्चेला घेण्यात येतील असे सांगून सदर चर्चेची कार्यपद्धती विशद केली व सदर मागण्यांवर कोणीही कपात सूचना मांडणार नाही असे गृहीत धरून चर्चेला प्रारंभ होईल असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(१) श्री. राधाकृष्ण विखे-पाटील
(२) ॲड . आशिष जैस्वाल
(३) डॉ.संजय कुटे
(४) श्री.सुनील शेळके
(५)श्रीमती माधुरी मिसाळ
(६) श्रीमती सुलभा खोडके
(७) श्री. रवि राणा
(८) श्री.सुनील प्रभू
(९) श्री. समीर कुणावार
(१०) श्री.बाळासाहेब आजबे
(११) श्री.संग्राम थोपटे
(१२) श्री.किशोर जोरगेवार
(१३) श्री.अबू आजमी
(१४) श्री.कैलास गोरंट्याल
(१५) ॲड. आकाश फुंडकर
(१६) श्री.प्रकाश सुर्वे
(१७) श्री.राजेश पाटील
(१८) श्रीमती श्वेता महाले
(१९) श्री.मनोहर चंद्रिकापुरे
(२०) श्री.दीपक केसरकर
(२१) श्री.शिरीष चौधरी
(२२) श्रीमती मनिषा चौधरी
(२३) ॲड. अशोक पवार
(२४) श्री.रमेश कोरगावकर
(२५) श्री.जितेश अंतापूरकर
(२६) श्री.राम सातपुते
(२७) श्री.पी.एन.पाटील
(२८) श्री.प्रताप अडसड
(२९) श्री.धर्मरावबाबा आत्राम
(३०) श्री.उदयसिंग राजपूत
(३१) श्री.अभिमन्यू पवार
(३२) श्री.सहसराम कोरोटे
(३३) श्री.रत्नाकर गुट्टे
(३४) ॲड. राहुल कुल
(३५) श्रीमती सरोज अहिरे
(३६) श्री.दिलीप लांडे
(३७) डॉ.तुषार राठोड
(३८) श्री.अमित झनक
(३९) डॉ.राहुल पाटील
(४०) श्री.दिलीपराव बनकर
(४१) श्री.समाधान आवताडे
(४२) श्री.संजय जगताप
(४३) श्री.शेखर निकम
(४४) श्री.संजय गायकवाड
(४५) श्री.कृष्णा गजबे
(४६) श्री.निलेश लंके
(४७) श्री.बळवंत वानखेडे
(४८) श्री.ज्ञानराज चौगुले
(४९) श्री.प्रकाश आवाडे
(५०) श्री.मोहनराव हंबर्डे
(५१) श्री.यशवंत माने
(५२) श्री.रमेश बोरनारे
(५३) श्रीमती गीता जैन
(५४) श्री.हिरामण खोसकर

(५५) विक्रमसिंह सावंत (५६) श्री.प्रकाश आबिटकर

(५७) श्री.चंद्रकांत ऊर्फ राजूभैया नवघरे

वने राज्यमंत्री यांनी आपल्या विभागाच्या मागण्यांवरील चर्चेस उत्तर दिले.

(चर्चा अपूर्ण)

ॲड.राहुल कुल,"आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचना" इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

आज सकाळी झालेल्या सर्व प्रतोदांच्या बैठकीमध्ये अर्धा-तास चर्चा गुरुवारी घेण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला असल्याचे माननीय संसदीय मंत्र्यांनी सांगितले.

गुरुवारी विशेष बैठकीमध्ये अर्धा-तास चर्चा घेण्यात येईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेस महसूल मंत्री, ग्रामविकास, कामगार मंत्री, उद्योग मंत्री, सार्वजनिक आरोग्य मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री, ऊर्जा राज्यमंत्री, जलसंपदा मंत्री, मदत व पुनर्वसन राज्यमंत्री यांनी आपापल्या विभागाच्या मागण्यांवरील चर्चेस उत्तर दिले.

उपरोक्त अनुदानाच्या मागण्या आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकण्यात आल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

**७.** **(अ)** (१) उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्र्यांनी, सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० – महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२२ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(२) महसूल मंत्र्यांनी, सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ – महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२२ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

**(ब)** उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्र्यांनी, सन २०२२ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १ – निकमार विद्यापीठ, पुणे विधेयक, २०२२ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.
विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

८. सर्वश्री सुनिल प्रभू, अमिन पटेल, अनिल पाटील, रविंद्र वायकर, नाना पटोले, यशवंत माने, अजय चौधरी, पृथ्वीराज चव्हाण, प्रकाश सोळंके, सदा सरवणकर, सुरेश वरपुडकर, ॲड अशोक पवार, सर्वश्री मंगेश कुडाळकर, झीशान सिद्दीकी, रोहित पवार, सुनील राऊत, संग्राम थोपटे, दीपक चव्हाण, प्रकाश सुर्वे, कैलास गोरंट्याल, दौलत दरोडा, रमेश लटके, अमित झनक, ॲड माणिकराव कोकाटे, सर्वश्री संजय पोतनीस, कुणाल पाटील, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री प्रकाश फातर्पेकर, शिरीष चौधरी, शेखर निकम, प्रताप सरनाईक, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री बाबासाहेब पाटील, भास्कर जाधव, सुभाष धोटे, बाळासाहेब आजबे, रमेश कोरगावकर, माधवराव जवळगांवकर-पाटील, संग्राम जगताप, राजन साळवी, पी.एन.पाटील (सडोलीकर), संजय राठोड, शिरीषकुमार नाईक, डॉ. किरण लहामटे, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री राजेश एकडे, निलेश लंके, ज्ञानराज चौगुले, बळवंत वानखडे, संदिप क्षीरसागर, डॉ. संजय रायमुलकर, सर्वश्री विकास ठाकरे, सुनिल शेळके, अनिल बाबर, रणजित कांबळे, संजय जगताप, भरतशेठ गोगावले, नितीन पवार, धीरज देखमुख, वैभव नाईक, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री सुनिल टिंगरे, दिलीप लांडे, विक्रमसिंग सावंत, जितेश अंतापूरकर, दिपक केसरकर, चेतन तुपे, संजय शिरसाट, राजू पारवे, सहसराम कोरोटे, चिमणराव पाटील, मोहनराव हंबर्डे, लहु कानडे, प्रकाश आबिटकर, ऋतुराज पाटील, राजू आवळे, किशोर पाटील, चंद्रकांत नवघरे, शांताराम मोरे, डॉ.राहुल पाटील, श्री.श्रीनिवास वनगा, ॲड.शहाजी पाटील, सर्वश्री संजय गायकवाड, नितीन देशमुख, बालाजी कल्याणकर, उदयसिंग राजपूत, रमेश बोरनारे, सुहास कांदे, महेंद्र थोरवे, विश्वनाथ भोईर, संतोष बांगर, योगेश कदम, श्रीमती लता सोनवणे, सर्वश्री कैलास घाडगे-पाटील, महेश शिंदे, महेंद्र दळवी, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव.

श्री.सुनील प्रभू, वि.स.स. यांनी म.वि.स. नियम २९३ अन्वये खालील प्रस्ताव मांडला व भाषण केले –

"मुंबईतील बऱ्याच इमारती ५० वर्षांपेक्षा जास्त जुन्या झाल्यामुळे सदर इमारतींचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, मुंबईतील हवाईमार्गात (फनेल झोन) येणाऱ्या विमानतळाच्या परिसरातील इमारतींना उंचीची मर्यादा असणे, त्यामुळे या इमारतींचा विकास व पुनर्विकास आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य असणे, मुंबई महापालिकेने सदर इमारतींचा नमुना गणनेच्या आधारे पुनर्विकास करण्यासाठी नगरविकास विभागाने योग्य निर्णय घेण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिका हद्दीत भोगवटा प्रमाणपत्र नसलेल्या व वर्षानुवर्षे प्रतीक्षेत असलेल्या इमारतींचा भोगवटा प्रमाणपत्रांबाबत"क्षमापित करण्याचा" निर्णय घेणे व मध्यम वर्गीय नागरिकांना दिलासा देणे, राज्यातील शहरांमधील एसआरएच्या सक्षम प्राधिकाऱ्याने झोपडीधारकांची पात्रता प्रक्रिया ९० दिवसांत पूर्ण करण्याची आवश्यकता, मुंबई उपनगर, ठाणे व पुणे जिल्ह्यातील सर्वसामान्य

नागरिक तसेच सहकारी गृहनिर्माण संस्था व अन्य वेगवेगळ्या संस्थांना सन १९९६ पासून २०२१ पर्यंत २५ वर्षांच्या कालावधीच्या एकत्रित अकृषिक आकारणीच्या नोटिसा देण्यात येणे, सदर नोटिसांमधील अकृषिक आकारणीचे प्रमाण दर अवाजवी असणे, सदर रक्कम भरण्यासाठी देण्यात आलेला अल्प कालावधी, सदर रक्कम न भरल्यास संबंधितांची बँक खाती/कार्यालये सील करणे, कोविड- १९ जागतिक महामारीच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य नागरिक/व्यावसायिक अडचणीच्या काळातून जात असतांना शासनाकडून या अकृषिक आकारणीमध्ये मदतीची अपेक्षा, पी.एम.जी.पी. प्रकल्पांतर्गत शासनाच्या / खाजगी जमिनीवरील व म्हाडाच्या ५६ वसाहतीमधील सोसायट्यांना लावण्यात आलेल्या व्याजासहित एन. ए. टॅक्स रद्द करण्याबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता, म्हाडाच्या थकीत सेवा शुल्काबाबत उपाययोजना जाहीर करणे, प्रत्येक तालुक्यात म्हाडा प्रकल्पाची आवश्यकता, पुणे येथील जुन्या व जीर्ण झालेल्या म्हाडा इमारतींच्या पुनर्विकासाची आवश्यकता, राज्यभरातील जमिनीवरील म्हाडाचे असलेले आरक्षण व त्या जमिनींचा विकास व पुनर्विकास, म्हाडामार्फत नोकरदार महिलांसाठी वसतिगृह व मुला-मुलींकरीता वसतिगृह बांधण्याबाबत कार्यवाही, पश्चिम उपनगरात आरक्षित भूखंडावर म्हाडामार्फत मोठ्या रुग्णालयाची उभारणी करणे, मुंबईतील वांद्रे (पश्चिम) येथे म्हाडाच्या जागेवर पशुवैद्यकीय दवाखान्यांची उभारणी, शासकीय जमिनीवर असलेल्या गृहनिर्माण सोसायट्यांच्या इमारतींचा पुनर्विकास म्हाडामार्फत करण्याचा पर्याय उपलब्ध करण्याबाबत, रखडलेल्या झोपडपट्ट्यांचा विकास करण्यासाठी ॲमनेस्टी स्कीम त्वरित अंमलात आणण्याची आवश्यकता, केंद्र शासनाच्या जागेवर असलेला झोपडपट्ट्यांचा रखडलेला पुनर्विकास, एसआरए योजना संपूर्ण महाराष्ट्राला लागू करणे, धारावी झोपडपट्टी व बीडीडी चाळीचा पुनर्विकास करणे, याबाबत राज्य शासनाने करावयाची व केलेली निर्णयात्मक कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

श्री.सुनील प्रभू, वि.स.स. यांचे भाषण अपूर्ण

(चर्चा अपूर्ण)

## बुधवार, दिनांक २३ मार्च, २०२२

(१) सर्वश्री. बबनराव शिंदे व संजयमामा शिंदे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. बबनराव शिंदे वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"सोलापूर जिल्ह्यामध्ये विविध ठिकाणी राज्य मार्गाची दर्जोन्नती करून राष्ट्रीय महामार्गामध्ये रुपांतर केलेले असणे, त्यामध्ये म्हसवड-अकलुज-टेंभुर्णी-बार्शी-कुसळंब या मार्गास राष्ट्रीय

महामार्ग ५४८-सी म्हणून मंजुरी देण्यात आलेली असणे, यापैकी म्हसवड ते टेंभुर्णी या मार्गाचे काम सुरू असून यामध्ये संगम व शेवरे येथे शेतकऱ्यांना मोबदला न मिळाल्यामुळे काम बंद पाडलेले असणे तसेच सद्यःस्थितीत टेंभुर्णी-कुर्डूवाडी-बार्शी ते कुसळंब या मार्गाचे टेंडर प्रक्रिया सुरू असणे, माढा तालुक्यातून जाणाऱ्या या राष्ट्रीय महामार्गावर ५ साखर कारखाने असून टेंभुर्णी-कुर्डूवाडी-बार्शी या ठिकाणी एम.आय.डी.सी. कार्यान्वित झालेली असणे, साखर कारखाने हंगाम सुरू झाल्यानंतर हंगामात हजारो वाहने, बैलगाडी यांची वाहतूक असल्याने ४ ते ५ महिने मोठ्या प्रमाणावर वाहतुकीची तासनतास कोंडी मोठ्या प्रमाणावर होणे, त्यामुळे सदरचा टेंभुर्णी ते बार्शी-कुसळंब हा भाग रस्ता चौपदरी करणे गरजेचे असणे, टेंभुर्णी ते कुर्डूवाडी-बार्शी बायपास मार्गे कुसळंब असा ५ कि.मी. लांबीचा रस्ता अत्यंत खराब झालेला असणे, माढा, करमाळा, बार्शी, विधानसभा मतदारसंघातून जात असून पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा यांना जोडणारा महत्त्वाचा राष्ट्रीय मार्ग असणे, परंतु या महामार्गावरील अवजड वाहतूक करणाऱ्या वाहनांची तसेच प्रवाशांची संख्या वाढलेली असणे, त्यामुळे रस्त्यावर वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर होऊन अपघातांचे प्रमाण वाढणे, या राष्ट्रीय महामार्गाबाबत मा.केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री यांनी लातूर येथील रस्ते लोकार्पण कार्यक्रमात सदर रस्त्याचे चौपदरीकरण करणेबाबत घोषणा केलेली असणे, त्यासाठी राज्य सरकारकडून आवश्यक बाबींची पूर्तता झाल्यास या मार्गावरील अवजड वाहन,प्रवाशी वाहने याचबरोबर ग्रामीण भागातील शेतीमाल पालेभाज्या, फळे वेळेत पोहोचून नागरिकांची मदत होणे, टेंभुर्णी ते कुसळंब हा मार्ग चौपदरी होण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांची वारंवार मागणी होत असणे, त्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. सचिन कल्याणशेट्टी, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले.

“सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट दक्षिण सोलापूर तालुक्यातून जाणाऱ्या महामार्गाच्या भूसंपादन प्रक्रियेत अनियमितता झाल्याने उपजिल्हाधिकारी तथा प्रांताधिकारी यांना शासनाने निलंबित करणे, भूसंपादन प्रक्रिया करत असतांना अधिकारी यांनी नियमबाह्य प्रक्रिया राबवणे, एका सर्व्हे नंबर मध्ये असलेल्या दोन वेगवेगळ्या व्यक्तींपैकी जमिनीची मोजणी न करता एकाच व्यक्तीला मोबदला दिला जाणे, या व्यतिरिक्त भूसंपादन अधिकाऱ्याकडून शेतकऱ्यांसोबत वारंवार

आर्थिक गैरव्यवहार होणे, त्यामुळे भूसंपादन अधिकारी यांचे निलंबन होणे, यांची योग्य सखोल चौकशी न झाल्यामुळे निलंबित झाल्यानंतर उपजिल्हाधिकारी तथा प्रांतअधिकारी पुनश्च पदभार घेऊन कार्यरत होणे, त्यामुळे सामाजिक वाद विवाद होणे, परिणामी विभागातील रहिवाशांमध्ये शासनाप्रति पसरलेला तीव्र असंतोष व विभागातील रखडलेले पुनर्वसन प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करून रस्त्यावर आलेल्या जमीनधारकांना त्यांच्या हक्कासाठी न्याय मिळवून देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. शेखर निकम, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"कोकणामध्ये मुख्यत्वे आंबा, काजू, नारळ, सुपारी, चिकू इ. फळपिके घेतली जाणे, सदर पिकांसाठी महावितरण कंपनीकडून कृषी पंपांची कनेक्शने दिली जाणे, परंतु महावितरण कंपनीच्या परिपत्रक क्र.२४३, दिनांक ३ जुलै, २०१५ नुसार नारळ, सुपारी, आंबा, चिकू या बागांना कृषी व्यतिरिक्त सदरात गणना करून सदर शेतकऱ्यांकडून कृषी व्यतिरिक्त प्रमाणे सन २०१५ पासून आकारणी करून बिले अदा केली जाणे व बागायती पिकांसाठी वेगळा दर आकारण्याचा दृष्टीकोन दिसून येणे, बागायती पिकांमध्ये ऊस, केळी, संत्री, द्राक्ष ही सुध्दा बागायती पिके असणे, आंबा, काजू, नारळ, सुपारी, चिकू व नर्सरी ही बागायती पिके असूनदेखील यांना वेगळी वीज बिल आकारणी केली जाणे, कोकणातील शेती पंपांना महावितरण कंपनीने शेती कृषी व्यतिरिक्त विभागात केलेल्या कोकणातील शेतकऱ्यांना शेती असे वर्गीकरण होणेसंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

ऊर्जा राज्य मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) कॅप्टन आर. तमिल सेल्वन, श्री. अबू आजमी, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

कॅप्टन आर. तमिल सेल्वन वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"मुंबई मधील सायन-कोळीवाडा मतदारसंघात वडाळा ट्रक टर्मिनल, वडाळा येथे पुष्कळ आर.एम.सी (RMC) प्लांट असणे, सदर आर.एम.सी (RMC) प्लांट हे एम.एम.आर.डी.ए.च्या

भूखंडावर असणे, या आर.एम.सी (RMC) प्लांटमुळे सदर जागी मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्याचे निदर्शनास येणे, या प्लॉट भोवती वडाळा आर.टी.ओ, स्थानिक पोलीस स्टेशन यासारखे सरकारी कार्यालय असणे, तेथील कार्यरत कर्मचारी व स्थानिक नागरिक यांना प्रदूषणामुळे त्रास होणे, येथील आर.एम.सी (RMC) प्लांट पैकी मे. ईगल इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीने एम.एम. आर.डी.ए. ची अतिरिक्त जागा अनधिकृतपणे बळकवल्याचे निदर्शनात येणे, कुठलीही प्रशासकीय परवानगी न घेता स्थानिक रहिवाशी यांचा ये-जा करण्याचा मार्ग (रस्ता) बंद करणे, शासनाने नेमून दिलेल्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या नियमांना पायदळी तुडवून मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असणे, सदर भूखंड हा मेट्रो रेलच्या कामासाठी दिलेला असणे, तरी सदर जागेचा वापर मे. ईगल इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीकडून अनधिकृतपणे खाजगी कामाकरिता होत असणे, या व्यतिरिक्त अशोका या कंपनीचा आर.एम.सी. (RMC) प्लान्ट हा भक्ती पार्क येथील निवासी जागेत असणे, यामुळे स्थानिक नागरिकांना होत असलेला त्रास रोखण्याकरिता शासनाने गंभीर दखल घेऊन करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

नगर विकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्री. संजय जगताप, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधले.

“पुणे महानगरपालिका हद्दीत सन २०१७ पासून समाविष्ट झालेल्या गावातील मिळकत धारकांना पूर्वी ग्रामपंचायत हद्दीत असताना बांधलेल्या क्षेत्रावर सर्वसाधारण कर, सर्वसाधारण पाणीपट्टी, विशेष पाणीपट्टी, आरोग्य, सार्वजनिक वीज वापर कर मिळून एकत्रित आकारणी होत असणे, परंतु महानगरपालिकेने रस्ते, पाणी पुरवठा, दिवाबत्ती (स्ट्रीट लाईट), कचरा संकलन, ड्रेनेज लाईन, फुटपाथ इ. साठी केलेल्या सोयीसुविधा या अत्यंत अपुऱ्या असणे, अनेक वर्ष मनपा हद्दीत समाविष्ट झाल्यावरही मूलभूत पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात पुणे मनपा अपयशी असणे, मनपा हद्दीत समावेश झाल्यावर रेडिरेकनर नुसार सर्वसाधारण कर, पाणीपट्टी, सफाई कर, अग्निशमन कर, वृक्ष संवर्धन कर, जल लाभ कर, मलनिस्सारण कर, पथ कर, विशेष सफाई कर, मनपा शिक्षण उपकर व राज्य शासनाचा शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठ्या निवासी जागेवरील करांची आकारणी करत असल्याने महापालिकेत समावेश झाल्यावर ग्रामस्थांच्या पूर्वी आकारणी होत असलेल्या करात अनेकपटींनी वाढ झाल्याने नागरिकांत निर्माण झालेले असंतोषाचे व रोषाचे वातावरण, परिणामी पायाभूत सुविधांचे जाळे मुख्य शहराच्या तुलनेत समाविष्ट गावांमध्ये निर्माण केल्याशिवाय मनपा प्रचलित दराने कर भरण्यास स्थानिक नागरिकांनी केलेला विरोध, सन २०२४ पर्यंत सदर समाविष्ट गावांना मूलभूत सुविधा देण्याबाबत नियोजित करण्यात आले असल्याने

सन २०२४ पर्यंत ग्रामपंचायतीप्रमाणे कर आकारणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नगर विकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) डॉ. किरण लहामटे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"तळे, विहीर, शिंदे (ता.अकोले, जि.अहमदनगर) या गावांना पिण्याच्या पाण्याची योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून १० ते १२ वर्षापासून मंजूर होणे, परंतु या कामाचा दर्जा चांगला नसल्यामुळे तळे, विहीर, शिंदे गावांना पिण्याचे पाणी न मिळणे, तयार करण्यात आलेल्या विहिरीमध्ये देखील केवळ २ ते ३ महिने पुरेल इतकेच पाणी असणे, गावकऱ्यांपुढे पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण होणे, त्यामुळे नागरीकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण होणे, याबाबत संबंधित ठेकेदार, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करून या गावांना तातडीने पाणी पुरवठा मिळण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**लक्षवेधी सूचना क्रमांक-११ बाबत-**

लक्षवेधी सूचना क्रमांक ११ च्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना वितरित करेपर्यंत ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

(७) श्री. चेतन तुपे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"पुणे शहरातील कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट न लावल्यामुळे कचऱ्यातील घाण द्रव जमिनीत झिरपून प्रदूषित होणारे जलस्त्रोत, त्यामुळे होणारी पर्यावरणाची हानी, कचऱ्याने हवेतील प्रदूषण वाढल्यामुळे बालके आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये बळावलेले श्वसनाचे विकार, काही वेळा कचरा डेपोना आगी लागून निर्माण होणाऱ्या प्रदूषित धुरामुळे पर्यावरणाची होणारी हानी, शहराच्या एकाच भागात एकवटलेले कचरा डेपो, त्यामुळे त्या ठराविक भागातील प्रदूषणात पडणारी भर, हवेतील प्राणवायूची घसरलेली गुणवत्ता, औद्योगिक वसाहती आणि लगतच्या रहिवाशी क्षेत्रातील नागरिकांना होणारा प्रदूषणाचा त्रास, शहराच्या एकाच भागात कचरा डेपो केल्यामुळे लांबवर करावी

लागणारी वाहतूक, वाहतूक ठेके प्रकरणी मोठ्या प्रमाणात झालेले आर्थिक गैरव्यवहार, विशिष्ट ठेकेदारांना नजरेसमोर ठेवून दिलेले कचरा प्रकल्पाचे ठेके, याकामी झालेले आर्थिक गैरव्यवहार, ठेकेदार वापरत असलेले कालबाह्य तंत्रज्ञान, त्यांच्याकडे अद्यावत यंत्र सामुग्रीचा अभाव, त्यामुळे वाढलेले पर्यावरणीय प्रदूषण, शहरालगतच्या नव्याने समाविष्ट भागात कचरा टाकताना त्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे निर्माण झालेल्या प्रदूषणाने परिसरात होणारी पर्यावरण हानी परिणामी त्या भागात कचरा टाकण्यास स्थानिकांचा होणारा तीव्र विरोध, नगरवासीय आणि ग्रामवासीय यांच्यात वारंवार होणारा तीव्र संघर्ष, पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात होणारी हानी रोखण्यासाठी तातडीने प्रभावी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

पर्यावरण व वातावरणीय बदल राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(८) श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री नानाभाऊ पटोले, सुरेश वरपुडकर, पृथ्वीराज चव्हाण, श्रीमती सुलभा खोडके, श्री. चंद्रकांत नवघरे, डॉ. राहुल पाटील, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती प्रतिभा धानोरकर वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सामाजिक न्याय (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधले.

“महाराष्ट्र राज्यातील निराधार व्यक्तींना आधार म्हणून राज्य शासनातर्फे संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी निराधार पेन्शन, श्रावणबाळ पेन्शन अशा एकूण ५ प्रकारच्या योजनेतून पेन्शन दिल्या जात असणे, सदर योजनेच्या माध्यमातून निराधार व्यक्तीला फक्त १००० रुपये व त्या महिलेला मूल असेल तर १०० रुपये जास्त पेन्शन दिले जात असणे, सदर पेन्शनची रक्कम ही वाढत्या महागाईच्या काळात तुटपुंजी असणे, आजच्या महागाईच्या काळात पेन्शनच्या रक्कमेत वाढ करून ती किमान दरमहा ३००० रुपये करण्याची आवश्यकता, तसेच शासकीय कर्मचा-यांना ज्याप्रमाणे महागाई भत्ता दिला जातो त्याप्रमाणे दरवर्षी या पेन्शनमध्ये २० टक्के वाढ करण्याची आवश्यकता, तसेच निराधार योजनेच्या पेन्शनचा लाभ मिळण्यासाठी उत्पन्नाची अट २१ हजार रुपये असणे, म्हणजे दिवसाला केवळ ५८ रुपये उत्पन्न असणाऱ्या व्यक्तीलाच ही पेन्शन योजना लागू होत असणे, परिणामी अनेक निराधार व्यक्ती या योजनेपासून वंचित असणे, जुन्या काळातील लावलेली ही उत्पन्नाची अट बदलून ६० हजार रुपये करण्याची आवश्यकता, शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(९) श्री. अनिल बाबर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा मंत्र्याचे लक्ष वेधले.

"सांगली-सातारा-सोलापूर जिल्ह्यातील कायम दुष्काळी तालुक्यासाठी वरदान असणारी टेंभू उपसा सिंचन योजनेचे काम मागील २५ वर्षापासून सुरू असणे, सदर दुष्काळी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिण्याच्या तसेच शेतीच्या पाण्याचा प्रश्न अद्यापही प्रलंबित असणे, सदर योजनेचे काम तातडीने केल्यास या योजनेअंतर्गत तीन जिल्ह्यातील सात तालुक्यांमधील २१७ गावांना फायदा होणे, त्यामुळे या गावातील पिण्याच्या पाण्याची तसेच शेतीच्या पाण्याची अडचण दूर होणे, शेतीमालाचे उत्पादन वाढून त्याचा दर्जा वाढणे, बेरोजगार तरुणांना रोजगार मिळेल, सदर योजनेमध्ये खानापूर-आटपाडी-तासगांव तालुक्यातील वंचित गावांचा समावेश करण्याची होत असलेली मागणी, यासाठी टेंभू उपसा सिंचन योजनेमध्ये वंचित गावांचा समावेश करून ६ टप्पा नियोजित असणे, याबाबत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे दिनांक २४ जानेवारी, २०२० रोजी बैठक होऊन तीन महिन्यांमध्ये वंचित गावांचा समावेश करण्याचा आदेश दिलेला असणे, तसेच दिनांक २७ ऑक्टोबर, २०२० रोजी मा. प्रधान सचिव, जलसंपदा यांचेकडे पाण्याच्या फेरनियोजनाबाबत बैठक होऊनही अदयाप निर्णय न होणे, मा. जलसंपदा मंत्री यांचेकडे वारंवार निवेदने देऊनही अदयापही निर्णय न होणे, परिणामी दुष्काळी तालुक्यातील वंचित गावांमधील जनतेमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने लक्ष घालून उपरोक्त वंचित गावांचा लवकर समावेश करून दुष्काळी तालुक्यातील जनतेला पिण्यासाठी व शेतीला पाणी देण्याकरिता तातडीने शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

जलसंपदा मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ५४ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. संजय शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**१.** (१) चार तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) एक तारांकित प्रश्न माननीय तालिका सभाध्यक्षांच्या निदेशानुसार राखून ठेवण्यता आला.

(३) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एकोणतीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

श्री. नाना पटोले वि. स. स. यांनी, "वकील व छोट्या पत्रकांरावर हल्ले होणे" इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

गृह मंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता यांनी, "मागण्यांवरील चर्चेकरीता ५० टक्के वेळ सत्तारूढ पक्ष व ५० टक्के वेळ विरोधी पक्ष यांना वेळ देण्यात यावा" इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

याबाबत निश्चितपणे दखल घेतली जाईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

ॲड. आशिष शेलार वि.स.स. यांनी,"केंद्रीय यंत्रणांच्या नावाखाली वसुली करण्याचा कार्यक्रम पोलीस विभागाच्या माध्यमातून सुरू असणे" इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

गृह मत्र्यांनी याबाबत नोंद घेण्यात आलेली असून या प्रकरणी सत्य आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असे सांगितले.

**२.** (१) जलसंपदा मंत्र्यांनी,

(अ) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा एकवीसावा वार्षिक वित्तीय अहवाल व

(ब) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(२) पर्यावरण व वातावरणीय बदल राज्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचा सन २०२०-२०२१ चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

**३.** माननीय तालिका सभाध्यक्षांनी, बुधवार, दिनांक २३ मार्च, २०२२ रोजी प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारीत असल्याचे माननीय सभापतींनी सांगितले.

**४.** श्रीमती. प्रणिती शिंदे (समिती प्रमुख) यांनी अनुसूचित जाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर केला.

लक्षवेधी सूचना क्रमांक १ मंत्री महोदयांनी विनंती केल्यानुसार पुढे ढकलण्यात येत असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**५.** श्री. दौलत दरोडा (समिती प्रमुख) यांनी अनुसूचित जमाती कल्याण समितीचा पहिला

अहवाल १२ शिफारशींसह सभागृहाला सादर केला.

**६.** श्री. मनोहर चंद्रिकापुरे (समिती प्रमुख) यांनी रोजगार हमी योजना समितीचा पहिला अनुपालन अहवाल सभागृहाला सादर केला.

(१०) श्री. भिमराव (आण्णा) तापकीर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृह मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"खडकवासला (जि. पुणे) येथे मागील काही महिन्यांपासून गुन्हेगारी मध्ये लक्षणीय वाढ होणे, गुन्हेगारांवर पोलीसांचा वचक राहिलेला नसणे, नागरिकांमध्ये विशेषतः लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक यांच्यामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होणे, अल्पवयीन मुलींवर बलात्कार करून ठार मारल्याच्या घटना, अवैध धंदे, लॉटरी, रोडरोमिओ, लूटमार, खून, दरोडे, हॉटेल लॉजिंगच्या माध्यमातून अवैध धंदे, भर दिवसा रस्त्यालगत सुरू असलेला देह व्यापार, वाढता सायबर क्राईम या सारख्या घटना सहकार नगर, भारती विद्यापीठ, सिंहगड रोड, आणि हवेली पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये घडणे, त्याचबरोबर सहकारनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये धनकवडी गावठाण परिसरात अवैध धंदे, वाहनांची जाळपोळ, चोऱ्या, गंभीर स्वरूपाचे गुन्हे सर्रास घडत असणे, सोसायट्या, वस्ती भागात पोलिसांकडून पेट्रोलिंग देखील होत नसणे, पोलीस ठाण्याच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून लोकप्रतिनिधींशी कुठल्याही प्रकारे समन्वय नसणे, केलेल्या सूचना, तक्रारींवर तक्रार दाखल करावयास गेलेल्या नागरिकास मिळणाऱ्या वागणुकीमुळे व मनमानी कारभारामुळे नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण होणे, याबाबत संबंधित पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांचे कार्यक्षेत्र भौगोलिकदृष्ट्या सोयीच्या दृष्टीने पुणे शहर पोलीस आयुक्तालयास जोडण्याची आवश्यकता असणे, जि. पुणे येथील भोर विभाग-राजगड पोलीस स्टेशनच्या हद्दीतील हवेली तालुक्यात समाविष्ट असलेली गावे कमी करून त्या गावांचा समावेश हवेली ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीत करण्याचा निर्णय प्रलंबित असल्यामुळे हवेली तालुक्यातील खडकवासला विभागात येणारी मोरदरी, कल्याण, कोंढणपूर, रहाटवडे, आर्वी, शिवापूर, खेड शिवापूर, श्रीरामनगर, गाउडदरा ही गावे सध्या भोर विभाग अंतर्गत राजगड पोलीस स्टेशनच्या अंतर्गत येत असल्याचे निदर्शनास येणे, संबंधित गावे ही हवेली ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीमधील गावांना लागून असतांना त्या गावातील नागरिकांना कोणत्याही छोट्या-मोठ्या तक्रारीसाठी अथवा इतर

प्रशासकीय कामांसाठी हवेली ग्रामीण पोलीस स्टेशन नजीकच्या अंतरावर असतांना २६ किमी अंतरावर असणाऱ्या राजगड पोलीस स्टेशनला जावे लागणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

गृह मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(११) श्री. अबू आजमी, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"मानखुर्द – शिवाजीनगर येथील घाटकोपर-मानखुर्द लिंक रोड, एकता नगर, मंडाळा, टी-जंक्शन, मानखुर्द येथील अवैध गाळे शासनातर्फे हटविण्यात येणे, परंतु, तेथे पुन्हा अवैधरीत्या गाळे बांधण्यात आले असल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ वा त्यासुमारास निदर्शनास येणे, अवैध व्यावसायिक गाळे हटविण्याबाबत वारंवार संबंधित विभागांकडे मागणी करूनही अद्याप अवैध गाळे हटविण्यात न येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

गृहनिर्माण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

कॅप्टन आर. तमिल सेल्वन वि.स.स. यांनी, " वॉर्ड क्रमांक १७३ चे वार्ड अध्यक्ष श्री. दत्ता केलुस्कर यांच्यावर झालेला हल्ला" इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

गृह मंत्र्यांनी याबाबत माहिती घेऊन निवेदन करावे असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(१२) सर्वश्री सुनिल प्रभू, अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सुनिल प्रभू वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"मुंबई उपनगरातील मुंबई महानगरपालिकेच्या मालाड पूर्व-पश्चिम येथील नागरिकांना, मूलभूत नागरी सेवा-सुविधा उपलब्ध व्हावी याकरिता दिंडोशीच्या स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्रव्यवहार करून केलेल्या पाठपुराव्यानुसार शासन तथा मुंबई महापालिकेने पी/उत्तर विभागाच्या विभाजनास सन २०१९ मध्ये मान्यता देऊनही अद्याप पी/पूर्व आणि पी/पश्चिम अशी महापालिकेची स्वतंत्र

प्रभाग कार्यालये सुरू न झाल्याची बाब दिनांक २२ फेब्रुवारी, २०२२ रोजी निदर्शनास येणे, यामुळे मालाड पूर्व-पश्चिम भागातील नागरिकांची प्रशासकीय कामे आणि नागरीकांना मूलभूत, सेवा-सुविधा प्राप्त करण्यास अद्यापही अडचणीचे होऊन त्रासदायक ठरत असणे, पी/उत्तर विभागाचे पी/पूर्व आणि पी/पश्चिम असे विभाजन करून, दोन स्वतंत्र कार्यालयाकरिता दोन इमारती, आवश्यक अधिकारी व कर्मचाऱ्यांची नवीन पदे निर्मिती करून व त्याकरिता आवश्यक निधीची पालिकेच्या बजेटमध्ये तरतूद करून, कार्यालय सुरू करणेबाबतचा प्रस्ताव सादर होऊनही अद्याप स्थापत्य समिती (उपनगरे)/विधि समिती यांची मान्यता मिळू न शकल्याने सदरहू प्रभाग कार्यालय विभाजनाचे दोन वर्षांपासून प्रलंबित असल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, विभाग कार्यालयाच्या इमारतीची व्यवस्था करणेबाबत तसेच इमारतीची जागा उपलब्ध होऊन प्रभाग कार्यालय सुरू करणेबाबत काय कार्यवाही केली आहे, अद्याप याचा खुलासा शासनाकडून करण्यात न येणे, तसेच वॉर्ड विभाजनासाठी निधीची तरतूद केली नसल्यामुळे मालाड (पूर्व) भागातील नागरीकांना गेल्या दोन वर्षांपासून नवीन वॉर्डपासून वंचित रहावे लागणे, सदरहू विभाजनाचे प्रलंबित प्रस्तावास महापालिकेच्या संबंधित अधिकारी वर्गाकडून कार्यवाही करण्यास झालेले दुर्लक्ष, यामुळे मालाड पूर्व-पश्चिम भागातील लाखो सर्वसामान्य नागरीकांची झालेली व होत असलेली प्रचंड गैरसोय,याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नगरविकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाजपत्रिकेत विशेष बैठकीमध्ये दर्शविण्यात आलेल्या क्र. ७ व ८ च्या लक्षवेधी सूचना माननीय मदत व पुनर्वसन मंत्री यांच्या विनंतीवरुन पुढे ढकलण्यात आल्या असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**७. सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चा व मतदान.**

(१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(२) वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग

(३) आदिवासी विकास विभाग

(४) इतर मागास बहुजन कल्याण विभाग

उपरोक्त विभागाच्या मागण्यां म्हणजे मागण्या क्रमांक एन-२, एन-३, एन-४, एन-५, एन-६, एन-७, एन-८, एस-१, एस-२, एस-३, एस-४, एस-५, टी-२, टी-३, टी-४, टी-५, टी-६, टी-८, टी-९, टी-१०, टी-११, झेडजी-२, झेडजी-३, झेडजी-४, झेडजी-५ चर्चेला घेण्यात येतील. या मागण्यांचा तपशील कार्यक्रमपत्रिकेबरोबर वितरित केला आहे असे सांगून माननीय तालिका सभाध्यक्षांनी चर्चेची कार्यपध्दती विशद केली.

ॲड. आशिष शेलार वि.स.स. यांनी, सभागृहात मंत्री महोदय उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक १० मिनिटांसाठी स्थगित करावी अशी विनंती केली.

सर्वश्री योगेश सागर व राधाकृष्ण विखे-पाटील यांनी उक्त मुद्याच्या पुष्टयर्थ आपले म्हणणे मांडले.

सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून १३ मिनिटांनी दुपारी १ वाजून २३ मिनिटांपर्यंत स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून २३ मिनिटांनी सुरू झाली.

**सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चा व मतदान. (चर्चा पुढे सुरू.)**

मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) प्रा. डॉ.अशोक उईके
(२) श्री. दिलीप लांडे
(३) श्री. हरिभाऊ बागडे
(४) श्री. सुनिल भुसारा
(५) श्री. टेकचंद सावरकर
(६) श्री. देवेंद्र भुयार
(७) श्री. राजू आवळे
(८) डॉ. तुषार राठोड
(९) श्री. नरेंद्र भोंडेकर
(१०) ॲड. राहुल कुल
(११) श्री. किशोर जोरगेवार
(१२) श्री. योगेश कदम
(१३) श्री. दादाराव केचे
(१४) श्री. राजू पारवे
(१५) श्री. राजेश पवार
(१६) श्री. मुफ्ती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक
(१७) श्री. चंद्रकांत नवघरे
(१८) श्री. सहसराव कोरोटे
(१९) श्री. शेखर निकम
(२०) डॉ. देवराव होळी
(२१) श्री. श्रीनिवास वनगा
(२२) श्रीमती सरोज अहिरे
(२३) श्री. राम सातपुते
(२४) श्रीमती प्रतिभा धानोरकर

(२५) श्री. हिरामण खोसकर

(२६) श्री. कृष्णा गजबे

(२७) श्री. किशोर अप्पा पाटील

(२८) श्रीमती मनिषा चौधरी

(२९) श्री. मनोहर चंद्रिकापुरे

(३०) श्री. प्रताप अडसड

(३१) श्री. रमेश कोरगावकर

(३२) डॉ. विजयकुमार गावित

(३३) श्री. जितेश अंतापूरकर

(३४) श्री. सिध्दार्थ शिरोळे

(३५) डॉ. किरण लहामटे

(३६) श्रीमती मंजुळा गावित

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री, वैद्यकीय शिक्षण मंत्री, आदिवासी विकास मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री यांनी आपापल्या विभागाच्या मागण्यांवरील चर्चेस उत्तर दिले.

उपरोक्त विभागाच्या मागण्या दिवसाच्या पत्रिकेसोबतच्या सूचीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकण्यात येत आहेत असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

मागण्या एकत्रितपणे मतास टाकून संमत झाल्या.

**( चर्चारोध )**

चर्चारोधानंतर असलेल्या विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक -(एक) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग : डी-५, डी-८, डी-९ (दोन) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग : ई-२, ई-४ (तीन)वित्त विभाग : जी-६ (चार) सार्वजनिक बांधकाम विभाग : एच-७, एच-८ (पाच) जलसंपदा विभाग : आय-५ (सहा) ग्रामविकास विभाग : एल-३ (सात) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग : एम-३ (आठ) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग : एन-३, एन-४ (नऊ) नियोजन विभाग : ओ-२, ओ-९, ओ-१० (दहा) वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग : एस-१ (अकरा) आदिवासी विकास विभाग : टी-५ (बारा) उच्च व तंत्र शिक्षण विभाग : डब्ल्यू-२, डब्ल्यू-३ (तेरा) महिला व बाल विकास विभाग : एक्स-१ (चौदा) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग : वाय-२ (पंधरा) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग : झेडए-२ (सोळा) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग : झेडडी-२ (सतरा) मराठी भाषा विभाग : झेडएफ-२ (अठरा) इतर मागास बहुजन कल्याण विभाग : झेडजी-२, झेडजी-३ आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचित दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकण्यात आल्या.

मागण्या एकत्रितपणे मतास टाकून संमत झाल्या.

**८. (अ) पुरःस्थापनार्थ–**

(१) वित्त मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक १२ – महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०२२ मांडले व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०७, खंड (१) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून त्यांनी हे विधेयक विचार घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस केली असल्याचे सांगितले.

वित्त मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक १२ – महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०२२ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

श्री. सुधीर मुनगंटीवार वि.स.स. यांनी उपरोक्त विधेयकाच्या संदर्भात म.वि.स. नियम २६४ अन्वये सूचना मांडल्या.

एकूण ४८ सूचना प्राप्त झालेल्या असून त्यापैकी ४४ सूचना मान्य करण्यात आलेल्या आहेत व उर्वरित ४ सूचना अमान्य करण्यात आलेल्या आहेत असे उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी सांगितले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे-

(१) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक १० – महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२२ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्य सर्वश्री देवेंद्र फडणवीस, सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव व सन्माननीय सदस्य ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांचा तिसरा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(१) महसूल मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक ११ – महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२२ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. योगेश सागर
(२) ॲड. राहुल नार्वेकर
(३) श्री. समीर कुणावार
(४) श्री. विजयसिंग राजपूत

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव (चर्चा पुढे सुरू.)**

" मुंबईसह राज्यातील इतर ठिकाणच्या इमारतींचा पुनर्विकास करणे" इ. बाबत दिलेल्या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. सुनिल प्रभू
(२) श्री. योगेश सागर
(३) श्री. अमिन पटेल
(४) ॲड. पराग अळवणी
(५) श्री. झीशान सिद्दीकी
(६) श्री. मंगलप्रभात लोढा
(७) श्रीमती मनिषा चौधरी
(८) डॉ. भारती लव्हेकर

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून उद्या गुरुवार दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी सकाळी ९.०० वाजता विशेष बैठक भरेल असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

**गुरूवार, दिनांक २४ मार्च, २०२२**

**१.** १) श्री. महेश शिंदे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधले.

" सायगांव (एकबे) (ता. कोरेगांव, जि.सातारा) येथील ग्रामस्थांना १९७८ पासून गावठाण कब्जेपट्टी देण्यात आली नसून गावठाणाचा सातबारा न होणे, या गावठाणातील ग्रामस्थांना नवीन शर्त उठवून संबंधित खातेवारसांना कब्जेपट्टी देण्याबाबत शासनाकडे विनंती करण्यात येणे, तसेच कब्जेपट्टी देण्याकरिता शासनाने २० टक्के विलंब शुल्क लावण्यात येणे, सदरील विलंब शुल्क माफ करण्याबाबत शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता, या कामास विलंब लागत असल्याने ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याकरिता नवीन शर्त (सातबारावरील) उठवून गावठाणाचा सिटी सर्व्हे तातडीने देण्याची नितांत गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मदत व पुनर्वसन मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

२) श्रीमती मंजुळा गावित, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधले.

" साक्री तालुक्यातील (जि.धुळे) म्हसदी, काळगांव, वसमार, घमनार, दातर्ती, ककाणी, भडगाव (वा.), शेवाळी (मा) या गावातील शेतकऱ्यांना सन २०१८ खरीप हंगामातील दुष्काळी परिस्थितीतील अनुदान अद्यापही वाटप करण्यात न येणे, दिनांक ३० जुलै, २०१९ व दिनांक २२ ऑक्टोबर, २०१९ रोजी सहाय्यक संचालक (लेखा), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांनी शासनाकडे अनुदान मागणी प्रस्ताव सादर केलेला असणे, परंतु अद्यापही साक्री तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सन २०१८ खरीप हंगामातील नुकसानीपोटी अनुदान वाटप करण्याकरिता निधी उपलब्ध नसणे, परिणामी उक्त गावातील शेतकऱ्यांनी धरणे आंदोलन करणे, धरणे आंदोलनाच्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन शेतकऱ्यांना शासनाकडून निधी प्राप्त होताच अनुदान वाटप करण्यात येईल असे विभागीय आयुक्तांनी जिल्हाधिकारी, धुळे यांना कळविल्यानंतर त्यांनी शेतकऱ्यांना अनुदान वाटपाचे आश्वासन देणे, परंतु शासनाकडून अद्याप अनुदानाची रक्कम जिल्हाधिकारी, धुळे व तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे यांच्याकडे प्राप्त न होणे, परिणामी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांमध्ये वाढत असलेली असुरक्षिततेची भावना व त्यामुळे निर्माण झालेला तीव्र असंतोष, शासनाने तातडीने खरीप सन २०१८ हंगामात साक्री तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीत बाधित शेतकऱ्यांना तात्काळ अनुदान वाटप होण्यासाठी आवश्यक तो निधी मंजूर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मदत व पुनर्वसन मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

३) सर्वश्री ज्ञानराज चौगुले, सुनील प्रभू, अबू आजमी, सुभाष धोटे, अमित झनक, बळवंत वानखडे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"शासनाच्या महावितरण कंपनीमध्ये कार्यरत असलेले सुमित कुमार, उप संचालक तथा मुख्य तपास अधिकारी, सुरक्षा व अंमलबजावणी यांच्याकडून महावितरणमधील मीटर रिडींग एजन्सी तसेच महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून बेकायदेशीर पैशाची माग होत असणे, विविध अधिकारी कर्मचाऱ्यांना धमकावणे, याबाबतची रेकॉर्डिंग क्लिप तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांना दाखविल्यानंतर त्याची शिक्षा म्हणून त्यांची केवळ बदली करण्यात येणे, परंतु आता परत त्यांनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी आर्थिक संगनमत करून मुख्य तपास अधिकारी पद बळकावणे, सुमित कुमार यांच्या विरोधात कल्याण परिमंडळाअंतर्गत नैतिक अधःपतनाच्या तक्रारी प्राप्त होणे, यासर्व प्रकरणी पारदर्शक चौकशी होण्यासाठी त्यांना निलंबित करून त्यांची भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यामार्फत चौकशी करण्याची आवश्यकता, तसेच यापूर्वी शासनाकडे दिनांक ९ नोव्हेंबर, २०२० रोजी तत्कालीन संचालक, दिनेशचंद्र साबू यांचे बाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर त्यांचीही भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यामार्फत चौकशी करण्यात न येणे, याप्रकरणी वरिष्ठ अधिका-यांचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने याप्रकरणी तातडीने चौकशी करून दोषी असलेल्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता."

ऊर्जा मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाज पत्रिकेतील अनुक्रमांक एकवर दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक ४, ५ व ६ पुढे ढकलण्यात येत आहेत, असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

७) ॲड. राहुल कुल, सर्वश्री जयकुमार गोरे, सिद्धार्थ शिरोळे, शिमराव तापकीर, श्रीमती माधुरी मिसाळ, श्री. महेश लांडगे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधले.

" पुणे शहर व परिसरातील वाहतूक कोंडीची समस्या दूर करण्यासाठी दहा किलोमीटर परिसरात रस्त्यांचे सुयोग्य जाळे (रोड नेटवर्क प्लॅन) तयार करण्याचा निर्णय शासनाच्या नगरविकास विभागाने सन २०१३ मध्ये मंजूर केला असणे, या रस्त्यांच्या जाळ्यानुसार या दोन्ही महापालिका हद्दींलगतच्या परिसरात सुयोग्य रस्त्यांचे जाळे निर्माण करून या महानगरातील वाहतूक सुरळीत होण्यासाठी एक चांगले पाऊल शासनाने उचललेले असणे, तसेच प्लॅननुसार कित्येक रस्त्यांची कामे शासनाने अद्याप सुरू केलेली नसणे, सुरू केलेली कामे अपूर्ण असल्याने मोठ्या प्रमाणावर

वाहतूक कोंडीची समस्या उद्‌भवत असणे, पुणे शहरात दररोज लाखो वाहने प्रवेश करत असल्याने, प्रवेश करण्याच्या सर्व ठिकाणी वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत असणे, तदनंतर सन २०१५ मध्ये स्थापन झालेल्या पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण तसेच महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ यांनी पुणे महानगरच्या ५० किलोमीटर परिसरात पुणे शहराच्या वर्तुळाकार दोन वेगवेगळे रिंग रोड प्रस्तावित करून अद्यापही या दोन्ही रिंग रोड बाबत वारंवार फक्त घोषणा झालेल्या असून कोणताही ठोस निर्णय झालेला नसणे, पुणे शहरातील स्वारगेट ते हडपसर, येरवडा ते उबाळे नगर या मार्गावर तयार करण्यात आलेली बीआरटीची योजना संपूर्णपणे फसलेली असल्याने या रस्त्यावर सातत्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असणे, पुण्याच्या खडकवासला येथील वारजे, सिंहगड रोड, भूमकर चौक, नवले पूल ते कात्रज या परिसरात सर्विस रस्त्यावर नागरिकांनी केलेल्या अतिक्रणामुळे वाहतूक कोंडीत भर पडत असणे, चुकीच्या ठिकाणी असलेले दुभाजक, नागरिकांनी स्वतःच्या स्वार्थासाठी तयार केलेले बेकायदेशीर दुभाजक यामुळे देखील सामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असणे, पुणे युनिव्हर्सिटी परिसरातील पूल तोडल्याने त्या ठिकाणी देखील वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत असणे, या रस्त्याचे नव्याने नियोजन करण्याची आवश्यकता असणे, रस्त्यासाठी घोषित केलेल्या उड्डाणपुलाच्या कामासाठी अद्याप कोणतीही तरतूद झालेली नसणे, पुणे व पिंपरी व लगतच्या परिसरात मेट्रो प्रकल्पांची कामे संथ गतीने चालू असून नव्याने मांजरी ते हिंजवडी, फुरसुंगी - स्वारगेट - खडकवासला, वनाज - रामवाडी - वाघोली - रांजणगाव गणपती, निगडी - भोसरी – चाकण, हडपसर – लोणीकाळभोर या प्रस्तावित मेट्रो मार्गांचे बृहत आराखडे तयार करून सदर मेट्रो मार्गांना तातडीने मान्यता मिळण्याची आवश्यकता, नेहमीच्या होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांच्या मनात मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झालेला असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नगरविकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

८) सर्वश्री प्रशांत ठाकूर, समीर कुणावार, महेश बालदी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधले.

" कर्नाळा नागरी सहकारी बँक पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) यांच्या दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेल्या तपासणीमध्ये बँकेने मंजूर केलेल्या कर्ज प्रकरणामध्ये गंभीर आक्षेप नोंदविल्याचे निदर्शनास आले असणे, दिनांक २२ एप्रिल, २०१९ रोजी कर्नाळा बँकेने केलेल्या कर्ज व्यवहाराचे विशेष लेखा परीक्षण करण्याबाबत सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांना रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने कळविलेले असणे,

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्या आदेशान्वये जिल्हा विशेष लेखा परीक्षक यांनी लेखा परीक्षण करून बँकेचे अध्यक्ष, संचालक व पदाधिकारी यांनी संगनमताने केलेली विनातारणी कर्ज प्रकरणे, गैरविनियोग व गैर व्यवहारामुळे सभासद, बँकेचे ठेवीदार व खातेदार यांच्या ठेवी धोक्यात आल्या असल्याचे निदर्शनास आले असणे, महाराष्ट्र अधिनियम १९६० तसेच भारतीय दंड संहितेनुसार गुन्हा दाखल करण्याची जिल्हा विशेष लेखा परीक्षक यांनी शिफारस केलेली असणे, उक्त बँकेचे अध्यक्ष व संचालक यांच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाणे, गु.र.क्र.७८/२०२० भादवी कलम ४०९, ४१७, ४२०, ४६३, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब), ३४ सह सहकारी संस्था अधिनियम कलम १४७ सह महाराष्ट्र ठेवीदारांचे हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल केला असणे, दाखल केलेल्या गुन्ह्यात ६७ बनावट प्रकरणांची व्याजासह रक्कम रू.५४३,६१,४९,३७२/- रूपये व नमूद गुन्हयातील ५०,६८९ ठेवीदारांची रू.५२९,७२,४०,८७९.९३ ठेवी असणे, उक्त बँकेचे ठेवीदार ५०,६८९ असून त्यांचे केवायसी कागदपत्र प्राप्त करण्याचे व त्यांची यादी बनविण्याचे काम सध्या बँक व्यवस्थापनाकडून सुरू असणे, फिर्यादीतील ७६ व निष्पन्न ०९ अशा एकूण ८५ आरोपींविरूद्ध पुरावा गोळा करण्याचे काम सुरू असणे, जवळपास ५ ते ६ महिन्यांचा कालावधी होऊनसुध्दा बँकेतील खातेदार व ठेवीदारांना बँकेत ठेवलेली रक्कम मिळाली नसणे, तसेच बँकेतील हजारो रुपयांच्या घोटाळयात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभागी असलेल्या संचालक व अधिकाऱ्यांवर अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई झाली नसणे, त्यामुळे खातेदार व ठेवीदारांमध्ये शासनाच्या विरोधात निर्माण झालेली चीड व असंतोषाच्या भावनेबाबत, बँकेतील खातेदार व ठेवीदारांना त्यांची बँकेत ठेवलेली रक्कम तातडीने देण्याबाबत व सदर गैरव्यवहारात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभागी असणाऱ्या संचालक व अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावयाची नितांत गरज त्यावर शासनाने त्वरित करावयाची आवश्यक ती कार्यवाही व उपाययोजना."

सहकार मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

९) श्री संजीवरेड्डी बोदकुरवार, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधले.

" यवतमाळ जिल्हा परिषद, बांधकाम विभाग क्र. १ यांच्या विविध तालुक्यातील ११० निविदा प्रक्रिया निश्चित होणे, त्यातील झरी व पांढरकवडा येथील ९ कामांची निविदा १५.०१ टक्के न्यूनतम दराने कंत्राटदार श्री. राजीव मल्लारेड्डी येल्टीवार यांना मिळणे, न्यूनतम देक्कार असणाऱ्या निविदाकऱ्यांनी निविदा उघडण्याच्या दिनांकापासून कामकाजाच्या आठ दिवसाच्या आत अतिरिक्त

सुरक्षा रक्कम बँक गॅरंटी, मुदतठेव पावती (एफडीआर) च्या स्वरुपात संबंधित विभागात जमा करावी लागणे, त्याकरिता कंत्राटदार जो स्वतः यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती बॅंकेचा संचालक आहे त्याने बँक व्यवस्थापकाला हाताशी धरुन संगनमत करून श्री. यल्टीवार यांनी हातानी लिहिलेल्या एकूण १८.१० लाख रुपयांच्या १६ बनावट मुदत ठेव पावत्या यवतमाळ जि.प. बांधकाम विभाग क्र. १ यांना अतिरिक्त सुरक्षा रक्कम म्हणून ठेवणे, दिनांक २ मार्च, २०२२ रोजी कार्यकारी अभियंता श्री. कुटे हे पाटण शाखेत पावत्या पडताळणीसाठी जाणे, बँक व्यवस्थापकानी कार्यकारी अभियंता यांना सदर पावत्या आमच्या बँकेच्या नाहीत असे लेखी पत्र देणे, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी त्यांच्या प्रमाणित प्रती मागविल्यानंतर सदर पावत्या बनावट असल्याची बाब उघडकीस येणे, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२२ रोजी बँकेत फक्त रुपये १०,०००/- संकल्प निधी ठेव असताना रुपये १३ लाख १० हजार संकल्प ठेवीबाबत बँकेच्या व्यवस्थापकांनी बनावट अहवाल दिल्याची बाब उघडकीस येणे, असे असताना देखील यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अन्य संचालक मंडळास काही माहिती नसल्याचे निदर्शनास येणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रधान सचिव, सहकार विभाग यांना दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी तक्रार करणे, बँकेच्या पाटण शाखेचे व्यवस्थापक व बँकेचे संचालक श्री. राजीव मल्लारेड्डी यल्टीवार यांनी संगनमताने आणि बनावट पावत्या सादर करून शासनाची फसवणूक केल्याची बाब उघडकीस येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सहकार मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

१०) श्री राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"संगमनेर तालुक्यात प्रवरा नदीपात्रालगत असलेल्या गावांना प्रदूषित पाण्याचा पुरवठा होत असणे, मागील काही दिवसांपासून या नदीपात्रात सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना, संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक संघ, संगमनेर नगरपरिषद तसेच हॉटेल, हॉस्पिटल व इतर औद्योगिक कंपन्या यांचे रसायनयुक्त प्रदूषित पाणी बेकायदेशीरपणे थेट नदीपात्रात सोडण्यात येत असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांच्या असणे, याबाबत ग्रामस्थांनी वेळोवेळी महाराष्ट्र प्रदूषण मंडळ तसेच जिल्हा प्रशासनाला निवेदन देणे, नदीपात्रालगत असलेल्या सर्वच गावांच्या ग्रामपंचायतीनी या विरोधात ठराव करणे, सेवाभावी संघटना संस्थांनी या विरोधात आवाज उठविणे, या प्रदूषित पाण्यामुळे ग्रामस्थांसह पशुधन, शेतजमीन यांचे आरोग्य धोक्यात येणे, मागणी करूनही एसटीपी प्लॅनटची उभारणी अनेक वर्षे न करणे या सर्व बाबींमुळे गावांमध्ये निर्माण होत असलेला

असंतोष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

पर्यावरण व वातावरणीय बदल राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**२.** पुरःस्थापनार्थ –

१ ) संसदीय कार्य मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १३ – महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरणे (राजभाषा) विधेयक, २०२२ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

२ ) शालेय शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १४ – महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२२ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

३ ) उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १५ – महाराष्ट्र सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ विधेयक, २०२२ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

**३.** गृह मंत्र्यांनी म.वि.स नियम ५७ अन्वये पुढील प्रस्ताव मांडला.

“ म.वि.स. नियम १३० अन्वये सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५२ - महाराष्ट्र अनन्य विशेष न्यायालये (शक्ती कायद्याखालील महिलांच्या व बालकांच्या विरुद्धच्या विवक्षित अपराधांसाठी) विधेयक, २०२० विचारात घेण्यापूर्वी म.वि.स. नियम ११२ मधील परंतुकातील तरतूद म.वि.स. नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी.”

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**४.** (अ) संयुक्त समितीने सादर केल्याप्रमाणे - विचार, खंडशः विचार व संमत करणे -

गृह मंत्र्यांनी, म.वि.स. नियम १३० अन्वये सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५२ - महाराष्ट्र अनन्य विशेष न्यायालये (शक्ती कायद्याखालील महिलांच्या व बालकांच्या विरुद्धच्या विवक्षित अपराधांसाठी) विधेयक, २०२० विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
खंड २ ते १४ (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.
खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.
खंडशः विचारानंतर सन २०२० चे वि.स.वि. क्रमांक ५२ संमत झाले.

(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे –

(१) उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १५ – महाराष्ट्र सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ विधेयक, २०२२ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंड २ ते ८८ (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

खंडशः विचारानंतर सन २०२० चे वि.स.वि. क्रमांक १५ संमत झाले.

(२) मराठी भाषा मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १३ – महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरणे (राजभाषा) विधेयक, २०२२ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

१) ॲड. आशीष शेलार    २) श्री. योगेश सागर

मराठी भाषा मंत्र्यांनी चर्चेला उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंड २ ते १२ (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

खंडशः विचारानंतर सन २०२० चे वि.स.वि. क्रमांक १३ संमत झाले.

(३) शालेय शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १४ – महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२२ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावरील चर्चेत ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी भाग घेतला. (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ५५ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. संजय शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली पुन्हा सुरू झाली.

**५.** (अ) एक अल्पसूचना प्रश्न उत्तरित झाला.

(ब) तारांकित प्रश्न क्रमांक ३९३५४, ३८५१४, ४२८२५, ४३१२८ व ३८९७० यांची उत्तरे देण्यात आली.

(क) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील अनुक्रमांक (६) ते (४०) वरील प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

(ड) उपसचिवांनी, तारांकित प्रश्नोत्तरांची गुरुवार दिनांक १७ मार्च, २०२२ रोजीची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवली.

१) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, “चंद्रपूर येथील युवतीच्या संशयित मृत्यू प्रकरणाची चौकशी करणे,” या विषयावर जी स्थगन प्रस्तावाची सूचना दिली होती, त्या सूचनेला अनुलक्षून माननीय अध्यक्षांनी दिलेल्या सूचनेनुसार गृह (ग्रामीण) राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

श्री. संजय कुटे, वि.स.स. यांनी,“मागील आठवड्यामध्ये सत्तारुढ पक्षाने म.वि.स.नियम २९३ अन्वये प्रस्ताव मांडला असणे, उक्त प्रस्तावावर केवळ दोन सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडली असणे, सदरहू प्रस्ताव दोन दिवस कामकाज पत्रिकेमध्ये दाखविण्यात येणे, मात्र त्यावर चर्चा होऊन मंत्री महोदयांचे उत्तर न मिळणे,” इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

ही बाब तपासून घेतली जाईल, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**६.** (१) संसदीय कार्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकारण, मुंबई यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक लेखा आणि स्वतंत्र लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवले.

**७.** समिती प्रमुख, यांनी महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर केला.

**८.** आज गुरुवार दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी प्राप्त झालेल्या स्थगन प्रस्तावाच्या सर्व सूचनांना दालनात अनुमती नाकारली असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

श्री. राजेश पवार, वि.स.स. यांनी, ‘‘श्रीमती रुपाली पांचाळ या विवाहित महिलेचा झालेला संशयास्पद मृत्यू, कंधार येथील रुग्णालयाने तिच्या मृतदेहाचे पोस्टमार्टेम करण्यास केलेली टाळाटाळ तसेच पोलिसांनीही तक्रार न घेणे, या प्रकरणी तातडीने मृतदेहाचे पोस्टमॉर्टेम करण्याची सूचना देण्याची तसेच तक्रार न घेणाऱ्या पोलिसांवर कारवाई करण्याची मागणी,’’ इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

शासनाने दखल घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

श्री. महेश लांडगे, वि.स.स. यांनी, ‘‘मागील अनेक दिवसांपासून पिंपरी-चिंचवड शहरात खंडित होत असलेला वीज पुरवठा,’’ इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

शासनाने दखल घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

श्री. सुनील कांबळे, वि.स.स. यांनी,"पुणे जिल्ह्यातील लोणी काळभोर येथे मागील आठवड्यामध्ये टँकचे काम करत असताना ४ कर्मचाऱ्यांचा टँकमध्ये गुदमरून झालेला मृत्यू,’’ इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते यांनीही उक्त मुद्याच्या पुष्ट्यर्थ आपले मत मांडले.

शासनाने दखल घेऊन निवेदन करावे, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

श्री. हरिभाऊ बागडे, वि.स.स. यांनी, ‘‘प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा लाभ नवीन शेतकऱ्यांना न मिळणे, याबाबत कृषि आणि महसूल विभागाकडून होत असलेली टाळाटाळ,’’ इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

सदरहू प्रकरणी उच्च स्तरावर बैठक घेण्यात येईल व शेतकरी या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही, याची काळजी घेतली जाईल, असे महसूल मंत्र्यांनी सांगितले.

श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांनी, ‘‘दहिसर चेकनाका व एनएल चेकनाका या भागात मॅन्ग्रोव्हजना मोठ्या प्रमाणात लावण्यात येत असलेली आग, यामुळे वृद्धांना होत असलेला त्रास, या आगी थांबविण्यासाठीच्या उपाययोजना करण्याची आवश्यकता,’’ इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

१ ) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स. यांनी, ‘‘राज्यात चणा खरेदीची सुरू असलेली प्रक्रिया, मात्र संपूर्ण अकोला जिल्ह्यामध्ये खरेदी बंद असणे, प्रत्येक पोत्यामागे सहा रुपये अशी माथाडी

हमालांची असलेली मागणी,'' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने नोंद घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

२) श्री. कुणाल पाटील, वि.स.स. यांनी, ''राज्यात केंद्र सरकार पुरस्कृत प्रत्येक शाळेमध्ये संगणक लॅब सुरू होणे, त्यासाठी जवळपास ७ हजार ५०० शिक्षकांची झालेला नियुक्ती, मात्र केंद्र सरकारकडून हे अनुदान बंद झाल्याने सर्व शिक्षक बेरोजगार होणे, शिक्षकांची उपासमार टाळण्यासाठी त्यांना राज्य सरकारमध्ये सामावून घेणे,'' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने नोंद घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

३) श्री. किशोर पाटील, वि.स.स. यांनी, ''१४ व्या वित्त आयोगामध्ये ग्रामपंचायतच्या पाणीपुरवठा योजनेचे वीज देयक भरण्याची असलेली तरतूद, परंतु १५ व्या वित्त आयोगामध्ये अशा प्रकारची तरतूद नसणे, त्यामुळे पाणीपुरवठा योजनेचे वीज देयके कसे भरावे असा ग्रामपंचायतींसमोर उपस्थित झालेला प्रश्न,'' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने नोंद घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

४) श्री. गणेश नाईक, वि.स.स. यांनी, ''एमआयडीसी भागातील एमआयडीसीच्या जागेवर लोकांनी बांधलेली घरे तोडण्याचा उच्च न्यायालयाचा आदेश, राज्य शासनाने २०१५ पर्यंतची कुठलीही राहती घरे न तोडण्याचा दिलेला निर्णय, त्याअनुषंगाने ही घरे तोडू नये यासाठी करावयाची कार्यवाही,'' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने नोंद घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

५) श्री. रवींद्र चव्हाण, वि.स.स. यांनी,''कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील २७ गावांमधील रस्त्यावरील दिव्यांची वीज जोडणी तोडली जाणे, वीज देयकाचे पैसे तातडीने भरण्यासाठी महापालिकेच्या प्रशासकाला निर्देश देण्याची आवश्यकता,'' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने नोंद घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

६) श्री. सुनील टिंगरे, वि.स.स. यांनी, '' पुण्यात नुकतीच आणि राज्यात अल्पवयीन मुलीवर झालेला अत्याचार, त्यासाठीच्या उपाययोजना करण्याची आवश्यकता,'' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

या संदर्भात शिक्षण विभागाच्या माध्यमातून येणाऱ्या काळामध्ये शाळांबाबत एक धोरण आणले जाईल. शाळेमध्ये मुलींसाठी सुरक्षित आणि आरोग्यदायक वातावरण राहील या दृष्टिकोनातून प्रयत्न केले जाईल, असे महिला व बाल विकास मंत्र्यांनी सांगितले.

७) श्री. संजय केळकर, वि.स.स. यांनी, " ठाणे महानगरपालिकेने सफाई कामगारांना मागील तीन महिन्यांचे वेतन न देणे, याबाबत निर्देश देण्याची आवश्यकता," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने नोंद घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

८) श्री. विजय देशमुख, वि.स.स. यांनी, "सोलापूर जिल्हा व शहरामध्ये गेल्या आठ-दहा दिवसांमध्ये कोरोनाचा एकही रुग्ण आढळून न येणे, परिणामी कोरोनाच्या अटी व नियम शिथिल करण्याची आवश्यकता," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने नोंद घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

९) श्री. संभाजी पाटील-निलंगेकर, वि.स.स. यांनी, "लातूर जिल्ह्यातील दोन वर्तमानपत्रांच्या कार्यालयांना महानगरपालिकेने कुलूप लावणे, पत्रकारांना संरक्षण देणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने नोंद घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

१०) श्री. कृष्णा खोपडे, वि.स.स. यांनी, "नागपूर शहरातील मौजा वाठोडा येथे रस्त्याच्या कामासाठी खोदकाम करूनही प्रत्यक्ष कामाला अद्याप सुरूवात न होणे तसेच नागपूर जिल्हाधिकारी यांनी दलित योजनेच्या अंतर्गत विकास निधीच्या दिनांक २२ मार्च, २०२२ रोजीच्या आदेशामध्ये असलेली तफावत, दोन्ही प्रकरणी कारवाई करण्याची आवश्यकता," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने नोंद घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

११) श्री. तानाजी मुटकुळे, वि.स.स. यांनी, "हिंगोली शहरात गटार बांधणीचे काम मोठ्या प्रमाणावर सुरू असणे, मात्र त्या रस्त्यांवर अतिक्रमण झालेले असणे, याबाबत कारवाई करण्याची आवश्यकता," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने नोंद घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

१२) श्री. रवींद्र वायकर, वि.स.स. यांनी, "आरे वसाहतीमधील बिगरआदिवासी लोक झोपडपट्टीत वास्तव्याला असून त्यांची नोंद आरे कार्यालयात नसणे, त्यामुळे ही कुटुंबे मूलभूत सोयी-सुविधांपासून वंचित असणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने दखल घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

१३) श्री. भास्कर जाधव, वि.स.स. यांनी,"कोकणातील आरपीपीएल नावाचा ऊर्जा निर्मिती करणारा प्रकल्प असणे, वीज खरेदीसाठीचा करार ३१ मार्च, २०२२ रोजी संपणार असूनही केंद्र व राज्य सरकारने त्याबाबत करार न केल्यामुळे प्रकल्प बंद पडण्याची आलेली वेळ," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने दखल घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

१४) श्री. रईस शेख, वि.स.स. यांनी,"मौजे टिटवाळा, कल्याण येथील २०० वर्षे जुन्या पीर हाजी काशी पीर बाबा यांच्या दरगाहचे २३ फेब्रुवारी रोजी झालेले नुकसान, याबाबत कारवाई करण्याची आवश्यकता," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

१५) श्री. राजेश पाटील, वि.स.स. यांनी,"मुंबई-अहमदाबाद महामार्ग ते बोईसर रस्त्याचे काम गेली ८ वर्षे रखडलेले असणे, त्यामुळे त्यावर अनेक अपघात होऊन अनेकांना आपला जीव गमवावा लागणे, हे काम तात्काळ पूर्ण करण्याचे निर्देश देण्याची आवश्यकता तसेच या भागात मोठ्या प्रमाणावर नागरीकरण होत असल्यामुळे एमआयडीसीने त्यासाठी भूखंड आरक्षित करण्याची आवश्यकता," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने दखल घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

१६) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स. यांनी,"पनवेल महानगरपालिकेची स्थापना झाली तेव्हा आयुक्तांनी जीएसटीचे अनुदान मिळावे यासाठी चुकीची कागदपत्रे सादर करणे, आता या अनुदानातही कपात झाल्यामुळे महापालिकेला मिळत असलेले अनुदान कमी होणे, याबाबत शासनाने तातडीने लक्ष देण्याची आवश्यकता" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

१७) ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स. यांनी,"राज्यात इमारत व बांधकाम खात्याकडे प्रचंड निधी असूनही विविध क्षेत्रातील मजुरांना त्याचा लाभ न मिळणे, याबाबत शासनाने मार्गदर्शक सूचना तयार करण्याची आवश्यकता," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने दखल घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

१८) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स. यांनी,"यवतमाळ जिल्ह्यातील खरडा प्रकल्पाचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी नाशिक येथे पाठविला असणे, तो मंजूर करण्याबाबत शासनाला सूचना करण्याची आवश्यकता," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने दखल घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**९.** १) श्री. नीलेश लंके, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

''अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील जिल्हास्तरीय बिगर आदिवासी योजनेअंतर्गत वन विभागामार्फत वनक्षेत्रात मृद् व जल संधारणाच्या कामातून गॅबियन बंधारे व मातीनाल बंधाऱ्यांच्या कामासाठी जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी १ कोटी २२ लाख ४२ हजार रुपये सुपे, वाळवणे, रुईछत्रपती, पळवे बुद्रुक या गावांतील कामासाठी मंजूर करून जिल्हा उपवन संरक्षक यांचेकडे वर्ग करणे, या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून या कामाची चौकशी करण्याची मागणी संबंधित लोकप्रतिनिधींनी व तेथील नागरिकांनी नुकतीच केलेली असणे, या सर्व कामाची चौकशी करून संबंधितांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

मृद् व जलसंधारण राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

२) श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले.

''श्रीरामपूर तालुक्यातील आकारी पडीत जमीन मुंबई सरकार अधिसूचना गॅझेट क्रमांक ७८८४ दिनांक १ ऑगस्ट, १९१८ अन्वये जमिनींची सुधारणा करणे, लोकांच्या सार्वजनिक हितासाठी विकसित करून, पुन्हा फेरवितरण करण्यासाठी भूसंपादन अधिनियम १८९४ च्या कलम ६ अन्वये अधिसूचित करण्यात येणे, दिनांक २३ जुलै १९२० च्या करारनाम्यानुसार सदर बेलापूर सिंडीकेट कंपनी लिक्वीडेशन मध्ये गेल्यामुळे सदर कंपनीकडील जमिनी या दि.बेलापूर कंपनी हरेगांव या नवीन कंपनीकडे तत्कालीन जिल्हाधिकारी अहमदनगर यांच्यामार्फत वर्ग होणे, सदर जमिनींचे अधिकार अभिलेख हक्क नोंदणी रजिस्ट्रारला मालकाचे नाव कमी होवून सदर जमिनीस आकारी पडीत जमीन म्हणून नाव दाखल होणे, महाराष्ट्र शेतजमीन १९६१ च्या तरतुदीनुसार राज्यातील ११ खासगी साखर कारखान्यांच्या ताब्यातील अतिरिक्त घोषित झालेल्या जमिनी या देखील ताब्यात घेण्यात येऊन सरकार जमा करण्यात आल्यापैकी बेलापूर शुगर अलाईड कंपनीकडील अधिक

जमीन म्हणून सदर जमिनीचा ताबा महाराष्ट्र सरकारने १९६५ साली कंपनीचे नाव कमी करून, सरकारचे नाव दाखल करून, जमीन सरकारने ताब्यात घेणे, सदरच्या जमिनी दिनांक २ ऑगस्ट, १९६५ रोजी महाराष्ट्र स्टेट फार्मींग कॉर्पोरेशनकडे फक्त उस उत्पादन करून, बेलापूर शुगर इंडस्ट्रीला कच्चा माल पुरविण्यासाठी ३ वर्षांसाठी देणे, ३ वर्षांचा कालावधी संपल्यानंतर कोणत्याही प्रकारची वाढीव मुदत महामंडळास न देण्यात येणे, वरील जमिनी या महाराष्ट्र सरकारकडून व्यवस्थापन करण्यासाठी सरकारने महाराष्ट्र स्टेट फार्मिंग या नावाने महामंडळ दिनांक १३ ऑगस्ट, १९७० रोजी कलम २८-१AA अधिकाराचा वापर करून, राज्य सरकारने सीलींग आदेश व १९७० अन्वये औद्योगिक अस्थापनांकडून घेतलेल्या जमिनी महामंडळाकडे सुपूर्द करताना नियमावली ठरविणे, सदर जमिनी कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करण्यास, ताब्यात देण्यास व कोणत्याही त्रयस्थ इसमास शासनाच्या परवानगी शिवाय देण्यास मज्जाव करण्यात येणे, सदरच्या जमिनी शेती महामंडळाकडे वर्ग असून, महाराष्ट्र स्टेट फार्मींग हरेगाव अशी नोंद कब्जेदार सदरी असून, पीकपाहणी सदरी देखील महामंडळाचे नाव दाखल असणे, महाराष्ट्र शासनाने जमीन धारणा कायद्यामध्ये दुरुस्ती करून शेती महामंडळाकडे असलेल्या जमिनी परत करण्याचा निर्णय पूर्वी घेतला असणे, त्या अनुषंगाने श्रीरामपूर तालुक्यातील बऱ्याच जमिनी मूळ मालकांना परत करण्यात येणे, परंतु आकारी पडीत जमिनी ६० ते ७० वर्षे होऊनही मूळ मालकांना परत करण्यात आलेल्या नसणे, त्यामुळे ९ गावातील शेतकरी मूळ मालक भूमिहीन किंवा अल्पभूधारक होणे, शेती महामंडळाकडे आकारी पडीत जमिन ७ हजार एकरपेक्षा जास्त असून, पूर्वी महामंडळाकडे देण्याचा उद्देश आता साध्य होत नसल्याने जमिनी महामंडळाने ताब्यात ठेवण्याचा आधिकार गमावला असणे, असे असताना अचानकपणे सदरच्या जमिनी टेंडर काढून वाटप करण्याचा घाट महामंडळाने घालणे, सदर जमिनी या इतर व्यक्तींना, संस्थांना, कंपन्यांना कसण्यासाठी देण्याच्या उद्देशाने ही प्रक्रिया चालू करणे, सामुदायिक शेतीच्या गोंडस नावाखाली धनदांडग्या व्यक्तींना वाटप करण्याची प्रक्रिया सुरू असणे, या संदर्भात न्यायालयीन प्रक्रियाही सुरू असून, शासनाच्या वतीने दिनांक १ डिसेंबर, २०२१ रोजी शपथपत्र दाखल करण्यात येणे, सदर शपथपत्र हे याच विषयासाठी यापूर्वी दाखल झालेल्या याचिका क्र.२९१७/२०१५ मध्ये अप्पर सचिव श्री.प्रकाश बोरवे यांनी दाखल केलेल्या शपथपत्राच्या पूर्णपणे विरोधात असणे, शासनाची ही भूमिका दुटप्पी असून, शेतकऱ्यांना न्यायापासून वंचित ठेवणारी असणे, राज्यात अशा स्वरुपात शासनाने धारण केलेल्या, जमिनी या शेतकऱ्यांना परत देण्यात आलेल्या असताना श्रीरामपूर तालुक्यातील आकारी पडीत जमिनींबाबत शासनाची भूमिका विरोधी असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

३ ) श्रीमती सरोज आहिरे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले.

''देवस्थान इनाम जमिनीबाबतचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित असून या इनामामध्ये जमिनी रेव्हेन्युग्रँट किंवा ग्रँट ऑफ रेव्हेन्यू व सॉईल ग्रँट या दोन प्रकारात मोडतात त्यानुसार ज्या जमिनीचा शेतसारा देवस्थानास पूर्वापार देणेत येतात, त्यास रेव्हेन्यू ग्रान्ट किंवा ग्रान्ट ऑफ रेव्हेन्यू तसेच ज्या जमिनी देवस्थानास देखभालीसाठी मालकी हक्काने पूर्वापार दिलेली आहे त्यास सॉईल ग्रान्ट असे संबोधले जाणे, ज्या गावाचा संपूर्ण महसूल देवस्थानास देणेत येतो म्हणजे संपूर्ण गावाचा महसूल हा देवस्थानाचा इनाम म्हणजे रेव्हेन्यू ग्रान्ट असेल तर अशा गावास दुमालागाव ( Alien-ated Village ) म्हणतात आणि अशा दुमाला गावाच्या नोंदी एलियनेशन रजिस्टरमध्ये घेणेत आलेल्या आहेत व त्यामध्ये देवस्थानास किती महसूल देणेत येतो त्याची नोंद देखील घेणेत आलेली असल्यामुळे या दुमाला गावातील जमिनी देवस्थानाच्या मालकीच्या नसून त्या त्रयस्थ व्यक्तीच्या / शेतकऱ्यांच्या मालकीच्या आहेत हे स्पष्ट होते, परंतु असे असताना सन १९७२ मध्ये महाराष्ट्र शासनाने परिपत्रक निर्गमित करून त्यामध्ये इनामदार हे सुपिरीअर होल्डर Superior Holder असतील त्यांच्या नोंदी ७/१२ वर कब्जेदार सदरी रेषेवर घेण्याचे निर्देश दिले, परंतु दुमाला गावातील जमिनीमध्ये देवस्थानाचा मालकी हक्क नसताना देवस्थान देखील दुमाला गावातील जमिनीचे Superior Holder नसतानाही त्यांना Superior Holder समजून नाशिक जिल्ह्यातील विहितगाव, मनोली, बेलतगव्हाण, तिरडशेत वगैरे ह्या गावातील जमिनीचे ७/१२ वर कब्जेदार सदरहू रेषेवर घेण्याबाबत श्री व्यंकटेश बालाजी देवस्थानचे नाव स्वतंत्र फेरफार घेऊन नमूद करण्यात आले, तथापि, सदर फेरफारच्या कोणत्याही नोटीसा जमिनी मालक/शेतकरी यांना देणेत आलेल्या नव्हत्या, त्यामुळे त्या जमीन मालकाचे जमिनीचे खरेदी-विक्री हस्तांतरण यावर कोणतेही बंधन नसणे, त्या जमिनीचे मालकांना बँकेत कर्ज मिळत असणे, जमिनी बिगरशेती परवानगी पण देणेत येत असत. परंतु मधले काही काळात तत्कालीन मा.जिल्हाधिकारी नाशिक यांनी विहितगाव, मनोली, बेलतगव्हाण, तिरडशेत गावातील जमिनी देवस्थानच्या संमतीशिवाय विकता वा विकसित करता येणार नाही, अशी चुकीची धारणा केल्यामुळे तेव्हापासून या गावातील जमिनीचे खरेदी विक्री व्यवहार करणेस,जमिनीची बिगरशेती परवानगी देणेस देवस्थानाचे ना हरकत प्रमाणपत्राची मागणी महसूल विभागाकडून केली जाऊ लागली व असे ना हरकत प्रमाणपत्र देणेस देवस्थानाकडून त्याबद्दल पावती देताना "श्री" चरणी अर्पण अशी पावती देणेत येते. १ ) विहितगाव, २ ) बेलतगव्हाण, ३ ) मनोली, ४ ) तिरडशेत ही गावे दुमाला गावे असतांना व या गावातील जमिनीचा महसूल फक्त देवस्थानास मिळणेचा हक्क असताना व या गावातील जमिनी त्रयस्थ व्यक्तींच्या/शेतकऱ्यांच्या मालकीच्या असताना शासनाने अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे या

गावातील जमिनीचे ७/१२ वर कब्जेदार सदरी देवस्थानाचे नाव नमूद करण्यात येणे, शेतकऱ्यांची अडवणूक करून जमिनीवर कर्ज काढण्यास, जमिनीचे खरेदी विक्री व्यवहार नाहरकत दाखला देणेस शेतकऱ्यांकडून अनाधिकाराने पैसे घेतले जाणे, त्यामधून देवस्थानाकडून आतापर्यंत अशा बेकायदेशीरपणे शेतकऱ्यांकडून लाखो रुपये घेतले जाणे त्यामधून ७/१२ चे संगणक प्रणालीमध्ये शेतकऱ्याबरोबर सहमालक म्हणून देवस्थानचे पण नाव नमूद करण्यात येणे, हा सर्व महसूल अभिलेखामधील गैरप्रकार हा महसूल अधिकाऱ्याचे चुकीमुळे झालेला असणे, परंतु सदर अभिलेखामध्ये झालेल्या चुका दुरुस्त करून देवस्थानचे अनाधिकाराने ७/१२ वर लागलेले नाव कमी करणेकामी जमीन मालकांनी वारंवार अर्ज विनंत्या करूनही त्यांचे विनंतीकडे दुर्लक्ष केले जाणे, नुकतेच मुंबई उच्च न्यायालयाने रॉबर्ट डायस विरुध्द महाराष्ट्र सरकार या रिट पिटीशनमध्ये निर्णय दिलेला असून त्या निर्णयामध्ये देवस्थानाचे सॉइल ग्रान्ट व रेव्हेन्यू ग्रान्ट चा ऊहापोह करणे, त्यामुळे शासनाने त्वरित दुमाला गावातील जमिनीचे ७/१२ वरील देवस्थानाचे नाव कमी करणेच्या सूचना देऊन १) विहितगाव, २) बेलतगव्हाण, ३) मनोली, ४) तिरडशेत या गावातील शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया.''

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

४) सर्वश्री. जयकुमार गोरे, अभिमन्यू पवार, ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. जयकुमार गोरे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले

‘’दहिवडी (ता. माण) येथे उपविभागीय अधिकारी माण-खटाव यांनी अवैध गौण खनिज व वाहतूक रोखण्यासाठी तलाठी व मंडल अधिकारी यांच्या गस्त पथकांची नेमणूक केली असणे, वाकी (ता. माण) येथे दिनांक २२ फेब्रुवारी, २०२२ रोजी रात्रीच्या सुमारास माणगंगा नदी पात्र येथे १ ट्रॅक्टर वाळू चोरी करताना पकडला असून त्यांना कोणत्याही शासकीय प्रक्रिया न करता सोडण्यात आले असणे, त्याचे ऑडिओ व व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित झाले असणे, त्यानंतर संबंधित तहसीलदार यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात येणे, त्या अगोदर तहसीलदार यांचेवर लाचलुचपत प्रतिबंध खात्याची कार्यवाही झाली असणे, शासनाकडून तहसीलदार, मंडल अधिकारी व ट्रॅक्टर मालकावर कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, यामध्ये फक्त ४ तलाठ्यांचे निलंबन झाले असणे, तसेच कडेगाव, जि. सांगली येथे येरळा नदीतील वाडीयेराबाग येथे देखील असा प्रकार घडल्याचे निदर्शनास आले असणे, येथील एका पत्रकाराने वाळू तस्करीची माहिती अधिकाऱ्यांना दिली म्हणून त्याच्यावर वाळू तस्करांनी हल्ला केल्याची धक्कादायक बाब

दिनांक २० फेब्रुवारी, २०२२ रोजी घडलेली असणे, संबंधित पत्रकाराने तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांचेकडे तक्रार करण्याचा प्रयत्न केला असणे, परंतु संबंधित अधिकाऱ्यांकडून त्यांना कोणताही प्रतिसाद मिळाला नसणे, यामुळे स्थानिक ग्रामस्थांमध्ये मोठ्या प्रमाणवर भीतीचे वातावरण व नाराजीची भावना पासरलेली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

५) श्री. रवींद्र वायकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधले.

''जोगेश्वरी (पूर्व) रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या महानगरपालिकेच्या नवलकर मंडईचे संरचनात्मक सल्लागार व बृहन्मुंबई महानगरपालिकेचे तांत्रिक सल्लागार समितीने दिलेल्या अहवालानुसार सदरहू मंडई ही धोकादायक घोषित करून मंडई रिक्त करून तोडण्याचे अभिप्राय दिले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, सदरहू मंडईच्या पुनर्विकासाच्या दृष्टीकोनातून स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेसमवेत घेतलेल्या संयुक्त बैठकीत सदरहू पुनर्विकासाच्या कामाच्या अनुषंगाने सूचना करून सदरहू पुनर्विकासाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबतच्या सूचना दिलेल्या असणे, तसेच सदरहू मंडईतील अनुज्ञापनधारकांना मंडईमध्येच तात्पुरते संक्रमण शिबिर बांधून देण्याच्या अनुषंगाने महापालिका वास्तुविशारद यांच्याकडे आराखडे बनविण्याचे काम माहे डिसेंबर, २०२० रोजीपासून सुरू असून सदरहू काम अद्यापपर्यंत पूर्ण झालेले नसणे, परिणामी सदरहू मंडईच्या पुनर्विकासाचे काम नाहक प्रलंबित राहिलेले असल्याची बाब निदर्शनास येणे, अद्याप सदरहू आराखडे तयार झालेले नसल्यास या प्रकरणी आराखडे तयार करण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे जाणून सदरहू विलंबास जबाबदार असलेल्यांवर जबाबदारी निश्चित करून त्यांचेवर कारवाई करून तसेच सदरहू आराखडे तातडीने तयार करून मंडईतील अनुज्ञापनधारकांना मंडईमध्येच तात्पुरते संक्रमण शिबिर बांधून देण्याबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही केलेली नसून या प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांना हेतू:पुरस्सरपणे पाठीशी घालण्यात येत असल्याची बाब निदर्शनास येणे, तसेच किरकोळ मंडईकरिता आरक्षित असलेल्या या ठिकाणचे नगर भूमापन क्रमांक २५५, २५६, २५७, २५८ व २५९ पैकी नगर भूमापन क्रमांक २५६, २५७ व २५८ हे भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नावावर झाल्यानंतर मंडईच्या मुख्य इमारतीचे आराखडे मंजुरीकरिता सादर करण्यात येणार असल्याने सदरहू भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नावावर करण्याबाबतही शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसणे, सदरहू मंडईच्या पुनर्विकासाच्या

कामास होत असलेल्या विलंबामुळे येथील स्थानिक नागरिक व मंडईतील गाळेधारक यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून त्यांचेमध्ये तीव्र नाराजी पसरलेली असणे, सदरहू मंडईचा पुनर्विकास तातडीने करण्याबाबत स्थानिक नागरिक तसेच मंडईतील गाळेधारक यांच्या मागणीच्या अनुषंगाने या प्रकरणी तातडीने कार्यवाही करण्याबाबत शासनाने या प्रकरणी करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

नगरविकास मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

६) श्री. प्रमोद पाटील, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधले.

''ठाणे जिल्ह्यातील १४ गावे आणि परिसर गेल्या अनेक वर्षांपासून विकासापासून वंचित असणे, जिल्ह्यामध्ये पाणी, शिक्षण, आरोग्य, रुग्णालय, रस्ते अशा मूलभूत सुविधांची ही असलेली वानवा, भौगोलिक परिस्थितीने ही सर्व गावे नवी मुंबई महानगरपालिकेला जोडलेली असल्यामुळे या गावातील नागरिकांचा नवी मुंबई महानगरपालिकेत समाविष्ट होण्यासाठी असलेला कल, त्यासाठी गेली अनेक वर्ष शासन स्तरावर सुरू असलेले प्रयत्न, त्यासाठी वारंवार ग्रामपंचायत निवडणुकांवर घातला गेलेला बहिष्कार, सर्व ग्रामपंचायतींनी रीतसर ठराव करून शासनाकडे पाठविला असणे, नवी मुंबई मनपा ही याबाबत सकारात्मक असल्याने महासभेत १४ गावे समाविष्ट करण्यासाठी केलेला प्रशासकीय ठराव, दिनांक २३ जुलै, २०१९ रोजी तत्कालीन राज्यमंत्री (नगर विकास) यांच्यासमवेत दिनांक १५ ऑगस्ट, २०१९ रोजी झालेल्या बैठकीत ही सर्व गावे नवी मुंबई मनपा मध्ये समाविष्ट केल्याची घोषणा करण्यात येईल असे दिलेले आश्वासन, भौगोलिक परिस्थिती, सर्व गावांचे एकमत नवी मुंबई मनपा सकारात्मक असताना शासनाकडून निर्णय घेण्यास होत असलेली दिरंगाई व वारंवार आश्वासन देऊनही होत असलेली फसवणूक यामुळे ग्रामस्थांचा शासनावरील उडत चाललेला विश्वास व निर्माण झालेली चीड पाहता शासनाने याबाबत तातडीने निर्णय घेऊन या गावांच्या भवितव्यासाठी व विकासासाठी तातडीने नवी मुंबई महानगरपालिकेत समाविष्ट करण्यासाठी घ्यावयाचे निर्णय, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

नगरविकास मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

१) श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स. यांनी, "महावीज वितरण कंपनीचा गलथान कारभार, वीज जोडणी नसलेल्यांना आलेली वीज देयके, याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊनही कोणतीही कारवाई न होणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उक्त प्रकरणी शासनाने योग्य ती कार्यवाही करावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

२) श्री. संदीप क्षीरसागर, वि.स.स. यांनी, "बीड जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली टंचाई, १५ ते २० दिवसांतून एकदा पाणी येणे, ११४ कोटी रुपयांची योजना मंजूर होणे, मात्र वीज देयक न भरल्यामुळे योजना अद्याप सुरू न होणे, याबाबत तातडीने कारवाई होण्याची आवश्यकता," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने नोंद घेतली असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**१०.** सर्वश्री सुनिल प्रभू, अमिन पटेल, अनिल पाटील, रविंद्र वायकर, नाना पटोले, यशवंत माने, अजय चौधरी, पृथ्वीराज चव्हाण, प्रकाश सोळंके, सदा सरवणकर, सुरेश वरपुडकर, ॲड अशोक पवार, सर्वश्री मंगेश कुडाळकर, झीशान सिद्दीकी, रोहित पवार, सुनील राऊत, संग्राम थोपटे, दीपक चव्हाण, प्रकाश सुर्वे, कैलास गोरंट्याल, दौलत दरोडा, रमेश लटके, अमित झनक, ॲड माणिकराव कोकाटे, सर्वश्री संजय पोतनीस, कुणाल पाटील, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री प्रकाश फातर्पेकर, शिरीष चौधरी, शेखर निकम, प्रताप सरनाईक, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री बाबासाहेब पाटील, भास्कर जाधव, सुभाष धोटे, बाळासाहेब आजबे, रमेश कोरगावकर, माधवराव जवळगांवकर-पाटील, संग्राम जगताप, राजन साळवी, पी.एन.पाटील (सडोलीकर), संजय राठोड, शिरीषकुमार नाईक, डॉ. किरण लहामटे, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री राजेश एकडे, निलेश लंके, ज्ञानराज चौगुले, बळवंत वानखडे, संदिप क्षीरसागर, डॉ. संजय रायमुलकर, सर्वश्री विकास ठाकरे, सुनिल शेळके, अनिल बाबर, रणजित कांबळे, संजय जगताप, भरतशेठ गोगावले, नितीन पवार, धीरज देशमुख, वैभव नाईक, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री सुनिल टिंगरे, दिलीप लांडे, विक्रमसिंग सावंत, जितेश अंतापूरकर, दिपक केसरकर, चेतन तुपे, संजय शिरसाट, राजू पारवे, सहसराम कोरोटे, चिमणराव पाटील, मोहनराव हंबर्डे, लहु कानडे, प्रकाश आबिटकर, ऋतुराज पाटील, राजू आवळे, किशोर पाटील, चंद्रकांत नवघरे, शांताराम मोरे, डॉ.राहुल पाटील, श्री.श्रीनिवास वनगा, ॲड.शहाजी पाटील, सर्वश्री संजय गायकवाड, नितीन देशमुख, बालाजी कल्याणकर, उदयसिंग राजपूत, रमेश बोरनारे, सुहास कांदे, महेंद्र थोरवे, विश्वनाथ भोईर, संतोष बांगर, योगेश कदम, श्रीमती लता सोनवणे, सर्वश्री कैलास घाडगे-पाटील, महेश शिंदे, महेंद्र दळवी, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये पुढील प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)

"मुंबईसह राज्यातील इतर ठिकाणच्या इमारतींचा पुनर्विकास करणे"

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली व चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

१) श्री. सदा सरवणकर
२) श्री. प्रकाश सुर्वे
३) श्री. मिहिर कोटेचा
४) श्री. चेतन तुपे
५) श्री. रवींद्र वायकर
६) ॲड. राहुल नार्वेकर
७) श्री. सुनील भुसारा
८) ॲड. आशिष शेलार

गृहनिर्माण मंत्री, महसूल मंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री व मुख्यमंत्र्यांनी प्रस्तावावरील चर्चेला उत्तर दिले.

सभागृहाने प्रस्तावावर विचार केला असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**११.** सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, ॲड आशिष शेलार, सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, गिरीष महाजन, नितेश राणे, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री गणेश नाईक, मंगलप्रभात लोढा, अतुल भातखळकर, अमित साटम, योगेश सागर, रणधीर सावरकर, प्रशांत ठाकूर, ॲड पराग अळवणी, ॲड राहूल नार्वेकर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री सुनील राणे, संजय केळकर, रविंद्र चव्हाण, मिहिर कोटेचा, कॅ. आर. तमिल सेल्वन, सर्वश्री पराग शहा, राम कदम, डॉ. भारती लव्हेकर, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री महेश बालदी, सुभाष देशमुख, हरिभाऊ बागडे, श्रीमती विद्या ठाकूर, सर्वश्री कालिदास कोळंबकर, विजय देशमुख, सिध्दार्थ शिरोळे, भिमराव तापकीर, सुनिल कांबळे, लक्ष्मण जगताप, महेश लांडगे, संभाजी पाटील-निलंगेकर, अभिमन्यु पवार, राणाजगजितसिंह पाटील, सचिन कल्याणशेट्टी, राम सातपुते, डॉ.सुरेश खाडे, श्री मोहन मते, सर्वश्रीमती सीमा हिरे, नमिता मुंदडा, श्वेता महाले, ॲड राहूल कुल, श्री दादाराव केचे, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री.शिवेंद्रराजे भोसले, जयकुमार रावल, जयकुमार गोरे, डॉ.विजयकुमार गावित, डॉ.संजय कुटे, सर्वश्री राजेंद्र पाटणी, समीर कुणावार, डॉ.देवराव होळी, श्री. संजीवरेड्डी बोदकुरवार, प्रा.डॉ.अशोक उईके, सर्वश्री मदन येरावार, राजेश पवार, संतोष दानवे, बबनराव लोणीकर, डॉ.तुषार राठोड, डॉ. संदीप धुर्वे, सर्वश्री. अतुल सावे, प्रशांत बंब, किसन कथोरे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री. गणपत गायकवाड, कुमार आयलानी, प्रकाश आवाडे, समाधान आवताडे, धनंजय गाडगीळ, प्रताप अडसड, समिर मेघे, हरिष पिंपळे, नामदेव ससाने, ॲड. आकाश फुंडकर, सर्वश्री. राजेश पाडवी, कीर्तीकुमार भांगडिया, भिमराव केराम, गोवर्धन शर्मा,

प्रकाश भारसाकळे, लखन मलिक, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री. टेकचंद सावरकर, विजय रहांगडाले, कृष्णा गजबे, विकास कुंभारे, कृष्णा खोपडे, श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर, डॉ. राहूल आहेर, श्री. दिलीप बोरसे, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री. मंगेश चव्हाण, नारायण कुचे, तान्हाजी मुटकुळे, महेश चौघुले, रविशेठ पाटील, लक्ष्मण पवार, काशिराम पावरा, संजय सावकारे, सुरेश भोळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते यांनी पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले.

"मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर असूनही मूलभूत पायाभूत सुविधा या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नसणे, गेल्या पंचवीस वर्षात मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीमार्फत किमान अडीच लाख कोटींपेक्षा जास्त कामांच्या निविदा मंजूर होऊन मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होणे, कोव्हिडच्या काळामध्ये मुंबई महानगरपालिकेमध्ये हजारो कोटींचा भ्रष्टाचार झालेला निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिकेतील इमारत प्रस्ताव व बांधकाम विभागामार्फत ५० हजार कोटींपेक्षा जास्त रकमेचा भ्रष्टाचार होणे, मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समिती अध्यक्षांच्या विविध मालमत्तांवर आयकर विभागाच्या धाडी पडल्यावर त्यांच्या ३८ बेनामी मालमत्ता जप्त केल्या असल्याचे उघडकीस येणे, राजकीय आश्रयाशिवाय हे सर्व शक्य नसणे, टॅब खरेदी, सफाई कामगार वसाहत पुनर्विकासाच्या आश्रय योजनेमध्ये १८०० कोटींचा भ्रष्टाचार, जिजामाता उद्यान व प्राणिसंग्रहालयाच्या आधुनिकीकरणाचा प्रकल्प, ९०० इलेक्ट्रिक बसेसचे कंत्राट यासारख्या प्रक्रियांमध्ये घोटाळा झाला असणे, मुंबईच्या कोळीवाडा व गावठाणाकरिता वेगळा डीसीआर तयार करण्याची प्रक्रिया प्रलंबित राहिल्यामुळे मुंबईचे कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरवस्था, तत्कालीन सरकारच्या कालावधीमध्ये मुंबई मेट्रोपॉलिटन रिजनमध्ये २५६ किलोमीटरच्या मेट्रोच्या जाळ्याचे काम सुरू होणे, मात्र या सरकारच्या कार्यकाळात मेट्रोच्या कामाचा झालेला खोळंबा व मेट्रोच्या कामांच्या किंमतीमध्ये १० हजार कोटींपेक्षा जास्त वाढ झालेली असणे, मुंबई महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाने गेल्या १० वर्षांमध्ये ३८,८९९ झाडे तोडण्याची परवानगी दिलेली असतानाही फक्त २७०० झाडांसाठी व अहंकारापोटी आरेची कारशेड रोखली असल्यामुळे मेट्रोचा खोळंबा होऊन हा प्रकल्प दीर्घ काळाकरिता प्रलंबित राहणार असणे, १५ लाख घरांची आवश्यकता असताना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत फक्त सुमारे २ लाख घरे तयार झालेली असणे, मोठ्या प्रमाणावर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कार्यालयांमध्ये व खात्यामध्ये होणारा भ्रष्टाचार, सन २०११ पर्यंतच्या सर्व झोपडपट्ट्यांमधील घरांना प्रधानमंत्री आवास योजनेच्याअंतर्गत घरे देण्याचा कायदा सन २०१८ मध्ये पारित होऊनही सदर कायद्याची अंमलबजावणी न होणे, पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्पातील भाडेकरुंना बेघर करून त्यांना भाडेही न मिळणे, म्हाडामध्येही

मोठ्या प्रमाणावर होत असलेला भ्रष्टाचार, मुंबईचे डबेवाला भवन व मराठी भाषा भवन अद्याप दृष्टिपथातही नसणे, मुंबई महानगरपालिकेच्या मराठी शाळांची पटसंख्या रोडावून ७० टक्क्यांपेक्षा खाली गेलेली असणे, मुंबईकरांच्या सोयीसुविधांकडे दुर्लक्ष करत असताना मुंबई क्लायमेट ॲक्शन प्लॅनच्यामार्फत पर्यावरण विभागाचे दुटप्पी धोरण हे मुंबईकरांच्या समोर आलेले असणे, पवई तलावामध्ये भराव टाकून पर्यावरणाचे नुकसान करून हट्टापायी पवई सायकल ट्रॅकचा प्रस्ताव आणणे, सदर सायकल ट्रॅकला मुंबई हायकोर्टाकडून चपराक मिळणे, मुंबई शहरातील कचऱ्याची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट होत नसल्यामुळे मुंबईचे वातावरण व हवामान दूषित झालेले असणे, मुंबई शहरातील ग्रीन बिल्डिंगना मालमत्ता करातून सूट देण्याचा प्रस्ताव प्रलंबित असणे, ठाणे शहरातील स्मार्ट सिटी व अन्य प्रकल्पांतर्गत झालेल्या अनियमिततेची चौकशी करण्याची होत असलेली मागणी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील अनेक मोठ्या व जनोपयोगी प्रकल्पांमध्ये होत असलेला भ्रष्टाचार व अनियमितता, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला ज्येष्ठ नेते दिवंगत श्री.दि.बा.पाटील यांचे नाव देण्याबाबत स्थानिक जनता व भूमिपुत्रांकडून सातत्याने होत असलेली मागणी, या मागणीबाबत तातडीने निर्णय होण्याची आवश्यकता, राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची स्थिती ही कधी नव्हे एवढी खालच्या स्तराला गेलेली असणे, मुंबईमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटामधील आरोपींशी या सरकारमधील मंत्र्यांनी केलेल्या आर्थिक व्यवहाराच्या संदर्भामध्ये सदर मंत्र्यांना अटक होऊनही त्यांचा राजीनामा न घेऊन सरकार त्यांना पाठीशी घालत असणे, सचिन वाझे व ॲन्टीलिया प्रकरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर पोलिसांच्या प्रतिमेला तडा गेलेला असणे, अलिकडेच मुंबईतील एक पोलीस उपायुक्त एका वसुली प्रकरणामध्ये फरार असणे, नुकतेच सोलापूर येथे पोलीस उपनिरीक्षकच वरिष्ठांतर्फे वसुली करत असल्याचे माहिती अधिकार कार्यकर्त्यांने केलेल्या स्टिंग ऑपरेशनमध्ये उघड होणे, विदर्भ, मराठवाडा या मागास भागाचा अनुशेष दूर करण्यास वैधानिक विकास मंडळाचा मोठा वाटा असताना दिनांक ३० एप्रिल, २०२० रोजी मुदत संपल्यानंतर सरकारने वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ दिलेली नसणे, परिणामी या भागांचा खुंटलेला विकास व शिल्लक अनुशेषात झालेली वाढ, सरकारने तातडीने वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

रोजगार हमी योजना मंत्र्यांनी, ता.प्र. क्र. ४३१२८ च्या उत्तराबाबत माननीय अध्यक्षांनी दिलेल्या निदेशास अनुलक्षून निवेदन केले.

शासकीय विधेयके – (पुढे सुरू)

(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे –

(३) सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १४ – महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२२ -

उपरोक्त विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

१) ॲड. आशिष शेलार (भाषण पूर्ण)

२) श्री. अतुल भातखळकर

३) श्री. योगेश सागर

शालेय शिक्षण मंत्र्यांनी चर्चेला उत्तर दिले.
विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
खंडशः विचारानंतर सन २०२० चे वि.स.वि. क्रमांक १४ संमत झाले.

**विधान परिषदेने संमत केल्यास विचार, खंडशः विचार व संमत करणे –**

उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्र्यांनी, सन २०२२ ते वि.प.वि. क्र. ३ – डॉ. पी.ए. इनामदार विद्यापीठ, पुणे विधेयक, २०२२ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.
विधेयकावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.
१) श्री देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

माहितीचा मुद्दा -

१) श्री. आशुतोष काळे, वि.स.स. यांनी,"कोपरगाव इथं अतिक्रमणविरोधात सुरू असलेली कारवाई, पुन्हा अतिक्रमण होऊ नये म्हणून शासनाने पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उक्त प्रकरणी शासनाने नोंद घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव – (चर्चा पुढे सुरू)**

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

| | |
|---|---|
| १) श्री. रईस शेख | २) श्री. रवींद्र वायकर |
| ३) ॲड. आशिष शेलार | ४) श्री. सुनील प्रभू |
| ५) श्री. अमित साटम | ६) श्री. अबु आझमी |
| ७) श्री. नितेश राणे | ८) श्री. अतुल भातखळकर |
| ९) श्री. संजय केळकर | १०) श्री. महेश बालदी |
| ११) श्री. प्रशांत ठाकूर | |

(मंत्र्यांचे उत्तर बाकी)

आजच्या कामकाजपत्रिकेतील दर्शविण्यात आलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचना उद्या घेण्यात येतील. सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. शुक्रवार, दिनांक २५ मार्च २०२२ रोजी सकाळी ९.०० वाजता सभागृहाची विशेष बैठक भरेल. या बैठकीत सकाळी ९-०० ते १०-४५ या वेळेत लक्षवेधी सूचना चर्चेकरिता घेण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११-०० वाजता भरेल, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**शुक्रवार, दिनांक २५ मार्च, २०२२**

**(१)सर्वश्री नानाभाऊ पटोले, पृथ्वीराज चव्हाण, शिरीष चौधरी, लहू कानडे, संजय जगताप, श्रीमती मनिषा चौधरी, डॉ. भारती लव्हेकर, श्री. अमित साटम, ॲड. आशिष शेलार श्री. अतुल भातखळकर, ॲड. राहुल नार्वेकर, श्री. कालीदास कोळंबकर, श्रीमती सरोज अहिरे वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना–**

**ॲड. अशोक पवार, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्यांचे** लक्ष वेधले-

"मुंबई चित्रपटसृष्टी असोसिएशन ऑफ सिने अँड टेलिव्हिजन आर्ट डायरेक्टर आणि कॉस्च्युम डिझायनर (ACTADCD) ही नोंदणीकृत कामगार संघटना गत ५८ वर्षांपासून कार्यरत असून सिनेसृष्टीतील कामगार सभासद आणि निर्मात्यांमध्ये सुसंवाद वाढविणे, त्यांच्या समस्या सोडविणे व आकस्मिक काळात वैद्यकीय व अन्य मदत मिळवून देण्याचे काम ही संघटना करते, मात्र या संघटनेला फिल्म सेटिंग ॲण्डअलाईड मजदूर युनियन (Allied Mazdur Union) तसेच

फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया सिने एम्प्लॉईज (FWICE) या दोन संघटनांकडून विनाकारण त्रास देऊन अवैधरीत्या त्यांच्या कामकाजात अडथळा निर्माण करून हस्तक्षेप करणे, या दोन्ही संघटनांवर सारख्याच व्यक्ती विराजमान असून कामगारांच्या समस्यांच्या नावाखाली लाखो रुपयांचा गैरव्यवहार तसेच खंडणी जमा करण्याचे काम या दोन्ही संघटनांचे पदाधिकारी करीत असणे, उपरोक्त दोन्ही संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या जाचाला कंटाळून ACTADCD चे ज्येष्ठ सभासद श्री.राजेंद्र सापते यांनी आत्महत्या करणे व त्यांच्या सुसाईड नोटमध्ये या संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना यासाठी जबाबदार ठरविणे, तरीही या प्रकरणी कोणतीही फौजदारी कारवाई अद्यापपर्यंत न होणे, अलाईड मजदूर युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी जवळजवळ ३१ कोटी रुपयांचा सभासद निधीचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेकडे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये तक्रार नोंदवूनही यासंदर्भात अद्याप कोणतीही कारवाई न होणे, परिणामी त्यांचे धाडस अधिकच वाढून आता उपरोक्त दोन्ही संघटनांची वाकडी नजर ही ACTADCD संघटनेकडे वळली असून या संघटनेवर गुंडांमार्फत अनधिकृत कब्जा करण्याच्या उद्देशाने एक बनावट कार्यकारणी मंडळ स्थापन करून बनावट लेटरहेड, मानचिन्हे व ओळखपत्रे छापून त्यांची बँक खाती सील करण्यासंदर्भात बँकांना पत्र देणे व आश्चर्याची बाब म्हणजे बँक ऑफ महाराष्ट्र व ॲक्सिस बँकेने चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे उपरोक्त संघटनांचा हस्तक्षेप वैध ठरवून गत ६ महिन्यापासून ACTADCD संघटनेच्या बँकेचे व्यवहार रोखून ठेवणे, परिणामी या संघटनेचे सभासद अनुज्ञेय असलेल्या मदतीपासून वंचित असणे, या प्रकरणी आंबोली पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करूनही अद्यापपर्यंत उपरोक्त दोन्ही संघटनांवर कोणतीही कारवाई न होणे, या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन मा.गृहमंत्री महोदयांनी दिनांक ७ जुलै, २०२१ रोजी बैठक घेऊन SIT लाऊन दोषींवर कडक कारवाई करण्याचे आदेश देऊनही अद्याप कोणतीही कारवाई न होणे, सदरहू प्रकरणाची शासनाने गंभीर दखल घेवून ACT-ADCD च्या कार्यालयात अनधिकृत प्रवेश करून कामकाजात हस्तक्षेप करणाऱ्या उपरोक्त दोन्ही संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना त्वरित अटक करून कारवाई करणे बाबत तसेच बँकेचे व्यवहार पुन्हा सुरू करण्यासंदर्भात तातडीने आदेश देण्याची आवश्यकता, उपरोक्त दोन्ही संघटनांमधील गैरव्यवहारासंदर्भात तेथे प्रशासकाची नेमणूक करून आर्थिक गुन्हे शाखेकडून सखोल चौकशी व दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच श्री. राजेंद्र सापते यांच्या आत्महत्येमुळे त्यांचे कुटुंब आर्थिक संकटात सापडले असून त्यांना मदत देऊन उपरोक्त संपूर्ण प्रकरणी शासनाने अतिशय गांभीर्याने व तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**कामगार मंत्र्यांनी निवेदन केले.**

**काही प्रश्नोत्तरे झाली.**

श्री. सुनिल शेळके, वि.स.स. यांनी, 'मावळ मतदारसंघातील पवना धरणग्रस्तांचा प्रश्न सभागृहात दुर्लक्षित राहणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२) ॲड. अशोक पवार, श्री.राम सातपुते वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना

ॲड. अशोक पवार, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

"महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमाच्या कलम ४१ कक मध्ये धर्मादाय रुग्णालयाने गरीब व निर्धन रुग्णांना मोफत तसेच सवलतीच्या दरात उपचार करण्याची तरतूद असनूही राज्यातील अनेक धर्मादाय रुग्णालयामध्ये मनमानी पद्धतीने कारभार सुरू असून गरीब रुग्णांना १० टक्के राखीव खाटा सवलत योजनेतून उपचार करण्यासही रुग्णालये टाळाटाळ करत असणे, या रुग्णालयांना शासनामार्फत अनेक सूट व सवलती व माफक दरात जागा देण्यात आल्या असून महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियमातील तरतुदींनुसार गरीब सर्वसामान्य कष्टकरी जनतेला आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे या रुग्णालयांवर बंधनकारक असतानाही त्याची प्रभावी अंमलबजावणी न होणे, ही रुग्णालये गरीब रुग्णांकडून अवाजवी फी वसूल करणे, धर्मादाय रुग्णालयांमध्ये १० टक्के राखीव खाटा सवलत योजनेची प्रभावी अंमलबजावणी होणेची आवश्यकता असणे, या तरतुदीची अंमलबजावणी करताना या रुग्णांलयाच्या दर्शनी भागात जनसंपर्क अधिकारी यांचे नाव, मोबाईल नंबर, समितीचा बोर्ड, १० टक्के राखीव खाटा व शिल्लक आयपीएफ निधीबाबतचा तपशील लावून वेबसाईटवर देखील जागेची व निधीची उपलब्धता दर्शविण्याची आवश्यकता, संबंधित हॉस्पिटलचे जनसंपर्क अधिकारी सायंकाळी ६-०० नंतर तसेच रविवार व इतर सुट्ट्यांच्या दिवशी फोन देखील न उचलणे, त्यामुळे रुग्णांना होणारा त्रास तसेच गंभीर रुग्णांना मदत न होणे तर काहींना प्राण गमवावा लागणे, पैशाअभावी उपचार न होणे, परंतु याबाबत संबंधित रुग्णालयांकडून कार्यवाही न होणे, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, अधिनियमातील तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी होण्याची आवश्यकता, यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**कामगार मंत्र्यांनी निवेदन केले.**
**काही प्रश्नोत्तरे झाली.**

श्री.विकास ठाकरे, वि.स.स. यांनी,' श्री.अजय आंबेकर नावाचा अधिकारी स्वेच्छानिवृत्ती घेऊन फरार झाला असून या विषयाच्या संदर्भात माननीय उपाध्यक्षांनी त्यांच्या कक्षामध्ये बैठक घेऊन संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची आवश्यकता' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

यासंदर्भात आपल्या दालनामध्ये बैठक घेण्यात येणार असल्याचे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

(३) श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधले-

"महाराष्ट्र राज्य सह. बँक ही महाराष्ट्रातील सह. कर्ज पुरवठा यंत्रणेतील शिखर (ॲपेक्स) बँक असणे, या शिखर संस्थेच्या माध्यमातून राज्यातील सह.साखर कारखाने, सूतगिरण्या व जिल्हा मध्यवर्ती बँकांना अल्प व मध्यम मुदतीच्या कर्जांचे वाटप करण्यात येणे, बँकेच्या कामकाजामध्ये झालेल्या अनियमिततेमुळे रिझर्व्ह बँकेच्या सूचनेनुसार शासनाच्या सहकार विभागाने दिनांक ७ मे, २०११ रोजी बँकेचे तत्कालीन संचालक मंडळ बरखास्त करून बँकेवर प्रशासकीय मंडळाची नियुक्ती करणे, यावेळी वेळोवेळी सुधारणा करून प्रशासकांची निवड करणे, दिनांक १९ एप्रिल, २०१८ रोजी तत्कालीन प्रशासक मंडळाचे अध्यक्ष व सदस्य यांनी राजीनामा दिल्यानंतर सहकार आयुक्त महाराष्ट्र राज्य यांनी बँकेच्या प्रशासकीय मंडळाच्या अध्यक्षपदी विद्याधर अनास्कर तर सदस्य पदी श्री.भेंडे व श्री.महागावकर यांची नियुक्ती करणे, परंतु प्रशासकीय मंडळातील सदस्यांनी राजीनामा दिल्याने महाराष्ट्र राज्य सह. बँकेचे सर्व कामकाज प्रशासकीय मंडळाचे अध्यक्ष यांचेकडून एकाधिकारशाही पद्धतीने सुरू असणे, प्रत्यक्षात बँकेच्या माध्यमातून अडचणीत आलेल्या सह.साखर कारखाने सूतगिरण्या व जिल्हा माध्यमिक बँकांना कर्जपुरवठा करण्याबाबत निर्णय होणे अपेक्षित असताना, प्रशासक यांचेकडून कोणत्याही प्रकारचे कामकाज न होणे, सध्या बँकेची आर्थिक परिस्थिती सुधारत असून या सर्व बाबी विचारात घेता राज्यशासनाने सदर संस्थेची निवडणूक प्रक्रिया जाहीर होईपर्यंत बँकेवर राज्य शासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची तात्पुरती नियुक्ती करून महाराष्ट्र राज्य सह.बँकेचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**सहकार मंत्र्यांनी निवेदन केले.**
**काही प्रश्नोत्तरे झाली.**

(४) श्री. देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे नगर विकास मंत्र्यांचे लक्ष वेधले-

"नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या भूखंडांचे नूतनीकरण, हस्तांतरणाबाबत महाराष्ट्र **शासन राजपत्र** असाधारण भाग-चार-ब दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ नगरविकास विभाग यांच्या अधिसूचनेनुसार भूखंडांचे नूतनीकरण व हस्तांतरण करण्याबाबत लागणारे "भूभाटक" हे ०.०२% वरून ८% केल्यामुळे भूखंडधारकांना प्रचंड भुर्दंड पडून विकासकांना अडचण निर्माण झाली असणे, दिनांक २५ मार्च, २०२१ रोजी नागपूर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत संबंधित

विषयावर चर्चा होणे व सभागृहाने एकमताने ठराव क्र. ६६ पारित करून, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासनाचे दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या अधिसूचनेतील "महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्ता भाडेपट्टा नूतनीकरण अथवा हस्तांतरण) नियम २०१९, च्या तरतुदीबाबत फेरविचार करण्याबाबत शासनाकडे पाठविण्यात यावा असा निर्णय घेण्यात येणे, नागपूर महानगरपालिका सभागृहाने एकमताने ठराव करून घेतलेल्या उपरोक्त अधिसूचनेबाबत शासनाने फेरविचार करून निर्णय घेण्याची आवश्यकता, हा प्रश्न राज्यातील सर्वच महानगरपालिकांमध्ये तयार होणे, महापालिकेच्या भोगवटादार मध्यमवर्गीय असल्याने त्यांना अनंत अडचणींचा सामना करावा लागणे, याकरिता या निर्णयाचा पुनर्विचार करून नवीन निर्णय घेण्याची आवश्यकता व जोपर्यंत नवीन निर्णय होत नाही तोपर्यंत सदर निर्णय स्थगित ठेवून भोगवटादारांकडून हमी पत्र घेऊन दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ पूर्वीच्या तरतुदींप्रमाणे ०.०२% इतकेच भूभाटक वसूल करण्याबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता, या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**नगर विकास मंत्र्यांनी निवेदन केले.**
**काही प्रश्नोत्तरे झाली.**

(५) श्री. अनिल बाबर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधले-

"सांगली जिल्ह्यात द्राक्ष व डाळिंब पिकांची मोठ्या प्रमाणात लागवड होत असून शेतकऱ्यांनी जिल्ह्यात नवनवीन आधुनिक प्रयोग करून निर्यातक्षम द्राक्षे व डाळिंबे पिकवलेली असणे, परंतु सातत्याने अवेळी पाऊस व अतिवृष्टी, गारपीट यामुळे शेती धोक्यात आलेली असणे, वारंवार होणाऱ्या शेतीच्या नुकसानीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडणे, यावर ठोस उपाययोजना आखण्याकरिता शासनाने द्राक्ष व डाळिंब पिकांच्या उर्जितावस्था व संरक्षणाकरिता बागेवरती प्लास्टीक आच्छादन करणे व शेटनेटसाठी अनुदान देण्याची आवश्यकता असणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी संबंधित मंत्रीमहोदयांकडे पत्रव्यवहार, बैठका घेतल्या असतानाही तसेच विविध आयुधांद्वारे विधानसभा सभागृहात शासनाचे लक्ष वेधूनही अद्याप शासन स्तरावर कोणतीच ठोस कार्यवाही न होणे, परिणामी शेतकरी वर्गामध्ये प्रचंड असंतोष पसरणे, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाचे प्रतिक्रिया व भूमिका."

**कृषी मंत्र्यांनी निवेदन केले.**
**काही प्रश्नोत्तरे झाली.**

(६) श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृह मंत्र्यांचे लक्ष वेधले-

"रत्नागिरी जिल्ह्यातील बोरज (ता. खेड) येथे गोवंशातील दोन पाळीव जनावरांची घृणास्पद हत्या झाल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०२२ वा त्यासुमारास निदर्शनास येणे, या घटनेमुळे तणावसदृश स्थिती निर्माण होणे, अशाच प्रकारची घटना माहे जानेवारी, २०१९ मध्ये याच भागातील लोटे (ता. खेड) येथे उघडकीस येऊन गंभीर परिस्थिती निर्माण होणे, हे कृत्य करणाऱ्यांना अटक करण्यात यावी या मागणीसाठी दिनांक २६ जानेवारी, २०१९ रोजी नागरिक शांतपणे आंदोलन करीत असताना पोलिसांनी केलेल्या बेछूट लाठीहल्ल्यामुळे आंदोलक संतप्त होणे, आंदोलकांच्या भावनांचा उद्रेक होऊन जाळपोळ होऊन दंगलसदृश स्थिती निर्माण होणे, यामध्ये कित्येकजण जखमी होणे, आंदोलनामुळे संपूर्ण मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग कित्येक तास बंद होणे, सदर घटनेप्रकरणी पोलिसांकडून झालेली तकलादू कारवाई, परिणामी असे कृत्य करणाऱ्यांवर कोणतीही जरब नसल्याने पुन्हा तीन वर्षानंतर गोवंशहत्येच्या घटनेची पुनरावृत्ती होणे, सदर घटना घडून एक महिना उलटला तरी हे कृत्य करणाऱ्या गुन्हेगारांना पकडण्यात पोलिसांना आलेले अपयश, त्यामुळे पोलिसच गुन्हेगारांना पाठीशी घालण्याचे काम करीत असल्याची नागरीकांमध्ये निर्माण झालेली भावना, परिणामी नागरीकांमध्ये असलेली प्रचंड चीड आणि संतापाची भावना, या भावनांचा कधीही उद्रेक होण्याची शक्यता, ही गंभीर बाब लक्षात घेऊन शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

**गृह (ग्रामीण) राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.**
**काही प्रश्नोत्तरे झाली.**

(७) श्री.रोहित पवार, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृह मंत्र्यांचे लक्ष वेधले-

"पोलिसांच्या कामाचे तास जास्त असल्याने कामाचा ताण असणे, इतर कर्मचाऱ्यांना कामाचा आठवडा पाच दिवसाचा असणे, पोलिसांचा कामाचा आठवडा सात दिवसाचा असणे, पोलीस खात्याच्या अनेक जमिनी असून देखील पोलिसांच्या राहत्या घराचा तसेच पोलिस वसाहतीचा प्रश्न सातत्याने निर्माण होत असणे, अनेक पोलीस कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय मोडकळीस आलेल्या पोलिस वसाहतीमध्ये निवास करत असणे, त्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होणे, पोलिसांना चांगली सुविधा पुरवणाऱ्या कॅशलेस हॉस्पिटल (Cashless Hospitals) ची संख्या कमी असल्याने पोलिस कर्मचाऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागणे, पोलिसांना

हक्काच्या रजा वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून न मिळणे, किरकोळ रजांची संख्या वर्षाला १२ वरुन २० करण्याची मागणी पोलीस कर्मचाऱ्यांकडून होत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

**गृह (ग्रामीण) राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.**
**काही प्रश्नोत्तरे झाली.**

उपसचिवांनी, लक्षवेधी सूचनाक्रमांक १ ते १९४ या लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवली.

**सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ५७ मिनिटांनी सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.**

**सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय उपाध्यक्ष श्री. संजय शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.**

१. (१) सात तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील चौतीस प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित झाले.

२. (१) **वित्त राज्यमंत्र्यांनी,** खालील अहवाल व प्रकाशन सभागृहासमोर ठेवले : -

(क)भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचा अनुपालन अहवाल,

(ख)“लिंगभाव अर्थसंकल्प विवरणपत्र (Gender Budget Statement) व बाल अर्थसंकल्प विवरणपत्र (Child Budget Statement) २०२२-२०२३.

(२) संसदीय कार्य राज्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांचे सन २०१३-२०१४, २०१४-२०१५ व २०१५-२०१६ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

प्रधान सचिवांनी, विधानपरिषदेने कोणत्याही सुधारणेशिवाय संमत केलेली ९ वि.स.विधेयके, विधानपरिषदेने कोणत्याही शिफारशीशिवाय परत केलेली ४ वि.स.विधेयके आणि राज्यपालांची अधिसंमती मिळालेली ६ वि.स.विधेयके यांची नावे सभागृहाला वाचून दाखविली.

**(१) ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी,** ‘प्लॉट नं. ८०६, सीटीएस नं. ५११०, दादर टी.टी. या भूखंडावर ३३ (७) अंतर्गत जुन्या इमारतीचा पुनर्विकास करणाऱ्या भावी होम्स प्रायव्हेट लिमिटेडच्या धीरज व विनित शाह यांनी स्थानिक नागरिकांना ओ.सी. व डिम्ड कन्व्हीनिअन्सबाबत फसविल्याबद्दल त्यांच्याविरूद्ध कारवाई करणे ’ इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

**(२) श्री. महेश लांडगे, वि.स.स. यांनी,** ‘युक्रेन व रशियामध्ये युध्दजन्य परिस्थिती असल्यामुळे तेथून परतलेल्या महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्षाचे नुकसान टाळण्यासाठी काही नियम शिथिल त्यांचे शैक्षणिक वर्ष पूर्ण करता येण्याकरिता शासनाने दखल घेणे’ इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

**(३) श्री. चंद्रकांत पाटील, वि.स.स. यांनी,** ‘कोल्हापूर शहरामधील राज्याच्या मंत्रिमंडळात असणाऱ्या एका मंत्री महोदयांचा ३० कोटी रुपयांचा घरफाळा भरणे प्रलंबित असणे’इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

**(४) प्रा.डॉ. अशोक उईके, वि.स.स. यांनी,** ‘मागासवर्गीयअधिकारी व कर्मचारी यांच्या पदोन्नती संदर्भात शासनाच्या उदासीन व विरोधी भूमिका असणे’इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

**(५) श्री. राम कदम, वि.स.स. यांनी,** ‘शालेय शिक्षण मंत्र्यांनी शासनाच्यावतीने ‘भगवद् गीता’ शाळांमध्ये शिकविण्यासाठी नकार देणे ’इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

**तीन–पंचायत राज समितीचा अहवाल सादर करणे.—**

३. **श्रीमती प्रतिभा धानोरकर,** (समिती सदस्य), यांनी पंचायती राज समितीचा अकरावा, बारावा, तेरावा व चौदावा अहवाल सभागृहाला सादर केला.

तालिका सभाध्यक्षांनी, शुक्रवार दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली.

४. श्री.दीपक केसरकर (समिती प्रमुख), यांनी पुढील प्रस्ताव प्रस्तुत केला-

विधानसभा विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ प्रलंबितअसलेल्या,

(१) सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. प्रतापसरनाईक यांनी श्री. अर्णब गोस्वामी, संपादक, वृत्तनिवेदक व कार्यक्रम सूत्र संचालक, रिपब्लिक टिव्ही वृत्तवाहिनी यांचेविरुद्ध दिनांक ७ सप्टेंबर, २०२० रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

(२) सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. प्रताप सरनाईक यांनी हिंदी सिने अभिनेत्री कंगना राणावत यांचे विरुद्ध दिनांक ७ सप्टेंबर, २०२० रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण या दोन प्रकरणांवरील विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर करण्याकरिता महाराष्ट्र विधानसभा नियम १८३(१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी या प्रस्तावाबाबत आपले म्हणणे मांडले.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

(६) श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स. यांनी, 'नाशिक येथे पीव्हीआर चित्रपटगृहामध्ये 'दि काश्मीर फाईल्स ' हा चित्रपट पाहण्यासाठी गळ्यात भगवा स्कार्फ घालून गेलेल्या महिलांशी सुरक्षा रक्षकाने असभ्य वर्तन करणे'इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(७) श्रीमती नमिता मुंदडा, वि.स.स. यांनी, 'बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई मतदारसंघातील सौंदाणा या गावात ३०० एकर ऊस एमएसईबीच्या नादुरुस्त उपकरणांमुळे जळणे'इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(८) श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स. यांनी, 'कोल्हापूरमधील राधानगरी मतदारसंघात व अन्य भागांमध्ये गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नांकडे शासनाने दुर्लक्ष करणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(९) ॲड. राहुल नार्वेकर, वि.स.स. यांनी, 'शासनाने माहे जानेवारी २०२१ पर्यंत कोव्हिड प्रतिबंधात्मक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३ लाख ८ हजार नागरीकांविरोधात दाखल केलेल्या केसेस मागे न घेणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१०) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी, 'कांदिवली पूर्व येथील हनुमान नगरमधील त्रिमूर्ती चाळीतील पोषण आहार योजनेच्या माध्यमातून वितरित केलेल्या तांदळामध्ये प्लास्टीकचे दाणे आढळणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उक्त प्रकरणी शासनाने निवेदन करावे, असे निदेश माननीय तालिका सभाध्यक्षांनी दिले.

(११) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स. यांनी, 'गडचिरोली जिल्ह्यामध्ये बाल संगोपन योजनेंतर्गत सन २०१६-२०१७, २०१७-२०१८,२०१८-२०१९,२०१९-२०२० या वर्षांमध्ये प्राप्त झालेले ७६ लाख १६ हजार ४५० रूपयांचे लाभार्थी अनुदान तत्कालीन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी शासनास परत करणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१२) श्री. श्यामसुंदर शिंदे, वि.स.स. यांनी, 'नांदेडमध्ये दोन वर्षांपूर्वी हेडकॉन्स्टेबल श्री. शिवाजी शिंदे यांचा श्री. तुळजाराम ठाकूर या गुंडाने निर्घृणपणे खून करणे तसेच सृष्टी गायकवाड या मुलीला एका गुंडाने नांदेडहून अहमदाबादला पळवून नेणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१३) श्री. श्वेता महाले, वि.स.स. यांनी, ' बुलढाण्यातील चिखली मतदारसंघात दिनांक २८ फेब्रुवारी, २०२२ रोजी ऊर्जा मंत्री दौऱ्यावर आले असताना शेतकऱ्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता वीज जोडणी कापणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१४) श्री. अमित साटम, वि.स.स. यांनी, 'पद्मश्री प्राप्त सुप्रसिद्ध गायक सोनू निगम यांना मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त श्री. इकबाल सिंह चहल यांचे नातेवाईक फ्री शो करण्याबाबत धमक्या देत असणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१५) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. यांनी, 'वर्सोवा मतदारसंघातील वि. रा.देसाई रोड येथील फर्म रिपब्लिक रोडवरील CTS क्रमांक ८४४/१ अंबोली गाव, अंधेरी पश्चिम येथील भूखंडावर अनधिकृत डंम्पिंग करणाऱ्या ट्रक्समुळे वाहतुकीचा व स्थानिक नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होणे ' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१६) ॲड. आशिष जैस्वाल, वि.स.स. यांनी, 'विदर्भातील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या बोनसचे पैसे थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याबाबत माननीय उपमुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाची तातडीने पूर्तता करण्याची गरज' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१७)श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, 'विदर्भातील धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस देण्याबाबत शासनाकडून विलंब होणे'इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याबाबत नोंद घ्यावी करावे, असे निदेश माननीय तालिका सभाध्यक्षांनी दिले.

(१८)श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स. यांनी, 'एसटी संपामुळे राज्यातील विद्यार्थ्यांची अवहेलना होत असणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१९)श्री. किशोर पाटील, वि.स.स. यांनी, ' पुढील तीन महिन्यांसाठी राज्यातील शेतकऱ्यांची वीज खंडित केली जाणार नसल्याचे आश्वासित करूनही शासनाने शेतकऱ्यांच्या पाणीपुरवठा योजनेची वीज तोडणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२०) श्री. सुनिल कांबळे, वि.स.स. यांनी, ' पुणे येथे महाशिवरात्रीच्या दिवशी शिवलिंगाची पूजा आयोजित करणाऱ्या एका मंडळातील २५ ते २६ सदस्यांना पोलिसांनी घरातून उचलून नेणे व त्यांच्याविरूद्ध कलम २९५ अन्वये गुन्हा दाखल करणे ' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याबाबत नोंद घ्यावी करावे, असे निदेश माननीय तालिका सभाध्यक्षांनी दिले.

(२१) श्री. बळवंत वानखेडे, वि.स.स. यांनी, ' गेल्या २३ तारखेपासून बार्टी, पुणे येथे पीएच.डी आणि एमफीलचे विद्यार्थी फिलॉसॉपीकरिता उपोषणास बसणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याबाबत नोंद घ्यावी करावे, असे निदेश माननीय तालिका सभाध्यक्षांनी दिले.

(२२) श्री. प्रताप अडसड, वि.स.स. यांनी, ' नवनिर्वाचित आमदारांना मतदारसंघात काम करीत असताना प्रशासकीय स्तरावरील अधिकारांची माहिती देणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याबाबत नोंद घ्यावी करावे, असे निदेश माननीय तालिका सभाध्यक्षांनी दिले.

(२३) श्री. संजय केळकर, वि.स.स. यांनी, ' गेल्या दोन दिवसांपासून राज्यातील हजारो घरेलू महिला कामगारांनी त्यांच्या मागण्यांसाठी धरणे आंदोलन सुरू करणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याबाबत नोंद घ्यावी करावे, असे निदेश माननीय तालिका सभाध्यक्षांनी दिले.

(२४) श्री. चिंतामण वनगा, वि.स.स. यांनी, 'गुजरात सीमा ते मनोहर सीमेलगत अवैध धंदे सुरू असणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२५) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी, ' राजापूर मतदारसंघाचे आमदार श्री. राजन साळवी यांना दिनांक १० जानेवारी, २०२२ रोजी धमकीचा फोन येणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सदरहू प्रकरणी श्री. राजन साळवी, वि.स.स. यांना अधिकचा एक सुरक्षारक्षक उपलब्ध करून दिला असून त्यांच्या निवासस्थानीही सुरक्षारक्षक नियुक्त केला आहे. तसेच या दोन्ही फोन क्रमांकाची सायबर सेलच्या माध्यमातून तपासणी केली जात असून आवश्यकता भासल्यास अधिकीची सुरक्षा वाढविण्यात येईल, असे गृह (ग्रामीण) राज्य मंत्र्यांनी सांगितले.

(२६) श्री. संजय सावकारे, वि.स.स. यांनी,त्यांची एम एच १९ सी झेड ही इनोव्हा कार परस्पर परिवहन मंत्र्यांच्या नावे करण्यात आल्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला.

(२७) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स. यांनी, 'राज्यातील मंत्रीमहोदयांनी त्यांच्या बंगल्यास ज्या गड-किल्ल्याचे नाव दिले असेल तो किल्ला दत्तक घेऊन त्याची देखभाल करणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२८) श्री. उदयसिंह राजपूत, वि.स.स. यांनी, 'वैजापूर मतादारसंघातील पोखरी व इतर दोन-तीन गावातील पाणीपुरवठ्याची वीजजोडणी तोडणे व वैजापूर-गंगापूर येथे ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त होणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२९) श्री. टेकचंद सावरकर, वि.स.स. यांनी, ' राज्यातील सर्व गावांमध्ये शासनाच्या धोरणानुसारच रेशन वाटप होण्याची आवश्यकता तसेच नागपूर जिल्ह्यातील कामठी येथील धान उत्पादक शेतकऱ्यांकरिता बोनस जाहीर करण्याची आवश्यकता'इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२९) श्री. भीमराव तापकीर, वि.स.स. यांनी, 'खडकवासला किल्ल्यावर भगवा ध्वज उभारण्याकरिता पर्यटन विभाग व वन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र अद्याप न मिळणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(३०) श्री. नारायण कुचे, वि.स.स. यांनी, 'शेतकऱ्यांना रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहिरींचा लाभ घेण्यासाठी पाणी उपलब्धता प्रमाणपत्रासंदर्भात चुकीचे सर्वेक्षण होणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(३१) कॅप्टन आर.तमिल सेल्वन, वि.स.स. यांनी, 'महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मोफत वीज पुरवठा न झाल्यामुळे शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे'इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(३२) श्री. समीर कुणावार, वि.स.स. यांनी, ' गेल्या ४ वर्षांपासून मुंबईतील मनोरा आमदार निवासाचे रखडलेल्या कामाबाबत शासनाने निवेदन करणे'इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(३३) श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स. यांनी, 'शेतकऱ्यांना पुरेशा दाबाने वीज पुरवठा करण्यासाठी उपलब्ध असलेले ६३ केव्ही चे ट्रान्सफॉर्मर जळाल्यानंतर त्याजागी १०० केव्हीचे ट्रान्सफॉर्मर देण्याची आवश्यकता' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(३४) डॉ. देवराव होळी, वि.स.स. यांनी, ' आदिवासीबहुल चंद्रपूर जिल्ह्यातील मौजा कुसबी, ता.जिवती येथील आनंदराव मेश्राम यांनी २४ आदिवासींची ६३.६२ हेक्टर जमीन माणिकगड सिमेंट्स, स्थानिक प्रशासकीय अधिकाऱ्यांना हाताशी घेऊन सन १९८५ पासून ताब्यात घेणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(३५) श्रीमती नमिता मुंदडा, वि.स.स. यांनी, 'अंबाजोगाई तालुक्यातील डोंगरपिंगळा या गावामध्ये एका ८ वर्षीय मुलीवर बलात्कार होणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(३६) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांनी, 'विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात ड्रग्सचे व्यसन वाढत असल्यामुळे त्यांच्या विकासासाठी भारतीय तत्त्वज्ञान, मूल्य शिक्षण, आसने, गुरुचे महत्त्व व व्यवसाय प्रशिक्षण शाळांमध्ये सुरू करण्याची आवश्यकता' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(३७) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. यांनी, ‘ वर्सोवा मतदारसंघातील रूनवाल इमारतीच्या कार पार्किंगमध्ये अनधिकृत धंदे सुरू असणे’ इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(३८) डॉ. किरण लहामटे, वि.स.स. यांनी, ‘उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये खेड्यांमधील पिण्याच्या पाण्याच्या योजनांची वीज जोडणी तोडणे’ इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(३९) श्री. लहू कानडे, वि.स.स. यांनी, ‘श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघातील गोदावरी नदीच्या पूररेषेतील गावांच्या गावठाणांसाठी वीस वर्षांपूर्वी संपादित करून सदर जागेचे प्लॉट्स पाडूनही ते अद्याप गोरगरीबांना न देणे’ इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(४०) श्री. अतुल सावे, वि.स.स. यांनी, ‘तत्कालीन मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी संभाजीनगरसाठी १ हजार ६८० कोटी रूपयांची पाण्याची योजना सुरू करून दोन वर्षांनंतरही अद्याप त्याबाबत कोणतीही कारवाई न होणे’ इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

**७.** विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे विचार पुढे सुरू, खंडशः विचार व संमत करणे-

सन २०२२ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ३- डॉ. पी.ए.इमानदार विद्यापीठ, पुणे विधेयक, २०२२ - (चर्चा पुढे सुरू )

उपरोक्त वि.प.विधेयक विचारात घेण्याबाबतच्या प्रश्नावरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता (भाषण पूर्ण)

| २३ | "मौजे चेंबूर येथील न.भू.क्र. ३६० क बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील भूखंड ३० वर्ष मुदतीकरिता डॉ.बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल फाउंडेशन या संस्थेला सांस्कृतिक आणि कल्याणकारी उपक्रम इमारतीचे बांधकाम करण्याकरिता देण्यात येणे, सदरील भूखंडावरील इमारतीचे बांधकाम मागील ६-७ वर्षापासून पूर्णतः बंद असल्याची बाब नुकतीच निदर्शनास येणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०२० पासून आजतागायत वारंवार सहा.आयुक्त, मालमत्ता, बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय यांच्याकडे विचारणा केली असता या संदर्भात अद्यापही कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.'' | श्री. प्रकाश फातर्पेकर, वि.स.स. | दिनांक १४ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |
| २४ | "देवळाली मतदारसंघातील (जि.नाशिक) नाशिक रोडलगतच्या वडनेरगांव, वडनेरगेट परिसरातील वड, पिंपळ, आंबा व कडुनिंब इ. वृक्षांची बेकायदेशीरपणे तेथील नगरसेवक व उपायुक्त (उद्यान) महापालिका नाशिक, यांच्या आदेशानुसार संबंधित ठेकेदाराने दिनांक ७ व ८ जानेवारी, २०२२ रोजी वृक्षतोड केल्याचे तसेच जेलरोड-टाकळीरोड (नाशिक) येथे एका व्यावसायिकाने माजी नगरसेवकांच्या आदेशावरुन पिंपळ, औदूंबर इ. वृक्षांची वृक्षतोड केल्याचेही त्याचदरम्यान निदर्शनास येणे, सदर वृक्षतोडप्रकरणी वरील संबंधितांनी नाशिक महापालिका प्रशासनाची व वृक्षप्राधिकरणाची कोणतीही परवानगी घेतली नसल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास येणे, संबंधित नगरसेवक, उपायुक्त (उद्यान) व संबंधित ठेकेदार यांचेविरुद्ध वृक्षतोड संवर्धन कायदा व वन्यजीव संरक्षण कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी पोलीस कारवाई करण्यात यावी तसेच एक झाड एक | श्रीमती सरोज आहिरे, वि.स.स. | दिनांक १४ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | लाख रुपये याप्रमाणे संबंधितांकडून वसुली करावी, अशी मागणी नाशिक कृती समितीचे पदाधिकारी, तसेच स्थानिक कर्तव्यशील सामाजिक संस्थेचे पदाधिकारी व वृक्षप्रेमी जनतेने केली असल्याचेही त्याचदरम्यान निदर्शनास येणे, इतकेच नव्हेतर, सदर बेकायदेशीररित्या वृक्षतोड केल्याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी या सर्व प्रकरणी सर्व संबंधितांच्या विरोधात कारवाई करावी, अशी मागणी दिनांक १९ जानेवारी, २०२२ रोजीच्या पत्रान्वये मा.प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडे करणे, तथापि, त्याप्रकरणी अद्याप कोणतीही कारवाई करण्यात न येणे, परिणामी नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.'' | | |
| २५ | "भारत-पाकिस्तान फाळणीच्या वेळी पाकिस्तानातील सिंध प्रांतातून निर्वासित केलेल्या रहिवाश्यांचे भारतात पुनर्वसन करण्याच्या उद्दीष्टाने उल्हासनगर शहरात त्यांचे पुनर्वसन करणे, उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील अनेक इमारती या ६० ते ७० वर्षापूर्वी बांधकाम केलेल्या असणे, परिणामी उल्हासनगर महानगरपालिकेने सर्व्हेक्षण केलेल्या ५०० हुन अधिक इमारती या धोकादायक असल्याचे निदर्शनास येणे, सदर धोकादायक इमारतीमध्ये सुमारे १० हजार नागरिक रहिवास करीत असून त्यांच्यात भितीचे व असुरक्षिततेचे वातावरण पसरणे, दरवर्षीप्रमाणे या इमारतीमधील नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्याबाबत महानगरपालिकेमार्फत नोटीस पाठविण्यात येणे, उल्हासनगर मध्ये दिनांक १५ व २८ मे, २०२१ रोजी मोहिनी पॅलेस आणि साई शक्ती अपार्टमेंट तसेच दिनांक २४ ऑक्टोबर, २०२१ रोजी पारस अपार्टमेंट या इमारतीचा स्लॅब कोसळून झालेल्या अपघातात १३ नागरिकांचा मृत्यू आणि ११ नागरिक गंभीर जखमी होणे, या इमारतीमधील मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबियांना शासनाने ५ लाख रुपये मदत जाहीर करण्यात येऊनही अद्याप कोणतीही मदत देण्यात न येणे, मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना तातडीने मदत करावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वारंवार करणे, मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांनी शासनाकडे मानवतेच्या दृष्टीने आर्थिक मदत करण्यासाठी मागणी करणे, परंतु शासनामार्फत धोकादायक इमारतीमधील नागरिकांसाठी अद्यापपर्यंत | डॉ. बालाजी किणीकर, वि.स.स. | दिनांक १४ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | पर्यायी व्यवस्था न करण्यात येणे, उल्हासनगरमधील कोसळलेल्या धोकादायक इमारतींचे पुनर्निर्माण करण्यासाठी ४ एफ.एस.आय. देण्याची लोकप्रतिनिधींकडून होत असलेल्या मागणीच्या अनुषंगाने मा.नगरविकास मंत्री यांनी एक समिती स्थापन करून या समितीने १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले असतानाही अद्यापही कोणतीही निर्णयात्मक कार्यवाही न होणे, धोकादायक इमारतींची पुनर्बांधणी करण्याकडे राज्य शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी नागरिकांमध्ये शासनाविरुद्ध निर्माण झालेली असंतोषाची भावना, तसेच अनधिकृत बांधकामे नियमित करण्याकरीता शासनाकडून आकारण्यात येणाऱ्या दंडाची रक्कम कमी करून लहान-मोठ्या भूखंडधारकांना न्याय देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.' | | |
| २६ | "माधुरी पाटील विरुद्ध अपर आयुक्त व महाराष्ट्र शासन (सिव्हील अपिल क्र. ५८५४ / १९९४ विशेष अनुज्ञा याचिका क्र. १४७६७ / १९९३) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे नियमन) अधिनियम, २००० आणि शासनाकडील विविध आदेश अनुषंगाने जात प्रमाणपत्र आणि वैधता प्रमाणपत्र दिले जात असणे, श्री.दिलीप विठ्ठल बांबळे विरुद्ध महाराष्ट्र शासन या विशेष अनुज्ञा याचिका क्र.११२३४-४८-२०१७ प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी निर्णय देताना हमीपत्राच्या आधारे वैधता प्रमाणपत्राशिवाय अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर शैक्षणिक संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी देण्यात आलेले प्रवेश रद्दबातल ठरविले असणे, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. एसटीसी २११९/प्र.क्र.१७९ का.१०, दिनांक १० डिसेंबर २०१९, शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर प्रवेश मिळवणाऱ्या व्यक्तीस जात वैधता प्रमाणपत्र असल्याशिवाय प्रवेश देऊ नये असे शासनाने स्पष्ट आदेश दिलेले असताना विविध शैक्षणिक संस्थांमध्ये सर्रासपणे शासन निर्णय धाब्यावर बसवून जात वैधता प्रमाणपत्रे सादर न करणाऱ्या विद्यार्थ्यांना संरक्षण दिले जात असणे, तसेच ज्या विद्यार्थ्यांकडे वैधता प्रमाणपत्र नाही परंतु त्यांच्या कुटुंबातील सदस्य यांचेकडे | श्रीमती मंजुळा गावीत, वि.स.स. | दिनांक १४ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | वैधता प्रमाणपत्र आहे अशा विद्यार्थ्यांना अटी शर्तीच्या अधीन राहून वैधता प्रमाणपत्र मा.न्यायालयाकडून दिली जात असल्याने अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर बनावट उमेदवार प्रवेश घेत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे आदिवासी विकास विभागाने अशा विद्यार्थींचे व कुटूंबियांचे मूळ वैधता प्रमाणपत्र पुनःश्च तपासण्याबाबत अथवा पुनर्विलोकन करण्याची तसेच मा.सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| २७ | "राजगुरुनगर नगरपरिषद हद्दीतील गट नंबर ३१४/१ व ३१४/३ मध्ये बांधकाम सुरू आहे, सदर विकासकाने सन २०१४ साली क्षेत्र १२ आर चा नकाशा मंजूर करताना मो.र.न.१०३४८/१३ हा मोजणी नकाशा जोडून बांधकाम परवानगी मिळविणे, तसेच सन २०१७ साली संबंधित जागा मालक व विकासकाने सन २०१३ सालच्या मोजणीची बनावट प्रत बनवून त्यावर शासनाचे व भूमि अभिलेख कार्यालयाचे बनावट सही शिक्के तयार करून २४ आर क्षेत्राचा आराखडा व बांधकाम परवानगी राजगुरुनगर नगरपरिषद यांच्याकडून मिळविली असणे, गट नंबर ३१४ ला लगत महाराष्ट्र शासनाचा गट नंबर ३०७ हा हुतात्मा राजगुरू स्मारकाचा असणे, त्यामुळे गट नंबर ३१४ ला लागून ३०७ हा गट दाखवायला हवा परंतु सदर विकासकाने केलेल्या मोजण्यामध्ये लगत धारकामध्ये कुठेच ३०७ हा गट दाखवला गेला नसणे, तसेच शासनाची जागा बळकावून तेथे वाणिज्य स्वरूपाची इमारत उभी केली तसेच सदर बांधकाम परवानगी मिळवताना सादर केलेली कागदपत्रे ही बनावट व क्षेत्र १२ आर ची असून त्यावर क्षेत्र २४ आर ची बांधकाम परवानगी राजगुरुनगर नगरपरिषदेकडून मिळविणे, सदर बाब तत्कालीन मुख्याधिकारी, श्री.प्रकाश पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली असता मुख्याधिकारी यांनी कोणतीही कारवाई न केल्याने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन ९३२९९/२०२० दाखल केले असता मुंबई उच्च न्यायालयाने सर्व तक्रारी अर्ज मुख्याधिकारी राजगुरुनगर नगरपरिषद यांना सुनावणी घेऊन आठ आठवड्यात निकाली काढण्याचे आदेश दिले गेले असणे, त्यानुसार मुख्याधिकारी प्रकाश पाटील यांनी सुनावणी घेऊन तक्रारदाराने दिलेले पुरावे व सादर | श्री. दिलीप मोहिते-पाटील, ॲड. अशोक पवार, डॉ. किरण लहामटे, वि.स.स. | दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | केलेले लेखी युक्तिवाद यांच्यातील ठराविक मुद्दे घेऊन उपस्थित केलेल्या तक्रारी या दुसऱ्या कार्यालयाच्या असून त्याचा या कार्यालयाशी काही संबंध नाही असे सांगण्यात येणे, तसेच राजगुरुनगर नगरपरिषदेच्या कार्यालयाशी संबंधित असलेले कागदपत्रे व पुरावे विचारात न घेता विकासकाबरोबर मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण-घेवाण करून विकासकाच्या बाजूने निकाल देत तक्रारदार यांच्या म्हणण्यात कोणतेही तथ्य नाही असे कळविणे, तरी विकासकाने सादर केलेले बनावट नकाशे राजगुरुनगर नगरपरिषदेचा डीपी प्लॅन त्यामध्ये ३१४ लगत असणारा शासनाचा ३०७ गट असुन त्यामध्ये मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले आहे, तसेच क्षेत्र २४ आर चे चलन हे करोडो रुपयाचे असताना शासनाच्या रहिवाशी आदेशाचा वाणिज्य वापरासाठी चुकीचा वापर करून करोडो रुपयाचा नगरपरिषदेचा महसूल बुडवला असणे, सादर केलेली बनावट फायर एनओसी व तहसील कार्यालयातून बनावट सनद मिळवून त्या सर्व ठिकाणी बिगर शेती आदेश वापरून बँकांकडून कर्ज उपलब्ध करून घेतले असणे, तसेच बनावट कागदपत्रांच्या आधारे तहसीलदारांनी दिलेली सनद त्यांच्या कार्यालयाकडून दिनांक २४ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या आदेशाने रद्द करण्यात आली असणे, भूमी अभिलेख कार्यालयाचे रेकॉर्ड गहाळ करणे त्यामुळे संबंधित विकासकाने विविध ठिकाणी व वेगवेगळ्या प्रकल्पामध्ये भूमी अभिलेख कार्यालयाचे शिक्के व राजमुद्रा बनविल्याचा अहवाल भूमी अभिलेख कार्यालयाने देणे, देशासाठी हसत हसत बलिदान देणारे राजगुरूनगर येथील भूमिपुत्र "हुतात्मा राजगुरू स्मारक" साठी महाराष्ट्र शासन यांचे जागेत सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामामुळे नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, अनधिकृत बांधकाम काढून टाकून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २८ | "नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी-त्र्यंबकेश्वर या आदिवासी मतदार संघात सन २००९ ते २०१४ या कार्यकाळात आदिवासी जलसिंचन उपसा योजना या देवमोगरा सेवाभावी संस्थेमार्फत कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याप्रकरणी दिनांक ८ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या सुमारास मा. उपमुख्यमंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदन देण्यात येणे, सदर प्रकरणासंदर्भात चौकशी सुरु असतांना टाकेहर्ष, आवडे, टाकेदेवगाव यांना सुधारित सुप्रमा देण्यात येणे, मा.सहा.गुणनियंत्रण अधिकारी, दक्षता व गुणनियंत्रण पथक, मृद व जलसंधारण, औरंगाबाद येथील अधिकारी यांनी दिनांक ८ व ९ सप्टेंबर, २०२१ रोजी केलेल्या पाहणी दौऱ्यात १९ पैकी १४ योजना अपूर्ण अवस्थेत असल्याचे आढळून येणे, या सर्व योजना अपूर्ण असतांनाही कोट्यावधी रुपयांची देयके काढण्यात येऊन मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करणे, यासंदर्भात सर्वसामान्य जनतेने तसेच आदिवासी कोळी महादेव समाज विकास संघटना तसेच विविध आदिवासी संघटनेच्या वतीने मा.मंत्री, राज्यमंत्री यांच्याकडे तक्रारी देऊनही कोणतीच कारवाई होत नसल्याने सर्वसामान्य जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करून संबंधित दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व उपाययोजना.'' | श्री. हिरामण खोसकर, वि.स.स. | दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |
| २९ | "जागतिक युवा तंबाखू सर्वेक्षणामध्ये राज्यातील १३ ते १५ वयोगटातील ५.१ टक्के बालके तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करीत असल्याचे निदर्शनास येणे, तसेच १८ वर्षांखालील मुलांना तंबाखूजन्य पदार्थ विकण्यास कोटपा कायद्याअंतर्गत बंदी असतानाही त्याचे पालन होत नसल्याचे निदर्शनास येणे, त्यामध्ये शहरी भागातील बालकांच्या तुलनेत ग्रामीण भागातील बालकांना याचे व्यसन झपाट्याने लागत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे बालकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता, बालकांना व्यसनापासून परावृत्त करण्यासाठी त्यांच्यात जागृती करण्याची गरज, कोटपा कायद्याचे पालन न करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. अतुल भातखळकर, योगेश सागर, वि.स.स. | दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र.<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| ३० | "राज्यात पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयउचित लोकसेवा देण्याकरीता आणि त्यासंबंधीत बाबींकरीता तरतूद करण्यासाठी दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी महाराष्ट्र लोक हक्क अधिनियम, २०१५ प्रस्थापित करण्यात आला जेणेकरुन नागरीकांना शासकीय कर्मचारी व अधिकारी यांचेकडून कामकाजामध्ये होणाऱ्या दप्तर दिरंगाईस आळा बसावा व विहित कालावधीमध्ये सेवा पुरविण्यात यावी हा मुख्य उद्देश असणे, परंतु प्रत्यक्षात मात्र शासनाच्या कोणत्याही विभाग व कार्यालयांमध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाप्रमाणे कामकाज होत नसून त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास होत असणे, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ नुसार कोणत्याही साध्या संचिकेवर / प्रकरण / पत्र निर्गमित करण्याकरीता ७ दिवसांत, त्वरीत / तात्काळ संचिकेवर १ दिवसात, तातडीच्या संचिकेवर ४ दिवसांत, खात्यांअतर्गत संचिकेवर ४५ दिवसांत व विविध खात्यांशी संबंधीत ३ महिन्यांच्या आत निर्णय देणे बंधनकारक आहे, परंतू प्रत्यक्षात मात्र या कालमर्यादेचे पालन होत नाही, याबाबत महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमामध्ये नमूद केलेल्या तरतूदीनुसार संबंधीत अधिकारी किंवा कर्मचारी यांनी त्यांना नेमून दिलेले काम किंवा त्यांच्याशी संबंधीत काम पार पाडण्यात, कसूर केल्यास किंवा जाणून बुजुन किंवा हेतूपुरस्सर विलंब केल्यास महाराष्ट्र हक्क अधिनियम कलम १२ पोट-कलम (१) अन्वये, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अन्वये शिस्तभंगांच्या कारवाईस पात्र राहतील अशी तरतूद असतानाही याबाबत कोणतीही कार्यवाही संबंधित विभागांकडून न होणे, राज्यात सदरील अधिनियमाचा भंग झाला असल्यास सर्वच विभागांमध्ये किती अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्यात आली आहे किंवा कसे, यासंदर्भातील माहिती देण्याची आवश्यकता, या सर्व बाबी विचारात घेता राज्यात सामान्य नागरीक, सामाजिक कार्यकर्ते व लोकप्रतिनिधी यांना वेळेत लोकसेवा देण्याकरीता महाराष्ट्र लोक हक्क अधिनियम, २०१५ ची प्रभावीपणे अंमलबजावणी शासनाने करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स. | दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| ३१ | "जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, गोरेगाव (पूर्व), मुंबई येथील जागृती रुग्णालयाच्या प्रमुख प्रसिद्ध कर्करोग व गायनाकॉलॉजीस्ट विशेषज्ञ व मुंबईसह, देशभरात विविध रुग्णालयात गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणाऱ्या सुप्रसिदध डॉक्टर मिनल कांबळे यांची बजाज फिनसर्व्ह फायनान्स कंपनींने स्थानिक पोलीसांबरोबर संगनमत करून कॅन्सर रुग्णालय म्हणुन सुरु असलेला त्यांचा सुचीधाम संकुलातील बंगला बळकावून बेकायदेशीररित्या एन्कॅार कंपनीला विक्री करून आर्थिक घोटाळा केल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक २१ फेब्रुवारी, २०२२ रोजी निदर्शनास येणे, सदरहु महिला डॉक्टरने ३ कोटी ६ लाखापैकी ५० टक्के कर्ज अदा केले असतानाही डॉक्टर महिलेचे कॅन्सर रुग्णालय सुरु असलेला दिडोंशी, सुचीधाममधील बंगला बजाज फिनसर्व्ह फायनान्स कंपनीने कागदोपत्री कर्ज थकीत दाखवून, व मालमत्ता सर्फेसींग कायदा, १९८९ चे उल्लंघन व स्थानिक पोलीसांबरोबर संगनमत करून व मा.न्यायालयाची दिशाभूल व फसवणुक करून बंगला जप्तीचे आदेश मिळवून सदरहू महिला डॉक्टरचे हात बांधुन मारहाण करून शारीरीक व मानसिक छळवणुक करून सदरहू बंगला बेकायदा जप्त केल्याची धक्कादायक घटना घडणे, सदरहु प्रकरणी दिनांक ३१ मार्च, २०२१ व दिनांक ४ जून, २०२१ रोजी ॲट्रॉसिटी ॲक्ट अन्वये दाखल गुन्ह्यांवर पोलीसांनी, संबंधित २९ आरोपींना अटक करून त्यांचेविरुद्ध मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करणेबाबत अद्याप पोलीसांनी कोणतीच कार्यवाही न करणे, यासंदर्भांत दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी संबंधित पोलीस अधिकारी यांनी शासनास सादर केलेला अहवाल चुकीचा व दिशाभूल करणारा आणि अर्धसत्य माहितीवर आधारीत असणे, राज्यातील महिलांना सुरक्षा प्रदान करणे व त्यांना न्याय देण्यासाठी नुकतेच आंध्रच्या धरतीवर शक्ती कायदा मंजुर केला असताना, कॅन्सर व गायनाकॉलॉजीस्ट तज्ञ डॉक्टरची मालमत्ता बळकावून त्यांचा मानसिक व शारीरीक छळ करून झालेला अन्याय, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. | दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| ३२ | "जळगांव जिल्ह्यातील मुक्ताईनगर तालुका महाराष्ट्र राज्य व मध्यप्रदेशच्या सीमारेषेवर असल्याने या भागात परप्रांतीयांचे अवैध धंदे सुरु असून त्या माध्यमातून तालुक्यातील गुन्हेगारी वाढत असल्याचे निदर्शनास येणे, गेल्या काही काळापासून पोलीसांच्या दुर्लक्षामुळे किंवा आर्थिक हितसंबधामुळे आदिशक्ती श्री संत मुक्ताईच्या पुण्यभूमीमध्ये गुन्हेगारी वाढतांना दिसून येणे, तसेच गावठी कट्टे, हत्यारांची तस्करी, शहरातील भर चौकात तीक्ष्ण हत्यारांचे वार, अवैधरित्या बंदुकीच्या माध्यमातून दहशत माजविण्याचे प्रकार, इतर तालुका व जिल्ह्यातील तडीपार, मोक्का लावलेल्या गुन्हेगारांचा मुक्त संचार, मागील काळात एका गुन्हेगारांकडे गावठी कट्टा आढळून आल्याबाबतचे प्रकरण दडपण्यात येणे, दिनांक ६ नोव्हेंबर, २०२१ रोजी मुक्ताईनगर तालुक्यातील हलखंडा येथे जबरी दरोडा टाकून एका व्यक्तीचा खून होणे, त्याच दिवशी याच तालुक्यातील कोथळी या गावात श्री. विनोद शिंदे यांच्याकडे दरोडा, दिनांक १० नोव्हेंबर, २०२१ रोजी कुऱ्हा, ता.मुक्ताईनगर येथे दिनेश जयस्वाल यांचे घरावर दरोडा, गेल्या महिन्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी मुक्ताईनगर शहरात अवैध बनावट दारु विक्रेत्यावंर कारवाई करणे तसेच याच तालुक्यात अवैध बनावट दारुचा कारखाना सुद्धा उद्धवस्त करण्यात येणे, परंतु पोलीस निरिक्षकांकडून आजपावेतो अशी कुठलीच कारवाई होताना दिसत नसल्याने या अवैध धंदे व अवैध बनावट दारु विक्रेत्यांशी अर्थपूर्ण संबध असल्याचा सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण होत असलेला संशय, याकरिता शासनाने मुक्ताईनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक यांचेवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कारवाई." | श्री. चंद्रकांत निंबा पाटील, वि.स.स. | दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |
| ३३ | "धुळे जिल्ह्यातील सुलवाडे, जामफळ-कनोली उपसा सिंचन योजनेंतर्गत शेती संपादित केली असून त्यात धुळे तालुक्यातील वेल्हाणे, कुंडाणे, बाबरे येथील शेतकऱ्यांना अत्यल्प निवाडा घोषित करणे व आश्वासन देऊनही प्रशासनाने निवाडा दुरुस्तीबाबत कोणतीही ठोस कार्यवाही न करणे, प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहीत केल्या मात्र मोबदल्याबाबत प्रत्येक भागातील शेतकऱ्यांना वेगवेगळा मोबदला देणे, सोनगीर व | श्री. कुणाल पाटील, वि.स.स. | दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | सोंडले शिवारात २० ते २५ लाख रुपये एकरी भाव असताना ५ लाख रुपये देखील एकरी भाव न देणे तसेच विहीरी, फळझाडे, घर, बोअरवेल शेड यांचे योग्य मोबदल्यासाठी मुल्यमापन केले जात नसल्याने स्थानिक शेतकऱ्यांनी माहे जानेवारी, २०२२ च्या पहिल्या आठवडयादरम्यान धरणाचे काम बंद पाडून बेमुदत धरणे आंदोलन सुरु करणे व याबाबत जिल्हाधिकारी, धुळे यांना निवेदन देण्यात येणे, तसेच जवाहर सामाजिक कृतज्ञता ट्रस्ट, धुळे या ट्रस्टने धुळे तालुक्यातील अनेक दुष्काळी गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर सिंचनासाठी काम केले असून सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजनेतून दुष्काळी गावांसाठी लाभ देणे शक्य असल्याचा प्राथमिक अभ्यास केलेला असणे, शासनाने बंद पाईपद्वारे सिंचन सुविधा देणेबाबत निर्णय घेतलेला असणे, त्यामुळे प्रकल्पाच्या पाणी वापरात निश्चितपणे बचत होणे, सदर बचतीतून धुळे तालुक्यातील दापुरा, सरवड, लोणकुटे, कापडणे, धमाणे, धमाणी, नगाव बु., बिलाडी, कुंडाणे, वरखेडे व बाळापुर या १० गावातील ४० बंधारे भरल्यास सदर गावांमधील सिंचन व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटू शकणे, या बाबींकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |
| ३४ | “मुंबई हे बेटांचे शहर असणे, या शहरात १६००० पेक्षा जास्त उपकर प्राप्त इमारती जुन्या व जीर्ण असून मोडकळीस आलेल्या असणे, सदर इमारतींना दुरुस्तीची किंवा पुनर्विकास करण्याची गरज असणे, त्यातील जास्तीत जास्त इमारती या दक्षिण मुंबई विभागात असणे, मुंबई शहरात संक्रमण शिबिरांची संख्या खूप कमी असणे, त्यातच म्हाडाच्या कर्मचारी वर्गाची संख्या देखील कमी असणे, विशेषतः मुंबादेवी विधानसभा विभागात अनेक पदे रिक्त असणे, त्यामुळे जुन्या व जीर्ण इमारतींचे सर्वेक्षण वेळेत न होणे, इमारतींच्या दुरुस्तीसाठी म्हाडाकडे निधी उपलब्ध नसणे, कामाठीपुरा परिसराचा पुनर्विकासाचा प्रश्न ऐरणीवर असणे, परंतु आजमितीपर्यंत त्यावर कार्यवाही न होणे, परिणामी इमारतींच्या दुरुस्ती व पुनर्विकासात होत असलेल्या दिरंगाईमुळे नागरिकांत पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | श्री. अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री. हिरामण खोसकर, संग्राम थोपटे, कुणाल पाटील, झीशान सिद्दिकी, कुमारी प्रणिती शिंदे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. धिरज देशमुख, सुरेश वरपुडकर, विकास ठाकरे, अमित झनक, लहू कानडे, सुभाष धोटे, विक्रमसिंह सावंत, बळवंत वानखडे, अबू आजमी, वि.स.स. | दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| ३५ | जोगेश्वरी विधानसभा क्षेत्र हे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'के' पूर्व व 'पी' दक्षिण गोरेगाव या दोन कार्यालयांशी जोडलेले असणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे के/पूर्व कार्यालय अंधेरी (पूर्व) येथे कार्यरत असून त्याअंतर्गत येणाऱ्या एकूण १५ प्रभागांपैकी ७२, ७३, ७४, ७७, ७८, ७९ असे सहा प्रभाग जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील असणे, तर पी / दक्षिण हे कार्यालय गोरेगाव (पश्चिम) येथे कार्यरत असून त्याअंतर्गत येणाऱ्या एकूण ८ प्रभागांपैकी ५२ व ५३ हे दोन प्रभाग जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील असणे, जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रापासून बृहन्मुंबई महानगरपालिकेची के / पूर्व व पी / दक्षिण ही दोन्ही कार्यालये जवळपास ८ ते ९ कि.मी. दूर असल्याने या कार्यालयात कामानिमित्त जाणाऱ्या नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून तेथे ये-जा करण्यात त्यांच्या वेळेचा अपव्यय होत असल्याने नागरिक त्रस्त होणे, त्यानुषंगाने जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील आजगावकर मैदान येथील प्लॉट क्रमांक ५१ व ५२ येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नविन कार्यालय सुरू करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली असता सदरहू बाब तांत्रिक स्वरूपाची व धोरणात्मक असल्याने या प्रकरणी व्दसिदस्यीय समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर कारवाई करण्यात येईल असे सह आयुक्त (सा.प्र.) यांनी कळविलेले असणे, उक्त जागेवर बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नवीन विभागीय कार्यालय सुरू होण्यास होत असलेला विलंब तसेच या प्रकरणी येत असलेल्या तांत्रिक अडचणी लक्षात घेता जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील पुनमनगर येथे नव्याने तयार करण्यात आलेल्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मजास मंडई या १० मजली इमारतीत बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नवीन विभागीय कार्यालय सुरू करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये केलेली असणे, तसेच याआधी तेथे अगोदर इमारत प्रस्ताव विभागाचे कार्यालय सुरु असणे, सद्यःस्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिकेतील प्रभागांच्या नविन रचनेनुसार विभाग कार्यालयांचे विभाजन व पुनर्रचना करण्याकरिता गठीत करण्यात आलेल्या दोन उपायुक्तांच्या समितीने दिलेल्या अहवालावर विविध गटनेत्यांनी अनेक हरकती, मुद्दे | श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. | दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | व सूचना उपस्थित केलेल्या असणे, या प्रकरणी दोन सह आयुक्तांच्या समितीकडून अहवाल मागविण्यात आला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, तथापि सदरहू समितीने आपला अहवाल शासनास अथवा बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनास सादर केलेला नसणे, या प्रकरणी अहवाल सादर करण्यास होत असलेला विलंब लक्षात घेता संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून त्यांचेवर कारवाई करून अहवाल लवकरात लवकर सादर करण्याबाबत समितीस निर्देश देण्याबाबत. मा. मुख्यमंत्री यांच्या समवेत पार पडलेल्या बैठ्कीत या प्रस्तावाला संमती देण्यात आली असून मुंबई उपनगर पालकमंत्री यांच्या बैठ्कीत मनपा आयुक्तांनी या मागणीला दुजोरा देणे, असे असतानाही जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील पुनमनगर येथे नव्याने तयार करण्यात आलेल्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मजास मंडई या १० मजली इमारतीत बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नविन विभाग कार्यालयाच्या निर्मितीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून शासन व बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडे वारंवार मागणी करण्यात येणे, या प्रकरणी नविन विभागीय कार्यालयाच्या निर्मितीस मंजूरी मिळणेबाबत होत असलेल्या विलंबामुळे स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण होत असलेली संतापाची भावना, शासनाने या प्रकरणी तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |
| ३६ | "राज्यातील गोरगरीब आदिवासी जनतेचे बळजबरीने आमिष दाखवून व त्यांना आरोग्याच्या सेवा देऊन होणारे धर्मांतरण रोखण्याकरिता भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४१ व ३४२ मध्ये सुधारणा करणे आवश्यक असणे, रामायण, महाभारतापासून छत्रपती शिवाजी महाराज, महाराणा प्रताप, झाशीची राणी लक्ष्मीबाई या काळातील आदिवासींचा मोठा इतिहास व पराक्रम असणे, निसर्गप्रेमी आदिवासी समाज खेड्यापाड्यांमध्ये ११ टक्क्याच्या आसपास असून आरोग्य व अन्य सेवा देण्याच्या नावावर आमिष दाखवून बळजबरीने आदिवासींचे धर्मांतरण करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास येणे, परिणामी देशातील पुरातन आदिवासी संस्कृती नष्ट होत असणे, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४१ अन्वये अनुसूचित जातीचा माणूस धर्मांतरीत होउन मूळ संस्कृतीपासून दूर गेला तर त्याच्या | डॉ. अशोक उईके, वि.स.स. | दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | अनुसूचित जातीच्या सवलती बंद होणे, तथापि, कलम ३४२ नुसार अनुसूचित जमातीची व्यक्ती धर्मांतरीत होऊन मूळ संस्कृतीपासून दूर गेली तरी त्यांच्या अनुसूचित जमातीच्या सवलती बंद होत नसणे, उलट हा धर्मांतरित आदिवासी व्यक्ती अनुसूचित जमातीचा व अल्पसंख्यांक अशा आरक्षणाचा दुहेरी लाभ घेत असणे, त्यामुळे अनुसूचित जमातीच्या व्यक्तीने कोणत्याही कारणास्तव धर्मांतर केल्यास त्याला अनुसूचित जमातीचे आरक्षण बंद करण्याच्या दृष्टीने संविधानाच्या अनुच्छेद ३४१ व ३४२ मध्ये उचित सुधारणा करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ३७ | "शाहुवाडी तालुक्यामधील २६८ पैकी ३४ प्राथमिक शाळा अत्यंत दुर्गम व डोंगराळ क्षेत्रात ज्ञानदानाचे कार्य करत असणे, दुर्गम व डोंगराळ क्षेत्र असल्याने सदर शाळेतील शिक्षक पदे नेहमी रिक्त राहणे, सुगम शाळेतील शिक्षकांची दहा वर्षे बदली होत नसणे, शिक्षक या शाळा स्वीकारण्यास नकार देणे याउलट दुर्गम शाळेतील शिक्षकांची तीन वर्षानंतर विनंती बदली होत असल्याने अनेक शिक्षक दुर्गम शाळा स्वीकारण्याची शक्यता असणे, सध्या तालुक्यात २६८ प्राथमिक शाळेत मंजूर शिक्षकांची ९०० इतकी पदे असून त्यापैकी २३० इतकी पदे रिक्त असणे, त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, शासनाने शाहूवाडी तालुक्यातील दुर्गम शाळा निकषांमध्ये बसणाऱ्या १६६ गावातील शाळा दुर्गम व अवघड क्षेत्र म्हणून घोषित केल्यास अधिकाधिक रिक्त पदे भरण्यास मदत होणे व त्यामुळे रिक्त पदाचा प्रश्न मिटेल व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नसून तालुक्याचा शैक्षणिक दर्जा उंचावेल याकडे शासनाने प्राधान्याने लक्ष घालण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | डॉ. विनय कोरे, वि.स.स. | दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली.. |
| ३८ | "नाशिक जिल्ह्यातील नांदगांव क्षेत्राची भौगोलिक स्थिती पाहता गावा-गावातील अंतर मोठ्या प्रमाणात असणे, ग्रामस्थांची प्रशासकीय कामाबाबत गैरसोय होणे, त्यामुळे गोरगरीब ग्रामस्थांना उदरनिर्वाहासाठी ८ ते ९ महिने बाहेर गावी जाणे लागणे, ग्रामपंचायत असलेल्या गावांना वाडी व तांडे यामध्ये राहणाऱ्या रहिवाश्यांना त्यांची कामे वेळेवर करण्यास मोठ्या | श्री. सुहास कांदे, वि.स.स. | दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | प्रमाणात आजमितीपर्यंत त्रास सहन करावा लागणे, या त्रासातून त्यांची मुक्तता व्हावी याकरीता व या परिसरातील ग्रामस्थांची अनेक कामे विना विलंब होण्याकरीता व त्यांची होत असलेली गैरसोय दूर व्हावी म्हणून नांदगाव या क्षेत्रातील वाडी व तांड्या वस्तीशी संलग्न असलेल्या ग्रामपंचायती विभक्त करून देणे या अनुषंगाने शासनाने तात्काळ निर्णय घेऊन त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता.'' | | |
| ३९ | "पुणे जिल्ह्यातील लोणावळा नगरपरिषद (ता.मावळ) प्रशासनाने नगरपरिषदेचा कोणताही ठराव पारीत न करतांच संबंधित कंत्राटदारास माहे मे, २०१२ मध्ये रुपये १.५० कोटी अदा केले असल्याचे निदर्शनास येणे, सदर नगरपरिषदेने कोणतीही कामे वा साहित्य लोणावळा नगरपरिषदेकडे उपलब्ध न केल्यामुळे सन २०१६ सालापर्यंत सुमारे रुपये ८ कोटीहून अधिक रक्कमेचे आर्थिक नुकसान झाल्याचे निदर्शनास येणे तसेच त्याबाबत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मागविण्यात आलेल्या माहितीद्वारे ही बाब उघडकीस येणे, मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी त्यांचे दिनांक २९ जानेवारी, २०२० रोजीच्या पत्रान्वये तसेच मा.लोकआयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचेकडे तक्रारी दाखल केल्या असल्याचेही निदर्शनास येणे, सदर प्रकरणी मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याप्रकरणी व त्याबाबत तक्रारी दाखल करुनही १ वर्षापेक्षा अधिक कालावधी होऊनही कार्यवाही न होणे व त्यामुळे मा.लोकप्रतिनिधींसह सर्वसामान्य जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने केलेली कार्यवाही व उपाययोजना." | श्री. सुनिल शेळके, वि.स.स. | दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |
| ४० | "पाटोदा (जि.बीड) येथील नगरपंचायत हद्दीत मांजरा नदीवरील ब्रीज कम बंधारा कामासाठी शासनाने २ कोटी ९२ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करणे, सदर कामाच्या ई-निविदासाठी अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यतेचा अधिकार नसताना देखील सा.बां.विभागाच्या अधिक्षक अभियंता, उस्मानाबाद यांची तांत्रिक मान्यता सादर करणे, परंतु सा.बां.विभागाच्या अधिक्षक अभियंता, उस्मानाबाद यांनी सदर कामास तांत्रिक मान्यता दिली नसल्याचे लेखी पत्र देणे, | सर्वश्री. प्रकाश सोळंके, संदिप क्षिरसागर, बाळासाहेब आजबे, वि.स.स. | दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | एकंदरीत सदर ई-निविदा बोगस पद्धतीने करणे, प्रत्यक्ष अंदाजपत्रकानुसार काम न करता २ कोटी ६० लक्ष रुपयांचे देयक अदा होणे, यामध्ये तत्कालीन नगराध्यक्ष, मुख्याधिकारी, नगर अभियंता व ठेकेदार यांनी संगनमत करून भ्रष्टाचार करणे, या कामासाठी अतिरिक्त १ कोटी रूपयांच्या निधीची मागणी करणे, दरम्यान या नगरपंचायतच्या सन २०१७ ते २०२१ या ५ वर्षांच्या कालावधीमध्ये विविध सार्वजनिक व मुलभूत योजनेच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता व भ्रष्टाचार होणे, एकंदरीत या नगरपंचायतचे सन २०१७ ते २०२१ या कालावधीमधील विशेष लेखापरिक्षण करण्याची आवश्यकता असणे, तसेच बंधारा कम ब्रिज कामाच्या अपहार प्रकरणी दोषी विरुद्ध फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करून अपहाराची रक्कम शासनाने वसूल करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| ४१ | "विदर्भात तसेच अमरावती जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सिंचनाचा अनुशेष असणे, अमरावती विभागातील अंदाजे १०० हुन अधिक लघु व मध्यम प्रकल्पांना पंतप्रधान पॅकेज अंतर्गत सन २००६ ते २००८ या काळात मान्यता प्रदान झालेली असणे. सदर मान्यता प्रदान करण्यात आलेले सिंचन प्रकल्प लवकरात लवकर पूर्णत्वास जावे या हेतूने प्रकल्पाकरिता आवश्यक असणारी जमीन व घरे भूसंपादन कायदा १९८४ अन्वये संपादित न करता सरळ खरेदी पद्धतीने प्रत्यक्ष जमीन खरेदी केलेली असणे, सिंचन प्रकल्पात जमिनी गेलेल्या अनेक शेतकऱ्यानी प्रशासनाला सहकार्य करून १२ हेक्टरहून अधिक प्रमाणात जमिनी शासनास हस्तांतरीत केलेल्या असणे, परंतु जमिनी संपादित केलेल्या असताना प्रत्यक्ष वाटाघाटी न होणे, ग्रामपंचायतीस विश्वासात न घेणे, कुठलीही पूर्वसूचना न देणे, संमतीपत्र वा खरेदी खताचा मसुदा न करणे, त्यास कायदेशीर अनुमती न घेणे, शासनाकडून मार्गदर्शक तत्वे न मागवणे, पुनर्वसन अनुदानाकरिता सूचना न देणे, अनुमती न देणे, खरेदीखत मसुद्यास शेतकऱ्याची मान्यता न घेणे, अशा अनेक प्रकारच्या त्रुट्या अलीकडच्या काळात दृष्टीक्षेपात येणे, भूसंपादन पुनर्वसन पुनःस्थापना अधिनियम २०१३ हा कायदा मंजूर होऊन दिनांक १ जानेवारी, २०१४ रोजी अंमलात आलेला असणे, एकाच प्रकल्पावर सरळ खरेदी करण्यात | श्री. बळवंत वानखेडे, वि.स.स. | दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | आलेल्या शेतकऱ्याला रु.८०,०००/- प्रती एकर ते २ लक्ष प्रती एकर एवढा मोबदला देण्यात आलेला असणे, परंतु ज्या शेतकऱ्यानी सरळ खरेदीस विरोध करून अन्य मार्गाने खरेदी केल्याने त्यांना १२ ते १४ लक्ष प्रती एकर एवढा मोबदला दिलेला असणे, याबाबत वारंवार विविध प्रकल्पग्रस्त संघर्ष समित्यांमार्फत विविध प्रकारे शासनाला न्याय देण्याची मागणी केलेली असणे, परंतु अद्यापपर्यंत सदर प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळालेला नसल्याने प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्या निकाली काढण्यासाठी विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी अमरावती यांच्या कार्यालयासमोर प्रकल्पग्रस्तांचे दिनांक ४ मार्च, २०२२ पासून अनिश्चित काळाकरिता प्राणांतिक महाउपोषण सुरु असणे, परंतु अद्यापही सदर प्रकरणी तोडगा न निघाल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ४२ | "महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांसाठी केंद्र शासनाने सुरू केलेल्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM KISAN) या योजनेच्या कामकाजावर तहसिलदार व नायब तहसिलदार संघटना, महाराष्ट्र राज्य व महाराष्ट्र राज्य तलाठी संघ यांनी सन २०२१ मध्ये बहिष्कार घातला असणे, सदरील योजनेतील अनेक शेतकऱ्यांच्या त्रुटीची पूर्तता होत नसल्याने अनेक शेतकरी या योजनेच्या मंजुरीपासून तसेच नियमित मिळत असलेल्या मदतीपासून वंचित राहत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये निदर्शनास येणे, सदर योजनेचे महसूल विभागाच्या पातळीवरील १००% कामकाज पूर्ण झाल्याने सदरील योजना तांत्रिक अडचणीसंदर्भात कामे व योजना राबविण्याबाबतची कार्यवाही कृषी विभागाने करावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य तलाठी व पटवारी मंडळ यांनी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये निवेदनाद्वारे केली असणे, मा. कृषी मंत्री महोदय यांनी सदरील योजना कृषी विभागामार्फत राबविली जाईल अशी घोषणा करणे, महसूल विभागाने सदरील कामकाजावर बहिष्कार घातला असल्याने व ही वेबसाईट बंद असल्याने शेतकऱ्यांची त्रुटी पूर्तता होत नसल्याने तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या खात्यात मदत जमा होत नसल्याने शेतकरी तहसील कार्यालयात खेटे मारत असणे, महसूल विभागाकडून | सर्वश्री. अभिमन्यु पवार, देवेंद्र फडणवीस, ॲड राहूल कुल, श्री. जयकुमार गोरे, वि.स.स. | दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र.<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | त्यांच्या प्रश्नांची दखल घेतली जात नसणे, राज्यातील अनेक शेतकरी या योजनेपासून वंचित असणे, नगरपालिका, महानगरपालिका व नगरपंचायत मधील रहिवाशी शेतकरी या योजनेपासून वंचित असणे, परिणामी शेतकरी वर्गात तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, सदरील योजना सक्षमरित्या राबविण्यासाठी या योजनेसाठी राज्य शासनाने पूर्णवेळ अधिकारी व कर्मचारी नियुक्त करून सदरील योजनेत राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा समावेश करण्याबाबत व त्यांच्या त्रुटीची पूर्तता करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| ४३ | "गुरुवर्य कै. लक्ष्मणरावजी इनामदार उपसा सिंचन योजना, जिहे-कठापूर, सातारा या प्रकल्पामुळे माण व खटाव तालुक्यातील दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना लाभ होणार असणे, या योजनेमुळे माण व खटाव तालुक्यातील २७५०० हजार हेक्टर क्षेत्र ओलीताखाली येऊन दुष्काळी तालुक्यातील शेतकऱ्यांना फायदा होणार असणे, त्यासाठी सुमारे ७०० कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित असणे, सदरचा प्रकल्प दुष्काळी भागातील असल्याने राज्य शासन हा प्रकल्प कधीपर्यंत पूर्ण करणार व त्यास कसा निधी उपलब्ध करून दिला जाणार याबाबत काहीही नियोजन सरकारने जाहीर केलेले नसणे, याबाबतची वर्षनिहाय आकडेवारी देण्याची आवश्यकता असणे, तसेच प्रकल्प पूर्ण करणेसाठी कालबद्ध कार्यक्रम हाती घेण्याची आवश्यता असून यामुळे माण व खटाव तालुक्यातील जनतेला दिलासा मिळणार असून, या कामांची उर्वरित निविदा काढण्यात असंख्य दिरंगाई होत असून त्वरित निविदा काढण्याची आवश्यकता असणे, या योजनेचा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेमध्ये समावेश करणेचा प्रस्ताव प्रलंबित असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. जयकुमार गोरे, अभिमन्यु पवार, ॲड. राहूल कुल, वि.स.स. | दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |
| ४४ | "हिंगोली जिल्ह्यातील सिंचनाचा अनुशेष भरुन काढणे व इतर मागण्यांकरिता दिनांक २ जानेवारी, २०२२ रोजीपासून हिंगोली जिल्हा सिंचन संघर्ष समितीतर्फे तहसिल कार्यालय, कळमनुरी येथे ट्रॅक्टर मोर्चा व इसापूर धरणाच्या उजव्या कालव्याचे गेट बंद आंदोलन सुरु असणे, जिल्ह्यात अनेक सिंचन योजना प्रस्तावित असूनही त्यावर अदयाप अंमलबजावणी | श्री. संतोष बांगर, वि.स.स. | दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | होत नसल्याचे निदर्शनास येणे, याउलट हिंगोली जवळील मौ.खरबी या गावाजवळ कयाधू नदीवर बॅरेज बांधून येथून इसापूर धरणात पाणी वळविण्याचा शासनाचा असलेला घाट, जिल्ह्यातील कयाधू नदी ही एकमेव जिवंत नदी असून हिंगोली जिल्ह्याची जीवनरेखा असलेल्या या कयाधू नदीचे पाणी वळविल्यास जिल्ह्यातील कयाधू नदी काठावरील संपूर्ण भागाचे अक्षरशः वाळवंट होण्याची निर्माण झालेली भिती, कयाधू नदी ही पुराचे पाणी आल्यावर भरलेली असते नाहीतर ती कोरडी पडत असल्याने खरबीचा बंधारा झाल्यास परिसरातील गावांना पिण्याकरिता पाणी सुद्धा मिळणे शक्य होणार नसल्याची वस्तुस्थिती असणे, याकरिता जिल्हा सिंचन संघर्ष समितीने प्रस्तावित बॅरेजला मान्यता देऊ नये याकरीता मागणी करणे, सदरहू समितीने हिंगोली जिल्ह्यातील सिंचनाचा अनुशेष भरुन काढण्याच्या दृष्टीने संबंधित विभागाकडे केलेला पत्रव्यवहार, याकडे शासनाचे जाणीवपर्वूक होत असलेले दुर्लक्ष, याकरिता हिंगोली जिल्हा सिंचन संघर्ष समितीने केलेले आंदोलन, याकडे शासनाने गांभीर्याने लक्ष घालून शासन स्तरावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.'' | | |
| ४५ | "मौजे घोडबंदर सर्व्हे नं. ७२/२, ७३/१, २, ३, ४ या भागातील मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गौरव एनक्लेव को-ऑप. हौ. या सोसायटीमध्ये राहणाऱ्या २३३ सदनिका/गाळे धारक व त्यामध्ये वास्तव्य करणारे जवळ जवळ ३००० नागरिक यांना सदर इमारत धोकादायक दाखवून तिचा पुनर्विकास करण्यासाठी महानगरपालिकेकडून रवि डेव्हलपर्स या विकासकास दिला जाणे व इमारतीतील रहिवाशांना जबरदस्तीने सदनिका खाली करण्यास भाग पाडणे, सदर सोसायटीमधील सर्व रहिवाशांना घर व दुकाने देण्याचे आश्वासन देऊन देखील अद्याप सदर अर्धवट स्वरुपात असणे, जवळपास ७ वर्षे इतक्या कालावधीत रहिवाशांना रवी डेव्हलपर्स यांनी केलेल्या करारानुसार भाडे सुद्धा न देणे, सन २०१३ ते आजपर्यंत सदर इमारतीचे बांधकाम अपूर्ण स्वरुपात असणे, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महानगर-पालिकेकडे याबाबत चौकशी करणे, मिरा-भाईदर महानगर-पालिकेडून देण्यात आलेली सदर बांधकामाची परवानगी वारंवार रद्द होणे, परिणामी सदर | श्री. रवि राणा, वि.स.स. | दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | इमारतीतील रहिवाशांचे भविष्य अंधःकारमय होणे, सदर विकासकाने रहिवाशांची केलेली फसवणूक लक्षात घेता त्यांच्यावर कडक कारवाई करून गौरव एनक्लेव को-ऑ.सो. या इमारतीतील रहिवांशाना न्याय मिळण्याबाबत होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ४६ | "राज्यातील पत्रकारांना दुर्धर आजार, अपघात झाल्यास किंवा मृत्यू झाल्यास त्यांना मदत करण्याच्या उद्देशाने शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीची स्थापना शासनाने १ ऑगस्ट, २००९ रोजी केलेली असणे, सदरील निधीतून मिळणाऱ्या मदतीच्या रकमेत शासनाने सन २०१६ नंतर वाढ केलेली नसणे, सदरील निधीतून केवळ अधिस्वीकृतीधारक पत्रकारांनाच मदत मिळत असणे, शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीसाठी राज्याच्या अर्थसंकल्पात दरवर्षी रुपये १० कोटीची कायम निधीची तरतूद करण्याची मागणी पत्रकारांची असणे, या योजनेअंतर्गत पत्रकार व त्यांच्या कुटुंबियांना मदतीस पात्र असलेल्या आजारांची संख्या वाढ करण्याची आवश्यकता असणे, पत्रकार संरक्षण कायद्याची अंमलबजावणी राज्यात कठोरपणे होत नसणे, ग्रामीण व शहरी पत्रकारांना अपघात विमा व आरोग्य विम्याची सुविधा नसणे, महात्मा फुले जन आरोग्य योजनेतून सरसकट सर्व पत्रकारांना दीड लाखांपर्यंत मोफत उपचाराची सोय उपलब्ध नसणे, या सर्व प्रश्नांची तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया." | श्री.रोहित पवार, वि.स.स. | दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |
| ४७ | "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग हा कायद्याद्वारे गठित झालेला आयोग असणे, या आयोगाच्या अध्यक्ष व इतर सदस्यांच्या नेमणुका करण्याचे अधिकार शासनास असणे व असे असताना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने विद्युत लोकपाल या पदावर नेमणूक करताना उच्च न्यायालयाचे निवृत्त प्रधान सचिव दर्जाचे अधिकारी अथवा वीज क्षेत्रातील निवृत्त दर्जाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशी पात्रता असलेल्या व्यक्तींची नियुक्ती करणे, अपेक्षित असतांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने स्वतःचे निकष डावलून दुय्यम दर्जाची पात्रता धारण करणाऱ्या व निकषात न बसणाऱ्या व्यक्तीची विद्युत लोकपाल पदी | सर्वश्री. संग्राम थोपटे, कैलास गोरंट्याल, अमित झनक, सुभाष धोटे, वि.स.स. | दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | नियुक्ती केली असल्याने व सदरहु नियुक्तीवर शासनाचे निवृत्त प्रधान सचिव यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असल्याने व सदरहु याचिकेवर मा. उच्च न्यायालयाने दिनांक १५ मार्च २०२२ रोजी निर्णय देऊन विद्युत लोकपाल पदी केलेली नियुक्ती अवैध ठरविली असल्याने व यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाने त्यांच्या आदेशात नियुक्तीसंदर्भात विद्युत नियामक आयोगावर ताशेरे ओढलेले असल्याने, विद्युत नियामक आयोगावरील इतरही महत्वाच्या पदावर नियुक्ती करताना विद्युत नियामक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी एकमेकांचे हितसंबंध जपणे, ही बाब निर्दशानास येणे तसेच आयोगाने यासंदर्भात केलेल्या इतर नियुक्त्यांसंदर्भात CAG ने सुद्धा आक्षेप नोंदविला असणे, याकडे शासनाचे होणारे दुर्लक्ष व त्यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ४८ | "नागपूर-मुंबई दरम्यान विकसित करण्यांत येत असलेला बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग माहे सप्टेंबर, २०२२ पर्यंत जनतेसाठी खुला करण्याचे शासनाने नियोजन करण्यात येणे, तथापि हा समृद्धी महामार्ग केवळ नागपूरपर्यंत मर्यादीत न ठेवता गडचिरोली जिल्ह्यापर्यंत विस्तारीत करण्यांत येणार असल्याचे दिनांक ७ डिसेंबर, २०२१ रोजी सहसंचालक अभियांत्रिकी यांनी प्रसार माध्यमासमोर तर मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्व. उपक्रम) तथा जिल्हा पालकमंत्री, गडचिरोली यांनी प्रसार माध्यमातर्फे आयोजित, कार्यक्रमात दिनांक १ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास जाहीर करणे, गडचिरोली जिल्हा हा आदिवासी व नक्षलवादी जिल्हा असल्याने उपराजधानी असलेल्या नागपूरसारख्या शहरांशी तातडीने संपर्क साधण्यासाठी समृद्धी महामार्गासारख्या महामार्गाची असलेली तातडीची गरज, परिणामी, शासनाच्या या निर्णयाबाबत गडचिरोली जिल्हावासियांनी व्यक्त केलेली समाधानाची भावना, त्यामुळे सदर समृद्धी महामार्गाचा तातडीने विस्तार करण्यासंदर्भात शासनाने, त्याबाबतचा व्यवहार्यता अहवाल (Feasibility Report) व सल्लागार कंपनी नेमण्याचे दृष्टीने शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | श्री. धर्मरावबाबा आत्राम, वि.स.स. | दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| ४९ | "ठाणे व मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये एम.एम.आर.डी.ए.च्या माध्यमातून मेट्रोचे काम सुरु असून त्यापैकी मेट्रो-४ व मेट्रो-९ हे ओवळा-माजीवाडा मतदारसंघातील असणे, मेट्रोचे काम पूर्णत्वाला येण्यापूर्वी कारशेडची जागा एम.एम.आर.डी.ए.च्या ताब्यात असणे, याकरिता मेट्रो-४ साठी एम.एम.आर.डी.ए.ने घोडबंदर रोडवरील मोघरपाडा येथे रहिवाशी क्षेत्रातील शेतकरी कसत असलेल्या जागेवर आरक्षण टाकणे, त्यानंतर एम.एम.आर.डी.ए.चे अधिकारी जागेवर सर्वेक्षण करण्याकरिता गेले असता स्थानिक शेतकऱ्यांनी त्यांना विरोध करणे, स्थानिक आमदार म्हणून मध्यस्थी करून एम.एम.आर.डी.ए. ने जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या माध्यमातून सर्वेक्षणाचे काम पूर्ण करणे, शेतकऱ्यांना जो मोबदला द्यावयाचा आहे तो आर्थिक मोबदला न देता मेट्रो कारशेडसाठी लागणाऱ्या जागे व्यतिरिक्त रहिवाशी क्षेत्रातील त्यांच्याच जमिनीचा उर्वरित विकसित भाग परत त्यांना देणेबाबत मा.मुख्यमंत्री व मा.नगरविकास मंत्री हे अंतिम निर्णय घेणेसंदर्भात आश्वस्त केलेले असणे, मिरा भाईंदर क्षेत्रातील मेट्रो-९ चे काम सुरु असून त्यासाठी लागणाऱ्या कारशेडसाठीचे आरक्षण राई, मुर्धा व मोर्वा या गावातील शेतकऱ्यांच्या कसत असलेल्या जमिनीवर एम.एम.आर.डी.ए.ने टाकलेले असणे, जमिनीच्या आसपास अनेक खाजगी, मालकी, धर्मादाय संस्था तसेच शासकीय जमिनी उपलब्ध असतानाही जाणीवपूर्वक एम.एम.आर.डी.ए.ने भात शेती व इतर शेती विषयक व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनीवर हे आरक्षण टाकून अन्याय करणे, त्यामुळे तेथील शेतकऱ्यांनी सर्वेक्षण न होणेसाठी एम.एम.आर.डी.ए.च्या विरोधात एल्गार पुकारणे, त्यामुळे या गावापासून काही अंतरावर असलेल्या खोपरा गावातील शासकीय जमिनीवर मेट्रो-९ च्या कारशेडचे आरक्षण टाकावे व राई, मुर्धा, मोर्वा गावापर्यंत मर्यादित असलेली मेट्रो सेवा पुढे उत्तन व गोराई जवळ असलेल्या पॅगोडापर्यंत नेल्यास पर्यटनाला चालना मिळून या परिसराचा विकास होईल व या गावाजवळून जाणाऱ्या ३० मीटरच्या रस्त्याऐवजी १८ मीटरचा रस्ता व मेट्रो कारशेडकडे जाणाऱ्या १८ मीटरच्या रस्त्याऐवजी ३० मीटरचा रस्ता बनविण्यात यावा अशी स्थानिक नागरिकांची मागणी असणे, तसेच मेट्रो-४ व मेट्रो-९ च्या कारशेडच्या आरक्षणाबाबत शासनाने सत्वर भुमिका स्पष्ट करणेबाबत, शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया." | श्री. प्रताप सरनाईक, श्रीमती यामिनी जाधव, वि.स.स. | दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| ५० | "भिवंडी शहरात मुलभुत आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येणे, यासंदर्भात मुंबई महानगर विकास प्राधिकरण कडून मेट्रो-५ प्रकल्पातंर्गत मुंबई नागरी परिवहन प्रकल्प राबविण्यात येत असणे, सदर प्रकल्पाचा दुसऱ्या टप्प्याच्या विस्तारिकरण प्रकल्पबाधीतांना दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. द्वारे पुनर्वसनासाठी शिथिल धोरण अवलंबिण्याची शिफारस करण्यात येणे, दिनांक ६ जानेवारी, २०२१ रोजी शिफारस केलेल्या धोरणांनुसार मुंबई महानगर विकास प्राधिकरणामार्फत आजपर्यंत भिवंडीतील प्रकल्प बाधितांच्या खाजगी मालमत्तेची नुकसान भरपाई न मिळणे, त्यामुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली असणे, नागरिकांनी वेळोवेळी मागणी करून देखील मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडून याबाबत नुकसान भरपाई मिळण्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री.रईस शेख, वि.स.स. | दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |
| ५१ | "चंद्रपूर जिल्ह्यातील महाऔष्णिक वीज केंद्राच्या प्रदूषणात दिवसेंदिवस वाढ होत असणे, सदर केंद्राच्या प्रदुषणाचा परिणाम चंद्रपूरसह थेट नागपूर, पुणे व मुंबईवर होत असल्याचा दावा पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या द सेंटर फॉर रिसर्च ऑन एनर्जी अण्ड क्लिन एअर (सीआरईए) नामक संस्थेने नुकताच केलेला असणे, सदर महाऔष्णिक वीज केंद्रातून निघणारे एस.पी.एम., सल्फर डायऑक्साइड, नायट्रोजन डायऑक्साइड आणि मर्क्युरी सारखे प्रदुषणकारी घटक हवेच्या माध्यमातून उक्त शहरांपर्यंत पोहोचणे, त्यामुळे उक्त शहरातील नागरिकांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होत असल्याचा दावाही सदर संस्थेने करणे, सदर वायू प्रदूषणामुळे २०२० मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील ८५, नागपूर ६२, यवतमाळ ४५, मुंबईत ३० आणि पुणे व नांदेड मध्ये प्रत्येकी २९ जणांचा अकाली मृत्यू झाल्याचे उक्त संस्थेच्या अहवालात नमूद करण्यात येणे, त्यामुळे महाऔष्णिक वीज केंद्राचे मुदतबाह्य झालेले ३ आणि ४ क्रमांकाचे संयंत्र बंद करण्याची व सल्फर कमी करण्यासाठी यंत्रणा उभारण्याची मागणी करणाऱ्या द सेंटर फॉर रिसर्च ऑन एनर्जी अण्ड क्लिन एअर (सीआरईए) नामक संस्थेने केलेली असणे, चंद्रपूर जिल्ह्यातील महाऔष्णिक वीज केंद्रच नव्हे तर राज्यातील इतरही औष्णिक वीज केंद्र अशाच पद्धतीने प्रदूषणात भर घालत असल्याचे चित्र असणे, शासनाने यासर्व बाबीचा गांभीर्याने विचार करून निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता वा शासनाची प्रतिक्रिया." | श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स. | दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| ५२ | "मौजे साखरीआगर (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथे राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत मच्छीमारांना मुलभूत सुविधा व मासेमारी जेटी उभारणेसाठी रु.२.९७ कोटी इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता दिनांक १५ डिसेंबर, २०११ रोजी शासनाने दिलेली असणे, त्यानुसार कामाची निविदा प्रसिद्ध होऊन प्रत्यक्षात सन २०१२ मध्ये हे काम सुरू झालेले असणे, परंतु काम सुरू होवून आणि त्यावर रु.१६.२५ लक्ष इतका खर्च झाल्यानंतर सन २०१४ पासून हे काम पूर्णपणे बंद अवस्थेत असून ठेकेदाराने या कामाकडे पूर्णतः दुर्लक्ष केलेले असणे, काम अपूर्ण अवस्थेत असल्याने साखरीआगर व परिसरातील किनारपट्टीच्या गावांमधील मच्छीमारांची खूप मोठी गैरसोय होत असणे, बर्फ, पाणी, डिझेल नौकेवर चढवणे ही कामे करताना त्यांचे खूप हाल होत असणे, आधीच मत्स्यदुष्काळ, वादळ, पाऊस यामुळे अडचणीत असलेला मच्छीमार जेटीच्या सुविधेअभावी अधिकच संकटात सापडलेला असून त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झालेला असणे, हे काम पूर्णत्वास जाण्याच्या दृष्टीने अनेकदा मंत्रालय स्तरावर बैठका होऊन, त्यात ठोस निर्णय होऊनदेखील वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांची अडवणुकीची व असहकार्याची भूमिका यामुळे कोणतीही कार्यवाही होत नसल्याने मच्छीमारांमध्ये प्रचंड संतापाचे वातावरण असणे, सदर जेटीचे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे याकरिता आवश्यक उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, सदर गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. भास्कर जाधव, वि.स.स. | दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |
| ५३ | "राज्यात शासकीय अधिकाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात भा.दं.वि. कलम ३३२ व ३५३ चा गैरवापर होत असल्याच्या घटनेत वाढ होत असल्याचे उघडकीस येणे, कोणाचाही वाद झाल्यास किंवा कुठल्याही कर्मचाऱ्यांना विचारणा केल्यास शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याची तक्रार देऊ, अशी धमकी दिली जाणे व खोट्या तक्रारी होणे, पोलिसांनी तात्काळ दखल व अटक करणे, परिणामी सामान्य जनतेची होत असलेली पिळवणूक, कायद्यात झालेली सुधारणा ही ढाल म्हणून वापरण्याऐवजी त्याचा शस्त्र म्हणून वापर होणे, मागील हिवाळी अधिवेशनात मा. मंत्री (गृह) यांनी या कायद्याचा गैरवापर होत | ॲड आशिष जयस्वाल, डॉ. बालाजी किणीकर, वि.स.स. | दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | असल्याचे मान्य करून कायद्यात सुधारणा करण्याचे आश्वासन देवूनही त्याची पूर्तता न होणे, कायदा पारित करतानाही याचा गैरवापर झाल्यास पुनर्विचार करून सुधारणा करू असेदेखील आश्वासन दिले असताना याबाबत आढावा न घेतल्यामुळे राज्याच्या जनतेची होत असलेली कुचंबणा, लोकप्रतिनिधी व सर्व स्तरावरून मागणी होत असताना याबाबत शासनाने निर्णय घेण्याची गरज, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| ५४ | "मुंबई उपनगरातील अनेक गृहनिर्माण सोसायट्यांना महसूल विभागाने अकृषक कराच्या नोटीसा बजावलेल्या असणे, मुंबई उपनगरातील सुमारे २० हजार गृहनिर्माण सोसायट्यांना दरवर्षी अकृषिक कर आकारण्यात येत असणे, ज्यावेळी या सोसायट्यांची बांधकामे झाली त्यावेळी त्यांनी हा कर भरलेला असणे, तसेच मुंबई शहर विभागातील सोसायट्यांना हा कर भरावा लागत नसताना उपनगरातील सोसायट्यांना हा कर भरावा लागत असणे, सन २००८ पासून कर भरण्यासाठी ज्या नोटीस बजावण्यात आल्या होत्या त्याला या अगोदर तत्कालीन महसूलमंत्री यांनी स्थगिती दिलेली असणे, परंतु आता पुन्हा राज्य सरकारच्या महसूल विभागाने या नोटीसा बजावल्या असून याबाबत सोसायट्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होणे, याबाबत लोकप्रतिनिधींनी पत्राद्वारे ही बाब शासनाच्या लक्षात आणून दिलेली असणे, कोरोनामुळे आधीच सोसायट्यांना अनेक आर्थिक अडचणींना समोरे जावे लागत असून त्यातच आता या अवाजवी कराचा बोजा आल्याने सोसायट्या अडचणीत आलेल्या असणे, तरी मुंबई उपनगरातील गृहनिर्माण सोसायट्यांना बजावलेल्या सदर अकृषीक कर नोटीसांना त्वरित स्थगिती देण्याबाबत व मुंबई उपनगरातील लावण्यात येत असलेला हा अकृषीक कर कायमस्वरूपी रद्द करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, श्री. पराग शाह, श्रीमती विद्या ठाकूर, श्री. अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री. हिरामण खोसकर, संग्राम थोपटे, कुणाल पाटील, झीशान सिदिद्की, कुमारी प्रणिती शिंदे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. धिरज देशमुख, सुरेश वरपुडकर, विकास ठाकरे, अमित झनक, लहू कानडे, सुभाष धोटे, विक्रमसिंह सावंत, बळवंत वानखडे, अमित साटम, अतुल भातखळकर, डॉ.भारती लव्हेकर, वि.स.स. | दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| ५५ | "जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील बावणे पांगरी व भोकरदन तालुक्यातील राजूर या महसुली मंडळात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होणे, नैसर्गिक नुकसानीमुळे शासनाने तातडीने बाधित शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान भरपाई अद्यापही न देणे, त्यामुळे अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना राज्य शासनाने आर्थिक मदत तातडीने करावी व बाधितांना दिलासा द्यावा यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माननीय मुख्यमंत्री महोदय यांना दिनांक ९ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्या दरम्यान जावक क्रमांक २०२१-२०२२/०८० या पत्राद्वारे तसेच कृषी मंत्री, मदत व पुनर्वसन मंत्री व संबंधित अधिकारी यांना लेखी विनंती केलेली असणे, परंतु शासनाने शेतकऱ्यांना अनुदान मिळणेसाठी अद्यापही कोणत्याच उपाययोजना केल्या नसणे, परिणामी स्थानिक लोकप्रतिनिधींसह बाधित शेतकऱ्यांच्या समवेत दिनांक १२ नोव्हेंबर रोजी वा त्या दरम्यान लाखोच्या संख्येने ट्रॅक्टर आक्रोश मोर्चा काढणे, सदर नुकसानीला अनेक महिने उलटूनही कोणतीही कारवाई होत नसणे, तसेच पांगरी व राजूर महसूल मंडळातील अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे व फळबागांचे पंचनामे ७ महिन्यापूर्वी झालेले असणे, तसेच जिल्हाधिकारी जालना यांनी सदर दोन्ही तालुक्यातील बदनापूर, बावणे पांगरी व भोकरदन तालुक्यातील राजूर महसूल मंडळात नुकसान झालेल्या क्षेत्राचा पाहणी दौरा केलेला असणे, जिल्हाधिकारी, जालना यांनी शेतकऱ्यांच्या पिकांचे व फळबागांचे अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीबाबतचा सविस्तर प्रस्ताव महसूल व पुनर्वसन विभाग, मंत्रालय यांच्याकडे सादर करणे, जिल्हाधिकारी, जालना यांनी नुकसानग्रस्त शेतकरी यांना अनेकदा आर्थिक मदत देण्याचे आश्वासन देऊनही अद्यापही बाधित गरीब शेतकऱ्यांना मदत दिलेली नसणे, परिणामी शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत असणे, शासनाच्या उदासीन धोरणामुळे शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ येणे, त्यामुळे सामान्य गरीब शेतकरी यांच्यात शासनाच्या विरोधात पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री.नारायण कुचे, वि.स.स. | दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र.<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| ५६ | "खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दूर्बल घटकांच्या शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी "अमृत" (AMRUT-Academy of Maharashtra Research, Upliftment and Training) संस्थेला निधी व कर्मचारी पदाधिकारी देण्याबाबत खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी "अमृत" ही संस्था ऑगस्ट, २०१९ मध्ये स्थापन करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, यापूर्वी अनुसूचित जातीतील तरुणांच्या व तरुणींसाठी त्यांना शैक्षणिक मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने बार्टी ही संस्था स्थापन करण्यात येणे, त्याच धर्तीवर खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दूर्बल घटकांचा शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी "अमृत" ही योजना शासनाने मंजूर करणे, परंतू, सुमारे २ वर्षपेक्षा जास्त कालावधी होऊनसूद्धा या संस्थेला कार्यालयासाठी जागा तसेच त्याठिकाणी अधिकारी व कर्मचाऱ्यांची नेमणूक न करणे तसेच त्यांना आर्थिक निधीसूद्धा अद्याप देण्यात न आल्यामुळे या संस्थेचे काम ठप्प असणे, त्यामुळे खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दूर्बल घटकांच्या शैक्षणिक व त्यांना मार्गदर्शन प्रशिक्षणही न मिळणे, त्यामुळे या प्रवर्गात पसरलेला तीव्र असंतोष, "अमृत" या संस्थेला कार्यालयासाठी जागा तसेच त्या संस्थेसाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून ही योजना प्रत्यक्षात कार्यान्वित करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. इंद्रनिल नाईक, वि.स.स. | दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |
| ५७ | "सोलापूर जिल्ह्यामध्ये विविध ठिकाणी राज्य मार्गाची दर्जोन्नती करून राष्ट्रीय महामार्गामध्ये रुपांतर केलेले असणे, त्यामध्ये म्हसवड-अकलुज-टेंभुर्णी-बार्शी-कुसळंब या मार्गास राष्ट्रीय महामार्ग ५४८-सी म्हणून मंजूरी देण्यात आलेली असणे. यापैकी म्हसवड ते टेंभुर्णी या मार्गाचे काम सुरु असून यामध्ये संगम व शेवरे येथे शेतकऱ्यांना मोबदला न मिळाल्यामुळे काम बंद पाडलेले असणे तसेच सद्यस्थितीत टेंभुर्णी-कुर्डूवाडी-बार्शी ते कुसळंब या मार्गाचे टेंडर प्रक्रिया सुरु असणे, माढा तालुक्यातून जाणाऱ्या या राष्ट्रीय महामार्गावर ५ साखर कारखाने असून टेंभुर्णी-कुर्डूवाडी-बार्शी या ठिकाणी एम.आय.डी.सी. कार्यान्वित झालेली असणे, साखर कारखाने हंगाम सुरु झाल्यानंतर हंगामात हजारो वाहने, बैलगाडी यांची | सर्वश्री. बबनराव शिंदे, संजयमामा शिंदे, वि.स.स. | दिनांक २३ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र.<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | वाहतूक असल्याने ४ ते ५ महिने मोठ्या प्रमाणावर वाहतुकीची तासनतास कोंडी मोठ्या प्रमाणावर होणे, त्यामुळे सदरचा टेंभुर्णी ते बार्शी-कुसळंब हा भाग रस्ता चौपदरी करणे गरजेचे असणे, टेंभुर्णी ते कुर्डूवाडी-बार्शी बायपास मार्गे कुसळंब असा ५ कि.मी. लांबीचा रस्ता अत्यंत खराब झालेला असणे, माढा, करमाळा, बार्शी, विधानसभा मतदारसंघातून जात असून पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा यांना जोडणारा महत्वाचा राष्ट्रीय मार्ग असणे, परंतु या महामार्गावरील अवजड वाहतुक करणाऱ्या वाहनांची तसेच प्रवाशांची संख्या वाढलेली असणे, त्यामुळे रस्त्यावर वाहतुक कोंडी मोठ्या प्रमाणावर होऊन अपघातांचे प्रमाण वाढणे, या राष्ट्रीय महामार्गाबाबत मा.केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री यांनी लातूर येथील रस्ते लोकार्पण कार्यक्रमात सदर रस्त्याचे चौपदरीकरण करणेबाबत घोषणा केलेली असणे, त्यासाठी राज्य सरकारकडून आवश्यक बाबींची पूर्तता झाल्यास या मार्गावरील अवजड वाहन,प्रवाशी वाहने याचबरोबर ग्रामीण भागातील शेतीमाल पालेभाज्या, फळे वेळेत पोहोचून नागरीकांची मदत होणे, टेंभुर्णी ते कुसळंब हा मार्ग चौपदरी होण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांची वारंवार मागणी होत असणे, त्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ५८ | "सांगली-सातारा-सोलापूर जिल्ह्यातील कायम दुष्काळी तालुक्यासाठी वरदान असणारी टेंभू उपसा सिंचन योजनेचे काम मागील २५ वर्षापासून सुरु असणे, सदर दुष्काळी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिण्याच्या तसेच शेतीच्या पाण्याचा प्रश्न अद्यापी प्रलंबित असणे, सदरच योजनेचे काम तातडीने केल्यास या योजनेअंतर्गत तीन जिल्ह्यातील सात तालुक्यांमधील २१७ गावांना फायदा होणे, त्यामुळे या गावातील पिण्याच्या पाण्याची तसेच शेतीच्या पाण्याची अडचण दूर होणे, शेतीमालाचे उत्पादन वाढून त्याचा दर्जा वाढणे, बेरोजगार तरुणांना रोजगार मिळेल, सदर योजनेमध्ये खानापूर-आटपाडी-तासगांव तालुक्यातील वंचित गावांचा समावेश करण्याची होत असलेली मागणी, यासाठी टेंभू उपसा सिंचन योजनेमध्ये वंचित गावांचा समावेश करून ६ टप्पा नियोजित असणे, याबाबत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे दिनांक २४ जानेवारी, २०२० रोजी बैठक होऊन | श्री. अनिल बाबर, वि.स.स. | दिनांक २३ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र.<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | तीन महिन्यांमध्ये वंचित गावांचा समावेश करण्याचा आदेश दिलेला असणे, तसेच दिनांक २७ ऑक्टोबर, २०२० रोजी मा. प्रधान सचिव, जलसंपदा यांचेकडे पाण्याच्या फेरनियोजनाबाबत बैठक होऊनही अदयापही निर्णय न होणे, मा. जलसंपदा मंत्री यांचेकडे वारंवार निवेदने देऊनही अदयापही निर्णय न होणे, परिणामी दुष्काळी तालुक्यातील वंचित गावांमधील जनतेमध्ये पसलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने लक्ष घालून उपरोक्त वंचित गावांचा लवकर समावेश करून दुष्काळी तालुक्यातील जनतेला पिण्यासाठी व शेतीला पाणी देण्याकरीता तातडीने शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ५९ | "सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट दक्षिण सोलापूर तालुक्यातून जाणाऱ्या महामार्गाच्या भूसंपादन प्रक्रियेत अनियमितता झाल्याने उप जिल्हाधिकारी तथा प्रांताधिकारी यांना शासनाने निलंबित करणे, भूसंपादन प्रक्रिया करत असतांना अधिकारी यांनी नियमबाह्य प्रक्रिया राबवणे, एका सर्व्हे नंबर मध्ये असलेल्या दोन वेगवेगळ्या व्यक्तींपैकी जमिनीची मोजणी न करता एकाच व्यक्तीला मोबदला दिला जाणे, या व्यतिरिक्त भूसंपादन अधिकाऱ्याकडून शेतकऱ्यांसोबत वारंवार आर्थिक गैरव्यवहार होणे, त्यामुळे भूसंपादन अधिकारी यांचे निलंबन होणे, यांची योग्य सखोल चौकशी न झाल्यामुळे निलंबित झाल्यानंतर उप जिल्हाधिकारी तथा प्रांतअधिकारी पुनश्च पदभार घेऊन कार्यरत होणे, त्यामुळे सामाजिक वाद विवाद होणे, परिणामी विभागातील रहिवाशांमध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष व विभागातील रखडलेले पुनर्वसन प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करून रस्त्यावर आलेल्या जमीन धारकांना त्यांच्या हक्कासाठी न्याय मिळवून देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. सचिन कल्याणशेट्टी, वि.स.स. | दिनांक २३ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |
| ६० | "कोकणामध्ये मुख्यत्वेः करून आंबा, काजू, नारळ, सुपारी, चिकू इ. फळपिके घेतली जाणे, सदर पिकांसाठी महावितरण कंपनीकडून कृषी पंपाची कनेक्शने दिली जाणे, परंतु महावितरण कंपनीच्या परिपत्रक क्र.२४३, दिनांक ३ जुलै, २०१५ नुसार नारळ, सुपारी, आंबा, चिकू या बागांना कृषी सदरात गणना करून सदर शेतकऱ्यांकडून कृषी व्यतिरिक्त | श्री. शेखर निकम, वि.स.स. | दिनांक २३ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | प्रमाणे सन २०१५ पासून आकारणी करून बीले अदा केली जाणे व बागायती पिकांसाठी वेगळा दर आकारण्याचा दृष्टीकोन दिसून येणे, बागायती पिकांमध्ये ऊस, केळी, संत्री, द्राक्ष ही सुद्धा बागायती पिके असणे, आंबा, काजू, नारळ, सुपारी, चिकू व नर्सरी ही बागायती पिके असूनदेखील यांना वेगळी वीजबील आकारणी केली जाणे, कोकणातील शेती पंपांना महावितरण कंपनीने शेती कृषी व्यतिरिक्त विभागात केलेल्या कोकणातील शेतकऱ्यांना शेती असे वर्गीकरण होणेसंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ६१ | "पुणे महानगरपालिका हद्दीत सन २०१७ पासून समाविष्ट झालेल्या गावातील मिळकत धारकांना पूर्वी ग्रामपंचायत हद्दीत असताना बांधलेल्या क्षेत्रावर सर्वसाधारण कर, सर्वसाधारण पाणीपट्टी, विशेष पाणीपट्टी, आरोग्य, सार्वजनिक वीज वापर कर मिळून एकत्रित आकारणी होत असणे, परंतु महानगरपालिकेने रस्ते, पाणी पुरवठा, दिवाबत्ती(स्ट्रीट लाईट), कचरा संकलन, ड्रेनेज लाईन, फुटपाथ इ. असलेल्या सोयी सुविधा या अत्यंत अपुऱ्या असणे, अनेक वर्ष मनपा हद्दीत समाविष्ट झाल्यावरही मूलभूत पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात पुणे मनपा अपयशी असणे, मनपा हद्दीत समावेश झाल्यावर रेडिरेकनर नुसार सर्वसाधारण कर, पाणीपट्टी, सफाई कर, अग्निशमन कर, वृक्ष संवर्धन कर, जल लाभ कर, मलनिस्सारण कर, पथ कर, विशेष सफाई कर, मनपा शिक्षण उपकर व राज्यशासनाचा शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठ्या निवासी जागेवरील करांची आकारणी करत असल्याने महापालिकेत समावेश झाल्यावर ग्रामस्थांच्या पूर्वी आकारणी होत असलेल्या करात अनेकपटींनी वाढ झाल्याने नागरिकांत निर्माण झालेले असंतोषाचे व रोषाचे वातावरण, परिणामी पायाभूत सुविधांचे जाळे मुख्य शहराच्या तुलनेत समाविष्ट गावांमध्ये निर्माण केल्याशिवाय मनपा प्रचलित दराने कर भरण्यास स्थानिक नागरिकांनी केलेला विरोध, सन २०२४ पर्यंत सदर समाविष्ट गावांना मूलभूत सुविधा देण्याबाबत नियोजित करण्यात आले असल्याने सन २०२४ पर्यंत ग्रामपंचायतीप्रमाणे कर आकारणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. संजय जगताप, वि.स.स. | दिनांक २३ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र.<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| ६२ | "मुंबईमधील सायन कोळीवाडा मतदार संघात वडाळा ट्रक टर्मिनल, वडाळा येथे पुष्कळ आर.एम.सी (RMC) प्लांट असणे, सदर आर.एम.सी (RMC) प्लांट हे एम.एम. आर.डी.ए.च्या भूखंडावर असणे, या आर.एम.सी (RMC) प्लांटमुळे सदर जागी मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्याचे निदर्शनात येणे, या प्लॉटभोवती वडाळा आर.टी.ओ, स्थानिक पोलीस स्टेशन यासारखे सरकारी कार्यालय असणे, तेथील कार्यरत कर्मचारी व स्थानिक नागरिक यांना प्रदूषणामुळे त्रास होणे, येथील आर.एम.सी (RMC) प्लांट पैकी मे. ईगल इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीने एम.एम.आर.डी.ए. ची अतिरिक्त जागा अनधिकृतपणे बळकवल्याचे निर्दर्शनात येणे, कुठलीही प्रशासकीय परवानगी न घेता स्थानिक रहिवाशी यांचा ये-जा करण्याचा मार्ग (रस्ता) बंद करणे, शासनाने नेमून दिलेल्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या नियमांना पायदळी तुडवून मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असणे, सदर भूखंड हा मेट्रो रेलच्या कामासाठी दिलेला असणे, तरी सदर जागेचा वापर मे. ईगल इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीकडून अनधिकृतपणे खाजगी कामाकरिता होत असणे, या व्यतिरिक्त अशोका या कंपनीचा आर.एम.सी. (RMC) प्लांट हा भक्ती पार्क येथील निवासी जागेत असणे, यामुळे स्थानिक नागरिकांना होत असलेला त्रास रोखण्याकरिता शासनाने गंभीर दखल घेऊन करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | कॅप्टन आर. तमिल सेल्वन, श्री. अबू आजमी, वि.स.स. | दिनांक २३ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |
| ६३ | "तळे, विहिर, शिंदे (ता.अकोले, जि.अहमदनगर) या गावांना पिण्याच्या पाण्याची योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून १० ते १२ वर्षापासून मंजूर होणे, परंतु या कामाचा दर्जा चांगला नसल्यामुळे तळे, विहिर, शिंदे गावांना पिण्याचे पाणी न मिळणे, तयार करण्यात आलेल्या विहिरीमध्येदेखील केवळ २ ते ३ महिने पुरेल इतकेच पाणी असणे, गावकऱ्यांना पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण होणे, त्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण होणे, याबाबत संबंधित ठेकेदार, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करून या गावांना तातडीने पाणी पुरवठा मिळण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | डॉ. किरण लहामटे, वि.स.स. | दिनांक २३ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| ६४ | "महाराष्ट्र राज्यातील निराधार व्यक्तींना आधार म्हणून राज्य शासनातर्फे संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी निराधार पेन्शन, श्रावणबाळ पेन्शन अशा एकूण ५ प्रकारच्या योजनेतून पेन्शन दिल्या जात असणे, सदर योजनेच्या माध्यमातून निराधार व्यक्तीला फक्त १००० रुपये व त्या महिलेला मूल असेल तर १०० रुपये जास्त पेन्शन दिले जात असणे, सदर पेन्शनची रक्कम ही वाढत्या महागाईच्या काळात तूटपुंजी असणे, आजच्या महागाईच्या काळात पेन्शनच्या रक्कमेत वाढ करून ती किमान दरमहा ३००० रुपये करण्याची आवश्यकता, तसेच शासकीय कर्मचाऱ्यांना ज्याप्रमाणे महागाई भत्ता दिला जातो त्याप्रमाणे दरवर्षी या पेन्शनमध्ये २० टक्के वाढ करण्याची आवश्यकता, तसेच निराधार योजनेच्या पेन्शनचा लाभ मिळण्यासाठी उत्पन्नाची अट २१ हजार रुपये असणे, म्हणजे दिवसाला केवळ ५८ रुपये उत्पन्न असणाऱ्या व्यक्तीलाच ही पेन्शन योजनाा लागू होत असणे, परिणामी अनेक निराधार व्यक्ती या योजनेपासून वंचित असणे, जुन्या काळातील लावलेली ही उत्पन्नाची अट बदलून ६० हजार रुपये करण्याची आवश्यकता, शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. नानाभाऊ पटोले, सुरेश वरपुडकर, पृथ्वीराज चव्हाण, श्रीमती सुलभा खोडके, श्री. चंद्रकांत नवघरे, डॉ. राहुल पाटील, वि.स.स. | दिनांक २३ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |
| ६५ | "पुणे शहरातील कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट न लावल्यामुळे कचऱ्यातील घाण द्रव जमिनीत झिरपून प्रदूषित होणारे जलस्त्रोत, त्यामुळे होणारी पर्यावरणाची हानी, कचऱ्याने हवेतील प्रदूषण वाढल्यामुळे बालके आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये बळावलेले श्वसनाचे विकार, काही वेळा कचरा डेपोना आगी लागून निर्माण होणाऱ्या प्रदूषित धुरामुळे पर्यावरणाची होणारी हानी, शहराच्या एकाच भागात एकवटलेले कचरा डेपो, त्यामुळे त्या ठराविक भागातील प्रदूषणात पडणारी भर, हवेतील प्राणवायूची घसरलेली गुणवत्ता, औद्योगिक वसाहती आणि लगतच्या रहिवाशी क्षेत्रातील नागरिकांना होणारा प्रदूषणाचा त्रास, शहराच्या एकाच भागात कचरा डेपो केल्यामुळे लांबवर करावी लागणारी वाहतूक, वाहतूक ठेके प्रकरणी मोठ्या प्रमाणात झालेले आर्थिक गैरव्यवहार, विशिष्ट ठेकेदारांना नजरेसमोर ठेवून दिलेले कचरा प्रकल्पाचे ठेके, याकामी झालेले आर्थिक गैरव्यवहार, ठेकेदार वापरत असलेले कालबाह्य तंत्रज्ञान, त्यांच्याकडे अद्ययावत यंत्रसामुग्रीचा अभाव, | श्री. चेतन तुपे, वि.स.स. | दिनांक २३ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | त्यामुळे वाढलेले पर्यावरणीय प्रदूषण, शहरालगतच्या नव्याने समाविष्ट भागात कचरा टाकताना त्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे निर्माण झालेल्या प्रदूषणाने परिसरात होणारी पर्यावरण हानी परिणामी त्या भागात कचरा टाकण्यास स्थानिकांचा होणारा तीव्र विरोध, नगरवासीय आणि ग्रामवासीय यांच्यात वारंवार होणारा तीव्र संघर्ष, पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात होणारी हानी रोखण्यासाठी तातडीने प्रभावी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ६६ | "खडकवासला (जि. पुणे) येथे मागील काही महिन्यांपासून गुन्हेगारी मध्ये लक्षणीय वाढ होणे, गुन्हेगारांवर पोलीसांचा वचक राहिलेला नसणे, नागरिकांमध्ये विशेषतः लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरीक यांच्यामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होणे, अल्पवयीन मुलींवर बलात्कार करून ठार मारल्याच्या घटना, अवैध धंदे, लॉटरी, रोमिओ, लुटमार, खून, दरोडे, हॉटेल लॉजिंगच्या माध्यमातून अवैध धंदे, भर दिवसा रस्त्यालगत सुरू असलेला देह व्यापार, वाढता सायबर क्राईम या सारख्या घटना सहकार नगर, भारती विद्यापीठ, सिंहगड रोड, आणि हवेली पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये घडणे, त्याचबरोबर सहकारनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये धनकवडी गावठाण परिसरात अवैध धंदे, वाहनांची जाळपोळ, चोऱ्या, गंभीर स्वरूपाचे गुन्हे सर्रास घडत असणे, सोसायट्या, वस्ती भागात पोलीसांकडून पेट्रोलिंग देखील होत नसणे, पोलीस ठाण्याच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून लोकप्रतिनिधींशी कुठल्याही प्रकारे समन्वय नसणे, केलेल्या सूचना, तक्रारींवर तक्रार दाखल करावयास गेलेल्या नागरिकास मिळणाऱ्या वागणुकीमुळे व मनमानी कारभारामुळे नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण होणे, याबाबत संबंधित पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ठ झालेल्या गावांचे कार्यक्षेत्र भौगोलिक दृष्ट्या सोयीच्या दृष्टीने पुणे शहर पोलीस आयुक्तालयास जोडण्याची आवश्यकता असणे, जि. पुणे येथील भोर विभाग-राजगड पोलीस स्टेशनच्या हद्दीतील हवेली तालुक्यात समाविष्ट असलेली गावे कमी करून त्या गावांचा समावेश हवेली ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीत करण्याचा | श्री. भिमराव तापकीर, वि.स.स. | दिनांक २३ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र.<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | निर्णय प्रलंबित असल्यामुळे हवेली तालुक्यातील खडकवासला विभागात येणारी मोरदरी, कल्याण, कोंढणपूर, रहाटवडे, आर्वी, शिवापूर, खेड शिवापूर, श्रीरामनगर, गाउडदरा ही गावे सध्या भोर विभाग अंतर्गत राजगड पोलीस स्टेशनच्या अंतर्गत येत असल्याचे निदर्शनास येणे, संबंधित गावे ही हवेली ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीमधील गावांना लागून असतांना त्या गावातील नागरिकांना कोणत्याही छोट्या-मोठ्या तक्रारीसाठी अथवा इतर प्रशासकीय कामांसाठी हवेली ग्रामीण पोलीस स्टेशन नजीकच्या अंतरावर असतांना २६ किमी अंतरावर असणाऱ्या राजगड पोलीस स्टेशनला जावे लागणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | | |
| ६७ | "मानखुर्द – शिवाजीनगर येथील घाटकोपर-मानखुर्द लिंक रोड, एकता नगर, मंडाळा, टी-जंक्शन, मानखुर्द येथील अवैध गाळे शासनातर्फे हटविण्यात येणे, परंतु, तेथे पुन्हा अवैधरीत्या गाळे बांधण्यात आले असल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ वा त्यासुमारास निदर्शनास येणे, अवैध व्यावसायिक गाळे हटविण्याबाबत वारंवार संबंधित विभागांकडे मागणी करूनही अद्यापपर्यंत अवैध गाळे हटविण्यात न येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. अबू आजमी, वि.स.स. | दिनांक २३ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |
| ६८ | "मुंबई उपनगररातील मुंबई महानगरपालिकेच्या मालाड पूर्व-पश्चिम येथील नागरिंकाना, मुलभूत नागरी सेवा-सुविधा उपलब्ध व्हावी याकरिता दिंडोशीच्या स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्रव्यवहार करून केलेल्या पाठपुराव्यानुसार शासन तथा मुंबई महापालिकेने पी/उत्तर विभागाच्या विभाजनास सन २०१९ मध्ये मान्यता देऊनही अद्याप पी/पूर्व आणि पी/पश्चिम अशी महापालिकेची स्वतंत्र प्रभाग कार्यालये सुरु न झाल्याची बाब दिनांक २२ फेब्रुवारी, २०२२ रोजी निदर्शनास येणे, यामुळे मालाड पुर्व-पश्चिम भागातील नागरिकांची प्रशासकीय कामे आणि नागरिंकाना मुलभूत, सेवा-सुविधा प्राप्त करण्यास अद्यापही अडचणीचे होऊन त्रासदायक ठरत असणे, पी/उत्तर विभागाचे पी/पूर्व आणि पी/पश्चिम असे विभाजन करुन, दोन स्वतंत्र कार्यालयाकरिता दोन इमारती, आवश्यक अधिकारी व कर्मचाऱ्यांची नवीन पदे निर्मिती करून व त्याकरिता आवश्यक निधीची पालिकेच्या बजेटमध्ये तरतूद, कार्यालय | सर्वश्री. सुनिल प्रभू, अतुल भातखळकर, वि.स.स. | दिनांक २३ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | सुरु करणेबाबतचा प्रस्ताव सादर होऊनही अद्याप स्थापत्य समिती (उपनगरे)/विधी समिती यांची मान्यता मिळू न शकल्याने सदरहु प्रभाग कार्यालय विभाजनाचे दोन वर्षेपासुन प्रलंबित असल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, विभाग कार्यालयाच्या इमारतीची व्यवस्था करणेबाबत तसेच इमारतीची जागा उपलब्ध होऊन प्रभाग कार्यालय सुरु करणेबाबत काय कार्यवाही केली आहे, अद्याप याचा खुलासा शासनाकडून करण्यात न येणे, तसेच वॉर्ड विभाजनासाठी निधीची तरतुद केली नसल्यामुळे मालाड (पूर्व) भागातील नागरीकांना गेल्या दोन वर्षांपासून नवीन वॉर्डपासून वंचित रहावे लागणे, सदरहु विभाजनाचे प्रलंबित प्रस्तावास महापालिकेच्या सबंधीत अधिकारी वर्गाकडून कार्यवाही करण्यास झालेले दुर्लक्ष, यामुळे मालाड पूर्व-पश्चिम भागातील लाखो सर्वसामान्य नागरिकांची झालेली व होत असलेली प्रचंड गैरसोय,याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |
| ६९ | "सायगांव (एकबे) (ता. कोरेगांव, जि.सातारा) येथील ग्रामस्थांना १९७८ पासून गावठाण कब्जेपट्टी देण्यात आली नसून गावठाणाचा सातबारा न होणे, या गावठाणातील ग्रामस्थांना नविन शर्त उठवून संबधित खातेवारसांना कब्जेपट्टी देण्याबाबत शासनाकडे विनंती करण्यात येणे, तसेच कब्जेपट्टी देण्याकरीता शासनाने २० टक्के विलंब शुल्क लावण्यात येणे, सदरील विलंब शुल्क माफ करण्याबाबत शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता, या कामास विलंब लागत असल्याने ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याकरिता नविन शर्त (सातबारावरील) उठवून गावठाणाचा सिटी सर्व्हे तातडीने देण्याची नितांत गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | श्री. महेश शिंदे, वि.स.स. | दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |
| ७० | "साक्री तालुक्यातील (जि.धुळे) म्हसदी, काळगांव, वसमार, घमनार, दातर्ती, ककाणी, भडगाव (वा.), शेवाळी (मा) या गावातील शेतकऱ्यांना सन २०१८ खरीप हंगामातील दुष्काळी परिस्थितीतील अनुदान अद्यापही वाटप करण्यात न येणे, दिनांक ३० जुलै, २०१९ व दिनांक २२ ऑक्टोबर, २०१९ रोजी सहायक संचालक (लेखा), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांनी शासनाकडे अनुदान मागणी प्रस्ताव सादर केलेला असणे, परंतु | श्रीमती मंजुळा गावीत, वि.स.स. | दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | अद्यापही साक्री तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सन २०१८ खरीप हंगामातील नुकसानीपोटी अनुदान वाटप करण्याकरीता निधी उपलब्ध नसणे, परिणामी उक्त गावातील शेतकऱ्यांनी धरणे आंदोलन करणे, धरणे आंदोलनाच्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन शेतकऱ्यांना शासनाकडून निधी प्राप्त होताच अनुदान वाटप करण्यात येईल असे विभागीय आयुक्तांनी जिल्हाधिकारी, धुळे यांना कळविल्यानंतर त्यांनी शेतकऱ्यांना अनुदान वाटपाचे आश्वासन देणे, परंतू शासनाकडून अद्याप अनुदानाची रक्कम जिल्हाधिकारी, धुळे व तहसिलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे यांच्याकडे प्राप्त न होणे, परिणामी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांमध्ये वाढत असलेली असुरक्षिततेची भावना व त्यामुळे निर्माण झालेला तीव्र असंतोष, शासनाने तातडीने खरीप सन २०१८ हंगामात साक्री तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीत बाधीत शेतकऱ्यांना तात्काळ अनुदान वाटप होण्यासाठी आवश्यक तो निधी मंजूर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.'' | | |
| ७१ | "शासनाच्या महावितरण कंपनीमध्ये कार्यरत असलेले सुमित कुमार, उप संचालक तथा मुख्य तपास अधिकारी, सुरक्षा व अंमलबजावणी यांच्याकडून महावितरणमधील मिटर रिडींग एजन्सी तसेच महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून बेकायदेशीर पैशाची मागणी करीत असणे, विविध अधिकारी कर्मचाऱ्यांना धमकावणे, याबाबतची रेकॉर्डिंग क्लिप तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांना दाखविल्यानंतर त्याची शिक्षा म्हणून त्यांची केवळ बदली करण्यात येणे, परंतु आता परत त्यांनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्याशी आर्थिक संगनमत करून मुख्य तपास अधिकारी पद बळकावणे, सुमित कुमार यांच्या विरोधात कल्याण परिमंडळा अंतर्गत नैतिक अधिपतनाच्या तक्रारी प्राप्त होणे, यासर्व प्रकरणी पारदर्शक चौकशी होण्यासाठी त्यांना निलंबित करून त्यांची भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यामार्फत चौकशी करण्याची आवश्यकता, तसेच यापूर्वी शासनाकडे दिनांक ९ नोव्हेंबर, २०२० रोजी तत्कालीन संचालक, दिनेशचंद्र साबु यांचे बाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर त्यांचीही भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यामार्फत चौकशी करण्यात न येणे, याप्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्यांचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने याप्रकरणी तातडीने चौकशी करून दोषी असलेल्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता." | सर्वश्री. ज्ञानराज चौगुले, सुनिल प्रभू, अबू आजमी, सुभाष धोटे, अमित झनक, बळवंत वानखडे, वि.स.स. | दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| ७२ | "पुणे शहर व परिसरातील वाहतूक कोंडीची समस्या दूर करण्यासाठी दहा किलोमिटर परिसरात रस्त्यांचे सुयोग्य जाळे (रोड नेटवर्क प्लॅन) तयार करण्याचा निर्णय शासनाच्या नगरविकास विभागाने सन २०१३ मंजूर केला असणे, या रस्त्यांच्या जाळ्यानुसार या दोन्ही महापालिका हद्दीलगतच्या परिसरात सुयोग्य रस्त्यांचे जाळे निर्माण करून या महानगरातील वाहतूक सुरळीत होण्यासाठी एक चांगले पाऊल शासनाने उचलले असणे, तसेच प्लॅन नुसार कित्येक रस्त्यांची कामे शासनाने अद्याप सूरू केलेली नसणे, सुरु केलेली कामे अपूर्ण असल्याने मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीची समस्या उद्‌भवत असणे, पुणे शहरात दररोज लाखो वाहने प्रवेश करत असल्याने, प्रवेश करण्याच्या सर्व ठिकाणी वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत असणे, तदनंतर सन २०१५ मध्ये स्थापन झालेल्या पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण तसेच महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ यांनी पुणे महानगरच्या ५० किलोमिटर परिसरात पुणे शहराच्या वर्तुळाकार दोन वेगवेगळे रिंग रोड प्रस्तावित करून अद्यापही या दोन्ही रिंग रोड बाबत वारंवार फक्त घोषणा झालेल्या असून कोणताही ठोस निर्णय झालेला नसणे, पुणे शहरातील स्वारगेट ते हडपसर, येरवडा ते उबाळे नगर या मार्गावर तयार करण्यात आलेली बीआरटीची योजना संपुर्णपणे फसलेली असल्याने या रस्त्यावर सातत्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असणे, पुण्याच्या खडकवासला येथील वारजे, सिंहगड रोड, भूमकर चौक, नवले पुल ते कात्रज या परिसरात सर्विस रस्त्यावर नागरिकांनी केलेल्या अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडीत भर पडत असणे, चुकीच्या ठिकाणी असलेले दुभाजक, नागरिकांनी स्वतःच्या स्वार्थासाठी तयार केलेले बेकायदेशीर दुभाजक यामुळे देखील सामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असणे, पुणे युनिव्हर्सिटी परिसरातील पुल तोडल्याने त्या ठिकाणी देखील वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत असणे, या रस्त्याचे नव्याने नियोजन करण्याची आवश्यकता असणे, रस्त्यासाठी घोषित केलेल्या उड्डाणपूलाच्या कामासाठी अद्याप कोणतीही तरतूद झालेली नसणे, पुणे व पिंपरी व लगतच्या परिसरात मेट्रो प्रकल्पांची कामे संथ गतीने चालू असून नव्याने मांजरी ते हिंजवडी, फुरसुंगी - स्वारगेट - खडकवासला, वनाज - रामवाडी - वाघोली - रांजणगाव | ॲड. राहूल कुल, सर्वश्री. जयकुमार गोरे, सिद्धार्थ शिरोळे, भिमराव तापकीर, श्रीमती माधुरी मिसाळ, श्री. महेश लांडगे, वि.स.स. | दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | गणपती, निगडी - भोसरी – चाकण, हडपसर – लोणीकाळभोर या प्रस्तावित मेट्रो मार्गांचे बृहत आराखडे तयार करून सदर मेट्रो मार्गांना तातडीने मान्यता मिळण्याची आवश्यकता, नेहमीच्या होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांच्या मनात मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झालेला असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ७३ | "कर्नाळा नागरी सहकारी बँक पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) यांच्या दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेल्या तपासणीमध्ये बँकेने मंजूर केलेल्या कर्ज प्रकरणामध्ये गंभीर आक्षेप नोंदविल्याचे निदर्शनास आले असणे, दिनांक २२ एप्रिल, २०१९ रोजी कर्नाळा बँकेने केलेल्या कर्ज व्यवहाराचे विशेष लेखा परिक्षण करण्याबाबत सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांना रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने कळविले असणे, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्या आदेशान्वये जिल्हा विशेष लेखा परिक्षक यांनी लेखा परिक्षण करून बँकेचे अध्यक्ष, संचालक व पदाधिकारी यांनी संगनमताने केलेल्या विनातारणी, गैरविनियोग व गैर व्यवहारामुळे सभासद, बँकेचे ठेवीदार व खातेदार यांच्या ठेवी धोक्यात आल्या असल्याचे निदर्शनास आले असणे, महाराष्ट्र अधिनियम १९६० तसेच भारतीय दंड संहितेनुसार गुन्हा दाखल करण्याची जिल्हा विशेष लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेली असणे, उक्त बँकेचे अध्यक्ष व संचालक यांच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाणे, गु.र.क्र.७८/२०२० भादवी कलम ४०९, ४१७, ४२०, ४६३, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब), ३४ सह सहकारी संस्था अधिनियम कलम १४७ सह महाराष्ट्र ठेवीदारांचे हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल केला असणे, दाखल केलेल्या गुन्ह्यात ६७ बनावट प्रकरणांची व्याजासह रक्कम रू.५४३,६१,४९,३७२/- रूपये व नमुद गुन्हयातील ५०,६८९ ठेवीदारांची रू.५२९,७२,४०,८७९.९३ ठेवी असणे, उक्त बँकेचे ठेवीदार ५०,६८९ असून त्यांचे केवायसी कागदपत्र प्राप्त करण्याचे व त्यांची यादी बनविण्याचे काम सध्या बँक व्यवस्थापनाकडून सुरू असणे, फिर्यादीतील ७६ व निष्पन्न ०९ असे एकूण ८५ आरोपींविरूद्ध पुरावा गोळा करण्याचे काम सुरू असणे, जवळपास ५ ते ६ महिन्यांचा | सर्वश्री. प्रशांत ठाकूर, समीर कुणावार, महेश बालदी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, वि.स.स. | दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | कालावधी होऊनसुद्धा बँकेतील खातेदार व ठेवीदारांना बँकेत ठेवलेली रक्कम मिळाली नसणे, तसेच बँकेतील हजारो रूपयांच्या घोटाळयात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभागी असलेल्या संचालक व अधिकाऱ्यांवर अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई झाली नसणे, त्यामुळे खातेदार व ठेवीदारांमध्ये शासनाच्या विरोधात निर्माण झालेली चिड व असंतोषाच्या भावनेबाबत बँकेतील खातेदार व ठेवीदारांना त्यांची बँकेत ठेवलेली रक्कम तातडीने देण्याबाबत व सदर गैरव्यवहारात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभागी असणाऱ्या संचालक व अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावयाची नितांत गरज त्यावर शासनाने त्वरीत करावयाची आवश्यक ती कार्यवाही व उपाययोजना.” | | |
| ७४ | "यवतमाळ जिल्हा परिषद, बांधकाम विभाग क्र. १ यांची विविध तालुक्यातील ११० निविदा प्रक्रिया निश्चित होणे, त्यातील झरी व पांढरकवडा येथील ९ कामांची निविदा १५.०१ टक्के न्युनतम दराने कंत्राटदार श्री. राजीव मल्लारेड्डी येल्टीवार यांना मिळणे, न्युनतम देक्कार असणाऱ्या निविदाकऱ्यांनी निविदा उघडण्याच्या दिनांकापासून कामकाजाच्या आठ दिवसाच्या आत अतिरिक्त सुरक्षा रक्कम, बँक गॅरंटी, मुदतठेव पावती (एफडीआर) च्या स्वरुपात संबंधित विभागात जमा करावी लागणे, त्याकरिता कंत्राटदार जो स्वतः यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती बँकेचा संचालक आहे त्याने बँक व्यवस्थापकाला हाताशी धरुन संगनमत करून श्री. यल्टीवार यांनी हातानी लिहिलेल्या एकूण १८.१० लाख रुपयांच्या १६ बनावट मुदत ठेव पावत्या यवतमाळ जि.प. बांधकाम विभाग क्र. १ यांना अतिरिक्त सुरक्षा रक्कम म्हणून ठेवणे, दिनांक २ मार्च, २०२२ रोजी कार्यकारी अभियंता श्री. कुटे हे पाटण शाखेत पावत्या पडताळणीसाठी जाणे, बँक व्यवस्थापकानी कार्यकारी अभियंता यांना सदर पावत्या आमच्या बँकेच्या नाहीत असे लेखी पत्र देणे, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी त्याच्या प्रमाणित प्रती मागविल्यानंतर सदर पावत्या बनावट असल्याची बाब उघडकीस येणे, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२२ रोजी बँकेत फक्त रुपये १०,०००/- संकल्प निधी ठेव असताना रुपये १३ लाख १० हजार संकल्प ठेवीबाबत बँकेच्या व्यवस्थापकांनी बनावट अहवाल दिल्याची बाब उघडकीस | श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार,वि.स.स. | दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | येणे, असे असताना देखील यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अन्य संचालक मंडळास काही माहिती नसल्याचे निदर्शनास येणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रधान सचिव, सहकार विभाग यांना दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी तक्रार करणे, बँकेच्या पाटण शाखेचे व्यवस्थापक व बँकेचे संचालक श्री. राजीव मल्लारेड्डी यल्टीवार यांनी संगनमताने आणि बनावट पावत्या सादर करून शासनाची फसवणूक केल्याची बाब उघडकीस येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ७५ | "संगमनेर तालुक्यात प्रवरा नदीपात्रालगत असलेल्या गावांना प्रदूषित पाण्याचा पुरवठा होत असणे, मागील काही दिवसांपासून या नदीपात्रात सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना, संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक संघ, संगमनेर नगरपरिषद तसेच हॉटेल, हॉस्पिटल व इतर औद्योगिक कंपन्या यांचे रसायनयुक्त प्रदूषित पाणी बेकायदेशीरपणे थेट नदीपात्रात सोडण्यात असलेल्या तक्रारी ग्रामस्थांच्या असणे, याबाबत ग्रामस्थांनी वेळोवेळी महाराष्ट्र प्रदूषण मंडळ तसेच जिल्हा प्रशासनाला निवेदन देणे, नदीपात्रालगत असलेल्या सर्वच गावांच्या ग्रामपंचायतीनी या विरोधात ठराव करणे, सेवाभावी संघटना संस्थांनी या विरोधात आवाज उठविणे, या प्रदूषित पाण्यामुळे ग्रामस्थांसह पशुधन, शेतजमिन यांचे आरोग्य धोक्यात येणे, मागणी करुनही एसटीपी प्लॅन्टची उभारणी अनेक वर्षे न करणे या सर्व बाबींमुळे गावांमध्ये निर्माण होत असलेला असंतोष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. | दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |
| ७६ | "अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील जिल्हास्तरीय बिगर आदिवासी योजनेअंतर्गत वन विभागामार्फत वनक्षेत्रात मृद व जलसंधारणाच्या कामातून गॅबियन बंधारे व मातीनाल बंधाऱ्यांच्या कामासाठी जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी १ कोटी २२ लाख ४२ हजार रुपये सुपे, वाळवणे, रुईछत्रपती, पळवे बुद्रुक या गावांतील कामासाठी मंजूर करून जिल्हा उपवन संरक्षक यांचेकडे वर्ग करणे, या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून या कामाची चौकशी करण्याची मागणी संबंधित लोकप्रतिनिधींनी व तेथील नागरिकांनी नुकतीच केलेली असणे, यासर्व कामाची चौकशी करून संबंधितांविरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. निलेश लंके, वि.स.स. | दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| ७७ | "श्रीरामपूर तालुक्यातील आकारी पडित जमिन मुंबई सरकार अधिसूचना गॅझेट क्रमांक ७८८४ दिनांक १ ऑगस्ट, १९१८ अन्वये जमिनींची सुधारणा करणे, लोकांच्या सार्वजनिक हितासाठी विकसीत करुन, पुन्हा फेरवितरण करण्यासाठी भूसंपादन अधिनियम १८९४ च्या कलम ६ अन्वये अधिसुचित करण्यात येणे, दिनांक २३ जुलै १९२० च्या करारनाम्यानुसार सदर बेलापूर सिंडीकेट कंपनी लिक्वीडेशन मध्ये गेल्यामुळे सदर कंपनीकडील जमिनी या दि.बेलापूर कंपनी हरेगांव या नवीन कंपनीकडे तत्कालीन जिल्हाधिकारी अहमदनगर यांच्यामार्फत वर्ग होणे, सदर जमिनींचे अधिकार अभिलेख हक्क नोंदणी रजिस्ट्रारला मालकाचे नाव कमी होवून सदर जमिनीस आकारी पडीत जमिन म्हणून नाव दाखल होणे, महाराष्ट्र शेतजमिन १९६१ च्या तरतुदीनुसार राज्यातील ११ खासगी साखर कारखान्यांच्या ताब्यातील अतिरिक्त घोषीत झालेल्या जमिनी या देखील ताब्यात घेण्यात येवून सरकार जमा करण्यात आल्यापैकी बेलापूर शुगर अलाईड कंपनीकडील अधिक जमिन म्हूणून सदर जमिनीचा ताबा महाराष्ट्र सरकारने १९६५ साली कंपनीचे नावे कमी करुन, सरकार नाव दाखल करुन, जमिन सरकारने ताब्यात घेणे, सदरच्या जमिनी दिनांक २ ऑगस्ट, १९६५ रोजी महाराष्ट्र स्टेट फार्मींग कॉर्पोरेशनकडे फक्त उस उत्पादन करुन, बेलापूर शुगर इंडस्ट्रीला कच्चा माल पुरविण्यासाठी ३ वर्षांसाठी देणे, ३ वर्षांचा कालावधी संपल्यानंतर कोणत्याही प्रकारची वाढीव मुदत महामंडळास न देण्यात येणे, वरील जमिनी या महाराष्ट्र सरकारकडून व्यवस्थापन करण्यासाठी सरकारने महाराष्ट्र स्टेट फार्मींग या नावाने महामंडळ दिनांक १३ ऑगस्ट, १९७० रोजी कलम २८-१AA अधिकाराचा वापर करुन, राज्य सरकारने सिलींग आदेश व १९७० अन्वये औद्योगिक अस्थापनांकडून घेतलेल्या जमिनी महामंडळाकडे सुपूर्द करताना नियमावली ठरविणे, सदर जमिनी कोणत्या ही प्रकारे हस्तांतरण करण्यास, ताब्यात देण्यास व कोणत्याही त्रयस्त इसमास शासनाच्या परवानगी शिवाय देण्यास मज्जाव करण्यात येणे, सदरच्या जमिनी शेतीमहामंडळाकडे वर्ग असून, महाराष्ट्र स्टेट फार्मींग हरेगाव अशी नोंद कब्जेदार सदरी असून, पीकपाहणी सदरी देखील महामंडळाचे नाव दाखल असणे, महाराष्ट्र शासनाने जमिन धारणा कायद्यामध्ये दुरुस्ती | श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. | दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | करुन शेती महामंडळाकडे असलेल्या जमिनी परत करण्याचा निर्णय पुर्वी घेण्यात येणे, त्या अनुषंगाने श्रीरामपूर तालुक्यातील बऱ्याच जमिनी मुळ मालकांना परत करण्यात येणे, परंतू आकारी पडीत जमिनी ६० ते ७० वर्षे होवूनही मुळ मालकांना परत करण्यात आलेल्या नसणे, त्यामुळे ९ गावातील शेतकरी मुळ मालक भूमिहीन किंवा अल्पभूधारक होणे,शेती महामंडळाकडे आकारी पडीत जमिन ७ हजार एकरपेक्षा जास्त असून, पुर्वी महामंडळाकडे देण्याचा उद्देश आता साध्य होत नसल्याने जमिनी महामंडळाने ताब्यात ठेवण्याचा आधिकार गमावला असणे, असे असताना अचानकपणे सदरच्या जमिनी टेंडर काढून वाटप करण्याचा घाट महामंडळाने चालविणे, सदर जमिनी या इतर व्यक्तिंना, संस्थांना, कंपन्यांना कसण्यासाठी देण्याच्या उद्देशाने ही प्रक्रीया चालू करणे, सामुदायीक शेतीच्या गोंडस नावाखाली धनदांडग्या व्यक्तिंना वाटप करण्याची प्रक्रीया सुरु असणे, या संदर्भात न्यायालयीन प्रक्रीयाही सुरु असून, शासनाच्या वतीने दिनांक १ डिसेंबर, २०२१ रोजी शपथपत्र दाखल करण्यात येणे, सदर शपथपत्र हे याच विषयामध्ये यापुर्वी दाखल झालेल्या याचिका क्र.२९१७/२०१५ मध्ये अप्पर सचिव श्री.प्रकाश बोरवे यांनी दाखल केलेल्या शपथपत्राच्या पुर्णपणे विरोधात असणे, शासनाची ही भूमिका दुटप्पी असून, शेतकऱ्यांना न्यायापासून वंचित ठेवणारी असणे, राज्यात अशा स्वरुपात शासनाने धारण केलेल्या, जमिनी या शेतकऱ्यांना परत देण्यात आलेल्या असताना श्रीरामपूर तालुक्यातील अकारी पडीत जमिनींबाबत शासनाची भूमिका विरोधी असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ७८ | "देवस्थान इनाम जमिनीबाबत चा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित असून या इनाममध्ये जमिनी रेव्हेन्युग्रेट किंवा ग्रँट ऑफ रेव्हेन्यू व सॉईल ग्रँट या दोन प्रकारात मोडतात त्यानुसार ज्या जमिनीचा शेतसारा देवस्थानास पूर्वापार देणेत येतात, त्यास रेव्हेन्यु ग्रान्ट किंवा ग्रान्ट ऑफ रेव्हेन्यु तसेच ज्या जमिनी देवस्थानास देखभालीसाठी मालकी हक्काने पुर्वापार दिलेली आहे त्यास सॉईल ग्रान्ट असे संबोधले जाणे, ज्या गावाचा संपूर्ण महसूल देवस्थानास देणेत येतो म्हणजे संपूर्ण गावाचा महसूल हा देवस्थानाचा इनाम म्हणजे रेव्हेन्यु ग्रान्ट असेल | श्रीमती सरोज आहिरे, वि.स.स. | दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | तर अशा गावास दुमालागाव (Alienated Villege) म्हणतात आणि अशा दुमाला गावाच्या नोंदी ॲलिनेशन रजिस्टरमध्ये घेणेत आलेल्या आहेत व त्यामध्ये देवस्थानास किती महसूल देणेत येतो त्याची नोंद देखील घेणेत आलेली असल्यामुळे या दुमाला गावातील जमिनी देवस्थानाच्या मालकीच्या नसून त्या त्रयस्थ व्यक्तीच्या/ शेतकऱ्यांच्या मालकीच्या आहेत हे स्पष्ट होते ,परंतु असे असताना सन १९७२ मध्ये महाराष्ट्र शासनाने परिपत्रक निर्गमित करून त्यामध्ये इनामदार हे सुपिरीअर होल्डर Superior Holder असतील त्यांच्या नोंदी ७/१२ वर कब्जेदार सदरी रेषेवर घेण्याचे निर्देश दिले, परंतु दुमाला गावातील जमिनीमध्ये देवस्थानाचा मालकी हक्क नसताना देवस्थान देखील दुमाला गावातील जमिनीचे Superior Holder नसतानाही त्यांना Superior Holder समजून नाशिक जिल्ह्यातील विहितगाव, मनोली, बेलतगव्हाण,तिरडशेत वगैरे हया गावातील जमिनीचे ७/१२ वर कब्जेदार सदरह रेषेवर घेण्याबाबत श्री. व्यंकटेश बालाजी देवस्थानचे नाव स्वतंत्र फेरफार घेऊन नमूद करणेत आले, तथापि सदर फेरफारच्या कोणत्याही नोटीसा जमिनी मालक/शेतकरी यांना देणेत आलेल्या नव्हत्या, त्यामुळे त्या जमिन मालकाचे जमिनीचे खरेदी-विक्री हस्तांतरण यावर कोणतेही बंधन नसणे, त्या जमिनीचे मालकांना बँकेत कर्ज मिळत असणे, जमिनी बिगरशेती परवानगी पण देणेत येत असत. परंतु मधले काही काळात तात्कालिन मा.जिल्हाधिकारी नाशिक यांनी विहितगाव, मनोली, बेलतगव्हाण, तिरडशेत गावातील जमिनी देवस्थानच्या संमतीशिवाय विकता वा विकसित करता येणार नाही,अशी चुकीची धारणा केल्यामुळे तेव्हापासून या गावातील जमिनीचे खरेदी विक्री व्यवहार करणेस,जमिनीची बिगरशेती परवानगी देणेस देवस्थानाचे ना हरकत प्रमाणपत्राची मागणी महसूल विभागाकडून केली जाऊ लागली व असे ना हरकत प्रमाणपत्र देणेस देवस्थानाकडून त्याबद्दल पावती देताना “श्री” चरणी अर्पण अशी पावती देणेत येते. १) विहितगाव, २) बेलतगव्हाण, ३) मनोली, ४) तिरडशेत ही गावे दुमाला गावे असतांना व या गावातील जमिनीचा महसूल फक्त देवस्थानास मिळणेचा हक्क असताना व या गावातील जमिनी त्रयस्थ व्यक्तींच्या/शेतकऱ्यांच्या मालकीच्या असताना शासनाने | | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | अधिकाऱ्यांचे चुकीचे या गावातील जमिनीचे ७/१२ वर कब्जेदार सदरी देवस्थानाचे नाव नमुद करण्यात येणे, शेतकऱ्यांची अडवणूक करून जमिनीवर कर्ज काढण्यास, जमिनीचे खरेदी विक्री व्यवहार नाहरकत दाखला देणेस शेतकऱ्यांकडून अनाधिकाराने पैसे घेतले जाणे, त्यामधून देवस्थानाने आतापर्यंत अशा बेकायदेशीरपणे शेतकऱ्यांकडून लाखो रुपये घेतले जातता त्यामधून ७/१२ चे संगणक प्रणालीमध्ये शेतकऱ्याबरोबर सह मालक म्हणून देवस्थानचे पण नाव नमूद करण्यात येणे, हा सर्व महसूल अभिलेखामधील गैरप्रकार हा महसूल अधिकाऱ्याचे चुकीमुळे झालेला असणे, परंतु सदर अभिलेखामध्ये झालेल्या चुका दुरुस्त करून देवस्थानचे अनाधिकाराने ७/१२ वर लागलेले नाव कमी करणेकामी जमिन मालकांनी वारंवार अर्ज विनवण्या करुनही त्यांचे विनंतीकडे दुर्लक्ष केले जाणे, नुकतेच मुंबई उच्च न्यायालयाने रॉबर्ट डायस विरुद्ध महाराष्ट्र सरकार या रिट पिटीशनमध्ये निर्णय दिलेला असून त्या निर्णयामध्ये देवस्थानाचे सॉइल ग्रान्ट व रेव्हेन्यु ग्रान्ट चा उहापोह करणे, त्यामुळे शासनाने त्वरित दुमाला गावातील जमिनीचे ७/१२ वरील देवस्थानाचे नाव कमी करणेच्या सूचना देऊन १) विहितगाव, २) बेलतगव्हाण, ३) मनोली, ४) तिरडशेत या गावातील शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया. | | |
| ७९ | "दहिवडी (ता. माण) येथे उपविभागीय अधिकारी माण-खटाव यांनी अवैध गौण खनिज व वाहतूक रोखण्यासाठी तलाठी व मंडल अधिकारी याचे गस्त पथकांची नेमणूक केली असणे, वाकी (ता. माण) येथे दिनांक २२ फेब्रुवारी, २०२२ रोजी रात्रीच्या सुमारास मांगगगा नदी पात्र येथे १ ट्रॅक्टर वाळू चोरी करताना पकडला असून त्यांना कोणत्याही शासकीय प्रक्रिया न करता सोडण्यात आले असणे, त्याचे ऑडिओ व विडिओ समाज माध्यमांवर प्रसारित झाले असणे, त्यानंतर संबंधित तहसीलदार यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात येणे, त्या अगोदर तहसीलदार यांचेवर लाचलुचपत प्रतिबंध खातेची कार्यवाही झाली असणे, शासनाकडून तहसीलदार, मंडल अधिकारी व ट्रॅक्टर मालकावर कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, यामध्ये फक्त ४ तलाठीचे निलंबन झाले असणे, तसेच कडेगाव, | सर्वश्री. जयकुमार गोरे, अभिमन्यु पवार, ॲड राहूल कुल, वि.स.स. | दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | जि. सांगली येथे येरळा नदीतील वाडीयेराबाग येथे देखील असा प्रकार घडल्याचे निदर्शनास आले असणे, येथील एका पत्रकाराने वाळू तस्करीची माहिती अधिकाऱ्यांना दिली म्हणून त्याच्यावर वाळू तस्करांनी हल्ला केल्याची धक्कादायक बाब दिनांक २० फेब्रुवारी, २०२२ रोजी घडलेली असणे, संबधित पत्रकाराने तहसीलदार व उपविभागीय अधिकारी याचेकडे तक्रार करण्याचा प्रयत्न केला असणे, परंतु संबंधित अधिकाऱ्यांकडून त्यांना कोणताही प्रतिसाद मिळाला नसणे, यामुळे स्थानिक ग्रामस्थांमध्ये मोठ्या प्रमाणवर भीतीचे वातावरण व नाराजीची भावना पासरलेली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ८० | "जोगेश्वरी (पूर्व) रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या महानगरपालिकेच्या नवलकर मंडईचे संरचनात्मक सल्लागार व बृहन्मुंबई महानगरपालिकेचे तांत्रिक सल्लागार समितीने दिलेल्या अहवालानुसार सदरहू मंडई ही धोकादायक घोषित करून मंडई रिक्त करून तोडण्याचे अभिप्राय दिले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, सदरहू मंडईच्या पुनर्विकासाच्या दृष्टीकोनातून स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेसमवेत घेतलेल्या संयुक्त बैठकीत सदरहू पुनर्विकासाच्या कामाच्या अनुषंगाने सूचना करून सदरहू पुनर्विकासाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबतच्या सूचना दिलेल्या असणे, तसेच सदरहू मंडईतील अनुज्ञापनधारकांना मंडईमध्येच तात्पुरते संक्रमण शिबिर बांधुन देण्याच्या अनुषंगाने महापालिका वास्तुविशारद यांच्याकडे आराखडे बनविण्याचे काम माहे डिसेंबर, २०२० रोजीपासून सुरू असून सदरहू काम अद्यापपर्यंत पूर्ण झालेले नसणे, परिणामी सदरहू मंडईच्या पुनर्विकासाचे काम नाहक प्रलंबित राहिलेले असल्याची बाब निदर्शनास येणे, अद्याप सदरहू आराखडे तयार झालेले नसल्यास या प्रकरणी आराखडे तयार करण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे जाणून सदरहू विलंबास जबाबदार असलेल्यांवर जबाबदारी निश्चित करून त्यांचेवर कारवाई करून तसेच सदरहू आराखडे तातडीने तयार करून मंडईतील अनुज्ञापनधारकांना मंडईमध्येच तात्पुरते संक्रमण शिबिर बांधून देण्याबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही केलेली नसून या | श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. | दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांना हेतू:पुरस्सरपणे पाठिशी घालण्यात येत असल्याची बाब निदर्शनास येणे, तसेच किरकोळ मंडईकरिता आरक्षित असलेल्या या ठिकाणचे नगर भूमापन क्रमांक २५५, २५६, २५७, २५८ व २५९ पैकी नगर भूमापन क्रमांक २५६, २५७ व २५८ हे भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नावावर झाल्यानंतर मंडईच्या मुख्य इमारतीचे आराखडे मंजुरीकरिता सादर करण्यात येणार असल्याने सदरहू भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नावावर करण्याबाबतही शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसणे, सदरहू मंडईच्या पुनर्विकासाच्या कामास होत असलेल्या विलंबामुळे येथील स्थानिक नागरिक व मंडईतील गाळेधारक यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून त्यांचेमध्ये तीव्र नाराजी पसरलेली असणे, सदरहू मंडईचा पुनर्विकास तातडीने करण्याबाबत स्थानिक नागरीक तसेच मंडईतील गाळेधारक यांच्या मागणीच्या अनुषंगाने या प्रकरणी तातडीने कार्यवाही करण्याबाबत शासनाने या प्रकरणी करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ८१ | "ठाणे जिल्ह्यातील १४ गावे आणि परिसर गेल्या अनेक वर्षापासून विकासापासून वंचित असणे, जिल्ह्यामध्ये पाणी, शिक्षण, आरोग्य, रुग्णालय, रस्ते अशा मूलभूत सुविधांची ही असलेली वाणवा, भौगोलिक परिस्थितीने ही सर्व गावे नवी मुंबई महानगरपालिकेला जोडलेली असल्यामुळे या गावातील नागरिकांचा नवी मुंबई महानगरपालिकेत समाविष्ट होण्यासाठी असलेला कल, त्यासाठी गेली अनेक वर्ष शासन स्तरावर सुरू असलेले प्रयत्न, त्यासाठी वारंवार ग्रामपंचायत निवडणूकांवर घातला गेलेला बहिष्कार, सर्व ग्रामपंचायतींनी रितसर ठराव करून शासनाकडे पाठविला असणे, नवी मुंबई मनपा ही याबाबत सकारात्मक असल्याने महासभेत १४ गावे समाविष्ट करण्यासाठी केलेला प्रशासकीय ठराव, दिनांक २३ जुलै, २०१९ रोजी तत्कालीन राज्यमंत्री (नगर विकास) यांच्यासमवेत दिनांक १५ ऑगस्ट, २०१९ रोजी ही सर्व गावे नवी मुंबई मनपा मध्ये समाविष्ट केल्याचे घोषणा करण्यात येईल असे दिलेले आश्वासन, भौगोलिक परिस्थिती, सर्व गावांचे एकमत नवी मुंबई मनपा सकारात्मक असताना शासनाकडून निर्णय घेण्यास होत असलेली दिरंगाई व | श्री. प्रमोद पाटील, वि.स.स. | दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | वारंवार आश्वासन देऊनही होत असलेली फसवणूक यामुळे ग्रामस्थांचा शासनावरील उडत चाललेला विश्वास व निर्माण झालेली चीड पाहता शासनाने याबाबत तातडीने निर्णय घेऊन या गावांच्या भवितव्यासाठी व विकासासाठी तातडीने नवी मुंबई महानगरपालिकेत समाविष्ट करण्यासाठी घ्यावयाचे निर्णय, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ८२ | "मुंबई चित्रपटसृष्टी असोसिएशन ऑफ सिने अँड टेलिव्हिजन आर्ट डायरेक्टर आणि कॉस्च्युम डिझायनर (ACTADCD) ही नोंदणीकृत कामगार संघटना गत ५८ वर्षापासून कार्यरत असून सिनेसृष्टीतील कामगार सभासद आणि निर्मात्यांमध्ये सुसंवाद वाढविणे, त्यांच्या समस्या सोडविणे व आकस्मिक काळात वैद्यकीय व अन्य मदत मिळवून देण्याचे काम ही संघटना करते, मात्र या संघटनेला फिल्म सेटींग ॲण्ड अलाईड मजदूर युनियन (Allied Mazdur Union) तसेच फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया सिने एम्प्लॉईज (FWICE) या दोन संघटनांकडून विनाकारण त्रास देवून अवैधरित्या त्यांच्या कामकाजात अडथळा निर्माण करून हस्तक्षेप करणे, या दोन्ही संघटनांवर सारख्याच व्यक्ती विराजमान असून कामगारांच्या समस्यांच्या नावाखाली लाखो रुपयांचा गैरव्यवहार तसेच खंडणी जमा करण्याचे काम या दोन्ही संघटनांचे पदाधिकारी करीत असणे, उपरोक्त दोन्ही संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या जाचाला कंटाळून ACTADCD चे ज्येष्ठ सभासद श्री.राजेंद्र सापते यांनी आत्महत्या करणे व त्यांच्या सुसाईड नोटमध्ये या संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना यासाठी जबाबदार ठरविणे, तरीही या प्रकरणी कोणतीही फौजदारी कारवाई अद्यापपर्यंत न होणे, अलाईड मजदूर युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी जवळजवळ ३१ कोटी रुपयांचा सभासद निधीचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेकडे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये तक्रार नोंदवूनही यासंदर्भात अद्याप कोणतीही कारवाई न होणे, परिणामी त्यांचे धाडस अधिकच वाढून आता उपरोक्त दोन्ही संघटनांची वाकडी नजर ही ACTADCD संघटनेकडे वळली असून या संघटनेवर गुंडांमार्फत अनधिकृत कब्जा करण्याच्या उद्देशाने एक बनावट कार्यकारणी मंडळ स्थापन करून बनावट लेटरहेड, मानचिन्हे व ओळखपत्रे | सर्वश्री. नानाभाऊ पटोले, पृथ्वीराज चव्हाण, शिरीष चौधरी, लहू कानडे, संजय जगताप, श्रीमती मनिषा चौधरी, डॉ.भारती लव्हेकर, श्री.अमित साटम, ॲड. आशिष शेलार, श्री.अतुल भातखळकर, ॲड. राहुल नार्वेकर, श्री. कालीदास कोळंबकर, श्रीमती सरोज आहिरे, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | छापून त्यांची बँक खाती सिल करण्यासंदर्भात बँकांना पत्र देणे व आश्चर्याची बाब म्हणजे बँक ऑफ महाराष्ट्र व एक्सिस बँकेने चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे उपरोक्त संघटनांचा हस्तक्षेप वैध ठरवून गत ६ महिन्यापासून ACTADCD संघटनेच्या बँकेचे व्यवहार रोखून ठेवणे, परिणामी या संघटनेचे सभासद अनुज्ञेय असलेल्या मदतीपासून वंचित असणे, या प्रकरणी आंबोली पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करुनही अद्यापपर्यत उपरोक्त दोन्ही संघटनांवर कोणतीही कारवाई न होणे, या प्रकरणाची गंभीर दखल घेवून मा.गृहमंत्री महोदयांनी दिनांक ७ जुलै, २०२१ रोजी बैठक घेऊन SIT लावून दोषींवर कडक कारवाई करण्याचे आदेश देऊनही अद्याप कोणतीही कारवाई न होणे, सदरहू प्रकरणाची शासनाने गंभीर दखल घेवून ACTADCD च्या कार्यालयात अनधिकृत प्रवेश करून कामकाजात हस्तक्षेप करणाऱ्या उपरोक्त दोन्ही संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना त्वरीत अटक करून कारवाई करणेबाबत तसेच बँकेचे व्यवहार पुन्हा सुरु करण्यासंदर्भात तातडीने आदेश देण्याची आवश्यकता, उपरोक्त दोन्ही संघटनांमधील गैरव्यवहारासंदर्भात तेथे प्रशासकाची नेमणूक करून आर्थिक गुन्हे शाखेकडून सखोल चौकशी व दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच श्री.राजेंद्र सापते यांच्या आत्महत्येमुळे त्यांचे कुटुंब आर्थिक संकटात सापडले असून त्यांना मदत देवून उपरोक्त संपूर्ण प्रकरणी शासनाने अतिशय गांभीर्याने व तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री.अमित साटम, ॲड.आशिष शेलार, श्री.अतुल भातखळकर, ॲड. राहुल नार्वेकर, श्री. कालीदास कोळंबकर, श्रीमती सरोज आहिरे, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |
| ८३ | "महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमाच्या कलम ४१ कक मध्ये धर्मादाय रुग्णालयाने गरीब व निर्धन रुग्णांना मोफत तसेच सवलतीच्या दरात उपचार करण्याची तरतूद असनूही राज्यातील अनेक धर्मादाय रुग्णालयामध्ये मनमानी पद्धतीने कारभार सुरु असून गरीब रुग्णांना १० टक्के राखीव खाटा सवलत योजनेतून उपचार करण्यास ही रुग्णालये टाळाटाळ करत असणे, या रुग्णालयांना शासनामार्फत अनेक सूट व सवलती व माफक दरात जागा देण्यात आल्या असून महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियमातील तरतूदीनुसार गरीब सर्वसामान्य कष्टकरी जनतेला आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे | ॲड. अशोक पवार, श्री. राम सातपुते, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | या रुग्णालयांवर बंधनकारक असतानाही त्याची प्रभावी अंमलबजावणी न होणे, ही रुग्णालये गरीब रुग्णांकडून अवाजवी फी वसूल करणे, धर्मादाय रुग्णालयांमध्ये १० टक्के राखीव खाटा सवलत योजनेची प्रभावी अंमलबजावणी होणेची आवश्यकता असणे, या तरतुदीची अंमलबजावणी करताना या रुग्णांलयाच्या दर्शनी भागात जनसंपर्क अधिकारी यांचे नाव, मोबाईल नंबर, समितीचा बोर्ड, १० टक्के राखीव खाटा व शिल्लक आयपीएफ निधीबाबतचा तपशिल लावुन वेबसाईटवर देखील जागेची व निधीची उपलब्धता दर्शविण्याची आवश्यकता, संबंधित हॉस्पिटलचे जनसंपर्क अधिकारी सायंकाळी ६.०० नंतर तसेच रविवार व इतर सुट्यांच्या दिवशी फोन देखील न उचलणे, त्यामुळे रुग्णांना होणारा त्रास तसेच गंभीर रुग्णांना मदत न होणे तर काहींना प्राण गमवावा लागणे, पैशाअभावी उपचार न होणे, परंतु याबाबत संबंधित रुग्णालयांकडून कार्यवाही न होणे, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, अधिनियमातील तरतूदींची प्रभावी अंमलबजावणी होण्याची आवश्यकता, यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ८४ | " रत्नागिरी जिल्ह्यातील बोरज (ता. खेड) येथे गोवंशातील दोन पाळीव जनावरांची घृणास्पद हत्या झाल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०२२ वा त्यासुमारास निदर्शनास येणे, या घटनेमुळे तणावसदृश स्थिती निर्माण होणे, अशाच प्रकारची घटना माहे जानेवारी, २०१९ मध्ये याच भागातील लोटे (ता. खेड) येथे उघडकीस येवून गंभीर परिस्थिती निर्माण होणे, हे कृत्य करणाऱ्यांना अटक करण्यात यावी या मागणीसाठी दिनांक २६ जानेवारी, २०१९ रोजी नागरिक शांतपणे आंदोलन करीत असताना पोलीसांनी केलेल्या बेछूट लाठीहल्ल्यामुळे आंदोलक संतप्त होणे, आंदोलकांच्या भावनांचा उद्रेक होवून जाळपोळ होवून दंगलसदृश स्थिती निर्माण होणे, यामध्ये कित्येकजण जखमी होणे, आंदोलनामुळे संपूर्ण मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग कित्येक तास बंद होणे, सदर घटनेप्रकरणी पोलीसांकडून झालेली तकलादू कारवाई, परिणामी असे कृत्य करणाऱ्यांवर कोणतीही जरब नसल्याने पुन्हा तीन वर्षानंतर गोवंशहत्येच्या घटनेची पुनरावृत्ती होणे, सदर घटना घडून एक महिना | श्री.भास्कर जाधव, वि.स.स., | दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र.<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | उलटला तरी हे कृत्य करणाऱ्या गुन्हेगारांना पकडण्यात पोलीसांना आलेले अपयश, त्यामुळे पोलीसच गुन्हेगारांना पाठिशी घालण्याचे काम करीत असल्याची नागरिकांमध्ये निर्माण झालेली भावना, परिणामी नागरिकांमध्ये असलेली प्रचंड चीड आणि संतापाची भावना, या भावनांचा कधीही उद्रेक होण्याची शक्यता, ही गंभीर बाब लक्षात घेवून शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया." | | |
| ८५ | "पोलीसांच्या कामाचे तास जास्त असल्याने कामाचा ताण असणे, इतर कर्मचाऱ्यांना कामाचा आठवडा पाच दिवसाचा असणे, पोलीसांचा कामाचा आठवडा सात दिवसांचा असणे, पोलीस खात्याच्या अनेक जमिनी असून देखील पोलीसांच्या राहत्या घराचा तसेच पोलीस वसाहतीचा प्रश्न सातत्याने निर्माण होत असणे, अनेक पोलीस कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय मोडकळीस आलेल्या पोलीस वसाहतीमध्ये निवास करत असणे, त्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होणे, पोलीसांना चांगली सुविधा पुरवणाऱ्या कॅशलेस हॉस्पिटल (Cashless Hospitals) ची संख्या कमी असल्याने पोलीस कर्मचाऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागणे, पोलीसांना हक्काच्या रजा वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून न मिळणे, किरकोळ रजांची संख्या वर्षाला १२ वरुन २० करण्याची मागणी पोलीस कर्मचाऱ्यांकडून होत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. रोहित पवार, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |
| ८६ | "महाराष्ट्र राज्य सह.बँक ही महाराष्ट्रातील सह. कर्ज पुरवठा यंत्रणेतील शिखर (अॅपेक्स) बँक असणे, या शिखर संस्थेच्या माध्यमातून राज्यातील सह.साखर कारखाने, सुतगिरण्या व जिल्हा मध्यवर्ती बँकांना अल्प व मध्यम मुदतीच्या कर्जांचे वाटप करण्यात येणे, बँकेच्या कामकाजामध्ये झालेल्या अनियमिततेमुळे रिजर्व्ह बँकेच्या सुचनेनुसार शासनाच्या सहकार विभागाने दिनांक ७ मे, २०११ रोजी बँकेचे तत्कालिन संचालक मंडळ बरखास्त करून बँकेवर प्रशासकीय मंडळाची नियुक्ती करणे, यावेळी वेळोवेळी सुधारणा करून प्रशासकांची निवड करणे, दिनांक १९ एप्रिल, २०१८ रोजी तत्कालीन प्रशासक मंडळाचे | श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | अध्यक्ष व सदस्य यांनी राजीनामा दिलेनंतर सहकार आयुक्त महाराष्ट्र राज्य यांनी बँकेच्या प्रशासकीय मंडळाच्या अध्यक्षपदी विद्याधर अनास्कर तर सदस्य पदी श्री.भेंडे व श्री.महागावकर यांची नियुक्ती करणे, परंतू प्रशासकीय मंडळातील सदस्यांनी राजीनामा दिल्याने महाराष्ट्र राज्य सह. बँकेचे सर्व कामकाज प्रशासकिय मंडळाचे अध्यक्ष यांचेकडून एकाधिकारशाही पद्धतीने सुरू असणे, प्रत्यक्षात बँकेच्या माध्यमातून अडचणीत आलेल्या सह.साखर कारखाने सुतगिरण्या व जिल्हा माध्यमिक बँकांना कर्जपुरवठा करण्याबाबत निर्णय होणे अपेक्षीत असताना, प्रशासक यांचेकडून कोणत्याही प्रकारचे कामकाज न होणे, सध्या बँकेची आर्थिक परिस्थिती सुधारत असुन या सर्व बाबी विचारात घेता राज्यशासनाने सदरील संस्थेची निवडणूक प्रक्रिया जाहीर होई पर्यंत बँकेवर राज्य शासनातील वरीष्ठ अधिकाऱ्यांची तात्पुरती नियुक्ती करून महाराष्ट्र राज्य सह.बँकेची निवडणुक कार्यक्रम जाहीर करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका. | | |
| ८७ | "नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या भूखंडांचे नूतनीकरण, हस्तांतरणाबाबत महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-चार-ब दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ नगरविकास विभाग यांच्या अधिसूचनेनुसार भूखंडांचे नूतनीकरण व हस्तांतरण करण्याबाबत लागणारे "भूभाटक" हे ०.०२% वरून ८% केल्यामुळे भूखंडधारकांना प्रचंड भुर्दंड पडून विकासकांना अडचण निर्माण झाली असणे, दिनांक २५ मार्च, २०२१ रोजी नागपूर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत संबंधित विषयावर चर्चा होणे व सभागृहाने एकमताने ठराव क्र.६६ पारित करुन, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासनाचे दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या अधिसूचनेतील "महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्ता भाडेपट्टा नूतनीकरण अथवा हस्तांतरण) नियम, २०१९, च्या तरतुदीबाबत फेरविचार करण्याबाबत शासनाकडे परत पाठविण्यात यावा, असा निर्णय घेण्यात येणे, नागपूर महानगरपालिका सभागृहाने एकमताने ठराव करून घेतलेल्या उपरोक्त अधिसूचनेबाबत शासनाने फेरविचार करून निर्णय घेण्याची आवश्यकता, हा प्रश्न राज्यातील सर्वच महानगरपालिकांमध्ये तयार होणे, महापालिकेच्या भोगवटादार मध्यमवर्गीय असल्याने | श्री. देवेंद्र फडणवीस, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | त्यांना अनंत अडचणींचा सामना करावा लागणे, याकरिता या निर्णयाचा पुनर्विचार करून नविन निर्णय घेण्याची आवश्यकता व जोपर्यंत नविन निर्णय होत नाही तोपर्यंत सदर निर्णय स्थगित ठेवून भोगवटादारांकडून हमीपत्र घेऊन दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ पूर्वींच्या तरतूदी प्रमाणे ०.०२% इतकेच भूभाटक वसूल करण्याबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता, या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची करर्यवाही व उपाययोजना." | | |
| ८८ | "सांगली जिल्ह्यात द्राक्ष व डाळिंब पिकांचे मोठ्या प्रमाणात लागवड होत असून शेतकऱ्यांनी जिल्ह्यात नवनवीन आधुनिक प्रयोग करून निर्यातक्षम द्राक्षे व डाळींब पिकवलेली असणे, परंतु सातत्याने अवेळी पाऊस व अतिवृष्टी, गारपीट यामुळे शेती धोक्यात आलेली असणे, वारंवार होणाऱ्या शेती नुकसानीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडणे, यावर ठोस उपाययोजना आखण्याकरिता शासनाने द्राक्ष व डाळिंब पिकांच्या उर्जितावस्था व संरक्षण मिळण्याकरिता बागेवरती प्लास्टीक आच्छादन करणे व शेटनेटसाठी अनुदान देण्याची आवश्यकता असणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी संबंधित मंत्रीमहोदयांकडे पत्रव्यवहार, बैठका घेतल्या असतानाही तसेच विविध आयुधांद्वारे विधानसभा सभागृहात शासनाचे लक्ष वेधूनही अद्याप शासन स्तरावर कोणतीच ठोस कार्यवाही न होणे, परिणामी शेतकरी वर्गामध्ये प्रचंड असंतोष पसरणे, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाचे प्रतिक्रिया व भूमिका." | श्री. अनिल बाबर, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |
| ८९ | "कोल्हापूर वन विभागामध्ये मुख्यवनसंरक्षक क्लेमेन बेन व उपवनसंरक्षक एस.एस.धुमाळ यांचे कार्यकाळामध्ये जिल्ह्यातील जंगलक्षेत्रामध्ये गवती कुरणे वाढविणे व वनतळयांची कामे करणे अपेक्षित असताना तसे न होणे, परीनामी जंगतलातील गवारेडे व जंगली टस्कर हत्तींच्या दैनंदिन उपद्रव व हल्यामध्ये दरवर्षी अनेक शेतकरी गंभीर जखमी व मृत्यमुखी होणे, याबाबत त्यांचा बंदोबस्त करण्याबाबत वेळोवेळी मुख्यवनसंरक्षक व मंत्रालय स्तरावर बैठका घेऊनही कोणतीही कार्यवाही न होणे, तसेच गवारेडे व हत्तींचा दिवसेंदीवस वाढत | श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली. |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
| --- | --- | --- | --- |
| | असलेला उपद्रवामुळे शेतीचे होणारे नुकसान यामुळे शेतकरी मेटाकुटाला येणे, याबाबत उपाययोजना करणे गरजचे असेणे, तसेच जिल्ह्यात लाकुड वाहतुकीसाठी वाहतुक पास वितरीत करण्याऐवजी मोठ्या प्रमाणात अवैधपणे वाहतुक सुरु असणे, याकरीता बेन व धुमाळ यांचे वरदहस्ताने व अपाले आर्थिक हित जोपासून विना पास वाहतुक सुरु असणे, याबाबत शासनाने वाहतूक पास नियमावलीमध्ये आवश्यक त्या सुधारणा करणे गरजेचे असणे, जिल्हा नियोजन समितीकडून सन २०१४ ते १९ या कालावधी वन विभाग (प्रा.) व वन्यजीव विभाग यांना वितरीत केलेल्या कोट्यवधी रुपयांच्या झालेल्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता असल्याबाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी समितीने गंभीर आक्षेप नोंदवत झोलली सर्वच कामे मानकाप्रमाणे व निकृष्ट दर्जाची झाली असल्याबाबत दिलेल्या स्वयंस्पष्ठ अहवालानुसार जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१ रोजी मुख्य वनसंरक्षक प्रा. कोल्हापूर व वन संरक्षक तथा क्षेत्र संचालक, सहयाद्री व्याघ्र, कोल्हापूर यांना संबंधित दोषींवर महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) अधिनियम, १९७९ अंतर्गत विभागीय/खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करणे, परंतु अद्याप याबाबत कोणतीही कार्यवाही सबंधित खातेप्रमुख यांचेकडून करण्यात आलेली नसणे, तसेच कोल्हापूर जिल्ह्यामध्ये संयुक्त वन व्यवस्थापन समित्या कागदोपत्री कार्यरत असणे, वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचे माध्यमातुन चुकीच्या व मनमानी पद्धतीने कामकाज सुरु असून शासनाच्या कोट्यवधी रुपयांचा अपहार करण्याचे काम दरवर्षी अधिकारी व कर्मचारी करत आहेत, समितीच्या कामांची निवड ग्रामसभेच्या मान्यतेने करणे बंधनकारक असताना उप मुख्यकार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जि.प.कोल्हापूर यांनी दिलेल्या अहवालामध्ये अशा कोणत्याही पद्धतीचे कामकाज कोल्हापूर जिल्ह्यातील कोणत्याही वनव्यवस्थापन समितीकडून करण्यात आले नसल्याचे नमुद करणे, जिल्ह्यातील समितींच्या कामकाजाची माहीती लोकप्रतिनिधी यांनी मागणी करुनही गेल्या १ ते दीड वर्षापासुन देण्यात न येणे, याबाबत राज्य व केन्द्र शासनाच्या कोट्यवधी रुपयांचा योग्य विनियोग करण्याचे काम मुख्यवनसंरक्षक व उप वनसरंक्षक | | |

| अ.क्र.<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | यांचे असताना त्यांचेकडून अधिकारांचा गैरवापर करत अधिकारी व कर्मचारी यांचेवर दबाव आणत Gem Portal वर बेकायदेशीरपणे खरेदी करण्यात येणे, या सर्व बाबी गंभीर स्वरुपाच्या असून शासनाच्या कोट्यवधी रुपयांचा अपव्यय करणा-या असणे, याबाबत शासनाने कारवाई करण्याची आवश्यकता, दाजीपुर वन्यजीव अभयारण्याचा पर्यटनदृष्टया विकास करण्याकरीता मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यखतेखाली दिनांक १९ मे, २०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ११० कोटी रुपयांच्या आरखडयास तत्वता मान्यता देऊन २५ कोटी रुपयांच्या निधीची तदतुद करण्याचे आश्वासीत करण्यात येणे, परंतु श्री. समाधान चव्हाण, वनसंरक्षक तथा व्याघ्र संचालक, सहयाद्री व्याघ्र राखीव कोल्हापूर यांचेकडून याबाबत कोणतेही कार्यवाही वेळेत न करणे, यास सर्वस्वी चव्हाण हे जबाबदार असुन या सर्वबाबी गंभिर स्वरुपाच्या असणे, याबाबत शासनाने कोल्हापूर जिल्ह्यामध्ये वनविभागामध्ये चुकिच्या व मनमानी पद्धतीने सुरु असलेल्या कामकाजाची चौकशी करून सबंधित वरिष्ठ अधिकारी यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, त्याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया.” | | |
| ९० | "राज्यातील मागासवर्गीय अधिकारी व कर्मचारी यांच्या पदोन्नतीतील आरक्षणासंदर्भात शासनाची अत्यंत उदासीन व विरोधी भूमिका असणे, मागील चार-पाच वर्षापासून विविध संवर्गातील, विविध विभागांतर्गत एक लाखापेक्षा अधिक अनुसूचित जाती-जमातीचे, भटके-विमुक्त, विशेष मागासवर्गीय अधिकारी व कर्मचारी हे पदोन्नतीपासून वंचित असणे, मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी मागासवर्गीय पदोन्नती संदर्भात दिलेल्या निकालानंतर तत्कालीन सरकारने दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजीच्या परिपत्रकानुसार मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या ३३ टक्के जागा रिक्त ठेवलेल्या असणे, तथापि सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ७ मे, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे पदोन्नती आरक्षण सरसकट रद्द करणे व मागासवर्गियांसाठी रिक्त ठेवण्यात आलेल्या जागा देखील सेवाज्येष्ठतेनुसार सरसकट भरणे, मागासवर्गीयांच्या पदोन्नतीतील आरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात जर्नेलसिंग वि. लक्ष्मीनारायण गुप्ता याप्रकरणी | डॉ. अशोक उईके, श्री. राजेश पाडवी, डॉ. देवराव होळी, सर्वश्री. दिलीप बोरसे, कृष्णा गजबे, काशिराम पावरा, भिमराव केराम, डॉ. संदीप धुर्वे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | दिनांक २८ जानेवारी, २०२२ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये खालील प्रमुख बाबी नोंदविलेल्या असणे, १. आरक्षित प्रवर्गातील उमेदवार हे अनारक्षित प्रवर्गातून निवडीसाठी सुद्धा पात्र ठरत असणे, (परिच्छेद १७) २. आरक्षित प्रवर्गातील प्रतिनिधित्वाचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे, खुल्या प्रवर्गातून गुणवत्तेनुसार पदोन्नती मिळाल्याच्या कारणाखाली त्यामध्ये बदल होऊ शकत नसणे, (परिच्छेद १७) ३. एम. नागराज यांच्या निर्णयाची अंमलबजावणी ही पूर्वलक्षी प्रभावाने नाही तर पुढील प्रभावाने (Prospective) असणे, (परिच्छेद ४२) ४. संख्यात्मक आकडेवारी (Quantifiable Data) निश्चित करण्यासाठी संपूर्ण सेवा कालावधी लक्षात घेऊ नये तसेच संवर्ग व गट हे समानार्थी शब्द नसणे, (परिच्छेद ४५) ५. संविधानाने राज्यांना अपर्याप्त संख्येनुसार पदे किंवा पदांच्या वर्गाला पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्याचे अधिकार प्रदान केले असणे, (परिच्छेद ४६) ६. राज्यांनी संवर्गला (Cadre) अनुसरून पदोन्नतीमध्ये आरक्षण सिद्ध केले पाहिजे कारण बिंदुनामावली ही संवर्ग नुसार निर्धारित केली जात असणे, (परिच्छेद ४७) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त निकालानुसार महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचा दिनांक ७ मे, २०१९ रोजीचा निर्गमित केलेल्या शासन निर्णय खालील कारणाने अवैध ठरत असणे,१. या निर्णयानुसार महाराष्ट्र शासनाने मागास प्रवर्गाच्या ते ३० टक्के आरक्षित जागा खुल्या प्रवर्गात समाविष्ट केल्या असणे, तथापि मागास प्रवर्गाचे आरक्षण खुल्या प्रवर्गात न मोजता आरक्षणाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने वरील निर्णयाद्वारे दिलेले असणे, २. एम. नागराज विरुद्ध भारत सरकार या निर्णयाची अंमलबजावणी पूर्वलक्षी प्रभावाने न करता ती पुढील प्रभावाने (१९/१०/२००६ पासून पुढे) करण्याचे आदेश देखील सर्वोच्च न्यायालयाने दिलेले असणे, परंतु शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ७ मे, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाने दिनांक २५ मे, २००४ पासून म्हणजेच पूर्वलक्षी प्रभावाने त्यांची अंमलबजावणी करण्यात आलेली असणे, सदरील एम. नागराज यांच्या निकालानुसार स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या असणे की मागास प्रवर्गाच्या रोस्टर पॉईंटच्या आरक्षित जागेवर जनरल कॅटेगरी यांना | | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | पदोन्नती देण्यात येऊ नये, तरी देखील दिनांक ७ मे, २०२१ रोजीच्या चुकीच्या शासन निर्णयानुसार सद्यस्थितीत मागासवर्गीयांसाठी रिक्त ठेवणे अपेक्षित असलेल्या जागेवर पद्धतीची प्रक्रिया वेगाने सुरूच ठेवणे, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त निकालानुसार राज्य सरकार यांनी कॅडरवाईज डाटा तयार करण्याबाबत कोणतीच कार्यवाही अद्याप न करणे, मागासवर्गीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती आरक्षण संदर्भात गठित करण्यात आलेल्या मंत्रिगटाच्या समितीची कुठलीही बैठक या निकालानंतर न घेणे, सदर मंत्री गटातील समितीच्या कुठल्याही मंत्र्यांनी मागासवर्गीयांच्या संदर्भात सहानुभूतीपूर्वक निर्णय घेण्यासंदर्भात मागणी न करणे, एकंदरीतच राज्यभरात एकूणच कार्यरत असलेल्या सुमारे दहा लाखांपेक्षा अधिक मागासवर्गीय अधिकारी व कर्मचारी या सर्वांच्या मनामध्ये सरकारच्या मागासवर्गीय विरोधी भूमिकेमुळे उदासीनता निर्माण होणे,एक लाखापेक्षा अधिक मागासवर्गीय अधिकारी व कर्मचारी यांना पदोन्नतीपासून वंचित ठेवणे हे अतिशय अन्यायकारक व एकंदरीतच शासनाच्या कामकाजावर विपरीत परिणाम करणारे असणे, शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ९१ | "महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा संयुक्त परीक्षांतर्गत होणाऱ्या कृषी सेवा मुख्य परीक्षेचा नवीन अभ्यासक्रम अलिकडेच आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला असणे, या संदर्भात असणाऱ्या शासन निर्णयानुसार बी.एससी. (ऑनर्स) उद्यानविद्या / वनविद्या / सामाजिक विज्ञान / बी. टेक. कृषी अभियांत्रिकी / बी. टेक. जैवतंत्रज्ञान या विद्याशाखांच्या पदव्या बी.एससी.(ऑनर्स) कृषी या पदवीशी समतुल्य समजण्यात आल्या असणे, तरीदेखील लोकसेवा आयोगाने अलिकडेच जाहीर केलेल्या उपरोक्त अभ्यासक्रमात बी.एससी. (ऑनर्स) कृषी या पदवी अभ्यासक्रमाला झुकते माप देण्यात आलेले असणे, पेपर १ व २ मिळून ४०० गुणांपैकी साधारणतः त्या अभ्यासक्रमाचे सुमारे २४८ गुण व बी.टेक. (ऑनर्स) कृषी अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाचे सुमारे १३६ गुण असे भारांकन निश्चित करण्यात आले असणे, या १३६ गुणांमध्येही सर्वसाधारण कृषी विषयक अभ्यासक्रमाचा समावेश असून निव्वळ कृषी | सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. राम कदम, रवि राणा, अभिमन्यु पवार, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे म्हणता येतील अशा केवळ १६ गुणांचाच समावेश करण्यात आलेला असणे, यामुळे बी.टेक. (ऑनर्स) कृषी अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यावर अन्याय होणार असणे, तसेच कृषी विभागामधील शेतकऱ्यांच्या हिताच्या अनेक योजनांचे स्वरूप बी.टेक. (ऑनर्स) कृषी अभियांत्रिकी अभ्यासक्रमाशी निगडीत असल्याच्या वस्तुस्थितीचाही विचार करून, परीक्षांच्या तारखा जाहीर होण्यापूर्वी या अभ्यासक्रमाचा पुनर्विचार करावा, अशा आशयाचे निवेदन महाराष्ट्र राज्य कृषी अभियांत्रिकी संघटनेने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे दिलेले असणे, आयोगामार्फत त्यावर अद्यापही कोणतीही उचित कार्यवाही करण्यात आलेली नसणे, सर्व संबंधित विद्याशाखांच्या विद्यार्थ्यांना समान न्याय मिळण्यासाठी सदर अभ्यासक्रमाचा फेरविचार करण्याच्या दृष्टीने आयोगाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ९२ | "मराठवाडा खादी ग्रामउद्योग समीती नांदेड ही संस्था सन १९६७ मध्ये स्थापन झालेली असणे, सदरील संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील कांही भागाचा समावेश असणे, सदरील संस्थेमार्फत खादीचे उत्पादन व विक्री केली जाऊन कायमस्वरूपी रोजगार दिला जात असणे, सदर संस्थेच्या मालमत्ता जमीन जवळपास २६ शहरामध्ये २९ विविध ठिकाणी असणे, सदरील सस्थेतील अंतर्गत वाद व बेकायदेशीर व्यवस्थापणामुळे संस्था डबघाईस येणे, सदरील संस्थेअंतर्गत उत्पादने बंद रोजागर बंद झाला असणे , कुशल कामगारावर बेकारीची वेळ येणे, सदरील संस्थेच्या मालमत्ता विक्री करताना सह धर्मादाय आयुक्त औरंगाबाद यांची परवानगी न घेता परस्पर विक्री केली असणे, सदरील न्यासाची सर्व मालमत्तेची नोंद अनुसूची १ ला न घेणे, विश्वस्थानी न्यासाची जागा भाडे तत्वावर देताना मा. धर्मादाय सह आयुक्त यांची परवानगी नियमांनुसार घेतली नसणे, न्यासाच्या नियमावलीप्रमाणे व्यवस्थापन न करणे, व्यवस्थापन मंडळाच्या पाधाधिकारी व सदस्याकडून गैरव्यवहार बाबतीत मा. धर्मादाय आयुक्त मुंबई यांच्याकडे तसेच शासनाच्या गवर्नर डिटेल्स वर १५/०३/२०१७ रोजी दाखल करणे, सदरील तक्रारीची चौकशी व दोष सिद्ध झाला असतांनाही त्याबाबत कोणतीही कार्यावही झालेली | सर्वश्री. अभिमन्यु पवार, राणाजगजीतसिंह पाटील, ॲड. राहूल कुल, सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, सुधीर मुनगंटीवार, राजेश पवार, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | नसणे, सदरील निरक्षण व चौकशी अहवाल क्र. ६३/१७, २७/१७ नुसार सहाय्यक धर्मादाय आयुक्त -१ नांदेड विभाग नांदेड यांनी विश्वस्तविरिद्ध कारवाई करण्याची परवानगी मागण्यासाठी प्रस्ताव मा.धर्मादाय सह आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे प्रस्ताव पाठवण्यात येत असल्याचे निरीक्षण अहवालात नमूद करणे, सदर संस्थेचे संचालक मंडळ बेकायदेशीर निवडली असल्याने सदरील संचालक मंडळ निवडीचा अहवाल व संचालक मंडळ निवडीतील बदलाचा अहवाल मा. धर्मादाय आयुक्तांनी वेळोवेळी नामंजूर केला असल्याने सद्यस्थितीतील संचालक मंडळ बेकायदेशीर असल्याचे निदर्शनास येणे, सदरील संचालक मंडळाने वसमत,केज सह इतर मालमत्ता नियमबाहया विक्री केलेली असणे, नांदेड येथील संस्थेची मालमत्ता विकासकाला परस्पर नियमबाह्य पद्धतीने दिलेली असणे, अश्या पद्धतीने महाराष्ट्रातील स्वातंत्र्यसैनिकांनी स्थापन केलेले अत्यंत उल्लेखनीय कार्य असलेल्या या संस्थेच्या अनागोंदी व भ्रष्ट कारभाराची व अनियमिततेची चौकशी करण्याबाबत व सदरील संस्थेवर प्रशासकीय कार्यावही करण्याबाबत शासनाने तातडीने करवायची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | कित्ता |
| ९३ | "चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा व्याघ्र प्रकल्पाला आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असणे, परंतु या ठिकाणी कोअर झोनमध्ये काम करणाऱ्या गाईड व ड्रायव्हर यांना अत्यंत अल्प मानधन मिळत असणे, जून ते सप्टेंबर या पावसाळयाच्या कालावधीत सदर प्रकल्पाचा कोअर झोन बंद असल्याने या कमर्तचाऱ्यांना कोणतेही मानधन मिळत नसणे, याशिवाय कोरोनामुळे हा प्रकल्प दोन वर्षे पर्यटकांसाठी बंद असल्याने या कर्मचाऱ्यांना कोणतेही मानधन मिळालले नसणे, त्यांची परिस्थिती हलाखीची होणे, त्यांच्या उपजिवीकेचा गंभीर प्रश्न उभा राहणे, या काळात या कर्मचाऱ्यांना शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत मिळाली नसणे, ही मदत त्यतांना मिळावी असे या कर्मचाऱ्यांची मागणी असणे, तसेच पावसाळयात येथील पर्यटन बंद असल्याने या कर्मचाऱ्यांना पर्यायी रोजगार उपलब्ध करून द्यावा किंवा मानधन द्यावे तसेच मानधनात वाढ करावी, अशी त्यांची आग्रही मागणी असतानाही त्यावरील कारवाईस शासनाकडून होत असलेला विलंब, परिणामी येथील गाईड व ड्रायव्हर यांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे याबाबत करावयाची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया." | श्रीमती प्रतिभा धानोरकर वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| ९४ | "महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धीच्या कामाची संपूर्ण समन्वय करणारी यंत्रणा म्हणून माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची ओळख असून शासनाचे विविध कल्याणकारी कार्यक्रम, उपक्रम, धोरणे, योजना आणि विविध मोहिमांची माहिती या यंत्रणेद्वारे तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्यात येत असणे, शासनाचे उपक्रम जनतेपर्यंत पोहोचविणे याबरोबरच जनतेच्या प्रतिक्रिया शासनामार्फत पोहचविण्याची कामगिरी महासंचालनायास पार पाडावी लागत असणे, परंतु कुंपणच शेत खात असल्याचा गंभीर प्रकार महासंचालनालर्याच्या कामकाजात आढळून येणे, तत्कालीन संचालक श्री. अजय अंबेकर यांनी त्यांच्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणात आर्थिक अनियमितता करून शासनाचे करोडो रुपये लुबाडणे, अंबेकर कार्यरत असताना आयोजित करण्यात आलेल्या इस्त्रायल देशाच्या अभ्यास दौ-यामध्ये विविध प्रकारच्या प्रशासकीय व वित्तीय त्रुटी आढळून येणे, त्यांनी मोबाईल व्हॅनद्वारे प्रसिद्ध करण्यासाठी ई-निविदेमध्ये अटी व शर्तीनुसार संस्थांचा समावेश करण्याच्या कामी "ब" वर्गासाठी अर्ज असताना त्यास "अ" वर्गामध्ये समाविष्ट करण्यात येऊन अन्य निविदाधारकांवर अन्याय करणे, महत्मा ज्योतिबा फुले चित्रपट निर्मिती या शासनाच्या महत्वाकांक्षी योजनेची पूर्तता करण्यासाठी चित्रपट निर्मितीचे काम मे एप्लोक्सन्स मिडीया प्रा.लि. मुंबई यांच्यामार्फत नियमबाहय करार करून शासनाची फससवणूक केली असता संबंधित नस्ती गहाळ झाल्याचे उघड होणे, जाहिरराती प्रदर्शन माध्यम आराखडा तयार करताना संबंधित यंत्रणेची परवानगी न घेता विहित कार्यपद्धतीची अंमलबजावणी न करता कार्यालयीन स्तरावर टिप्पणीद्वारे मे बेसिल या खाजगी कंपनीची निवड करणे, मागील सरकारमध्ये "मी मुख्यमंत्री बोलतोय" यात केलेल्या जाहिरातींचे मुल्यांकन व निरिक्षणाबाबत देयकांबाबत गंभीर स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त होणे, राज्य परिवहन महामंडळाच्या जाहिरातींबाबत मे श्री. ओम ॲडव्हटायझर्स मुंबई व मे राकेश ॲडव्हटायझर्स, मुंबई यांनी बनावट प्रमाणपत्राद्वारे शासनाची आर्थिक फसवणूक केल्याचा अहवाल प्राप्त होऊनही त्यानंतरच्या काळात वरील दोन्ही संस्थांना कार्यादेश देण्यात येणे, सामाजिक न्याय विभागास पुढील वर्षासाठी समाज माध्यमांद्वारे जाहिरात | श्री. विकास ठाकरे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | करण्यासाठी एजन्सी नियुक्ती करण्याचे सादरीकरण बेकायदेशीररित्या व अधिकाराचा दुरुपयोग करून आयोजित करणे, दि.२१ जुलै,२०१७ च्या शासन निर्णयानुसार संबंधित विभागाकडून नियमितील तरतुदीनुसार ७.५ टक्के प्राप्त रकमेच्या वापरामध्ये आक्षेपार्ह बाबी महालेखापालाच्या लेखा परिक्षणामध्ये निदर्शनास येणे, अशा अनेक प्रकारांमध्ये श्री. आंबेकर यांचे वर्तन बेशिस्त, बेजबाबदार व निष्काळजीपणाचे असल्याचे आढळून येणे, यामध्ये मोठा आर्थिक गैरव्यवहार व भ्रष्टाचार झाल्याने याप्रकरणी राज्य शासनाने सखोल चौकशी करून तत्कालीन संचालक श्री. अजय अंबेकर यांच्यावर सक्त वसुली संचालनालयामार्फत चौकशी करून कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | | |
| ९५ | "पालघर जिल्ह्यात रेल्वेच्या डीएफसीसी प्रकल्पातील रेल्वे ट्रॅकच्या भरावासाठी जिल्ह्यातील वैतरणा, सफाळे, केळवे, पालघर, उमरोली, बोईसर, वानगाव, डहाणू आणि घोलवड या रेल्वे स्थानकानजीक आजूबाजूच्या गावाजवळील हिरवेगार डोंगर व टेकड्या पोखरुन व त्यावरील झाडांची कत्तल करून हजारो ब्रास माती आणि मुरुम यांची बेकायदा वाहतूक तसेच गौण खनिजाचे ठेकेदार आणि भूमाफियांकडून बेकायदा उत्खनन राजरोसपणे सुरु असणे, बेकायदा उत्खनन करणाऱ्या ठेकेदार व भूमाफियांविरुद्ध कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत पालघर जिल्ह्याच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, डोंगर पोखरुन गौण खनिजे काढण्यात येत असल्याने पर्यावरणाचा समतोल राखण्याकरिता बेकायदा उत्खनन करणाऱ्या ठेकेदार व भूमाफियांवर कठोर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. श्रीनिवास वनगा, सुनिल प्रभू, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| ९६ | "चाळीसगाव, जि.जळगांव येथे ऑगस्ट २०२१ महिन्याच्या शेवटी व पुन्हा सप्टेंबर २०२१ महिन्याच्या पहिल्या आठवड्यात ढगफुटीसदृश्य अतिवृष्टी होणे, त्यामुळे पाटणादेवी अभयारण्य क्षेत्र व गिरणा - मन्याड धरण क्षेत्रात जवळपास एका रात्रीत १४० मिलिमीटर पाऊस झाल्याने व नद्यांना आलेल्या महापुरात बरेच रस्ते पाण्याखाली गेल्याने अनेक गावांचा संपर्क तुटणे, पुलांचे भराव वाहून गेले असून काही पुलांचा मुख्य भाग क्षतिग्रस्त झालेला असणे, तसेच काही ठिकाणी नवीन पुलांची निर्मिती करण्याची निर्माण झालेली अत्यावश्यक गरज, या सर्व परिस्थितीमुळे चाळीसगाव तालुक्यातील दळणवळण प्रभावित झाले असून नागरिकांना या रस्ते व पुलावरून ये-जा करणे जीवघेणे ठरत असणे, यासंदर्भात चाळीसगाव तालुक्यातील राज्यमार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग ह्यांच्या दुरुस्तीसाठी सुमारे ५० कोटी रुपयांची आवश्यकता असून त्यास प्राधान्याने मंजुरी द्यावी याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधिंनी माहे २०२१ ला निवेदनाद्वारे मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे मागणी करणे, परंतु सदरील निवेदनावर आजतागायत कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, याकडे शासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. राम कदम, रवि राणा, अभिमन्यु पवार, संदिप क्षिरसागर, नामदेव ससाने, राजेंद्र पाटणी, समिर मेघे, मोहन मते, डॉ. पंकज भोयर, श्री. राणाजगजीतसिंह पाटील, ॲड.राहूल कुल, सर्वश्री. संभाजी पाटील-निलंगेकर, योगेश सागर, डॉ. देवराव होळी, सर्वश्री. मंगेश चव्हाण, गणपत गायकवाड, वि.स.स. | कित्ता |
| ९७ | "ठाणे जिल्ह्यातील कल्याण, डोंबिवली, भिवंडी, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर, नवी मुंबई यांना जोडणाऱ्या महत्त्वाच्या कल्याण शिळ रस्त्याचे सहा पदरीकरणाचे काम रस्ते विकास महामंडळातर्फे सुरु असणे, या कामासाठी मे. साकेत इन्फ्राप्रोजेक्ट प्रा. लि. जेव्ही मे.एस. एम. एस. एल या कंत्राटदारांची नियुक्ती करून टप्पा - १ साठी ३८९ कोटी मंजूर असणे, अत्यंत महत्त्वाच्या या रस्त्याच्या कामाच्या दर्जाबाबत सुरुवातीपासूनच स्थानिक लोकप्रतिनिधी या नात्याने मा. मंत्री व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिलेली असणे, अधिकाऱ्यांना घेऊन प्रत्यक्ष पाहणी करून काही सूचना दिलेल्या असणे, रस्त्याचा दर्जा अत्यंत निकृष्ट असतानाही पावसाळी अधिवेधन २०२० विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक १३८८४ याला अधिकारी व कंत्राटदार यांनी आर्थिक संगनमत करून दिलेले खोटे व दिशाभूल करणारे उत्तर, या उत्तरामध्ये मा. मंत्री महोदयांचीही केलेली | श्री. प्रमोद पाटील, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | फसवणूक, त्यानंतर सतत पाठपुरावा केल्यानंतर महामंडळाने कामाचा दर्जा तपासण्यासाठी व्ही. जे. टी. आय या त्रयस्थ संस्थेची नियुक्ती करण्यात येणे, या संस्थेने केलेल्या पाहाणीत रस्त्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे होऊन ४० ठिकाणी रस्ता वापरण्यायोग्य नसल्याचे अभिप्राय नोंदविण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, संस्थेने शासनास सादर केलेल्या संरचनात्मक अहवालात केवळ १० कि.मी. लांबीच्या रस्त्यात ६४ पॅनलमध्ये तडे गेल्याचे आढळून येणे, या रस्त्याचे काम कंत्राटदार कंपनीने अतिशय संथगतीने करुनही अत्यंत निकृष्ट दर्जाचे केल्याने सतत होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे प्रवाशाचे होत असलेले हाल, अनेक वेळा अपघात झालेले असणे, असे असतानाही जबाबदार अधिकाऱ्यांनी ज्याकडे जाणीवपूर्वक केलेले दुर्लक्ष, लोकप्रतिनिधींना दिलेले खोटी व दिशाभूल करणारी उत्तरे, केवळ अधिकारी व कंत्राटदारांच्या संगनमताने शासनाच्या निधीचा होत असलेला दुरुपयोग, वारंवार निदर्शनास आणूनही कारवाई करण्यास होत असलेली टाळाटाळ, दोषींना पाठीशी घालण्याचा सुरु असलेला प्रयत्न, त्यामुळे या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांमध्ये निर्माण झालेला संताप व चिड पाहता याकडे तातडीने लक्ष घालून कल्याण शिळ रस्त्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत जबाबादारी निश्चित करून संबंधित कार्यकारी अभियंता, उपअभियंता व कनिष्ठ अभियंता यांना तातडीने निलंबित करून त्यांची चौकशी करण्याची आवश्यकता तसेच मे. साकेत इन्फ्राप्रोजेक्ट प्रा. लि. जेव्ही मे. एस. एम. एस. एल या कपन्यांना काळ्या यादीत टाकून शासनाचे झालेले नुकसान त्यांच्याकडून वसूल करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| ९८ | "नागपूर जिल्ह्यातील सुरु असलेले नागपूर ते मुंबई दुरागती समृद्धी महामार्गाचे कामे दोन वर्षांपासून सुरु असणे, सदर मार्गाचे काम म.रा. रस्ते विकास महामंडळ अखत्यारित सुरु असून सदर कामाचे कंत्राट मेघा कंपनीला दिला असून सदर रत्यावरुन जड वाहनाची कंत्राटदाराकडून मोठ्या प्रमाणात वाहतुक सुरु असणे, यामुळे देवळी-सुकळी, घारपुरे-सालई दभा, कान्होलीबारा ते टाकळघाट, वारंगा-घोगली-चिंचोली-सांवगी, कान्होलीबारा-केळझर, हळदगाव-वडगाव-आजगांव व घोडेघाट या ग्रामीण मार्ग, | सर्वश्री. समिर मेघे, मोहन मते, डॉ. पंकज भोयर, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | जिल्हा मार्गाची जड वाहतुकीमुळे पूर्ण दूर्दशा होणे, यामुळे ग्रामीण भागातील रहिवाशांना, शेतकऱ्यांना, व्यावसायिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावे लागने, याबाबत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना लोकप्रतिनिधी या नात्याने तोडी व लेखी तक्रार देऊनही संबंधित समृद्धी महामार्गाच्या काम करणाऱ्या कंत्राटदारावर कोणतीही कार्यवाही होत नसल्याने लोकप्रतिनिधी या नात्याने दि. १५ फ्रेबुवारीला स्वतः अधिकाऱ्यासोबत रस्त्याची पाहणी केले असता रस्त्याची पूर्णता दुर्दशा झाल्याचे दिसून येणे, यामुळे संबंधित जड वाहतुकीमुळे रस्त्याची झालेली खराबी व दुर्दशा यामुळे शासनाने संबंधित कंत्राटदारावर कार्यवाही करण्याची आवश्यकता, नागरिकामध्ये पसरलेला तीव्र असंतोष, शासनाने यावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ९९ | "जि. ठाणे, जव्हार सार्वजनिक बांधकाम विभागातील वाडा उप विभागाअंतर्गत खैर या एकाच गावातील पडवलेपाडा ते धिंडेपाडा व तरेपाडा आदी तीन रस्त्यांची कामे प्रत्यक्षात न करता बोगस बिले सादर करून कोट्यवधी रुपयांचा आर्थिक घोटाळा करण्यात आल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, या संदर्भात शिवक्रांती सामाजिक संघटनेच्या अध्यक्षांनी मा.मुख्यमंत्री व सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे लेखी तक्रार दाखल करण्यात येऊनही अद्याप दोषींविरुद्ध शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, जव्हार सार्वजनिक बांधकाम विभागाने २०१० ते २०२१ या कालावधीत काढलेल्या सर्व बिलांची आणि प्रत्यक्षात झालेल्या कामांची एसआयटी तर्फे सखोल चौकशी करण्याची सामाजिक संघटनेने शासनाकडे केलेली मागणी, या सर्व कामांची दक्षता व गुणनियंत्रण विभागामार्फत चौकशी करून बिले काढणाऱ्या शाखा अभियंता, उपविभागीय अभियंता व कार्यकारी अभियंता यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांना तात्काळ निलंबित करून त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक विभागा मार्फत चौकशी करण्याची तसेच संबधीत ठेकेदारास काळया यादीत टाकण्याची व त्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील आदिवासी जनतेत निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. राम सातपुते, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १०० | "महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री क्षेत्र पंढरपूर येथील श्री.विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी राज्यातून लाखो भाविक पंढरपूर ला जात असणे. सोलापूर-पंढरपूर मार्गावरील पंढरपूर-देगांव-चिंचोली-टाकळी-सिकंदर-कुरुल ते रामा-२०२ ला जोडणारा रस्ता प्रजिमा ६६ रस्ता हा सध्यास्थितीत अत्यंत खराब असून हा पंढरपूर व सोलापूर मुख्यालयास जोडणारा जवळचा मार्ग असणे. परंतू रस्त्यांवर अनेक ठिकाणी खड्डे पडलेले असल्याने हा रस्ता म्हणजे मृत्युचा सापळा बनलेला असणे. रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे सातत्याने अपघात घडत असल्याने परिसरातील नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे. यामुळे रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक असणे. या रस्त्याच्या सुधारणेमुळे या भागातील शेतीमाल पंढरपूर व सोलापूर येथे नेण्यास मदत होणार असून सदर रस्ता बागायती क्षेत्रातून जात असलेने हा रस्ता ऊस वाहतुकीसाठी उपयुक्त असणे.या रस्त्याच्या सुधारणेमुळे या भागातील शैक्षणिक संकुले, तिर्थक्षेत्र, बाजारपेठा, साखर कारखाने व दवाखाने जोडले जाणार असल्यामुळे पंढरपूर-देगांव-चिंचोली-टाकळी-सिकंदर-कुरुल ते रामा-२०२ ला जोडणारा रस्ता प्रजिमा ६६ कि.मी. ०/०० ते ३५/७०० या कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला असून सदरच्या रस्त्याचा आशियाई विकास बँक अर्थसहाय अंतर्गत फेज २ मध्ये समावेश करून निधीची तरतूद करणे गरजेचे असणे, सदर रस्त्यास आशियाई विकास बँक अर्थसहाय्यातंर्गत प्रस्तावित केलेल्या कामांना मंजुरी देण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांची, भाविकांची वारंवार मागणी होत असूनही त्याकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले असणे, परिणामी या मार्गावरून प्रवास करताना जनतेमध्ये पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण यामुळे शासनाने या मार्गाचा आशियाई विकास बँक आवश्यक फेज-२ मध्ये सामावेश करून कामाला गती देण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १०१ | "नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावर वर्धा जिल्ह्यातील आर्वी विधानसभा मतदार संघातील विरूळ – रसुलाबाद – सोरटा – पिंपळगाव – सावरखेडा - निजामपूर टाकळी - वडाळा इत्यादी गावे येत असणे, रस्त्यावरील काम सुरू असल्याने मार्गाला लागून शेतकऱ्यांच्या शेतातील सर्व पिके धुळीने उद्ध्वस्त होणे, या संदर्भात उपविभागीय अधिकारी यांच्या माध्यमातून सर्व्हे करण्यात येणे, परंतु त्याप्रमाणे शेतकऱ्यांच्या पिकांना मोबदला न मिळणे, समृद्धी महामार्गाच्या बाजूला शेतकऱ्यांच्या शेतात जाणारे रस्ते उध्वस्त होणे, महामार्गाचे खाली उतरणारे पाणी पूर्णतः शेतकऱ्यांच्या शेतामध्ये उतरते त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतामध्ये २-३ फुट पाणी जमा होऊन पिके उध्वस्त होणे, सोबतच शेतकरी उध्वस्त होत असल्यामुळे तात्काळ उपाययोजना करण्याची गरज असणे, शेतकऱ्यांच्या शेताला लागून वरून येणारे पाणी अडविण्याच्या दृष्टीने नाली बांधकाम करण्याची गरज निर्माण होणे, वर्धा जिल्ह्यातील आर्वी-वर्धा व तळेगाव - आष्टी-द्रुगवाडा या महामार्गाचे काम पूर्ण झाले असतानाही विभागाने महामार्गावरील दोन्ही बाजूच्या शेतकऱ्यांना विचार न करता व योग्य नियोजन न केल्यामुळे रस्त्यावरील पाणी शेतकऱ्यांच्या शेतामध्ये उतरल्याने पिके उध्वस्त होणे, तसेच शेतकऱ्यांना जाण्या - येण्याच्या दृष्टीने वाहिपेरीचे रस्ते नामशेष झाल्यामुळे शेतकरी अडचणीत सापडलेला असणे, शासनाने या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करून पिकांचा मोबदला, पाणी अडविण्याच्या दृष्टीने नाली बांधकाम व वाहिपेरीचे रस्ते तातडीने तयार करून देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. दादाराव केचे, वि.स.स. | कित्ता |
| १०२ | "दि. २६/११/२०२१ रोजी उच्चस्तरीय सचिव समितीने अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाअंतर्गत नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्या आस्थापनेवरील उच्चस्तरीय सचिव समितीने १३९१ पदांना मंजुरी दिलेली असणे, विभागातील एकूण ४९९ पदे निरसित करण्यात येणे, मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्राचा विचार करता, सततची वाढणारी लोकसंख्या, मुंबईवर कोसळणारी नैसर्गिक आपत्ती, तसेच कर्मचारी/अधिकारी यांचेवर कामाचा मोठा ताण पडणार असून कर्मचारी शासनाच्या महत्वाकांक्षी योजना जनतेला परवू न शकणे, विभागातील पदे कमी झाल्यास शासनाच्या | श्रीमती मनिषा चौधरी, ॲड. राहुल नार्वेकर, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | महत्वाकांक्षी योजना गरजू व पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यास मोठ्या अडचणी निर्माण होण्याची शक्यता, अन्नधान्य, केरोसीन, बायोडिझेल व वेळोवेळी नियंत्रित करण्यात येणा-या शिधाजीन्यांचा काळाबाजार रोखणे शक्य होणार नाही, हा काळाबाजार रोखण्यास कर्मचारी कमी पडल्यास जनता त्यांच्या हक्कापासून वंचित राहणे, हा विभाग लोकाभिमुख व गोरगरीब जनतेला अन्नधान्य पुरविणारा असल्याने या विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची पदे कमी करू नये यासाठी होत असलेली मागणी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना." | | |
| १०३ | "शासनाने, सा.वि.प्र अंतर्गत राज्यातील अन्न धान्य वाहतूक कंत्राट निश्चित करण्यासाठी अटी शर्ती ठरवून दिनांक १५ जानेवारी २०२१ रोजी शासन निर्णय निर्गमित करणे, सदर शासन निर्णया विरुद्ध मा. उच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल होणे, मा. न्यायालयाने सर्व याचिका खारीज करून शासन निर्णय व त्यामधील अटी व शर्ती योग्य ठरवून त्या कायम करण्याचा दिलेला निर्णय, उक्त शासन निर्णयातील अट क्र ५.९ अन्वये निविदा मध्ये पात्रतेसाठी निविदाकाराकडे असणारी आवश्यक वाहन क्षमता बाबत तरतूद नमूद करण्यात येणे, तसेच एका पेक्षा जास्त जिल्ह्यात निविदा सादर करणाऱ्या निविदाकाराना अट क्र ५.१७ अन्वये विशेष सवलत देण्यात येऊन अश्या निविदाकारांना ते एका पेक्षा जास्त ठिकाणी न्यूनतम ठरल्यास, त्यांना ७ दिवसात वाहने उपलब्ध करून देणेबाबतची तरतूद नमूद असणे,सिल्व्हर रोडलाइन्स, यवतमाळ या निविदाकाराने उपरोक्त अट क्र ५.१७ चा उपयोग करून ७ दिवसात वाहने सादर करणे बाबत दिनांक १० जून २०२१ शपथपत्र सादर करून वाहनांच्या एक सारख्या कागदपत्रा वर राज्यातील १० जिल्ह्यात निविदा सादर करणे व सर्व निविदांनमध्ये पात्रता मिळविणे, त्यापैकी यवतमाळ, चंद्रपूर, बुलढाणा, अमरावती या ४ जिल्ह्यात दिनांक ३० सप्टेंबर २०२१ व १२ ऑगस्ट २०२१ रोजी न्यूनतम निविदाकार ठरणे, त्यामुळे शासन निर्णयतील अट क. ५.१७ व त्यांचे शपथपत्र दिनांक १० जून २०२१ नुसार त्यांना एक जिल्हा वगळून इतर ३ जिल्ह्यासाठी शापाथपत्रात नमूद तितक्याच क्षमतेचे, अतिरिक्त स्वामालकीचे व नियंत्रणाखालील वाहने ७ दिवसात उपलब्ध करून देणे | श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स. | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | आवश्यक असणे, सदरील निविदा प्रक्रिया ही जिल्हास्तरावर न होता शासनस्तरावर झालेली असणे, शासनस्तरावरील निविदा समितीने १० जिल्ह्यात सादर केलेली निविदा पात्र ठरविणे, सदर निविदाकाराकडे अट क्र ५.१७ नुसार आवश्यक वाहन क्षमता आहेत किवा नाही याची खातरजमा व पूर्तता न करता उक्त नियम शिथिल करून या निविदाकारास ४ जिल्ह्यात कंत्राट मंजुरीचे प्रस्ताव सादर करणे, सिल्वर रोडलाइन्स या निविदाकाराने अट क्र ५.१७ व शपथपत्र दिनांक १० जून २०२१ नुसार एक जिल्हा वगळून इतर ३ जिल्ह्यासाठी तितक्याच क्षमतेचे अतिरिक्त स्वामालकीची व नियंत्रणाखालील वाहने ७ दिवसात विभागस सादर करणे आवश्यक असतानाही सदर निविदाकाराने दिनांक २० ऑक्टोबर२०२१ पर्यन्त वाहने उपलब्ध करून दिलेली नसणे, त्यामुळे सिल्वर रोडलाइन्स यांनी अट क्र ५.९ व ५.१७ चा स्पष्ट व उघडपणे भंग केलेला असतानाही निविदा मंजूरी समितीचे अध्यक्ष तथा सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांनी दिनांक २४ डिसेंबर २०२१ रोजी सदर निविदाकारास वाहतुकीचे कंत्राटे मंजूर करून संबंधित जिल्हाधिकाऱ्याना आदेश निर्गमित करणे, सिल्वर रोडलाइन्स सोबत करारनामा करताना दिनांक १५ जानेवारी २०२१ च्या शासन निर्णयातील तरतुदीचे काटेकोरपणे पालन करण्याचे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी बुलढाणा यांना देण्यात आलेले असताना तसेच सदर निविदाकाराने शासन निर्णयातील अट क्र ५.१७ व त्यांचे शपथपत्र दिनांक १०जून २०२१ नुसार विहित वेळेत वाहने उपलब्ध करून दिली नसल्याने अट क्र ५.१७ चा भंग केला असताना तसेच अट क्र १०.१ नुसार विहित वेळेत करारनामा केला नसल्यामुळे अट क्र १०.१ चा सुद्धा भंग केला असताना उक्त शासन निर्णयातील अटी व शरतींचा भंग केलेला असतानाही जिल्हाधिकारी बुलढाणा यांनी वेळीच अट क्र १०.५ नुसार कार्यवाही करून शासनास फेरनिविदेचा प्रस्ताव न पाठविणे, या उलट प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी, बुलढाणा द्वारे अधिकार नसताना व नियमविरुद्ध दिनांक २४ जानेवारी २०२२ व २ फेब्रुवारी २०२२ च्या पत्रांवये सदर निविदाकारास पूर्तता करून करारनामा करण्यास वेळ वाढवून देणे, या दोन्ही पत्रानां जिल्हाधिकारी बुलढाणा यांची मान्यता नसणे, शासन पत्र दिनांक २४ डिसेंबर २०२१ मधील निर्देशा विरुद्ध प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी, | | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | बुलढाणा यांनी निर्गमित केलेले दिनांक २४ जानेवारी २०२२ व २ फेब्रुवारी २०२२ बाबत शासनाने कोणतीही कार्यावही न करणेव शासन निर्णय १५ जानेवारी २०२१ मधील अट क्र १०.५ नुसार सिल्वर रोडलाइन्स विरुद्ध कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी बुलढाणा यांना न देणे, सदर प्रकरणी चौकशी करून कार्यवाही करण्याची मागणी बुलढाणा जिल्हा प्राधिकृत स्वस्त धान्य दुकानदार व केरोसिन परवानाधारक संघटनेच्या अध्यक्षानी दिनांक ८ फेब्रुवारी २०२२ रोजीच्या निवेदनाद्वारे केलेली असणे, सदर निवेदनात सिल्वर रोडलाइन्स ने त्यांना मिळालेले कंत्राट बुलढाणा जिल्ह्यात सध्या कार्यरत वाहतूक कंत्राटदार गौरी एंटरप्राईज यांना रु ६८ प्रती क्विंटल प्रमाणे सबलेट केल्यामुळे गौरी एंटरप्राईज ने त्यांच्यामालकीच्या वाहन व नियंत्रणाखालील वाहने सिल्वर रोडलाइन्स च्या नावावर करून दिलेले असणे, दिनांक २६ नोव्हेंबर २०१२ च्या शासन निर्णय व कार्यरत वाहतूक करारातील अट क्र १२ (i),(vi),(viii),(ix) नुसार वाहतुकीचा करार कार्यरत असताना कंत्राट कालावधी मध्ये मालकीच्या व नियंत्रणखलील वाहने काढता किवा दुसऱ्याला देता येत नसणे व तसे केल्यास ते सदर शासन निर्णय व कराराचा भंग असणे, प्रकरणात झालेल्या तक्रारींची चौकशी व पडताळणी न करता दिनांक १५ फेब्रुवारी २०२२ च्या पत्रांवये सिल्वर रोडलाइन्स सोबत वाहतूक करार करण्यास शासनाने मान्यता देणे व अश्या गैरकायदेशीर कृतीना सहमति देणे, दिनांक १७ फेब्रुवारी २०२२ च्या पत्रांवये विभागीय आयुक्त, अमरावती यांनी सुद्धा प्रकरणात सखोल चौकशी करण्याचे निर्देश दिले असताना कोणतीही चौकशी न होणे, या सर्व प्रकरणी संबंधित विभागाकडून जाणीव पूर्वक दुर्लक्ष करण्यात येणे, सिल्वर रोडलाइन्स या निविदाकारासाठी नियमाविरुद्ध, शासन निर्णयातील अटी शर्ती शिथिल करून कंत्राट प्रदान करण्यात येणे, तसेच जिल्हाधिकारी बुलढाणा यांनीसुद्धा वेळीच नियमानुसार कार्यवाही न करता सिल्वर रोडलाइन्सची पाठराखण करणे व नियमविरुद्ध वाहतुकीचा करार करणे, शासनाने या सर्व प्रकरणी तातडीने स्वतंत्र पारदर्शक चौकशी करून बुलढाणा जिल्ह्यातील वाहतूक निविदा कंत्राट तत्काल रद्द करून फेरनिविदा काढण्याची आवश्यकता, त्याच प्रमाणे शासन निर्णयातील अटींचा भंग केल्या प्रकरणी सिल्वर रोडलाइन्स आणि गौरी एंटरप्राईज यांच्या विरुद्ध तसेच त्यांना पाठीशी घालून शासकीय नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कार्यवाही करण्याची आवश्यकता. | | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
| --- | --- | --- | --- |
| १०४ | "शासनाच्या बीपीएल आणि एपीएल, अंत्योदय या योजनेअंतर्गत स्वस्त धान्य दुकानावर (रेशनिंग) वाटप केला जाणारा गहू, तांदूळ गोरगरीब जनतेला वितरित होण्याऐवजी रेशनिंग माफियांमार्फत रवा, मैदा तयार करणाऱ्या अवैधरीत्या मिलवर पाठविल्या जात असल्याच्या तक्रारी पोलीसांना प्राप्त होत असणे, त्यानुसार मुंबईच्या चित्ताकॅम्प रोड, मानखुर्द येथील खासगी गोदामातून रेशनिंगचा गहू, तांदूळ इ. भिंवडी येथील जय आनंद फुड पडघा मिल येथे पाठविला जात असतांना पोलीसांनी नवी मुंबईतील वाशी, (अभ्युदय बँकसमोर) येथे १२०० गोण्या घेऊन निघालेला टेम्पो मुद्देमालांसह दि.२२ जानेवारी, २०२२ रोजी पकडण्यात आल्याचे निदर्शनास येणे, अशाप्रकारे यापूर्वीही रेशनिंगचा काळा बाजार करणाऱ्या मिल मालकांवर पोलीसांनी गुन्हे नोंदविण्यात येणे, परंतु त्याप्रकरणी पुढे कोणती कारवाई झाली याबाबतची अनभिज्ञता असणे, त्यामुळे गोरगरीब जनतेसाठी शासनामार्फत अन्नधान्य पुरवठा होत असतांना रेशनिंग माफियांकडून होत असलेली लूट व काळाबाजार, परिणामी राज्यातील गोरगरीब जनतेमध्ये निर्माण झालेली नैराश्याची भावना, सबब, रेशनिंगमाफियांवर कायद्यांची जरब म्हणून प्रस्तुत प्रकरणांसह अन्य अशाच प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. धर्मरावबाबा आत्राम, वि.स.स. | कित्ता |
| १०५ | "नाशिक ग्रामीण जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक सचिन पाटील यांनी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक ते पोलीस शिपाई पदापर्यंतच्या केलेल्या बदल्यांमध्ये कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, गतवर्षी पोलीस अधीक्षक पदावर नियुक्त झालेले सचिन पाटील यांनी त्यांची दि.१० सप्टेंबर २०२१ रोजी मुंबईला बदली होण्यापूर्वी बदलीसाठी शासनाने दिलेल्या ३१ ऑगस्ट पूर्वी मोठ्या कर्मचाऱ्यांची बदली करण्यात येणे, पोलीस दलातील कर्मचाऱ्यांची बदली प्रक्रिया नियमानुसार होत असणे, सदर प्रकरणात ३० टक्के कर्मचाऱ्यांची बदली विनंतीनुसार तर उर्वरित ७० टक्के बदल्या रेटकार्ड वापरून ३० हजार ते ५ लाख याप्रमाणे पदानुसार करून यामध्ये कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार करण्यात येणे, जिल्हा वाहतूक शाखा व स्थानिक गुन्हे शाखा या मलईदार विभागात कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे गॅझेट प्रसिद्ध न करता बेकायदेशीररीत्या बदल्या | डॉ. राहूल आहेर, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | करण्यात येणे, अधीक्षक पाटील यांनी पदाचा गैरवापर करून मार्च २०२१ मध्ये बेकायदा पोलीस बंदोबस्त देऊन वाडिवऱ्हे जवळ प्रदीप पवार यांच्या जमिनीचा बेकायदेशीर ताबा दिल्याच्या बदल्यात एक एकर जमीन मामा धनाजी पाटील यांचे नावे करणे, कैलास शहा, रमेश चौरसीया यांची नावे गुन्हयातून वगळण्यासाठी मोठी रक्कम घेऊन सदरहू पैशातून वरळी सीफेस येथे ओसवाल बिल्डरकडून फ्लॅट विकत घेण्यात येणे, अतुल मदानकडून दारुची केस रद्द करण्यासाठी कोट्यवधी रुपयांची लाच घेण्यात येणे, गंगापूर जवळील मोहिते आणि सोनवणे, बटाविया, जमिनीचा वाद मिटविण्यासाठी मोठी रक्कम घेणे, तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयातील असलेल्या महिला व पुरुष कर्मचाऱ्यांच्या असलेल्या तक्रारी, जिल्ह्यातील अनेक ठिकाणी सुरु असलेल्या ऑनलाईन जुगार व रॉलेट चालविणाऱ्यांविरुद्ध मोक्काची कारवाई करण्यात जाणूनबुजून केली असलेली टाळाटाळ, अशा प्रकारे सदरहू सचिन पाटील यांनी नाशिक येथे वर्षभर पोलीस अधीक्षक पदावर असताना त्यांचे कारकिर्दित मोठ्या प्रमाणात कर्मचाऱ्यांच्या बदल्या तसेच गैरप्रकार करून भ्रष्टाचार करण्यात येणे, सदर प्रकरणाची शासनाने एक स्वतंत्र अधिकारी नेमून सखोल चौकशी करावी, त्यानुसार त्यांचेविरुद्ध तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.'' | | |
| १०६ | "वैद्यकीय अभ्यासक्रम (एम.बी.बी.एस.) मध्ये प्रवेशाकरिता माहे मे, २०१९ मध्ये नीटचे परिक्षा घेण्यात येणे, माहे जून २०१९ मध्ये वैद्यकीय अभ्यासक्रम (एम.बी.बी.एस.) निकाल लागणे, याच कालावधीमध्ये स्कायटेक प्रा.लि., भोसले टेरेस बिल्डींग, घोले रोड, शिवाजी नगर, पुणे यांची इंटरनेटवर प्रवेश मार्गदर्शना करीता जाहिरात येणे, कुमारी मंरीश खत्री, कुमार अक्षय रूपेश दुबे, कुमार आदित्य रविंद्र चौधरी व कुमारी ऋतुजा अनिल रोकडे यांच्या प्रवेशासाठी संस्थेचे संचालक श्री. कुमार यांचेशी संपर्क करणे, श्री. कुमार व त्यांचे भागीदार श्री. रंजन यांनी खाजगी वैद्यकीय महाविद्यालयामध्ये प्रवेशाबाबत आश्वस्त करणे, एम.बी.बी.एस. करीता प्रत्येकी रू. ५.०० लक्ष व बी.ए.एम.एस करीता रू. ३.०० लक्ष इतक्या अग्रीम रकमेची मागणी करण्यात येणे, विद्यार्थ्यांचे पाल्यांनी | श्री. विकास ठाकरे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | आर.टी.जी.एस. चे माध्यमातुन वरील रक्कम देण्यात येणे, त्याऐवजी प्रवेश न मिळाल्यास संस्थेचे संचालकांनी स्कायटेक संस्थेचा आगामी तारखेचा चेक देण्यात येणे, राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयामध्ये जागा शिल्लक नसल्याचे कारणास्तव बाहेर राज्यातील महाविद्यालयामध्ये प्रवेशाकरीता अधिकच्या रक्कमेची मागणी करणे तथा विविध राज्यामध्ये प्रवेशाकरीता बोलाविण्यात येणे, वारंवार रक्कमेची मागणी करणे, प्रवेश मिळत नसल्याचे लक्षात आल्यावर विद्यार्थ्यांचे पालकांनी दिलेल्या रक्कमा परत करण्याची मागणी करणे, स्कायटेक प्रा.लि., च्या संचालकांनी रक्कम परत करण्यास नकार देणे तथा धमकी देणे, याबाबत पालकांनी पोलीस आयुक्त, पुणे यांना दि २४ ऑगष्ट २०२१ रोजी तक्रार देणे, विद्यार्थ्यांचे एक वर्षाचे झालेले नुकसान तथा रक्कम परत मिळण्याने विद्यार्थ्यांचे पाल्यांमध्ये असलेले असंतोषाचे वातावरण यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| १०७ | "पॉर्नोग्राफिक व्हिडीओचे चित्रीकरण करून ते वेबसाईटवर अपलोड करण्याचे रॅकेट मुंबईत उघडकिस आले असणे, सदर प्रकरणात आतापर्यंत अभिनेत्री गहना वशिष्ठसह ९ जणांना अटक झाल्याने या प्रकरणाची व्याप्ती बरीच मोठी असणे, चित्रपट, मालिका तसेच वेब सीरीजमध्ये संधी मिळवून देण्याच्या नावाखाली तरुण-तरुणींचे अश्लील व्हिडीओ पॉर्न साईटवर अपलोड करीत लाखोंची कमाई करणाऱ्या रॅकेटचा मुंबई पोलीसांच्या मालमत्ता कक्षाने पर्दाफाश केला असणे, गहनाचे स्वतःचे प्रॉडक्शन हाऊस असणे, गहना वेब सीरीज, शॉर्ट फिल्मच्या नावाखाली पॉर्नोग्राफिक व्हिडीओ तयार करून ते वेबसाईटवर अपलोड करायची असा तिच्यावर आरोप असणे, सदर आरोपाखाली पोलीसांनी गहनाला अटक केली असणे, अभिनेत्री शिल्पा शेट्टीचे पती राज कुंद्रा यांच्या विआन इंडस्ट्रीजमध्ये व्यवस्थापकीय संचालक असलेला उमेश कामत याला ही अटक करण्यात आली असणे, मालवणी पोलीस ठाण्यात झारखंडच्या १९ वर्षीय तरुणीने तक्रार दाखल केली असून रीवा खान ऊर्फ यास्मीन खान विरुद्ध स्वतंत्र गुन्हा नोंद करण्यात आली असणे, यामध्ये प्रोडयुसर, डायरेक्टर, मॉडेल रीवा खान ऊर्फ यास्मीनचा पती शान बॅनर्जी ऊर्फ दीपंकर खसनवीस | सर्वश्री. अमित साटम, सुभाष देशमुख, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | यालाही अटक करण्यात आली असणे, पॉर्नव्हिडीओ तयार करण्याच्या कारवाया खुलेआम होत असतांना त्यासोबत अन्य गंभीर गुन्हेही त्याला चिकटत असणे, बॉलिवूडमध्ये नशीब आजमवण्यासाठी आलेल्या तरुण-तरुणींना हेरुन वेबसिरीज, चित्रपट, मालिकामध्ये काम देण्याच्या बहाण्याने तथाकथित प्रॉडक्शन हाऊस त्यांचे शोषण करीत असणे, गेल्या पाच महिन्यात लॉकडाऊनच्या कालावधीत भारतात चाइल्ड़ पॉर्नोग्राफीशी संबंधित २५ हजार मटेरीअल अपलोड करण्यात आले असणे, त्यात प्रथम दिल्ली नंतर महाराष्ट्राचा क्रमांक लागत असणे, सदर अश्लीलतेचा हा मोठा उद्योग बिन बोभाट सुरु असणे, यावर प्रभावीपणे पायबंद घालण्यासाठी प्रयत्न आणि नियोजन करणे तसेच कलेच्या नावाखाली चाललेला हा काळा धंदा नेस्तनाबूत करण्यासाठी सायबर ॲक्टम़ध्ये सुधारणा करण्याची तीव्र गरज निर्माण झाली असणे, तसेच पॉर्नोग्राफी फिल्म.बनवणाऱ्या प्रॉडक्शन हाऊस व संबंधितांवर कडक कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कारवाई तसेच उपाययोजना व राज्य़ शासनाची प्रतिक्रिया." | | |
| १०८ | "पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील अनाधिकृत हुक्का पार्लरचा प्रश्न ऐरणीवर आला असणे. या हुक्का पार्लरमुळे काही दिवसापूर्वी मुंबईत लागलेल्या आगीप्रमाणे पुण्यातही आग लागण्याची घटना घडू शकते. त्यामुळे वेळीच अशा बेकायदा हुक्कापार्लरवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात असणे. पुणे शहरात कोरेगांव पार्क, मुंढवा, हडपसर, कोंढवा या परिसरात अनेक नामांकित हॉटेल्स व पबमध्ये हुक्का पार्लर चालू असणे. पोलीसांकडून काही प्रमाणात कारवाई केली जाते. मात्र, त्यानंतर ही हुक्का पार्लर पुन्हा सुरू झाल्याचे दिसून येत आहे. काही ठिकाणी छुप्या तर कुठे उघड पद्धतीने ही हुक्का पार्लर सुरू आहेत. त्यामुळे अशा हुक्का पार्लरवर वेळीच कारवाई करण्याची आवश्यकता असणे.तरुणाईमध्ये हुक्क्यांची मोठी क्रेझ आहे. पुणे शहरातही हुक्का पार्लरमध्ये तरुणाईची मोठी गर्दी असते. तरुणांकडून तंबाखूच्या सेवनासाठी हुक्क्याचा आधार घेतला जातो. त्यात वेगवेगळ्या फ्लेवर उपलब्ध करून देण्यात येतात. पुण्यात हुक्क्यासाठीचे ५२ प्रकारचे फ्लेवर मिळत असून, तरुणांकडून या फ्लेवर्सना अधिक मागणी असल्याची माहिती समोर | श्री. सुनिल कांबळे, वि.स.स. | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | आली असणे. त्यामुळे पालकांसाठी हुक्का पार्लर ही मोठी डोकेदुखी ठरत आहे. हॉटेलच्या बंद खोल्यांमध्ये हुक्का ओढण्यास उपलब्ध करून दिला जातो. दुर्दैवाने त्या ठिकाणी आगीसारखा प्रकार घडला तर मोठी दुर्घटना घडू शकते. त्यामुळे पोलीसांनी वेळीच जागे होऊन त्यांच्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी नागिरकांकडून केली जात असणे यावर शासनाने करावयाची तातडीची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| १०९ | “पुणे जिल्ह्यातील भिमा-कोरेगांव येथील विजय स्तंभाला अभिवादन करण्यासाठी हजारो बहुजन वर्गातील बांधव राज्याच्या कानाकोपऱ्यातून, खेडयापाडयातून येत असून दि. १ जानेवारी, २०१८ रोजी काही समाजकंटकांनी केलेल्या भ्याड हल्ल्याच्या दि.२ व ३ जानेवारी रोजी संपूर्ण राज्यात मोर्चे व आंदोलनाच्या मार्गाने निषेध करणे, या आंदोलनात सहभागी झालेल्या तरुणांना अटक करून राजकीय द्वेषापायी खोटे गुन्हे दाखल करणे, दि.२६ ऑक्टोबर २०१८ रोजी गुन्हे मागे घेण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला असला तरी दिलेल्या निर्णयात तत्कालीन शासनाने जाणीवपूर्वक जाचक अटी समाविष्ट करून शासन निर्णय कार्यान्वित करणे, म्हणून अद्यापही भिमा-कोरेगांव प्रकरणी दाखल केलेले खटले घेण्यात न येणे, परिणामी आंदोलक तरुणांमध्ये व आम जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून भिमा-कोरेगांव प्रकरणांसंबंधी दाखल केलेले गुन्हे व खटले मागे घेण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया.” | सर्वश्री. नानाभाऊ पटोले, सुरेश वरपुडकर, श्रीमती सुलभा खोडके, श्री. विकास ठाकरे, कुमारी प्रणिती शिंदे, श्री. अमीन पटेल, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. जितेश अंतापूरकर, कुणाल पाटील, सुभाष धोटे, मोहनराव हंबर्डे, अबू आजमी, वि.स.स. | कित्ता |
| ११० | "सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यात शहरात गेल्या कित्येक वर्षापासून अवैध धंदे सर्रासपणे सुरू असल्याची बाब जानेवारी २०२२ मध्ये निदर्शनास येणे सोलापूर अधीक्षक यांच्या पथकाने वारंवार या वेदर कारवाई करणे परंतु कारवाई झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी सदरहू धंदे पुन्हा सुरू असणे तसेच सोलापूर पोलीस अधीक्षक पथक कारवाई करत असताना स्थानिक अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणे हद्दीतील पोलीस त्यांना सहकार्य मदत करण्याची गरज असतानाही न करणे परिणामी विभागातील रहिवाशांना शासन प्रति पसरलेला असंतोष, यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाय योजना." | श्री. सचिन कल्याण-शेट्टी, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १११ | "दिनांक ४ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास पुणे येथील येरवडा येथे पुणे-नगर रस्त्यावर शास्त्रीनगर चौकाच्या अलिकडे फारुक फ्रामाजी वाडिया यांच्या जागेत ब्ल्यू ग्रास बिझनेस पार्क या बांधकाम साईटवर नियोजित व्यावसायिक संकुलाच्या इमारतीच्या पाया बसविण्यासाठी लोखंडी जाळी तयार करण्यात आलेली असणे, सदर जाळी अचानकपणे कोसळून झालेल्या दुदैवी दुर्घटनेत पाच मजुरांचा जागीच मृत्यू होऊन अन्य चौघेजण गंभीर जखमी होणे, त्याप्रकरणी करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीत मजुरांच्या मृत्यूला संबंधित बांधकाम कंपनी, ठेकेदार जबाबदार असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांच्याविरोधात पोलीसांत गुन्हा दाखल करण्यात येणे, दरम्यानच्या काळात मृतांच्या कुटुंबियांना शासनाने प्रत्येकी ५ लाख इतकी आर्थिक मदत जाहीर करण्यात येणे, तसेच सदर प्रकरणी मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात येणे, सदर नेमलेल्या चौकशी समितीचे कामकाज पूर्ण होऊन समितीने आपला अहवाल सादर केला असल्यास, सदर अहवालात नमूद करण्यांत आलेल्या बाबींचे अनुषंगाने शासनाकडून करण्यात आलेली कार्यवाही, तसेच शासनाने जाहीर केलेल्या आर्थिक मदत वाटप प्रकरणी केलेली वा करण्यात आलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | सर्वश्री. दिपक चव्हाण, अनिल पाटील, राजू कारेमोरे, मनोहर चंद्रिकापूरे, धर्मरावबाबा आत्राम, इंद्रनिल नाईक, चंद्रकांत नवघरे, नितीन पवार, दिलीपराव बनकर, ॲड. माणिकराव कोकाटे, श्रीमती सरोज आहिरे, सर्वश्री. सुनिल भुसारा, दौलत दरोडा, अतुल बेनके, दिलीप मोहिते-पाटील, अशोक पवार, सुनिल शेळके, अण्णा बनसोडे, सुनिल टिंगरे, चेतन तुपे, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री. आशुतोष काळे, निलेश लंके, संग्राम जगताप, रोहित पवार, प्रकाश सोळंके, संदिप क्षिरसागर, बाळासाहेब आजबे, बाबासाहेब पाटील, बबनराव शिंदे, यशवंत माने, मकरंद जाधव-पाटील, शेखर निकम, मानसिंग नाईक, श्रीमती सुमन पाटील, श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. | कित्ता |
| ११२ | “राज्यात विशेषतः रायगड जिल्ह्यात अनेक विकासकांनी निरनिराळी आमिषे दाखवून सदनिका विकताना नागरिकांची फसवणूक करीत असून दिवसेंदिवस फसवणूकीच्या प्रमाणात वाढ होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ रोजी निदर्शनास येणे, नागरिकांकडून बोगस करारनामे करून घरांच्या किंमती वसूल करणे, प्रत्यक्षात विकासकांकडे अशा कोणत्याही गृह प्रकल्पाची शासनाची मंजूरी नसणे, फसवणूकीच्या अशा प्रकारच्या अनेक तक्रारी पनवेल व आसपासच्या पोलीस स्टेशनमध्ये नागरिकांकडून दाखल होवून सुद्धा पोलीस यंत्रणा जाणूनबुजुन दुर्लक्ष करीत असणे, तक्रार केल्यास पैसे परत मिळणार नाहीत या भितीने फसवणूक उघडकीस येवूनही अनेक वर्षे तक्रार करण्यात न येणे, नवीन नवीन कायदे करूनसुद्धा संबंधीत विभागाकडून ठोस अंमलबजावणी होत नसल्यामुळे विकासकांकडून सदनिकाधारकांची होणारी फसवणूक होवूनसुद्धा विकासकांवर कोणतीच | सर्वश्री. प्रशांत ठाकूर, समीर कुणावार, महेश बालदी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | कारवाई होत नसल्यामुळे विकासक सर्रासपणे सदनिका धारकांची फसवणूक करीत असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेल्या असंतोषाच्या भावनेबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून करावयाची आवश्यक कार्यवाही व उपाययोजना याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | | |
| ११३ | "जैश-ए-मोहम्मद च्या दहशतवाद्याने काही महिन्यांपूर्वी महाल येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय आणि रेशीमबाग येथील स्मृती मंदिराची रेकी केल्याची माहिती मिळालेली असणे, घटनेचे गांभीर्य पाहता उपराजधानीतील सर्व महत्वपूर्ण स्थळांची सुरक्षाव्यवस्था वाढविली असणे, नागपूर हे दहशतवाद्यांच्या हिटलिस्टवर असणे व यापूर्वी येथील संघ मुख्यालयावर दहशतवादी हल्ल्याचा प्रयत्न झालेला असणे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या परिसराची जैश-ए-मोहम्मद या आतंकवादी संघटनेकडून रेकी करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्याच्या वृत्ताला नागपूर पोलीसांनी देखील दुजोरा दिलेला असणे, रेकी करणाऱ्या व्यक्तीने गेल्या वर्षी जून किंवा जुलै महिन्यात दोन दिवस नागपूरात वास्तव्य केलेले असणे, त्यांनी काही छायाचित्रे गोळा केल्याचे सांगण्यात येत असणे, रेकी करणाऱ्यावर पाकव्याप्त काश्मिरमधून हॅन्डलरचे नियंत्रण असल्याचे व तो हॅन्डलर मोबाईलवर वेळोवेळी त्याला चित्रीकरणासंबंधी निर्देश देत असल्याचे उघडकीस येणे, जम्मू-काश्मीरमधील बांदीपुरा जिल्ह्यातील पोलीस स्टेशन अंतर्गत ग्रेनेड बाळगल्याप्रकरणी एका तरुणाची चौकशी केल्यानंतर ही बाब समोर आलेली असणे, नागपूर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा नोंदविलेला असणे, संघ मुख्यालय व हेडगेवार स्मृती मंदिराची रेकी करणारा संशयित आतंकवादी रईसला नागपूरमध्ये आणून त्याची चौकशी करण्यात येणार असणे, या प्रकरणी राष्ट्रीय पातळीवर विविध तपास यंत्रणांशी समन्वय ठेऊन दहशतवादाचा एकजुटीने मुकाबला करण्याची आवश्यकता, नागपूर येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयाची व राज्यातील इतर महत्वाच्या स्थळांची सुरक्षा वाढविण्याबाबत व संबंधित दहशतवाद्यांना शोधून त्यांचेवर कारवाई होण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. राम कदम, रवि राणा, अभिमन्यु पवार, वि.स.स. | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| ११४ | कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील मोकाशी पाडा, दहिसर, दहिसर मोरी या तीन गावातील जबरदस्तीने जमीन लाटण्याच्या उद्देशाने दिनांक ३ फेब्रुवारी,२०२२ रोजी रात्री साडेआठच्या सुमारास कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे माजी नगरसेवक रमेश सुकऱ्या म्हात्रे, वैभव पाटील, सचिन पाटील व त्यांचे चाळीसहून अधिक गुंड साथीदार लाठ्याकाठ्यानिशी ४ गाड्यांतून येऊन मोकाशी पाडा येथील एकनाथ मोकाशी व त्यांचा मुलगा प्रशांत मोकाशी यांना बेदम मारहाण करून व महिलांनाही धक्काबुक्की करून दहशत निर्माण करणे, याप्रकरणी डायघर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यास गेले असताना स्थानिक पोलीसांकडून गुन्हा नोंदविण्यासंदर्भात कोणतीही कारवाई न झाल्याने स्थानिक विधानसभा सदस्यांनी पीडित एकनाथ मोकाशी व त्यांचे कुटुंब तसेच दहशतीखाली असलेल्या अन्य शेतकऱ्यांसह डायघर पोलीस स्टेशनवरच ठिय्या आंदोलन केल्यानंतर चार दिवसानंतर पोलीसांनी कडोंमपाचे माजी नगरसेवक रमेश सुकऱ्या पाटील, वैभव पाटील, सचिन पाटील व १५ गुन्हेगारांविरुद्ध एफ.आय.आर. नोंदविणे, पोलीसांकडून एफ.आय.आर. मध्ये झालेल्या अक्षम्य दिरंगाईबाबत सखोल चौकशी करून संबंधित दोषी विरोधात कायदेशीर तसेच गुन्हेगारांविरोधात कडक कारवाई होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावायची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. प्रमोद पाटील, वि.स.स. | |
| ११५ | "चंद्रपूर जिल्ह्यातील पोंभुर्णा तालुक्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांनी कोरपना तालुका खरेदी विक्री सहकारी संस्था मर्यादित कोरपना यांना जानेवारी २०२२ या महिन्यात खरीप हंगामातील धानाची विक्री करणे, विक्री केलेल्या मालासंदर्भात त्यांना माल आवक पावती किंवा माल विक्री केल्याची पावती खरेदी विक्री संस्थेद्वारे देण्यात न येणे, याबाबत शेतकऱ्यांनी विचारणा केली असता त्यांना उडवाउडवीची उत्तरे देणे, याबाबत शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक होणे, शेतकऱ्यांनी विक्री केलेल्या मालाची पावती तसेच धानाची देय असलेली रक्कम तातडीने मिळण्याची मागणी करणे, सदर धान उत्पादक शेतकरी आंदोलनाच्या पवित्र्यात असणे, याप्रकरणाची सखोल चौकशी होवून दोषींवर कडक कारवाई होण्याची नितांत आवश्यकता तसेच शेतकऱ्यांना तातडीने न्याय मिळण्याची आवश्यकता, शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही." | श्री. सुधीर मुनगंटीवार, डॉ. पंकज भोयर, श्री. सचिन कल्याणशेट्टी, वि.स.स. | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| ११६ | "माळशिरस तालुक्यातील (जि.सोलापूर) मौजे फलवणी, काळमवाडी, बचेरी येथील ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये रस्त्यावरुन जि.प. प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळेमध्ये १७५ विद्यार्थी शिकत असणे, या हद्दीमधून गावकरी, शेतकरी सतत ये-जा करत असतात व काळमवाडी, बचेरीतील नागरिकांना ७ ते ८ कि.मी. अंतरावरुन ये-जा करावी लागत असल्याने विद्यार्थी व गावकरी यांची गैरसोय होत असल्याने नीरा उजवा कालव्यावर पूल व्हावा अशी मागणी करण्यात येणे, त्यानूसार मौजे फळवणी, काळमवाडी, बचेरी येथील रस्त्याच्या कालव्यावर पूल मंजुर होणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (माळशिरस) यांनी मा. जलसंपदा मंत्री, म.रा. यांना दिनांक १ डिसेंबर २०२१ रोजी दिलेले असतानाही अद्याप सदर निवेदनावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, सदर रस्त्याच्या कालव्यावरुन पूल करण्याबाबत शासन जाणीवरित्या दुर्लक्ष करित असल्याचे समजते, यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये व विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण होणे, सदर पुल तातडीने करण्याची आवश्यकता व यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. राम सातपुते, वि.स.स. | |
| ११७ | "कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत कोल्हापूर पाटबंधारे विभागामध्ये विविध प्रकल्पांची कामे मंजुर असणे, या सर्व कामांची निविदा प्रक्रिया संबंधित कार्यकारी अभियंता यांचेस्तरावर ई-निविदा राबविण्यात येणे, ही सर्व कामे ठराविक ठेकेदारांना देण्याच्या उद्देशाने मुख्य अभियंता श्री.हणमंत गुणाले यांचेकडून कोल्हापूर पाटबंधारे विभागाचे अधिक्षक अभियंता श्री. महेश सुर्वे व सर्व कार्यकारी अभियंता यांना सुचित करण्यात येणे, यामध्ये कार्यकारी अभियंता स्तरावर सुरु असलेली कामे ठराविक ठेकेदारांना देण्याकरीता जलसंपदा विभागाच्या दि. ८ एप्रिल, २०२१ रोजीच्या शासन शुद्धीपत्रकाचा आधार घेत ठराविकच ठेकेदारांना Gio-Tagging सुविधा उपलब्ध करून देण्याकरीता अधिकारांचा गैरवापर करणे, त्यामुळे ठराविक ठेकेदारांना काम देण्याच्या उददेशाने व आपले आर्थिक हित जोपासण्याचे काम मुख्य अभियंता श्री. गुणाले यांचेकडून सुरू असणे, यामुळे कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत कार्यरत असणाऱ्या ठेकेदारांमध्ये कमालीचा असंतोष पसरलेला | श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स. | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | असणे, याबाबत लेखी तक्रारी येवूनही कोणतीही कार्यवाही विभागाकडून करण्यात न येणे, त्यामुळे सन २०२०-२१ व २१-२२ सालामध्ये सुरु असलेल्या सर्वच कामांमध्ये Gio-Tagging चा आधार घेत ठराविक ठेकेदारांना देण्यात आलेल्या संपूर्ण कामकाजाची चौकशी करणे गरजेचे असणे, तसचे कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत सिंचन व बिगर सिंचन प्रापण सूची अंतर्गत दरवर्षी कोट्यवधी रुपयांची कामे सिंचन व्यवस्थापनाच्या नावाखाली करण्यात येणे, यामध्ये एकाच कामावर दरवर्षी लाखो रुपये खर्च करून देयके अदा करणे, तसेच कामांची अंदाजपत्रके वाजवी दरापेक्षा दुप्पट-तिप्पट असुनही निकृष्ट दर्जाचे काम ठेकेदार यांचेकडून करण्यात येणे, या सर्व कामी संबंधित अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता जबाबदार असुन शासनाच्या कोट्यवधी रुपयांचा अपहार दरवर्षी करण्याचे काम जलसंपदा विभागंतर्गत राज्यामध्ये सर्वत्र ठिकाणी सुरु असणे, या सर्व कामांची चौकशी करण्याकरीता स्वतंत्र चौकशी समिती नेमून चौकशी करण्याबाबत व दोषींवर कडक कायदेशीर कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व त्याबाबत शासनाची भूमिका व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| ११८ | "अकोला शहरामधून वाहणाऱ्या मोर्णा तसेच अकोला शहरा लगतच खडकी, चांदूर इत्यादी गावालगत वाहणाऱ्या विद्रुपा (मोर्णा नदीची उपनदी) या दोन्ही नद्यांच्या पुरबाधीत क्षेत्रात अवैध लेआँऊट/जमीनी अकृषक करण्यास जलसंपदा विभागाकडून नाहरकत प्रमाणपत्र देणे, उक्त दोन्ही नद्यांच्या ब्लु झोन तसेच रेड झोनची आखणी नसताना सदर क्षेत्रातील जमिनी अकृषक करण्याचे प्रस्तावास महसुल विभाग, नगरविकास विभाग यांच्याकडून जलसंपदा विभागास नाहरकत प्रमाणपत्राची मागणी होणे उक्त प्रयोजनासाठी जलसंपदा विभागाकडून नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येणे, पुरबाधीत क्षेत्रात नागरी बांधकामे झाल्याने नदी प्रवाहाला बाधा पोहचविणाऱ्या कृतींना अटकाव करून कायदेशीर कार्यवाही करण्याचे सबंधित मुख्य अभियंता यांना शासनाचे आदेश असणे, अकोला शहरात मोर्णा व विदृपा नदीच्या पुरबाधीत निषिद्ध व नियंत्रित क्षेत्रात अवैध अकृषक मंजुरातील व लेआऊट मध्ये २१/२२ जुलै २०२१ रोजी महापुरामुळे नागरी वस्तीचे प्रचंड नुकसान होणे, जलसंपदा | श्री. रणधीर सावरकर, वि.स.स. | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | विभागाकडून लालपुर रेषा व निळयापुर रेषा बाबत नियमांचे पालन न करणे, सदर पुररेषांची आखणी न करणे, यामुळे नागरी वस्तींची झालेली वित्त हानी तसेच भविष्यातील जिवित व वित्त हानी लक्षात घेऊन शासनाची भूमिका व करावयाची कार्यवाही." | | |
| ११९ | "नाशिक, कोपरगाव येथील पाटबंधारे विभागात उपविभागीय पदावर असताना सागर शिंदे यांनी अभियंता श्री.मिसाळ यांचेबरोबर आर्थिक संगनमत करून कॅनलच्या कामात प्रत्यक्षात काम न करता कोट्यवधी रुपयांचा शासकीय निधीचा अपहार करून भ्रष्टाचार केल्याचे नुकतेच उघडकीस येणे, सदरहू अधिकारी यांनी त्र्यंबकेश्वर येथील घाट व गोदावरी नदीचा घाटाच्या बांधकामात स्टीलचे बार कमी वापरून गैरप्रकार करून भ्रष्टाचार करणे, स्थानिक लोकप्रतिनिधींनी तक्रार केली असता सदरहू अधिकारी यांचेवर कारवाई न करता केवळ वेतनवाढ बंद करणे, अद्याप याबाबत चौकशीची कार्यवाही पूर्ण न होणे, जलसंधारण विभागात पदोन्नतीने कार्यकारी अभियंता पदावर रुजू झाल्यापासून सागर शिंदे या अधिकाऱ्याने मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करण्यात येऊन गिरणारे येथे ६ एकर जमीन विकत घेऊन व त्यावर आंब्याची लागवड करून काही जागेत कोट्यवधी रुपये किंमतीचा बंगला बांधण्यात येणे, पर्यटनाची कामे अधिकची जास्तीची टक्केवारी दिली नसल्यामुळे २/३ वर्षे तसेच पडून राहाणे, तसेच शिंदे यांनी नाशिक पाटबंधारे विभागात दरवर्षी कॅनलचा गाळ काढणे, गवत काढण्याकरिता मिळणारा १०-१५ कोटी रुपये निधी प्रत्यक्षात कोणतेच काम न करता, काम केल्याचे कागदोपत्री दाखविण्यात येऊनही हया कालव्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर झाडे व गवत वाढलेले दिसत असणे, सदरहू कामात कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार करण्यात येऊन शासकीय निधीचा मोठ्या प्रमाणात झालेला अपव्यय, कॅनलची दुरुस्ती व देखभाली अभावी या परिसरातील शेती सिंचनावर त्याचा झालेला अनिष्ट परिणाम, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे येथील जनतेत निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व संतापाचे वातावरण, या सर्व बाबींची व सागर शिंदे यांनी यापूर्वी केलेल्या सर्व कामांची गुणनियंत्रक व दक्षता पथकामार्फत चौकशी करून श्री.सागर शिंदे व अभियंता श्री.मिसाळ यांना तातडीने निलंबित करून त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. संजय शिरसाट, वि.स.स. | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १२० | "लोअर दुधना (ता.सेलू, जि.परभणी) धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्याचे अस्तरीकरणाचे काम अपूर्ण असल्यामुळे शेतकरी बांधव धरणाच्या पाण्यापासून वंचित असल्याचे माहे डिसेंबर २०२१ अखेरीस निदर्शनास येणे, शासनाने १९७९ साली या धरणासाठी लागणारा एकूण खर्च २८ कोटी असतांना मात्र धरण पूर्ण होण्यास सन २०२१ पर्यंत हा खर्च २००० कोटींवर जाणे, डावा कालवा मुख्य कालव्यामध्ये पावसाच्या पाण्याने मोठी वाताहत झाल्याबाबत संबंधित विभागाकडे सोमटाणा, अडुळा, एकरुखा, गोविंदपुर आखी, डीग्रस येथील कालव्यांबाबत अनेक तक्रारी येणे, लोअर दुधना प्रकल्पांच्या कालव्यांची कामे ही निकृष्ट दर्जाची झाली असून ठेकेदार व अभियंता यांनी संगनमताने आगाऊ रक्कम उचलून कामे अपूर्ण केल्याबाबतच्या अनेक तक्रारी शेतकऱ्यांकडून येणे, याकडे शासन जाणीवपूर्वक करित असलेले दुर्लक्ष, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रती चिडेची व संतापाची भावना निर्माण होणे, सदर प्रकरणी शासनाने संबंधित ठेकेदार व प्रकल्प अभियंता यांच्यावर कारवाई करून कालव्याची अपूर्ण कामे त्वरित पूर्ण करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर, डॉ. राहूल पाटील, वि.स.स. | कित्ता |
| १२१ | "विदर्भातील महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या गोसेखुर्द प्रकल्पाची पूर्णत्वाकडे वाटचाल होत असताना त्यात अंतर्भूत असलेल्या बाबींकडे मात्र शासनाचे दुर्लक्ष होत असणे, मागील महिन्यापासून गोसे धरणात जलसाठा वाढविला जात असून २४५. ५०० मिटर जलसाठा करण्याचे नियोजन केलेले असणे, परंतु जलसाठ्यात वाढ होत असल्याने धरणातील बॅक वॉटर ने भंडारा जिल्ह्यातील शहरासह एकूण २६ गावांच्या नदीकाठावरील जनतेच्या अडचणी दिवसेंदिवस वाढत जाणे, नदीकाठावरील गावांना जोडणारे रस्ते, शेतात जाणारे पांदण रस्ते पाण्याखाली आलेले असणे, तसेच हजारो हेक्टर शेती पाण्याखाली आल्याने शेती पिकांची ही मोठ्या प्रमाणात नुकसान होणे, कित्येक गावांच्या सभोवताल पाण्याचा वेढा असल्याने धरणातील जलचर प्राणी जसे साप विंचू व अन्य विषारी कीटक गावात घुसण्याचे प्रकार वाढणे, शहरातील व अनेक गावालगतच्या स्मशानभूमी पाण्याखाली आल्याने मृतदेहावर अंत्यसंस्कार कुठे करावे असा प्रश्न निर्माण होणे, शेतात जाणाऱ्या | श्री. नरेंद्र भोंडेकर, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | रस्त्यावरून पाणी साचल्याने शेतात जावे कसे हाही प्रश्न निर्माण झालेला असणे, तसेच अनेक गावातील पाणीपुरवठा करणारी नळ योजना धरणातील बॅक वॉटर च्या पाण्यात सापडली असल्याने जिल्ह्यातील नागरिकांना दूषित पाणी प्यावे लागत आहे, त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आलेल्या असणे, या सर्व बाबींवर शासन प्रशासनाने डोळेझाक केलेली असणे, यावर आजता गायत कोणतीही उपायोजना केलेली नसणे, त्यामुळे भंडारा जिल्ह्यातील शहरासह एकूण २६ गावातील नागरिक तीव्र आंदोलन करण्याच्या भूमिकेत असणे, याबद्दल अनेक संघटनांनी शासनाला निवेदनही देण्यात येणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष व यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| १२२ | "सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील निमगाव येथील तलावावर ३० वर्षांपुर्वी तयार केलेला कॅनॉल निकृष्ट दर्जाचे काम झाल्याचे कारण पुढे करत पाटबंधारे विभागाने लघुपाटबंधारे विभागाकडून ताब्यात घेतला नसल्याने कॅनॉलची वहनक्षमता घटली असून दरवर्षी शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसणे, सदर निमगाव तलावावरील असणारा कॅनॉल पाटबंधारे विभागाने ताब्यात घ्यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी (माळशिरस) यांनी सातत्याने करण्यात येणे, त्यानूसार या कॅनॉलच्या दुरुस्तीचे काम तात्काळ करावे व हा कॅनॉल ताब्यात घ्यावा अशा सूचना करण्यात येणे, परंतु सदर सूचनाची अंमलबजावणी अद्याप प्रशासनाकडून करण्यात न येणे, यावरुन शासन सदर कॅनॉलच्या दुरुस्तीचे काम पूर्ण करण्याबाबत कार्यतत्पर नसल्याचे दिसून येणे, त्यामुळे जनमानसात शासनाप्रती चिडेची भावना निर्माण होणे, सदर कॅनॉलच्या दुरुस्तीचे काम तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. राम सातपुते, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र.<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| १२३ | "माहे फेब्रुवारी व त्या सुमारास सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील दुष्काळी २४ गावांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर येणे, सदर २४ गावांमध्ये मंगळवेढा तालुक्यातील शिरसी, लेंडवेचिंचाळे, आंधळगाव, लक्ष्मी दहीवाडी,पाटखळ, भाळवणी, हाजापुर, शैलेवाडी, खुपसंगी, रेवेवाडी, खडकी,मेटकरवाडी, रड्डे,निंबोणी, खवे, तळसंगी, जालीहाळ, हिवरगाव, नंदेश्वर, जुनोनी, भोसे, सिद्धनकेरी, जित्ती,येड्राव या गावांचा समावेश असणे, सदर गावांवर असलेला कायमस्वरूपी दुष्काळ निवारणासाठी मंगळवेढा उपसा सिंचन योजना राबविण्याचा निर्णय तत्कालीन शासनाकडून घेण्यात येणे, सदर निर्णयामुळे या गावातील तब्बल ११११२० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार असल्याची माहिती प्राप्त होणे, सदर निर्णयाच्या अनुषंगाने दर सूची सन २०१३-१४ नुसार शासन निर्णय ६ सप्टेंबर २०१४ अन्वये रुपये ५३०.०४ कोटीची प्रशासकीय मान्यता देणे, परंतु प्रशासकीय मान्यता मिळून देखील काम वेळेवर चालू न झाल्यामुळे तेथील नागरिकांकडून उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात येणे, सदर याचिकेवर सुनावणीदरम्यान मा.उच्च न्यायालयाने शासनास सदर प्रकल्प त्वरित मार्गी लावण्याचे आदेश देऊन देणे , सदर आदेशानंतर देखील योजना कागदावरच असल्याने न्यायालयाच्या आदेशाचे पालन केले नसल्याचे उघडकीस येणे, जास्तीची माहिती घेतली असता सदर योजना ही उजनी उजवा कालवा की मी ९१ मधून कालव्याद्वारे गुंजेगाव बॅरेज मध्ये पाणी सोडून गावात दोन टप्प्यात ११११२० हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण करण्याचे असणे, सदर योजनेस शासन पत्र दिनांक १४ मार्च २०२० अन्वये अटी शर्तीनुसार तत्त्वतः मान्यता दिलेली असणे, सदर अटी शर्तीनुसार या प्रकल्पास भीमा उजनी प्रकल्प अंतर्गत पाणी उपलब्ध असून शासन निर्णय दिनांक २६ नोव्हेंबर २०२१ नुसार पाणी उपलब्ध होणे, नव्याने प्रशासकीय मान्यता प्रस्तावाची तांत्रिक तपासणी पूर्ण करून रुपये ५७८.१५ कोटी रक्कमेचा प्रस्ताव महामंडळाकडून दिनांक १२ जुलै २०२१ नुसार सादर करण्यात येणे, तसेच अटीप्रमाणे मा. मुख्यमंत्री यांचेकडे सदरचे प्रकरण क्रमांक १०१/२०१९ अन्वये सुधारित प्रशासकीय मान्यतेकरीता प्रलंबित असणे, तसेच महामंडळाकडून महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांची मान्यता देण्याबाबतचा | सर्वश्री. समाधान अवताडे, विजयकुमार देशमुख वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | प्रस्ताव देखील शासन दरबारी प्रलंबित असणे, एकूण पाहता अद्याप कागदोपत्री सोपस्कार शासनदरबारी प्रलंबित असल्याने सदर योजनेचे काम अद्याप चालू न झाल्यामुळे येथील जनतेत तीव्र असंतोष निर्माण झाला असून त्याचा उद्रेक होण्याची शक्यता असणे, या करता शासनाने त्यांच्याकडील मंगळवेढा उपसा सिंचन योजनेचे संबंधित सर्व मान्यतेच्या प्रस्तावास त्वरित मान्यता देऊन योजना कार्यान्वित करण्यासंबंधी करावयाची उपाययोजना व कारवाई." | | |
| १२४ | "कोरेगांव तालुक्याच्या (जि.सातारा) उत्तर भागातील कायम दुष्काळी क्षेत्रास सिंचनाची सोय करण्याकरिता वांगणा उपसा सिंचन योजना राबविण्यात येणे, या योजनेद्वारे धोम डावा कालवा कि.मी.५३ येथून (सा.क्र.५२/२०० कि.मी.) एका टप्प्यात ८१.८४ मी. उंचीपर्यंत पाणी उपसा करून कोरेगांव तालुक्यातील वांगणा नदीच्या पूर्व व पश्चिम भागातील १७ गावातील एकूण ४२०० हे. (सिंचन लायक क्षेत्र) इतके क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे नियोजन असणे, परंतु सदरील प्रकल्पाचे डिझाईन चुकीच्या पद्धतीने केल्यामुळे तेथील हजारो शेतकरी शेतीच्या पाण्यापासून तसेच पिण्याच्या पाण्यासूनही वंचित राहिल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, यामुळे परिसरातील टॅकरने पाणी-पुरवठा करावा लागणे, परंतु शेतीकरिता पाणी उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान होउन आर्थिक फटका बसणे, परिणामी शेतकरी व नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, यामुळे सदरील प्रकल्पाचे डिझाईन चुकीच्या पद्धतीने करणाऱ्या संबधित कंपनीची शासनाने चौकशी करन कडक कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच या परिसरातील शेतकऱ्यांना शेतीसाठी व नागरिकांना पिण्यासाठी पाण्याची सोय करण्याकरिता तातडीने करावयाची उपाययोजना, याबाबत शासनाने तातडीने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिकिया व भूमिका." | श्री. महेश शिंदे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १२५ | “वेल्हे (जि.पुणे) तालुक्यातील गुंजवणी येथे जल प्रकल्प उभा करण्यात येत असून या प्रकल्पातून पुरंदर तालुक्याला पाणी मिळणार असणे, पुरंदर तालुक्यामध्ये बंद पाइप लाइनच्या हा प्रकल्प करण्यात येणे, परंतु पूर्वीच्या ठरलेल्या मार्गाने प्रकल्प न राबविता तो थेट नीरा नदीच्या काठाने पुढे नेण्याचा घाट घालण्यात आलेला असणे, यामध्ये गावाच्या संपूर्ण शिवाराचा विचार न करता अधिकारी त्यांच्या मर्जीनुसार सर्वेक्षण करून पूर्वीचा आराखडा बदलण्यात येणे,याविरोधात ग्रामसभा घेऊन काम बघून बंद पडणे घालायचे माहिती जानेवारी २०२२ च्या दरम्यान निदर्शनास येणे, त्यामुळे स्थानिक जनतेत पसरलेले तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने चौकशी करून जुना आराखड्यानुसार बंद पाईपलाईनचा प्रकल्प पूर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावायची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. संजय जगताप, वि.स.स. | कित्ता |
| १२६ | "माहे फेब्रुवारी व त्या सुमारास सोलापूर जिल्ह्यातील विशेषता पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील पाणथळ व क्षारपड जमिनीचा प्रश्न ऐरणीवर येणे, पाणथळ व क्षारपड जमिनीची क्षेत्र हे लाभ क्षेत्रातील विहिरींच्या पाणीपातळीच्या नियतकालिक निरीक्षणाद्वारे ठरविले जाणे त्यासाठी पावसाळ्यात (१५ ऑक्टोबर ते ३१ जानेवारी) व पावसाळापूर्व (१ एप्रिल ते ३१ मे) अशा दोन हंगामात दर वर्षी नियतकालिक निरीक्षणे घेण्यात येणे, नुकत्याच झालेल्या निरीक्षणानुसार सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील क्षारपड जमिनीं मध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होणे, पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील १००० हेकटर पेक्षा जास्त जमिनी या क्षारपड होणे, जमिनी पाणथळ व क्षारपड होण्याची मुख्य कारणे म्हणजे कालव्याद्वारे सिंचन होणाऱ्या पाण्याचा निचरा न होणे, पावसाच्या पाण्याचा मंदगतीने होणार निचरा, रासायनिक खतांचा अति प्रमाणात वापर आणि सर्वात महत्वाचे कारण म्हणजे जिल्ह्यातून वाहत असणाऱ्या भीमा नदीमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होऊन पाणी दूषित होऊन क्षारता वाढणे अशी असणे, जमिनी क्षारपड झाल्यामुळे शेती उत्पादनामध्ये घट होऊन पीक उत्पादन कमी होणे ,जमिनीचा पोत खराब होऊन पीक | श्री. समाधान अवताडे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | हंगामात घट होणे ,तसेच शेतीतून शेत मजुरांचे विस्थापन होणे, कृषी उत्पादनात घट होणे व मुख्यतः शेती व शेतीपूरक व्यवसायावर प्रतिकूल परिणाम होणे,आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे अशीच परिस्थिती राहिल्यास नजीकच्या काळात मोठ्या प्रमाणावर जमिनी क्षारपड होऊन शेत जमिनी नष्ट होण्याची भीती निर्माण होणे, याचा एकूण परिणाम शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर होऊन त्यांच्या एकूण राहणीमानावर होणे,याच्यावर उपाय म्हणजे मोठ्या प्रमाणावर परिणामी अशी भूमिगत चर योजना राबविण्याची मागणी शेतकऱ्यांमार्फत जोर धरू लागणे,सदरची योजना ही अत्यन्त प्रभावी असून दीर्घकाळ परिणाम करणारी असणे,शासनाने सांगली जिल्ह्यात सदरच्या भूमिगत चर योजना ही प्रायोगिक ततत्वावर राबविली जात असणे,तीच योजना सोलापूर जिल्ह्यात देखील राबविण्याची आवश्यकता असणे,आगोदरच राज्यातला बळीराजा त्रासलेला असताना ह्या क्षारपड जमिनींचे भविष्यात मोठे संकट उभे राहून अल्प भूधारक शेतकरी भूमिहीन होण्याची भीती निर्माण होणे, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही. | | |
| १२७ | "भिवंडी तालुक्यातील मुंबई वडोदरा महामार्गाकरिता जमीन संपादनात तत्कालिन उप विभागीय अधिकारी श्री.मोहन नळदकर यांनी सन २०२०-२०२१ मध्ये गैरव्यवहार केलेला असणे, सौ. रंजना रमेश घरात पूर्वाश्रमिची कुंदा परशरम पाटील, रा.अकलोली, (शिरवली, ता. भिवंडी, जि. ठाणे) वारसाहक्काने सदर ठिकाणी वडिलोपार्जित स्थावर मिळकत असणे, सर्व्हे नं.१५४/२ब या जागेतून मुंबई वडोदरा महामार्ग जात असून भारत सरकारने दिलेल्या जाहिरातीत सदर ७/१२ उताऱ्यावर सौ. रंजना घरत यांच्या नावावर आहे. सौ.घरत यांचे दोन्ही भाऊ सर्वश्री. प्रभाकर व सुधाकर पाटील यांनी महसूल खात्याच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करून सन १९९५ साली केलेल्या बोगस कुल मुख्यातर पत्राचा गैरवापर करून तातडीने बोगस खरेदी खत बनवून फसवणूक करणे, सदरची तक्रार तलाठी सजा अकलोली व मंडळ अधिकारी, अनगांव यांना हरकत अर्ज सादर करून खरेदी खतास होणाऱ्या नोंदणीस मज्जाव केला असतांनाही आजपर्यंत संबंधित उताऱ्यावर नोंद नसणे, तरी सौ.रंजना घरत यांचे नाव उताऱ्यावर असतांना तत्कालिन उप विभागीय अधिकारी, | श्री. मंगेश कुडाळकर, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | भिवंडी यांनी कुठल्या कायद्याच्या अधिकाराचा वापर करून संपूर्ण रक्कम त्यांच्या भावाच्या नावावर वर्ग करणे, तसेच भिवंडी उप विभागीय कार्यालयात बुलेट ट्रेनकरिता जागा हस्तांतरण करण्यासाठी शेतकरी जागा देण्यास तयार असतांना कोणतेतरी कारण दाखवून शेतकऱ्यांना नाहक त्रास दिला गेला, किंबहुना मोबदला देताना या कामासाठी नेमलेल्या दलालांमार्फत कामे केली गेली, अशा इतरही तक्रारी झाल्या होत्या, तरी या सर्व प्रकरणी शासनाने संबंधितांवर करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| १२८ | "बीड जिल्ह्यातील विठोबा देव देवस्थान.खर्डा. ता.जामखेड, ची जमीन - मुर्शदपूर ता.आष्टी, विठोबा देवस्थान. पांढरी.ता आष्टी, श्रीरामचंद्र देवस्थान. आष्टी. (कोयाळ), श्रीरामचंद्र देवस्थान. कोयाळ. ता.आष्टी, खंडोबा देवस्थान. आष्टी, विठोबा देवस्थान खडकत. ता.आष्टी, श्रीरामचंद्र देवस्थान. चिंचपूर.ता.आष्टी, पिंपळेश्वर महादेव देवस्थान आष्टी. या ८ हिंदू समाजाचे इनाम देवस्थानाचे ८ बनावट खालसा आदेशान्वये इनाम जमीन खाजगी व्यक्तीच्या नावे करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले असणे, मा. महसूल मंत्री यांच्याकडे सामाजिक कार्यकर्त्यांमार्फत दि. १७/८/२०२१ रोजी लेखी तक्रार देण्यात आली असणे, परंतु अद्याप पर्यंत कोणतीच कारवाई झाली नसणे, यावर तेथील नागरिकांची होत असललेली चिडेची भावना, व मोठ्या प्रमाणावर होत असलेला असंतोष, इनाम जमिनी बेकायदेशीररित्या खालसा करून भूखंड माफियांमार्फत प्लॉटिंग करून कोट्यवधी रुपयांची कमाई करण्यात आली असणे, तसेच कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असणे, शासकीय अधिकाऱ्यांमार्फत सुद्धा मोठ्या प्रमाणात अनेक प्रकारचे आर्थिक गैरव्यवहार झाले असणे, संबंधितांमार्फत शासनाची फसवणूक करण्यात आली असणे, सदर बाब अतिशय गंभीर असणे, सदर बनावट खालसा आदेशान्वये ज्या खाजगी व्यक्तींच्या नावावर जमिनी करण्यात आलेल्या आहेत आणि शासनाच्या फसवणूक करणारे संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांची अश्या दोषींवर कसून चौकशी करून संबंधितांवर फौजदारी स्वरूपाची कार्यवाही झाली नसणे, अद्याप पर्यंत कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल झाला नसणे, सदर प्रकरणाच्या कारवाईत जाणीवपूर्वक दिरंगाई होत असणे, यावर शासनाने तात्काळ करावयाची कारवाई व उपाययोजना." | श्री. बाळासाहेब आजबे, वि.स.स. | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १२९ | "बीड जिल्ह्यातील देवस्थान/दर्गा/मस्जिद च्या जमिनी व ईनामी जमिनी खाजगी लोकांनी अनधिकृत खालसा केल्या असणे, या मध्ये महसूल आणि इतर विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश असणे, प्रकरणात उप जिल्हाधिकारी, सामान्य प्रशासन, बीड. यांना अटक होणे, जिल्हाभरात महसूल अधिकाऱ्यांच्या संगनमताने बीड, माजलगाव, गेवराई, परळी, पाटोदा, अंबाजोगाई, धारूर, या तालुक्यातील जवळपास १० हजार एक्कर पेक्षा जास्त जमिनीची परस्पर विल्हेवाट लावल्याचे उघड होणे, वक्फ बोर्डाकडून गुन्हे नोंद करण्यात आले मात्र महसूल यंत्रणेकडून कोणतीही कार्यवाही न होणे, काही जमिनी तर मा. न्यायालयाचे आदेश डावलून हस्तांतरित करण्यात येणे, जमिनीचा शासन नियमाप्रमाणे संबंधित दुय्यम निबंधक यांच्याकडून काढून दिलेल्या व्हॅल्युवेशन प्रमाणे शासनाला नजराणा रक्कम न भरणे, तेव्हा शासनाने सदर प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषीवर कार्यवाही करण्याची मागणी होणे, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका" | श्रीमती नमिता मुंदडा, सर्वश्री. प्रकाश सोळंके, संदिप क्षिरसागर, बाळासाहेब आजबे, अबू आजमी, वि.स.स. | कित्ता |
| १३० | "उप विभागीय अधिकारी, भिवंडी याचे कार्यालयामध्ये दि.२४ फेब्रुवारी, २०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंध विभागाने सापळा रचून कार्यवाहित कल्याण-कसारा ३ रा रेल्वे मार्ग संपादित जागेचा मोबदला बाधीत शेतकऱ्यास देण्यासाठी उप विभागीय कार्यालयाकडून ६ लाखाच्या लाचेची मागणी करण्यात येऊन लोकसेवक विठ्ठल गोसावी, नायब तहसिलदार, उप विभागीय अधिकारी, कार्यालय भिवंडी विभाग हे लाच मागताना व घेताना रंगे हात पकडले जाणे, सदर प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून पडताळणी चालू असताना मुख्य आरोपी विठ्ठल गोसावी, नायब तहसिलदार यांनी तसेच त्यामधील अजून दोन आरोपी विजय कमलाकर भोईर व लक्ष्मण सिंह शंकर सिंह राजपुरोहित यांनी प्रांताधिकारी व नायब तहसिलदार यांची वसुली आम्हीच करत असल्याचे कबुल केले जाणे, तथापि वरील गुन्ह्यामध्ये विठ्ठल गोसावी प्रमाणेच प्रांताधिकारी बाळासाहेब वाघचौरे हे सुद्धा तेवढेच दोषी दिसून येणे, प्रांत कार्यालयाकडून कोणत्याही चुकीच्या पद्धतीने मोबदला अदा केला जात नाही, असे कळविण्यात कळविले जाणे, परंतु | श्री.शांताराम मोरे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | तक्रारदार शेतकऱ्यांस मागील दोन महिन्यांपासून कार्यालयात फेऱ्या मारायला लावणे, नायब तहसिलदार गोसावी यांनी अवाजवी टक्केवारी रक्कम मागून शेतकऱ्यांस हैरान करून सोडणे व शेवटी सही करणाऱ्या सर्वांनाच पैसे दिल्याशिवाय काम होणारी नाही असे सांगणे, याबाबत शेतकऱ्यांने दिनांक ४ फेब्रुवारी २०२२ रोजी लोकप्रतिनिधींकडे सदरील विषयाची तोंडी व लेखी तक्रार देणे, परिणामी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने योग्य ती कार्यवाही करून काही लाचखोरांना गजाआड केलेले असणे, तरी जमिनीचा योग्य मोबदला शेतकऱ्यांस देण्याऐवजी शेतकऱ्यांचीच लुट करत असलेल्या या प्रांताधिकारी वाघचौरे व गोसावी, नायब तहसिलदार या भ्रष्ट अधिकाऱ्यांवर निलंबनाची कार्यवाही करण्याची आवश्यकता.'' | | |
| १३१ | "पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्याचे क्षेत्रफळ राज्यातील काही जिल्ह्यांपेक्षाही जास्त असल्याने प्रशासनावर कामाचा प्रचंड ताण असणे, लोकसंख्या झपाट्याने वाढत असणे, या भागात प्रशासकीय कामे राबवणेसाठी व नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी स्वंतत्र गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी व कायमस्वरूपी तहसीलदार, नायब तहसीलदार या अधिकाऱ्यांची गरज आहे. त्यामुळे तालुका हवेलीचे महसूली विभाजन करून पूर्व हवेलीचे कार्यक्षेत्र मोठे असल्याने स्वतंत्र तहसील कार्यालय असावे, ह्या मागणी बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व त्यावरील शासनाची प्रतिक्रिया." | सर्वश्री भिमराव तापकीर, अशोक पवार, वि.स.स. | कित्ता |
| १३२ | "चिंचणी (ता. डहाणू, जि.पालघर) येथील समुद्र किनाऱ्यालगत मोहम्मद खालीद चुनावाला यांच्या नावे असलेली गट क्र. ५१३ आणि ५१४ मध्ये जवळपास चार एकर जमीन तत्कालीन डहाणू तहसीलदार राहुल सारंग यांनी सीआरझेड नियमाचे उल्लंघन करून नियमबाह्यपणे अकृषीक परवानगी देण्यात येणे, जमीन गट क्र. ५१३ मधील जागा हरीत क्षेत्र व नाविकास क्षेत्रातील असणे, यालाच लागून असलेल्या गट क्र.५१४ मध्ये सीआरझेड नियमाचे उल्लंघन करण्यात येणे, चुनावाला यांनी किनारी असलेल्या संरक्षित तिवरांच्या झाडांची कत्तल करून पर्यावरणास गंभीर हानी पोहोचविल्याची तक्रार येथील | श्री. सुरेश भोळे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | चिंचणी ग्रामपंचायत सदस्य व सर्व ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांचेकडे करण्यात येणे, सदरहू जागा अकृषीक करण्यासाठी तलाठी सजा चिंचणी व मंडळ अधिकारी चिंचणी यांनी चुकीचा अहवाल डहाणुचे तत्कालीन तहसीलदार यांना दिनांक ७ जून, २०२१ रोजी सादर करण्यात येणे, सदर जागा बिनशेती करताना नियमांचा भंग झाला असेल तर डहाणू उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत संपूर्ण चौकशी करून यामध्ये अनियमितता आढळून आल्यास नियमानुसार कायदेशीर कारवाई केली जाईल असे आश्वासन उपजिल्हाधिकारी श्री.किरण महाजन यांनी देणे, त्यानुसार येथील तलाठी, मंडळ अधिकारी व तत्कालीन तहसीलदार श्री.राहुल सारंग यांना तात्काळ निलंबीत करून त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| १३३ | "ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली येथील कोपर, मोठा गाव, जुनी डोंबिवली, गणेशनगर, देवीचा पाडा, भिवंडी जवळील पिंपळास, माणकोली, दिवे आदी भागात गेले दोन वर्षांपासून ते अद्यापपर्यंत वाळू माफियांकडून मोठ्या प्रमाणात रेती उपसा करून व त्याची तस्करी करून महसूल यंत्रणांशी हातमिळवणी करून कोट्यवधी रुपयांचा आर्थिक घोटाळा करण्यात येत असल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच उघडकीस येणे, मुंब्रा पूर्व जलद रेल्वे मार्गाजवळील खारफूटीचे जंगल असलेल्या आणि खाडीचे पाणी असलेल्या भागात दररोज मुंब्रा खाडीतील झाडीत आडोशाला १५ ते २० बोटी उभ्या केल्या जात असणे, दिवसा वाळू उपसा करताना पोलीस व महसूल विभागाचे अधिकारी यांची गस्त असल्याने दिवसा वाळू उपसा न करता रात्रीच्या वेळी वाळू उपसा करून पार्क केलेल्या बोटीद्वारे रेतीची तस्करी करण्यात येणे, पर्यावरण प्रेमी व सामाजिक संघटनांचा महसूल खात्यावर दबाव असल्यानेच दिवसा झाडीत उभ्या केलेल्या बोटी रात्री आणून रेतीची तस्करी करण्यात येणे, डॉ.अश्विनी जोशी, डॉ.महेंद्र कल्याणकर जिल्हाधिकारी असताना कल्याण, डोंबिवली, भिवंडी, मुंब्रा खाडीतील बेकायदा उपसा करणाऱ्या रेती माफियांविरुद्ध सक्तीने कारवाई करून माफियांचे बोटी व अन्य साहित्यांचे सुमारे दोन कोटी रुपयांचे नुकसान करण्यात येणे, | श्री. सुरेश भोळे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
| --- | --- | --- | --- |
| | यामुळे शासनाचा रेती माफियांवर जरब असणे, परंतु गेले दोन तीन वर्षात जिल्हाधिकाऱ्यांचे लक्ष नसल्यामुळे सदरहू भागात शासनाच्या महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांबरोबरच रेती माफियांनी आर्थिक संगनमत करून शासनाचा करोडो रुपयांचा महसूल बडवून पर्यावरणाची प्रचंड हानी करण्यात येणे, उपसा केलेली रेती शहराच्या विविध भागात पोहचविण्यात येणे, काही साठा खाडी किनारी हौदात, तर काही रेतीचा साठा खारफुटीच्या आडोशाला ठेवण्यात येणे, खारफुटी झाडांची प्रचंड कत्तल करण्यात येऊन खाडी क्षेत्रात राडारोडा टाकून खाडीचे लचके तोडण्यात येणे, महसूल अधिकाऱ्यांना वाळू उपशाची माहिती दिली की ते फक्त कारवाई केली जाईल असे साचेबद्ध उत्तर देतात असेही पर्यावरणप्रेमींनी सांगणे, ठाणे येथील अनेक दैनिकांमध्येही यासंदर्भात आवाज उठविण्यात येणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य जाणीवपूर्वक दुर्लक्ष, परिणामी पर्यावरण प्रेमी व येथील स्थानिक जनतेत निर्माण झालेले तीव्र संतापाचे व असंतोषाचे वातावरण, या सर्व प्रकाराला जबाबदार असलेल्या त्या त्या भागातील तहसिलदार व संबधित महसूल अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करून त्यांची चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.'' | | |
| १३४ | "जालना जिल्ह्यातील अंबड, घनसावंगी, परतुर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या लाभक्षेत्रातील जमिनी ३० वर्षांपासून संपादित करण्यात येणे, या जमिनींच्या ७/१२ वर मागील २० वर्षांत मूळ मालकाचे नाव असणे, परंतु सद्यःस्थितीत संबंधीत ७/१२ वर महाराष्ट्र शासनाच्या नावाच्या नोंदी येणे, आज या जमिनी शेतकऱ्यांच्या ताब्यात असणे, या जमिनी ३ हजार रुपये एकरी भावाने घेण्यात आल्या असणे, सदरहू जमिनी मूळ शेतकऱ्यांना परत करण्यात याव्यात अशी शेतकऱ्यांची मागणी असणे, या जमिनींचा लिलाव करण्यात आल्यास शेतकरी भूमीहिन होऊन निराधार होणार असणे, पैठण धरणग्रस्तांना जमिनी देण्याबाबत जिल्हाधिकारी, जालना यांनी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना वारंवार पत्र पाठवून ताब्यात घेण्याबाबत कळविले असणे, तथापि धरणग्रस्तांची जमिनी घेण्याबाबत उदासिनता दिसून येणे, ज्या उद्देशाने जमिनी संपादित केल्या त्या तीन वर्षांत सदरहू उद्देशासाठी वापरण्यात आल्या नाहीत तर त्या शेतकऱ्यांना परत करण्याची संबंधीत अधिनियमात तरतूद असणे, याबाबत शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. बबनराव लोणीकर, सुधीर मुनगंटीवार, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. अभिमन्यु पवार, नारायण कुचे, राजेश पवार, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १३५ | "जळगाव जिल्ह्यात रावेर व यावल तालुक्यातील सुकी व तापी नदी पात्रातून अवैध वाळू उपसा होत असून यावर शासनातर्फे नियंत्रण घालावे, अशी मागणी सातत्याने गिरणा नदीकाठच्या गावातील ग्रामस्थांकडून हात असून अनेकवेळा नदीकाठच्या गावातील ग्रामस्थांनी देखील सुकी व तापी नदीतून होणारा अवैध वाळूचा उपसा करताना रंगेहात पकडून महसूल विभागाकडे देणे, तथापि, त्यानंतर पुढे त्या अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर कोणतीच कारवाई न होणे, कालांतराने पुन्हा त्याच ठिकाणी अवैध वाळूचा उपसा होत असणे, त्यामुळे सुकी व तापी काठच्या ग्रामस्थांचे मानसिक खच्चीकरण होणे, अवैध वाळू उपसा करणारे बिनदिक्कतपणे वावरत असणे, अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर महसूल प्रशासनाकडून गुन्हे दाखल केले जात असून त्यांचे ट्रॅक्टर वाळूसह जप्तकरण्यात येत असतात, त्यानंतरसुद्धा कायद्यांमधील पळवाटाचा फायदा घेऊन वाळू तस्कर सहीसलामत सुटत असणे, वाळू तस्करांवर होणारी कायद्याची तरतूदही किरकोळ असल्याने कारवाई होऊनही पुन्हा अवैध वाळूची तस्करी केली जात असणे, त्यामुळे वाळू तस्करांवर लावण्यात येणारी गुन्हयांची कलमे कडक करण्यासाठी, त्यांचेवर कठोर कारवाई करण्यासाठी प्रसंगी कायद्यामध्ये बदल करण्याची गरज तसेच अवैध वाळू उपसा प्रकारामध्ये वाढ होत असल्याने याबाबतीत तातडीने चौकशी करून कडक कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. | श्री. शिरीष चौधरी वि.स.स. | कित्ता |
| १३६ | "राज्यातील कुंभार समाजाला आमच्या कुटुंबास मातीच्या विटा, कौले व सणसुदीला लागणाऱ्या वस्तु व मूर्ति तयार करण्यास दरवर्षी ५०० ब्रास पर्यन्त मातीसाठी स्वामित्वधन माफ केलेले असणे, तरीही क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून गौण खनिज उत्खननाथे तातुपरते परवाने देणे बंद करणे, राष्ट्रीय हरित लवादाने जानेवारी २०२२ मध्ये जिल्हा प्रशासनाकडून गौण खनिज उत्खननासाठी दिले जाणारे तातुपरते परवाने बेकायदा ठरविले असणे, पाच हेक्टरच्या आतील क्षेत्राच्या उत्खननासाठीही राज्यस्तरीय पर्यावरण समितीची मान्यता बंधनकारक करणे, राज्य सरकारकडून या संदर्भात अद्याप कोणत्याही सूचना किंवा मार्गदर्शक तत्वे जारी करण्यात आले नसल्याने जिल्हाप्रशासनाने असे तातुपरते परवाने | श्री. संजय जगताप, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | थांबविणे, याचा फटका कुंभार समाजाला मोठ्या प्रमाणात बसला असून समाजावर उपासमारीची वेळ आलेली असणे, पिढीजात कुंभार समाजाला पारंपरिक व्यवसायिकांच्या समोरील व्यवसायिक अडचणी लक्षात घेऊन नियमात विशिष्ट कालावधीत व विशिष्ट क्षेत्रात, विशिष्ट परिमणा इतके गौण खनिज उत्खनन करण्यास परवानगी देण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी , मा. तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आले असणे, स्थानिक प्रशासनाकडून वन विभागाचे नाहरकत दाखला घेणे बंधनकारक केले आहे य याबरोबर गौण खनिज उत्खननासाठी विशिष्ट आराखडा मजुरीची अटही बंधनकारक करणे, एकंदर यासाठीचे कागदपत्रांचे सोपस्कार प्रचंड असणे कुंभार समाजाला जाणूनबुजून वेठीस धरले जात असून परिणामी कुंभार समाज देशोधडीला लागला असून या समाजामध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून कुंभार समाजाला न्याय मिळण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | | कित्ता |
| १३७ | "मुंबई उपनगर जिल्ह्यातील तहसिल कार्यालयामार्फत मागील कालावधीत सर्वसामान्य नागरिक, सहकारी गृहनिर्माण संस्था, अन्य वेगवेगळ्या संस्थांना सन १९९६ पासून सन २०२१ पर्यंत अश्या एकूण २५ वर्षाच्या कालावधीच्या एकत्रित अकृषिक आकारणीच्या नोटीसा देण्यात येणे, सदर नोटिसांमध्ये सन १९९६ पासून अकृषिक आकारणीची थकबाकी नमूद केलेली असणे, सदर नोटीशीमधील बिनशेती – सारा / अकृषिक आकारणीचे प्रमाणदर अवाजवी असणे, सन १९९६ ते २०२१ दरम्यान अनेक सर्वसामान्य नागरीकांनी, सोसायट्यांनी यापूर्वी वेळोवेळी अकृषिक आकारणीचे पैसे भरून देखील पूर्वी भरलेल्या पैशांच्या नोदी संबंधित नोटीशीमध्ये नसणे, मागील काळात झालेली नोटबंदी, कोविड १९ च्या महामारी साथीमुळे सर्व क्षेत्रातील लोकांच्या झालेल्या पगार कपातीच्या, आर्थिक अडचणीच्या काळात नागरीकांना, त्यांच्या सोसायट्यांना अवाजवी रकमेच्या नोटीसा येणे, सदर रक्कम भरण्यासाठी सात दिवसांचा अल्पावधी देणे, सदर रक्कम न भरल्यास संबंधित नागरीक आणि सोसायट्यांची बँक खाती किंवा सोसायटी | श्री. अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री. हिरामण खोसकर, संग्राम थोपटे, कुणाल पाटील, झीशान सिद्दिकी, कुमारी प्रणिती शिंदे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. धिरज देशमुख, सुरेश वरपुडकर, विकास ठाकरे, अमित झनक, लहू कानडे, सुभाष धोटे, विक्रमसिंह सावंत, बळवंत वानखडे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र.<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | कार्यालय सील करण्याच्या धमक्या देणे, याशिवाय विविध आस्थापना कोविड - १९ पार्श्वभूमीवर आर्थिक अडचणीत असताना देखील अश्या प्रकारे नोटीसा देणे, परिणामी त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या पगाराचे प्रश्न उपस्थित होणे, राज्याच्या अन्य महानगर पालिका क्षेत्रात देखील अश्याच प्रकारच्या तक्रारी प्राप्त होणे, राज्यातील महापालिका, नगरपालिका क्षेत्रात त्यांच्याकडून शीघ्रसिद्धगणकाच्या आधारे संबंधित नागरीक, सोसायट्या, विविध आस्थापना यांना मालमत्ता कराची आकारणी करणे, महापालिका क्षेत्रात मालमत्ता कर व अकृषिक कर अशा दुहेरी आकारणीमुळे लोकांवर पडणारा आर्थिक भुर्दंड, कोविड १९ च्या जागतिक महामारीच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य नागरीक, व्यावसायिक अडचणीच्या काळातून जात असताना, त्यांना शासनाकडून मदतीची अपेक्षा असताना शासनाचे त्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे सर्वसामान्य लोकांच्या मनात तीव्र असंतोष निर्माण झालेला असणे, परिणामी होणारी आर्थिक छळवणूक, स्थानिक नागरीकांवर होत असलेला अन्याय, त्यामुळे शासनाने केलेली वा करावयाची उपाय योजना अथवा शासनाने यावर करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | कित्ता |
| १३८ | "मुंबईतील वांद्रे पूर्व येथील रामनगर, गरीब नगर, नौपाडा, घास बाजार, तीन बंगला, बापूची स्टॉल रोड येथील एकशे चार एकर जागेवर ८० वर्षापासून वसाहती वसल्या असून सुमारे दहा हजार कुटुंबे असलेल्या या वस्त्यांमधील बहुतांशी कुटुंबाकडे वास्तवाची सर्व पुरावे असणे, रेल्वे लगत असलेल्या कुटुंबांना संरक्षण देण्याची राज्य शासन कार्यवाही करणार असल्याचे माहिती २०२२ च्या दरम्यान जाहीर करणे, येथील रहिवासी यांच्याकडे जुने रेशनिंग कार्ड, वीजबिल, पाणीपुरवठा जोडणी देयके इत्यादी पुरावे असून अनेक वर्षांपासून या ठिकाणी राहणाऱ्या रहिवाशांची घरे मोडकळीस आलेली असल्याने कधी दुर्घटना होऊन जीवितहानी होण्याची शक्यता असणे, सदरच्या २०४ एकर जमिनीपैकी १७७ एकर जमिनीची प्रॉपर्टी कार्ड रेल्वेच्या नावे असून रेल्वे मंत्रालयाकडे ताबा असणे, परंतु ७७ एकर जमिनी संदर्भात राज्य शासनाने कोणती ताबा पत्र दिले नसल्याने उक्त ७७ एकर जमीन राज्यशासनाने प्रॉपर्टी कार्ड करून बेहराम नगर, गरीब नगर, नौपाडा, घास बाजार, | श्री. झीशान सिद्दिकी, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | तीन बंगला, बापूची स्टॉल रोड येथील रहिवाशांचे पुनर्विकास करणे शक्य असतानाही उक्त ७७ एकर जमीन प्रॉपर्टी कार्ड तयार करून ताबा घेण्यास शासनाकडून विलंब होत असल्याने स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोष व नाराजीची भावना,याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून सदरचे ७७ एकर जमिनीचा ताबा घेऊन उक्त वसाहतींचा पुनर्विकास करण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | | |
| १३९ | "चंद्रपूर जिल्ह्यातील दुर्गम आदिवासी भागातील पहिल्यावाहिल्या सिमेंट उद्योगांमध्ये अनेक अनियमितता व जमीन भूसंपादन भूपृष्ट अधिकार चुकीच्या पद्धतीने केल्या गेल्यामुळे आदिवासी कोलाम कुटुंबाची फसवणूक व शासनाच्या जमिनीचा भोंगळ कारभारामुळे माणिकगड सिमेंट कंपनीने अवैध मार्गाने बेकायदेशीर वन विभाग महसूल व खाजगी आदिवासी कोलाम समाजाच्या जमिनी बनावट कागदपत्रे भूमापन मोजणी न करता चुकीच्या पद्धतीने ताबा प्रक्रिया करून हस्तांतर करणे, मोठ्या प्रमाणात चुनखडी उत्खनन व वन पर्यावरण नियमाचे उल्लंघन करून शासनाची कर चोरी दिशाभूल करणे, अनधिकृत कब्जा नियमबाह्य खदान परिसरात नवीन रस्त्यांची अनाधिकृत बांधकाम करणे, नोकारी कुसुंबी बाँबेझरी क्षेत्रातील जमीन मान्यता नसताना ६४२ ट्रॅक्टर पेक्षा जास्त जमिनी क्षेत्राच्या बाहेर जाऊन कंपनीने उत्खनन व अनधिकृत बांधकाम आदिवासींच्या जमिनीवर कब्जा करणे, गेल्या वीस वर्षापासून कंपनीला दिनांक १७ ऑगस्ट, १९८१ रोजीच्या शासनाने दिलेल्या लिस्ट करारानुसार जमिनीचे भूमापन सीमांकन चिन्ह निश्चित न करता भुमी अभिलेख विभागाकडून भूमापन मोजणी न करणे, अवैध उत्खनन अनधिकृत बांधकाम केल्याच्या अनेक तक्रारी प्रशासनाकडे असताना हा घोळ निकाली काढण्यासाठी भू मापन मोजणी केल्याशिवाय पर्याय नसल्याचे अहवाल तहसीलदार जिवती व भूमी अभिलेख निरीक्षक यांनी पोलीसांसमक्ष कुसुंबी येथे स्थळ पंचनामा करून जिल्हाधिकारी यांना देणे, खदाणीत उत्खनन आदिवासी कुटुंबाची शेत जमीनीत शोध सुरू असल्याचा अहवाल दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९ ला देणे, मात्र वनविभागानी पुढील कारवाई न करणे, तहसीलदार राजुरा यांनी नोकारी येथील तेरा आदिवासी जमीन खरेदी व्यवहार संशयास्पद तसेच शासनाची | श्री. सुभाष धोटे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | योग्य मार्गाने परवानगी न घेता सतत पाठपुरावा करून १९५६ पासून येथील भूमापन मोजणी झाली नसणे, तसेच चाळीस वर्षापासून कंपनीने नकाशा ची दुरुस्ती अथवा महसूल अभिलेखात दुरुस्ती न करता शासनाची दिशाभूल आदिम आदिवासाची फसवणूक करीत राष्ट्रीय संपत्तीची कर चोरी वन पर्यावरण आदिवासी हक्क संरक्षण कायद्याचे उल्लंघन करत कंपनी मोठ्या प्रमाणात आर्थिक फायदा मिळवून शासनाला दिशाभूल करीत असून याकडे संबंधित प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्यशासनाने सखोल चौकशी करून संबंधित कंपनीच्या जमिनीची संपूर्ण चौकशी करून स्थानिक आदिवासींना लाभ देण्यासाठी संबंधित कंपनी प्रशासनावर कठोर स्वरुपाची कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | | |
| १४० | "चंद्रपूर जिल्ह्यातील कुसुंबी, ता.जिवती येथील आनंदराव मेश्राम व इतर २४ आदिवासींची ६३.६२ हे.आर जमीन मालकी हक्काने असणे, मात्र या जमिनीवर मानिकगड सिमेंट कंपनीने स्थानिक प्रशासनिक अधिकाऱ्यांना हाताशी घेऊन १९ मार्च, १९८५ पासून बेकायदेशीरपणे ताबा मिळविणे, कंपनीने कोणालाही विश्वासात न घेता, कोणताही मोबदला न देता, नियमबाह्य व बेकायदेशीररित्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने जमीन कब्यात घेणे, सदर बाब भुसंपादन उपजिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर दि.२४.९.२०१७ व ३.२.२०१८ रोजी त्यांनी या जमिनीचा मोबदला व न्याय या आदिवासींना मिळवून देण्याबाबत उप विभागीय अधिकारी, राजूरा यांना पत्र देणे, त्यावरून तहसिलदार जिवती यांना पत्र देण्यात येणे, त्यावरून दि. १६.५.२०१८ रोजी तहसिलदार, जिवती यांनी खोटा व बनावट अहवाला तयार करणे, त्या अहवालावरून मालक असणारे हे आदिवासी परिवार न्याय व हक्कांपासून वंचित होणे, दि.१८.११.२०२१ रोजी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी त्याच खोट्या व बनावट अहवालावरून कक्ष अधिकारी, मंत्रालय, मुंबई यांना अहवाल सादर करणे, या खोट्या अहवालावर आक्षेप घेत वरिष्ठांकडे आदिवासी परिवारांना न्याय देण्याची सातत्याने मागणी करण्यात येणे, दि.९.२.२०२२ रोजीच्या अति.उपजिल्हाधिकारी, | श्री. देवराव होळी, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | चंद्रपूर यांच्या मा.विभागीय आयुक्त यांना पाठविलेल्या पत्रान्वये फेरफार क्र.२४८, दि.३.२.२०२१ हा रद्द करणे, तसेच त्रिस्तरीय समितीन्वये याबाबत तहसिलदार, तलाठी यांना खुलासा सादर करण्याचे निर्देश देणे, यावरून लक्षात येते की मौजा कुसुंबी येथील २४ आदिवासी परिवारांच्या हक्काचे हनन झाल्याने त्यांना न्याय देण्याची व दोषींवर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| १४१ | "वैतरणा जलविद्युत प्रकल्पाकडे संपादित जमिनीपैकी अतिरिक्त असलेल्या ६२३.२२ हे.जमिन जाहिर लिलावाद्वारे विक्री करण्याचा प्रस्ताव मा. कार्यकारी अभियंता, भातसा धरण, व्यवस्थापन विभाग, भातसानगर यांनी जा.क्र.भाधव्यवि/प्रशा-४/२३४३/सन २०२० दि.१५.९.२०२० अन्वये मा.जिल्हाधिकारी, जि. नाशिक या कार्यालयास सादर करण्यात येणे, त्यानुसार उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग, जि. नाशिक यांनी पत्र क्र. भूसंपादन/ कावि/९६२ दि.६.१०.२०२० अन्वये'' सदर अतिरिक्त जमिनीची आवश्यकता नसल्याचे व सदर जमिनीचे प्रचलित शासन निर्णयानुसार जाहिर लिलावाद्वारे विक्री करण्यास हरकत नसल्याचे '' प्रमाणपत्राची मागणी करण्यात येणे, त्यानुसार सदर प्रकरणी ना-हरकत प्रमाणपत्र देणेसाठी शासनाकडून मान्यता मिळणेकरिता कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचे पत्र क्र. कोंपाविम/तां-३/वैतरणा जलविद्युत/२६७४/सन २०२० दि.२९.१०.२०२० अन्वये शासनास सादर करण्यात येणे, त्यानुसार नियामक मंडळाच्या ७९ व्या बैठकीत '' वैतरणा जलविद्युत प्रकल्पाकडे संपादित जमिनीपैकी अतिरिक्त असलेल्या ६२३.२२ हेक्टर जमिनीपैकी सनं.२७/१ नागोसली, ता.इगतपुरी,जि.नाशिक मधील ७ एकर २८ गुंठे क्षेत्रापैकी १.४८ एकर जमिन ही नागोसली ग्रामपंचायत कार्यालय, अंगणवाडी बांधकाम व इतर सुविधांसाठी जमिनी प्रचलित रेडी रेकनर नुसार दर आकारन कायमस्वरपी हस्तांतरीत करण्यास व उर्वरित अतिरिक्त ६२२.६२ हेक्टर जमिन महसूल विभागाचे जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे हस्तांतरीत करून जाहिर लिलावाद्वारे विक्री करणे कामी "ना हरकत प्रमाणपत्र'' देण्यासाठीचा प्रस्ताव शासनास | श्री. हिरामण खोसकर, वि.स.स. | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | शिफारस करण्यासाठी मंजूरी देण्यास नियामक मंडळाची एकमताने मान्यता देण्यात येणे, या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी सतत पाठपुरावा करून मा.मंत्री, जलसंपदा यांनी दि.२५.७.२०२० रोजी वैतरणा जलविद्युत प्रकल्पाचा केलेल्या दौऱ्यादरम्यान अतिरिक्त जमिन मूळ मालकांना परत देण्याची केलेली मागणी, परंतु अद्यापही यावर कोणतीच कार्यवाही न झाल्याने या जमिनीच्या मूळ मालकामध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिकिया व भूमिका.'' | | |
| १४२ | "नागपूर येथील मेयो रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी रुग्णालयास रुपये ३.५ कोटी इतक्या निधीची आवश्यकता असणे, तथापि रुग्णालय प्रशासनाकडून शासनास सादर करण्यांत येणाऱ्या विनंतीपत्रात ३.५ कोटी ऐवजी रुपये ३५,६३,४००००/- इतकी मागणी एक शुन्य जादा टाकून नोंदविण्यात आल्याचे निदर्शनास येणे, शासनानेदेखील त्याबाबत काहीही शहानिशा न करतां नोंदणीपत्रातील सर्वच्यासर्व रक्कम रु.३५ कोटी ६३ लाख इतकी रक्कम मेयो रुग्णालय प्रशासनास वितरित करण्यांत आल्याचे दिनांक २२ जानेवारी,२०२२ रोजी निदर्शनास येणे, दरम्यानच्या काळात रुग्णालय प्रशानास आपली चूक लक्षांत आल्यावर जादा आलेली अतिरिक्त रक्कम शासनास परत घेण्याची विनंती करण्यांत येणे, परंतु शासनाने अतिरिक्त सर्व रक्कम परत घेण्याऐवजी त्या रक्कमेपैंकी फक्त १० कोटी ४३ लाख इतकीच रक्कम परत घेण्यांत येणे, त्यामुळे उर्वरित २२ कोटी रक्कमेबाबत काय झाले असा प्रश्न निर्माण होऊन त्यामध्ये आर्थिक घोटाळा झाला आहे की काय, असा अधिकारी/कर्मचारी वर्गामध्ये संभ्रम होणे, परिणामी या प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करून केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. धर्मरावबाबा आत्राम, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १४३ | "महिलांमध्ये सध्या सर्व्हायकल कॅन्सर झपाट्याने पसरत असणे, वय वर्षे ११ ते २० या वयोगटातील मुलींना सर्व्हायकल कॅन्सर होण्याची शक्यता असणे, सर्व्हायकल कॅन्सर रोखण्यासाठी यावर प्रतिबंधात्मक उपायासाठी लस उपलब्ध असणे, उक्त वयोगटातील मुलींना काही ठराविक अंतराने ३ लसी दिल्यास या आजारावर प्रतिबंध होऊ शकतो, परंतु एका लसीची किंमत रुपये ३ हजार असून ३ लसी घेण्यासाठी ९ हजार रुपये खर्च करावे लागत असणे, त्यामुळे सर्वसामान्य, मध्यमवर्गीय गरीब कुटुंबांना हा खर्च परवडणारा नसणे, सर्व्हायकल कॅन्सरमुळे दरवर्षी सरासरी २ लाख ६५ हजार, ६७२ महिलांचा मृत्यू होत असणे, सर्व्हायकल कॅन्सरसाठी गार्डासिल (Gardasil) आणि सिर्वरीक्स (Cervarix) या दोन लसी देण्याची आवश्यकता असणे, या लसी बनविण्याऱ्या ग्लॅक्सस्मिथ (Glax Smith) आणि मेर्क (Merck) या दोन कंपन्या असून दोन्हीही कंपन्या मुंबईत औषधाची उत्पादने करीत असणे, या दोन्ही कंपन्या राज्य सरकारच्या सर्व सवलती घेत असणे, यापूर्वी मुंबईसह राज्यामध्ये हॅपेटायटस "बी" रोखण्यासाठी सवलतीच्या दरात लसी उपलब्ध करून देण्यात आले असणे, राज्य सरकार राज्यातील विविध ठिकाणी जनतेच्या आरोग्यासाठी महापालिका, नगरपरिषदा, जिल्हापरिषदा व वेगवेगळ्या सामाजिक संस्था यांच्या माध्यमातून आरोग्य शिबिराचे आयोजन केले जात असणे, परंतु या आरोग्य शिबिरामध्ये सर्वसाधारण आरोग्य तपासणी करून उपचार केला जात असणे, मा. पंतप्रधान यांच्या बेटी बचाव, बेटी पढाव या योजनेअंतर्गत राज्यभर महिलांमध्ये सर्व्हायकल कॅन्सरबाबत जनजागृती करून, सर्व्हायकल कॅन्सरची लस उपलब्ध करून महिलांना सवलतीच्या दरात देण्याची अत्यंत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. योगेश सागर, अतुल भातखळकर, श्रीमती मनिषा चौधरी, ॲड. पराग अळवणी, ॲड. आशिष शेलार, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १४४ | "महाराष्ट्र राज्यातील गोर-गरीब रुग्णांसाठी राज्य शासनामार्फत महात्मा ज्योतीबा फुले आरोग्य योजना राबविण्यात येणे, सदर योजनेंतर्गत ९७५ आजारांवर मोफत उपचार मिळत असणे, सदर योजना ॲलोपॅथी उपचार घेणाऱ्या रुग्णांसाठी वरदान ठरत असणे, आयुर्वेद उपचार पद्धतीमध्ये सर्व आजारांवर औषधोपचार होत असणे, राज्यात सन २०१७ पर्यंत ६९ आयुर्वेद महाविद्यालय सुरु असणे, सदरील महाविद्यालयांतून उत्तीर्ण झालेल्या डॉक्टरांची संख्याही मोठ्या प्रमाणात असणे, त्यामुळे देश पातळीवर तसेच राज्यामध्ये आयुर्वेद उपचार घेणाऱ्यांची रुग्णांच्या संख्येतही मोठ्या प्रमाणात वाढ होत असणे, आयुर्वेद उपचार सर्वसामान्य, गोरगरीब रुग्णांपर्यंत पोहचत असणे, परंतू आयुर्वेद उपचार पद्धतीचा समावेशन शासनाच्या कोणत्याही आरोग्य योजनेमध्ये नसल्यामुळे आयुर्वेद उपचार घेणाऱ्या रुग्णांची होणारी आर्थिक कुचंबना, शासनाने आयुर्वेदीक उपचार महात्मा ज्योतीबा फुले आरोग्य योजनामध्ये समाविष्ठ करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची निर्णयात्मक कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया." | डॉ. राहूल पाटील, वि.स.स. | कित्ता |
| १४५ | "राज्यातील कोविड प्रतिबंधक लसीकरण मोहिमेत धुळे महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून नागरीकांना लस न देताच संबंधितांना मोठ्या प्रमाणात केवळ प्रमाणपत्रे दिली गेली असून यात मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार झाला असल्याचे दिनांक ३०.१२.२०२१ दरम्यान समोर येणे याप्रकरणात मालेगाव संबंध ही उघड झाले असणे, धुळे महापालिकेच्या माध्यमातून चालणाऱ्या लसीकरण केंद्रावरुन ज्या लाभार्थ्यांना लस दिल्याचे दाखविले गेले, त्यातील अनेक जणांना लस न देता  केवळ ऑनलाईन प्रमाणपत्र दिले गेले असणे, यात माळेगाव शहरातील नागरीकांनाही अशी प्रमाणपत्रे वितरित झाली असणे, ८४ दिवसानंतर लसीचा बॅच नंबर बदलतो. मात्र संबंधित नागरीकांच्या प्रमाणपत्रावर दोन्ही डोसचे बॅच नंबर सारखेच आढळून आले असणे, त्यामुळे बोगस लसीकरण प्रमाणपत्र वितरणचे व्यवहारात सुमारे दोन कोटीचा गैरव्यवहार झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असणे, याची सखोल चोकशी करून याबाबत शासनाने करावयाची आवश्यक ती करवाई ? उपाययोजना व शासनाच्या प्रतिक्रिया." | श्री. योगेश सागर, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १४६ | "माहे फेब्रुवारी २०२२ च्या दुसऱ्या आठव्यात वा त्या दरम्यान जिल्हा अहमदनगर तालुका पारनेर येथील लोकप्रतिनिधी यांनी तालुका पारनेर येथे मौजे ढवळपुरी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्यात येणे, मौजे टाकळी ढोकेश्वर येथे स्त्री उपचार रुग्णालयाची स्थापना व रुग्णालय कर्मचारी वसाहत नव्याने बांधणे, तालुका पारनेर येथे ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणी वर्धन करणे व सुपा औद्योगिक वसाहत याठिकाणी "ट्रामा केअर सेंटरची" उभारणी करणे अशा आरोग्याच्या दृष्टीने महत्वाच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून केलेल्या विविध मागण्या गेले महिने प्रलंबित असल्याची बाब उघड होणे, आरोग्याच्या गैरसोयींना सामोरे जावे लागत असल्याने स्थानिक ग्रामस्थांना व नागरिकांना अनेक संकटांना सामोरे जाण्याची वेळ उद्भवल्याने नागरिकांच्या मनात निर्माण झालेली असंतोषाची भावना यावर शासनाने करावयाची कार्यवाही व आवश्यकती उपाययोजना. | श्री. निलेश लंके, वि.स.स. | कित्ता |
| १४७ | "समाजाकडून आणि कुटुंबीयांकडूनही घृणा व तिरस्काराची वागणूक मिळणाऱ्या कुष्ठ रुग्णांसाठी सन १८८२ मध्ये कार्यान्वित करण्यात आलेल्या पुणे येथील डॉ. बंदोरवाला कुष्ठ रुग्णालयात, जेथे १००० पेक्षा जास्त पुरुष व महिला रुग्ण दाखल होत असणे, ज्यांना दिले जाणारे औषधोपचार, पुनर्रचनात्मक शस्त्रक्रिया सेवा, व्यवसायाभिमुख प्रशिक्षण, मात्र स्वयंसेवी संस्थेकडे चालवण्यास देण्यात आलेले हे रुग्णालय सन २००२ मध्ये शासनाकडे हस्तांतरीत केल्यानंतर, आंतररुग्ण कक्षांची व स्वच्छता गृहांची देखभाल दुरुस्ती अभावी झालेली दुरावस्था, कर्मचारी निवासस्थानांची दुरावस्था. शस्त्रक्रियागृहाच्या नादुरुस्तीमुळे व शस्त्रक्रिया उपकरणा अभावी पुनर्रचनात्मक शस्त्रक्रियांचे बंद पडलेले काम यंत्रसामुग्री व कुशल कर्मचाऱ्या अभावी ठप्प झालेली रुग्ण सेवा, त्यामुळे तेथे दाखल रुग्णांच्या संख्येत झालेली लक्षणीय घट, दाखल असणाऱ्या रुग्णांमध्ये असणारा असंतोषाची भावना, तसेच कर्मचारी वर्गातील निर्माण झालेली नाराजी, तसेच या रुग्णालयाच्या जागेत होणारी अतिक्रमणामुळे रुग्णां होणारा त्रास त्यामुळे अतिक्रमणे हटविण्याची आवश्यकता, राज्यात कुष्ठ रुणांच्या संख्येमुळे शासनाने डॉ. बंदोरवाला कुष्ठ रुग्णालयाची होणारी दुरावस्था दुर करण्यासाठी आवश्यकती सोयी सुविधा पुरविण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रीया." | श्री. संजय जगताप, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १४८ | "टेंभुर्णी जि.सोलापूर हे पुणे-सोलापूर,पंढरपूर-शिर्डी या राष्ट्रीय महामार्गावरील प्रमुख गांव असून या ठिकाणावरुन प्रवासी वाहतुक,श्री.क्षेत्र पंढरपूर,शिर्डी येथे जाणारी मोठी प्रवासी संख्या परिसरातील सुमारे ३० गावांतील ग्रामीण लोकसंख्या यांचे करिता वेळेत वैद्यकीय सुविधा मिळणेसाठी टेंभुर्णी शहरामध्ये ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय बांधणेसाठी राज्य सरकारने मंजुरी देऊन १५ कोटी निधीची तरतुद केलेली असणे, सार्वजनिक आरोग्य विभागाकडे उप जिल्हा रुग्णालय बांधणेसाठी आवश्यक जागा उपलब्ध नसल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मागणी करून महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ (जलसंपदा विभाग) यांचे मालकीची टेंभुर्णी येथील गट क्रं. ८६६ क्षेत्रफळ १.६० हेक्टर जागा उप जिल्हा रुग्णालयासाठी मंजूर केलेली असणे, त्यासाठी जलसंपदा विभागाने जागेचे १,४३,८०,८२१ रुपयांचे मुल्यांकन केलेले असणे, सदरचे आकारलेले मुल्य भरणेसाठी सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडे मागणी केलेली असून त्यावर सार्वजनिक आरोग्य विभागाकडून कोणतीही कार्यवाही होत नसणे, परिणामी ग्रामीण भागातील रुग्णांना वेळेत उपचार मिळणेस दिरंगाई होत असणे, उपचार न मिळाल्याने मृत्युचे प्रमाण वाढणे याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी महामार्गावर प्रवास करणाऱ्या तसेच ग्रामीण भागातील जनतेमध्ये पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण यामुळे राज्य शासनाने जागेचे मुल्यांकन भरुन तातडीने काम सुरू करणेबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. | कित्ता |
| १४९ | "जिल्हा रुग्णालय औंध, जि. पुणे. येथे दिव्यांग प्रमाणपत्र मिळविण्यासाठी दिव्यांगांचे हाल होत असल्याची बाब माहे मार्च २०२२ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास येणे, रुग्णालयामध्ये दिव्यांगांना व्हील चेअर उपलब्ध नसणे, रुग्णालयामध्ये कर्मचारी व डॉक्टरांची कमतरता असणे, डॉक्टरांची वेळ एक आठवडा ते २ महिने मिळत नसणे, रुग्णालयात तिसऱ्या मजल्यावर दिव्यांगांसाठी मूल्यमापन कार्यालय असणे परंतु रुग्णालयाची लिफ्ट फक्त दुसऱ्या मजल्यापर्यंत सुरु असणे, दुसऱ्या मजल्यावरून दिव्यागांना तिसऱ्या मजल्यापर्यंत जाताना अतिशय त्रास होणे, रुग्णालयात केसपेपर | सर्वश्री. सिद्धार्थ शिरोळे, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री. भिमराव तापकीर, सुनिल कांबळे, ॲड. राहूल कुल, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | काढताना दिव्यांगांसाठी स्वतंत्र खिडकी नसणे, इंटरनेटमुळे अनेक यंत्रणा बंद असणे, एवढे होऊन सुद्धा दिव्यांगांचे एका दिवसामध्ये प्रमाणपत्र काढण्याची प्रक्रिया पूर्ण न होणे, त्यांना दोन तीन वेळा प्रमाणपत्र मिळविण्यासाठी रुग्णालयात जावे लागणे, रुग्णालयामध्ये दिव्यांग प्रमाणपत्राची अनेक प्रकरणे बरेच दिवस प्रलंबित असणे, दिव्यांगांना वेळेवर प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाचे याकडे झालेले दुर्लक्ष, शासनाने तातडीने दिव्यांग प्रमाणपत्र देण्याची गरज, त्या दृष्टीने शासनाने गांभीर्याने व तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| १५० | "पायरवाडी (ता. मोखाडा, जि. पालघर) येथील बालकास जव्हार कुटीर रुग्णालयात दाखल करण्यात आलेला कु. अजय युवराज पारधी या ६ वर्षीय बालकाचा दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी उपचारादरम्यान झालेला मृत्यू, सदर बालकास त्याच्या कुटुंबियांनी २४ जानेवारी, २०२२ रोजी त्र्यंबकेश्वर येथील दवाखान्यात नेणे, तेथे एक दिवसाच्या उपचारानंतर त्याला सरकारी दवाखान्यात दाखल करण्याचा त्र्यंबकेश्वर येथील डॉक्टरांनी सल्ला देणे, या सल्ल्यानंतर मुलाच्या पालकानी त्याला मोखाडा येथील ग्रामीण रुग्णालयात घेऊन जाणे, तेथील डॉक्टरांनीही बालकाला जव्हार येथील कुटीर रुग्णालयात दाखल करण्यास सांगणे, पालकानी जव्हार येथील कुटीर रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्या बालकावर उपचार मिळण्यास विलंब झाल्यामुळे दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी उपचारा दरम्यान बालकाचा झालेला मृत्यू, मृत बालकाचा देह घरी नेण्यासाठी कुटुंबाकडे पैसे नसल्याने त्यांना रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यास जव्हार येथील कुटीर रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांकडून झालेला हलगर्जीपणा, मृतदेह रुग्णवाहीकेतून नेण्यासाठी पैसे न दिल्यास रुग्णवाहीका मिळणार नाही, असे रुग्णवाहिकेच्या चालकाने मृत बालकाच्या वडिलांना सांगणे, परिणामी मुलाचा मृतदेह ३५ ते ४० किमी अंतरावर असलेल्या स्वतःच्या घरी दुचाकीवरुन नेण्यात येणे, या दुर्देवी घटनेला जबाबदार असलेल्या रुग्णालयाच्या प्रशासनाच्या कारभाराविषयी जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष, या दुर्दैवी घटनेची व प्रशासनाच्या मनमानी कारभाराची चौकशी करून जबाबदार असणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.'' | श्री. श्रीनिवास वनगा, श्रीमती यामिनी जाधव, श्री. राजेश पाटील, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १५१ | राज्यशासनाचे कोविड महामारीचे कडक निर्बंध असताना देखील मुंबईतील वांद्रे विभागात लसीकरणाचे बोगस प्रमाणपत्र दिले जात असल्याबाबत निर्मलनगर पोलीस ठाणे येथील तक्रार दाखल केली असताना बोगस प्रमाणपत्र जारी करण्यात आले असल्याचे डिसें. २०२१ च्यादरम्यान निष्पन्न होणे, वांद्रे विभागातील सर्व १३ लसीकरण सेंटरचे हेड असलेले वरिष्ठ आरोग्य अधिकारी, डॉ. सतिश बडगिरे यांनी अधिकाराचा गैरवापर करून बोगस प्रमाणपत्र दिले असल्याचा संशय असतानाही त्यांची चौकशी करण्यात आलेली नसणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या तत्कालीन सहायक आयुक्त श्रीमती अलका ससाणे यांना याप्रकरणाची माहिती दिली असतानादेखील कोणतीही कारवाई करण्यात न येणे, कोविड काळात नागरिकांना जीविताची भीती असतानादेखील सर्रासपणे वरील प्रकार घडत असताना दुर्लक्ष केले जात असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना याबाबत राज्यशासनाने सखोल चौकशी करून संबंधित वरिष्ठ अधिकारी डॉ. सतिश बडगिरे व सहायक आयुक्त श्रीमती अलका ससाणे तसेच या प्रकरणातील इतर अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | श्री. झीशान सिद्दिकी, वि.स.स. | कित्ता |
| १५२ | ''मोखाडा तालुक्यातील (जि. पालघर) कोशिमशेत या गावातील सर्वेश अशोक धोडी या १६ महिन्याच्या मुलाला दिनांक १० फेब्रुवारी, २०२२ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र वाशाळा येथील परिचारिकेने मुलाच्या घरी जाऊन एमआर व ट्रिपल बुस्टर डोस दिल्यानंतर त्याचा दिनांक  रोजी झालेला मृत्यू, आरोग्य विभागाच्या बेफिकीरीमुळे मुलाचा मृत्यू झाल्याचा नातेवाईकांचा आरोप, याप्रकरणी शासनाने तात्काळ चौकशी करून मृत्युस कारणीभूत असलेल्या परिचारिका व जबाबदार असलेल्या वैद्यकीय अधिकारी यांच्यावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. श्रीनिवास वनगा, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १५३ | "नागपूर येथील मेयो रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी रुग्णालयांलयास रुपये ३.५ कोटी इतक्या निधीची आवश्यकता असणे, तथापि रुग्णालय प्रशासनाकडून शासनास सादर करण्यांत येणाऱ्या विनंतीपत्रात ३.५ कोटी ऐवजी रुपये ३५,६३,४००००/- इतकी मागणी एक शून्य जादा टाकून नोंदविण्यात आल्याचे निदर्शनास येणे, शासनानेदेखील त्याबाबत काहीही शहानिशा न करता नोंदणीपत्रातील सर्वच्यासर्व रक्कम रु.३५ कोटी ६३ लाख इतकी रक्कम मेयो रुग्णालय प्रशासनास वितरित करण्यांत आल्याचे दिनांक २२ जानेवारी, २००० रोजी निदर्शनास येणे, दरम्यानच्या काळात रुग्णालय प्रशानास आपली चूक लक्षांत आल्यावर जादा आलेली अतिरिक्त रक्कम शासनास परत घेण्याची विनंती करण्यांत येणे, परंतु शासनाने अतिरिक्त सर्व रक्कम परत घेण्याऐवजी त्या रक्कमे पैकी फक्त १० कोटी ४३ लाख इतकीच रक्कम परत घेण्यांत येणे, त्यामुळे उर्वरित २२ कोटी रक्कमेबाबत काय झाले असा प्रश्न निर्माण होऊन त्यामध्ये आर्थिक घोटाळा झाला आहे की काय, असा अधिकारी/कर्मचारी वर्गामध्ये संभ्रम होणे, परिणामी या प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करून केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. धर्मरावबाबा आत्राम, वि.स.स. | कित्ता |
| १५४ | "पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या आवारात असणाऱ्या शवविच्छेदन गृहाशेजारी शवविच्छेदन करण्यात आलेल्या मृत व्यक्तींचे अवशेष उघड्यावर टाकण्यात येणे, सदर अवशेष डुक्कर, कुत्री आदी प्राणी खात असल्याचा धक्कादायक प्रकार माहे डिसेंबर २०२१ मध्ये उघडकीस येणे, उपजिल्हा रुग्णालयात घडलेल्या या प्रकारामुळे अधिकाऱ्यांच्या बेजबाबदारपणाचा नागरिकांमध्ये संताप व्यक्त होणे, या प्रकरणी सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची नागरिकांकडून होत असलेली मागणी, परंतु याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. चंद्रकांत (दादा) पाटील, योगेश सागर, गणपत गायकवाड, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १५५ | "जि. ठाणे, मुरबाड तालुक्यात, ठाणे जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभाग व १४, १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून करण्यात आलेली रस्ते काँक्रीटीकरण, पेव्हर ब्लॉक, नदीकाठचे घाट, स्मशानभूमी व रस्ते, गटारे, पाणीपुरवठा वाहिन्या, टाक्या, शासकीय इमारती, बोअरवेल विहीर यांची बांधकामे अत्यंत निकृष्ट दर्जाची झाल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, सदर विकासकामांवर कोट्यवधी रुपये खर्च करण्यात येऊनही कामे आराखड्यानुसार करण्यात न येणे, काँक्रीटच्या कामात दगडांचा व धुळ मिश्रित वाळूचा सर्रास वापर करण्यात येणे, नियमानुसार रुंदीकरण न करता मातीवरच डांबर टाकून निकृष्ट दर्जाचे काम करण्यात येणे, सबंधित अधिकारी यांचे ठेकेदाराबरोबर असलेल्या आर्थिक संगनमतामुळे सदरहू विकासकामे निकृष्ट दर्जाची होऊन शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी वाया जाऊन विकासकामे खराब दर्जाची झाल्याने सदरहू तालुक्यातील ग्रामस्थ जनतेस विकासकामाच्या लाभापासून वंचित राहावे लागणे, यासंदर्भात वरिष्ठ कार्यालयांकडे लेखी तक्रारी अथवा माहिती अधिकारात माहिती मागविण्यास, माहिती देण्यास जाणूनबुजून विलंब करणे किंवा चुकीची माहिती देणे, मुरबाड-म्हसा निकृष्ट रस्त्यांबाबतसुद्धा अशाच प्रकारे तक्रार केली असता त्याची दखल न घेणे, यासंदर्भात जिल्हा परिषदेचे उपअभियंता संजय कोरडे, कार्यकारी अभियंता व संबंधित अधिकारी यांच्यावर तात्काळ कारवाई करण्याची ग्रामस्थांकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने हस्तक्षेप करून तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया" | श्री. सुरेश भोळे, वि.स.स | कित्ता |
| १५६ | "जि. नाशिक, सिन्नर तालुक्यातील, सिन्नर पंचायत समितीच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील कंत्राटी पद्धतीने कार्यरत असलेल्या कनिष्ठ अभियंता गौरव सुर्यकांत गवळी यांस लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी १५ हजार रुपयांपैकी पहिला टप्पा १० हजार रुपये लाच स्वीकारताना नुकतीच अटक करण्यात येणे, सिन्नर तालुक्यातील कासारवाडी ग्रामपंचायत अंतर्गत पिण्याच्या पाण्यासाठी आर.ओ.प्लांट काम पूर्ण केल्यावर सदर कामाची मोजमाप पुस्तिका भरून केलेल्या कामाचे देयक काढून देण्यासाठी सदरहू अधिकारी यांनी १५ हजाराची लाच मागण्यात येणे, दरम्यान लाचखोर कनिष्ठ अभियंता | श्री. सुरेश भोळे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | गवळी यांना रंगेहाथ पकडल्यानंतर त्यांची कसून चौकशी करण्यात येणे, चौकशीत सदर लाच ही ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील तीन वरिष्ठ अधिकारी कर्मचारी कार्यकारी अभियंता श्री.भांड, उप अभियंता श्री.संजय मेस्त्री व शाखा अभियंता श्री. शिंदे यांच्यासाठी आपण स्वीकारली असल्याचा जबाब गवळी यांनी देणे, यामुळे नाशिक जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा अधिकाऱ्यांबाबत जनतेत निर्माण झालेले संशयाचे वातावरण, यामुळे येथील ग्रामीण जनतेचा शासकीय अधिकाऱ्यांवरील विश्वास उडणे, त्यामुळे सदर वरिष्ठ अधिकाऱ्यांना निलंबित करून त्यांचीही चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.'' | | |
| १५७ | "राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षण टिकविण्यासाठी ओबीसी समाजाचा इम्पिरिकल डेटा गोळा करण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगास समर्पित आयोग म्हणून घोषित करण्यात येणे, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षण टिकवण्यासाठी इम्पिरिकल डेटा गोळा करण्याची जबाबदारी असलेल्या राज्य मागासवर्ग आयोगाने दिनांक २८ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास मुख्य सचिवांना पत्र लिहून डेटा गोळा करण्यासाठी निधी व कर्मचारी वर्ग पुरविण्याची विनंती केलेली असणे, या मागणीनुसार अद्याप एकही कर्मचारी आयोगाला उपलब्ध करून देण्यात आलेला नसणे, राज्य मागास आयोग आणि इतर मागास व बहुजन कल्याण विभाग यांच्यात एकवाक्यता नसणे, अर्थसंकल्पित ४३० कोटीपैकी निव्वळ ५ कोटी अद्यापपर्यंत आयोगाला उपलब्ध होणे, इम्पिरिकल डाटाअभावी निवडणूक आयोगाकडून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका ओबीसी आरक्षणाशिवाय पार पाडणे, दरम्यानच्या काळात शासनाकडे असलेला डेटा आयोगाकडे देऊन त्याची तपासणी करून अंतरिम अहवाल देण्यास व त्याआधारे आगामी महापालिकांच्या निवडणुका घेण्यास न्यायालयाने मान्यता दिलेली असणे, त्यानुसार आयोगाने अपुऱ्या मनुष्यबळावर व कमी मुदतीत अहोरात्र काम करून अंतरिम अहवाल तयार केलेला असणे, परंतु यापुढील सर्व निवडणूका ओबीसी आरक्षणासह घेण्यासाठी | सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. राम कदम, रवि राणा, अभिमन्यु पवार, किशोर जोरगेवार, अबू आजमी, रईस शेख, ॲड. राहूल कुल,श्री. जयकुमार गोरे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | राज्य मागासवर्ग आयोगाचा अंतिम अहवाल प्राप्त होणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने सांगितलेले असल्याने आयोगाला कर्मचारी व निधी पुरविणे अत्यावश्यक असणे, ओबीसी आरक्षणाचा लाभ सर्वच क्षेत्रातील नागरिकांना होणारा असल्यामुळे मागासवर्ग आयोगाचे अंतिम अहवालाचे काम जलद गतीने होण्यासाठी त्यांना तातडीने कर्मचारी वर्ग व निधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनाची भूमिका व करावयाची तातडीची उपाययोजना." | | |
| १५८ | "भंडारा जिल्ह्यातील मनरो लालबहादुर शास्त्री हायस्कुल (ता. जि. भंडारा) येथील जिल्हा परिषदेच्या ताब्यातील भुखंड खाजगीकरणाच्या माध्यमातुन बांधा वापरा व हस्तांतर करा या तत्त्वावर विकसित करण्यासाठी शासन निर्णय ग्राम विकास विभाग निर्णय क्र. संकुल -२०२१/प्र. क्र. ३४/बांधकाम-४ दि. १० मार्च २०२१ रोजी शासन आदेश निर्गमित करणे, परंतु सदर मनरो लाल बहादुर शास्त्री हायस्कुल परिसरात गेल्या १५ वर्षापासुन अतिक्रमणधारक फुटपात मुख्य रस्त्यांच्याकडेला शाळेजवळील भागात छोटे-मोठे व्यवसाय उदर निर्वाह करीता बहुतांश स्थानिक नागरिक करत असत. या बांधकामामुळे स्थानिक नागरीकांच्या ३०० कुटुंबावर उपासमारीची पाळी येणे, त्यांची दुकाने अतिक्रमीत जागेवरून हटविण्याचा प्रयत्न सुरू असणे, त्यामुळे या बांधकामाला प्रचंड विरोध होणे, गेली १५ वर्षाच्या पुर्वी पासुन अतिक्रमण असल्याने पक्की दुकाने देणांची सतत मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व प्रशासनाला वारंवार लेखी निवेदनाद्वारे मागणी करणे त्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधीद्वारे या गंभीर बाबींची दखल घेत सदर नागरिकांची बांधकाम विकासकाविरुद्ध रोष पाहता सदर शासन परवानगी रद्द करणेसंदर्भात मा. मंत्री, ग्रामविकास विभाग म. रा. मंत्रालय मुंबई यांना लेखी निवेदनाद्वारे दिनांक १० फेब्रुवारी, २०२२ रोजी मागणी करणे. तसेच लाल बहादूर शाळेला ऐतिहासिक वारसा असल्याने या संपुर्ण बाबीची सखोल व सविस्तर चौकशी शासनाने करून स्थानिक विरोध, नागरीकांची मागणी लक्षात घेता तीव्र रोष आणि शासनाप्रती असंतोषाची भावना निर्माण होवू नये यासाठी शासन निर्णय आदेश रद्द करून योग्य तो न्याय स्थानिक नागरिकांना देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. नरेंद्र भोंडेकर, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र.<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| १५९ | "जि.नाशिक, दिंडोरी व पेठ तालुक्यातील विविध योजनांच्या विकासकामांच्या प्रशासकीय मंजुरीच्या फाईली, जिल्हा परिषद बांधकाम विभाग एकचे कार्यकारी अभियंता श्री.सुरेंद्र कंकरेज व तीनच्या कार्यकारी अभियंता श्रीमती शैलजा नलावडे यांनी जास्तीची टक्केवारी न मिळाल्याने अडवून ठेवल्याचा प्रकार नुकताच निदर्शनास येणे, सदर एक व तीन चे कार्यकारी अभियंता कार्यालयात न भेटणे, कार्यालयात न येणे, लोकप्रतिनिधींचे मोबाईल कॉल न घेणे, विकासकामांच्या फाईल प्रशासकीय मान्यता देऊन विकासकामे सुरु करण्यासाठी पुढे न पाठविणे, पंचायत समिती कार्यालयात बसून कामकाज करणे, जे ठेकेदार टक्केवारी देत नाही त्यांच्या फाईल्स हेतूपुर्वक थांबवून ठेवणे, यामुळे त्याचा दिंडोरी व पेठ तालुक्यातील व नाशिक जिल्ह्यातील विकासकामांवर झालेला अनिष्ट परिणाम, यामुळे येथील जनतेस विकासकामांपासून वंचित राहावे लागणे, श्री.सुरेंद्र कंकरेज हे गेली १५ ते २० वर्षांपासून नाशिक येथेच कार्यरत असणे, त्यामुळे त्यांचा येथील दबदबा वाढला असून त्यामुळेच ते जास्तीची टक्केवारी दिल्याशिवाय ठेकेदारांच्या फाईल्स काढत नसल्याचा आरोप संपूर्ण जिल्ह्यातील ठेकेदारांनी करणे, या संदर्भात ठेकेदार व सदस्यांच्या शिष्टमंडळाने मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांची भेट घेऊन त्यांना तक्रार निवेदन देण्यात येणे, मा.उपाध्यक्ष यांनी या संदर्भात सबंधित विभागाच्या अधिकारी यांचे समवेत आयोजित केलेल्या बैठकीत, मा.उपाध्यक्षांनी, कार्यकारी अभियंता यांना अडविलेल्या फाईली त्वरित निकाली काढण्याचे आदेश देण्यात येणे, सबब सदर आदेशाला केराची टोपली दाखविण्यात येणे, परंतु अद्यापही कार्यकारी अभियंता यांनी आदेशाचे पालन न करता उल्लंघन करण्यात येणे, यास्तव कार्यकारी अभियंता श्री.सुरेंद्र कंकरेज व कार्यकारी अभियंता श्रीमती शैलजा नलावडे यांना तात्काळ बडतर्फ करून त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. सुरेश भोळे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १६० | "सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय कामात आर्थिक व्यवहाराशिवाय सामान्य प्रशासन विभागातून फाईल मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधीत विभागाकडे मार्गस्थ होत नसल्याचा गंभीर आरोप अरुण डोंगरे, जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम समितीचे सभापती यांनी नुकताच केल्याचे निदर्शनास येणे, सदरहू सभापतींनी सामान्य प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती चंचल पाटील यांचेवर थेट आरोप करण्यात येणे, शिवाय बढत्या, प्राथमिक शिक्षक समायोजन पदस्थापना यात मोठा आर्थिक घोटाळा केल्याचे आरोप करण्यात येणे, सदरहू सभापती महोदयांनी शिक्षक समायोजन व पदस्थापना देताना झालेल्या आर्थिक घोटाळयाचे अनेक पुरावे असल्याचे वक्तव्य करणे, नुकतेच ७३ शिक्षकांचे समुपदेशन करण्यात येणे, मात्र त्यांना अद्यापपर्यंत शाळेत पदस्थापना देण्यात न येणे, यामुळे सदरहू प्राथमिक शिक्षकांच्या पदस्थापनेत मोठा आर्थिक घोटाळा झाल्याचे निदर्शनास येणे, यामध्ये अधिकाऱ्यांनी आपले आर्थिक हीत जोपासले असणे, राज्य शासनाने शाळा सुरु करण्याचा निर्णय घेणे, मात्र सामान्य प्रशासन विभागाकडून केलेले घोटाळे उघडकीस येऊ नये म्हणून ऑनलाईनचा प्रयोग करण्यात येणे, या घोटाळयातील संबंधीत अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करून त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक विभागा मार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया" | श्री. राम सातपुते, वि.स.स. | कित्ता |
| १६१ | "जव्हार तालुक्यातील पाथर्डी ग्रामपंचायतीच्या हद्दीतील भाटीचा पाडा (जि.पालघर) येथील एका गरोदर महिलेला दिनांक २ फेब्रुवारी, २०२२ रोजी बाळंतपणासाठी जवळील साकूर रुग्णालयात नेण्यासाठी गावांपासून रस्ताच नसल्याने सात-आठ किलोमीटर पायीच डोलीतून पायपीट करावी लागल्याची घटना दिनांक ४ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा दरम्यान निदर्शनास येणे, या घटनेपूर्वीच सहा वर्षीय मुलाला जव्हार येथील रुग्णालयात नेण्यासाठी पैशाअभावी रुग्णवाहिका नाकारण्यांत आल्यामुळे बाईकवरुन रुग्णास घेऊन जाण्याची आलेली पाळी व त्यामुळे राज्यभर उमटलेले तीव्र पडसाद, परिणामी मौ.भाटीचा पाडा (ता. जव्हार) गावांत रस्ताच नसल्याने एका गरोदर महिलेला डोलीतून न्यावे लागणे ही बाब | सर्वश्री. दिपक चव्हाण, अनिल पाटील, राजू कारेमोरे, मनोहर चंद्रिकापूरे, धर्मरावबाबा आत्राम, इंद्रनिल नाईक, चंद्रकांत नवघरे, नितीन पवार, दिलीपराव बनकर, ॲड. माणिकराव कोकाटे, श्रीमती सरोज आहिरे, सर्वश्री. सुनिल भुसारा, दौलत दरोडा, अतुल बेनके, दिलीप मोहिते-पाटील, अशोक पवार, सुनिल शेळके, अण्णा बनसोडे, सुनिल टिंगरे, चेतन तुपे, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री. आशुतोष | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | शासनास भूषणावह नसणे, सबब भाटीचा पाडा व अन्य लगतच्या गावांसाठी शासनाने रस्ता व वाहतुकीच्या अन्य सोईसुविधा निर्माण करण्याची आवश्यकता, त्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | काळे, निलेश लंके, संग्राम जगताप, रोहित पवार, प्रकाश सोळंके, संदिप क्षिरसागर, बाळासाहेब आजबे, बाबासाहेब पाटील, बबनराव शिंदे, यशवंत माने, मकरंद जाधव-पाटील, शेखर निकम, मानसिंग नाईक, श्रीमती सुमन पाटील, श्री. सुनिल प्रभू, डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. | |
| १६२ | "शासनाने जानेवारी, २०१३ मध्ये ग्रामपंचायतींचे विभाजन करण्यासाठी तांडे आणि आदिवासी गावांना १ हजार लोकसंख्येची व मुळ ग्रामपंचायतीपासून दुसऱ्या ग्रामपंचायतीचे अंतर ३ किलोमीटर असावी, अशी अट टाकण्यात आलेली असणे, राज्यात अनेक तांड्यात आदिवासी वाड्यात मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढलेली असणे, अनेक तांडे व वाड्यांना महसुली दर्जा प्राप्त झालेला असणे, परंतू गट ग्रामपंचायत व ग्रामपंचायत स्तरावरील महसुली गावांतील वादांमुळे गावांच्या विकासकामांना अडथळा निर्माण होत असल्याच्या तक्रारी करण्यांत येणे, विकास कामे करण्यास निर्माण होत असलेला अडथळा दूर करण्यासाठी तांडे व आदिवासी वाड्या यांच्या अंतराची मर्यादा कमी करून ती ३ कि.मी ऐवजी १ कि.मी करून लोकसंख्येची अट १ हजार वरुन ७०० एवढी करण्याची तेथील नागरीकांची व लोकप्रतिनिधींची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना." | श्री. इंद्रनिल नाईक, वि.स.स. | कित्ता |
| १६३ | "विभागीय आयुक्त, कोकण विभाग या कार्यालयामार्फत सन २०२२ मध्ये कनिष्ठ सहायक व ग्रामसेवकांच्या पदोन्नतीसाठी विभागीय परीक्षा घेण्यात येणे, या विभागीय परीक्षा जिल्हा परिषदेमधील कनिष्ठ सहायक या पदावरून वरिष्ठ सहायक या पदासाठी तसेच ग्रामसेवक या पदावरून ग्राम विकास अधिकारी या पदासाठी घेण्यात येणे, विभागीय परीक्षा घेण्याचा, प्रश्नपत्रिका काढण्याचा तसेच तपासण्याचा व निकाल लावण्याचा संपूर्ण अधिकार विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना असणे, या विभागीय परीक्षेमध्ये अनियमितता झाली असल्याचे निदर्शनास आले असून विभागीय आयुक्त, कोकण विभाग कार्यालयातील उपायुक्त (आस्थापना) त्यांचे सहकारी आणि त्यांचा खाजगी वाहक यांनी कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार केला असणे, सदर पदाच्या विभागीय परीक्षा पास होण्याकरीता परीक्षार्थी कर्मचाऱ्यांकडून दोन लाखांपासून दहा लाखांपर्यंत पैसे घेतले | सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, जयकुमार रावल, सुधीर मुनगंटीवार, अभिमन्यु पवार, मदन येरावार, नामदेव ससाने, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | असणे, त्याबदल्यात परीक्षा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना परीक्षेच्या दोन ते तीन दिवसापूर्वीच परीक्षेत येणाऱ्या एकूण प्रश्नांपैकी अर्धे प्रश्न देण्यात येणे तसेच पेपर सोडवताना पेपर पत्रिकांमध्ये खाली जागा सोडायला लावून नंतर परीक्षा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना बोलावून त्यांच्याकडून उत्तरे लिहून घेण्यात येणे, या विभागीय परीक्षांमध्ये सहा ते सात कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याची शक्यता असणे, विभागीय परीक्षेतील भ्रष्टाचारासाठी खाजगी ड्रायव्हरच्या मोबाईलचा वापर करण्यात आला असणे, सदर प्रकरणी सायबर सेलमार्फत चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करून कारवाई करण्याची आवश्यकता असणे, सदर परीक्षा राज्यातील ग्रामपंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्याशी संबंधित असल्याने तिचे व्यापक स्वरुप पाहता चौकशी अहवाल येईपर्यंत सदर विभागीय परीक्षेच्या निकालाला स्थगिती देण्याचीही आवश्यकता, शासनाने यासंदर्भात करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| १६४ | "नागपूर, वर्धा येथील कामगारांच्या जीवावर कोट्यवधी रुपये नफा कमावणाऱ्या लॉयड्स उत्तम गलवा कंपनीतील कामगारांची मोठ्या प्रमाणात पिळवणूक व आर्थिक फसवणूक करण्यात येत असल्याचा गंभीर प्रकार नुकताच निदर्शनास येणे, कंपनीत काम करणाऱ्या कामगारांना साधी वेतनसुद्धा अधिकृत वेतन स्लीपवर देण्यात न येणे, वेतन स्लीप आणि पीएफ स्लीप कामगारांना न देणे, विमा उतरविल्याचे सांगण्यात येणे, परंतु प्रत्यक्षात विम्याची रक्कम जमा न करता कामगारांची कंपनीकडून प्रचंड फसवणूक करण्यात येणे, कामगारांसाठी कोणत्याही सुरक्षात्मक उपाययोजना करण्याकडे कंपनी व्यवस्थापनातर्फे करण्यात येत असलेले हेतुपूर्वक दुर्लक्ष, सदरहू कंपनीत धोक्याच्या ठिकाणी कामगारांकडून काम करून घेण्यात येत असणे, दि.१३.२.२०२२ रोजीच्या पहाटे पाचच्या सुमारास कमलेश गजभिये नामक कामगार कन्वेयर बेल्टसमोर काम करताना सुरक्षेची कोणतीही साधने नसल्यामुळे सदर कामगाराचा बेल्टमध्ये अडकून मृत्यू झाल्याची गंभीर घटना घडणे, बेल्ट कापून कमलेशचा मृतदेह बाहेर काढण्यात येणे, या भीषण अपघातामुळे कामगारांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण होणे, कंपनी व्यवस्थापनाने सदरहू मृत्यू प्रकरण पोलीसांशी व कामगार | ॲड. माणिकराव कोकाटे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | अधिकाऱ्यांशी (लेबर ऑफिसर) आर्थिक संगनमत करून सेवाग्राम मध्ये पाठविलेल्या मृतदेहाची उत्तरीय तपासणी करून मृतदेह परस्पर कामगाराच्या गावी पाठविण्यात येऊन सदर प्रकरण दडपून टाकल्याचा घडलेला गंभीर प्रकार, सदरहू कंपनीत यापूर्वी मोठा बॉयलर स्फोट होऊन यामध्ये सुमारे ३४ कामगार जखमी होऊन दोन कामगारांचा मृत्यू होणे, यामुळे सदरहू कंपनीत कामगार सुरक्षित नसल्याने वारंवार अपघात होऊन कामगारांच्या जिवीताला निर्माण झालेला गंभीर धोका, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे कामगारांमध्ये निर्माण झालेले संतापाचे, चिंतेचे व असुरक्षिततेचे वातावरण, शासनाच्या कामगार विभागाकडे यासंदर्भात वारंवार तक्रारी करुनही लेबर ऑफिसरचे सदर कंपनीशी असलेले आर्थिक हितसंबध लक्षात घेता, सदर तक्रारींना केराची टोपली दाखविणे, यास्तव सदर कंपनीवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून कामगार अधिकाऱ्यास तात्काळ निलंबित करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.'' | | |
| १६५ | "राज्यातील घरेलू कामगारांना एप्रिल २०२१ मध्ये जाहीर केलेले प्रत्येकी रु. १५००/- अद्याप मिळाले नसल्याचे बाब माहे फेब्रुवारी २०२२ तिसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आले असणे, अनेक पात्र घरेलू कामगारांनी कोविड अर्थ सहाय्य तात्काळ मिळणे साठी निवेदनाद्वारे शासना कडे मागणी करूनही अध्याप दिली नाही तसेच घरेलू कामगारांना किमान वेतन व पेन्शन देण्याचे देण्याची मागणी शासन कडे प्रलंबित असणे, महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळाची स्थापना होऊन अनेक वर्ष होऊनही हे मंडळ पूर्ण पणे कार्यान्वित झाले नसणे, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही." | सर्वश्री. विनोद निकोले, हितेंद्र ठाकूर, क्षितीज ठाकूर, राजेश पाटील, वि.स.स. | कित्ता |
| १६६ | "चिखलदरा (जि.औरंगाबाद) येथे महावितरण कंपनीची सुमारे ३० हजार रोहित्रे वापराविना पडून असल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक २२ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, रोहित्रासाठी अनेक शेतकऱ्यांनी अर्जाद्वारे मागणी करुनही त्यांना अद्याप रोहित्र उपलब्ध न होणे, रोहित्राअभावी हजारो शेतकऱ्यांची पिके जळून जाणे, | श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात झालेले आर्थिक नुकसान, महावितरणच्या गलथान कारभारामुळे विद्युत रोहित्रे गेले दोन वर्षापासून पडून असणे, सदर रोहित्रे खरेदीसाठी लागलेला निधी विचारात घेता, यामध्ये महावितरणाचेही नुकसान झाले असल्याने सदर प्रकरणाची शासनाने गंभीर दखल घेऊन चौकशी करून दोषींविरुद्ध कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावायची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १६७ | "उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यात शेतकऱ्यांनी चार वर्षापूर्वी वीज जोडणीकरिता डिमांड रक्कम भरुनही अदयाप वीज जोडणी झालेली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये निदर्शनास येणे, महावितरण कंपनीकडून वीज जोडणी न झाल्यामुळे वीजेअभावी ज्वारीसह अन्य पिके पाण्याअभावी जागेवरच करपणे, वीज नसल्याने पाण्याचा उपसा होत नसल्याने पिकांना पाणी देता येत नसणे, नुकतेच तालुक्यातील सांगवी (काटी) येथील शेतकरी शिवारात ज्ञानेश्वर मगर यांची गट नंबर ७८० मधील सहा एकरातील ज्वारीचे पीक पाण्याअभावी जागेवरच करपल्याची घडलेली घटना, आधीच बहुतेक शेतकऱ्यांनी विहिर खोदण्याकरिता बँकेचे कर्ज घेतलेले असणे, कर्जफेडणीसाठी बॅकेकडून तगादा लावला जात असणे, असे असतांनाही हातातोंडाशी आलेली पिके पाण्याअभावी करपून जात असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडणे, शेतकऱ्यांकडे शेतीशिवाय उत्पन्नाचे दुसरे कोणतेही साधन नसल्यामुळे आत्मदहन करण्याशिवाय दुसरा पर्याय नसणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने सखोल चौकशी करून तालुक्यातील वीज जोडणी तसेच जबाबदार असणाऱ्या महावितरण कंपनीविरुद्ध तात्काळ कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. कैलास घाडगे पाटील, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १६८ | "महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना आदिवासी विकास विभागाच्या आदिवासी घटक कार्यक्रमाअंतर्गत पाडाळणे (ता.अकोले,जि.अहमदनगर) येथील (शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१९/प्र.क्र.३९/ऊर्जा-५, दि.१९ सप्टेंबर, २०१९) नवीन ३३ के.व्ही उपकेंद्र स्थापन करण्यात दि.१९ सप्टेंबर, २०१९ रोजी मान्यता देण्यात येणे, यासाठी शासनाने निधीची व्यवस्थासुद्धा करणे, परंतु या योजनेसाठी निधी अद्यापही प्रत्यक्षात देण्यांत न येणे, अद्याप विद्युत केंद्र सुरु न केल्यामुळे तेथील नागरिकांना सुमारे ४० कि.मी. अंतरावरील दुसऱ्या विद्युत केंद्रावरुन अतिरिक्त विद्युत कनेक्शन जोडण्याची आलेली पाळी, तथापी त्या विद्युत केंद्रातुन पुरविण्यात येणाऱ्या वीजपुरवठयांमध्ये वारंवार वीज खंडीत होण्याचे प्रकार, त्यामुळे पिण्याचे पाणी व शेतीसाठी पाणी उपलब्ध करण्यास निर्माण झालेल्या अनेक अडचणी, त्यामुळे तेथील नागरिकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, मौ.पाडाळणे व मवेशी येथील नव्याने सुरु करण्यात येणाऱ्या ३३ के.व्ही.उपकेंद्र स्थापन करण्याचा निधी मिळण्याबाबत मा.आदिवासी विकास मंत्री व मा.आदिवासी विकास राज्यमंत्री यांना लेखी पत्राने विनंती करुनही अद्याप काम मार्गी न लागणे, तरी या ३३ के.व्ही. मवेशी व पाडाळणे उपकेंद्रास निधी प्राप्त होणार का आणि किती दिवसाने होणार." | डॉ. किरण लहामटे, वि.स.स. | कित्ता |
| १६९ | "राज्यातील महावितरण अंतर्गत नियुक्त कंत्राटदार एजन्सींनी ग्राहकांच्या वीज मीटरचे चुकीचे रिडींग घेऊन शासकीय महसूलाचे आर्थिक नुकसान केल्याप्रकरणी पुणे औरंगाबाद, नांदेड, अकोला येथील सहा कंत्राटदार एजन्सीविरुद्ध दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२ रोजी बडतर्फीची कारवाई करण्यात येणे, महावितरणने या कंत्राटदार एजन्सींनी केलेल्या मीटर रिडींगची पडताळणी केली असता चुकीचे रिडींग दाखवून महावितरणचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान केल्याचे निदर्शनास येणे, ग्राहकांच्या वीज मीटरचे अचूक रिडींग न घेणाऱ्या कंत्राटदार व एजन्सींना कायमस्वरुपी काळ्या यादीत टाकून त्यांचेवर कठोर कारवाई करण्याचा शासनाने इशारा देऊनही अद्याप त्यांचेवर फौजदारी व काळ्या यादीत टाकणेबाबत कोणतीच कारवाई करण्यात न येणे, तसेच या एजन्सींद्वारे रिडींग केलेल्या सर्व मीटरची फेरतपासणी करण्यासाठी शासनाने विशेष मोहिम राबवून कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावायची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १७० | "परंतु अकोले तालुक्यातील शेती पंपांना ठिकाणी २ तास ४ तास शेतीपंपासाठी वीज पुरवठा होणे त्याही सातत्यपूर्ण विद्युत खंडीत होणे. बऱ्याच ठिकाणी दिवसाआड विद्युत पुरवठा होणे त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात हाल होणे, शेतकऱ्यांचा प्रचंड असंतोश वाझणे, वीज वितरण कार्यालयावर मोर्चे नेणे, जळालेली रिहित्रे १-१ महिना न मिळणे, ही अकोले विधानसभा क्षेत्रातील वीज वितरणातील अवस्था दिसते आहे, तरी ही अवस्था सुधारणार का आणि किती दिवसांमध्ये सुधारणार या परिस्थितीला जबाबदार कोण त्या संबंधितांवर कारवाई होणार काय." | डॉ. किरण लहामटे, वि.स.स. | कित्ता |
| १७१ | "महाराष्ट्र राज्याच्या उर्जा विभागाअंतर्गत शासनाच्या मालकिच्या महानिर्मिती कंपनीमध्ये सन २०१४-२०१९ ह्या कालावधीतील सर्व स्थापत्य बांधकामे, सुरक्षा व संचालन विभागातील कार्यकारी पर्यवेक्षीय ते नियंत्रण करणाऱ्या अधिकाऱ्यांनी मे. B.G.R. Energy System या कंपनीस मंत्रालयीन स्तरावरील अधिकारी, शासकीय कंपनीचे व तत्कालीन शासनाने संगनमताने केलेल्या ५७७० कोटी रुपये भ्रष्टाचार केल्याचे निदर्शनास येणे, त्याप्रकरणी चौकशी करून शासनाच्या सुधारीत दरानुसार बुडविलेल्या स्वामित्व धनाच्या रक्कमेची वसुली करून भष्ट्राचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हे दाखल करणे, चंद्रपूर औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या निर्मितीमध्ये सन २०१४-१०१९ ह्या कालावधीत सुमारे ३५०० कोटी रुपयांचे नुकसान होणे, प्रकल्प उभारणीच्या काळात सिव्हील कामाच्या ड्रॉईंगनुसार रॉयल्टी क्लेअरंसमध्ये १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त महसूल बुडविण्यात येणे, मे. B.G.R. Energy System या कंपनीने उभारणीच्या कामात तत्कालीन सिव्हीलचे मुख्य अभियंता व संचालक, संचलन व इतर यंत्रणांनी कंत्राटदार कंपनीच्या लोकांच्या हिताची जोपासना करून सुमारे ५०० कोटी रुपयांची कामे वाढवून दाखविल्याचे C.V.C. किंवा गुणनियंत्रण यंत्रणेमार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी तसेच शासनाच्या महावितरण व महापारेषण या दोन्ही कंपन्यांमध्ये नेमण्यात आलेल्या संचालक, संचलन/मान संसाधन प्रकल्प तसेच शासनाच्या महानिर्मिती कंपनीमध्ये नेमण्यात येणे, याबाबत जनतेमध्ये व विविध संघटनांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व तीव्र प्रतिक्रिया, तसेच विविध कामगार संघटनांनी केलेली निदर्शने तसेच संचालक संचलन, महावितरण यापुर्वीच्या पदावरील बाबी न्यायप्रविष्ट असताना त्यांच्या पुर्वनियुक्त्या करणे, महापारेषण कंपनीमध्ये (MSTCL-SP/T-0802/0231 थर्मल विजन कॅमेरा इ. सारख्या निविदा प्रक्रीयेमध्ये विसंगती असलेल्या कंपन्यांना काम देणे, खापखेडा, चंद्रपूर व इतरही | श्री. अनिल पाटील, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | महाऔष्णिक केंद्रामध्ये वारंवार आगी लागणे त्यासाठी संचालक संचलन जबाबदार असणे, सदर संचालक Chief Fire Officer यांचे न ऐकता स्वतःच्या अधिकारात मनमानी करणे तसेच कार्यकारी संचालक पारेशन असताना गंभीर स्वरूपाच्या तक्रारी असताना ठराविक संघटनांच्या फायद्यासाठी त्यांचीच नेमणूक करणे, व मुख्य अभियंता औष्णिक प्रकल्प खापखेडा, चंद्रपूर, कोरोडी, भुसावळ, पारस, परळी, नाशिक इत्यादी प्रकल्पांमध्ये केलेल्या गैरप्रकारास कंपन्यांचे संचालक तसेच शासनाचे अधिकारी संगनमताने पाठीशी घालत असणे, इत्यादी बाबतीत शासनाचे होणारे दुर्लक्ष, त्यावर करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया" | | |
| १७२ | "माळशिरस तालुक्यात (जि.सोलापूर) महावितरण कंपनीच्या पोलला सिमेंट कॉंक्रीट नसल्याने पोल पडणे, तारा तुटणे, तुटलेल्या तारांचे फ्युज न जाता तारा तशाच वीजभारीत राहिल्याने धाको होणे, फ्युज ऐवजी अल्युमिनियम तारांचे पंथे वापरणे, ट्रन्सफॉर्मर सेंटरला न्यूट्रलला आर्थिंग नसणे, इ. दोष सर्रास सर्वत्र दिसून येणे, सदर सदोष वीजरचना करणारे महावितरणचे अधिकारी, विद्युत ठेकेदार व विद्युत निरिक्षक यांचेवर शासनाने अद्याप कोणतीच कारवाई केलेली नसणे, राज्यात समान पद्धतीने वीजरचना/उभारणी व्हावी यासाठी बांधकाम पद्धती व नकाशे शासनाने निश्चित केलेले नसणे, सोलापूर जिल्ह्याच्या विद्युत निरिक्षकाकडे सोलापूर व कोल्हापूर असे दोन जिल्हे, दोन विद्युत निरिक्षक व एक सहाय्यक विद्युत निरिक्षक असे एकूण तीन चार्ज देण्यात येणे, सदर विद्युत निरिक्षक हे प्रत्यक्ष घटनास्थळी भेटी देतात की नाही याचा अहवाल शासनाने सादर करणे गरजेचे असणे, त्याचबरोबर महावितरणच्या ३३/११ के.व्ही. उपकेंद्राची वार्षिक तपासणी विद्युत निरिक्षक यांचेकडून होते काय असा प्रश्न निर्माण होणे, महाराष्ट्र राज्य हे प्रगत राज्य असल्याने महावितरण हे टेस्टिंग शाखा, दक्षता शाखा, गुणनियंत्रण शाखा व कार्यालयाचे विस्तृत जाळे असल्याने व विद्युत निरिक्षकांचे निरिक्षण घटनास्थळी जाऊन होत नसणे, राज्य शासनाने पुर्वीप्रमाणे नोटिफाईड व्होल्टेज ३३ के.व्ही. जाहिर करून २६.५.२०१५ च्या शासन निर्णयाप्रमाणे स्वयंप्रमाणितता व व्यवसाय सुलभता यांची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, तसेच गेल्या तीन वर्षांत २०० हेक्टरच्या वरती ऊस व डाळींबाच्या पिक जळीत होऊन शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले असतानाही शासनाकडून अद्यापपर्यंत शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची आर्थिक | श्री. राम सातपुते, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | मदत दिलेली नसणे, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासन उदसिन असल्याचे दिसून येणे, यामुळे शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रती चिडेची भावना निर्माण झालेली असणे, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| १७३ | "सौ. अनिता विलास सिंग राहणार एन-९,एच- ६१/४ श्रीकृष्ण नगर हडको एन-९ सिडको कॉलनी औरंगाबाद या दिनांक १५ /७ /२०१८ रोजी दुपारच्या सुमारास घराच्या गच्चीवर कपडे वाळत घालण्यासाठी गेले असता घरावरून गेलेल्या हाय टेंशन विद्युत तारांचा स्पर्श लागून त्यांना शॉक लागणे, शॉक लागल्यानंतर त्यांनी औरंगाबाद चांगल्या दर्जाच्या रुग्णालयामध्ये उपचार घेणे, परंतु तरीसुद्धा त्यांच्या दोन्ही हात तोडावे लागल्याने त्यांना आलेले कायमचे अपंगत्व, घरावरून जाणाऱ्या विद्यूत तारांमुळे जीवित हानी होऊ नये यासाठी सदर विद्युत तारा काढण्याची वेळोवेळी मागणी करूनही औरंगाबाद विद्युत विभागाने सदर विद्युत तारा हटविल्या नसल्याने झालेल्या अपघातास ऊर्जा विभाग जबाबदार असणे, विद्युत शॉक लागल्यानंतर सौ अनिता ठेंग यांच्यावर उपचारासाठी लाखो रुपयांचा खर्च येणे, हा खर्च त्यांच्या नातेवाईकांनी कर्ज काढून केल्याने ते कर्जबाजारी होणे, त्यातच सौ ठेंग यांना आलेल्या कायमस्वरूपी अपंगत्वामुळे त्यांच्या उदरनिर्वाहाचा निर्माण झालेला प्रश्न, एव्हढी गंभीर घटना होऊनही वीज वितरण कंपनीने त्यांना कोणतीही आर्थिक मदत न देणे, विज वितरण कंपनीच्या हलगर्जीपणामुळे सौ अनिता ठेंग यांना कायमचे अपंगत्व आल्याने त्यांना दोन्ही कृत्रिम हात बसविण्यासाठी ग्लोबल हॉस्पिटल मुंबई यांनी जवळपास ३५ लाखाचा खर्च सांगणे, ठेंग कुटुंबीयांची आर्थिक स्थिती हलाखीची असल्याने सदर खर्च ते करू न शकणे, यामुळे विज वितरण कंपनीने अतितातडीने त्यांच्या उपचारासाठी आलेला तसेच कृत्रिम हात बसविण्यासाठी येणारा खर्च विनाविलंब देऊन त्यांना कायमस्वरूपी अपंगत्व आल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी घेऊन त्यांना झालेल्या मानसिक, शारिरीक त्रासाबद्दल नुकसान भरपाई देण्याची झालेली मागणी, याकडे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे त्यांच्या जीवन मरणाचा निर्माण झालेला ज्वलंत प्रश्न, यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १७४ | "टोरंट कंपनीच्या दहशतीखाली भिवंडीतील सर्वसामान्य जनता असतानाच याच वादग्रस्त कंपनीला शासनाकडून दिवा, मुंब्रा, कळवा हा भाग आंदण म्हणून देण्याचा सुरु असलेला प्रयत्न दिनांक ७ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास उघडकीस येणे, भिवंडी मध्ये मिटरसाठी जादा शुल्क आकारणे, वीज चोरीचे खोटे गुन्हे दाखल करणे, विना पावती आर्थिक व्यवहार करणे व दिशाभूल करून शासनाचा पैसा राजरोसपणे लूटत असणे, टोरंट कंपनीकडून सेक्यूर मेक कंपनीचे २०-३० टक्के जादा जलदगतीने चालणारे मिटर लावून ग्राहकांची लुबाडणूक करण्यात येणे, आधीच राज्यात आर्थिक मंदीचे सावट असताना टोरंट कंपनीच्या एकाधिकारशाहीमुळे भिवंडी तालुक्यातील उद्योगधंदे व पावरलूम बंद पडलेले असणे, तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींनी ग्रामसभेमध्ये टोरंट हटाव असे ठराव करून शासनास दिलेले असणे, परंतु पोलीस प्रशासनाला हाताशी धरुन तक्रार करणाऱ्या ग्राहकांवर खोटे गुन्हे दाखल करणे, कंपनी प्रशासनाकडून ग्राहकांना दहशतीखाली ठेऊन लुबाडण्याचे सुरु असलेले सर्रास प्रकार, टोरंट कंपनीचा अरेरावीपणा तसेच दहशत दाखवून सर्वसामान्यांची सुरु असलेली पिळवणूक, या कंपनीला महाराष्ट्रातून हद्दपार करण्याची आवश्यकता असताना शासनाकडून टोरंट कंपनीसाठी पायघडया घालून दिवा, मुंब्रा, कळवा, शिळ असा भाग देण्याची प्रक्रिया सुरु असणे, कामाचा आदेश दिला नसताना व अंदाजपत्रक मंजूर नसतानाही दोस्ती कंम्पाऊंड मधील डीपी रोड, मुंब्रा रेती बंदर रस्त्यावर आर.एस.जे. ६-६ चे पोल टोरंटकंपनीने उभे केलेले असून परवानगी नसतानाही एरिया विकत घेतलेला असणे, तक्रार केल्यास तुम्हाला पोलीसांकडून तुरुंगात डांबू अशी अरेरावीची भाषा करून कळवा व दोस्ती परिसरात नागरिकांवर खोटे गुन्हे दाखल केलेले असणे, महागाई कमी न होता सर्वसामान्यांवर अधिक भार पडण्याची शक्यता, ग्राहकांना युनिटचा दर सध्यापेक्षा वाढविलेला असणे, अन्यायग्रस्त टोरंट कंपनीचे भिवंडी मधीलच कंत्राट रद्द करण्याची आवश्यकता असताना, शासकीय इमारती विना मोबदला कोणत्याही कंपनीस देणे ही सरकारी मालमत्तेची लूट असताना, महावितरणची कार्यालये विना मोबदला टोरंट कंपनीला वापरण्यास देण्यात येणे, भिवंडी प्रमाणे आपल्यावर अन्याय होऊ नये म्हणून स्थानिक जनतेने सर्वपक्षीय मोर्चाकाढून टोरंट कंपनीचा केलेला निषेध पाहाता, शासनाने जनतेचे हित जपण्यासाठी दिवा, कळवा, मुंब्रा हा भाग टोरंट कंपनीला न देता, शासनाने सर्वसामान्य ग्राहकांचे हीत जपण्यासाठी वादग्रस्त असलेल्या या कंपनीला महाराष्ट्रातूनच हद्दपार करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. प्रमोद पाटील, वि.स.स | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १७५ | "महाराष्ट्र राज्याच्या उर्जा विभागाअंतर्गत शासनाच्या मालकिच्या महानिर्मिती कंपनीमध्ये सन २०१४-२०१९ ह्या कालावधीतील सर्व स्थापत्य बांधकामे, सुरक्षा व संचालन विभागातील कार्यकारी, पर्यवेक्षीय ते नियंत्रण करणाऱ्या अधिकाऱ्यांनी मे. B.G.R. Energy System या कंपनीस मंत्रालयीन स्तरावरील अधिकारी, शासकीय कंपनीचे व तत्कालीन शासनाने संगनमताने केलेल्या ५७७० कोटी रुपये भ्रष्टाचार केल्याचे निदर्शनास येणे, त्याप्रकरणी चौकशी करून शासनाच्या सुधारीत दरानूसार बुडविलेल्या स्वामित्व धनाच्या रक्कमेची वसुली करून भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हे दाखल करणे, चंद्रपूर, औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या निर्मितीमध्ये सन २०१४-२०१९ ह्या कालावधीत सुमारे ३५०० कोटी रुपयाचे नुकसान होणे, प्रकल्प उभारणीच्या काळात सिव्हील कामाच्या ड्रॉईंगनुसार रॉयल्टी क्लेअरंसमध्ये १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त महसुल बुडविण्यात येणे, मे. B.G.R. Energy System या कंपनीने उभारणीच्या कामात तत्कालीन सिव्हिलचे मुख्य अभियंता व संचालक, संचलन व इतर यंत्रणांनी कंत्राटदार कंपनीच्या लोकांच्या हितांची जोपासना करून सुमारे ५०० कोटी रुपयांची कामे वाढवून दाखविल्याचे C.V.C किंवा गुणनियंत्रण यंत्रणेमार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी तसेच शासनाच्या महावितरण व महापारेषण या दोन्ही कंपन्यांमध्ये नेमण्यात आलेल्या संचालक, संचलन/ मानव संसाधन प्रकल्प तसेच शासनाच्या महानिर्मिती कंपनीमध्ये नेमण्यात येणे, याबाबत जनतेमध्ये व विविध संघटनांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व तीव्र प्रतिक्रिया, तसेच विविध कामगार संघटनांनी केलेली निदर्शने तसेच संचालक संचलन, महावितरण यापुर्वीच्या पदावरील बाबी न्यायप्रविष्ठ असतांना त्यांच्या पुर्वनियुक्त्या करणे, महापारेषण कंपनीमध्ये (MSTCL-SP/T-०८०२/०२३१ थर्मल विजन कॅमेरा इ. सारख्या निविदा प्रक्रियेमध्ये विसंगती असलेल्या कंपन्यांना काम देणे, खापखेडा, चंद्रपूर व इतरही महाऔष्णिक केंद्रामध्ये वारंवार आगी लागणे त्यासाठी संचालक संचलन जबाबदार असणे, सदर संचालक Chief Fire Officer यांचे न ऐकता स्वतःच्या अधिकारात मनमानी करणे तसेच कार्यकारी संचालक पारेशन असतांना गंभीर स्वरुपाच्या तक्रारी | श्री. अनिल पाटील, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र.<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | असतांना ठराविक संघटनांच्या फायद्यासाठी त्यांचीच पुन्हा महा पारेशनच्या संचालक मानव संसाधन पदावर नेमणूक करणे, व मुख्य अभियंता औष्णिक प्रकल्प खापखेडा, चंद्रपूर, कोरोडी, भुसावळ, पारस, परळी, नाशिक इत्यादी प्रकल्पांमध्ये केलेल्या गैरप्रकारास कंपन्यांचे संचालक तसेच शासनाचे अधिकारी संगनमताने पाठीशी घालत असणे, इत्यादी बाबतीत शासनाचे होणारे दुर्लक्ष, त्यावर करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| १७६ | "राज्यातील चारही वीज कंपन्यांत सुरु करण्यांत येत असलेले खाजगीकरण धोरण, तसेच महावितरणच्या १६ शहरांच्या खाजगीकरणाबाबत असलेला संभ्रम, त्याचप्रमाणे केंद्र सरकारच्या विद्युत (संशोधन) प्रस्तावित वीज बील २०२१ या सरकारच्या धोरणाबाबत कामगारांच्या प्रमुख्य संघटनांच्या संघर्ष समितीकडून घेण्यात आलेला तीव्र आक्षेप, तसेच महानिर्मिती कंपनीद्वारा गेल्या ३० वर्षापासून संचालित असलेल्या जलविद्युत केंद्र खाजगी उद्योगांना देण्याचे धोरण रद्द करण्याची होत असलेली मागणी, वीज कंपन्यातील प्रस्तावित बदली धोरण रद्द्द करणे आणि दोन्ही कंपन्यांतील रिक्त पदे भरणे व सुत्रधारी कंपनीचा वाढता हस्तक्षेप बंद करणे, त्याच प्रमाणे चारही वीज कंपन्यांतील कंत्राटी कामगारांचे शोषण थांबवून त्यांना ६० वर्षापर्यंत कंत्राटदार विरहीत नोकरीत संरक्षण, नोकरीची सुरक्षितता, तीनही कंपनीच्या सरळसेवाभर्तीमध्ये पात्र कर्मचाNयांना १० टक्के आरक्षण तसेच मेडीक्लेम सुविधा सुरु करणे तसेच वीज कर्मचाNयांना राज्य शासनाप्रमाणे पेन्शन योजना सुरु करणे इत्यादी मागण्यांसाठी कामगारांच्या प्रमुख्य संघटनांच्या संघर्ष समितीने दि.०९/०२/२०२२ रोजी मा.उर्जामंत्री यांच्यासह चारही वीज कंपन्यांच्या अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकांना आंदोलन करण्याचा दिलेला इशारा, तथापी याबाबत कोणतीच निर्णयात्मक कार्यवाही करण्यात आली नसल्याने दि.०९/०३/२०२२ रोजीपासून आझाद मैदानावर धरणे आंदोनल सुरु करण्यात येणे, तसेच २८ व २९ मार्च, २०२२ रोजी दोन दिवसांचा संप पुकारण्यात येणे, शासनाने याप्रकरणी लक्ष घालून कामगारांच्या प्रमुख्य संघटनांच्या संघर्ष समितीच्या मागण्यांबाबत तात्काळ निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | डॉ. राहूल पाटील, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १७७ | "पुणे-नाशिक महामार्गावर संगमनेर तालुक्यातील चंदनपुरी घाटात धावत्या टेम्पेला आग लागून पुणे बोर्डाच्या बारावीच्या प्रश्नपत्रिका जळून खाक झाल्याची घटना माहे फेब्रुवारी, २०२२ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास येणे, मध्यप्रदेशातील भोपाळ येथून या प्रश्नपत्रिका मुद्रीत करून घेऊन येणे, पेपरफुटी टाळण्यासाठी आणि गोपनियता भंग होऊ नये म्हणून प्रश्नपत्रिका मुद्रीताचे काम महाराष्ट्राऐवजी परराज्यात देण्यात येणे, सदर प्रश्नपत्रिका बाहेरच्या राज्यात दिल्यामुळे मुद्रीतांचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या प्रती अविश्वास व्यक्त झाल्यामुळे त्यांच्यात तसेच परिक्षेचे वेळापत्रक बदलण्यात आल्याने परिक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, प्रश्नपत्रिका जळून खाक झाल्याने परिक्षेची तारीख बदलण्यात येणे, प्रश्नपत्रिका मुद्रीतांचे काम बाहेरील राज्यातील कंपनीला न देता राज्यातील शासकीय मुद्रणालयात पेपरफुटी व गोपनियतेचा भंग न करण्याच्या अटीवर देण्याबाबत आणि या पेपर जळीतकांडातील दोषींवर त्वरीत कारवाई करण्याची जनतेकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. संतोष दानवे, श्रीमती यामिनी जाधव, वि.स.स. | कित्ता |
| १७८ | ''नाशिक महापालिकेच्या तसेच खासगी शाळांतील विद्यार्थ्यांना निकृष्ट आहार पुरवल्या प्रकरणी दोन वर्षापूर्वी सेंट्रल किचन योजनेच्या १३ ठेकेदारांना निकृष्ट आहार पुरवठा केल्याप्रकरणी अपात्र करणे, आता यापैकी एका ठेकेदाराच्या हिरावाडीतील ठाकरेमळा परिसरातील स्वामी विवेकानंद बचत गटाच्या गोदाम तपासणीत शेजारील बंगल्यात शासनामार्फत पुरविण्यात आलेली तांदळाची २८१ (१५ हजार किलो) पोती सापडून यामध्ये कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला असणे, सदरहू तांदुळ साठ्याचा वापर केला असता तर एका दिवसात सुमारे १ लाख १२ हजार विद्यार्थ्यांची खिचडीद्वारे भुक भागण्याची शक्यता असणे, स्वामी विवेकानंद बचतगटाने शासनाचा तांदुळसाठा संपवून उलट आपणच आपल्याकडील १० हजार किलो तांदुळ स्वतःआणून खिचडी शिजवल्याचा दावा करीत शिक्षण विभागाची फसवणूक करण्यात येणे, विशेष म्हणजे महापालिका आयुक्तांनी याआधी १३ ठेकेदारांचे (५० टक्के बिल) २ कोटी ६९ लाख रुपयांचे स्थगित ठेवलेले | श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | बिल देण्यासाठी शासनातील उच्च पदस्थ व लोकप्रतिनिधींकडून बैठक घेऊन अदा करणेबाबत आयुक्तांवर दबाव टाकून आदेशित करण्यात येणे, सापडलेल्या २८१ पोती प्रकरणी चौकशी करून महापालिकेला सादर केलेल्या अहवालात गोदामात तांदुळ राहिले नसल्याचे नमूद करण्यात येणे, यामुळे शेजारील बंगल्यात ३०० पेक्षा अधिक शासनाचे शिक्के असलेली २८१ पोती कशी आली याचे उत्तर देण्यास हेतुपूर्वक टाळण्यात येणे, यामुळे महापालिक आयुक्तांना सादर झालेला अहवाल हा संबंधीत अधिकारी व ठेकेदार संस्थेला बेकायदा संरक्षण देणारा असल्याने अहवालाबाबत निर्माण झालेले संशयाचे वातावरण, सन २००३ पर्यंत पोषण आहार पुरवठा करणाऱ्या महिला बचत गटाकडून काढून पालिका प्रशासनाने सेंट्रल किचनच्या गोंडस नावाखाली १३ ठेकेदार संस्थांना देण्यात येणे, परिणामी महिला बचत गटावर ओढवलेले बेरोजगारीचे व उपासमारीचे संकट, त्यानंतर १३ ठेकेदार संस्थांनी केलेला गैरप्रकार उघडकीस आल्यानंतर महिला बचत गटांना पुन्हा पोषण आहार पुरविण्याचे काम देण्याचा निर्णय घेऊन यासाठी निविदा काढण्यात येणे, त्यासाठी ४ ते १८ फेब्रुवारी पर्यंत मुदत देण्यात आली असताना अचानक निविदा प्रक्रियेवर स्थगिती घेऊन अपात्र १३ ठेकेदारांपैकी एका ठेकेदार संस्थेला काम दिल्याचा घडलेला आश्चर्यजनक प्रकार, सदरहू प्रकरणात कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार होऊन शासकीय निधीचा झालेला अपव्यय तसेच विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या पोषण आहारावर त्याचा गंभीर परिणाम होणे, दरम्यान हया प्रकरणातील ठेकेदार ऋषिकेश चौधरी यांनी सदर लपवलेला तांदुळ हा शासनाचा असल्याचे स्वतःहून मान्य केले असणे, सदरहू प्रकरणाची शासनाने उच्च स्तरावरुन एसआयटीद्वारे चौकशी करून महापालिकेतील संबंधीत दोषी अधिकारी, ठेकेदार यांचेवर कठोर कारवाई करुन, पोषण आहार वितरणाचे काम गरीब गरजु महिला बचत गटांना देणेबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य जाणीवपूर्वक दुर्लक्ष, परिणामी विद्यार्थी व महिला बचत गटांमध्ये निर्माण झालेले तीव्र संतापाचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.'' | | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १७९ | "चंद्रपूरसह राज्यात खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांची संख्या दिवसेंदिवस वाढत असणे, या खासगी इंग्रजी शाळांवर शासनाचा कोणताही अंकुश नसणे, या स्वतंत्र अर्थसहाय्यीत शाळा असल्याने त्या मनमानी धोरण अवलंबिणे, या शाळा त्यांच्या शाळेतील विद्यार्थ्यांना ३ ते ४ गणवेषाची सक्ती करीत असणे, खाजगी दुकानांतून जास्त दराची वह्या-पुस्तके व गणवेष खरेदी करायला लावीत असणे, इतर शालेय वस्तूही विशिष्ट दुकानांतून खरेदी करावी, अशी सक्ती करीत असणे, या शाळांमधून दर दोन ते तीन वर्षात विद्यार्थ्यांचा गणवेश बदलला जाणे, एकंदर विद्यार्थी पालकांची लूट करीत असणे, त्यामुळे शासनाने या शाळांच्या मनमानी पद्धतीवर शासनाने नियंत्रण आणावे, अशी या शाळातील विद्यार्थी पालक यांची आग्रही मागणी असतानाही त्यावर कारवाई करण्यास शासनाकडून होत असलेला विलंब, परिणामी राज्यातील या खाजगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांतील विद्यार्थी-पालक यांच्यामध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया." | श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स. | कित्ता |
| १८० | "राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात १५ टक्के शालेय शुल्क कपातीच्या घेतलेल्या निर्णयास उच्च न्यायालयाने स्थगिती दिली असल्याचे निदर्शनास येणे, तसेच थकीत शुल्क भरू न शकलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करू नये, परीक्षेपासून रोखू नये असे न्यायालयाचे स्पष्ट आदेश असतांनाही अनेक शाळांनी विद्यार्थ्यांना शालेय शुल्क न भरल्यामुळे शाळेत प्रवेश दिला नसल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया गेले असणे, तसेच ज्या सुविधांचा विद्यार्थी वापर करित नाहीत किंवा आवश्यक नाही अशा सुविधांची शुल्क वसुली शाळा प्रशासन करित असणे, त्यामुळे शालेय शुल्क न भरल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारणाऱ्या शाळांवर कडक कारवाई करण्याबाबत तसेच शालेय शुल्कांमध्ये सवलत देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १८१ | "प्राथमिक शिक्षण संचालनालयाने जाहिर केलेल्या यादीद्वारे शासन मान्यता न घेता राज्यात ६७४ शाळा या बेकायदेशीरपणे सुरु असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ च्या दुसऱ्या आवठड्यात उघडकीस येणे, सदर शाळांमध्ये मुंबई महानगरपालिका विभागात सर्वाधिक म्हणजे २२३ शाळा, त्यानंतर ठाण्यात १४९ तर पालघरमध्ये १४३ शाळा मान्यते अभावी सुरु असल्याचे समोर येणे, प्राथमिक शिक्षण संचालनालयाने नोव्हेंबर, २०२० मध्ये जारी केलेल्या परिपत्रकानुसार शालेय शिक्षण विभागाच्या मान्यता प्रमाणपत्राशिवाय शाळा उघडल्यास किंवा शिक्षण विभागाने मान्यता काढून घेतल्यानंतरही शाळा सुरु ठेवल्यास अशा संस्था चालकांविरोधात त्वरित कारवाई करण्याच्या सूचना राज्यातील सर्व नगरपालिका, नगरपरिषद आणि महानगरपालिका शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या असणे, मुंबईत अनेक खासगी प्राथमिक शाळा वर्षांनुवर्षे आरटीई नियमानुसार कोणतीही मान्यता न घेता बिनदिक्कत सुरु असल्याचे निदर्शनास येणे, या बेकायदेशीर शाळांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात येण्याची भीतीही व्यक्त होणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, प्राथमिक शिक्षण संचालनालयाने नोव्हेंबर, २०२० मध्ये जारी केलेल्या परिपत्रकानुषंगाने राज्यातील सुरु असलेल्या ६७४ बेकायदेशीर शाळांविरोधात शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया." | ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री किसन कथोरे, प्रशांत ठाकूर, सुनील राणे, सुनिल प्रभू, रणधीर सावरकर, श्रीनिवास वनगा, संतोष दानवे, मंगेश चव्हाण, अबू आजमी, राहूल कुल, जयकुमार गोरे, रईस शेख, श्रीमती यामिनी जाधव, वि.स.स. | कित्ता |
| १८२ | "नाशिक जिल्हा परिषद येथील तत्कालिन शिक्षणाधिकारी श्री.प्रविण पाटील यांनी नाशिक जिल्ह्यातील काही शैक्षणिक संस्थामधील कर्मचारी यांना शासनाचा आकृतीबंध असतांनाही शिपाई पदाच्या मान्यता व वेतनश्रेणी सन २००८ पासून देण्यात येणे, जवळपास १९ मान्यता या त्यांच्या कार्यकाळात एकाच दिवशी देण्यात आल्या त्यामुळे सदर प्रकरणामुळे शासनाचे आर्थिक नुकसान होणे, त्याचप्रमाणे कनिष्ठ लिपिकाच्या सन २०१० पासून ७ मान्यता देऊन त्याचदिवशी नियमित वेतनश्रेणी लागू करून शासनाचे आर्थिक नुकसान करणे, त्याचप्रमाणे माहे जून, २०१७ च्या शासन निर्णयाप्रमाणे पवित्र पोर्टल लागू झाल्यापासून शिक्षण सेवक यांची नियुक्ती करता येत नाही, असे असतांना | श्री. हिरामण खोसकर, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | सुद्धा तत्कालिन शिक्षणाधिकारी यांनी दिनांक २ जानेवारी, २०१२ ते दिनांक १५ जून, २०१७ रोजी नियुक्त ३० शिक्षण सेवक यांना मान्यता देणे, सदर प्रस्ताव हे शिक्षणाधिकारी कार्यालयात दिनांक ५ मार्च, २०२० रोजी जमा करण्यात येणे व सदर प्रस्तावास दिनांक २० मार्च, २०२० रोजीपासून देशात कडक लॉकडाऊन असतांनाही एकाच दिवशी म्हणजे दिनांक २० मार्च, २०२० रोजी मान्यता देणे व त्याच तारखेला नियमित वेतनश्रेणी मान्यता नस्तीवर अधिक्षक, उप शिक्षणाधिकारी याची स्वाक्षरी नसतांनाही देणे, त्यामुळे सदर मान्यता प्राप्त शिक्षक सेवकांना फरक बिलाच्या माध्यमातून लाखोचा फायदा करून देणे व शासनाचे आर्थिक नुकसान करणे, सर्व मान्यता दिलेल्या कर्मचाऱ्यांना बॅकडेटेड (मागील तारखा टाकून) नियुक्त्या दिल्या असून प्रत्यक्षात कार्यरत नसणे, सुमारे २५ शिपायांना मान्यता आकृतीबंधात शिपाई पद मंजूर नसतांनाही शिपाई पदास रोस्टर न तपासता मान्यता दिल्यामुळे शासनाच्या तिजोरीवर भार पडणे, त्याचबरोबर दिवद येथील अर्धवेळ ग्रंथपाल श्री.पेंढारी यांना नियमबाह्य शिक्षक मान्यता देण्यात येणे, सदर वैयक्तिक मान्यता देतेवेळेस कार्यालयीन टिप्पणी मध्ये उप शिक्षणाधिकारी, कार्यालयीन अधीक्षक यांच्या टिप्पणी घेणे गरजेचे असतांना तसे न करता सदर मान्यता प्रस्ताव हे संबधित लिपिक यांच्या स्वाक्षरीने मंजूर करून शिक्षणाधिकारी यांनी मान्यता देणे, त्याचप्रमाणे अंशतः अनुदानित ते अनुदानित, विना अनुदानित वरुन अनुदानित वर बदली संदर्भातील जवळपास १०० प्रस्तावांना एकाच दिवशी मान्यता देणे, सदर प्रकरणाची व तत्कालिन शिक्षणाधिकारी, संबधित लिपिक यांची खातेनिहाय चौकशी करून कायदेशीर कार्यवाही करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिकिया.'' | | |
| १८३ | "मुंबईतील उपनगरामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतंर्गत अनेक झोपडीधारकांना सशुल्क पुनर्वसन योजनेअंतर्गत परिशिष्ट-२ मध्ये नांव समाविष्ट करण्याबाबत व मोफत घर देण्याबाबतच्या बहुतेक अर्जदारांच्या सुनावणी व निर्णय गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असणे, झोपडपटटी पुनर्वसन योजनेअंतर्गत मौजे वळणाई, ता.बोरिवली, येथील न.भू.क्र. १ (पै) व २ (पै) येथील वळणाई परिवर्तन सहकारी गृहनिर्माण संस्था झोपडीधारकांची पात्रता | श्री. संतोष बांगर, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | शासनाच्या सशुल्क पुनवर्सन योजनेअंतर्गत परिशिष्ट -२ मध्ये नांव समाविष्ट करण्याबाबत तसेच मोफत घर मिळण्याबाबत दिनांक १०/९/२०२० व ९/९/२०२१ रोजी झालेल्या सुनावणीस एक वर्षाचा कालावधी होऊनही अद्यापपर्यंत निर्णय न होणे, उक्त वळणाई परिवर्तन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित मधील झोपडीधारक रहिवासी यांनी वसाहत अधिकारी पी/उत्तर यांच्याकडे दिनांक ११/१०/२०२१ रोजी ११९७ पासूनचे झोपडीत राहत असल्याचे पुरावे देऊनही तसेच वसाहत अधिकारी पी/उत्तर कार्यालयाकडून दिनांक २४/२/२०२१ रोजी झोपडीधारकांचे व इतरांचे सर्वेक्षण व राहते असल्याची पाहणी करून सर्व कागदोपत्री पुरावे सादर करुनही परिशिष्ट -२ मध्ये नाव समाविष्ट करण्यास होत असलेले दुर्लक्ष, तसेच सदरहू झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवित असलेले विकासक सिद्धार्थ इंटरप्रायझेस बिल्डर्स ॲंड डेव्हलपर्स व वळणाई परिवर्तन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित चे अध्यक्ष /सचिव यांनी दिनांक ११ ऑक्टोंबर,२०२१ रोजी वसाहत अधिकारी व मा.सहायक आयुक्त, पी/उत्तर विभाग, महानगरपालिका, यांच्याकडे आपल्या अधिकारात निर्णय घेतल्यास संस्थेची कोणतीही हरकत नसल्याचे दिलेले पत्र, वसाहत अधिकारी यांनी निर्णय दिल्यास सामावून घेण्याची दिलेली मान्यता, झोपडीधारक श्री.भिमराव सावतकर व इतर झोपडीधारकांचे शासनाच्या सशुल्क पुनवर्सन योजनेअंतर्गत परिशिष्ट -२ मध्ये नांव समाविष्ट करण्याबाबत तसेच मोफत घर मिळण्याबाबत सर्व पुरावे व पात्रता असतांना नावे परिशिष्-२ मध्ये समाविष्ट करण्यात होत असलेली टाळाटाळ. त्यामुळे पुन्हा दिनांक २२/१२/२०२१ रोजी वसाहत अधिकारी यांनी रहिवाशांच्या झोपडीच्या समावेशासह नविन टेबल सव्हे प्लॅन तयार करून महानगरपालिकेला सादर करण्याबाबत विकासक व अध्यक्ष/ सचिव वळणाई परिवर्तन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.यांना पत्र दिले असणे, परंतु पुढे कोणतीच कार्यवाही झाली नसल्याने महापालिका स्तरावर अद्यापपर्यत निर्णय न घेणे, परिणामी सदरील झोपडीधारक रहिवाशांमध्ये पसरलेले तीव्र असंतोषाचे वाातवरण, याबाबत शासनाने सखोल चौकशी करून सदरील झोपडीधारक रहिवाशांचा गेली अनेक वर्षे प्रलंबित असलेला प्रश्न सोडविण्यासाठी व त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनाच्या सशुल्क पुनर्वसन योजनेअंतर्गत परिशिष्ट -२ मध्ये झोपडीपट्टीधारांची नावे समाविष्ट करण्याबाबत तसेच मोफत घर मिळण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका." | | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १८४ | "म्हाडाच्या ५६ वसाहतीपैकी अभ्युदयनगर काळाचौकी येथील म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाचे काम गेल्या ६ वर्षापासून रखडलेले असणे, अभ्युदयनगर, काळाचौकी येथील सन १९५६ पासून ३३ एकर जागेवर उभ्या असलेल्या वसाहतीमधील ४८ इमारती जीर्ण होउन त्यांची दुरावस्था झाल्यामुळे म्हाडाकडून २००५ पासून इमारतींच्या पुनर्विकासाची प्रक्रिया सुरु झालेली असणे व सदर पुनर्विकासाचे काम ६ वर्षापासून मे.किस्टोन रियल्टर्स प्रा.लि. (रुस्तमजी समुह) यांना प्रलंबित असणे, मे.किस्टोन रियल्टर्स प्रा.लि.च्या विकासकास पुनर्विकासाचे काम करण्यासाठी १५० कोटी रुपये मुद्रांक शुल्क भरावे लागणार असल्याने ते विकासकाला परवडत नसल्याने विकासकाकडून पुनर्विकासाच्या कामात होणारे अक्षम्य दुर्लक्ष, म्हाडा प्राधिकरणासोबत व गृहनिर्माण मंत्री यांच्या समवेत म्हाडा भवनात पुनर्विकासाच्या कामाबाबत म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या माध्यमातून झालेल्या संयुक्त बैठकीत निविदा काढण्याचा निर्णय झालेला असतांनाही निर्णयाच्या अनुषंगाने अद्याप कोणतीच कार्यवाही न होणे, परिणामी अभ्युदयनगर, काळाचौकीतील जीर्ण व दुरावस्थेत असलेल्या ४८ इमारती केंव्हाही पडून जीवित व वित्त हानी होण्याचा निर्माण झालेला धोका, इमारतीत राहणाऱ्या रहिवाशांच्या मनात शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष, शासनाने तात्काळ अभ्युदयनगर काळाचौकीमधील ४८ इमारतींच्या पुनर्विकासाबाबत निर्णयात्मक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. अजय चौधरी, वि.स.स. | कित्ता |
| १८५ | "पुणे सायबर पोलीसांनी पेपरफुटीचा प्रयत्न हाणून पाडल्यानंतर डिसेंबर, २०२१ मध्ये परिक्षा रद्द करण्यात आल्या त्याचवेळी परिक्षा शुल्क परत करण्याची घोषणा राज्य शासनाने करणे, तसेच सरकारच्या निर्देशानुसार म्हाडाने ऑनलाईन परिक्षा जाहिर केलेल्या घोषणेप्रमाणे परिक्षेत शुल्क अद्याप परत केलेले नसल्याची बाब दि. १३ फेब्रुवारी, २०२२ रोजी समोर येणे, म्हाडाने प्रत्येकी ५०० रुपये परिक्षा शुल्क आकारणे, अडीच लाखांहून अधिक परिक्षार्थी असून त्यातून म्हाडाकडे कोट्यवधी रुपये जमा झालेले असणे, परंतु ऐनवेळी परिक्षा रद्द झाल्याचा त्रास परिक्षार्थींना सहन करावा लागल्यामुळे भरपाई म्हणून परिक्षा शुल्क परत करण्याची घोषणा करण्यात आली आणि घोषणेची अंमलबजावणी | ॲड. आशिष शेलार, सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री किसन कथोरे, प्रशांत ठाकूर, सुनिल प्रभू, रणधीर सावरकर, राम कदम, मंगेश चव्हाण, रईस शेख, राहूल कुल, जयकुमार गोरे, श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र.<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | त्वरीत करण्याचे जाहिर करण्यात येणे, परिक्षा ऑनलाईनवर पार पाडल्या तरी शुल्क परतावा झालेला नसल्यामुळे तो त्वरीत परत करावा तसेच उत्तरतालिके संबंधिचे आक्षेप नोंदविण्यासाठी आकारण्यात येत असलेले २०० रुपये शुलकही रद्द करावी अशी मागणी एमपीएससी समन्वय समितीचे अध्यक्ष राहूल कवठेकर यांनी सचिव, म्हाडा, मा.गृहनिर्माण मंत्री आदींकडे करण्यात येणे, शासनाने परिक्षा शुल्क परत करण्याची घोषणा करून घोषणाची अंमलबाजवणी त्वरीत करण्याचे जाहिर करण्यात आलेले असतानाही अडीच लाख म्हाडा परिक्षार्थी शुल्क परताव्यास शासन जाणीवपूर्वक विलंब करित असणे, सदरहू शुल्क परताव्याची रक्कम विना विलंब संबंधितांना अदा होण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| १८६ | "मुंबईत महारेराने चुकीचे बांधकाम करणाऱ्या विकासकांविरुद्ध ६३३ कोटी रुपयांचे पुनर्प्राप्ती वॉरंट जारी केल्याचे निदर्शनास येणे, तसेच मागील तीन वर्षापासून या आदेशाची अंमलबजावणी झाली नसल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे सदनिका खरेदीदारांमध्ये अविश्वास निर्माण होत असणे, त्यामुळे खरेदीदारांना त्यांची गुंतवणूक परत करण्याबाबत चुकार विकासकांच्या विरोधात कारवाई करण्याची गरज असणे, त्यामुळे त्याची तातडीने अंमलबजावणी होण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया." | श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. | कित्ता |
| १८७ | "गोरेगाव पश्चिम येथील म्हाडाच्या मोतीलाल नगर क्र. १, २ व ३ या वसाहतींचा विकास राज्य शासनामार्फत करण्यात येणार असून तेथील रहिवाशांना याबाबत विश्वासात न घेणे, त्यांच्या संपूर्ण परवानगी शिवाय त्याठिकाणी म्हाडा अधिकाऱ्यांमार्फत जबरदस्तीने सर्व्हे करण्यात येणे, त्याला स्थानिकांनी तीव्र विरोध करणे, म्हाडाने न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करून या वसाहतींचा पुनर्विकास म्हाडाला स्वतः करणे शक्य नसल्याचे सांगणे, विकासकाची नेमणुक करण्याकरिता निविदा प्रक्रिया राबविणे, यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्रीमती विद्या ठाकूर, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १८८ | "पुणे शहरामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अंतर्गत चालू असलेल्या प्रकल्पामध्ये निर्माण झालेल्या अडचणी विषयी बैठक लावणेसाठी स्थानिक लोकप्रतीनिधी यांनी विभागीय आयुक्त, पुणे यांना ९ सप्टेंबर २१ रोजी विभागीय आयुक्त, पुणे यांना पत्र देणे परंतु सदर बैठकीचे आयोजन अद्याप पर्यंत न होणे. पुणे शहरात काशेवाडी, मंगळवार पेठ, लोहिया नगर, ताडीवाला रोड, नाना पेठ इत्यादी ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसनाचे काम चालू असणे. यापैकी बरेच प्रकल्प अर्धवट अवस्थेत असणे. झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प करणाऱ्या विकसकांचे प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांशी असलेल्या हितसंबंधा मुळे प्रत्यक्ष झोपडपट्टीधारकांची विकासकाकडून वेगवेगळ्या प्रकारे अडवणूक करणे व पात्र असणाऱ्या झोपडपट्टीवासीयांना सुद्धा घरापासून वंचित राहावे लागणे प्राधिकरणाच्या कार्यालयामध्ये सदर प्रकल्पावर देखरेख व तांत्रिक तपासणी करण्यासाठी स्वतःचे योग्य ते मनुष्यबळ नसणे. त्यामुळे सदर प्रकल्पाच्या बांधकामाची तांत्रिक दृष्ट्या तपासणी न होणे. लोहियानगर येथील झोपडपट्टी धारकांना बिबवेवाडी येथे तात्पुरती राहायची व्यवस्था केली असतानाही त्या ठिकाणी सदर झोपडपट्टीधारकांना अनेक गैरसोयीचा सामना करावा लागणे व लोहियानगर येथे होत असलेल्या प्रकल्पाचे काम गेल्या दहा वर्षांपासून रखडलेली असते त्यामुळे येथील रहिवाशांना स्वतःचे घर मिळण्यासाठी अनेक वर्षे वाट पाहावी लागणे. नाना पेठेतील प्रकल्प पूर्ण झालेला असून तेथे लाभधारकांना मिळालेल्या घरांमध्ये कोणत्याही सोयीसुविधा नसणे ताडीवाला रोड येथील पानमळा प्रकल्पातील झोपडपट्टी धारकाला विकासक व अधिकाऱ्यांच्या असलेल्या संगनमतामुळे पात्र असूनही अनेक वर्ष हेलपाटे मारायला लावून ही अद्याप पर्यंत त्यांना स्वतःच्या हक्काचे घर न मिळणे या सर्व गोष्टींची शासनाने सखोल चौकशी करण्याची आवश्यकता व गरीब झोपडपट्टीधारकांना न्याय मिळण्यासाठी शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. सुनिल कांबळे, श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १८९ | "ओशिवरा, अंधेरी (पश्चिम), मुंबई येथील सी.टी.एस. नं. २६ पै, ३४पै., ३६ पै., ३७ पै., ३८ पै., ३९ पै., ४० पै., ४२ पै. व ४३ पै. येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत मे. लष्करीया कन्स्ट्रक्शन प्रा.लि. या कंपनीने वाढीव चटईक्षेत्राचा घोटाळा केला असल्याची बाब माहे, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास येणे, मे. लष्करीया कन्स्ट्रक्शन प्रा. लि. या कंपनीने उक्त ठिकाणचे वाढीव चटईक्षेत्र आपल्या सहभागीदाराच्या मे. हौसिंग डेव्हलमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लि. (एच.डी.आय.एल.) या कंपनीच्या बांद्रा येथील पथ्थरनगर को. ऑप. हौसिंग सोसायटीच्या झोपडपट्टी पुनर्वसन वापराकरिता विकलेला असणे, मे. हौसिंग डेव्हलमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लि. (एच.डी.आय.एल.) या कंपनीने या वाढीव चटईक्षेत्राचा वापर आपल्या बांद्रा येथील पथ्थरनगर को. ऑप. हौसिंग सोसायटीच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेकरिता केलेला असणे, वाढीव चटईक्षेत्र एकदा एका ठिकाणी वापरल्यानंतर तो अन्यत्र वापरता येत नसतांना मे. लष्करीया कन्स्ट्रक्शन प्रा.लि. या कंपनीने तोच वाढीव चटईक्षेत्र पुन्हा ओशिवरा येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेकरिता वापरलेला असणे, या सर्व प्रकरामध्ये मे. लष्करीया कन्स्ट्रक्शन प्रा.लि. या कंपनीने अनेक अनियमितता केली असून या सर्व अनियमिततेमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन विभागातील अधिकारी व कर्मचारी गुंतलेले असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण-घेवाण झालेली असणे, मे. लष्करीया कन्स्ट्रक्शन प्रा.लि. या कंपनीने उपरोक्त ठिकाणी बांधलेल्या इमारती या मूळ नकाशाप्रमाणे न बांधता त्यामध्ये अनधिकृत बांधकामे केलेली असणे, या अनधिकृत बांधकामांची महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसोबत आर्थिक व्यवहार करून विविध ना हरकत प्रमाणपत्र मिळविलेली असणे, मूळ नकाशाप्रमाणे बांधकाम न केल्यामुळे स्थानिक नागरिकांना अनेक अडचणीना सामोरे जावे लागत असल्याने त्यांच्यात पसरलेला तीव्र स्वरुपाचा असंतोष व संतापाची भावना, परिणामी मे. लष्करीया कन्स्ट्रक्शन प्रा.लि. या कंपनीने त्यांच्या अन्यत्र सुरु असलेल्या प्रकल्पामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता करु नये याकरिता त्यांच्याकडील सर्व प्रकल्प काढून घेऊन अन्य विकासकाला हे प्रकल्प देण्याबाबत तसेच मे. लष्करीया कन्स्ट्रक्शन प्रा. | श्री. कैलास गोरंट्याल, वि.स.स. | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | लि. या कंपनी व विकासकाने वाढीव चटईक्षेत्रामध्ये केलेल्या अफरातफरीची मा.उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायाधिशामार्फत चौकशी करून नियमानुसार दंड आकारणी करण्याबाबत आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेतील ज्या ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मे. लष्करीया कन्स्ट्रक्शन प्रा. लि. या कंपनी वा विकासकाला केलेल्या मदतीबाबत त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबतची शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| १९० | "राज्यात मुंबईतील रखडलेल्या ३८० झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांना गती देण्यासाठी शासनाने अभय योजना आणली या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी मुंबईतील लोकप्रतिनिधी शासनाकडे करीत असल्याची बाब माहे जानेवारी २०२२ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास येणे, एसआरएचे घर विकताना पुर्वीची १० वर्षाची अट तीन वर्षाची करणे, सन २००० ते २०११ पर्यंत राहणाऱ्या झोपडपट्टीतील रहिवाशांकडून वसूल करण्यात येणारी रक्कम कमी करून शासन निर्णय २०१८ ची अंमलबजावणी करणे, एसआरए योजने अंतर्गत मुंबईच्या आदिवासींना पर्यायी घरे देणे पुर्वी चाळी बांधून पहिल्या मजल्याची घरे विकत घेतली त्या नागरिकांना पर्यायी घरे देणे, आदि मागण्या केलेल्या असणे, या मागण्यांना न्याय देण्याची आवश्यकता असतानही न देणे, त्यामुळे सर्वसामान्य झोपडपट्टी धारकांच्यामध्ये शासना विरोधी नाराजी व्यक्त होत असणे, एसआरएची, जी योजना बंद केली आहे ती सुरु करण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री.मंगलप्रभात लोढा, वि.स.स. | कित्ता |
| १९१ | "पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत शहरी भागात सन २०२२ पर्यंत प्रत्येक कुटुंबांकडे सर्व सुविधांसह पक्के घर असावे या हेतूने योजना राबविण्यात येणे, याकरिता केंद्र व राज्य शासनाकडून घरकुलांकरिता मान्यता मिळालेली असणे, तसेच शहरातील अनेक घरकुलांची कामे पूर्णत्वास गेलेले असतानाही निधीकरिता मंजुरी मिळालेली नसणे, लाभार्थ्यांना केंद्राकडून मिळणारे अनुदान थकलेले असणे, अनुदान मिळत नसल्याने त्यांचे | सर्वश्री. राजेश एकडे, बळवंत वानखडे, अमित झनक, विकास ठाकरे, ॲड. आकाश फुंडकर, सर्वश्री. संजय रायमुलकर, संजय गायकवाड, सुभाष धोटे, मनोहर चंद्रिकापूरे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | बांधकाम अर्धवट अवस्थेत असणे, तसेच अनेक नागरिकांनी घरकुल होणार या आशेने स्वतःचे जुने राहते घर पाडलेले असल्यामुळे त्याच्या निवासाचा प्रश्न निर्माण होणे, राज्य शासनाकडून मिळणारा अनुदानाचा टप्पा मिळालेला असणे, परंतु केंद्राकडून मिळणाऱ्या दीड लाखाच्या अनुदानापैकी केवळ ६० हजार रुपयांचा पहिला हप्ता प्राप्त झालेला असणे, नव्वद हजाराच्या दुसऱ्या हप्त्याची रक्कम अद्यापही अनेक लाभार्थ्यांना न मिळणे, त्यामुळे जनमानसामध्ये या योजनेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होऊन तीव्र नाराजी व्यक्त होणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| १९२ | "मौजे मागाठाणे, बोरिवली पूर्व, मुंबई उपनगर येथील न. भू.क्र. १०७ ई., १४१, १४२, १५५/१ ते १२ या भूखंडावरील (म्हाडा व खाजगी जमिन) शिवशक्ती सह.गृह.संस्था (नि.) मे.ऑबेरॉय स्काय सिटीच्या विकासकाने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेकरिता गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांची परवानगी नसतांनाही तसेच एलओआय न घेता संपादित करणे, तसेच अद्यापही प्रापर्टी कार्डावर विकासकांचे नाव नसतांनाही सदरची योजना राबविण्यात येऊन सभासदांची फसवणूक करणे, परिणामी स्थानिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, त्याचबरोबर या भूखंडाला लागूनच असलेल्या भू.क्र.१०६/ई, १४, १४२, १५५/१ ते २२ या भूखंडावर ऑबेराय स्काय सिटीचे बांधकाम सुरु असून या इमारती बांधकाम सुरु असताना केलेल्या गौण खनिजांचे केलेल्या उत्खननापोटी रॉयल्टी कमी दाखविण्यात आल्याने शासनाचा सुमारे १०० कोटी रुपयांचा महसूल बुडविल्याची बाब माहे डिसेंबर, २०२१ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, यासंदर्भात तक्रार केल्यानंतर संबधित अधिकाऱ्यांनी मशिनरी नसल्याने मोजमाप करणे शक्य नसल्याचे सांगण्यात येणे, सदरील प्लॉटची पाहणी केली असता त्यांची लांबी व रुंदी आणि खोली याप्रमाणे त्यांची रॉयल्टी कमीत कमी ८० ते ८५ कोटी एवढी होणे, तसेच याबाबतची दंडात्मक कारवाई करण्याची आवश्यकता असतांना आर्थिक संगनमत करून विकासकांवर कोणतीच कारवाई न करणे, यामुळे शासनाचा करोडो रुपयांचा महसूल बुडणे, याकरिता शासनाने तातडीने दोन्ही प्रकरणाची चौकशी करून संबधित विकासकांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. | श्री. प्रकाश सुर्वे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १९३ | "मुंबई सांताक्रुझ गोळीबार एसआरए प्रकल्पात २६ हजार झोपडयांचा समावेश असून या प्रकल्पांच्या विकासाची जबाबदारी शिवालिक व्हेंचर्स प्रा.लि. या कंपनीकडे असणे, सन २००६ पासून प्रकल्प सुरुवात होऊन २६ वर्षे उलटूनही प्रकल्प पुर्णतः रखडलेला असणे, शिवालिक व्हेंचर्सकडून त्याठिकाणच्या सुमारे ७८०० झोपडया तोडण्यात आल्या असणे, गेल्या १६ वर्षापासून अनेक झोपडपट्टीवासियांचे भाडे थकीत असून, बहुतांशी झोपडीवासियांना भाडे दिले नसल्यामुळे हजारो कुटुंबियांना रस्त्यावर राहण्याची वेळ येणे, या प्रकल्पातून अद्यापपर्यत २५०० कुटूंबियांना पक्की घरे दिलेली नसणे, ट्रान्झिट कॅम्पमध्ये ८०० कुटुंबांचे स्थलांतर केलेले असले तरी ती घरेही मोडकळीस आली असून राहण्यासाठी योग्य नसणे, शिवालिक व्हेंचर्स या विकासकाने एस.आर.ए.म्हाडा व महानगरपालिकेचे करोडो रुपये थकविले असल्याचे निदर्शनास येणे, महानगरपालिकेने वेळोवेळी विकासकाला नोटीस पाठवूनही सदर थकबाकी भरली न जाणे, म्हाडा व महानगरपालिकेच्या भूखंडावर बनविलेला ट्रान्झिट कॅम्पची अत्यंत दुरावस्था झालेली असणे, यामध्ये राहणे नागरिकांना असहाय्य होत असणे, झोपडपट्टीवासियांचे योग्य पुनर्वसन न करता विकासकाने विक्रीसाठी केलेली ४०० घरे विकून पैसा कमवला असूनही झोपडपट्टीवासियांना घरे बांधून देण्यास असमर्थता दर्शविणे, उक्त प्रकल्प इतके वर्षे रखडल्यामुळे असून स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत राज्यशासनाने सखोल चौकशी करून एसआरएच्या ३ के स्कीमला त्वरीत रद्द करून इतर विकासकामार्फत सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. झीशान सिद्दिकी, अबू आजमी, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १९४ | "जि. ठाणे, उल्हासनगर येथील महापालिकेमध्ये मा. आयुक्त दि.२७.३.२०२१ ते ४.४.२०२१ या कालावधीत रजेवर असताना तात्पुरता पदभार पहात असलेल्या अतिरिक्त आयुक्त करुणा जुईकर आणि तत्कालिन नगररचनाकार अरुण गुरगुळे व कनिष्ठ अभियंता परमेश्वर गुडदे यांनी शहरातील शहाड गावठाण परिसरात २३ मजल्याच्या गृहसंकुलाला वाढीव ३६ मजल्याची परवानगी देऊन वाढीव बांधकामाला परवानगी देणे, इमारतीला पूर्णत्वाचा दाखला देणे अशा एकूण ४ परवानग्या बेकायदेशीररित्या देऊन संबंधित विकासकाबरोबर आर्थिक घोटाळा केल्याचा प्रकार दि.२७.११.२०२१ रोजी उघडकीस येणे, उल्हासनगर शहर हे देशातील सर्वाधिक घनतेचे शहर असून या शहरात ७ मजल्यापेक्षा अधिक उंच इमारतीला परवानगी देता येत नसतानाही सदरहू गृहसंकुलातील प्रकल्पास प्रथम २३ मजले व नंतर पुन्हा वाढवून ३६ मजल्याची परवानगी देऊन धोरणात्मक निर्णय तसेच संबंधित महापालिका अधिनियमांचे उल्लंघन केल्याचा प्रकार घडणे, आधीच उल्हासनगर शहरात बांधलेल्या अनधिकृत इमारती धोकादायक होऊन रहिवाशी कुटुंबे मृत्युमुखी पडल्याच्या घटना घडत असताना अशा प्रकारच्या अनधिकृत बांधकामास संबंधित अतिरिक्त महापालिका आयुक्तांनी परवानगी दिल्याचा घडलेला आश्चर्यजनक प्रकार, सदरहू प्रकरणी लोकप्रतिनिधींनी मा.आयुक्त तसेच शासनाकडे लेखी तक्रार करण्यात येऊनही अद्याप यावर कोणतीच कार्यवाही न करता सदर प्रकरण आर्थिक संगनमताने दडपून टाकण्यात येणे, यामुळे अतिरिक्त आयुक्त करुणा जुईकर, कनिष्ठ अभियंता परमेश्वर गुडदे यांना तात्काळ निलंबित करून त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, तसेच सेवानिवृत्त नगररचनाकार अरुण गुरगुळे यांची चौकशी करून त्यांनी यापूर्वी दिलेल्या परवानग्यांची पुन्हा एकदा त्रयस्थ संस्थेमार्फत चौकशी लावणे तसेच त्यांचे निवृत्ती वेतन रोखणे या सर्व प्रकारांमुळे येथील जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, याबाबत दिलेल्या सर्व परवानग्या रद्द करण्याबाबत शासनाने तातडीने हस्तक्षेप करून करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. राम सातपुते, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १९५ | "कल्याण पश्चिमेकडील कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या नजीक असलेल्या माणिक कॉलनी वसाहतीच्या पुनर्विकासात विकासकाने अनियमितता झाल्याच्या तक्रारीवर मा.सत्र न्यायालयाच्या आदेशानुसार, कल्याणच्या बाजारपेठ पोलीस ठाण्यात केडीएमसीच्या पाच माजी आयुक्तांसह, सहायक संचालक, नगररचनाकार, बिल्डर आणि वास्तूविशारद यांचेसह १८ जणांवर भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ९ आणि १३ नुसार दि.१८ जानेवारी, २०२२ रोजी गुन्हा दाखल केल्याची घटना घडणे, माणिक कॉलनी वसाहतीतील १३७ मूळ रहिवाशी कुटुंबांना मालकी हक्काची घरे मिळावी यासाठी पुनर्विकास प्रकल्प राबविण्यात येणे, परंतु रहिवाशी कुटुंबाबरोबर केलेल्या करारनाम्या ऐवजी बांधकाम नकाशा मंजुर करताना केवळ एकच भाडेकरु राहत असल्याचे दाखवत, जुन्या सर्व १३७ रहिवाशी कुटुंबांचा घरे मिळण्याचा हक्क हिरावून घेऊन त्यांना बेघर करणे, विकासकाने विकास नियंत्रण नियमावलीचे उल्लंघन करून व एफएसआयचा चुकीचा वापर करून २००४ साली बांधकाम परवानगी घेण्यात येणे, पार्किंग, मैदान यासारख्या आवश्यक सुविधा देणे अपेक्षित असताना विकासकाने पार्किंगच्या जागी १६ गाळे काढून या गाळयांची विक्री करण्यात येणे, विकासकाने किती रहिवाशांना ताबा दिला आहे आणि किती क्षेत्रावर बांधकामे केल्याची पडताळणी न करताच त्याला एफएसआय मंजुर केल्याचा रहिवाशांनी आरोप करणे, या संदर्भात रहिवाशी व लोकप्रतिनिधींनी आयुक्त महापालिका व पोलिसांत तक्रार दाखल करणे, तसेच पालिका अधिकारी आणि विकासक यांच्यातील बैठकीचे इतिवृत्तही बनावट असल्याचे उघड होणे, तत्कालीन आयुक्तांनी तक्रारीकडे दुर्लक्ष केल्याने न्यायालयात दावा करण्यात येणे, मा.सत्र न्यायालयाच्या आदेशानुसार संबंधित दोषींविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात येऊनही बाजारपेठ पोलीसांनी आरोपीस अटक करून मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करणेबाबत कोणतीच कारवाई करण्यात न येणे, सदरहू प्रकरण विकासक व दोषी आयुक्तांनी राजकीय बळाचा तसेच बाजारपेठ पोलिसांनी आर्थिक संगनमताने दडपून टाकण्याचा प्रयत्न करण्यात येणे, सदर प्रकरण शासनाच्या निदर्शनास येऊनही अद्याप शासनाने उच्च स्तरावरून कोणाच्याही दबावाला | श्री. सुरेश भोळे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | बळी न पडता, बेघर १३७ रहिवाशी कुटुंबांना न्याय देण्यासाठी कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, माजी आयुक्त गोविंद राठोड, रामनाथ सोनवणे, एस.एस.भिसे, ई.रविंद्रन, गोविंद बोडके, तत्कालीन नगररचनाकार चंद्रप्रकाश सिंग, रवी राव, मारुती राठोड यांना तात्काळ अटक करणे, सध्या महापालिकेत सेवेत असलेले सुरेंद्र टेंगळे, ज्ञानेश्वर अडके, देविदास जाधव, रघुवीर शेळके, संजय भोळे, सुहास गुप्ते, प्रसाद सखदेव यांना तात्काळ सेवेतून बडतर्फ करून त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी बेघर रहिवाशांमध्ये निर्माण झालेले तीव्र संतापाचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.'' | | |
| १९६ | "पुणे महानगरपालिका हद्दीतील वडगाव बुद्रुक येथील सर्व्हे नं.४३,४७,४८,४९ पुनर्वसित गावठाणातील घरांवर नजरचुकीने बीडीपी आरक्षण टाकण्यात आले असणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी आणि रहिवासी संबंधित प्रशासनास सदरचे बीडीपी आरक्षण काढण्याबाबत पत्रव्यवहार, बैठका घेतल्या असणे, सदर रहिवासियांना कागदोपत्री बिडीपी आरक्षण असल्याने मोडकळीस आलेले घरे दुरुस्त करणे अथवा विकसन करणे कामी अडथळा येत असणे, त्यामुळे नागरिक धोका पत्करून आहे त्या अवस्थेत वास्तव्य करीत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व त्यावरील शासनाची प्रतिक्रिया." | श्री. भिमराव तापकीर, वि.स.स. | कित्ता |
| १९७ | ''वसई-विरार महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती एच मध्ये वर्तक चौक ते माणिकपूर नाका दरम्यान डिव्हायडर आणि रस्ता सुस्थितीत असतानाही पालिका प्रशासनाने कागदोपत्री खराब दाखवून या कामासाठी दोन कोटी रुपयांचे कंत्राट मंजूर केल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच उघडकीस येणे, सदरहू अर्धा कि.मी.रस्ता चांगला असणे, तसेच डिव्हायडर देखील मजबुत असणे, याकडे हेतुपूर्वक दुर्लक्ष करून पालिका प्रशासनाने त्याच कामासाठी २ कोटी १ लाख ५२ हजार १६४ रुपयांचे कंत्राट मे.जय भवानी एम्पोप्रोजेक्ट भाईंदर यांना मंजूर करून देण्यात येणे, सदर ठेका मंजूर निविदेपेक्षा २३.१० टक्के जादा दराने मंजूर | श्री. राम सातपुते, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | करणे, सदरहू कंत्राट महापालिकेचे शहर अभियंता श्री.एम.जी.गिरगावकर यांचे स्वाक्षरीने मंजूर करण्यात येणे, एकंदरीतच या गैरप्रकारामुळे महापालिका प्रशासनाने कोट्यवधी रुपयांचा आर्थिक घोटाळा केल्याचा प्रकार उघडकीस येणे, एकूणच गरज नसताना काम काढलेल्या या निविदेसह यापूर्वीच्या अनेक कामांची उच्चस्तरीय चौकशी करण्याची आवश्यकता, कामाचे इस्टिमेट बनविताना, कामाचा कार्यारंभ आदेश देताना, काम पूर्ण झाल्यावर त्याचे बिल अदा करताना अशा प्रत्येक टप्प्यांवर ठेकेदारांकडून अक्षरशः सावकारी पद्धतीने टक्केवारी घेण्याच्या गैरप्रकारामुळे या भागातील ठेकेदार त्रासले असून, त्यांनी व या भागातील विविध पक्षाच्या लोकप्रतिनिधींनी यासंदर्भात स्थानिक आमदारांकडे, आयुक्तांकडे व नगरविकास मंत्र्यांकडे तसेच लाचलूचपत प्रतिबंधक खात्याकडे केलेल्या तक्रारी, यामुळे महापालिकेच्या निधीचा मोठ्या प्रमाणात झालेला व होत असलेला अपव्यय, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, संबधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.'' | | |
| १९८ | "वसई-विरार महानगरपालिका हद्दीत शहरातील घनकचरा आणि सांडपाणी समस्या सोडविण्यासाठी महापालिकेला संपूर्णतः अपयश आल्याने राष्ट्रीय हरित लवादाने वसई-विरार महापालिकेला सव्वाशे कोटी रुपये दंड आकारल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच निदर्शनास येणे, प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी सदरहू शहरात सांडपाणी समस्या आणि घनकचरा व्यवस्थापन करण्यासाठी कृती आराखडा तयार करून कोणतेही नियोजन केले नसल्याने शहरात प्रदूषणाचा स्तर प्रचंड वाढून येथील जनतेस संसर्गजन्य रोगाचा प्रादूर्भाव होऊन त्यांच्या आरोग्यास निर्माण झालेला गंभीर धोका, प्रदूषण समस्येमुळे राष्ट्रीय हरित लवादाने वसई-विरार महापालिकेला मे २०१९ पासून प्रतिदिन साडे दहा लाख रुपये दंड आकारण्याचा निर्णय घेणे, सदर निर्णयानुसार अद्यापपर्यंत दंडाची रक्कम सव्वाशे कोटींवर जाणे, केंद्र सरकारने १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत सन २०२०-२१ आणि सन २०२१-२२ या दोन वर्षात महापालिकेला उपलब्ध करून दिलेल्या एकूण ६४ कोटींपैकी अद्यापपर्यंत | श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र.<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | केवळ दोन कोटी रुपये इतका कमी निधी खर्च केल्याचा उघडकीस आलेला धक्कादायक प्रकार, पालिकेला ६४ कोटींचा निधी मिळूनही उपाययोजना करण्यात अपयशी ठरणे, हा निधी नुसता तिजोरीत पडून आहे की आपल्या मर्जीतील ठेकेदारांची टक्केवारी घेवून बिले काढण्यासाठी वापरला गेला असा वसई-विरार येथील नागरिकांमध्ये निर्माण झालेला संशय, निधी मिळविण्यापूर्वी कामाचे नियोजन करणे आवश्यक असताना पालिकेकडे कसलेच नियोजन नसल्याचे उघड झालेले असणे, घनकचरा व्यवस्थापनाबाबत पालिका पूर्ण अपयशी ठरली असून त्यामुळे स्वच्छ भारत अभियानात पालिकेचा क्रमांकही घसरत असणे, ढिसाळ नियोजन आणि गलथान कारभारामुळे वसई-विरार महापालिका हद्दीत मोठ्या प्रमाणात प्रदूषण वाढून पर्यावरणाचा प्रचंड ऱ्हास होणे, परिणामी शहरातील जनतेचे जीवनमान धोक्यात येणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, या सर्व प्रकाराला जबाबदार असलेल्या घनकचरा विभागाचे उपायुक्त, सहाय्यक आयुक्त यांचेसह त्यासंबधित अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय चौकशी करण्याची व हरित लवादाने आकारलेला दंड सदर अधिकाऱ्यांकडून वसूल करण्याची होत असलेली मागणी, यामुळे येथील जनतेत निर्माण झालेले तीव्र संतापाचे, असंतोषाचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.'' | | |
| १९९ | "नाशिक महानगरपालिकेच्या हद्दीतील आनंदवली शिवारातील, नवशा गणपती येथे सर्व्हे नं.६५ या भूखंडावर खाजगी बांधकाम व्यावसायीकाकडून मोठ्या प्रमाणावर नदी किनारी अनधिकृत बांधकाम सुरु असून यामुळे गोदावरी नदीचे पात्र अरुंद करण्याचा गंभीर प्रकार नुकताच उघडकीस येणे, सन २००८ मध्ये गोदावरी व उपनद्यांना पूर आल्यानंतर पाटबंधारे विभागामार्फत निळी व लाल पूररेषा आखण्यात आली असल्यामुळे नदीकिनारी शेकडो मिळकती बाधित झाल्याने तेथील नागरीक या आपत्तीतून मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत असताना महापालिकेच्या नगररचना विभागाकडून मात्र सर्रास गोदावरी किनारी पूररेषेत अनधिकृतपणे व आर्थिक संगनमत करून विकासकांना बांधकाम परवाने देण्याचा प्रकार सुरु असणे, यामुळे मनपा व पाटबंधारे खात्याने पूररेषा आखून दिलेली असताना नदी | श्री. राम सातपुते, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | किनारी किती बांधकामांना, कोणत्या आधारे परवानग्या देण्यात आलेल्या आहेत याची सविस्तर चौकशी होणे अत्यंत आवश्यक असणे, मोठ्या प्रमाणावर लाच घेऊन बिल्डिंग प्लॅन आणि पीटीसीट मंजूर केलेल्या नाशिक महानगरपालिकेचे अधिकारी राजेंद्र आहेर, संजय अग्रवाल, सी.बी.आहेर व त्यांच्या सहकारी अधिकाऱ्यास जबाबदार धरून त्यासह दोषी विकासकाविरुद्ध तात्काळ चौकशी करून कारवाई करण्याची तसेच सदरहू अनधिकृत बांधकाम तात्काळ थांबविण्यात यावे, खुद्द महापौर सतिश कुलकर्णी यांच्या पाहणीत देखील सकृतदर्शनी अनधिकृत बांधकाम आढळले होते, मात्र संजय अग्रवाल यांच्यावर कोणतीही कारवाई न करता त्यांना कार्यकारी अभियंता म्हणून पदोन्नती मिळाल्यामुळे त्यांना थेट गुणनियंत्रण विभागासारखा महत्वाकाचा विभाग देण्यात येणे, विशेष म्हणजे अग्रवाल यांना काही काळासाठी अन्य विभागात पदोन्नती देऊन ३१ जानेवारी नंतर नगररचना विभागात कार्यकारी अभियंता म्हणून आणण्यासाठी आर्थिक संगनमत करून प्रयत्न करण्यात येणे, नगरविकास विभागातील संबंधीत अधिकाऱ्यांची लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करणे, सदरहू चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधीत अधिकारी, कर्मचारी यांना निलंबीत करणे अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा महापालिकेच्या लोकप्रतिनिधींनी शासन तथा महापालिकेस देण्यात येणे, तसेच नाशिक शहरातील पूर रेषेतील बांधकामाचा गेले अनेक वर्षापासूनचा प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासनाने ठोस निर्णय घेऊन कार्यवाही करण्याची आवश्यकता, तसेच वरील अधिकाऱ्यांच्याबाबतीत आर्थिक संगनमताशिवाय कोणतेही काम न करण्याच्या विकासकांच्या असलेल्या तक्रारी, याकडे झालेले व होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया" | | |
| २०० | "पालघर जिल्ह्यात जिल्हा मुख्य कार्यालय उभारण्याच्या बदल्यात दुग्धविकास विभागाने सिडकोला दिलेल्या सुमारे ४०० एकर जागेतील गवताची तस्करी व विक्री करून लाखो रुपयाचा चारा घोटाळा केल्याचे दि.५.२.२०२२ रोजी निदर्शनास येणे, सिडकोच्या काही अधिकाऱ्यांनी स्थानिक ठेकेदाराबरोबर आर्थिक संगनमत करून केळवे रोड, टोकराळे, रामबाग, डोंगरपाडा आदि भागातील ४०० एकर जमिनीत उगवणाऱ्या गवताची निविदा | श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | प्रक्रिया प्रसिद्ध करण्यापूर्वी ४५० मजूर लावून गवताची कापणी करण्यात येणे, गवत वाहतुकीच्या दिवस-रात्र गाड्या चालूनही २० कि.मी. अंतरावर असलेल्या सिडकोच्या कार्यालयाच्या एकाही अधिकारी कर्मचाऱ्या त्याची भणक सुद्धा न लागल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येणे, यासंदर्भात सिडकोने सापळा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात येऊनही अद्याप सदर प्रकरणी पोलीसांनी दखल घेऊन संबंधित दोषीविरुद्ध अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, संबंधित सिडको अधिकारी आणि ठेकेदार दरवर्षी २० ते २५ लाख रुपयाचे गवत एकतृतीयांश किंमतीमध्ये विक्री करून सिडकोचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान अद्यापपर्यंत करण्यात येत असणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावायची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया." | | |
| २०१ | "मीरा भाईंदर क्षेत्रांमध्ये कचरा व साफसफाईचा ठेका ठेकेदाराला देण्यासंदर्भात निविदा प्रक्रिया दर तीन वर्षांनी राबवण्यात येणे, शासनाकडे लोकप्रतिनिधींनी वारंवार केलेल्या तक्रारीनंतर निविदा प्रक्रिया न राबविता त्याच ठेकेदाराला सन २०१७ पासून सातत्याने राज्य शासनाची कुठलीही परवानगी न घेता गेली पाच वर्षे मुदतवाढ देणे, मीरा-भाईंदर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बिकट असताना कचरा व साफसफाईसाठी वार्षिक निविदा काढण्याची ३ वर्षांचे निविदा प्रक्रिया राबविली जात का नाही असा प्रश्न जनतेकडून विचारला जाणे, या वर्षी कचरा व साफसफाईच्या कामांसाठी निविदा प्रक्रिया राबवित असताना कोविडमुळे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती डबघाईला आलेली असताना देखील काही मोजक्या ठेकेदारांना फायदा होईल या दृष्टीने महानगरपालिकेने तब्बल ८०० कोटी रुपयांची निविदा प्रक्रिया राबविली असणे, ही निविदा प्रक्रिया राबवित असताना अर्थसंकल्पामध्ये कुठल्याही प्रकारची तरतूद नसताना तसेच केंद्र व राज्य शासनाच्या कुठल्याही योजनेमध्ये ८०० कोटी रुपयांचे अनुदान अथवा कर्ज नसताना ही निविदा प्रक्रिया बेकायदेशीरपणे राबवली असल्याचे मत महानगरपालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे असणे, महानगरपालिकेने निवडणुकीच्या तोंडावर सत्ताधारी पक्षाला आर्थिक फायदा होण्यासाठी निविदा प्रक्रियाचा घाट घातलेला असणे, त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या कर रूपाने येणाऱ्या पैशाचा दुरुपयोग होत असल्याचे मत नागरिकांमध्ये बनलेले असणे, चौकशी करून योग्य ती कारवाई करणे गरजेचे असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र.<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| २०२ | "ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये काही वर्षापूर्वी जुन्या व नवीन ठाण्याचे प्रतिबिंब दाखवण्यासाठी घोडबंदर रोड वरील मानपाडा येथे 'जुने ठाणे व नवीन ठाणे' हा प्रकल्प उभारण्यात येणे, लोकमान्य नगर येथील रुणवाल प्लाझा मागील बाजूस चित्रपटसृष्टीला शंभर वर्षे पूर्ण झाल्याबद्दल बॉलीवुड फिल्मची थीम पार्कची निर्मिती करण्यात येणे, परंतु ठेकेदार व महानगरपालिकेच्या काही अधिकाऱ्यांच्या चुकांमुळे या दोन्ही थीम पार्कची दुर्दशा झालेली असणे, या दोन्ही थीम पार्कमध्ये करण्यात आलेले काम अतिशय निकृष्ट दर्जाचे असणे, ठेकेदाराने निविदेतील अटी व शर्तीनुसार या पद्धतीचे व ज्या किमतीचे काम करणे अपेक्षित होते त्यापेक्षा कमी दर्जाचे सुमार काम केलेले असणे, असे असुनसुद्धा काही अधिकाऱ्यांच्या शिफारशीमुळे जुने ठाणे नवीन ठाणे या थीम पार्कमध्ये अंदाजे १६ कोटी रुपये व बॉलीवूड या थीम पार्कमध्ये अंदाजे १३ कोटी रुपयांची बिले ठेकेदाराला अदा केल्याचे बाब उघडकीस येणे, याबाबत सर्व पक्षांच्या लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी तक्रारी करून चौकशीची मागणी केल्यानंतरही अद्यापपर्यंत या प्रकरणी चौकशी अहवाल महानगरपालिकेने जारी केला नसणे. याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. | कित्ता |
| २०३ | "मीरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये शहर विकास विभागाच्या माध्यमातून मोठे मोठे विकास प्रकल्प राबवण्यात येणे, या विकास प्रकल्पातील सुविधा भूखंड, आर.जी. भूखंड, रस्त्याचे भूखंड व इतर आरक्षित भूखंड विकासकाने महानगरपालिकेला हस्तांतरित करण्याची बोगस प्रक्रिया राबविणे, तसेच सदरच्या भूखंडावरील अतिक्रमण न हटवता व कुंपन भिंत न बांधता महानगरपालिकेकडून टी.डी.आर प्रमाणपत्र घेतलेले असणे व जागेवर या विकासकांचे बांधकाम ही चालू असणे, यावरील अतिक्रमण नाटककार व कुंपण भिंत बांधतात महानगरपालिकेकडून खेड्यात प्रमाणपत्र घेणे व या जागेवर या विकासकांचे बांधकाम चालू असणे, मीरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सुविधा भूखंड, आर.जी. भूखंड, रस्त्याचे भूखंड व इतर आरक्षित भूखंड महानगरपालिकेच्या नावे सातबारा करून हस्तांतरित करण्याची प्रक्रिया पूर्ण न करता बहुतांश विकासकांनी ही सर्व भूखंड हडप | श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | केल्याचे अनेक प्रकरणे उजेडात येणे, महत्त्वाचे म्हणजे मीरा-भाईंदर महापालिका क्षेत्रामध्ये खेळायचे मैदाने,रस्ते व इतर आरक्षित जागेचे भूखंड कागदोपत्री महानगरपालिकेच्या ताब्यात असल्याचे दिसून येणे, त्याच्या नियमानुसार टीडीआर विकासकाने अथवा जागा मालकांनी पूर्णतः घेतलेला असणे, परंतु जागेवर मात्र त्याच विकासकाच्या अथवा जागा मालकांच्या ताब्यात हे भूखंड असून त्यांच्या सहमतीने त्या आरक्षित जागेवर झोपड्या अथवा व्यापारी गाळयाची निर्मिती झाल्याचे दिसून येणे, यामध्ये प्रामुख्याने मीरा-भाईंदर मधील वादग्रस्त विकासक ओसवाल बिल्डर, गोयल बिल्डर्स, सेव्हन इलेव्हन कन्स्ट्रक्शन कंपनी, आर.एन.ए. बिल्डर्स. विधी बिल्डकॉन प्रा.लि.,सालासार बिल्डर्स, गुजरात डेव्हलपर्स या विकासकांचा मोठा सहभाग असणे, तर काही ठिकाणी आरक्षित भूखंडावर झोपड्यांचे अतिक्रमण असतानासुद्धा मोकळा भूखंड ताब्यात न घेता विकास विभागाने कागदोपत्री हे भूखंड रिकामी असल्याचे दाखवून महानगरपालिके बरोबर खोटे कागदपत्र तयार करून बोगस ताबा पावती बनविल्याची प्रकरणे सुद्धा असणे, यामध्ये सुद्धा ओसवाल बिल्डर, गोयल बिल्डर्स, सेव्हन इलेव्हन कन्स्ट्रक्शन कंपनी, आर.एन.ए. बिल्डर्स. विधी बिल्डकॉन प्रा.लि.,सालासार बिल्डर्स, गुजरात डेव्हलपर्स या विकासकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असणे, मुंबईच्या वेशीवर मीरा-भाईंदर शहर असल्याने शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात विकास कामे चालू असणे, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रांमध्ये तिन्ही बाजूंनी खाडी किनारा असल्याकारणाने बहुतांश ठिकाणी खारफुटी असल्याने याच परिसरात विकसित करावयाचे भूखंड व आरक्षित भूखंड असल्याकारणाने अनेक विकासकांनी सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करून नकाशे मंजूर करून बांधकामासाठी परवानगी घेतले असणे, परंतु शासनाच्या धोरणानुसार आरक्षित भूखंड, सुविधा भूखंड व आर.जी.भूखंड महानगरपालिकेला जर मिळाले नाही तर शहराच्या विकासाला भविष्यात कुठेतरी खीळ बसणार असल्याचे तज्ञांचे मत असणे, त्यामुळे या सर्व प्रकरणाची चौकशी करून जागा मालक व विकासकांवर फसवणुकीची व आर्थिक घोटाळ्याचे गुन्हे दाखल करून शहर विकास विभागातील ज्या अधिकाऱ्यांनी हे बोगस कागदपत्रे बनवून आर्थिक घोटाळयाला साथ दिली त्यांचीही चौकशी करून योग्य ती कारवाई करणे गरजेचे असणे, कारवाई न झाल्याने स्थानिक रहिवाशांमध्ये पसरलेले नैराश्याचे वातावरण, त्यामुळे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २०४ | "घुग्गुस हे चंद्रपूर जिल्ह्यातील प्रमुख औद्योगिक शहर असणे, येथील दलित समाजाच्या नागरिकांनी वार्ड क्र. ४ व ५ मध्ये काही विकासकामांचा दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत समावेश करण्याची मागणी करणे, मात्र हेतुपुरस्सर नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांनी या मागणीकडे दुर्लक्ष करणे, घुग्गुस मधील सहा पैकी चार वार्डांना योजनेत समाविष्ट करण्यात येणे, परंतु दलितांची संख्या जास्त असून सुद्धा वार्ड क्र. ४ व ५ ला हेतुपुरस्सर वगळण्यात येणे, सन २०१५ व सन २०२० ला आरक्षणाच्या सोडतील दलित मतदारांच्या संख्येच्या आधारावर दोन्ही वार्डात दोन अनुसूचित प्रवर्गाची जागा आरक्षीत असणे, वार्ड क्र. ५ हा वार्ड महामानव विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने ओळखला जाणे, या परिसराला आंबेडकरनगर असे संबोधले जाणे, या दोन्ही वार्डाचा या योजनेत समावेश न होणे म्हणजे तेथील दलित जनतेवर अन्याय होणे, यासंदर्भात घुग्गुस येथील दलित बांधवांनी उपोषण करणे, मुख्याधिकारी नगर परिषद घुग्गुस यांनी जाणीवपूर्वक या प्रक्रियेत दलित जनतेवर अन्याय केल्याने दलित बांधवांमध्ये तिव्र असंतोष, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून मुख्याधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी दलित बांधवांमध्ये असंतोष वाढीस लागणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. सुधीर मुनगंटीवार, डॉ. पंकज भोयर, श्री. सचिन कल्याणशेट्टी, वि.स.स. | |
| २०५ | "नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नजीक परिसरातील काही किलोमीटरच्या परिक्षेत्राच्या नगर नियोजनाच्या शासनाने सिडको अंतर्गत नैना प्रधिकरणाची सन २०१३ मध्ये स्थापना केली असणे, जवळपास ८ वर्षाचा कालावधी होऊन सुद्धा नैना अंतर्गत उक्त परिक्षेत्रात कुठलाही प्रकारचा सुनियोजित विकास झाला नसणे, नैना अंतर्गत येणाऱ्या गावांच्या विकासाकरीता प्रशासनाने अद्यापपर्यंत ११ नगर नियोजन योजना (टी.पी.एस.स्किम) घोषित केल्या असणे, सदर नगर नियोजन योजनापैकी नगर नियोजन योजना १ कार्यान्वीत झाली असून नगर नियोजन योजना २ बाबत निविदा निघाल्या असून उर्वरीत नगर योजना ३ ते ११ बाबत शेतकऱ्यांना विश्वासात न घेता भूसंपादनाच्या नोटीस बजावण्यात आल्या | सर्वश्री. प्रशांत ठाकूर, समीर कुणावार, महेश बालदी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र.<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | असणे, गेल्या अनेक वर्षांपासून नैना अंतर्गत शेतकऱ्यांच्या अनेक मागण्या सिडको प्रशासनाकडे प्रलंबित असणे, वारंवार सिडको प्रशासनाकडे पाठपुरावा करून सुद्धा कुठल्याही प्रकारची दखल घेतली जात नसणे, त्यामुळे नैना विरोधात स्थानिक नागरिक व शेतकऱ्यांमध्ये पसरलेल्या चिडीच्या व प्रचंड असंतोषाच्या भावनाबाबत शासनाने शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य करून आधी पुनर्वसन मग विकास या तत्त्वावर तातडीने लक्ष घालून करावयाची आवश्यक कार्यवाही व उपाययोजना याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | | |
| २०६ | "मुंबई पालिकेने सफाई कामगारांच्या ३९ वसाहतींच्या पुनर्विकासासाठी आश्रय योजना राबवण्याचे ठरविले असणे, ही योजना कार्यान्वित होण्यासाठी १,८४४ कोटी रुपयांचे प्रस्तावही आतापर्यंत पालिकेत मंजूर झालेले असणे, सदर योजनेच्या कामास ३३ लाख चौ.फु. बांधकाम मंजूर असताना त्यात ७९ लाख चौ.फु.पर्यंत वाढ करून पालिकेची मान्यता घेणे, मुंबईतील सफाई कामगारांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेतून मालकी हक्काची घरे देणे शक्य असतानाही महापालिकेने मालकी हक्कांची घरे देण्याऐवजी आश्रय योजनेच्या नावाखाली "सेवा निवासस्थानाचा" पर्याय सफाई कामगारांना देणे, याबाबत लोकप्रतिनिधींनी मुख्यमंत्री व पालिका आयुक्त यांच्याकडे लेखी तक्रार केलेली असणे, मात्र त्यावर अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, या नव्या निर्णयामुळे योजना खर्चातही अनेक पटीने वाढ झालेली असणे, निविदाही ठराविक कंत्राटदारांना काम मिळेल अशा पद्धतीनेच तयार करण्यात आलेल्या असणे, कामगारांच्या वसाहतींच्या पुनर्विकासात बांधकामांचा खर्च हा ४,८६० रुपये प्रति चौ.फूट दाखवला जाणे, मात्र शासनाच्या एसआरए योजनेमध्ये दिल्या जाणाऱ्या घरांसाठी हाच दर १,५०० रुपये एवढा असणे, सरकार आणि महापालिकेचे प्रत्येकी ५० % टक्के अनुदान देऊन सफाई कामगारांना मालकी हक्काने घरे देता येऊ शकणे, परंतु पालिकेनेच ही योजना स्वतः कार्यान्वित करावयाचे ठरविल्याने सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबत संशयाचे वातावरण तयार होणे, त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर कडक कारवाई करून आश्रय योजने अंतर्गत सफाई कामगारांच्या वसाहतीचा पुनर्विकास करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया. | सर्वश्री. श्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. राम कदम, रवि राणा, अभिमन्यु पवार, अतुल भातखळकर, सुनील राणे, अबू आजमी, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र.<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| २०७ | "पुणे शहरातील पाणी पुरवठा यंत्रणेत सुधारणा करण्यासाठी महापालिकेने समान पाणी पुरवठा योजना हाती घेतली असणे, सदर २४ तास पाणीपुरवठा योजनेसाठी २ हजार २६३ कोटी रुपयांचे कर्जरोखे पुढील पाच वर्षात उभारण्याचा माहे जून २०१७ मध्ये घेण्यात आलेला निर्णय, मात्र पुणे महापालिकेकडून समान पाणीपुरवठा योजनेचे काम संथ गतीने सुरू असल्याचे माहे फेब्रुवारी २०२२ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास येणे, त्यातच पाणी वाटपात असमानता असणे, टाक्यांचे काम अपूर्ण असणे, पाईपलाईन अद्यापही बऱ्याच भागात न पोहचणे, पाणीपुरवठा योजनेच्या कामात अनेक चुका होत असून, काम चांगल्या पद्धतीने होत नसल्याचे निदर्शनास येणे, विशेषतः गेल्या अनेक महिन्यांत प्रकल्पाचे प्रत्यक्षातील काम व निधीचा वापर याबाबत समाधानकारक चित्र नसणे, पुणे शहरातील नागरीक मनपा कर पूर्ण भरत असणे, मात्र काही भागात सदर योजनेचे काम करणे व काही भागात काम न करणे असा दुजाभाव करणे, नागरिकांच्या करातून ही योजना राबविण्यात येत असताना, त्यांना विश्वासात घेण्यात आले नसणे, रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करण्यापूर्वी जलवाहिन्यांची कामे करण्यात आली नसणे, योजनेचा आराखडा करताना सर्वेक्षण केलेले नसणे, आतापर्यंत ३ लाख १८ हजार ५७४ मीटरपैकी १४ हजार ११२ मीटर बसविण्यात आले असणे, जलवाहिन्या टाकण्याचे काम ३१० किलोमीटरपर्यंत (४१ टक्के) पूर्ण असणे, एकूण ८४ साठवण टाक्या बांधण्यात येणार असून, ७२ टाक्यांचे काम सुरू असणे, त्यातील पहिल्या टप्प्यातील २०० कोटी रुपयांचे किमतींच्या कर्जरोखांचा मुंबईत संपन्न झालेला कार्यक्रम, कर्ज रोख्यांपोटी पुणे महानगरपालिकेला ७.५९ टक्के दराने व्याज अदा करावे लागणार असणे, कर्ज आणि मुद्दलाची रक्कम दहा वर्षात फेडायची असणे, महानगरपालिकेने कर्ज काढून ही योजना राबविण्याचे ठरविण्यात आले असणे, त्यामुळे महानगरपालिकेवर मोठ्या प्रमाणात पडणारा आर्थिक ताण, परिणामी इतर नागरी सुविधांवर होणारा विपरीत परिणाम, नागरिकांवर नागरी सुविधांपासून वंचित राहण्याची ओढवणारी आपत्ती, यावर उपाययोजना म्हणून या योजनेसाठी केंद्र शासनाकडून व राज्य शासनाकडून अर्थसहाय्य उपलब्ध करण्याची नितांत गरज, लवकरातलवकर समान पाणीपुरवठा योजना पूर्ण होऊन पुणेकरांना पाणीपुरवठा सुरळीत होणे, यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाची उपाययोजना. | श्री. चेतन तुपे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २०८ | "सायन कोळीवाडा मतदार क्षेत्रामध्ये जवळपास ७०% जनता ही झोपडपट्टी मध्ये वास्तव्यास असणे, सदर ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांसाठी जवळपास १.५ किलोमीटर पर्यंत महानगरपालिका व सरकारी शाळा उपलब्ध नसल्याची बाब निदर्शनात येणे, परिणामी मुंबई सारख्या आंतरराष्ट्रीय शहरामध्ये विध्यार्थी व पालकांना शाळेत ये जा करण्याकरिता दररोज १.५ किलोमीटरची पायपीट करावी लागत असणे, तत्कालीन सरकारच्या काळात सन २०१६ मध्ये मी नवीन शाळेचे बांधकाम करण्याकरीता सभागृहात केलेल्या मागणीनुसार, MMRDA आयुक्त यांनी २०१९ मध्ये वडाळा येथील भूखंड शाळेचे बांधकाम करण्या करिता राखीव केले असणे, याबाबत ५ वर्षांचा कालावधी होऊनही अद्यापपर्यंत MMRDA मार्फत सदर भुखंड उपलब्ध झाले नसल्याची बाब समोर येणे, यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असणे, परिणामी विभागातील नागरिकांमध्ये शासनाप्रति पसरलेला तीव्र असंतोष विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान टाळण्याकरिता सदर विषयाकडे शासनाने प्राधान्याने लक्ष घालण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया." | कॅप्टन आर. तमिल सेल्वन, वि.स.स. | कित्ता |
| २०९ | "कल्याण (पूर्व) येथील चेतना शाळा ते नेवाळी नाका मलंग रस्ता हा कल्याण-डोंबिवलीकरांसाठी महत्त्वाचा असणे, या रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे अपघात होत असल्याच्या आलेल्या असंख्य तक्रारी, त्यामुळे दि. २९ सप्टेंबर २०२१ रोजी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना व कंत्राटदाराला घेऊन लोकप्रतिनिधींनी प्रत्यक्ष दौरा करून आढावा घेतला असता रस्त्याच्या दर्जाबाबत व महानगरपालिकेने कंत्राटदाराला दिलेल्या बिलाबाबत धक्कादायक बाबी उघडकीस येणे, उपरोक्त रस्त्याचे काम महानगरपालिकेकडून मे. रेल्कॉन इन्फ्राप्रोजेक्टस् प्रा. लि. मुंबई या कंपनीला ४२ कोटी रुपयांना देण्यात येणे, जी कंपनी मुंबईमध्ये काळ्या यादीत असणे, महापालिकेने सदरहू कंपनीला दिनांक १३/४/२०१७ रोजी काम दिले व १२/९/२०१८ पर्यंत काम पूर्ण करण्याचे आदेश देणे, परंतु दिलेल्या कालावधीत काम पूर्ण न होणे, त्यानंतर पुन्हा दि.३१/५/२०२१ | श्री. सुरेश भोळे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | पर्यंत मुदतवाढ देण्यात येणे व मूळ रकमेत जवळपास ४ कोटी रुपये कंत्राटदाराला वाढवून देण्यात येणे, धक्कादायक बाब अशी की रस्त्याचे काम ७५ टक्के झाले नसतानाही महानगरपालिकेने कंत्राटदारास ९५ टक्क्यांपेक्षा जास्त रक्कम दिलेली असणे, अशाया महत्त्वाच्या रस्त्यामध्ये कंत्राटदार व महापालिकेतील अधिकारी यांनी आर्थिक संगनमत करून केलेला कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार, कल्याण-डोंबिवलीमधील गेल्या ८ वर्षात खड्डे भरण्यासाठी ११४ कोटी रुपये खड्डयात घातल्याची होत असलेली चर्चा, इथे तर रस्त्याचा संपूर्ण निधीच हडप केल्याचा उघडकीस आलेला धक्कादायक प्रकार, सदर प्रकरणी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा व या रस्त्यावर कार्यादेश दिल्यापासून आत्तापर्यंत निकृष्ट दर्जाच्या कामाला जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून त्यांना निलंबित करणे, तसेच सदर कंपनीला मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण क्षेत्रात जिथे-जिथे कामे दिली असतील त्या कामांची दक्षता व गुणनियंत्रण विभागामार्फत चौकशी करावी व कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकून कल्याण महानगरपालिकेकडून बिलापोटी देण्यात आलेली रक्कम वसूल करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने हस्तक्षेप करून करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.'' | | कित्ता |
| २१० | "वसई-विरार महापालिका हद्दीत नालासोपारा, विरार आणि वसईच्या पूर्वेकडील भागात आणि मुंबई अहमदाबाद मार्गावरील गावांमध्ये तसेच संतोष भुवन, बिलालपाडा धानिवबाग, फुलपाडा, श्रीरामनगर, पेल्हार, चंदनसार, वालिव आदी अनेक ठिकाणी भूमाफियांनी व विकासकांनी हजारो इमारती, लाखो चाळींची अनधिकृत बांधकामे केल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच निदर्शनास येणे, भूमाफिया आणि विकासकांनी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त आशिष पाटील व त्यांचे सबंधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांचेबरोबर अर्थपूर्ण व्यवहार करून अनधिकृत इमारती व चाळींची बांधकामे करण्यात येणे, यापूर्वी अनधिकृत बांधकाम विभागातील काही कर्मचारी ह्या बाबतीत पैसे घेताना रंगेहाथ | श्री. राम सातपुते, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | पकडले गेल्याची घटना घडणे, अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण आणण्यास महापालिका संपूर्णतः अपयशी ठरणे, काही वेळेला जास्त दबाव आल्यानंतर पालिकेतर्फे अनधिकृत बांधकाम तोडल्याने अनेक गरीब परिवारांचे संसार उघडयावर येणे, सदरहू अनधिकृत बांधकामाबाबत स्थानिक नागरीक, सामाजिक संघटना यांनी वसई-विरार महापालिकेत दाखल केलेल्या तक्रारीची पालिका प्रशासनाने कोणतीच दखल घेण्यात न येणे, जास्त दबाव आला तर थातूरमातूर कारवाई केल्याचे दाखविण्यात येणे, अनधिकृत बांधकामा संदर्भात मा.उच्च न्यायालय मुंबई यांना खोटी माहिती दिल्याने न्यायालयाने महापालिका प्रशासनावर गंभीर ताशेरे ओढून फटकारण्यात येणे व महापालिका बरखास्त करण्याचा दिलेला गंभीर इशारा, त्यानंतर महापालिका प्रशासनाने अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याकरिता ॲक्शन प्लॅन तयार करण्याची घोषणा करण्यात येऊनही अद्याप यावर वसई-विरार महापालिका प्रशासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, आत्तापर्यंत महापालिका हद्दीत लाखो अनधिकृत बांधकामे झाली असून परिस्थिती नियंत्रणा बाहेर जाणे, याबाबत मा.उच्च न्यायालयाने कारवाई संदर्भात दिलेले आदेश विचारात घेता शासन तथा वसई-विरार महापालिका प्रशासनाने वेळीच कारवाई न केल्यास पालिकेस अनधिकृत बांधकाम थोपविणे अत्यंत कठीण होणार असल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे येथील स्थानिक जनतेत पालिका प्रशासनाबाबत निर्माण झालेली तीव्र असंतोषाचे व संतापाचे वातावरण, या सर्व गोष्टींना जबाबदार असणाऱ्या व अतिक्रमण विभागाची जबाबदारी असलेल्या अतिरिक्त आयुक्तांना तात्काळ निलंबित करून त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करून त्यांच्या हाताखालील अधिकाऱ्यांची मंत्रालयातील सचिव अथवा सहसचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.'' | | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २११ | "ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपालिका क्षेत्रातील मार्च २०१९ ते आजतागायत कोरोना १९ च्या कालावधीमध्ये कोरोना विषाणू प्रतिबंधक उपाययोजनाकरिता लाखो रुपयांचा विना निविदा खर्च करण्यात येणे, काही कामांमध्ये निविदा प्रक्रिया राबविण्यात येणे परंतु सदरची कामे ही आपल्याच मर्जीतील ठेकेदाराला देण्याकरिता प्रशासनाने व राजकीय प्रतिनिधींच्या म्हणण्यानुसार काढलेल्या निविदा उघडण्याच्या वेळी अनेक वेळा निविदा रद्द करून पुनर्निविदा काढण्यात येणे, कुळगाव बदलापूर नगरपरिषदेने गेल्या पाच वर्षात किती निविदा वेळेत उघडल्या गेल्या नसल्याबाबत चौकशी करून कारवाई करण्याची नागरिकांकडून होत असलेली मागणी, नगरपरिषद हद्दीमध्ये रस्ते, कमानी, लव्ह बदलापूर, ओपन जिम, सेल्फी पॉईन्ट, कचरा उचलणे निविदा, गार्डनचे सुशोभीकरण इत्यादी कामांच्या निविदा राजकीय प्रतिनिधी व प्रशासन यांच्या संगनमताने उघडून मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार व भ्रष्टाचार झालेला असणे, प्रत्येक विकास कामाला तोच टेस्ट रिपोर्ट, तीच इन्शुरन्सची कॉपी लावलेली असणे, लेखा परीक्षण अहवालात सुद्धा ताशेरे ओढले असणे त्यामुळे कुळगाव बदलापूर नगर परिषद हद्दीतील गेल्या पाच वर्षात झालेल्या विकास कामांची व त्याबाबत काढलेल्या निविदा तसेच कोरोना कोविड १९ च्या कालावधीमध्ये खर्च केलेल्या निधी बाबत श्वेत पत्रिका काढण्याची व त्रयस्त समितीद्वारे चौकशी करण्याची नागरिकांकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. किसन कथोरे, गणपत गायकवाड, अ‍ॅड. आशिष शेलार, सर्वश्री. संजय केळकर, कुमार आयलानी, राम सातपुते, अतुल भातखळकर, गणेश नाईक, श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स. | कित्ता |
| २१२ | ''नाशिक महापालिकेच्या तसेच खासगी शाळांतील विद्यार्थ्यांना निकृष्ट आहार पुरवल्या प्रकरणी दोन वर्षापूर्वी सेंट्रल किचन योजनेच्या १३ ठेकेदारांना निकृष्ट आहार पुरवठा केल्याप्रकरणी अपात्र करणे, आता यापैकी एका ठेकेदाराच्या हिरावाडीतील ठाकरेमळा परिसरातील स्वामी विवेकानंद बचत गटाच्या गोदाम तपासणीत शेजारील बंगल्यात शासनामार्फत पुरविण्यात आलेली तांदळाची २८१ (१५ हजार किलो) पोती सापडून यामध्ये कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला असणे, सदरहू तांदुळ साठ्याचा वापर केला | श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | असता तर एका दिवसात सुमारे १ लाख १२ हजार विद्यार्थ्यांची खिचडीद्वारे भुक भागण्याची शक्यता असणे, स्वामी विवेकानंद बचतगटाने शासनाचा तांदुळसाठा संपवून उलट आपणच आपल्याकडील १० हजार किलो तांदुळ स्वतःआणून खिचडी शिजवल्याचा दावा करीत शिक्षण विभागाची फसवणूक करण्यात येणे, विशेष म्हणजे महापालिका आयुक्तांनी याआधी १३ ठेकेदारांचे (५० टक्के बिल) २ कोटी ६९ लाख रुपयांचे स्थगित ठेवलेले बिल देण्यासाठी शासनातील उच्च पदस्थ व लोकप्रतिनिधींकडून बैठक घेऊन अदा करणेबाबत आयुक्तांवर दबाव टाकून आदेशित करण्यात येणे, सापडलेल्या २८१ पोती प्रकरणी चौकशी करून महापालिकेला सादर केलेल्या अहवालात गोदामात तांदुळ राहिले नसल्याचे नमूद करण्यात येणे, यामुळे शेजारील बंगल्यात ३०० पेक्षा अधिक शासनाचे शिक्के असलेली २८१ पोती कशी आली याचे उत्तर देण्यास हेतुपूर्वक टाळण्यात येणे, यामुळे महापालिका आयुक्तांना सादर झालेला अहवाल हा संबंधीत अधिकारी व ठेकेदार संस्थेला बेकायदा संरक्षण देणारा असल्याने अहवालाबाबत निर्माण झालेले संशयाचे वातावरण, सन २००३ पर्यंत पोषण आहार पुरवठा करणाऱ्या महिला बचत गटाकडून काढून पालिका प्रशासनाने सेंट्रल किचनच्या गोंडस नावाखाली १३ ठेकेदार संस्थांना देण्यात येणे, परिणामी महिला बचत गटावर ओढवलेले बेरोजगारीचे व उपासमारीचे संकट, त्यानंतर १३ ठेकेदार संस्थांनी केलेला गैरप्रकार उघडकीस आल्यानंतर महिला बचत गटांना पुन्हा पोषण आहार पुरविण्याचे काम देण्याचा निर्णय घेऊन यासाठी निविदा काढण्यात येणे, त्यासाठी ४ ते १८ फेब्रुवारी पर्यंत मुदत देण्यात आली असताना अचानक निविदा प्रक्रियेवर स्थगिती घेऊन अपात्र १३ ठेकेदारांपैकी एका ठेकेदार संस्थेला काम दिल्याचा घडलेला आश्चर्यजनक प्रकार, सदरहू प्रकरणात कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार होऊन शासकीय निधीचा झालेला अपव्यय तसेच विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या पोषण आहारावर त्याचा गंभीर परिणाम होणे, दरम्यान ह्या प्रकरणातील ठेकेदार ऋषिकेश चौधरी यांनी सदर लपवलेला तांदुळ हा शासनाचा असल्याचे स्वतःहून मान्य केले असणे, सदरहू प्रकरणाची शासनाने उच्च स्तरावरुन एसआयटीद्वारे चौकशी करून महापालिकेतील संबंधीत दोषी अधिकारी, | | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | ठेकेदार यांचेवर कठोर कारवाई करुन, पोषण आहार वितरणाचे काम गरीब गरजु महिला बचत गटांना देणेबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य जाणीवपूर्वक दुर्लक्ष, परिणामी विद्यार्थी व महिला बचत गटांमध्ये निर्माण झालेले तीव्र संतापाचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.'' | | |
| २१३ | "जि.नाशिक येथील स्मार्ट सिटी कंपनीच्यावतीने प्रोजेक्ट गोदा अंतर्गत रामवाडी ते अहिल्यादेवी होळकर पुलादरम्यान गोदावरील नदीपात्रातील गाळ उपसा करण्याच्या कंत्राटाच्या नावाखाली ठेकेदाराने हजारो टन बेकायदा वाळू उपसा करून मोठ्या प्रमाणात आर्थिक घोटाळा करून शासनाच्या महसूलाचे नुकसान केल्याचा नुकताच उघडकीस आलेला प्रकार, नाशिकच्या म्यूनिसिपल स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि.या कंपनीचे अध्यक्ष श्री.आनंद लिमये यांनी पहिल्याच बैठकीत सदरहू कामात होणाऱ्या बेकायदा वाळू उपाशाबाबत सविस्तर चौकशी करून अहवाल सादर करण्याचे जिल्हाधिकारी यांना आदेश देण्यात येणे, स्मार्ट सिटी कंपनीच्यावतीने विकासा संदर्भात राबविण्यात येणाऱ्या प्रोजेक्ट गोदाच्या कामाची मुदत माहे सप्टेंबर २०२१ मध्ये संपुष्टात आल्याने प्रकल्पाचे काम रखडल्याने सदरहू प्रकल्पाला माहे ३१ मे २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात येणे, सदरहू प्रकल्पाचे काम सुरु झाल्यानंतर ७ ते ८ फूट खोलीनंतर रेती लागल्याने रॉयल्टीचा प्रश्न निर्माण होणे, ठेकेदाराने शासनाची परवानगी न घेताच हजारो टन रेतीचा बेकायदा उपसा करून त्याची विक्री करून कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास येणे, या संदर्भात विधी मंडळाच्या अंदाज समितीने नाशिकला भेट दिली असता समितीच्या अधिकाऱ्यांनी व पदाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष गोदावरीची स्थळ पाहाणी केली असता त्यामध्ये सकृतदर्शनी गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास येणे, महसूल अधिकाऱ्यांनी वाळूचे टेंडर न काढता परस्पर संगनमताने ठेकेदाराला झुकते माप देणे, तसेच पर्यावरण खात्याची परवानगी न घेता कोट्यवधी रुपयांचा वाळूसाठा करून नदीपात्रालगतच वाळू धुण्याचे काम सुरु असणे, त्यामुळे सर्व पाण्याचे प्रदूषण होवून तेच | ॲड. माणिकराव कोकाटे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | पाणी नाशिक मधील नागरिकांना पिण्यासाठी दिले जाणे, त्यामुळे निर्माण झालेले विविध आजार, यास्तव सदर ठेकेदाराचा हा ठेका तात्काळ रद्द करून यापूर्वी त्याने केलेल्या कामांची गुणनियंत्रण विभागामार्फत तात्काळ चौकशी करणे, त्यांच्याकडून दंड आकारणे व ठेकेदाराला काळया यादीत टाकण्याची व सदर ठेकेदाराला पाठिशी घालणाऱ्या स्मार्टसिटी व महानगरपालिकेच्या संबधित अधिकारी व तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांना तात्काळ निलंबित करून त्यांची चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने हस्तक्षेप करून करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| २१४ | "पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने पवना बंदीस्त जलवाहिनी प्रकल्प प्रस्तावित असणे. सदर प्रकल्पाला स्थानिक शेतकऱ्यांच्या वतीने तीव्र विरोध होऊन सन २०११ मध्ये मौजे बउर ता. मावळ येथे प्रकल्पाविरोधात शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनामध्ये पोलीसांकडून बेछूट गोळीबार होऊन ३ शेतकरी मृत्युमुखी पडणे. तसेच १२ शेतकरी जखमी होण्याची दुर्दैवी घटना घडणे. सदर घटनेचे जनसामान्यांमध्ये तीव्र पडसाद उमटणे व सर्व नागरिकांमध्ये शासनाविरुद्ध आक्रोशाचे भावना निर्माण होणे. तद्नंतर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने स्थायी समितीमध्ये मृतांच्या वारसांना व जखमी झालेल्या शेतकऱ्यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेत सामावून घेण्याची मागणीच्या ठरावाला एकमताने मंजुरी देऊन सदर प्रस्ताव शासनाकडे दिनांक २४ जून, २०१९ रोजी आवश्यक कागदपत्रांसह सादर केलेला असणे. सदर विषयाबाबतित मा. उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २९/९/२०१९ रोजी बैठकीचे आयोजन होऊन सदर बैठकीत मा. उपमुख्यमंत्री यांनी नगरविकास विभागास सकारात्मकता दर्शवून सदर अहवाल तयार करून लवकरात लवकर कार्यवाही करावी असे निर्देश देऊनही अद्याप शासनाकडून सदर विषय प्रलंबित असणे त्यामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण तसेच नाराजीची तीव्र भावना याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व त्यावर शासनाची प्रतिक्रिया." | श्री. सुनिल शेळके, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २१५ | "ठाणे शहराच्या स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत येणारा "इंटेलिजंट ट्रान्सपोर्ट मॅनेजमेंट सिस्टीम". (आयटीएस) हा प्रकल्प गेली पाच वर्षे केवळ कागदावरच असून या प्रकल्पांतर्गत कोणतीही कामे झालेली नसणे, कामे झालेली नसताना संबंधित ठेकेदाराला दंड आकारण्याच्या ऐवजी ठाणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी प्रकल्पासाठी ठेकेदाराला २ कोटी ६५ लाख रुपयांची बिले अदा केली असणे, या योजनेतील 'व्हेअर इज माय टीएमटी बस' हे ॲप अद्यापही ठेकेदाराने सुरूच केलले नसणे, या ॲपच्या माध्यमातूनच होणारे जीपीएस ट्रॅकींग देखील बंदच असणे, शिवाय बसेसमध्ये बसवलेले जीपीएस ट्रॅकर देखील कालबाह्य झालेले असल्याचे ठेकेदाराचे म्हणणे असणे, एलईडी टीव्ही चोरीला गेल्याचे ठेकेदाराचे म्हणणे असणे, मात्र चोरीला गेलेल्या टीव्ही संदर्भात ठेकेदार किंवा पालिकेकडून कोणतीच तक्रार पोलीसात केली गेलेली नसणे, शहरात मोठ्या प्रमाणात सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत असतानाही पालिकेच्या मालकीच्या वस्तू चोरीला कशा जातात याबाबत साशंकता निर्माण होणे, स्मार्ट सिटी मिशन, नवी दिल्लीच्या संचालकांकडून एकूणच ठाणे स्मार्ट सिटीतील गैरव्यवहारांची चौकशी करून अहवाल देण्याबाबत आदेशित करण्यात आलेले असणे, सदर योजनेत गैरव्यवहार करणाऱ्यांची अद्यापही कोणतीही चौकशी अथवा त्यांचेवर कारवाई करण्यात आलेली नसणे, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. राम कदम, रवि राणा, अभिमन्यु पवार, प्रमोद पाटील, अबू आजमी, कालीदास कोळंबकर, रईस शेख, वि.स.स. | कित्ता |
| २१६ | "अग्निशमन दलाने मुंबईतील १,१४९ रुग्णांलयाच्या घेतलेल्या झाडाझडतीत तब्बल ४० रुग्णांलयांनी सुरक्षेचे नियम धाब्यावर बसविल्याची धक्कादायक बाब उजेडात आली असणे, महापालिकेने मुंबईतील सर्व रुग्णांलयांचे फायर ऑडिट केले असणे, यामध्ये १,१४९ रुग्णांलयांची तपासणी केली असता, ३४२ ठिकाणी सर्व यंत्रणा नियमानुसार असल्याचे दिसून येणे, तर १२८ रुग्णांलये बंद असणे, ६३९ रुग्णांलयामध्ये किरकोळ दुरुस्त्या करण्याचे आवयश्क असणे, ४० रुग्णालयांच्या इमारतीबाहेर पडण्याच्या रस्त्यांमध्ये अडगळ, अग्निरोधक यंत्रणा बंद असणे आदी निष्काळजी आढळून आली असणे, मुंबईतील बहुतांश रुग्णालयामध्ये अग्निरोधक यंत्रणा कार्यान्वित नसणे, फायर | श्रीमती मनिषा चौधरी, ॲड. राहुल नार्वेकर, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | एक्सटिंगुडशेरसारख्या अनेक गोष्टी नसणे, आपत्तीकाळात बाहेर पडण्याच्या मार्गात अडथळे असणे, अशा पद्धतीने सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवून रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरू असल्यामुळे सर्वसामान्य नागरीकांमध्ये संतापाची भावना मोठ्या प्रमाणात निर्माण होणे, रुग्णालयामध्ये सुरक्षाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही तसेच उपाययोजना व राज्य शासनाची प्रतिक्रिया." | | |
| २१७ | "भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्राबाहेरून जाण्याच्या रिंगरोडच्या बांधकामास मार्च २०१३ मध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने प्रशासकीय मान्यता देण्यात येणे, सदर बाह्यवळन रस्ता रिंगरोड ज्या गावांतून जाणारा आहे त्या ९ गावापैकी केवळ ३ गावांचे संयुक्त मोजणी झालेली असणे, सन २०१९ पासून रस्त्यासाठी लागणाऱ्या जमिनीची मोजणी बंद असणे, संयुक्त मोजणी घेऊन रस्त्याचे काम त्वरित सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधि यांनी मा.मंत्री महोदय व सबंधित अधिकारी यांच्याकडे गेल्या दोन वर्षाच्या काळात अनेक वेळा मागणी केली असणे, प्रस्तावित रिंगरोडच्या जागेवर अंजूर फाटा हरिद्वारा सोसायटीच्या मागील बाजूस मौजे राहनाळ येथील स.नं. ५३१/१ पैकी एका खाजगी विकासकाने इमारतीचे बांधकाम सुरू करणे, सदर बांधकामामुळे रिंगरोडचे काम बाधित होणे, सदर इमारतीचे बांधकाम परवाना रद्द करून रिंगरोडचे बांधकाम त्वरित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी यांनी आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका व आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मुंबई यांच्याकडे अनेक वेळी मागणी करणे, रिंग रोडचे बांधकाम त्वरित सुरू करण्याबाबत व व्यावसायिकाच्या बांधकामाचे परवानगी रद्द करण्याची आवश्यकता, शासनाची सदर विषयी केलेली वा करावयाची, शासनाची भूमिका व प्रतिक्रिया." | श्री. रईस शेख, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २१८ | "ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील पोखरण रोड क्र. १ येथे उभारण्यात आलेल्या छाबय्या विहंग गार्डन या अनधिकृत इमारतीचा दंड व त्यावरील संपूर्ण व्याज पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या दिनांक १२ जानेवारी, २०२२ रोजीच्या बैठकीत घेण्यात आला असणे, तसेच सदर इमारतीला तात्काळ भोगवटा प्रमाणपत्र देण्यासंदर्भात ठाणे महानगरपालिका आयुक्तांना आदेश देण्याचा निर्णयही घेण्यात आलेला असणे, सदर विकासकांनी बांधलेल्या या प्रकल्पातील पाच माळे अनधिकृत असल्याचे समोर आल्यानंतर तत्कालीन महापालिका आयुक्त यांनी दंडात्मक कारवाई केलेली असणे, संभाव्य टीडीआरचा वापर करत विनापरवाना बांधकाम केल्यामुळे सदर कंपनीस दंड व व्याज आकारण्यात येणे, या प्रकरणात नगरविकास विभागाने घेतलेली भूमिका म्हणजे "गुन्हा क्षमापन शुल्क ही बाब ठाणे महानगरपालिकेच्या आर्थिक बाबींशी निगडित असून याचा शासनावर प्रत्यक्ष आर्थिक भार पडत नसणे, ही बाब वित्त विभागाने पूर्णपणे अमान्य केली असून "सदर आर्थिक भार जरी प्रत्यक्षरीत्या राज्य शासनावर येत नसला तरी ठाणे महानगरपालिकेच्या आर्थिक स्त्रोताचा एक भाग आहे आणि महानगरपालिकांना विविध विकास कामांसाठी राज्य शासनाकडून निधी उपलब्ध केला जातो त्यामुळे महानगरपालिकेचा आर्थिक तोटा हा राज्य शासनाचा आर्थिक तोटा आहे तसेच टीडीआर वापरास परवानगी न घेता तो वापरणे ही गंभीर अनियमितता असल्यामुळे येथे आर्थिक भाराचा प्रश्न येत नाही, अनियमिततेसाठी उलट दाम दुप्पट दंड आकारणे योग्य राहील जेणेकरून नियमांचे उल्लंघन कोणी करणार नाही" असे अभिप्राय वित्त विभागाने दिलेले असणे, अन्य प्रकरणातील अशा प्रकारच्या मागण्या फेटाळल्या असल्याचे वित्त विभागाने नमूद करणे, ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील हे एकमेव प्रकरण असल्याच्या नगरविकास विभागाच्या दाव्यालाही वित्त विभागाने छेद दिला असून उघडकीस न आलेली अशी अनेक प्रकरणे असण्याची शक्यता व्यक्त केलेली असणे, मात्र वित्त विभागाचे सदर प्रतिकूल अभिप्राय डावलून साक्षात मंत्रिमंडळानेच बेकायदेशीर असा हा निर्णय एक अपवादात्मक बाब म्हणून घेतलेला असणे, अशा प्रकारचा निर्णय घेण्याचा मंत्रीमंडळाला अधिकारच | सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. राम कदम, रवि राणा, अभिमन्यु पवार, संजय केळकर, किसन कथोरे, अबू आजमी, रईस शेख, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | नसल्याचे उघड होणे, अनधिकृत बांधकाम असलेल्या या इमारतीचा दंड व त्यावरील व्याज माफ करण्याच्या निर्णयामागे कोणतेही संयुक्तिक कारण शासनाकडे नसतानाही केवळ सत्ताधारी पक्षाच्या आमदाराच्या विनंतीवरून सारासार विवेक गुंडाळून दंड व व्याज माफी केली जाणे, या व अशा अन्य प्रकरणांमधील दंड माफ करण्याच्या दृष्टीने व अनधिकृत बांधकाम नियमित करण्याच्या दृष्टीने शासनाची भूमिका व त्यावरील उपाययोजना." | | |
| २१९ | "मुंबई महापालिकेच्या मराठी, हिंदी, इंग्रजी आणि ऊर्दू माध्यमातील शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या इयत्ता दहावीच्या मुलांसाठी १९४०१ टॅब खरेदी केले जाणार असणे, या टॅबच्या स्क्रीनचा आकार, बॅटरी लाईफ, रॅम, मेमरी, इंटरनेट सुविधा, सॉफ्टवेअर आवृत्ती, लर्निंग सॉफ्टवेअर, टॅबचा दर्जा, त्याची तांत्रिक वैशिष्ट्ये, तसेच संबंधित कंपनीच्या माहितीचा तपशील याबाबत प्रस्तावात काहीही स्पष्टता नसणे, टॅबची ही योजना २०१५ मध्ये सुरू करण्यात आली असून त्यावेळी एका टॅबची किंमत ६८५० रुपये तर २०२१ साली हीच किंमत साधारणतः २० हजार रुपये निश्चित करण्यात आली असून या खरेदीत मोठी तफावत दिसून येणे, इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना हे टॅब पुढील दोन महिन्यांनंतर हातात मिळणार असून येत्या मार्चमध्ये बोर्डाच्या परीक्षा होईपर्यंत ते वापरण्यासाठी जेमतेम एक महिना उरणार असणे, सुमारे एक महिना इतक्या कमी कालावधीसाठी हे टॅब खरेदी केले जाणार असणे, पूर्वीच्या टॅब खरेदीच्या तुलनेत अधिक पैसे खर्च करूनही यंदा विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या शेवटी कमी कालावधीसाठी टॅब उपलब्ध होणार असणे, टॅबची वाढीव किंमत, तांत्रिक तपशिलाचा अभाव तसेच शैक्षणिक वर्षाचा उर्वरित कमी कालावधी पाहता या निर्णयाचा पुनर्विचार करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. राम कदम, रवि राणा, अभिमन्यु पवार, अबू आजमी, रईस शेख, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २२० | "प्रिन्सेस स्ट्रीट ते वरळी या कोस्टल रोड प्रकल्पाच्या कामासंदर्भात वरळी येथील समुद्रातील पुलाच्या दोन पिलरमधील अंतर ६० मीटर ऐवजी २०० मीटर ठेवण्याची मागणी स्थानिक मच्छीमारांकडून करण्यात आलेली असणे, येथील पाणी स्थिर नसल्याने बोटी डगमगतात, कमी अंतरामुळे मच्छिमारांच्या बोटी ये-जा करण्यामध्ये अडथळा होत असल्याने सदर मागणी करण्यात येणे, या मागणीच्या अनुषंगाने गेल्या दोन महिन्यात मच्छीमारांकडून अनेक वेळा आंदोलन करून काम बंद पाडण्यात आलेले असणे, कोळी बांधवांनीच तज्ज्ञ आणि सक्षम प्राधिकरण संस्थेकडून पिलरच्या अंतराबाबत अहवाल प्राप्त करून घेऊन सादर करावा, असा उलटा सल्ला पालिकेच्या अधिकाऱ्यांकडून मच्छीमारांना देण्यात आलेला असणे, सागरी किनारा सेतूच्या खांबांमधील ६० मीटर अंतरामुळे मासेमारीला धोका निर्माण होईल हे सिद्ध करणारा अहवाल सादर करण्यासाठीची पालिकेने मच्छीमारांना दिलेली १५ दिवसांची मुदत संपलेली असणे, त्याबाबतचे पत्र पालिकेने मच्छीमारांना पाठविल्याने उभयतांमधील संघर्ष अधिक तीव्र होणे, तीन वर्षांपासून सुरू असलेल्या कामामध्ये मच्छिमारांच्या मागणीचा तीन वर्षात विचार न करता आता १५ दिवसात अहवाल आणावयास सांगणे उचित नसल्याचे मच्छिमार संघटनांचे म्हणणे असणे, मच्छीमारांनी प्राधिकरणाकडून मान्यताप्राप्त सर्वेक्षण अहवाल आणावा, असे महापालिकेचे म्हणणे असणे परंतु मान्यताप्राप्त प्राधिकरण शासनाच्या अधीन असल्याने मच्छीमारांची याबाबत कोंडी झालेली असणे, सागरी किनारा मार्गाच्या सर्वेक्षणासाठी त्या त्या विषयातील तज्ज्ञांकडून सल्ला घेणे आवश्यक असणे, त्यांनी दिलेला अहवाल पालिकेला सादर करणे यासाठीचा १५ दिवसात अहवाल देणे कठिण असल्याचे मच्छीमारांचे म्हणणे असणे, मच्छिमारांच्या मागणीच्या अनुषंगाने सदर कामाच्या आराखड्यात बदल करण्याच्या दृष्टीने शासनाकडून अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. राम कदम, रवि राणा, अभिमन्यु पवार, अबू आजमी, रईस शेख, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २२१ | "दिनांक २६ जुलै, २००५ रोजी संततधार पावसामुळे मुंबईत आलेला महापुर आणि मिठी नदीने धारण केलेले रौद्ररुप पुन्हा अनुभवास येऊ नये यासाठी मिठी नदीच्या खोलीकरणासह रुंदीकरणासाठी मुंबई महानगरपालिका आणि मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणाने आजमितीस १ हजार १५० कोटी रुपये खर्च करण्यात येणे, परंतु अद्याप मिठी नदी गाळातच असून दुसरीकडे मिठी नदीच्या संरक्षक भिंतीसह सर्व्हिस रोडची कामेही अपूर्णावस्थेत असणे, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि पालिकेच्या हद्दीतील कामे अर्धवट असतानाही १ हजार १५० कोटी रुपये कंत्राटदारांना देण्यात येणे, मिठी नदीच्या खोलीकरणासह रुंदीकरण व सर्व्हिसरोड तसेच संरक्षक भिंतीची कामे रखडले असूनही शासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करित असणे, अद्यापपर्यंत पूर्ण झालेल्या कामाचे ऑडीट करून शिल्लक असलेली कामे शीघ्रगतीने हाती घेऊन युद्धपातळीवर पूर्ण करण्याची आवश्यकता व करावयाची तातडीची कार्यवाही." | ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री. किसन कथोरे, प्रशांत ठाकूर, सुनील राणे, अमित साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री. पराग शाह, योगेश सागर, सुभाष देशमुख, राम कदम, सदा सरवणकर, गणपत गायकवाड, वि.स.स. | कित्ता |
| २२२ | "मुंबई महानगरपालिकेच्या जिजामाता उद्यान व प्राणिसंग्रहालयाच्या आधुनिकीकरणाच्या प्रकल्पाच्या निविदांमध्ये अनियमितता झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असणे, शंभर कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या निविदेमध्ये विदेशी कंपन्याही सहभागी होऊ शकत असल्यामुळे, अशा विदेशी कंपन्या सहभागी होऊ नयेत म्हणून, १८५ कोटी अंदाजित रकमेच्या निविदेचे ९१ कोटी व ९४ कोटी अशा अंदाजित रकमांच्या निविदांमध्ये दोन भाग करण्यात आलेले असणे, याआधी महापालिकेच्या रस्ते व इतर कामांसाठी निविदा भरणाऱ्या कंपन्यांनीच आता जिजामाता उद्यानातील कंत्राटेही मिळविण्यासाठी पुढाकार घेतल्याने संशय व्यक्त केला जात असणे, ९१ कोटी अंदाजित रकमेच्या कामासाठी १४६ कोटींची तर ९४ कोटींच्या अंदाजित कामासाठी १४६ कोटींची निविदा भरण्यात आलेली असणे, अशा प्रकारे एकूण १८५ कोटींच्या अंदाजित कामासाठी २९२ कोटी म्हणजेच १०७ कोटी रुपयांचा अधिकचा खर्च महापालिकेला करावा लागणार असणे, या निविदांमध्ये अनियमितता झाली असल्याचा आरोप मुंबईच्या पालकमंत्र्यांनीही केला असणे, या सर्व प्रकरणाची चौकशी, चौकशीचे निष्कर्ष तसेच दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली हे स्पष्ट होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. राम कदम, रवि राणा, अभिमन्यु पवार, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २२३ | "जि.पालघर येथील वसई तालुक्यातील वालिव विभागातील चिंचोटी, बापाणे, म्हात्रेवाडी, हसोबानगर, वाघराळपाडा, धुमाळनगर आदी भागात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे झाल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच उघडकीस येणे, वसई-विरार महापालिकेचे सहाय्यक आयुक्त श्री.सुभाष जाधव व अतिरिक्त आयुक्त यांच्या अखत्यारित मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे झालेली असतानाही, अद्याप त्याची जबाबदारी स्वीकारुन राजीनामा देणेबाबत कोणतीच कार्यवाही न करणे, वालिव, पेल्हार, चंदनसार या प्रभागातील अनधिकृत बांधकामांवर सहायक आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांनी कारवाई करण्याऐवजी आर्थिक तडजोड करून अनधिकृत बांधकामांना संरक्षण देत असल्याचा गंभीर प्रकार निदर्शनास येणे, अनधिकृत बांधकामातून होणाऱ्या मोठ्या प्रमाणावरील वसुल्यांना हे दोघेच जबाबदार असून, सदरहू भ्रष्ट अधिकाऱ्याला प्रशासनातून त्वरित काढून टाकण्याची स्थानिक नागरिकांकडून महापालिका आयुक्तांकडे मागणी करण्यात येणे, सुभाष जाधव यांचे मूळ पद हे लिपिक असताना तसेच त्यांना एका प्रकरणात निलंबित करून चौकशी चालू असतानाही त्यांना "जी" वालीव येथे प्रभारी सहायक आयुक्त पदावर नेमणूक देणे, अनधिकृत बांधकाम प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालय यांनी देखील कठोर कारवाई करण्याचे आदेश वेळोवेळी निर्गमीत केले असतानाही वसई तालुक्यातील उपरोक्त भागात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे करण्यात येऊन संबंधीत महापालिका अधिनियम व नियमांचे सऱ्हास उल्लंघन केल्याची बाब स्पष्ट होणे, या सर्व प्रकरणाची दखल घेऊन शासनाने सुभाष जाधव व संबधीतांना तात्काळ निलंबीत करून त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक विभागा मार्फत चौकशी सुरु करण्याची होत असलेली मागणी, सदर प्रकरण शासनाच्या निदर्शनास येऊनही यावर कोणतीच कारवाई न करता राज्य शासनाने घेतलेली बघ्याची भूमिका, परिणामी जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने उच्च स्तरावरुन हस्तक्षेप व चौकशी करून तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. राम सातपुते, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २२४ | "मीरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये शहर विकास विभागाच्या माध्यमातून मोठे मोठे विकास प्रकल्प राबवण्यात येणे, या विकास प्रकल्पातील सुविधा भूखंड, आर.जी. भूखंड, रस्त्याचे भूखंड व इतर आरक्षित भूखंड विकासकाने महानगरपालिकेला हस्तांतरित करण्याची बोगस प्रक्रिया राबविणे, तसेच सदरच्या भूखंडावरील अतिक्रमण न हटवता व कुंपन भिंत न बांधता महानगरपालिकेकडून टी.डी.आर प्रमाणपत्र घेतलेले असणे व जागेवर या विकासकांचे बांधकाम ही चालू असणे, यावरील अतिक्रमण नाटककार व कुंपण भिंत बांधतात महानगरपालिकेकडून खेड्यात प्रमाणपत्र घेणे व या जागेवर या विकासकांचे बांधकाम चालू असणे, मीरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सुविधा भूखंड, आर.जी. भूखंड, रस्त्याचे भूखंड व इतर आरक्षित भूखंड महानगरपालिकेच्या नावे सातबारा करून हस्तांतरित करण्याची प्रक्रिया पूर्ण न करता बहुतांश विकासकांनी ही सर्व भूखंड हडप केल्याचे अनेक प्रकरणे उजेडात येणे, महत्त्वाचे म्हणजे मीरा-भाईंदर महापालिका क्षेत्रामध्ये खेळायचे मैदाने,रस्ते व इतर आरक्षित जागेचे भूखंड कागदोपत्री महानगरपालिकेच्या ताब्यात असल्याचे दिसून येणे, त्याच्या नियमानुसार टीडीआर विकासकाने अथवा जागा मालकांनी पूर्णतः घेतलेला असणे, परंतु जागेवर मात्र त्याच विकासकाच्या अथवा जागा मालकांच्या ताब्यात हे भूखंड असून त्यांच्या सहमतीने त्या आरक्षित जागेवर झोपड्या अथवा व्यापारी गाळयाची निर्मिती झाल्याचे दिसून येणे, यामध्ये प्रामुख्याने मीरा-भाईंदर मधील वादग्रस्त विकासक ओसवाल बिल्डर, गोयल बिल्डर्स, सेव्हन इलेव्हन कन्स्ट्रक्शन कंपनी, आर.एन.ए. बिल्डर्स. विधी बिल्डकॉन प्रा.लि., सालासार बिल्डर्स, गुजरात डेव्हलपर्स या विकासकांचा मोठा सहभाग असणे, तर काही ठिकाणी आरक्षित भूखंडावर झोपड्यांचे अतिक्रमण असतानासुद्धा मोकळा भूखंड ताब्यात न घेता विकास विभागाने कागदोपत्री हे भूखंड रिकामी असल्याचे दाखवून महानगरपालिकेबरोबर खोटे कागदपत्र तयार करून बोगस ताबा पावती बनविल्याची प्रकरणे सुद्धा असणे, यामध्ये सुद्धा ओसवाल बिल्डर, गोयल बिल्डर्स, सेव्हन इलेव्हन कन्स्ट्रक्शन कंपनी, आर.एन.ए. बिल्डर्स. विधी बिल्डकॉन प्रा.लि.,सालासार बिल्डर्स, गुजरात डेव्हलपर्स या विकासकांचा मोठ्या प्रमाणात | श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | सहभाग असणे, मुंबईच्या वेशीवर मीरा-भाईंदर शहर असल्याने शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात विकास कामे चालू असणे, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रांमध्ये तिन्ही बाजूंनी खाडी किनारा असल्याकारणाने बहुतांश ठिकाणी खारफुटी असल्याने याच परिसरात विकसित करावयाचे भूखंड व आरक्षित भूखंड असल्याकारणाने अनेक विकासकांनी सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करून नकाशे मंजूर करून बांधकामासाठी परवानगी घेतले असणे, परंतु शासनाच्या धोरणानुसार आरक्षित भूखंड, सुविधा भूखंड व आर.जी.भूखंड महानगरपालिकेला जर मिळाले नाही तर शहराच्या विकासाला भविष्यात कुठेतरी खीळ बसणार असल्याचे तज्ञांचे मत असणे, त्यामुळे या सर्व प्रकरणाची चौकशी करून जागा मालक व विकासकांवर फसवणुकीची व आर्थिक घोटाळयाचे गुन्हे दाखल करून शहर विकास विभागातील ज्या अधिकाऱ्यांनी हे बोगस कागदपत्रे बनवून आर्थिक घोटाळयाला साथ दिली त्यांचीही चौकशी करून योग्य ती कारवाई करणे गरजेचे असणे, कारवाई न झाल्याने स्थानिक रहिवाशांमध्ये पसरलेले नैराश्याचे वातावरण, त्यामुळे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| २२५ | "मुंबई महानगरपालिकेमध्ये स्थापत्य कंत्राट कामातील निविदा प्रक्रियेत झालेल्या घोटाळा प्रकरणाची चौकशी अहवाल सप्टेंबर-२०२१ रोजी जाहिर झालेला असून या अहवालामध्ये महानगरपलिकेतील ६३ अभियंता व कर्मचारी यांना दोषी ठरविण्यात आलेले असून या दोषी अभियंता व कर्मचाऱ्यांवर अद्यापपर्यंत महानगरपालिकेकडून कोणत्याही स्वरुपाची कारवाई न झाल्यामुळे मुंबईतील नागरिकांमध्ये या प्रकारामुळे पसरलेली असंतोषाची भावना याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया. | श्री. झीशान सिद्दिकी, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २२६ | "ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथील स्वच्छता सर्वेक्षणात राज्यात दुसरा क्रमांक पटकावणाऱ्या कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापनात अनियमितता, गैरप्रकार व गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत कचरा संकलनासाठी ठेकेदारांची नेमणूक करण्यापासून त्यांना बिल अदा करण्यापर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेत अनियमितता व मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार करण्यात येणे, नगरपरिषदेने नगरपरिषद हद्दीतील कचऱ्याचे संकलन करण्यासाठी दहा झोन तयार करून तीन ठेकेदार नेमण्यात येणे, तसेच अलीकडे अकरावा झोन तयार करून चौथ्या ठेकेदाराचीही नेमणूक करणे, दररोज किती टन कचरा संकलित होतो याचे मोजमाप ठेवण्यासाठी वजनकाटाच नसल्याने ठेकेदारास कोणत्या निकषाखाली बिले अदा केली याबाबत संशय निर्माण होणे, ठेक्याची मुदत संपुष्टात आली असताना निविदा न मागविता याच ठेकेदारांना मुदतवाढ दिल्याचा आश्चर्यजनक प्रकार घडणे, ठेका संपुष्टात येण्यापूर्वीच सर्वसाधारण सभेने दि.२८.२.२०१८ रोजी ठराव मंजूर करून घंटागाडी, चालक, कामगार, इंधन, देखभाल दुरुस्तीसह नव्याने ठेका देण्यासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली असतानासुद्धा परिषदेने नव्याने निविदा मागविता त्याच ठेकेदारास काम देऊन झुकते माप दिल्याचा प्रकार घडणे, सदरहू कामात नगरपरिषदेचे सबंधीत अधिकारी व ठेकेदार यांनी आर्थिक संगनमत करून मोठ्या प्रमाणात आर्थिक घोटाळा करण्यात येणे, यास्तव नगरपालिकेचे संबधीत अधिकारी यांना तात्काळ निलंबित करून त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची व संबधीत ठेकेदाराचा ठेका तात्काळ रद्द करून त्याला काळया यादीत टाकण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे येथील जनतेत निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. राम सातपुते, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २२७ | "हिंगोली नगर पालिकेला महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत मंजूर झालेल्या रस्त्याची पूर्ण झालेली कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची झाल्याचे नुकतेच माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये निदर्शनास येणे, उक्त अभ्यिानांतर्गत रस्त्याकरिता १०१ कोटीचा निधी मंजूर झाला असून यामध्ये ४६ रस्ते सिमेंटचे तर ११ रस्ते डांबरीकरणाचे असणे, सदरहू रस्त्यांची कामे पूर्ण झाली असून अवघ्या सहा महिन्यातच या रस्त्यावर जागोजागी खड्डे पडलेले असून वाहतुकीसाठी अडथळा निर्माण होत असणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक १ ऑगस्ट, २०२१ रोजी मा.नगरविकास मंत्र्याकडे पत्रव्यवहाराद्वारे चौकशीची केलेली मागणी, सदर मागणीच्या अनुषंगाने सदर निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांच्या कामाची पाहणी करण्याची आवश्यकता, तसेच दर्जाहीन व निकृष्ट दर्जाचे काम करून शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी वाया घालवणाऱ्या दोषी कंत्राटदारावरुद्ध कठोर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, तसेच यास जबाबदार असणाऱ्या दोषी ठेकेदारांची देयके तात्काळ थांबविण्याबाबत शासन स्तरावर करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.'' | श्री. संतोष बांगर, वि.स.स. | कित्ता |
| २२८ | "गोंदिया जिल्ह्यातील सडक/अर्जुनी व अर्जुनी/मोरगाव नगरपंचायतीच्या हद्दीतील शासकीय जमिनीवर मोठ्या प्रमाणावर अनेक वर्षांपासून अतिक्रमण करून कच्ची घरे बांधून नागरिक राहत असले तरी "सर्वांसाठी घरे-२०२२" च्या धोरणानुसार जमिनीचा पट्टा त्यांचे नावावर नसणे, त्यामुळे पंतप्रधान आवास योजना व रमाई घरकूल योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याची त्यांचेवर आलेली वेळ, नागरी क्षेत्रातील अतिक्रमणधारकांचे नावे जमिनीचे पट्टयांचे वाटप करून शासकीय घरकुल योजनेचा लाभ संबंधित कुटुंबांना देणेबाबत शासनाच्या नगरविकास विभागाचे दिनांक ६ मार्च, २०१८ चे शासन निर्णयाप्रमाणे, अतिक्रमित जमिनीचे पट्टे नावावर करून देण्याबाबत शासनाचे धोरण असणे, तथापि असे असतांनाही घरकुल योजनेचा लाभ देण्याबाबत नागरिकांनी केलेल्या मागणीला सडक अर्जुनी व अर्जुनी / मोरगाव या नगरपंचायतीकडून योग्य प्रतिसाद मिळत नसल्याबाबतच्या तक्रारी येणे, या तक्रारींवरुन मा.लोकप्रतिनिधींनी नगरपंचायतीचे पदाधिकारी व अतिक्रमण | श्री.मनोहर चंद्रिकापूरे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | धारकांची बैठक घेऊन घरकुलासाठी जमिनीचे पट्टे संबंधितांचे नावावर करून देणेबाबत निर्णय घेण्यांत येणे,परंतु एक वर्षापासून नगरपंचायतीचे पदाधिकारी व अतिक्रमित जमीनवाटप समितीचे अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकारी, गोंदिया यांनी कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास येणे, इतकेच नव्हेतर, शासनाचे धोरणानुसार अतिक्रमित जमिनीचे पट्टे वाटपाबाबत कार्यवाही न झाल्यामुळे दोन्ही योजनांची कोट्यवधी रुपयांची रक्कम जिल्हाधिकारी, गोंदिया यांचेकडे गेल्या दोन वर्षांपासून अद्याप अखर्चित असल्याचेही दिनांक ६ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, परिणामी सडक / अर्जुनी व अर्जुनी / मोरगाव परिसरातील जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे संबंधित नगरपंचायतीचे अधिकारी व जिल्हाधिकारी, गोंदिया यांचेविरुद्ध कारवाई करण्याची आवश्यकता तसेच संबंधितांना जमिनीचे पट्टे वाटपाची व घरकूल योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही करण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. | | |
| २२९ | "औरंगाबाद शहराला जायकवाडी धरणातुन पुरवठा होत असणे, परंतु पूर्वीची पाणी पुरवठायोजना जुनी व अपुरी पडत असणे, त्यामुळे राज्यसरकारने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेतून १६८० कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना मंजूर करणे, निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याकरता तब्बल १ वर्ष वेळ घेणे, त्यानंतर माननीय मुख्यमंत्री यांच्या हस्ते या योजनेचे भूमिपूजन करणे, परंतु अद्यापर्यंत राज्य शासनाने या योजनेसाठी निधि उपलब्ध करून न देने, जुन्या समांतर जलवाहीनीच्या महापालीकेकडे जमा असलेल्या पैशांमधूनच नवीन पाणीपुरवठा योजनेसाठी खर्च करने, गेल्या काही महिन्यांपासून हे पैसे देखील न मिळाल्या मुळे पाणीपुरवठा योजनेचे काम ठप्प असणे, या योजनेचे काम पूर्ण करण्याचा कालावधी ३६ महिने (३ वर्ष) असणे, आतापर्यंतच्या १ वर्षाच्या काळात साधारण ५० टक्के काम पूर्ण होणे अपेक्षित असणे, परंतु प्रत्यक्षत ५ ते १० टक्केच काम होने, त्यामुळे ही योजना पूर्ण न होण्याची शक्यता असणे व त्यामुळे औरंगाबाद शहराचा विकास खुंटने, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. अतुल सावे, नारायण कुचे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
| --- | --- | --- | --- |
| २३० | "नागपूर महागनर पालीके अंतर्गत मनपाच्या विविध विभागांसह विविध झोन कार्यालयांना स्टेशनरीचे वाटप करण्यात येत असणे, मे. मनोहर साकोरे ॲन्ड कंपनी, मे. स्वस्तीक ट्रेडींग ,, मे. गुरूकृपा स्टेशनरी, मे. एस.के. एंटरप्रायझेस व मे. सुदर्शन कंपनी य एकाच मालकाच्या विविध नावांच्या कंपन्यामार्फत स्टेशनरीचा पुरवठा करण्यात येणे, सदर्हु स्टेशनरी पुरवठा करीत असतांना स्टेशनरीचा पुरवठा न करता अधिकारी व कर्मचारी यांच्या खोट्या सह्या करून आरोग्य विभागामध्ये रू. २.१५ कोटी (१३१ फाईल), लायब्ररी विभाग रू. ७४.३ लाख (४७ फाईल), जन्म-मृत्यू विभाग रू. ६०.६७ लाख (४०फाईल), घनकचरा व्यवस्थापन विभाग रू. १.२३ कोटी (३३ फाईल), सामान्य प्रशासन भाग रू. ६८.०० लाख (८ फाईल), बिलांची रक्कम उचलण्यात आलेली असल्याचा धक्कादायक प्रकार माहे डिसेंबर २०२१ मध्ये उघडकीस येणे, सदर बिले मंजुर करतांना मनपातील लेखा विभागातील अधिकाऱ्यांनीसुद्धा तपासणी केली नसणे, या स्टेशनरी गैरव्यवहारामध्ये दि १३ डिसेंबर २०२१ रोजी संबंधित पुरवठादार कंपनी विरूद्ध गुन्हा दाखल करण्यात येणे, सदर गैरप्रकार हा एकाच विभागातील असून मनपाचे अन्य विभागांना कोट्यवधी रूपयांची स्टेशनरी पुरवठा करण्यात येणे, त्यामुळे मनातील अन्य विभागातील स्टेशनरी पुरवठ्याची चौकशी होणे गरजेचे असणे, तसे राज्य शासनाने सन २०२०-२०२१ व २०२१-२०२२ मध्ये मनपाला कोरोना महामारीमध्ये उपाय योजना करण्याकरिता रू. २५.०० कोटी आपात सहायता निधी देण्यात आलेला असणे, परंतु महामारीमध्ये विना निविदा नागपूर-कोटोल रोडवरील दहेगाव मार्गावरील राधास्वामी सत्संग केंद्रामध्ये १००० बेडच्या रूग्णालयाकरिता, शहरातील विविध भागामंध्ये कंटेलमेंट झोन उभारण्यास मोठ्याप्रमाणात खर्च करण्यात येणे, यामध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणात अनियमितता झालेली असल्याचे निदर्शनास येणे, नागरीकांच्या कराचे रूपाने जमा केलेल्या रकमेचा अशाप्रकारे गैरव्यवहार करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचे विरूद्ध कार्यवाही करण्याची नागरिकांनी मागणी करण्यात येणे, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व प्रतिक्रीया." | श्री. विकास ठाकरे, वि.स.स. | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २३१ | "डोंबिवली महापालिका हद्दीतील डोंबिवलीच्या खंबाळपाडा येथील कृष्णा कन्स्ट्रक्शन कंपनीचे शेषाराम चौधरी या विकासकाने महानगरपालिकेच्या गुरचरण जागा सर्व्हे क्र.३१ वर अनधिकृत इमारतीचे बांधकाम करून सदनिका विक्री करताना जी जाहिरात दिली त्यामध्ये सर्व्हे क्र.२९ हा दाखविण्यात येणे, परंतु सदरील जागेच्या ७/१२ उताऱ्यावरही महापालिकेचेच नाव असणे, असे असतानाही महापालिका आयुक्त, अतिक्रमणचे अतिरिक्त आयुक्त व वॉर्ड ऑफीसर यांचेसोबत आर्थिक संगनमत करून त्यावर सात मजल्याच्या पाच इमारतींचे बेकायदेशीर व अनधिकृत बांधकाम केल्याचा प्रकार नुकताच उघडकीस येणे, विकासकाने बांधकाम पूर्ण केल्यावर व वृत्तपत्रात वन आरके, वन बीएचके, टूबीएचके अशी जाहिरात देऊन करोडो रुपयांस फ्लॅटची विक्री करून कोट्यवधी रुपयांचा आर्थिक घोटाळा करण्यात येणे, महापालिकेच्या नगरविकास विभागाची कोणतीही परवानगी न घेता शासनाने प्लॅन मंजूर केल्याचे सांगून ग्राहकांची आर्थिक लूट करण्यात येणे, महापालिकेच्या नगररचना विभागाचे बनावट दस्तऐवज बनविणे, जिल्हाधिकाऱ्यांचे एन.ए.कागदपत्रे लावून रजिस्ट्रेशन करणे, यामुळे शासनाचा बुडालेला करोडो रुपयांचा महसूल, सदर प्रकरणी विकासका विरोधात टिळक नगर पोलीस ठाण्यात नुकताच गुन्हा दाखल करण्यात येणे, यावर अनधिकृत बांधकामावर कल्याण-डोंबिवली महापालिकेचे अधिकारी कारवाई करण्यासाठी गेले असता बांधकाम व्यावसायिकाने तेथे खोटे भाडोत्री दाखवून सदर इमारत ही रहिवासी असल्याचे दाखविणे, तसेच पोलीस प्रोटेक्शन देत नसल्याचे खोटे कारण सांगून महापालिकेचे अधिकारी अनधिकृत बांधकामास देत असलेले बेकायदा संरक्षण, यास्तव ह्या प्रकरणात आर्थिक संगनमत करून बेकायदा बांधकाम वाचविणाऱ्या महापालिकेच्या संबधित अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करून त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, शेषाराम चौधरी ह्या विकासकावर एम.आर.टी.पी.कायद्यानुसार गुन्हा दाखल असतानाही बांधकाम पूर्ण झाले असणे, निष्काषनाच्या कारवाईचे आदेश निघाले असतानाही संबधित अधिकाऱ्यांनी डोळेझाक करून इमारत पूर्ण करण्यास दिलेली मोकळीक, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. राम सातपुते, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २३२ | "नागपूर जिल्ह्यात अल्प व अत्यल्प भुधारक गोर-गरीब गरजू शेतकऱ्यांचा उत्पनाचा स्तर वाढविण्याकरिता प्रधानमंत्री खनिज कल्याण निधीतून दुधाळू गाई व शेळी वाटप योजना राबविली असणे, सदर योजनेच्या अंतिम याद्या लाभासाठी जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धेन विभागाला पाठविण्यात येणे, असल्यास या योजनेत तालुक्यातील दोन सर्कलला झुकत्या मापासह धनदांडग्यांची व पदाधिकारीअसलेल्या लाभार्थी म्हणून नावे असल्याने गरीब शेतकऱ्यांवर अन्याय होत असणे, सदर दुधाळू गाईंच्या यादीत सर्वांत जास्त राजोला जि.प. सर्कलमधिल-४३, सिल्ली-१५, कुही-३, वेलतूर-२ व मांढळ न सर्कलमधिल-१ असे एकुन ६४ तर शेळी वाटप मध्ये राजोला सर्कलमधील ५२ व सिल्लीमधील ६ असे एकूण ५८ लाभार्थ्यांची नांवे मंजूर होणे, असल्यास मांढळ व वेलतूर सर्कलमधील गरीब शेतकऱ्यांवर अन्याय होत असणे, नागपूर जि.प. पशुसंवर्धन विभागाने दुधाळ गाई व शेळी गट वाटप अनुदान योजना जाहीर होणे, सदर मंजूर यादीत तालुक्यातील गरीब व पात्र शेतकऱ्यांना डावलण्यात येणे, तर धन दांडग्याची, सधन व ग्रामपंचायत पदाधिकारी यांना स्थान देण्यात येणे, सदर दुधाळू गायी अनुदान योजनेच्या मंजूर यादीत रा. सिल्ली हल्ली कुही येथील प्रमिला महादेव जीभकाटे यांचे नाव असणे, सदर लाभार्थीचे पती महादेव जीभकाटे हे मांढळ कृषी उत्पन्न बाजार समितीचे उप सभापती असणे, सदर लाभार्थीचे पती-पत्नीचे वार्षिक उत्पन्न लाखो रुपयांचे असताना त्यांचे नावे दुधाळू गाई वाटप यादीत येणे हे आश्चर्य होत असणे, असल्यास शासनाने दखल घेऊन या यादीची फेरनिवड करणे व शासनाने सदर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, शासनाने यावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. समिर मेघे, मोहन मते, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री. टेकचंद सावरकर, विजय रहांगडाले, विनोद अग्रवाल, बंटी भांगडिया, वि.स.स. | कित्ता |
| २३३ | "शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील पाषाणे गाव परिसरातील मुक्ता जीवन सोसायटीमधील बॉयलर, देशी जातीच्या कोंबड्या अचानकपणे माहे फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या सुमारास मृत्यूमुखी पडणे, सदर घटनेचा बर्ड फ्ल्यू आजाराने मृत्यू झाल्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर परिसरातील एक किमी अंतरावरील सर्व कोंबड्या मारण्याचे आदेश काढण्यात येणे, तसेच विविध शासकीय विभागांतील १२५ अधिकारी व कर्मचारी यांनी परिसरातील | सर्वश्री. दौलत दरोडा, सुनिल प्रभू, योगेश सागर, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | तब्बल २३ हजार ४२८ पक्षी, ३ हजार ८०० किलो कुक्कुट खाद्य, १ हजार ६०३ अंडी नष्ट करण्यात येणे, मुक्ता जीवन येथील ज्या कोंबड्यांचा मृत्यू झाला त्यांना जे खाद्य देणे गरजेचे आहे ते न देता आजूबाजूला असलेल्या हॉटेलातील उरलेले व टाकलेले अन्न देत असल्याने त्यांच्या एकट्याच्या पोल्ट्रीमधील कोंबड्या मृत होणे, असे असतांनाही स्थानिक पोल्ट्री व्यावसायिकांच्या पोल्ट्रीमधील एकाही पक्षाला ही लागण झालेली नसतांना शासकीय अधिकाऱ्यांनी पक्षी, अंडी, खाद्य नष्ट करून मोठे आर्थिक नुकसान झाल्याने व्यापारी अडचणीत सापडणे, परिणामी या पोल्ट्री व्यावसायिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, शासनाने तातडीने स्थानिक पोल्ट्री व्यावसायिकांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| २३४ | "इतर मागास वर्ग समाजाच्या आरक्षण व आत्तापर्यंत शासनामार्फत दिल्या जाणाऱ्या सवलतींचा व इतर लाभांचा सर्वंकष दृष्टीने अभ्यास करून परिणामकारक कार्यान्वयन होण्याच्या दृष्टीने तसेच अतिरिक्त सवलती, लाभ प्रस्तावित करण्याच्या दृष्टीने अभ्यास करून मंत्रिमंडळाला शिफारस करण्यासाठी मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दि.१६ ऑक्टोबर, २०२० रोजी एका मंत्रिमंडळ उपसमितीचे गठन करण्यात आलेले असणे, या समितीने सव्वा वर्षाच्या कालावधीमध्ये बैठका व अहवाल तयार करण्याच्या दृष्टीने कोणतीच प्रगती केलेली दिसून आलेली नसणे, ओबीसी आरक्षणाचा मुद्दा न्यायप्रविष्ट असल्याने या समाजासाठी सवलतीच्या योजना राबवून दिलासा देण्यासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापन केलेली असणे, परंतु या समितीच्या रेंगाळलेल्या कामकाजावरून समितीला तसेच सरकारला इतर मागासवर्गीयांच्या कल्याणाबाबत कोणतीही संवेदना उरलेली नसल्याचे अधोरेखित होत असणे, पाच मंत्र्यांचा समावेश असलेल्या या समितीत तत्कालीन वने, भूकंप पुनर्वसन मंत्री यांनी राजीनामा दिल्यामुळे जी जागा रिक्त झाली आहे तीदेखील अद्याप भरण्यात आलेली नसणे, ओबीसींना दिल्या जाणाऱ्या सवलती व इतर लाभांचा अभ्यास करून अतिरिक्त लाभ देण्याच्या बाबतीत शिफारशी करण्यासाठी समितीचे कामकाज अधिक जलद गतीने करणेकामी उपसमितीस पूर्णतः अपयश आलेले असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. | सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री राम कदम, रवि राणा, अभिमन्यु पवार, वि.स.स | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २३५ | "देवसरी (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) या गावातील ९९ पुरग्रस्त बाधित दलित कुटुंबाच्या वस्तीचे शासनाने मंजूर केलेल्या मौजे आंबवन, ता.उमरखेड येथील जागेवरचे पुनर्वसन मागील १५ वर्षापासून रखडलेले असल्याचे माहे जानेवारी,२०२२ रोजी उघडकीस येणे, सन २००६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे व पैनगंगा नदीला आलेल्या पूरामुळे दलित वस्तीतील देवसरी गावामध्ये पाणी शिरणे मोठ्या प्रमाणात घरांची पडझड होऊन नुकसान होणे, याबाबतचे गांभीर्य लक्षात घेउन भविष्यात अतिवृष्टी झाल्यास पुरपरिस्थिती निर्माण होऊ नये यादृष्टीने तत्कालिन जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी मा.सचिव, मदत व पुनर्वसन यांना बाधित ९९ कुटुंबाचे पुनर्वसन करण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर करणे, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने दलित वस्तीमधील बाधित ९९ कुटुंबाचे पुनर्वसन आंबवन, ता.उमरखेड जि.यवतमाळ येथील शासकीय सर्वे नंबर ६ ई वर्ग -२ क्षेत्रफळ ५ अे ८१ आर जमिनीपैकी ३.०० हे.आर येथे सर्व सोयी-सुविधांसह करण्याबाबत प्रस्तावित करणे, परंतु शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या तक्त्यामध्ये "देवसरी गावाचे पुनर्वसन" असा उल्लेख केल्यामुळे शासनाच्या प्रचलित नियमानुसार व शासन निर्णयानुसार गावाच्या लोकसंख्येपैकी ७५ टक्के इतकी संख्या नसल्यामुळे सदर प्रस्ताव नामंजूर करीत असल्याबाबत मा. जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात येणे. प्रत्यक्षात पुनर्वसन हे संपूर्ण गावाचे नसून फक्त देवसरी गावातील दलित वस्तीतील बाधित ९९ कुटुंबांचे असल्याने सदरहू शासन निर्णय येथे लागू होत नसणे, प्रस्तावित चुकीच्या उल्लेखामुळे व शासन निर्णयाचा आधार घेत बाधित कुटुंबियाचे पुनर्वसन करण्यास जाणीवपूर्वक दिशाभूल केली जात असणे, दिनांक २३ मार्च,१९८४ रोजीचा महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयातील अे(१) नुसार अंशतः पुनर्वसन अंशतः पुनर्वसनाच्या सर्व सुविधा बाधित कुटुंबियांना शासनाकडून मिळणे बंधनकारक असणे असे असतानाही शासन निर्णयाचा व प्रस्तावात चुकीचा झालेला उल्लेख यावर लक्ष केंद्रित करून बाधित कुटुंबियावर अन्याय करण्यात येणे, यासंदर्भात मा. मदत व पुनर्वसन मंत्री, पालकमंत्री ,यवतमाळ जिल्हा, मा.जिल्हाधिकारी, यवतमाळ आदिंकडे पत्रव्यवहार करूनही अद्याप कोणतीच | श्री. संतोष बांगर, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | कार्यवाही न होणे, त्यामुळे देवसरी गावातील वस्तीचे पुनर्वसन करण्यासाठी शासनास सुधारित प्रस्ताव पाठविण्याबाबत उपजिल्हाधिकारी पुनर्वसन यवतमाळ यांनी उपविभागीय अधिकारी उमरखेड यांना दि २५/०१/२०२२ रोजी पत्र पाठविले असणे, परिणामी बाधित कुटुंबियांवर बेघर होण्याची आलेली वेळ, सदरहू देवसरी भागातील पुरग्रस्त दलित वस्ती ही निळया व लाल झोनमध्ये असल्याने शासनाच्या धोरणानुसार कोणत्याही सोयीसुविधा पुरविल्या जात नसणे, याबाबत मा.जिल्हाधिकारी यवतमाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ, जि. पुनर्वसन अधिकारी, यवतमाळ व उपविभागीय अधिकारी उमरखेड यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधिंनी केलेला पत्रव्यवहार, सदर प्रकरणी शासनाने गांभीर्याने लक्ष घालून शासनाकडूनच झालेल्या चुकीच्या उल्लेखामुळे गेल्या १५ वर्षांपासून प्रलंबित असलेले ९९ पुरग्रस्त बाधित कुटुंबियांचे पुनर्वसन शासनाने मंजूर केलेल्या मौजे आंबवन, ता. उमरखेड जि. यवतमाळ येथील जागेत करण्याबाबत शासन स्तरावरून तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका." | | |
| २३६ | "माहे जून २०२१ ते माहे ऑक्टोबर २०२१ दरम्यान राज्यात आलेल्या अतिवृष्टी, महापूर यासारख्या आपत्तीमध्ये राज्यशासनाने आपत्तीग्रस्तांना आर्थिक मदत देताना एनडीआरएफ/एसएडीआरएफ निकषांपेक्षा अधिकची मदत दिलेली असणे, राज्यात नैसर्गिक आपत्तीची संख्या वाढलेली असणे, नैसर्गिक आपत्तीच्या परिणामाने शेतीचे,पशुधनाचे तसेच नागरी वस्त्यांमध्ये घरांचे, दुकानांचे मोठ्या नुकसान होत असणे, आपत्तीग्रस्तांना मदत देण्यासाठीचे केंद्र शासनाचे एनडीआरएफ/एसएडीआरएफ निकष सात वर्ष होऊनही सुधारित केलेले नसल्याने राज्यात आपत्ती ग्रस्तांना मदत देताना अडचणी असणे,एसएडीआरएफ अंतर्गत राज्याचा वाटा ठरवताना डीझास्टर रिस्क इंडेक्स सुधारित करण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्याची गरज असणे,वाढत्या आपत्ती बघता आपत्ती व्यवस्थापनासाठी मोठ्या निधीची आवश्यकता असल्याने निधीसाठी पर्याय उभारण्याची गरज असणे, बदलते हवामान आणि तापमानवाढ हे मोठे आव्हान ठरत असल्याने वातावरणीय बदलांच्या परीणामांची दाहकता कमी करण्याच्या दृष्टीने राज्याचे सुधारित धोरण आखण्याची गरज | श्री. रोहित पवार वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र.<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | असणे,बदलते हवामान व तापमान वाढीच्या समस्यांचा सामना करण्यासाठी युवकांना सहभागी करून घेण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज असणे,वातावरणीय बदल संबंधित अभ्यासासाठी तसेच संशोधनासाठी राज्य शासनाकडून वित्तीय सहाय्य करण्याची गरज असणे.शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया. | | |
| २३७ | "मावळ तालुक्यातील मळवंडी ठुले प्रकल्पासाठी १९९७ मध्ये १२९ शेतकऱ्यांच्या जमिनी शासनाने संपादित केल्याने त्यांचे पुनर्वसनाच्या घेतलेल्या निर्णयास २५ वर्षानंतरही पर्यायी जमीन भूखंड वाटप प्रलंबित असणे, दि.०५/१२/२०१७, १६/०२/२०१९ शासन आदेशानुसार मळवंडी प्रकल्पग्रस्तांच्या पात्रतेनुसार मौजे डिंग्रजवाडी ता. शिरूर २३९ गटामध्ये अनुज्ञेय होणारी पूर्ण देय जमीन वाटप न करता अंशतः वाटप करणे, धरणग्रस्तांचे संपादित जमिनीचे बंदी दिनांकापूर्वीचे ८अ खात्यांनुसार त्यांना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जमीन वाटप संकलनांनुसार पात्र ठरविलेली देय जमीन वाटप न करणे, विद्यमान पुनर्वसन अधिकाऱ्याने आदेशात निश्चित केलेल्या कुटुंबसंख्येनुसार देय जमीन वाटप न करणे, शासनाच्या दि.१३/०५/२०१९ आदेशाविरोधात जमीन ताब्यात देण्यापूर्वीच कब्जेहक्काची रक्कम वसूल करणे, ताबा दिला नसणे, जमिनीस सिंचनाची व रस्त्याची सोय केलेली नसणे, ताबा दिल्यानंतर पुढील समान वार्षिक हप्त्याने रक्कम वसूल न करणे, प्रशासन अतिक्रमणधारकांवर पुनर्वसन अधिनिमातील कलम २१ पोट-कलम (१ ते ५) नुसार जमीनवाटप दिनांकापासून प्रतिदिवस १००० रु. प्रमाणे दंडात्मक वसुलीची कार्यवाही न केल्याने शासनाचा कोट्यवधीचा महसुल बुडवणे, उत्खनन झाले नसलेला खोटा अहवाल देणे, पोलीसांनी अद्यापही २७ व्यक्तींवर गुन्हे दाखल न करणे, सदर प्रकल्पग्रस्तांच्या संरक्षणाच्या उपाययोजना व प्रलंबित न्याय देणेकामी दिरंगाईबाबत शासनाकडून गुन्हे दाखल झालेले नसणे, त्याअनुषंगाने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. राम कदम, रवि राणा, अभिमन्यु पवार, डॉ. संदीप धुर्वे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २३८ | "यवतमाळ जिल्ह्यातील पुसद विधानसभा मतदारसंघात ब्राम्हणगाव महसुली मंडळ बोरी खु. महसुली मंडळ, शेंबाळ पिंपरी महसुली मंडळ तसेच गौळ खु. महसुली मंडळ व खंडाळा महसुली मंडळात दि. २९ व ३० सप्टेंबर, २०१९ रोजी अतिवृष्टी होऊन शेतकऱ्यांच्या पिकांची लक्षावधी रुपयांचे झालेले नुकसान, तेथील लोकप्रतिनिधींनी स्वतः उपजिल्हाधिकारी पुसद यांच्यासमोर इतर अधिकाऱ्यांसोबत पंचनामे केलेले असणे, परंतू अद्यापही शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळालेली नसणे, ज्या महसुली मंडळांना नुकसानभरपाई देण्यात आली ती महसुली मंडळे नुकसानभरपाई न मिळालेल्या ब्राम्हणगांव, बोरी खु., शेंगाळ पिंप्री, गौळ खु. व खंडाळा महसुली मंडळाच्या बांधला लागूनच असणे, त्यामुळे नुकसानभरपाई न मिळालेल्या शेतकऱ्यांत पसरलेला तीव्र असंतोष, ब्राम्हणगांव, बोरी खु., शेंगाळ पिंप्री, गौळ खु. व खंडाळा महसुली मंडळातील आपातग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई त्वरीत देण्याबाबत होत असलेली मागणी यावर शासनाने केलेली व करावयाची उपाययोजना." | श्री. इंद्रनिल नाईक, वि.स.स. | कित्ता |
| २३९ | "पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील पवना धरणासाठी सन १९६४ ते १९७२ दरम्यान १९ गावांतील १२०३ खाते धारकांच्या सुमारे २३९४ हेक्टर जमिनीचे शासनाकडून भूसंपादन होणे, यामध्ये एकूण बाधीत शेतकऱ्यांपैकी केवळ ३४० शेतकऱ्यांचे मावळ व खेड तालुक्यात कागदोपत्री पुनर्वसन करण्यात येणे, यातील बहुतांश शेतकऱ्यांच्या नावांची सातबाऱ्यावर नोंद नसून त्यांच्याकडे सदर जमिनीचा प्रत्यक्ष ताबा नसल्याचे निदर्शनास येणे, उर्वरित ८६३ प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असणे, या प्रकल्पग्रस्तांना खास बाब म्हणून सन २०१० साली जमिनीचे वाटप करण्याचा निर्णय सरकारने घेऊन तसे आदेश मावळ प्रांताधिकाऱ्यांना २०१२ मध्ये देऊनही अद्याप वाटपाचे काम पूर्ण न होणे, सन २०१३ साली तत्कालीन उपमुख्यमंत्री यांच्या बैठकीत पवना प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन वाटप करण्यासाठी पुन्हा जमीन मोजणी करण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब होणे, सदर प्रकल्पात संपादित क्षेत्र व शिल्लक क्षेत्राचे जलसंपदा विभागामार्फत मोजणी होऊनही त्या अहवालाचे महसूल व भूमी अभिलेख | श्री. सुनिल शेळके, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | विभागाकडून खातरजमा करणे बाकी असणे, सदर पुनर्वसनाच्याबाबतीत दिनांक २९ सप्टेंबर, २०२१ रोजी मा. उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील बैठक आयोजित होऊन सदर बैठकीमध्ये पुनर्वसनाचा प्रश्न लवकर मार्गी लागणे कामी मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे संबंधित विभागास उचित निर्देश होऊनही अद्याप हा विषय प्रलंबित असल्याने बाधित खातेदार व जनतेमध्ये शासनाच्या विरोधात निर्माण झालेली नाराजीची भावना व यावर शासनाने केलेली कार्यवाही व उपाययोजना | | |
| २४० | "अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यातील मौजे मातुलठाण, सरला, गोवर्धन, महाकालवडगाव, कमालपूर, खानापूर, भामाठाण आदि गोदावरी नदीकाठच्या पूररेषा नियंत्रण रेषेमधील गावांना नवीन गावठाण मंजूर करण्यात आलेले असणे, सन १९७२ मध्ये किंवा त्या दरम्यान जिल्हाधिकाऱ्यांमार्फत वरील सर्व गावांसाठी जमीन संपादन करण्यात आलेली असणे, तथापि सरला-२६७, गोवर्धन-३२८, भामाठाण-३३८, महाकालवडगाव-४१६, कमालपूर-११४, खानापूर-१६३ आणि मातुलठाण-३३८ एवढ्या मोठ्या संख्येने पात्र लाभार्थी असणे, तथापि जिल्हा पुनर्वसन अधिकारी किंवा तहसीलदार यांनी आज पावेतो संपादित गावठाणामध्ये प्लॉट पाडून सर्व लाभार्थ्यांना प्लॉटचे वाटप केलेले नसणे, त्यामुळे अद्यापही अनेक लाभार्थी, जुन्याच गावात धोकादायक स्थिती मध्ये राहत असणे, लाभार्थ्यांच्या नावे जमीन नसल्याने शेकडो लाभार्थ्यांना घरकुले मंजूर होऊनही रद्द होत असणे, शाळा, अंगणवाडी, पाणीपुरवठा योजना अशा सार्वजनिक अत्यावश्यक सुविधा पासून ग्रामस्थ वंचित राहत असणे, आणि याबाबत तहसीलदारांकडे सदर प्लॉट वाटपाबाबत वारंवार मागणी करूनही प्रशासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना.' | श्री.लहू कानडे, वि.स.स. | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २४१ | "माहे फेब्रुवारी व त्या सुमारास सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर शहर येथील २०० खाटांच्या सामान्य रुग्णालयाचे व मंगळवेढा शहर येथील १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या सार्वजनिक आरोग्य या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न ऐरणीवर येणे, पंढरपूर हे शहर जिल्ह्यातील व राज्यातील प्रमुख शहर असणे, शहरात दरवर्षी एकूण ४ वाऱ्या होत असणे, या वाऱ्याच्या निमित्ताने लाखो भाविक शहरात दर्शनाकरता येत असणे, येणाऱ्या भाविक व वारकऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने सध्या शहरात उपलब्ध असलेले उपजिल्हा रुग्णालय अपुरे पडत असणे, याकरताच दरवर्षी तात्पुरत्या स्वरूपाचे आरोग्य केंद्र उभारावे लागत असणे, या तात्पुरत्या आरोग्य केंद्रामुळे शासनावर दरवर्षी करोडो रुपयांचा बोजा पडत असणे, तसेच वाढते शहरीकरण लक्षात घेता येथील स्थानिक नागरिक व आसपासच्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अद्ययावत व सुसज्ज सेवा मिळणे करीता उपाय म्हणून सदर १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणी वर्धन करून २०० खाटांच्या सामान्य रुग्णालयात रूपांतर करण्याच्या प्रस्तावास तत्कालीन शासनाने सन २०१३-१४ साली मंजुरी देणे, परंतु प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे सदर प्रस्तावाच्या आराखड्यास पुन्हा सन २०१७ साली शासनाने मान्यता देणे, त्यानंतर तब्बल पाच वर्षे उलटून देखील अद्याप प्रशासनामार्फत अंदाजपत्रक सादर करण्यात न येणे, सततच्या पाठपुरावा केल्यानंतर स्थानिक प्रशासनाने पुन्हा सन २०२१ ला सुधारित अंदाजपत्रक आराखड्यासह मान्यतेकरिता शासनाकडे सादर करणे, तसेच मंगळवेढा शहर देखील तालुक्याचे महत्त्वाचे ठिकाण असणे सदर शहरातून NH१६६ हा राष्ट्रीय महामार्ग जात असून त्यामुळे मोठ्या प्रमाणावर रहदारी वाढून अपघाताचे प्रमाण वाढल्याने तातडीच्या उपचाराभावी जीवितहानी होत असणे, तसेच शहरातील व आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना सध्या असलेले ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय आरोग्य सेवेच्या दृष्टीने अपुरे पडत असणे, याकरताच तत्कालीन राज्यमंत्री सार्वजनिक आरोग्य यांनी सन २०१८ साली शंभर खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या श्रेणीवर्धनचा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश प्रशासनाला देणे, परंतु आदेश देऊन देखील प्रशासनाने अद्याप कोणतीच ठोस कारवाई न करणे, यामुळे | श्री. समाधान अवताडे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | सदरील शहरातील आरोग्य सेवेचे होत असलेले हाल, शासनाचे होणारे आर्थिक नुकसान आणि प्रशासनाची होत असलेली दिरंगाई यामुळे तेथील जनतेत पसरत असलेला क्रोध व असंतोष यावर उपाय म्हणून शासनाने पंढरपूर येथे २०० खाटांचे सामान्य रुग्णालय व मंगळवेढा येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय याचा श्रेणीवर्धनाचा प्रस्तावास तात्काळ मंजुरी देण्याच्या दृष्टीने करावयाची कारवाई व उपाययोजना." | | |
| २४२ | "माहिती अधिकारात मागितलेली माहिती विद्यापीठात उपलब्ध नसल्याचे लक्षात आल्यावर व त्याची खात्री पटल्यावर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.कालिदास चव्हाण यांनी दि. १३/१२/२०१७ रोजी जा.क्र. MUHS/UG/E-६/५७३/२०१७ चे पत्र सेक्रेटरी इंडीयन नर्सिंग कौन्सिल नवी दिल्ली व त्याची प्रत The Controller Of Publication Government Of India Department Of Publication Civil Line New Delhi यांना पाठवने त्याचबरोबर आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या अंतर्गत सुरु असलेल्या नर्सिंग कोलेजेस मध्ये बी.एस्सी, पी.बी.बी.एस्सी व एम.एस्सी नर्सिंग या अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठाच्या अंतर्गत सुरु असलेल्या नर्सिंग अभ्यासक्रमाच्या मान्यता बाबतचे Government Of India चे अधिकृत *Gazette Of Notification* नसल्याने राज्यातील पदवी व पदव्युत्तर नर्सिंग विद्यार्थ्यांचे प्रवेश व त्यांना मिळणारी विद्यापीठातील डिग्री हि बेकायदेशीर असून त्यांचे भविष्य अंधारमीय होण्याची शक्यता असणे त्याचबरोबर गेले तीन चार वर्ष हा विषय ऐरणीवर आला असता यामध्ये कोणीही लक्ष न घालणे तसेच महाराष्ट्र परिचर्या परिषदेवर प्रशासक असल्याने या विषयाकडे दुर्लक्ष होणे तसेच महाराष्ट्र परिचर्या परिषदेचे निवडणुका झाल्या असून त्याची कार्यकारणी अस्तित्वात येणे आणि जर महाराष्ट्र परिचर्या परिषदेने ठरवल्यास या विद्यार्थ्यांचे झालेल्या नोंदणी रद्द होणे व नवीन विद्यापीठातून नर्सिंग अभ्यासक्रम पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची नोंदणी न होणे असे झाल्यास हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात येण्याची शक्यता असून सर्वात महत्त्वाचे म्हणजे मागासवर्गीय इतर मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मिळणारी केंद्र व राज्य सरकारची शिष्यवृत्ती बंद होण्याची शक्यता असणे कारण शासनाची | श्री. राम सातपुते वि.स.स. | |

| अ.क्र.<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | शिष्यवृत्ती हि फक्त शासनाच्या मान्यता प्राप्त इन्स्टिट्यूशन मध्ये शिक्षण व डिग्री घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांनाच मिळणे. विद्यापीठातील सर्व नर्सिंग अभ्यासक्रमे हे केंद्र सरकारचे गॅझेट ऑफ नोटीफिकेशन (*Official Gazette*) नसल्यामुळे शासनाच्या मान्यता प्राप्त इन्स्टिट्यूशनच्या अंतर्गत न येणे जन माहिती अधिकारी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांनी दि. २७/११/२०१७ रोजी चुकीची माहिती देणे, याबाबत विद्यापिठामधील B.sc., P.B.B.sc, M.sc (Higher Qualification) नर्सिंग अभ्यासक्रमांस भारत सरकार यांचे मान्यता असलेले गॅझेट ऑफ नोटीफिकेशन (*Official Gazette*) विद्यापीठात उपलब्ध नसल्याने देता न येणे त्यानंतर दि. २२/१२/२०१७ ला अपिलेट अधिकारी तथा विद्यापीठाचे कुलसचिव यांच्याकडे माहिती अधिकार कायद्यांतर्गत अपील करणे, दि. १४/०२/२०१८ रोजी अपिलीय प्राधिकारी व तथा कुलसचिव डॉ. कालिदास चव्हाण यांचे अपील क्र. ३२६/२०१८ चे विवेचन व सुनावनीचे आदेश प्राप्त होणे त्याबरोबर भारत का राजपत्रक (Gazette Of India) या शीर्षक असलेल्या बनावट दस्तावेज महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे नर्सिंग अभ्यासक्रमाचे केंद्र सरकारच्या मान्यतेचे गॅझेट ऑफ नोटीफिकेशन असल्याचे भासवने व दि. १२/१२/२००३ रोजी माहिती अधिकारात दिले या गॅझेट ऑफ नोटीफिकेशन वरून असे दिसून येते की, हे गॅझेट ऑफ नोटीफिकेशन विद्यापीठाचे नसून बँकिंग परिचालन और विकास विभाग भारतीय रिजर्व बँक केंद्रीय कार्यालय यांचे असणे यामध्ये काही तरी गोडबंगाल असणे आणि विद्यापीठाला केंद्र शासनाच्या मान्यतेचे गॅझेट ऑफ नोटीफिकेशन INC च्या कायद्या प्रमाणे उपलब्ध नसल्याचे सिद्ध होणे याची सखोल चौकशी होणे गरजेचे असणे आणि संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून बनावट दस्तावेज तयार करून खरे असल्याचे भासवणे याबबत गुन्हा दाखल करणे शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
| --- | --- | --- | --- |
| २४३ | "मायणी, ता. खटाव, जि. सातारा येथील रूरल इन्स्टिटयूट ऑफ रिसर्च सेंटर व हॉस्पिटल, मायणी या मेडिकल कॉलेजच्या प्रवेशासाठी मोठ्या प्रमाणावर बोगस कागदपत्रे तयार केली असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली असणे, सदर मेडिकल ॲडमिशन होत असताना संस्था चालकांनी बारावी पासचे सर्टिफिकेट, मायग्रेशन सर्टिफिकेट, तसेच शाळेचे दाखले बोगस तयार करून विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश देऊन प्रक्रिया राबविली असणे, विद्यार्थ्यांना कमी मार्क असताना मेरिटमध्ये येण्यासाठी सर्व बोगस कागदपत्रे तयार करून ती शासनास सादर करून मायणी येथील रूरल इन्स्टिटयूट ऑफ रिसर्च सेंटर हॉस्पिटल येथे ॲडमिशन प्रक्रिया केली असून तेथे बोगस डॉक्टर तयार केले असे निदर्शनास आले असणे, यामध्ये तत्कालीन संस्थेतील पदाधिकारी व कर्मचारी यांनी संगनमताने हे काम केले असल्याचे निदर्शनास आले असून या संदर्भात १८-५-२०२१ रोजी मा.पोलीस अधीक्षक सातारा यांच्याकडे तक्रार दाखल केली असणे, त्यासंदर्भात अद्याप कोणतीही चौकशी केली नसणे, कोणताही गुन्हा अद्याप दाखल झालेला नसणे, यामुळे पात्र विद्यार्थ्यांना प्रवेशास मुकावे लागल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात मोठा असंतोष पसरलेला असणे. असेच जाळे महाराष्ट्रमध्ये अनेक ठिकाणी चालू असणे यामुळे पात्र विद्यार्थ्यांच्या मनात पसरलेला असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपयोजना." | ॲड राहूल कुल, वि.स.स. | कित्ता |
| २४४ | "राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील शिक्षकांनी डॉ.नितीन करमळकर समितीच्या शिफारशीनुसार व्यावसायरोध भत्ता वाढविणे, वैद्यकीय अभ्यास व पदव्युत्तर भत्ता एम्सच्या शिक्षकांनुसार देण्यात यावा, जोखीम भत्ता मंजूर करावा, अधिष्ठांताच्यासह संचालक व सहसंचालकांना विशेष देण्यात यावा, कुंठित वेतनवाढ सुरू करावी, सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजना सुरू करावी इत्यादी मागण्यांकरिता सुरू केलेले अध्यापन बंद आंदोलन, कोरोना काळात वैद्यकीय शिक्षकांनी पूर्ण क्षमतेने स्वतःच्या जीवाची पर्वा न करता केलेल्या रुग्ण सेवेची दखल घेऊन वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांसह शासनाने वैद्यकीय शिक्षकांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन देऊनही मागण्यांची प्रतिपूर्ती निर्णयात्मक मंजुरी देऊन करण्यास शासनाचे झालेले दुर्लक्ष, परिणामी शिक्षकांच्या आंदोलनामुळे दिनांक ०५ जानेवारी पासून वैद्यकीय पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे संपुर्ण अध्यापन | श्रीमती यामिनी जाधव, डॉ.बालाजी किणीकर, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | बंद होणे, परिणामी पदव्युत्तर विद्यार्थी, पालक वर्गात व शिक्षकांच्या मागण्या मान्य होत नसल्याने त्यांच्यात वाढता तीव्र असंतोष, शासनाने वैद्यकीय पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता वैद्यकीय शिक्षकांच्या मागण्या मान्य करण्याच्या अनुषंगाने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| २४५ | "राज्यातील १९ वैद्यकीय महाविद्यालयातील २२२० अस्थायी सहायक प्राध्यापक गेली अनेक वर्षे रुग्णालयात कार्यरत असणे, कोरोना काळातही त्यानी दिलेली अखंड सेवा देणे, त्यामुळे या प्राध्यापकांची शासन नियम अंतर्गत सेवा नियमित करण्याचे आश्वासन मा.वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी कोरोनाच्या पहिल्या लाटेच्या काळात देण्यात येणे, परंतु दोन वर्षे झाले तरी त्याबाबत कार्यवाही न झाल्यामुळे दि. ५ जानेवारीपासून या प्राध्यापकांनी साखळी उपोषण सुरू करून आजतागायत वेळोवेळी आंदोलने व त्यानंतर केलेले आत्मक्लेश आंदोलन करणे, तथापि, सदर आंदोलनादरम्यान एकीकडे रुग्णसेवा विस्कळीत होणे तर दुसरीकडे प्राध्यापकांनी पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे अध्यापनदेखील बंद करण्यात येणे, त्यामुळे विद्यार्थ्यांचे हजेरीसह अभ्यासक्रम पूर्ण करण्यावर होत असलेला परिणाम, गेल्या दीड महिन्यापासून आंदोलन सुरू असतांना शासनाने मात्र त्याकडे दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास येणे, सदर अस्थायी डॉक्टरांनी कोरोना काळात केलेली सेवा व शासनाने त्यांना शासकीय सेवेत नियमित करण्याचे दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्यासंदर्भात करावयाची कार्यवाही व उपाययोजना. | सर्वश्री. दिपक चव्हाण, अनिल पाटील, राजू कारेमोरे, मनोहर चंद्रिकापूरे, धर्मरावबाबा आत्राम, इंद्रनिल नाईक, चंद्रकांत नवघरे, नितीन पवार, दिलीपराव बनकर, ॲड. माणिकराव कोकाटे, श्रीमती सरोज आहिरे, सर्वश्री. सुनिल भुसारा, दौलत दरोडा, अतुल बेनके, दिलीप मोहिते-पाटील, ॲड. अशोक पवार, सर्वश्री. सुनिल शेळके, अण्णा बनसोडे, सुनिल टिंगरे, चेतन तुपे, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री. आशुतोष काळे, निलेश लंके, संग्राम जगताप, रोहित पवार, प्रकाश सोळंके, संदिप क्षिरसागर, बाळासाहेब आजबे, बाबासाहेब पाटील, बबनराव शिंदे, यशवंत माने, मकरंद जाधव-पाटील, शेखर निकम, मानसिंग नाईक, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री. सुनिल प्रभू, चंद्रकांत (दादा) पाटील, मंगेश चव्हाण, सुधीर मुनगंटीवार, डॉ. पंकज भोयर, श्री. सचिन कल्याणशेट्टी, वि.स.स. | कित्ता |
| २४६ | "सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठांतर्गत सर्व अभ्यासक्रमांच्या माहे ऑक्टोबर, २०२० पासून ऑनलाईन पद्धतीने परिक्षा घेण्यांत येणे, सदर परिक्षेकरिता कोणत्याही प्रकारे निविदा न मागविताच तसेच विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेची मान्यता न घेता आयसीटीआरडी या खासगी कंपनीला रुपये ३५/- प्रति पेपर याप्रमाणे परीक्षा | श्री. यशवंत माने, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | आयोजित करून त्यानुसार पेपर तपासणीचे कंत्राट देण्यांत आले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये निदर्शनास येणे, वास्तविकतः राज्यातील इतर सर्व अकृषी विद्यापीठांमध्ये या कामासाठी रुपये ५ ते रुपये १२ प्रति पेपर इतका दर आकारला जात असताना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाने मात्र निविदा न मागविता व विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेची मान्यता न घेताच, आयसीटीआरडी या कंपनीला चढ्या दराने काम देऊन अवास्तव खर्च करून त्यामध्ये आर्थिक घोटाळा करण्यात आल्याचेही माहे ऑक्टोबर, २०२० व माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास येणे, त्यामुळे शासनाने याप्रकरणाची चौकशी करण्यांत यावी, अशी मागणी विद्यापीठ व्यवस्थापन सदस्य तसेच विद्यार्थी व पालक वर्गांकडून करण्यांत येऊन निधीची अफरातफर करणाऱ्या सर्व संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी करण्यांत आली असल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास येणे, तथापि अद्यापही शासनस्तरावर कोणतीही कार्यवाही करण्यांत आली नसल्याचे दि. १५ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, परिणामी विद्यापीठ व्यवस्थापन समिती सदस्यांमध्ये तसेच जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व त्याप्रकरणी शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची भूमिका." | | |
| २४७ | "दि. १५ मार्च १९७४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीची स्थापना करणे, या समितीवर डॉ. बाबासाहेब यांचे अप्रकाशित साहित्य छापून ते लोकांसमोर आणण्याची जबाबदारी शासनाने सोपविणे, त्याअन्वये समितीने सुमारे २२ खंडाचे प्रकाशन करणे, उक्त २२ प्रकाशने लोकांच्या प्रचंड पसंतीस उतरणे व या प्रकाशित साहित्यातून अनेक विचारवंत, प्राध्यापक व शिक्षक यांनी शोध निबंध सादर करणे, हे साहित्य लोकांच्या पसंतीस आल्याने अजूनही अप्रकाशित असलेले साहित्य प्रकाशित करण्याची जनतेकडून होत असलेली मागणी, तथापि सन २००६ पासून या समितीने डॉ. बाबासाहेब यांचे अप्रकाशित साहित्य प्रकाशित न करणे, "प्रॉब्लेम ऑफ रुपी" हा ग्रंथ प्रकाशित करण्यात येणे, तसेच अन्य दहा ग्रंथ प्रकाशनाच्या मान्यतेसाठी प्रतिक्षेवर असणे, परंतु | श्री. बळवंत वानखडे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | शासनाच्या उदासीन धोरणामुळे यास मान्यता न मिळणे, आजवर प्रकाशित झालेल्या इंग्रजी प्रकाशनाची मराठी या मातृभाषेतून प्रकाशित करण्याची विचारवंत, अभ्यासक व विद्यार्थी यांच्याकडून सातत्याने होत असलेली मागणी, मा. उच्च न्यायालयानेदेखील स्वतःहून दखल घेऊन अप्रकाशित साहित्य तसेच प्रकाशित साहित्य लोकांपर्यंत पोहोचविण्याच्या जबाबदारीचे भान शासनास व्हावे म्हणून सु मोटो याचिका दाखल करणे, एकूणच शासनाचे या महत्त्वपूर्ण बाबींकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे जनतेत पसरलेले नैराश्य व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने अप्रकाशित साहित्याशी मंजुरी देण्याची तसेच इतर साहित्य प्रकाशित करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत तातडीने करावयाची उपाययोजना, शासनाची भूमिका व प्रतिक्रिया." | | |
| २४८ | "गंगाखेड (ता. गंगाखेड, जि. परभणी) येथील शेतकरी खरीप हंगाम २०१८, दुष्काळी अनुदान व २०२० चा मंजूर खरीप पिकविमा मिळण्याकरिता तहसिल कार्यालयासमोर १५ दिवसांपासून साखळी उपोषण करीत असणे, गंगाखेड मंडळाचा पिकविमा अतिवृष्टीमध्ये कोल्हापूर मंडळाला वळविला असणे, त्यामुळे शेतकरी त्यांच्या हक्काच्या निधीपासून वंचित राहणे, अद्यापही स्थानिक प्रशासनाने कोणतीही कार्यवाही न करणे, विमा कंपन्या मंजूर खरीप पिकविमा व दुष्काळी अनुदान बाधीत शेतकऱ्यांना देण्यास टाळाटाळ करीत असणे, अजूनही यातील एक रुपयाही शेतकऱ्यांना मिळाला नसणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी (गंगाखेड) यांनी मा.कृषी मंत्री यांना वेळोवेळी पत्रव्यवहार करून संबंधीत शेतकऱ्यांना निधी मिळण्याकरिता विनंती करणे, परंतु याबाबत कोणताच निर्णय न होणे, पिकविमा व दुष्काळी अनुदानापासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आल्याने त्यांनी आंदोलनाचा पवित्रा घेणे, मतदार संघातील २८४ गावे साखळी उपोषण करीत असणे, याबाबत शासनाने तातडीने ठोस निर्णय घेऊन खरीप हंगाम २०१८, दुष्काळी अनुदान व २०२० चा मंजूर खरीप पिकविमा शेतकऱ्यांना मिळण्यासंदर्भात करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. रत्नाकर गुट्टे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २४९ | "मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी कृषी विषयक माहिती, कृषी उत्पादनात वाढ होण्याच्या अनुषंगाने विविध प्रयोग व संशोधन करण्यासाठी व विद्यार्थ्यांना कृषी विषय शिक्षण मिळावे याकरिता परभणी येथे वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाची स्थापना करण्यात येणे, सदर कृषी विद्यापीठात सद्यःस्थितीत ५२ ते ५३ टक्के कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असणे, सन २०१७ पासून रिक्त पदे भरण्याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, विद्यापीठ प्रशासनामार्फत दर ३ महिन्यांनी शासनाकडे रिक्त पदाबाबतचा अहवाल सादर करण्यात येणे, तथापि परभणी येथील कृषी विद्यापीठातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी कृषीविषयक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्याचा होणारा विपरीत परिणाम, त्याचप्रमाणे कृषीविषयक संशोधन करण्यात येत असलेल्या अडचणी, गेल्या कांही वर्षापासून मराठवाड्यात ओला दुष्काळ, अवकाळी पाऊस अशा नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी संकटात सापडलेला असणे, त्यामुळे कृषी विषयक संशोधनाची नितांत आवश्यकता असणे, परंतु कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदामुळे संशोधनाचा अभाव भासत असणे, शासनाने रिक्त असलेली सर्व पदे तात्काळ भरण्याची आवश्यकता, तसेच वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाला यावर्षी ५० वर्षे पूर्ण होणे, यानिमित्त शासनामार्फत ५० कोटी रुपयांचा विशेष निधी मंजूर करण्यात येणे, सदर निधी कृषी क्षेत्राची गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने नवनवीन संशोधन कार्य व कृषीविषयक शिक्षण घेणाऱ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याच्या अनुषंगाने अत्यल्प असणे, त्यामुळे सदर निधीत वाढ करून किमान १०० कोटी रुपये मंजूर करण्याची आवश्यकता, शासनाने याबाबत निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता वा शासनाची प्रतिक्रिया.'' | डॉ. राहूल पाटील, वि.स.स. | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २५० | "माहे फेब्रुवारी व त्या सुमारास पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील डाळिंब फळाच्या लागवडीवर पडत असलेला खोडकिडीचा (शॉर्टहोल बोअरर) प्रश्न ऐरणीवर येणे, सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यात ५००० हेक्टर व पंढरपूर तालुक्यातील १२००० हेक्टर असे एकूण १७००० हेक्टर क्षेत्रामध्ये डाळिंब फळाची लागवड होत असणे, परंतु मागील दोन वर्षांपासून दोन्ही तालुक्यात डाळिंबाच्या फळांवर पडणाऱ्या खोडकिडी या रोगाने उच्छाद मांडलेला असणे, सदरच्या रोगाची तीव्रता इतकी आहे की झाडे जळून अख्खे बागच्या - बागेचे नुकसान होत असणे, यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका येथील स्थानिक शेतकऱ्यांना बसत असणे, यावर कृषी विभागामार्फत प्रशिक्षण राबविण्यात येत असणे, परंतु सदरच्या प्रशिक्षण म्हणजे शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्यासारखे असणे, यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष पसरलेला असणे, यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या आदेशाने जिल्ह्यातील कृषी विभागामार्फत सखोल सर्वेक्षण करून रोगावर नियंत्रण मिळावे अशी उपाययोजना करण्याची आवश्यकता असणे, तसेच आता तात्पुरत्या स्वरुपाचा उपाय म्हणून झालेल्या आर्थिक नुकसानाची त्वरित भरपाई करण्याची मागणी शेतकऱ्यांन मार्फत करण्यात येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. समाधान अवताडे, वि.स.स. | कित्ता |
| २५१ | "महाराष्ट्र हे फलोत्पादनात अग्रेसर राज्य असून राज्यात फळ पिकाखालील एकूण क्षेत्र १२.८९ लाख हेक्टर असणे, पुणे जिल्हा सिताफळासाठी भौगोलिक हवामानामुळे विशेष प्रसिद्ध असून पुरंदर तालुक्यातील सिताफळ हे महत्वाचे कोरडवाहू फळपिक म्हणून घेतले जात असणे, पुणे जिल्ह्यतील शेतकऱ्यांना या फळपिकाबाबत अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असणे, त्यामध्ये सिताफळाची साठवण क्षमता, उच्च दर्जाची जातिवंत कलमे, जुन्या बागा व जुने तंत्रज्ञानावर आधारित लागवड, पाण्याच्या अपुऱ्या सोयी, निर्यात योग्य असे सिताफळांचे वाणांचा अभाव, सिताफळाचे बहार व्यवस्थापन, काढणीनंतरचे व्यवस्थापन व तंत्रज्ञान सुविधांची कमतरता, आधुनिक यांत्रिकीकरणाचा अवलंब होत नसणे, इत्यादी बाबींचा विचार करता सिताफळाची उत्पादकता व दर्जा वाढविण्यासाठी शासनाकडून कोणतीही उपाययोजना होत नसणे, पुणे जिल्ह्यात नागपूर, अमरावती व वर्धा या जिल्ह्यांप्रमाणे स्थापन झालेल्या सिट्रस इस्टेट च्या धर्तीवर सिताफळ इस्टेट, स्थापन करण्याचा निर्णय घेण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व यावर प्रतिक्रिया." | श्री. संजय जगताप, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २५२ | "अंबरनाथ (जि.ठाणे) शहराचे वाढते शहरीकरण व शहरातील वाढती लोकसंख्या यामुळे सद्यःस्थितीत पाणी टंचाईचा प्रश्न गंभीर होत चाललेला असणे, सद्यःस्थितीत अंबरनाथ शहराला १४० एम.एल.डी. पाणी कोटा मंजूर असून त्यापैकी १२० एम.एल.डी. पाणी उल्हासनदीमधून उचलले जात असणे, उर्वरीत २० एम.एल.डी. पाणी कोट्यापैकी १० एम.एल.डी. एमआयडीसीला परत देणे व त्या ऐवजी ६ एम.एल.डी. फॉरेस्ट नाका व ४ एम.एल.डी. पालेगाव येथे मंजूर करण्याबाबत मा. पाणीपुरवठा मंत्री यांच्या दालनात झालेल्या बैठकीत लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, अंबरनाथ शहराला वाढीव पाणीपुरवठा मिळावा याकरिता अंबरनाथ विधानसभा क्षेत्राच्या लोकप्रतिनिधींनी मा.पाणीपुरवठा मंत्री यांच्याकडे वारंवार मागणी केलेली असणे, मागणीच्या अनुषंगाने मा.पाणीपुरवठा मंत्री महोदयांनी एम.आय.डी.सी. ला वाढीव पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्याबाबत सूचना केलेल्या असणे, परंतू अंबरनाथ शहराचा विकास व शहरातील लोकसंख्या ज्याप्रमाणे दिवसेंदिवस वाढत आहे त्याप्रमाणात भविष्यातही सुरळीत पाणीपुरवठा करता यावा याकरीता सन २०४८ ची अंदाजीत लोकसंख्या लक्षात घेऊन मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील महानगरपालिका व नगरपालिका यांच्याकडील उपलब्ध पाणी आरक्षण हे कमी असणे, त्यामुळे भविष्यातील पाणी टंचाई व पाण्याची मागणी याचा विचार करता पाण्याचे नवीन स्त्रोत निर्माण करण्याची आवश्यकता, अंबरनाथ शहराला वाढीव पाणी पुरवठा उपलब्ध मिळावा याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा. पाणीपुरवठा मंत्री, मा. उद्योगमंत्री, ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्याकडे वारंवार पाठपुरावा केलेला असणे, शासनाने मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामधील शहराचे वाढते शहरीकरण व वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन पाण्याचे नवीन स्त्रोत निमार्ण करून पाणीसाठा क्षमता वाढविण्याच्या अनुषंगाने तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता वा शासनाची प्रतिक्रिया." | डॉ. बालाजी किणीकर, वि.स.स. | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २५३ | "राज्यात विशेषतः मराठवाडयात वारंवार पडणारा दुष्काळ व त्यामुळे होणारी तीव्र पाणी टंचाई यावर उपाय म्हणून मागील सरकारच्या काळात ३ वर्षे ४ हजार टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला असणे, लातूरला तर रेल्वे वाहिनींच्या माध्यमातून पाणीपुरवठा करण्यात आला असणे, मराठवाड्यातील ११ मोठी धरणे बंद पाईपद्वारे एकमेकांना जोडणी करून मराठवाड्यातील दुष्काळाची समस्या कायमची दूर करण्याच्या दृष्टीने सरकाने डीपीआर तयार केला असणे, ८ पैकी औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद या ५ जिल्ह्यांच्या निविदा प्रसिद्ध झाल्या असणे व परभणी, हिंगोली, नांदेड डीपीआर तयार झाला असणे, तथापि, त्यावरील काम मात्र सरकारकडून अद्यापही न होणे, प्रत्येक कुटुंबाला नळाद्वारे स्वच्छ पाणीपुरवठा उपलब्ध करण्यासाठी केंद्राकडून जलजीवन मिशन योजनेंच्या माध्यमातून राज्याकरिता रुपये २४ हजार कोटी मंजूर करण्यात आले असणे, त्यापैकी रुपये १९३५.६२ कोटी निधी राज्याला प्राप्त झाला असणे, राज्याने आतापर्यंत २६०.३९ कोटी म्हणजेच १३.४५ टक्के निधी खर्च करण्यात येणे, दोन वर्षांत राज्याला या कामात नियोजनबद्ध प्रगती करता येणे शक्य असताना नळद्वारे स्वच्छ पाणीपुरवठा योजना शासन दप्तरी पडून असणे, राज्यात ४० हजार गावांत १ कोटी ४२ लाख घरे असणे, प्रत्येक घरात स्वच्छ पाणी पुरवठा योजना राबविणे अपेक्षित असताना ऑनलाईन आकडेवारीप्रमाणे फक्त ३८ हजार गावांमध्ये ही योजना अंमलात आली असणे, असे असताना शासनाने मात्र राज्यातील १ कोटी घरांना ५५ लीटर डरडोई प्रमाणे नळ कनेक्शन दिल्याची धादांत खोटी व जनतेची दिशाभूल करणारी नोंद शासन दप्तरी उपलब्ध असणे, महाराष्ट्र जीवन प्रधिकरणाने मोठ्या प्रमाणात ऑनलाईन निविदा प्रसिद्ध केल्या. परंतु त्या सर्व निविदा ३० टक्के ते ३५ टक्के जादा दराने असल्याचे निदर्शनास येणे, ५ हजार कोटी रुपयांच्या निविदा मंजूर करताना २० ते २५ टक्यांहून अधिक रक्कम मोजावी लागत असल्याने मंत्रालय हे भ्रष्टाचाराचे अड्डे बनल्याची गंभीर बाब उघडकीस येणे, जल जीवन मिशन योजना राबविण्याकरिता केंद्र सरकारने काही निकष ठरवून दिले असताना ते धाब्यावर बसवून सरकार दलालांच्या माध्यमातून स्वच्छ नळ पाणीपुरवठा योजनेचा खेळखंडोबा करीत असल्याकची गंभीर बाब उघडकीस येणे, याबाबत शासनाने लक्ष घालून तात्काळ करावयाची कारवाई व उपाययोजना.'' | सर्वश्री. बबनराव लोणीकर, देवेंद्र फडणवीस, सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २५४ | "मा.डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना ही आदिवासी भागात राबविली जाते. परंतु स्तनदा माता गरोदर महिला भगिनी यांना अंगणवाडी केंद्रावरती येणे मुश्किल असणे, त्यामुळे प्रत्यक्षात या अमृत आहाराची जागेवर वाटप होणे अडचणीचे असणे, म्हणून हा आहार त्या वाड्या-पाड्यांमध्ये प्रत्यक्ष घरी नेऊन देण्यास शासन परवानगी देणार काय, देणार असल्यास, ही अंमलबजावणी कधीपासून व किती दिवसांपासून करणार." | डॉ. किरण लहामटे, वि.स.स. | कित्ता |
| २५५ | "लोणार येथील (जि.बुलढाणा) कोलवड शिवारामध्ये आदिवासी मुला-मुलींचे शासकीय वसतिगृह बांधण्याचे काम सुरू असून ते अत्यंत निकृष्ट दर्जाचे सुरू असल्याचे दिनांक १६ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय अकोला येथील प्रकल्प आढावा समितीच्या सदस्यांनी केलेल्या पाहणीत आढळून येणे, सदरच्या बांधकामास लागणारी चुरी नसून निव्वळ डस्टचा वापर करून सिमेंट अल्पशा प्रमाणावर वापरण्यात येत असल्याचे निदर्शनास येणे, सिमेंट व लोखंड निकृष्ट दर्जाची असून रेती ऐवजी निव्वळ बगडा वापरण्यात येणे, सदरच्या निकृष्ट साहित्यामुळे भविष्यात सदरील इमारत कोसळून मोठी दुर्घटना होण्याची शक्यता, आदिवासी विकास बांधकाम विभागाचे इंजिनिअर पैठणकर हे कामाबाबतची माहिती देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करणे, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याबाबत लेखी निवेदन देण्यात येणे, परंतु अद्यापही त्यावर कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २५६ | "यवतमाळ येथील महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या उपप्रादेशिक कार्यालयात तब्बल ६२ लाखांचा अपहार झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या सुमारास उघडकीस येणे, या प्रकरणी लोहारा पोलीसांनी ११ जणांविरुद्ध कलमान्वये गुन्हा दाखल करणे, सदरहू प्रकरणी चौकशी करणारी याचिका (क्र.१५३/२०१२) मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली असता सुनावणी दरम्यान न्यायालयाने राज्य शासनाला निवृत्त न्यायाधिशांमार्फत चौकशी करण्याचे निर्देश देण्यात येणे, सदरच्या निर्देशानुसार केलेल्या चौकशीत विभागातील गैरव्यवहार, अफरातफर व फसवणूकीचा प्रकार उघडकीस येणे, सदर प्रकरणी तातडीने गुन्हा दाखल करून कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. नामदेव ससाने, वि.स.स. | कित्ता |
| २५७ | "राज्यातील सर्व शाळांमध्ये दिनांक ३० जून २०१६ नंतर प्राथमिक शिक्षकांच्या रिक्त पदावर होणारी नवीन नियुक्ती ही शिक्षक पात्रता परिक्षा टीईटी व सीटीईटी उत्तीर्ण धारकाची राहिल असे स्पष्टपणे नमूद असतानासुद्धा आदिवासी विकास विभागातील शिक्षक भरती करताना पात्रताधारक उमेदवार न मिळल्याचे कारण सांगून शिक्षक भरती प्रक्रिया राबविली जात असणे, हे पूर्णपणे चुकीचे असून राज्यात टीईटी व सीटीईटी पात्रता धारकांची संख्या मोठ्या प्रमाणात असून पात्रताधारक उमेदवारांना जाणीवपूर्वक डावलण्याचा प्रयत्न केला जात असणे, सन २०१८ मध्ये आदिवासी विकास विभागांतर्गत झालेल्या आश्रमशाळामधील शिक्षक भरती प्रक्रियेत बोगस भरती करण्यात येणे, राज्यातील होणाऱ्या सर्व शिक्षक पदाची भरती प्रक्रिया ही पवित्र पोर्टल मार्फत करण्यात यावी, असे निकष असतानासुद्धा आदिवासी विकास विभागात होणाऱ्या शिक्षक भरतीत वेगळे निकष वापरुन भरती करण्यात येणे, यामुळे या भरतीप्रक्रियेत अपादर्शी कारभार व भरती प्रक्रियेतील अनियमितता, बोगस व भोंगळ कारभारामुळे पात्रताधारक उमेदवारांवर अन्याय होत असल्याने त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबात राज्य शासनाने तातडीने चौकशी करून आदिवासी विकास विभागातील शिक्षकांची भरती प्रक्रिया पारदर्शी करण्यासाठी करावयाची कारवाई व याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | सर्वश्री. नानाभाऊ पटोले, सुरेश वरपुडकर, श्रीमती सुलभा खोडके, श्री. विकास ठाकरे, कुमारी प्रणिती शिंदे, श्री. अमिन पटेल, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. जितेश अंतापूरकर, कुणाल पाटील, सुभाष धोटे, मोहनराव हंबर्डे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २५८ | “राज्यातील आदिवासी विभागाच्या अनुदानातील आश्रमशाळांना आश्रमशाळा संहितेप्रमाणे शासनाकडून विद्यार्थ्यांच्या भोजनापोटी द्यावयाचे परिपोषण अनुदान वेळेवर मिळण्यास होणारी दिरंगाई व अडवणुक, यामुळे विद्यार्थीच्या भोजन, शैक्षणिक व इतर सोयी सवलतीवर होणारे परिणाम, आश्रमशाळा संहितेप्रमाणे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीबाबत संच मान्यतेबाबत शासनाकडे वारंवार पाठपुरावा करुनही त्याबाबत निर्णय न घेणे, आदिवासी आश्रमशाळाच्या उच्च माध्यमिक आश्रमशाळेत गणित/भौतिकशास्त्र या विषयासाठीच्या एका अतिरिक्त पदास मंत्रीमंडळाच्या मान्यता मिळाली असुन त्याप्रमाणे शासनाचे आदेश निघालेले असताना ते पद भरण्यास परवानगी न दिल्याने आदिवासी विद्यार्थ्यांना फक्त एकाच शाखेत म्हणजे मेडिकल किंवा इंजिनियरींगला जाता येत असल्यामुळे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाला पर्याय उपलब्ध नसणे, इतर विभागातील पद भरतीस मान्यता मिळत असतांना फक्त विज्ञान शिक्षक भरतीस परवानगी मिळण्यासाठी वित्त विभागाची अडवणूक, महागाईच्या काळात पहारेकरी पदास २४ तासासाठी दरमहा फक्त रुपये ५००० हे तुटपुंजे मानधन मिळत असल्यामुळे कोणीही व्यक्ती या पदावर काम करण्यास तयार नसणे, त्यामुळे मानधन वाढविण्याबाबत आदिवासी विभागाने तात्काळ निर्णय घेणे, यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेचा प्रश्न निर्माण होत असल्यामुळे दोन पहारेकरी पद भरण्यास मान्यता देणे, कोरोना काळात आश्रमशाळांमधील मृत्यूमुखी पडलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या रिक्त जागावर व सेवानिवृत्तीमुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची पदे रिक्त झालेली पदे न भरल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असणे, ही पदे तात्काळ भरण्यास मान्यता देण्याबाबत निर्णय घेणे, आश्रमशाळांतील लहान मुलांसाठी सफाईगाराचे पद नसल्यामुळे मुलांच्या आरोग्यावर होणारे परिणाम लक्षात घेता मानधन तत्वावर महिला व पुरुष सफाईगार पदास तात्काळ मान्यता मिळणे, विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेता व आरोग्याच्या दृष्टीने सहाय्यक अधिक्षक व सहायक अधिक्षिका हे पद भरतीस प्राधान्याने मान्यता मिळणे, अनुदानित आदिवासी आश्रमशाळेत प्रत्येक वर्गात किमान ३० विद्यार्थ्यांची अट शिथिल करून ३० पेक्षा कमी विद्यार्थी असल्यास ते ग्राहय धरुन त्याप्रमाणे परिपोषण | श्री. टेकचंद सावरकर, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | अनुदान देणे, आश्रमशाळा शैक्षणिक गुणवता वाढीसाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत शिक्षण समृद्धी प्रशिक्षण सारखे प्रशिक्षण शिक्षकांना देण्यात यावे इ. अनेक मागण्यांवर शासनाकडे वारंवार निवेदने दिली असता त्यावर शासनाचे होणारे दुर्लक्ष, यावर करावयाची उपाययोजना व करावयाची कार्यवाही." | | |
| २५९ | "१३००० सिंचन विहीर कार्यक्रमांतर्गत सन २०१९ मध्ये वर्धा जिल्ह्यात अनेक विहिरींचे काम हाती घेण्यात येणे, यापैकी काही विहिरी अतिवृष्टीमुळे व काळ्या मातीचे क्षेत्र असल्यामुळे खचल्याचे निदर्शनास येणे, मात्र विहिरींचे मोजमाप होऊ न शकल्यामुळे या शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम देण्यात न येणे, याचे प्रातिनिधिक उदाहरण म्हणजे मनीष उभाड या मौजे लाडेगाव, ता. आर्वी, जि. वर्धा येथील शेतकऱ्याची स. नं. १३२ क्षेत्र, १.५९ हे.आर. येथे या कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेली विहीर असणे, सदर विहिरीचा व्यास ६.५ मीटर व खोली ३० फूट झाल्यानंतर विहिरीचे बांधकाम सुरू करून ते पूर्ण करण्यात आलेले असणे,याबाबत विहिरीचे मोजमाप घेण्यात यावे याकरिता जलसंधारण अधिकारी, लघु पाटबंधारे विभाग, आर्वी यांचे कार्यालयातील कनिष्ठ अभियंता व उपविभागीय अभियंता यांना भ्रमणध्वनी करून तसेच प्रत्यक्ष भेटून विनंती करण्यात येणे, तथापि कोविड १९ महामारीचे व निधी उपलब्ध नसल्याचे कारण सांगून मोजमाप करण्यास अधिकाऱ्यांकडून नकार देण्यात येणे, अशातच दि. २५ मे, २०२० च्या सुमारास अतिवृष्टीमुळे व काळ्या मातीच्या क्षेत्रामुळे विहिर खचणे, विहीर खचल्यामुळे मोजमाप घेता येत नाही असे सांगून अखेरपर्यंत मोजमाप घेण्यात न येणे, त्यामुळे शेतकऱ्याला अनुदानापासून वंचित राहावे लागणे, जर वेळीच मोजमाप करून एम. बी. रेकॉर्ड तयार केला असता तर अनुदानापासून वंचित राहण्याची वेळ शेतकऱ्यावर आली नसती हे स्पष्ट असणे, तथापि यामध्ये शेतकऱ्याची कोणतीही चूक नसताना अधिकाऱ्यांच्या वेळकाढूपणामुळे शेतकऱ्यांवर अन्याय होत असणे, विशेष म्हणजे खचलेल्या विहिरीचा शासकीय अधिकाऱ्यांनी केलेला पंचनामा व फोटो सोबत जोडून अहवाल संबंधित अधिकाऱ्यांनी वरिष्ठ जि.प.अधिकाऱ्यांना पाठवला असतानाही वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून त्यादिवशी अतिवृष्टी | सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. राम कदम, रवि राणा, अभिमन्यु पवार, डॉ. संदीप धुर्वे, वि.स.स. | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | झाली होती का याबाबत हवामान विभागाचा अहवाल मागविण्यात येऊन आणखी दिरंगाई करण्याचा प्रयत्न करण्यात येणे, यासंदर्भात विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी त्यांच्या दि. १ फेब्रुवारी,२०२२ रोजीच्या पत्रान्वये संबंधित मंत्री महोदयांना वस्तुस्थिती निदर्शनास आणून देऊनही शेतकऱ्यांना न्याय देण्यात चालढकल होत असणे, परिसरातील अन्य शेतकऱ्यांच्या बाबतीतही हीच परिस्थिती असणे,याबाबत शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम तातडीने मिळण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | | |
| २६० | "बुलढाणा जिल्ह्यामध्ये २०१४ पासून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत विहिरींना मान्यता देण्यात आलेली नसणे, यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोषाचे वातावरण निर्माण होणे, यावर्षीच्या कृती आराखड्यात चिखली विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक गावातून शेतकऱ्यांनी विहीर व गोठयांची मागणी केलेली असणे, कृती आराखडा मंजूर असतानासुद्धा आणि कृती आराखड्यात शासनाने ठरवून दिल्या प्रमाणे लोकसंख्येच्या प्रमाणात सिंचन विहिरींचे परिपूर्ण प्रस्ताव सादर होऊनही विहिरींना मान्यता मिळालेली नसणे, पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी साहेब नरेगाच्या माध्यमातून कोट्यवधी रुपये देत असतांना जिल्हा प्रशासन व वरिष्ठ भु वैज्ञानिक यांच्या निष्काळजीपणामुळे शेतकऱ्यांना विहिरीचा लाभ मिळणे, तसेच अतिवृष्टीमध्ये गाळाने भरलेल्या, खचलेल्या विहिरीच्या दुरुस्तीलासुद्धा मान्यता न देणे, इतर राज्यांनी मग्रारोहयोच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या निधीतून अनेक विकास कामे पूर्ण करून आपापला विकास साधलेला असणे, MREGS चा निधी उपलब्ध असताना आणि शेकडो कामे करणे शक्य असतांना ही प्रशासनाच्या उदासीनतेमुळे मग्ररोहयोची कामे न होणे, तसेच प्रत्येक गावात मजूर उपलब्ध असून आणि त्यांच्या हाताला काम नाही तरी सुद्धा प्रशासन मजुरांना कामे न देणे, भुजल सर्वेक्षण विभागाने लक्षांक दिला नसल्याचे कारण देऊन विहिरींना मान्यता न देणे, परंतु बुलढाणा भुजल सर्वेक्षण विभागाने दि. ९/१२/२०२० रोजी उद्दिष्ट दिलेले असतानाही अद्याप कोणत्याही विहिरीस मान्यता न मिळणे, काही प्रमाणात गोठ्याच्या कामास मान्यता दिलेली आहे परंतू प्रत्यक्ष कामास सुरुवात झालेली नसणे, अधिकाऱ्यांच्या निष्क्रिय | श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | कारभारामुळे विहिरींना मान्यता मिळत नसल्याने दोषींवर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, तसेच तातडीने विहिरींना मान्यता देण्याची होणारी मागणी, याकडे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. | | |
| २६१ | "बुलढाणा जिल्हा सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँक मर्या. बुलढाणा अवसायनात असून सदर मालमत्तेच्या बुलढाणा मुख्यालय भूखंड विक्री संदर्भात बुलढाणा येथील मालमत्ता इमारत व भूखंड ३०००० चौ.फूट संस्थेचे अवसायक तथा तत्कालिन जिल्हा उपनिंबधक यांनी या भूविकास बँकेची मालमत्ता विक्री करण्याकरिता सहकार विभागाच्या शासन निर्णय क्र.एलडीबी-१०१७/प्र.क्र.९७/७-स मंत्रालय, मुंबई दि.१३.११.२०१७ नुसार कोणतीही प्रक्रिया राबविलेली नसणे, सदर शासन निर्णयानुसार राज्यातील उपरोक्त बँकेची (भूविकास बँकेची) मालमत्त संबधी निर्णय घेण्यासाठी शासनाने नियुक्त केलेल्या उपसमितीची मान्यता न घेता सदर बँकेची मालमत्ता विक्री करण्याबाबत कार्यवाही सुरू करणे, सदरहू प्रकरणासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सहकार मंत्री, यांना माहे डिसेंबर, २०२० रोजीच्या सुमारास लेखी निवेदन देण्यात येणे, त्यावर मा.सहकार मंत्री यांची सहकार आयुक्त, यांना भूखंडाच्या मालमत्तेची विक्री केलेल्या प्रक्रियेस स्थगिती देऊन संबधितांविरूद्ध निलंबनाची कारवाई करण्याची कार्यवाही करून अहवाल सादर करण्याचे दिलेले आदेश, परंतु अद्यापपर्यंत या संदर्भात शासनाने कोणतीच कार्यवाही न करणे, परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.'' | श्री. संजय गायकवाड, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २६२ | "प्रश्न क्र. २२०८२ अनुराधा अर्बन नागरी पतसंस्था चिखली जि. बुलढाणा ने २००८ च्या कर्जमाफीत केलेली अफरातफर, अनुराधा नागरी सहकारी बँक मर्या. चिखलीच्या सन २००७-२००८ च्या लेखापरिक्षण अहवालामध्ये कृषी कर्ज थकबाकीची रक्कम रु.८ लक्ष ५४ हजार दर्शविण्यात आली असतांना प्रत्यक्षात बँकेने कर्जमाफी योजनेअंतर्गत राज्य शासनाकडून ४५५ सभासदांसाठी रु.६६.९४ लाख व केंद्र शासनाकडून १२६७ सभासदांसाठी रु.१.६८ कोटी अशा एकूण १७२२ सभासदांसाठी रु.२.३५ कोटींची रक्कम लाटलेली असणे, याबाबत शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने २०२१ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात तारांकित प्रश्न क्र.२२०८२ च्या दि. १०/३/२०२१ विचारलेल्या प्रश्नाला दिलेल्या उत्तरात ही बाब सहकार मंत्री यांनी मान्य केलेली असणे, परंतू याबाबत सहाय्यक निबंधक, अमरावती यांच्याकडे चौकशी सुरू असून त्याचा अहवाल आल्यानंतर दोषींवर कारवाई करू असे आश्वासन सहकार मंत्री यांनी सभागृहाला दिलेले असणे, अनुराधा नागरी सहकारी बँक मर्या. चिखलीने केंद्र व राज्य सरकारच्या पैशाचा अपहार केल्याचे मान्य करूनही आणि कारवाईचे सभागृहात आश्वासन देऊनही सहकार मंत्री यांनी कारवाई करण्याऐवजी चौकशी समितीच रद्द करून सभागृहात दिलेल्या आश्वासनाचा भंग करून दोषींना पाठीशी घालणे, अपहार झाल्याचे सिद्ध होऊनही आणि अपहारीत रक्कम दंडनीय व्याजासाहित वसूल करून दोषींवर कठोर कारवाईची सभागृहात मागणी असतांनाही जाणीवपूर्वक सभागृहाचे पावित्र्य नष्ट करणे, याकरिता अपहारीत रक्कम दंडनीय व्याजासाहित वसूल करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची निर्माण झालेली आवश्यकता, याकडे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे पसरणांरा तीव्र असंतोष, यावरील कार्यवाही तथा उपाययोजना." | श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २६३ | "शेतकऱ्यांच्या सहकारी संस्थांना आर्थिक बळ देण्याकरिता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थापना करण्यात आलेली असून सहकारी तत्त्वावर कृषी व कृषिपूरक उद्योगाला चालना देणारी जिल्ह्यातील केंद्रीय संस्था म्हणून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक कार्य करीत असणे, तथापि चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक मंडळाने त्यांच्या सर्वसाधारण सभेत जिल्ह्यातील सेवा सहकारी /विविध कार्यकारी सहकारी संस्थांना आर्थिक सक्षमतेने चालवण्याचे धोरण न ठरविता सहकारी बँक निवडणुकीच्या दृष्टीने विविध कारणे देऊन आभासी सर्वसाधारण सभा घेऊन बँकेच्या पोट-नियमामधील दुरुस्ती मंजूर करणे, विभागीय सहनिबंधक यांनी चंद्रपूर जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती विचारात न घेता या पोट-नियम दुरुस्तीला मंजुरी दिली असणे, चंद्रपूर जिल्ह्यात ३९५ सेवा, विविध कार्यकारी, आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थांपैकी फक्त ३८ संस्था अ आणि ब ऑडिट वर्गात असून उर्वरित सर्व संस्था क ऑडिट वर्गात असणे, सहकारी संस्थांच्या निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार फक्त अ व ब ऑडिट वर्गाच्या सहकारी संस्थांना देण्याचा निर्णय सभेत पोटनियमात बदल करून घेणे, तर संस्थेच्या कार्यक्षेत्रातील रहिवासी असणाऱ्या सभासदांना त्या गावी शेतजमीन असली तरी कर्ज मिळणार नाही अशी पोटनियम दुरुस्ती करून सभासदांना कर्ज मिळण्यात अडचणी निर्माण करणे, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सन २०२०-२०२१ च्या वार्षिक आर्थिक हिशोब पत्रिकेची सखोल चौकशी होणे गरजेचे असणे, सदर संस्थेच्या संचालक मंडळाने बँकेचे सभासद असणाऱ्या सर्व प्रकारच्या सहकारी संस्थेचे सभासद व त्यांचे कुटुंबीयांकरता शेतकरी कल्याण निधी दरवर्षीच्या निव्वळ नफ्यातून तरतूद केली असून शेतकरी कल्याण निधीमध्ये अव्यवहार्य निधी वाटप करण्यात येणे, शेतकरी अपघात विमा योजना या केंद्रीय योजनेची अंमलबजावणी करण्यास बँकेच्या संचालक मंडळाने टाळाटाळ केली असणे, रिझर्व बँक ऑफ इंडिया, नाबार्ड व सहकारी खाते यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन न करता चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाने श्री. राजेश्वर कल्याणकर यांना बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर तीन वर्ष मुदतवाढ देणे, चंद्रपूर जिल्हा | सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. राम कदम, रवि राणा, अभिमन्यु पवार, डॉ. संदीप धुर्वे, वि.स.स. | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | मध्यवर्ती सहकारी बँकेने नुकतेच १६५ पदे भरण्यास परवानगी दिलेली असणे, अशा प्रकारे चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर काळजीवाहू संचालक मंडळाने बँक अहितेचे अनेक निर्णय घेतले असल्याने मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक १८.२ २०२१ च्या निर्णयानुसार सदर बँकेच्या संचालक मंडळावर प्रशासक नेमण्याची आवश्यकता असणे, याबाबत उपाययोजना व कार्यवाही." | | |
| २६४ | "प्रश्न क्र. २२०८२ अनुराधा अर्बन नागरी पतसंस्था चिखली जि. बुलढाणा ने २००८ च्या कर्जमाफीत केलेली अफरातफर, अनुराधा नागरी सहकारी बँक मर्या. चिखलीच्या सन २००७-२००८ च्या लेखापरिक्षण अहवालामध्ये कृषी कर्ज थकबाकीची रक्कम रु.८ लक्ष ५४ हजार दर्शविण्यात आली असतांना प्रत्यक्षात बँकेने कर्जमाफी योजनेअंतर्गत राज्य शासनाकडून ४५५ सभासदांसाठी रु.६६.९४ लाख व केंद्र शासनाकडून १२६७ सभासदांसाठी रु.१.६८ कोटी अशा एकूण १७२२ सभासदांसाठी रु.२.३५ कोटींची रक्कम लाटलेली असणे, याबाबत शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने २०२१ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात तारांकित प्रश्न क्र. २२०८२ च्या दि. १०/३/२०२१ विचारलेल्या प्रश्नाला दिलेल्या उत्तरात ही बाब सहकार मंत्री यांनी मान्य केलेली असणे, परंतू याबाबत सहायक निबंधक अमरावती यांच्याकडे चौकशी सुरू असून त्याचा अहवाल आल्यानंतर दोषींवर कारवाई करू असे आश्वासन सहकार मंत्री यांनी सभागृहाला दिलेले असणे, अनुराधा नागरी सहकारी बँक मर्या. चिखलीने केंद्र व राज्य सरकारच्या पैशाचा अपहार केल्याचे मान्य करूनही आणि कारवाईचे सभागृहात आश्वासन देऊनही सहकार मंत्री यांनी कारवाई करण्याऐवजी चौकशी समितीच रद्द करून सभागृहात दिलेल्या आश्वासनाचा भंग करून दोषींना पाठीशी घालणे, अपहार झाल्याचे सिद्ध होऊनही आणि अपहारीत रक्कम दंडनीय व्याजासाहित वसूल करून दोषींवर कठोर कारवाईची सभागृहात मागणी असतांनाही जाणीवपूर्वक सभागृहाचे पावित्र्य नष्ट करणे, याकरिता अपहारीत रक्कम दंडनीय व्याजासाहित वसूल करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची निर्माण झालेली आवश्यकता, याकडे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे पसरणांरा तीव्र असंतोष, यावरील कार्यवाही तथा उपाययोजना." | श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
| --- | --- | --- | --- |
| २६५ | "राज्यात सहकार विभागांतर्गत येणाऱ्या विविध कार्यकारी (वि.का.स.) सेवा संस्थांच्या निवडणूका कोवीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे गेल्या दिड वर्षापासून प्रलंबित होत्या. तसेच काही संस्थांच्या कालावधी पुर्ण झालेने संस्थांच्या निवडणूका जाहीर झालेल्या असणे, यामध्ये प्रामुख्याने कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यामध्ये विविध कार्यकारी (वि.का.स.) सेवा संस्थांच्या निवडणूकामध्ये चुकीच्या व भोगस पद्धतीने सभासदांची वाढ करून निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्याचे काम उप निंबधक, सहकारी संस्था कोल्हापूर अमर शिंदे व सहा. निबंधक संभाजी पाटील यांच्याकडून करण्यात येणे, या कामी स्थानिक पातळीवर गट सचिवांनी आर्थिक हित जोपासत सभासद वाढ करण्याचे काम करणे, याबाबत वस्तुस्थितीदर्शक छाननी करण्याचे काम सहा. निबंधक व उप निबंधक कार्यालयाकडून करणे अपेक्षित असताना तसे न होणे, यामुळे नितवडे, आरळगुंडी, कोनवडे, कडबिद्री, संस्थांच्या निवडणूक कार्यक्रमामध्ये अशाच पद्धतीने कामकाज करण्यात येणे, याबाबत लोकप्रतिनिधी यांनी कामकाज सुधारण्याबाबत वेळोवेळी सुचित करुनही कोणतीही कार्यवाही सबंधित अधिकारी यांचेकडून करण्यात नसल्यानेच नितवडे येथील संस्थेच्या निवडणूक कामकाजाची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी लेखी निवेदनाद्वारे मा. आयुक्त सहकार यांजकडे दि. १९ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास देण्यात येणे, परंतू अद्यापही याबाबत विभागाकडून कोणतेही कार्यवाही न होणे, यामुळे राज्य शासनाने सहकारी संस्थांच्या निवडणूका पारदर्शक होण्याकरिता स्थापन केलेल्या निवडणूक आयोगाच्या कामकाजावर आक्षेप उपस्थित होणे, चुकिच्या पद्धतीने कामकाज करत विविध कार्यकारी (वि.का.स.) सेवा संस्थांच्या निवडणूका ठराविक मंडळीच्या हातामध्ये देण्याकरिता सहकार विभागातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांचेकडून नियोजनबद्धपणे कामकाज सुरु असणे, यासर्व बाबी गंभीर स्वरुपाच्या असुन लोकशाही प्रक्रियेला घातक असणे, याबाबत राज्य शासनाने भुदरगड तालुक्यामध्ये चुकिच्या व नियमबाह्य पद्धतीने निवडणूक प्रक्रिया राबवून कामकाज करणाऱ्या उप निबंधक, अमर शिंदे व सहा. निबंधक संभाजी पाटील यांचेवर कडक कायदेशीर कारवाई करण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनायी भूमिका व प्रतिक्रिया. | श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २६६ | "नागपूर (ग्रामीण) तालुक्यातील नागपूर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावरील बुटीबोरी येथे नागरीकांच्या सोयीसाठी तसेच या मार्गावरील बस फेऱ्यांचे आवागमन लक्षात घेवून सन २०१७ मध्ये त्या ठिकाणी रू. २.५० कोटी किंमतीचे नविन बस निर्मीतीस राज्य शासनाने मान्यता प्रदान केली असणे, वास्तु निर्मीतीचे नकाशे खर्चाची अंदाजपत्रके त्यांना मान्यता व निविदा प्रक्रीया इत्यादी सर्व बाबी सन २०१८ मध्ये पूर्ण होवून काम सुरू झाले असणे, त्याकरिता शासनस्तरावरून निधी प्रदान झाला असणे, तथापि सन २०१९ अखेर बस स्थानक निर्मीतीचे ८०% काम पूर्ण झाले असणे, परंतु उर्वरीत जवळपास २०% काम अद्यापी न झाल्याने शासन निर्मीत व लोकोपयोगी वास्तु विना-वापर पडून असणे, तेंव्हा सदर काम कोणत्या कारणाने थांबलेले असणे, तसेच ते कधीपर्यंत पूर्ण करण्यात येणार असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | सर्वश्री. समिर मेघे, मोहन मते, डॉ. पंकज भोयर, वि.स.स. | कित्ता |
| २६७ | "अठरा लक्ष पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या वाढता विस्तार,कल्याण शहरामध्ये वाहतुकीची होणारी प्रचंड कोंडी, परिणामी, नागरिक रुग्ण यांची होणारी प्रचंड गैरसोय, कल्याण शहरातून हजारो शासकीय, निमशासकीय कर्मचारी व कामगार भिवंडी, कोनगाव, मानकोली, कोल्हेर, कशेळी येथील गोडाऊन पट्टा व परिसरातील कंपनी मध्ये कामानिमित्त जात असतात. या कामगारांना नेण्या-आणण्यासाठी कल्याण येथून दररोज ७०० अवैध प्रवासी बसेस भिवंडी व परिसरामध्ये दिवसभर जाणे-येणे करत असने, परिणामी कल्याण शहरा मध्ये दिवसभर वाहतुकीची कोंडी होने, दिवसभर होणाऱ्या वाहतुकीच्या कोंडीमुळे सरकारी कर्मचारी, अधिकारी वेळेवर कर्तव्यावर पोहचू शकत नसणे, रुग्णवाहिका देखील या वाहतूक कोटीत फसल्यामुळे रुग्ण वेळीच रुग्णालयात पोहचू न शकणे, अग्निशमन दलाचे वाहन सदर वाहतुकी च्या कोंडीमुळे गंभीर स्वरूपाचे रुग्ण दगावण्याची शक्यता नाकारता न येणे, अग्निशमन दलाचे वाहन सदर वाहतुकीच्या कोंडीत अडकल्यास दुर्घटनेच्या ठिकाणी वेळेवर पोहचू न शकने, वाहतूक नियंत्रणासाठी ठेवण्यात आल्या खाजगी व्यक्ती व वाहतूक पोलीसांचे, प्रादेशिक परिवहन विभागाचे याकडे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने देखील याकडे लक्ष न देणे, परिणामी कल्याण शहरातील नागरिकांचा शासनाप्रति निर्माण झालेला तीव्र असंतोष, कल्याण शहराला वाहतुकीतून मुक्त करण्याच्या अनुषंगाने शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही उपायोजना व शासनाची प्रतिक्रिया." | सर्वश्री. विश्वनाथ भोईर, शांताराम मोरे, श्रीनिवास वनगा, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २६८ | "पुणे शहरात रिक्षा या वाहनाद्वारे रिक्षा चालक हे सार्वजनिक प्रवासी सेवा देत असणे, मात्र त्यांना दिलासा देण्याऐवजी त्यांची परिस्थिती खालावेल अशीच धोरणे शासन आखत व अमलात आणत असणे, करोना येण्याच्या आधीपासून रिक्षा परवाना खुला करणे, जोखमीच्या व्यस्त प्रचंड प्रमाणात विमा हप्ता ठरवणे, बाईक टॅक्सी सारख्या धोरणामुळे खाजगी दुचाकी धारकांनाही प्रवासी वाहतूक करण्यासारखी स्थिती निर्माण करणे, रिक्षा चालक कल्याणकारी मंडळासारखा रिक्षा चालकाच्या जिव्हाळ्याचा विषयावर निर्णय न घेता आठ वर्ष प्रलंबित ठेवणे, वाहतूक नियमभंगासाठी वाहतूक सुधार कायद्याच्या नावाखाली दंड / तडजोड फी यात अतिरेकी वाढ करणे, वाहतूक दंड हा वाहतूक शिस्ती ऐवजी महसुलाचे साधन करून त्याची वसुली करणे, कोरोनाची जागतिक महारोगाची साथ आल्यावर या रोगामुळे आणि सततच्या टाळेबंदीमुळे रिक्षा चालकाची अवस्था अतिशय दारुण झालेली असणे, या काळात आजचा दिवस गेला उद्याचं काय ? अशी अवस्था टाळेबंदी आणि परिणामी रोजगार मोठ्या प्रमाणात घटल्यामुळे झाली असणे, कोरोना साथ सुरू होण्याआधी कर्जाऊ घेतलेल्या रिक्षा वाहनाचे हप्ते थकणे, ते वसूल करण्यासाठी फायनान्स कंपन्या कायदा धाब्यावर बसवून रिक्षा चालकास शिवीगाळ, मारहाण, नियमबाह्य पद्धतीने त्याचे जगण्याचे साधन ताब्यात घेणे, परस्पर विकणे असे मार्ग अवलंबिणे, फायनान्स कंपन्या मोठ्या लोकांच्या असल्याने आणि त्यांचे राजकीय, प्रशासकीय लागेबांधे असल्याने या विषयीची तक्रार दाखल करून घेण्यास पोलीस नकार देत असणे, त्यामुळे रिक्षाचालक हवालदील झालेला असणे, त्याविषयी रिक्षा पंचायतीने शासनाला निवेदने देऊन तसेच संयमाने अनेक आंदोलने करणे, आंदोलन करूनही दाद मिळत नसल्यामुळे रिक्षाचालक वैफल्यग्रस्त झाला असणे, यासाठी रिक्षा खुला परवाना आणि खुला रिक्षा बॅज बंद करणे, सन २०१४ साली मा. कामगार मंत्री यांना सादर शासकीय अभ्यास अहवालाप्रमाणे रिक्षा चालक कल्याणकारी मंडळ ताबडतोब स्थापन करणे, जोखमीच्या व्यस्त प्रमाणातील विम्याची लूट थांबविणे, जोखमी एव्हढाच हप्ता महाराष्ट्र युनिट धरून घेणे, ओला उबेर ची बेकायदा वाहतूक बंद करणे, बाईक टॅक्सी प्रवासी | श्री. सुनिल कांबळे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | वाहतूक करू शकणार नाही असे धोरण राज्याने तयार करणे सावकार, पठाण यांच्या व कर्ज वसुली करणाऱ्या फायनान्स कंपन्यांना पायबंद घालणे नियमबाह्य कर्ज वसुलीचे फायनान्स कंपन्यांवर गुन्हे दाखल करणे, टाळेबंदीच्याआधी बहुतांश नियमित हप्ते फेडणाऱ्या रिक्षा चालकांची कर्जे राष्ट्रीयकृत बँकेकडे वर्ग करणे, या सर्व मागण्या रिक्षा व्यावसायिकांनी वेळोवेळी शासनाकडे करूनही शासनाने यावर कोणताही निर्णय घेतलेला नसणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. | | |
| २६९ | "राज्यातील वस्त्रोद्योग व यंत्रमागाची वीज सवलत स्थगित ठेवण्याचे निर्देश महावितरणने जारी केल्यामुळे राज्यातील सुमारे २२०० कोटी रुपयांची वीज सवलत बंद होणे, महावितरणने वस्त्र उद्योगाची वीज सवलत बंद केल्यामुळे राज्यात संतप्त प्रतिक्रीया उमटल्यामुळे वस्त्रोद्योग मंत्र्यांनी माहे फेब्रुवारी ,२०२२ मध्ये राज्यातील २७ अश्वशक्तीपेक्षा अधिक वीज जोडभार वापराची सवलत पुन्हा सुरू करण्याची केलेली घोषणा, सदर घोषणा करून एक महिन्याचा कालावधी उलटत नाही तो २७ अश्वशक्तिपेक्षा कमी जोडभार तसेच मोठ्या वस्त्रोद्योगाची सवलत बंद करण्यात येणे, मागील ३२ वर्षापासून यंत्रमागासाठी वीज सवलत दिली जात असतांना महावितरणने अचानक वीज सवलत स्थगित ठेवण्याचे दिलेले निर्देश, यासंदर्भात महावितरणाच्या मुख्य अभियंत्यांनी १ मार्च, २०२२ रोजीच्या ई-मेल द्वारे सवलतीचे वीज बिल वितरण थांबविण्यात दिलेले आदेश, त्यामुळे यंत्रमागधारक व वस्त्रोद्योगाना विजेची बिले पूर्ण रक्कमेने भरावी लागणार असल्याने त्यांच्यात निर्माण झालेले चितेंचे वातावरण, सदर निर्णयाचा सर्वाधिक फटका वस्त्रोद्योगाला बसणे, यंत्रमागधारक व वस्त्रोद्योगधारकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण पाहता शासनाने याबाबत गांभीर्याने लक्ष घालून शासन स्तरावर कार्यवाही करून राज्यातील २७ अश्वशक्तीपेक्षा अधिक वीज जोडभार वापराची सवलत सुरू करण्याबाबत व वस्त्रोद्योग व यंत्रमागधारकाची वीज सवलत स्थगित उठविण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रीया व भूमिका." | श्री. अनिल बाबर, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २७० | "राज्यामध्ये बालविवाहाचे प्रमाण वाढले असून एकट्या सोलापूर जिल्ह्यात ७०० पेक्षा अधिक बालविवाह झाल्याचे निदर्शनास येणे, त्यामध्ये मुलींचे वय वाढीव दाखवल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, तसेच राज्यात सरकारी, निमसरकारी, खाजगी, सहकारी संस्था व कार्यालयांमध्ये महिला तक्रार निवारण समिती स्थापन केलेल्या नसल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे बालविवाह सारख्या गंभीर प्रश्नी शासनाची उदासीनता दिसून येणे, त्यामुळे बालविवाह रोखण्याकरिता व महिला सक्षमीकरण करण्याकरिता ठोस पाऊले उचलण्याची गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया." | श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. | कित्ता |
| २७१ | "चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात मृद व जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांनी सुमारे १०५ कोटीपेक्षा अधिक खर्चाची २० बंधाऱ्यांची कामे ११ टक्के कमिशनवर वाटल्याची धक्कादायक बाब नुकतीच निदर्शनास येणे, यामुळे कंत्राटदारांमध्ये प्रचंड खळबळ निर्माण होणे, मृद व जलसंधारण मंत्रालयाला विविध विकास कामांसाठी दोन हजार कोटी रुपये देण्यात येणे, गतवर्षी जिल्ह्याला निधीचे वाटप झाल्यानंतर कामांची निविदा काढण्यात येणे, मात्र ऐनवेळी जिल्हा जलसंधारण अधिकाऱ्याने बंधाऱ्याच्या कामासाठी औरंगाबाद येथील महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाचे नोंदणीकृत कंत्राटदार असावे अशी अट घालण्यात येणे, सदर दोन्ही जिल्ह्यात निविदा प्रक्रियेस स्थगिती देण्यात येऊन दि.२३ फेब्रुवारी २०२२ रोजी जुओ टॅगिंगची वेळ देण्यात येणे, निविदा भरण्याची अंतिम तारीख २ मार्च असतानाही या आधीच कामांचे वाटप करण्यात येणे, दोन्ही जिल्ह्याच्या १०५ कोटी रुपये खर्चाची २० कामे असणे, निविदा मूळ किंमतीच्या २१ टक्क्यांच्या वर भरण्यात येणे, १९ टक्के कमिशनवर सदरहू कामे मॅनेज करण्यात येणे, २० निविदा कामे ही प्रचलित दरसूचीनुसार नसणे, तसेच सेंट्रींग आणि मशिनरी अत्यल्प असलेल्या कंत्राटदारांना कामे देण्यात येणे, सदर कामे २५ टक्के विक्रीस काढण्यात येणे, सदर कामे वाटप करताना नोंदणी संपुष्टात आलेल्या कंत्राटदारांना बेकायदा वाटप करण्यात आल्याचा प्रकार घडणे, एस.एम.हकीम, | श्री. सुरेश भोळे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | एस.एस.शेख, शुभम इंजिनिअरिंग, जी.एस.शहा आणि एस.एम.उके या पाच कंत्राटदारांच्या नोंदणी प्रमाणपत्राची मुदत संपलेली असतानाही त्यांना प्रत्येकी १० ते १५ कोटी रुपयांची कामे मंजुर करण्यात येणे, सदर कामे वाटपात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार व गैरव्यवहार करण्यात येणे, या सर्व प्रकाराला जबाबदार असलेल्या सर्व अधिकाऱ्यांना तातडीने निलंबित करून त्यांची लाचलूचपत विभागामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे येथील जनतेत निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.'' | | |
| २७२ | "बुलढाणा जिल्ह्यात वरिष्ठ भुवैज्ञानिक व विकास यंत्रणा, बुलढाणा यांनी मनरेगा व इतर शासकीय योजनेतून शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या वैयक्तिक विहिरींचे उद्दिष्टे न देणे, सन २०१४ पासून जिल्ह्यात एकाही विहिरीला मान्यता न मिळणे, उद्दिष्टे निश्चित न केल्याने शेतकरी मोठ्या प्रमाणावर विहिरींच्या लाभापासून वंचित राहणे, वरिष्ठ भुवैज्ञानिक बुलडाणा हे गेल्या ३-४ वर्षापासून विहिरींचे लक्षांक देण्यास टाळाटाळ करीत असणे, करीता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सिंचन मान्यता देण्यासाठी वरिष्ठ भुवैज्ञानिक बुलडाणा यांना चिखली विधानसभा मतदारसंघातील चिखली आणि बुलढाणा तालुक्यातील सर्व गावांमधील सिंचन विहिरीचे लक्षांक देण्याबाबत आणि नवीन सिंचन विहिरींना लक्षांक निहाय मान्यता देण्याबाबत जिल्हाधिकारी बुलडाणा यांच्याकडे वारंवार मागणी करणे, परंतु अद्यापही लक्षांक न मिळणे, तसेच दोन विहिरींच्या मध्ये ५०० फुटाच्या आतील असलेल्या विहिरींना मान्यता येऊ नये ही अट रद्द करणे, यामुळे ज्या शेतकऱ्याने अद्यापपर्यंत विहीर खोदलेली नाही त्यांच्यावर अन्यायकारक असणे, वैयक्तिक सिंचन लाभार्थी यांचेकरिता शासनाचे विविध योजने अंतर्गत (मग्रारोहयो, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना व इतर) सिंचनाचे विहिरी मंजूर करतांना पाणलोट क्षेत्र निहाय होणाऱ्या विहिरीच्या अनुषंगाने संचालनालय, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पूणे, यांनी दिलेल्या सूचनेनुसार सिंचन विहिरीची शिफारस करण्यात येणे, करण्यात येणाऱ्या मूल्यांकनामध्ये भूजलाचे उपशाची टक्केवारी | श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | नुसार जिल्ह्यातील पाणलोट क्षेत्रांची चार ०४ वर्गवारी मध्ये विभागणी करण्यात येणे, अतिशोषित पाणलोट क्षेत्र (Over Exploited-१०० टक्केपेक्षा जास्त भूजल उपसा), शोषित पाणलोट क्षेत्र (Critical-९० से १०० टक्के), अंशतः शोषित पाणलोट क्षेत्र (Semicritical- ७० ते ९० टक्के), सूरक्षित पाणलोट क्षेत्र (Safe-७० टक्केपेक्षा कमी भूजल उपसा), अतिशोषित व शोषित हया पाणलोट क्षेत्रामध्ये ९० टक्केपेक्षा जास्त उपसा झालेला असल्याने येथे कोणत्याही प्रकारच्या नवीन सिंचन विहिरी घेण्याबाबत पूर्णतः बंदी असणे, याचे कारण जमिनीतील पाण्याचा उपसा केल्या जातो असे कारण सांगणे, वस्तुतः ज्या ठिकाणी विहीर असेल त्या ठिकाणी पावसाचे पडलेले पाणी विहीर जितकी खोल असेल तिथपर्यंत जलसंधारण होत असणे, त्यामुळे शेतीला पावसाचे जमा झालेल्या पाण्यावर किमान कमी पाण्याची पिके घेता येणे तसेच जमिनीत काही प्रमाणात पाणी ही मुरणे, परंतु शासनाकडून जमिनीत पाणी मुरविण्याचे प्रयत्न न करताही केवळ उपसा होतो हे कारण दाखवून अतिशोषित व शोषित पाणलोट क्षेत्रात विहिरींचे उद्दिष्ट न देणे अन्यायकारक असणे, तसेच पूर्वी अंशतः शोषित पाणलोट क्षेत्रामध्ये भूजलाचा उपसा हा ७० ते ९० टक्के पर्यंत असल्याने तेथे भूवैज्ञानिकांनी केलेल्या सर्वेक्षणाचे आधारे व भूजल पर्नभरणाचे अटींचे अधीन राहून या पूर्वी सिंचन विहिरींची शिफारस करण्यात येणे, परंतू आता संचालनालय, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी वैयक्तीक सिंचन विहिरी तसेच सामूदायिक लाभाच्या विहिरींबाबत नव्याने मार्गदशक सूचनेनुसार अंशतः शोषित (Semicritical-७० ते ९० टक्के) पाणलोट क्षेत्रामधील गावांमध्ये नवीन सिंचन विहिरींची शिफारस करण्यात येऊ नये असे नमूद केल्याने अंशतः पाणलोट क्षेत्रात विहिरींची शिफारस करता न येणे, बुलडाणा जिल्ह्यामध्ये एकूण ५७ पाणलोट क्षेत्र असून यापैकी अंशतः शोषित पाणलोट क्षेत्र (Semicritical-७० ते ९० टक्के) या वर्गवारीमध्ये जिल्ह्यातील २४ पाणलोट क्षेत्रे समाविष्ट आहेत. यामुळे अंदाजे ५० टक्के जिल्हा हा शासनाचे विविध योजने अंतर्गत देय असलेल्या सिंचन विहिरीपासून वंचीत राहणार असणे, (Semicritical-७० ते ९० टक्के) पाणलोट क्षेत्रामध्ये सिंचन विहिरींना बंदी घातल्याने | | |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | अशा पाणलोट क्षेत्रामध्ये अतिरिक्त २० टक्के भूजलसाठा असूनही नवीन सिंचन विहिरी घेण्यापासून अनेक लाभार्थी वंचीत राहणार असणे, करिता या पूर्वी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने अंशतः शोषित (Semcritical-७० ते ९० टक्के) पाणलोट क्षेत्रामध्ये प्रत्यक्ष सर्वेक्षण करून व भूजल पर्नभरणाचे अटी व शर्वीचे अधीन राहून नव्याने देय असलेल्या सिंचन विहिरी बाबत घेतलेली भूमिका व अंमलात आणलेले धोरण पुनश्च अंमलात आणून अंशतः शोषित (Semicritical-७० ते ९० टक्के) पाणलोट क्षेत्रामध्ये नवीन सिंचन विहिरीची शिफारस करण्यात यावी अशी होणारी मागणी, याकडे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे पसरणारा तीव्र असंतोष, यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. | | |
| २७३ | "राज्यातील खासगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी प्रवेशाच्या सर्व फेऱ्या संपल्यानंतर महाविद्यालयामध्ये रिक्त असणाऱ्या जागांवर प्रवेश घेतल्यास त्यांना शिष्यवृत्ती व शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ नाकारण्यात येत असणे, शेवटची प्रवेश फेरी ही नियमित प्रवेश प्रक्रियेचाच एक भाग असताना या फेरीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ नाकारून तंत्रशिक्षण संचालनालयाकडून मागास समाजातील विद्यार्थ्यांवर अन्याय होत असणे, शिष्यवृत्तीसाठी पात्र असूनही संस्था स्तरावरील फेरीमध्ये प्रवेश घेणाऱ्या हजारो गुणवंत विद्यार्थ्यांना पूर्ण शुल्क द्यावे लागत असल्याने सरकारच्या या धोरणाला विद्यार्थ्यांमधून विरोध होत असणे, शेवटच्या फेरीमधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्ती व शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ मिळावा यासाठी विद्यार्थी आग्रही असून याबाबत शासनाला या विषयाची तात्काळ दखल घेण्याची विनंती केलली असणे, राज्य सरकारच्या या अन्यायकारक धोरणामुळे अनेक मागास प्रवर्ग गटातील विद्यार्थ्यांचे नुकसान होत असणे, संस्था स्तरावर होणाऱ्या प्रवेश फेरीमधील विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्ती व शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ लागू करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. राम कदम, रवि राणा, अभिमन्यु पवार, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २७४ | "कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना सन २००४-०५ पासून सुरू असणे, परंतु मागील ४ ते ५ वर्षांपासून शासन निर्णयात नमूद केल्यानुसार अमरावती जिल्ह्यात रेडीरेकनर दराप्रमाणे दुप्पट किंवा ५ लक्ष रुपये एकर प्रमाणे शेती खरेदी करता येत नसणे, त्यामुळे अमरावती जिल्ह्यातील बहुतांश मागासवर्गीय लाभार्थी या योजनेपासून वंचित असणे, तसेच जमीन खरेदी करण्यासाठी समाज कल्याण विभागास शासन स्तरावरून मागच्या ४ वर्षांपासून आवश्यकतेनुसार किंवा मागणीनुसार निधी प्राप्त झालेला नसणे, त्यामुळे सदर योजनेची अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे मागासवर्गीय शेतमजुरांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना | श्री. बळवंत वानखेडे, वि.स.स. | कित्ता |
| २७५ | "जळगांव जिल्ह्यातील अमळनेर विधानसभा मतदारसंघात तापी नदीवर निम्न तापी प्रकल्प या मोठ्या प्रकल्पाचे काम गेल्या वीस-बावीस वर्षापासून संथगतीने सुरू असल्याचे निदर्शनास येणे, या प्रकल्पाच्या वक्राकार दरवाज्यांच्या कामाची निविदा काढून कामाची सुरुवातदेखील करण्यात आलेली असल्याचे निदर्शनास येणे, दरम्यानच्या काळात सदर दरवाजांचे अंदाजपत्रक तयार करताना शासनाचे प्रचलित मापदंड व शासन निर्णयाचा अवलंब करण्यांत न येणे, याबाबत तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांच्याकडे मा. स्थानिक लोकप्रतिनिधींकडून वारंवार तोंडी व लेखी पद्धतीने माहिती मागूनही सदर प्रकरणी संबंधित अधिकारी अद्याप माहिती उपलब्ध करून न देणे, तसेच दरवाजांच्या काढलेल्या निविदा दरामध्ये अवास्तव करांचा समावेश केलेला असल्याचे निदर्शनास येणे, सदर प्रकरणी शासन स्तरावर नेमण्यात आलेल्या सिंचन समितीने सदर वक्राकार दरवाजांच्या कंत्राटदाराने केलेले संकल्पन व दर याबाबत आक्षेप नोंदविल्याचेदेखील निदर्शनास येणे, सदर प्रकरणी संबंधित कंत्राटदाराने केलेले वाढीव वजनाचे संकल्पन व चुकीच्या अंदाजपत्रकानुसार निविदेतील अवाजवी दर हे चुकीच्या पद्धतीने मंजूर करण्यांत आल्याचेही माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये आढळून येणे, याप्रकरणी वारंवार मागणी करुनही संबंधित कंत्राटदार व सामील अधिकारी यांचेविरोधात कारवाई करण्यात होत असलेली कुचराई व जाणीवपूर्वक करण्यांत येत असलेली टाळाटाळ, परिणामी तेथील सर्वसामान्य जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व त्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. चंद्रकांत नवघरे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २७६ | “तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) औद्योगिक वसाहतीतील अनेक कंपन्यांमार्फत रात्री अपरात्री तसेच पहाटेच्या वेळीत सोडण्यात येणाऱ्या रासायनिक वायुमुळे पनवेल तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागात मोठ्या प्रमाणात प्रदुषणात वाढ झाली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ वा त्यासुमारास निदर्शनास येणे, उक्त परिसरातील वाढत्या प्रदुषणासंदर्भात वारंवार शासनाच्या निदर्शनास आणुनसुद्धा शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत असणे, अनेक रासायनिक कंपन्यांमार्फत उक्त परिसरातील नद्यांमध्ये सोडण्यात येणाऱ्या रसायन मिश्रीत दुषित पाण्यामुळे नदी प्रदुषित होवून मोठ्या प्रमाणात मासे मृत पावत असून भात शेती नापिक होत असणे, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे अद्ययावत यंत्रणा नसल्यामुळे रासायनिक कारखान्यांमार्फत सोडण्यात येणाऱ्या रसायन मिश्रित पाण्याची वेळोवेळी तपासणी न केल्यामुळे मोठ्या प्रमाणात मासे मरून व भातशेतीचेही नुकसान होत असणे, पर्यावरणाला धोका निर्माण करणाऱ्या उक्त औद्योगिक वसाहतीतील रासायनिक कारखान्यांवर कोणतीच कारवाई होत नसल्यामुळे नागरिकांच्या मनात संबंधित विभागाबाबत चिड निर्माण होत असणे, या कारणास्तव शासनाने रसायन मिश्रीत पाण्याची तपासणी करण्यासाठी अद्ययावत यंत्रणा उभारून दुषित वायु व पाणी सोडणाऱ्या कारखान्यांवर तसेच उक्त परिसरातील संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची नितांत गरज, त्यादृष्टीने शासनाने त्वरीत करावयाची आवश्यक ती कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया.” | सर्वश्री. प्रशांत ठाकूर, समीर कुणावार, महेश बालदी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, वि.स.स. | कित्ता |
| २७७ | "जगभरात वायु प्रदूषणामुळे सर्वाधिक मृत्यू होण्याच्या यादीमध्ये मुंबई हे पाचव्या क्रमांकावरचे शहर असल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, त्यामध्ये डम्पिंग ग्राउंडला लागणाऱ्या आगी, मोठमोठ्या औद्योगिक कंपन्यांतून निघणारा धूर, मुंबईस्थित कोळशावर आधारित टाटा ऊर्जा प्रकल्प यामुळे सर्वाधिक वायुप्रदूषण होत असल्याचे निदर्शनास येणे, तसेच वायु प्रदूषणामुळे लोकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून त्यांचे आयुर्मान कमी होत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे नागरिकांना वायु प्रदूषण संदर्भात सूचित करणारी आरोग्य मार्गदर्शिका जारी करण्याची गरज असणे, तसेच वायु प्रदूषणास कारणीभूत असणाऱ्या औद्योगिक क्षेत्रांवर कारवाई करण्याची गरज असणे, त्यामुळे मानवी आरोग्यावर | श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | गंभीर दुष्परिणाम करणाऱ्या वायु प्रदूषणाला आळा घालण्याकरिता ठोस उपाययोजना करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया." | | |
| २७८ | "औष्णिक विद्युत केंद्र, परळी (जि.बीड) येथून बाहेर पडणाऱ्या राखेची व्यवस्थीत विल्हेवाट लागत नसल्याने या परिसरात राखेचे कण दिवस-रात्र हवेत राहत असल्याने धुक्याप्रमाणे राखेची चादर हवेत पसरलेली असणे व त्यामुळे नागरिकांच्या आरोग्य धोक्यात आलेले असणे, त्यामुळे विविध प्रकारचे फुफुसाचे आजार त्यांना जडले असणे, राखेमुळे त्यांच्या जीवनमानावर विपरित परिणाम झालेला असणे, नागरिकांना अनेक प्रकारचे त्रास होत असणे, दुचाकी-वाहनचालक यांना परळी-गंगाखेड रस्त्यावर प्रवास करीत असताना राखेच्या पसरलेल्या चादरमुळे प्रवास करताना जिकरीचे होणे, त्यातच वारंवार अपघाताचे प्रमाण वाढले असल्याचे निदर्शनास येणे, मोठ्या प्रमाणावर नागरिकांमध्ये या राखेमुळे प्रचंड असंतोष व नाराजी पसरलेली असणे, या राखेच्या विरोधात महिला व नागरिकांनी अनेकदा राखेची वाहतूक करणारे कंटेनर अडवून आंदोलने केलेली असणे, परंतु अद्यापही ही वाहतूक बंद झालेली नसणे, शेतांमध्ये राख टाकली जात असल्याने जमिनीचा कस नाहीसा होऊन जमिनी नापिक होत असल्याचेही निदर्शनास येणे, संपूर्ण परळी शहरासह थर्मल पॉवर परिसरातील अनेक गावांवर याचा विपरित परिणाम झाला असून जनजीवन विस्कळीत झालेले असणे, अधिकाऱ्यांना सूचना देऊनही राखेबाबत कोणतीही योग्य प्रकारे विल्हेवाट लावली जात नसणे, औष्णिक विद्युत केंद्र, परळी येथून बाहेर पडणाऱ्या राखेची व्यवस्थीत विल्हेवाट लावण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (गंगाखेड) यांनी मा.पर्यावरण मंत्री, राज्यमंत्री पर्यावरण व अध्यक्ष-सचिव महाराष्ट प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना दि.२३.२.२०२२ रोजी निवेदन देऊन मागणी केली असणे, परंतु याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करून सदरहू राखेची योग्य प्रकारे विल्हेवाट लावून परळी शहर व थर्मल पॉवर परिसरातील नागरिकांना दिलासा देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना, यावर शासनाची प्रतिक्रिया." | श्री. रत्नाकर गुट्टे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २७९ | "वसई तालुका सहकारी औद्योगिक वसाहतीतील मे प्रोग्रेसिव सरफेस सिस्टीम प्रा.लि. वालीव या कंपनीकडून विषारी आणि घटक कचरा मोठ्या प्रमाणात खाडीला मिळणाऱ्या नाल्यात सोडण्यात येत असल्यामुळे जल आणि वायू प्रदूषणात होत असलेली वाढ, विषारी घटकांमुळे मासेमारीच्या पारंपारिक उपजीविकेच्या साधनापासून कोळी बांधवाना वंचित राहावे लागणे, मोठ्या संख्येने मासे मरत असल्याने निर्माण झालेली गंभीर परिस्थिती, कंपनीने विषारी आणि स्फोटक अशा रासायनिक पदार्थांचा साठा निर्धारित क्षमतेपेक्षा वाढीव स्वरूपात बाळगणे, कारखान्यासाठी आवश्यक असलेल्या परवानग्यांची पूर्तता नसणे, प्रदूषण नियंत्रणाशी संबंधित करावयाच्या उपाययोजनांचे पालन न करणे, या सर्व प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. मंगेश कुडाळकर, वि.स.स. | कित्ता |
| २८० | "चंद्रपूर जिल्ह्यातील गडचांदूर शहरात असलेली जुनी माणिकगड सिमेंट कंपनी व सध्याची अल्ट्राटेक सिमेंट कंपनी फार मोठ्या प्रमाणात वायु प्रदुषण करीत असुन कंपनी प्रशासनाकडून नागरिकांच्या जीवाशी खेळले जात असणे, या कंपनीच्या वायु प्रदूषणामुळे गडचांदूरातील व परिसरातील नागरिकांच्या सरासरी आयुर्मानात घट झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ च्या दरम्यान उघडकीस येणे, वायु प्रदुषणामुळे येथील नागरिकांच्या विविध रोगांनी ग्रासलेले असून कंपनीमधून मोठ्या प्रमाणात धूर बाहेर सोडण्यात येत असताना कंपनी व्यवस्थापन व चंद्रपूर प्रदुषण नियंत्रण मंडळ या गंभीर बाबीकडे मुद्दाम दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येणे, अल्ट्राटेक सिमेंट कंपनी पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन करीत असल्याने तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी स्थानिक जनतेकडून संबंधित प्रशासनाकडे तक्रारी करुनही त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याने स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत राज्यशासनाने चौकशी करून संबंधित कंपनीविरुद्ध व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांविरोधात कठोर स्वरुपाची कारवाई करण्याची आश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. सुभाष धोटे, वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र. (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| २८१ | "नाशिक तिर्थक्षेत्र ठिकाणच्या पवित्र गोदावरी नदीमध्ये दररोज ३५ ते ४० लाख लिटर सांडपाणी प्रक्रिया न करताच सोडले जात असल्याने गुणवत्तेच्या निकषानुसार सदरचे पाणी मनुष्य आणि प्राण्यांना पिण्यासाठी व आरोग्यासाठी योग्य नसून त्यांच्या आरोग्यावर घातक परिणाम होत असल्याचे राष्ट्रीय हरित लवादाने दि.१६.२.२०२२ रोजी गंभीर इशारा देणे, गोदावरी नदीत दर दिवशी ४५ ते ५० लाख लिटर सांडपाणी तयार होऊन त्यापैकी केवळ १० लाख लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याची व्यवस्था असणे, यामुळे दररोज ४० लाख लिटर सांडपाणी प्रक्रिया न करताच नदीमध्ये सोडले जात असल्याने नदीचे पाणी मोठ्या प्रमाणात प्रदुषित होऊन आरोग्यास घातक व हानीकारक असणे, सन २०१७ च्या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही सांडपाणी रोखण्यासाठी काहीच कारवाई न झाल्याने शासन तथा संबंधित अधिकाऱ्यांच्या अमानवी वर्तनाबद्दल तीव्र संताप व्यक्त करण्यात येणे, प्रत्यक्षात प्रदुषाला जबाबदार असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर आतापर्यंत केवळ शिस्तभंगाच्या कारवाईची केवळ औपचारिकता करून त्यांना कारवाई पासून शासनाकडून मिळालेले अभय, यामुळे देशाच्या कानाकोपऱ्यातून येणारे लाखो भाविक आणि स्थानिक नागरीकांच्या आरोग्यास निर्माण झालेला गंभीर धोका, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील नागरीकांमध्ये निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावायची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. सुनिल प्रभू, दिलीपराव बनकर, वि.स.स. | कित्ता |
| २८२ | "ठाणे शहरात बनावट कागदपत्राच्या आधारे मोठ्या प्रमाणावर अवैध औषध विक्री दुकाने (केमिस्ट) सुरु असल्याची गंभीर बाब दिनांक १ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, विशेषतः वागळे इस्टेट या दाट लोकवस्ती असलेल्या विभागात अवैध औषध विक्री दुकाने राजरोसपणे सुरु असणे, स्वामी समर्थ मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स तसेच इतर संबंधित दुकानदारांनी दुकाने उघडण्यासाठी खोटे दस्तावेज शासनास सादर करून संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करून मिळविलेले परवाने, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी वारंवार शासनाकडे पत्रव्यवहार करून अवैध औषध विक्री दुकानांवर कारवाई करण्याची करण्यात आलेली मागणी, परंतु अद्यापपर्यंत कोणत्याही अवैध दुकानांवर कारवाई न होणे, परिणामी स्थानिक नागरिकांच्या जीवितास निर्माण झालेला धोका, या गंभीर विषयाबाबत शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया." | सर्वश्री. अबू आजमी, रईस शेख, मोरे, वि.स.स. | कित्ता |

## विवरण क्रमांक - ३९

## लक्षवेधी सूचनेवर अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

## (म.वि.स. नियम १०५ अन्वये )

**निरंक**

****

## विवरण क्रमांक ४०

## शासकीय ठराव (म.वि.स. नियम ११० अन्वये).

**निरंक**

***

# विवरण क्रमांक - ४१

## अशासकीय ठराव

(म.वि.स. नियम १०६ अन्वये)

(१) एकूण आलेले ठराव - ३६४

(२) अमान्य झालेले ठराव - ६८

(३) मान्य झालेले ठराव २९६

| अ.क्र. (१) | प्राथम्यक्रमानुसार चर्चेला आलेले ठराव (२) | सदस्यांचे नांव (३) | चर्चेचा दिनांक (४) | शेरा (५) |
|---|---|---|---|---|
| १ | "राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे." | श्री. गणेश नाईक, वि.स.स. | ४ मार्च, २०२२ | मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी सूचना पुकारली असता संबंधित सन्माननीय सदस्यांकडून सूचना सभागृहात मांडण्यात आली नाही. |
| २ | ''मुंबईसह राज्यात रेल्वेचे सर्वाधिक जाळे पसरलेले असणे, सर्वाधिक महसूल प्राप्त होवूनही केंद्राकडून पूरेशा प्रमाणात राज्यास निधी प्राप्त न होणे, महिला सुरक्षा, प्रलंबित योजना, रेल्वे समस्या, सुरक्षित प्रवास आणि प्रवाशांना अत्याधुनिक सेवा सुविधांकरीता आवश्यक निधीची तरतूद करून व्यवस्थापन करण्यासाठी महाराष्ट्र राज्याकरिता स्वतंत्र महाराष्ट्र रेल महामंडळ स्थापन करावे अशी आग्रही मागणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.'' | श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. | ४ मार्च, २०२२ | मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी सूचना पुकारली असता संबंधित सन्मानीय सदस्यांकडून सूचना सभागृहात मांडण्यात आली नाही |

| अ.क्र. (१) | प्राथम्यक्रमानुसार चर्चेला आलेले ठराव (२) | सदस्यांचे नांव (३) | चर्चेचा दिनांक (४) | शेरा (५) |
|---|---|---|---|---|
| ३ | ''शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्षे जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.'' | श्री. राणाजगजी-तसिंह पाटील, वि.स.स. | ४ मार्च, २०२२ | मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधाह नसभा यांनी सूचना पुकारली असता संबंधित सन्माननीय सदस्यांकडून सूचना सभागृ-हात मांडण्यात आली नाही. |
| ४ | "परकीय मुघल राजवटीच्या खाणाखुणा पुसून महाराष्ट्राच्या जाज्वल्य इतिहासाच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी व राज्याची अस्मिता जपण्यासाठी "औरंगाबाद" या शहराचे "संभाजीनगर" असे नामांतर करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे." | श्री.समिर मेघे, वि.स.स. | ४ मार्च, २०२२ | मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधा-नसभा यांनी सूचना पुकारली असता संबंधित सन्माननीय सदस्यांकडून सूचना सभागृ-हात मांडण्यात आली नाही. |
| ५ | "निजामी राजवटीच्या पाऊलखुणा संपुष्टात आणून स्थानिक वैशिष्ट्य असलेल्या लेण्यांची ख्याती सर्वदूर वृद्धींगत करण्याच्या दृष्टीने "उस्मानाबाद" या शहराचे "धाराशीव" असे नामांतर करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे." | श्री.सुरेश भोळे, वि.स.स. | ४ मार्च, २०२२ | मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधा-नसभा यांनी सूचना पुकारली असता संबंधित सन्माननीय सदस्यांकडून सूचना सभागृ-हात मांडण्यात आली नाही. |
| ६ | "मुंबईसह राज्यात रेडी रेकनरच्या दरात दरवर्षी वाढ होत असल्याने, सदनिब कांच्या किंमतीत प्रचंड वाढ होत असणे, विभागीय सर्वोच्च विक्री दर रेडिरेकस नरमध्ये ग्राह्य धरण्यात येत असल्याने, सदनिकांच्या किंमती, मुळ किंमतीपेक्षा कितीतरी अधिक पटीने वाढणे, यामुळे सर्वसामान्य जनतेस सदनिका खरेदी करणे आवाक्याबाहेर जाणे, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्यासाठी, रेडी -रेकनरचे वाढते दर स्थिर ठेवण्यासाठी राज्यातील जनतेकडून होत असलेली मागणी याबाबत राज्य शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे." | श्री.सुनिल प्रभु, वि.स.स. | ४ मार्च, २०२२ | मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधा-नसभा यांनी सूचना पुकारली असता संबंधित सन्माननीय सदस्यांकडून सूचना सभागृ-हात मांडण्यात आली नाही. |

| अ.क्र. (१) | प्राथम्यक्रमानुसार चर्चेला आलेले ठराव (२) | सदस्यांचे नांव (३) | चर्चेचा दिनांक (४) | शेरा (५) |
|---|---|---|---|---|
| ७ | "राज्यात अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यातील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदी काठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले असून त्यामुळे रहिवाशांच्या आरोग्यावर आणि मच्छीमार बांधवांच्या उपजीविकेच्या साधनांवर होणारा विपरीत परिणाम लक्षात घेता राज्यातील जलप्रदूषण समस्येवर उपाय शोधून त्यावर प्रभावीरित्या आळा घालण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे." | श्रीमती यामिनी जाधव, वि.स.स. | २५ मार्च, २०२२ | दि. २५ मार्च, २०२२ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली परंतु चर्चा झाली नाही. |
| ८ | "विदर्भात नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला कोरडा दुष्काळ असूनही पिक विमा नुकसान भरपाईपासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषांमुळे शेतकरी वंचित राहत असणे, यास शंभर वर्षे जुनी ब्रिटीश कालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा उत्पन्न काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे." | श्री.राजेश एकडे, वि.स.स. | २५ मार्च, २०२२ | दि. २५ मार्च, २०२२ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली परंतु चर्चा झाली नाही. |
| ९ | "शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, कीटकनाशके यांच्या किमतीमध्ये सतत होणारी वाढ तसेच शेतकऱ्यांना शेती मालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित असे शेती मालाचे भाव मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे." | श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स. | २५ मार्च, २०२२ | दि. २५ मार्च, २०२२ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली परंतु चर्चा झाली नाही. |

## विवरण क्रमांक ४२

## समिती नियुक्त करण्याबाबत प्रस्ताव

## (म.वि.स. नियम १९४ अन्वये).

**निरंक**

***

## विवरण क्रमांक ४३

### समिती नियुक्त करण्याबाबत प्रस्ताव (सर्वसाधारण)

### (म.वि.स. नियम १६३ अन्वये).

**निरंक**

***

# विवरण क्रमांक -४४

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ मधील विधानसभेच्या प्रथम ( अर्थसंकल्पीय ) अधिवेशनामध्ये विधानसभा विशेषाधिकार कक्षाकडे प्राप्त झालेल्या विशेषाधिकारभंगाच्या सूचनांचे विवरणपत्र.

| अ.क्र. | सूचना क्रमांक | सूचना देणारे सदस्य | सूचनेचा विषय | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक | सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | ९३ | श्री. संदिप रविंद्र क्षीरसागर, वि.स.स. दिनांक ०१/०३/२०२२ | बीड नगरपरिषदेचे प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी श्री. नामदेव टिळेकर व बीड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. उत्कर्ष गुट्टे व संबंधितांविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, सन्माननीय सदस्य लोकप्रतिनिधीत्व करीत असलेल्या बीड नगर परिषदेचे तत्कालीन अध्यक्ष श्री. भारतभूषण क्षीरसागर, त्यांचे पुत्र तथा नगरसेवक डॉ. योगेश क्षीरसागर व इतर नगरसेवक हे नगर परिषदेच्या अधिकारी व कर्मचारी यांना सोबत घेऊन नगरपरिषदेच्या हद्दीत बेकायदेशीर रितीने शासन निधीतील विकास कामांचे उद्घाटन करत आहेत. बीड विधानसभा मतदार संघाचा प्रतिनिधी म्हणून शासन निधीतून होत असलेल्या कामांचे उद्घाटन व शुभारंभ या कार्यक्रमाचे निमंत्रण संबंधित अधिकाऱ्यांनी मा. सदस्यांना देणे आवश्यक होते. बीड विधानसभा क्षेत्रात बेकायदेशीररित्या सुरू असलेल्या या शासकीय कार्यक्रमाच्या संदर्भात पत्र क्र. एस.आर. के/ १३१८/ २०२२/ दि.४/२/२०२२ नुसार प्रशासक, नगर परिषद, बीड व जिल्हाधिकारी, बीड यांना लेखी अवगत करूनही शासन परिपत्रकांचे आणि आदेशांचे उल्लंघन करण्यात आल्यामुळे झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय. | | सूचना मा. मुख्य सचिव यांच्याकडे चौकशीकरिता व योग्य त्या कार्यवाहीकरिता पाठविण्यासाठी प्रस्तावित करण्यात आली. |

| अ.क्र. | सूचना क्रमांक | सूचना देणारे सदस्य | सूचनेचा विषय | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक | सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| २ | ९४ | श्री. राणाजगजितसिंह, वि.स.स. दिनांक ०२/०३/२०२२ | मा. श्री. दादाजी भुसे, कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य व श्री. एकनाथ डवले, प्रधान सचिव, कृषी विभाग यांचेविरुद्ध सुचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, " खरिप २०२१ हंगामात उस्मानाबाद जिल्ह्यात सोयाबीन पिकाचे ७० ते ८०% नुकसान झाल्याचा कृषी व पिक विमा कंपनीचा संयुक्त अहवाल असतानाही बजाज अलायन्स कंपनीने योजनेच्या कार्य प्रणालीतील मार्गदर्शक सूचनांचा चुकीचा संदर्भ लावत रु. १५,००० ते १८,००० प्र.हे. प्रमाणे पिक विमा वितरित केल्यामुळे शेतकऱ्यांना एकूण रु. ३०,००० ते ३६,००० प्र.हे हक्काची नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेतील तरतुदीप्रमाणे नुकसान भरपाईची रक्कम २५ लाखापेक्षा जास्त असल्याने कृषी सचिव यांना राज्य तक्रार निवारण समितीचे अध्यक्ष या नात्याने या विषयावर बैठक घेऊन शेतकऱ्यांना प्रत्यक्ष झालेल्या नुकसानी प्रमाणे अनुज्ञेय पीक विमा देण्याचे विमा कंपनीला आदेश करण्याबाबत लेखी पत्राद्वारे सूचित केले होते. प्रधानमंत्री पीक विमा योजना शासन निर्णय प्रपीवियो-२०२०/प्र. क्र.४०/११-अ, दि.२९/०६/२०२० मध्ये गंभीर स्वरूपाच्या तक्रारी, एकाहून अधिक जिल्ह्याशी संबंधित तसेच नुकसानीची व्याप्ती रु. २५ लाखांहून अधिक असेल अशा तक्रारी राज्यस्तरीय समितीकडे सादर करतील, राज्यस्तरीय समिती तक्रार प्राप्त झाल्यानंतर तत्काळ निकाली काढेल. समितीचा निर्णय सर्व घटकांना मान्य असेल, असे स्पष्ट नमूद केले आहे व त्यानुषंगाने कृषी मंत्री महोदयांकडे तसेच | | खुलासा मागविण्यासाठी प्रस्तावित |

| अ.क्र. | सूचना क्रमांक | सूचना देणारे सदस्य | सूचनेचा विषय | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक | सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | राज्यस्तरीय तक्रार निवारण समितीचे अध्यक्ष म्हणून प्रधान सचिव कृषी श्री. एकनाथ डवले यांच्याकडे लेखी स्वरूपात पत्राद्वारे तक्रार दाखल करून शेतकऱ्यांसाठी महत्वाच्या असलेल्या बाबीकडे लक्ष वेधूनही जाणूनबुजून अक्षम्य दुर्लक्ष करण्यात येत असल्याने झालेला सभागृहाचा व सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय." | | |
| ३ | ९५ | श्री. रवि राणा, वि.स.स. दिनांक ०८/०३/२०२२ | श्री. प्रविण आष्टीकर, मनपा आयुक्त, अमरावती, डॉ. आरती सिंग, पोलीस आयुक्त, अमरावती शहर, श्री. भरत गायकवाड, सहायक पोलीस आयुक्त, श्री. मनिष ठाकरे, राजापेठ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक, श्री. राहुल राऊत, राजापेठ पोलीस स्टेशनचे पोलीस उप निरीक्षक यांच्याविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, अमरावती येथील राजापेठ उड्डाणपुल येथे दिनांक १२ जानेवारी, २०२२ रोजी स्थापन करण्यात आलेला शिवछत्रपती राजे शिवाजी महाराज यांचा पुतळा अमरावती महानगरपालिका प्रशासन व पोलीस विभाग यांनी दिनांक १६ जानेवारी, २०२२ रोजी अर्ध्यारात्री उशिरा घातक साधनांचा वापर करून काढून अमरावती मनपाच्या अतिक्रमण विभागाच्या गोदामात ठेवल्याच्या घटनेमुळे तमाम शिवप्रेमींच्या भावना दुखावल्याने मनपा प्रशासन, अधिकारी यांचे विरोधात काही शिवभक्तांनी आपला संताप व्यक्त करत निषेध केला. यादरम्यान सदर घटनेच्या दिवशी मध्यरात्री ०३ ते ०४ वाजण्याच्या | | खुलासा मागविण्यासाठी प्रस्तावित |

| अ.क्र. | सूचना क्रमांक | सूचना देणारे सदस्य | सूचनेचा विषय | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक | सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | दरम्यान स्थानिक पोलिसांनी सन्माननीय सदस्यांच्या अमरावती येथील निवासस्थानी बळजबरीने प्रवेश करून दहशतवाद्यांप्रमाणे त्यांचे सोबत गैरवर्तन केले. काही दिवसांनी दिनांक ९/२/२०२२ रोजी अमरावती शहरातील काही शिवप्रेमींनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रती भावना दुखावल्याने राजापेठ भुयारी मार्ग येथे दुपारी अंदाजे १ ते ३ च्या दरम्यान महानगरपालिका आयुक्त श्री. प्रविण आष्टीकर यांचेवर शाई फेकून निषेध नोंदविला. सदर घटनेशी सन्माननीय सदस्यांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कोणताही संबंध नसताना, घटनेचे कोणतेही पुरावे मा. सदस्यांच्या विरोधात नसताना श्री. प्रविण आष्टीकर, महानगरपालिकेचे आयुक्त यांनी केवळ राजकीय आकसापोटी सदर गुन्ह्यात मा. सदस्यांचे नाव नोंदवून त्यांचेवर अपराध क्र. १३४/२०२२ अन्वये कलम ३०७, ३५३, ३३२, १४९, १४३, १४७, १४८,१४९,१०९,१२० (ब) ४२७, ५०० व ५०१ या गंभीर गुन्ह्यात त्यांना फसविण्यात आले आहे तसेच कायद्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी ज्यांच्यावर आहे त्या डॉ. आरती सिंग, पोलीस आयुक्त, अमरावती शहर, श्री. भरत गायकवाड, सहायक पोलीस आयुक्त, श्री. मनिष ठाकरे, राजापेठ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक, श्री. राहुल राऊत, राजापेठ पोलीस स्टेशनचे पोलीस उप निरीक्षक यांनी कोणत्याही बाबी तपासणी किंवा प्राथमिक चौकशी न करता वरील गंभीर गुन्हा रात्री ९.५१ मिनिटांनी सन्माननीय सदस्यांविरुद्ध नोंदविण्यात येऊन दिनांक | | |

| अ.क्र. | सूचना क्रमांक | सूचना देणारे सदस्य | सूचनेचा विषय | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक | सद्यःस्थिती |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | ३ मार्च, २०२२ पासून सुरु होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सन्माननीय सदस्यांना महापालिका, पोलीस प्रश्नांविषयी आवाज उठवता येऊ नये व अधिवेशनाचा कालावधी तुरुंगातच जावा ह्या भावनेने सन्माननीय सदस्य घटनास्थळी उपस्थित नसतानाही त्यांचे नाव जाणीवपूर्वक उक्त प्रकरणात गुंतवून त्यांच्या सभागृहाशी निगडीत कर्तव्ये बजावण्यामध्ये अडथळा आणल्यामुळे झालेला सन्माननीय सदस्य यांचा विशेषाधिकारभंग व अवमान हा होय. | | |
| ४ | ९६ | श्री. हरीष पिंपळे, वि.स.स. दिनांक ०८/०३/२०२२ | श्री. सुनील राठी, कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प, जलसंपत्ती अन्वेषण विभाग, अमरावती, जि.अमरावती यांच्याविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे "सन्माननीय सदस्य लोकप्रतिनिधीत्व करीत असलेल्या मुर्तीजापूर मतदारसंघात दाबयुक्त बंदिस्त नलिकाद्वारे सिंचन वितरण प्रणालीचा प्रस्ताव तयार करताना सन्माननीय सदस्यांना विश्वासात न घेता सदर प्रस्तावासंदर्भात कोणतीही माहिती सन्माननीय सदस्यांना उपलब्ध करून दिली नाही तसेच सन्माननीय सदस्य सन २००९ पासून लोकप्रतिनिधी असून त्यांना बैठकीला निमंत्रित न केल्याने तसेच सन्माननीय सदस्यांच्या मतदारसंघातील फक्त सहा गावांचा पाईपलाईन टाकण्याचा प्रस्ताव विचारात घेतल्याने सन्माननीय सदस्यांचा झालेला विशेषाधिकार भंग व अवमान हा होय" | | खुलासा मागविण्यासाठी प्रस्तावित |

| अ.क्र. | सूचना क्रमांक | सूचना देणारे सदस्य | सूचनेचा विषय | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक | सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| ५ | ९७ | श्री. गोवर्धन शर्मा, वि.स.स. दिनांक ०८/०३/२०२२ | जिल्हाधिकारी, अकोला यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "राज्याचे विधानमंडळाचे अधिवेशन कालावधीत मंत्रालयस्तरावर बैठक लावू नये असा नियम असतानाही जिल्हाधिकारी, अकोला यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२२ च्या कामकाज कालावधीत दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी अकोला मुख्यालय येथे बैठक आयोजित करून सन्माननीय सदस्यांना बैठकीला उपस्थित रहाण्याकरिता पत्र पाठविले असल्याने झालेला सभागृहाचा व सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय." | | खुलासा मागविण्यासाठी प्रस्तावित |
| ६ | ९८ | श्री. हरीष पिंपळे, वि.स.स. दिनांक ०८/०३/२०२२ | जिल्हाधिकारी, अकोला यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे," राज्याचे विधानमंडळाचे अधिवेशन कालावधीत मंत्रालयस्तरावर बैठक लावू नये असा नियम असतानाही जिल्हाधिकारी, अकोला यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२२ च्या कामकाज कालावधीत दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी अकोला मुख्यालय येथे बैठक आयोजित करून सन्माननीय सदस्यांना बैठकीला उपस्थित रहाण्याकरिता पत्र पाठविले असल्याने झालेला सभागृहाचा व सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय." | | खुलासा मागविण्यासाठी प्रस्तावित |

| अ.क्र. | सूचना क्रमांक | सूचना देणारे सदस्य | सूचनेचा विषय | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक | सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| ७ | ९९ | श्री. रणधीर सावरकर, वि.स.स. दिनांक ०८/०३/२०२२ | जिल्हाधिकारी, अकोला यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, " राज्याचे विधानमंडळाचे अधिवेशन कालावधीत मंत्रालयस्तरावर बैठक लावू नये असा नियम असतानाही जिल्हाधिकारी, अकोला यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२२ च्या कामकाज कालावधीत दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी अकोला मुख्यालय येथे बैठक आयोजित करून सन्माननीय सदस्यांना बैठकीला उपस्थित रहाण्याकरिता पत्र पाठविले असल्याने झालेला सभागृहाचा व सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय." | | खुलासा मागविण्यासाठी प्रस्तावित |
| ८ | १०० | श्री. सुनिल विजय टिंगरे, वि.स.स. दिनांक १०/०३/२०२२ | पुणे महानगरपालिकेतील श्री. सुहास जगताप (सहायक आयुक्त) व श्री. वैभव कडलक (सहायक आयुक्त), श्री.उंडे (समन्वय अधिकारी, डि.पी.डि.सी महानगरपालिका) तसेच येरवडा आणि नगररोड क्षेत्रिय कार्यालयांतर्गत येणारे संबंधीत उपअभियंता व शाखा अभियंता यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "सन्माननीय सदस्यांनी स्थानिक विकास निधीसंदर्भात नियोजन अधिकारी, पुणे यांना प्रस्तावित केलेल्या कामांना प्रशासकीय मान्यतेकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी झोपडपट्टीमधील कामे करण्यास महानगरपालिकेची ना हरकत मागविलेली होती .परंतु, महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांच्याकडे वारंवार मागणी करुन, बैठक घेवून तसेच स्मरणपत्र पाठवूनही सन्माननीय सदस्यांच्या रुपये दीड कोटींच्या निधींच्या विकास कामांना ना- | | खुलासा मागविण्यासाठी प्रस्तावित |

| अ.क्र. | सूचना क्रमांक | सूचना देणारे सदस्य | सूचनेचा विषय | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक | सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | हरकत प्रमाणपत्र देण्यात आले नसून त्यास जबाबदार असलेले पुणे महानगरपालिकेतील श्री. सुहास जगताप (सहायक आयुक्त) व श्री. वैभव कडलक (सहायक आयुक्त), श्री.उंडे (समन्वय अधिकारी, डी.पी.डि.सी महानगरपालिका) तसेच येरवडा आणि नगररोड क्षेत्रिय कार्यालयांतर्गत येणारे संबंधीत उपअभियंता व शाखा अभियंता या अधिकाऱ्यांनी सन्माननीय सदस्यांच्या विकास कामांमध्ये अडथळा आणून लोकप्रतिनीधींना अपमानास्पद वागणूक व मानसिक त्रास दिल्यामुळे झालेला सभागृहाचा व सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय." | | |
| ९ | १०१ | श्री. मंगेश चव्हाण, वि.स.स. दिनांक १५/०३/२०२२ | श्री. वि.र. शिंदे, कक्ष अधिकारी व श्री. प्रविण जैन, उप सचिव, ग्राम विकास विभाग (बांधकाम-४), महाराष्ट्र शासन यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "सन्माननीय सदस्य लोकप्रतिनिधित्व करीत असलेल्या मतदारसंघात पंचायत समितीची इमारत अतिशय जीर्ण झाल्याने नवीन प्रशासकीय इमारत बांधकामासाठी जिल्हा परिषद, जळगाव यांची मान्यता घेऊन पंचायत समितीमध्ये ठराव पारीत करून चाळीसगाव तालुक्यातील लोकसंख्येच्या दृष्टीने पंचायत समितीतील सर्व विभाग एकाच छताखाली उपलब्ध व्हावेत या हेतूने सन्माननीय सदस्यांनी मा.ग्रामविकास मंत्री यांना दिनांक २२ जुलै, २०२१ रोजीच्या पत्रान्वये पंचायत समितीची नवीन प्रशासकीय इमारत मंजूर करून त्यासाठी लागणारा निधी तातडीने उपलब्ध करून द्यावा | | खुलासा मागविण्यासाठी प्रस्तावित |

| अ.क्र. | सूचना क्रमांक | सूचना देणारे सदस्य | सूचनेचा विषय | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक | सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | अशी विनंती केली होती. तसेच पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीसाठी जमिनीच्या मोजणीपासून ते ताबा घेण्यापर्यंत पाठपुरावा करून त्यानुसार शासनाकडे रितसर प्रस्ताव सादर केला होता. मात्र श्री. वि.र. शिंदे, कक्ष अधिकारी व श्री. प्रविण जैन, उप सचिव, ग्राम विकास विभाग (बांधकाम-४), महाराष्ट्र शासन यांनी विद्यमान आमदारांच्या पत्राचा उल्लेख जाणीवपूर्वक टाळून माजी आमदार श्री. राजीवन देशमुख यांच्या पत्रामुळेच नवीन प्रशासकीय इमारतीचे काम झाले आहे असे जाणीवपूर्वक भासवल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा अवमान व विशेषाधिकार भंग हा होय." | | |
| १० | १०२ | श्री. कैलाश गोरंटयाल, वि.स.स. दिनांक २२/०३/२०२२ | श्रीमती कल्पना क्षिरसागर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना व श्री. डी.एच डाकोरे कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद उपविभाग, जालना यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, सन्माननीय सदस्यांचा मतदारसंघ असलेल्या जालना येथे ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत २५१५ इतर ग्रामीण विकास कार्यक्रम योजनेंतर्गत पंचायत समिती, जालना प्रशासकीय इमारत बांधकाम येथील "नुतन इमारत उद्‌घाटन सोहळा" महसूल राज्यमंत्री यांच्या शुभहस्ते शनिवार, दिनांक १९ मार्च, २०२२ रोजी संपन्न झाला. या सोहळ्याच्या निमंत्रण पत्रिकेत सन्माननीय सदस्य स्थानिक लोकप्रतिनीधी असताना देखील त्यांचे नावाला अग्रक्रम न देता त्यांचे नाव खालच्या क्रमांकावर नमूद करून माजी विधानसभा सदस्यांच्या नावाला अग्रक्रम देण्यात आल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय." | | खुलासा मागविण्यासाठी प्रस्तावित |

| अ.क्र. | सूचना क्रमांक | सूचना देणारे सदस्य | सूचनेचा विषय | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक | सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| ११ | १०३ | श्री. दिपक केसरकर , वि.स.स. तथा समिती प्रमुख, विधानसभा विशेषहक्क समिती २५/०३/२०२२ | कोकण विभागीय आयुक्त श्री. विलास पाटील तसेच श्री. राजन तेली यांच्याविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सन्माननीय सदस्यांच्या मतदारसंघातील मौजे आंबोली, चौकुळ व गेळे (ता.सावंतवाडी) येथील गावातील जमिनी संस्थान काळात कबुलायतीने देण्यात आल्या असून सदर जमिनींचे वाटप गावातील स्थानिक शेतकऱ्यांना करण्याबाबत सन्माननीय सदस्यांनी जिल्ह्याचा पालकमंत्री असताना पुढाकार घेतला होता. तथापि, तत्कालीन सरकारने घेतलेल्या महाराष्ट्र शासनाच्या जमीन वाटपाच्या धोरणात्मक निर्णयांना स्थगिती देण्यात आल्याने त्याचे पुनर्विलोकन करण्याबाबतचा अंतिम निर्णय प्रलंबित असल्याने उक्त प्रकरणी मा.मुख्यमंत्री यांनी संबंधित खात्यांची एकत्रित बैठक लावण्याबाबत आदेश दिले होते. यासंदर्भात कोकण आयुक्त श्री. पाटील यांनी विधानसभेचे अधिवेशन चालू असताना गुरुवार, दिनांक १७ मार्च, २०२२ रोजी सिंधुदुर्ग येथे विरोधी पक्षाचे प्रदेश चिटणीस श्री. राजन तेली व ग्रामस्थांसमवेत बैठक घेतली मात्र सन्माननीय सदस्य स्थानिक लोकप्रतिनिधी असताना देखील तसेच या प्रश्नासंदर्भात त्यांनी सातत्याने पाठपुरावा केलेला असताना देखील त्यांना या बैठकीस आमंत्रित करण्यात आले नाही. राज्याच्या विधानसभेचे अधिवेशन सुरू असताना अगदी मंत्रालयस्तरावर सुद्धा बैठकी आयोजित करण्यात येऊ नयेत असे शासनाचे आदेश असताना देखील बैठक आयोजित | | पुढील कार्यवाही करण्यास्तव प्रस्तावित |

| अ.क्र. | सूचना क्रमांक | सूचना देणारे सदस्य | सूचनेचा विषय | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक | सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | करण्यात येऊन सन्माननीय सदस्यांना बैठकीस बोलावण्यात आले नाही. त्याचप्रमाणे सिंधुदुर्ग भाजपा जिल्हाध्यक्ष श्री. राजन तेली यांनी पत्रकार परिषद घेऊन सन्माननीय सदस्यांच्या मतदारसंघातील लोकोपयोगी कामासंदर्भात तसेच त्यांच्या सभागृहाशी संबंधित कामकाजाबाबत अत्यंत आक्षेपार्ह भाषेत जाहीर टिकाटिप्पणी करून, आव्हान केल्यामुळे झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकारभंग व अवमान हा होय. | | |
| १२ | १०४ | श्री. विकास ठाकरे, वि.स.स. दिनांक २१/०३/२०२२ | श्री. श्रीकांत ढोके, उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, सन्माननीय सदस्यांनी श्री. श्रीकांत ढोके, उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांना पत्र क्र. २७८०/२०२१, दिनांक ८/१२/२०२१ रोजी दिलेल्या पत्रामध्ये महात्मा ज्योतीबा फुले यांच्या चित्रपटासंदर्भात आणि तत्कालीन संचालक श्री. अजय आंबेकर यांच्या प्राथमिक विभागीय चौकशी अहवालाची माहिती मिळण्याबाबत विनंती केली असता सदर माहिती सन्माननीय सदस्यांना देण्याबाबत खूप टाळाटाळ करण्यात येऊन जवळपास ३ महिने पाठपुरावा तसेच २ स्मरण पत्रे देऊनही अद्याप माहिती देण्यात आलेली नसल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय." | | खुलासा मागविण्यासाठी प्रस्तावित. |

| अ.क्र. | सूचना क्रमांक | सूचना देणारे सदस्य | सूचनेचा विषय | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक | सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १३ | १०५ | श्री. विकास ठाकरे, वि.स.स. दिनांक २१/०३/२०२२ | श्री. दीपक कपूर, महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, सन्माननीय सदस्यांनी श्री दीपक कपूर, महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालाय यांना पत्र क्रमांक १०३२/२०२१, दिनांक ०३/०४/२०२१ रोजी दिलेल्या पत्रामध्ये माहिती व जनसंपर्क संचालनालय कार्यालयांतर्गत तत्कालीन संचालक श्री अजय अंबेकर यांनी केलेल्या विविध गैरव्यवहाराबाबत ९ मुद्यांची माहिती मिळण्याबाबत व पत्र क्रमांक M-८०/२०२१ दिनांक १८/११/२०२१ रोजी दिलेल्या पत्रामध्ये महात्मा ज्योतीबा फुले यांच्या चित्रपटासंदर्भात तसेच तत्कालीन संचालक श्री. अजय आंबेकर यांच्या प्राथमिक विभागीय चौकशी अहवालाची माहिती मिळण्याबाबत आणि पत्र क्रमांक ४७/२०२२, दिनांक ०४/०१/२०२२ रोजी दिलेल्या पत्रामध्ये माहिती व जनसंपर्क संचालनालच्या निविदा क्र./ Digitual Wall Painting notice-२०१९/०३ आणि शासन निर्णय क्रमांकः मावज २०१७/प्र.क्र.१५३/ का.३, दिनांक २१ जुलै, २०१७ याचे ७.५% खर्चासंबंधित संपूर्ण कागदपत्रे (नस्ती) मिळण्याबाबत विनंती केली असता सदर माहिती देण्यासाठी खूप टाळाटाळ करण्यात आली असून जवळपास १ वर्षापासून पाठपुरावा करुनही वरील तीनही विषयाबाबतची माहिती अद्याप अप्राप्त असल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय." | | खुलासा मागविण्यासाठी प्रस्तावित |

## महाराष्ट्र विधानसभा

## अहवाल सादर करण्यास्तव

## विधानसभा विशेषाधिकार समितीकडे सूपुर्द करण्यात आलेली प्रकरणे.

| अ.क्र. | सूचना क्रमांक | सूचना देणारे सदस्य | सूचनेचा विषय | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक | सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | १३ | श्री.प्रताप सरनाईक, वि.स.स. दिनांक ०७/०९/२०२० | श्री.अर्णब गोस्वामी, संपादक, वृत्त निवेदक व कार्यक्रम सूत्र संचालक, रिपब्लिक टिव्ही वृत्तवाहिनी यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, श्री.अर्णब गोस्वामी, संपादक, वृत्त निवेदक व कार्यक्रम सूत्र संचालक, रिपब्लिक टिव्ही वृत्तवाहिनी यांचेद्वारे अनेक कार्यक्रमांमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून एका चित्रपट अभिनेत्याच्या आत्महत्या प्रकरणावरुन या वृत्तवाहिनीवर सातत्याने कपोलकल्पित चर्चा घडवून आणण्यात येत असून या चर्चेमध्ये या राज्याचे प्रमुख असलेले माननीय मुख्यमंत्री, श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचेवर अत्यंत आक्षेपार्ह, एकेरी व अश्लाघ्य भाषेत टिकाटीपणी करून मा.मुख्यमंत्री, मंत्रिमंडळाचे मंत्री, शासन यांचेबाबत जाणूनबुजून, हेतुपुरस्सर व दुष्टबुद्धीने अत्यंत आक्षेपार्ह व अवमानकारक विधाने करुन वृत्तपत्रीय पत्रकारितेच्या सर्व मर्यादा पायदळी तुडविण्यात येऊन वस्तुस्थितीदर्शक माहिती न घेता अत्यंत आक्षेपार्ह, मानहानीकारक व खोडसाळ वृत्त जाणीवपूर्वक प्रसारित करून महाराष्ट्रातील व देशातील जनतेच्या मनात एकूणच मा.मुख्यमंत्री, मंत्रिमंडळातील त्यांचे सहकारी | दिनांक ७ जुलै २०२० | अहवाल सादर करण्यास्तव प्रकरण समितीकडे सुपूर्द करण्यात आले. |

| अ.क्र. | सूचना क्रमांक | सूचना देणारे सदस्य | सूचनेचा विषय | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक | सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | मंत्री व शासन यांचेबद्दल संशय निर्माण होईल, त्यांची बदनामी होईल, अशा प्रकारची वातावरण निर्मिती करण्याचा प्रयत्न करुन माननीय मुख्यमंत्री ज्या विधानमंडळाचा भाग आहेत त्या विधानमंडळावरच अप्रत्यक्षपणे तसेच मंत्रिमंडळावर देखील प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे अत्यंत अवमानकारक, आक्षेपार्ह व असत्य टिकाटीपणी व निराधार आरोप करून मुख्यमंत्र्यांना प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे सभागृहाचे कामकाज पार पाडण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करून विधानमंडळाचा, सभागृहाचा व सभागृहाचे सदस्य असलेल्या मा.मुख्यमंत्री यांचा केलेला विशेषाधिकार भंग व अवमान हा होय. | ०७/०९/२० | |
| २ | १५ | श्री.प्रताप सरनाईक, वि.स.स. दिनांक ०७/०९/२०२० | हिंदी सिने अभिनेत्री कंगना राणावत यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "हिंदी सिने अभिनेत्री कंगना राणावत यांनी मुंबई बद्दल अत्यंत मानहानीकारक वक्तव्य करून मुंबई पाक व्याप्त काश्मीरसारखी वाटते असे बेताल वक्तव्य ट्वीटद्वारे करून त्याद्वारे मुंबईसाठी बलिदान केलेल्या १०८ हुतात्म्यांचा अपमान करून संपूर्ण महाराष्ट्राचा अवमान केल्याने झालेला विशेषाधिकार भंग व अवमान हा होय." | | अहवाल सादर करण्यास्तव प्रकरण समितीकडे सूपुर्द करण्यात आले. |

# विवरण क्रमांक - ४५

## सांविधिक प्रस्ताव

( म.वि.स. नियम २९० अन्वये )

निरंक

****

# विवरण क्रमांक ४६
## अंतिम आठवडा प्रस्ताव
## (म.वि.स. नियम २९२ अन्वये )

| अ.क्र. (१) | सदस्यांचे नांव (२) | विषय (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १. | सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, ॲड आशिष शेलार, सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, गिरीष महाजन, नितेश राणे, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री गणेश नाईक, मंगलप्रभात लोढा, अतुल भातखळकर, अमित साटम, योगेश सागर, रणधीर सावरकर, प्रशांत ठाकूर, ॲड पराग अळवणी, ॲड राहूल नार्वेकर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री सुनील राणे, संजय केळकर, रविंद्र चव्हाण, मिहिर कोटेचा, कॅ. आर. तमिल सेल्वन, सर्वश्री पराग शहा, राम कदम, डॉ. भारती लव्हेकर, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री महेश बालदी, सुभाष देशमुख, हरिभाऊ बागडे, श्रीमती विद्या ठाकूर, सर्वश्री कालिदास कोळंबकर, विजय देशमुख, सिद्धार्थ शिरोळे, भिमराव तापकीर, सुनिल कांबळे, लक्ष्मण जगताप, महेश लांडगे, संभाजी पाटील-निलंगेकर, अभिमन्यु पवार, राणाजगजितसिंह पाटील, सचिन कल्याणशेट्टी, | "मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर असूनही मूलभूत पायाभूत सुविधा या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नसणे, गेल्या पंचवीस वर्षात मुंबई महानगर पालिकेच्या स्थायी समितीमार्फत किमान अडीच लाख कोटींपेक्षा जास्त कामांच्या निविदा मंजूर होऊन मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होणे, कोव्हीडच्या काळामध्ये मुंबई महानगरपालिकेमध्ये हजारो कोटींचा भ्रष्टाचार झालेला निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिकेतील इमारत प्रस्ताव व बांधकाम विभागामार्फत ५० हजार कोटींपेक्षा जास्त रकमेचा भ्रष्टाचार होणे, मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समिती अध्यक्षांच्या विविध मालमत्तांवर आयकर विभागाच्या धाडी पडल्यावर त्यांच्या ३८ बेनामी मालमत्ता जप्त केल्या असल्याचे उघडकीस येणे, राजकीय आश्रयाशिवाय हे सर्व शक्य नसणे, टॅब खरेदी, सफाई कामगार वसाहत पुनर्विकासाच्या आश्रय योजनेमध्ये १८०० कोटींचा भ्रष्टाचार, जिजामाता उद्यान व प्राणीसंग्रहालयाच्या आधुनिकीकरणाचा प्रकल्प, ९०० इलेक्ट्रिक बसेसचे कंत्राट यासारख्या प्रक्रियांमध्ये घोटाळा झाला असणे, मुंबईच्या कोळीवाडा व गावठाणाकरिता वेगळा डीसीआर तयार करण्याची प्रक्रिया प्रलंबित राहिल्यामुळे मुंबईचे कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरावस्था, तत्कालीन सरकारच्या कालावधीमध्ये मुंबई मेट्रोपॉलिटन रिजनमध्ये २५६ किलोमीटरच्या मेट्रोच्या जाळ्याचे काम सुरू होणे, मात्र या सरकारच्या कार्यकाळात मेट्रोच्या कामाचा झालेला खोळंबा व मेट्रोच्या | २४ व २५ मार्च, २०२२ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र. (१) | सदस्यांचे नांव (२) | विषय (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | राम सातपुते, डॉ.सुरेश खाडे, श्री मोहन मते, सर्वश्रीमती सीमा हिरे, नमिता मुंदडा, श्वेता महाले, ॲड राहूल कुल, श्री दादाराव केचे, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री.शिवेंद्रराजे भोसले, जयकुमार रावल, जयकुमार गोरे, डॉ.विजयकुमार गावित, डॉ.संजय कुटे, सर्वश्री राजेंद्र पाटणी, समीर कुणावार, डॉ.देवराव होळी, श्री. संजीवरेड्डी बोदकुरवार, प्रा.डॉ.अशोक उईके, सर्वश्री मदन येरावार, राजेश पवार, संतोष दानवे, बबनराव लोणीकर, डॉ.तुषार राठोड, डॉ. संदीप धुर्वे, सर्वश्री. अतुल सावे, प्रशांत बंब, किसन कथोरे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री. गणपत गायकवाड, कुमार आयलानी, प्रकाश आवाडे, समाधान अवताडे, धनंजय गाडगीळ, प्रताप अडसड, समिर मेघे, हरिष पिंपळे, नामदेव ससाने, ॲड. आकाश फुंडकर, सर्वश्री. राजेश पाडवी, कीर्तीकुमार भांगडिया, भिमराव केराम, गोवर्धन शर्मा, प्रकाश भारसाकळे, लखन मलिक, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री. टेकचंद सावरकर, विजय रहांगडाले, कृष्णा गजबे, विकास कुंभारे, कृष्णा खोपडे, श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर, डॉ. राहूल आहेर, श्री. दिलीप | कामांच्या किंमतीमध्ये १० हजार कोटींपेक्षा जास्त वाढ झालेली असणे, मुंबई महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाने गेल्या १० वर्षांमध्ये ३८,८९९ झाडे तोडण्याची परवानगी दिलेली असतानाही फक्त २७०० झाडांसाठी व अहंकारापोटी आरेची कारशेड रोखली असल्यामुळे मेट्रोचा खोळंबा होऊन हा प्रकल्प दीर्घ काळाकरिता प्रलंबित राहणार असणे, १५ लाख घरांची आवश्यकता असताना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत फक्त सुमारे २ लाख घरे तयार झालेली असणे, मोठ्या प्रमाणावर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कार्यालयांमध्ये व खात्यामध्ये होणारा भ्रष्टाचार, सन २०११ पर्यंतच्या सर्व झोपडपट्ट्यांमधील घरांना प्रधानमंत्री आवास योजनेच्याअंतर्गत घरे देण्याचा कायदा सन २०१८ मध्ये पारित होऊनही सदर कायद्याची अंमलबजावणी न होणे, पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्पातील भाडेकरुंना बेघर करून त्यांना भाडेही न मिळणे, म्हाडामध्येही मोठ्या प्रमाणावर होत असलेला भ्रष्टाचार, मुंबईचे डबेवाला भवन व मराठी भाषा भवन अद्याप दृष्टिपथातही नसणे, मुंबई महानगरपालिकेच्या मराठी शाळांची पटसंख्या रोडावून ७० टक्क्यांपेक्षा खाली गेलेली असणे, मुंबईकरांच्या सोयीसुविधांकडे दुर्लक्ष करत असताना मुंबई क्लायमेट ॲक्शन प्लॅनच्यामार्फत पर्यावरण विभागाचे दुटप्पी धोरण हे मुंबईकरांच्या समोर आलेले असणे, पवई तलावामध्ये भराव टाकून पर्यावरणाचे नुकसान करून हट्टापायी पवई सायकल ट्रॅकचा प्रस्ताव आणणे, सदर सायकल ट्रॅकला मुंबई हायकोर्टाकडून चपराक मिळणे, मुंबई शहरातील कचऱ्याची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट होत नसल्यामुळे मुंबईचे वातावरण व हवामान दूषित झालेले असणे, मुंबई शहरातील ग्रीन बिल्डिंग्जना मालमत्ता करातून सूट देण्याचा प्रस्ताव प्रलंबित असणे, ठाणे शहरातील स्मार्ट सिटी | |

| अ.क्र. (१) | सदस्यांचे नांव (२) | विषय (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
